THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY

OU_184480

UNIVERSAL
LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M 928 K93M Accession No. M 1832

Author मिराशी, वासुदेव विष्णु.

Title कालिदास. 1934

This book should be returned on or before the date last marked below.

नव भारत ग्रंथ माला

८

कालिदास

नवभारत ग्रंथमालेचीं

लवकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

सापेक्षतादर्शन

लेखक, श्री. श्री. गो. भालेराव

विख्यात वास्तवशास्त्रज्ञ आइनस्टाइन याच्या सापेक्षतावादाचें (Theory of Relativity) सुबोध रीतीने केलेलें विवरण. अखिल विश्वाविषयींच्या आपल्या विचारसरणींत विलक्षण क्रांति घडवून आणणाऱ्या हचा सिद्धान्तावर आजवर ३७७५ पुस्तकें जगांतील भाषांत लिहिलीं गेलीं आहेत ! परंतु मराठींत हा प्रयत्न जवळ जवळ अपूर्वच आहे.

प्राचीन भारतीय शिक्षणपद्धति

लेखक, डॉ. अनंत सदाशिव आळतेकर

वैदिक कालापासून इ. स. १२०० पर्यंतच्या प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीचें वर्णन व विवेचन हया ग्रंथांत आलें आहे. हया ग्रंथाचा विशेष हा की शिक्षणविषयक बाबतीबद्दल शास्त्रकारांचे व स्मृतिकारांचे नियम काय आहेत एवढयाचाच विचार न करितां, ते नियम प्रत्यक्ष आचरणामध्यें किती येत याचीही छाननी संशयातीत ऐतिहासिक पुराव्याच्या आधारें यांत करण्यांत आली आहे. हा संशोधनात्मक परंतु अतिशय मनोरंजक ग्रंथ मराठींत केवळ अद्वितीय असा होणार आहे.

आधुनिक मराठी कविता

लेखक, श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर

मराठी वाङमयाचा विवेचक व सोपपत्तिक इतिहास 'माले' मधून प्रसिद्ध करण्याची जी योजना केली आहे तिच्यापैकी हा एक ग्रंथ असून तो श्री. माडखोलकरांच्या लेखणींतून उतरला आहे, यापेक्षा त्याचें अधिक वर्णन करण्याचें कारणच नाही. अत्यंत कुतूहलजनक विषय व तज्ज्ञ आणि विख्यात लेखक यांचा सुंदर संयोग प्रस्तुत ग्रंथाच्या बाबतींत जमून आला आहे.

कालिदास

लेखक

वासुदेव विष्णु मिराशी, एम्. ए.

संस्कृत भाषेचे अध्यापक,

मॉरिस कॉलेज, नागपूर.

सुविचार प्रकाशन मंडळ, लिमिटेड

शके १८५६] नागपूर [इ. स. १९३४

मुद्रक—पांडुरंग नारायण बनहट्टी, बी. एस्सी.,
व्यवस्थापक, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर.

प्रकाशक—वेंकटेश शामराव बलकुंदी, बी. ए., एल्एल्. बी.,
म्यानेजिंग डायरेक्टर, सुविचार प्रकाशन मंडळ लि.,
धनतोली, नागपूर.

प्रारंभीं

पांच सहा वर्षांपूर्वी नागपूरच्या 'महाराष्ट्र' वर्तमानपत्रांत मी कालिदासावर सहा लेख लिहिले. ते वाचकांना फार आवडल्यामुळें माझ्या कांही सन्मान्य मित्रांनी कालिदासाचें चरित्र लिहिण्याविषयीं मला आग्रह केला. पण इतर व्यवसायांमुळें हें काम मागे पडलें. पुढे माझे मित्र प्रो. श्री. ना. बनहट्टी यांनी 'नवभारत ग्रंथमाले'ची कल्पना काढली त्यावेळीं त्यांनी माझ्या नांवावर कालिदास हा विषय घातला. तथापि माझ्या संमतीशिवाय तो त्यांनी जाहीरही केला नसता, तर आज हें पुस्तक प्रकाशित होण्याचा योग आला असता असें मला वाटत नाही. तेव्हा या बऱ्यावाईट पुस्तकाचें बरेंचसें श्रेय अथवा जबाबदारी प्रो. बनहट्टी यांची आहे.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा कालिदासावरील मार्मिक निबंध प्रसिद्ध झाल्यास आज साठांवर वर्षें झालीं. या दीर्घ कालांत युरोपीय व इतर हिंदी भाषांतल्याप्रमाणें मराठींतही बरेंच कालिदासविषयक संशोधन झालें आहे. तथापि कालिदासविषयक विविध प्रश्नांचा सर्व बाजूंनी विचार करून लिहिलेल्या ग्रंथाची केवळ मराठींतच नव्हे तर माझ्या माहितीप्रमाणें इंग्लिश भाषेंतही उणीव आहे. मराठींतील ही उणीव शक्य तों भरून काढावी या हेतूने हा प्रयत्न केला आहे.

कालिदासविषयक वादग्रस्त प्रश्नांचा ऊहापोह अनेक विद्वानांनी केला आहे. तथापि त्यांपैकी बहुतेक प्रश्न अद्यापि अनिर्णीत आहेत. म्हणून प्रस्तुत पुस्तकांत या प्रश्नांविषयीं केवळ स्वतःचें मत न देतां, आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या प्रमुख मतांचाही उपन्यास व परीक्षण केलें आहे. त्यामुळें वाचकांस आपलें मत बनविण्यास मदत होईल असें वाटतें. संस्कृतज्ञ वाचकांस प्रस्तुत पुस्तकांतील हा भाग मनोरंजक व महत्त्वाचा वाटेल अशी आशा आहे. इतर वाचकांसही तो सुलभतेने ग्रहण करतां यावा म्हणून या पुस्तकांतील कालिदासकालीन परिस्थिति, त्याचीं काव्यें व

नाटकें याविषयींचीं प्रकरणें सविस्तर लिहिलीं आहेत. तीं प्रथम वाचलीं असतां इतर भाग समजण्यास अडचण पडणार नाही असें वाटतें. प्रस्तुत पुस्तकांत उद्धृत केलेल्या संस्कृत श्लोकांचें बहुतेक ठिकाणीं मराठी भाषांतर दिलें आहे. प्रत्येक ठिकाणीं तसें करणें विस्तारभयास्तव शक्य नव्हतें. तथापि अशा ठिकाणींही त्यांचा सारांश किंवा मथितार्थ दिला असल्यामुळें संस्कृतानभिज्ञ वाचकांसही एकंदर विवेचन समजण्यास अडचण पडणार नाही अशी आशा आहे.

प्रस्तुत पुस्तकांत मला उपलब्ध असलेल्या सर्व कालिदासविषयक ग्रंथांचा व लेखांचा मी उपयोग केला आहे व बहुतेक ठिकाणीं पूर्वगामी संशोधकांच्या ऋणाचा निर्देश केला आहे. जिज्ञासु वाचकांस परीक्षणाची सत्यासत्यता स्वतः पडताळून पाहतां यावी म्हणून बहुतेक महत्त्वाच्या ठिकाणीं संदर्भ दिले आहेत. या पुस्तकांत इतर संशोधकांच्या मतांचा केवळ अनुवाद नसून बहुश्रुत वाचकांस त्यांतील प्रत्येक प्रकरणांत नवीन संशोधन, माहिती व विचार आढळतील असा मला भरंवसा आहे. शेवटीं ज्या थोर कवीच्या रम्य ग्रंथांनी विद्यार्थिदशेपासून माझ्या मनावर मोहिनी घातली त्याच्या चरित्राचें व ग्रंथांचें मला पटलें तें सत्य स्वरूप मराठी वाचकांपुढें मांडून मला आज अंशतः त्याचा उतराई होतां येत आहे याबद्दल अत्यानंद होत आहे.

हें पुस्तक लिहितांना ज्यांच्या ग्रंथांचा व लेखांचा मी उपयोग केला आहे त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें. या ठिकाणीं श्रीयुत के. ल. ओगले यांच्या कालिदासविषयक मार्मिक लेखांचा प्रमुख्याने उलेख केला पाहिजे. आठव्या प्रकरणांतील राजकारण व शिक्षण या विषयांवरच्या कालिदासीय विचारांचें विवेचन करतांना मला त्यांच्या लेखांची मदत झाली आहे. 'नवभारत ग्रंथमाले'चे संपादक प्रो. श्री. ना. बनहट्टी यांनी पुस्तक छापलें जात असतां अनेक उपयुक्त सूचना केल्या याबद्दल त्यांचेही आभार मानतों.

नागपूर
१५ मार्च १९३४.

वा. वि. मिराशी.


माझे पितृतुल्य वडील बंधु

ती. सीताराम विष्णु मिराशी

यांस

प्रेमादरपूर्वक अर्पण

अनुक्रमणिका



प्रकरण		पृष्ठ
१. कालनिर्णय	..	९–४१
२. कालिदासकालीन परिस्थिति	..	४१–५६
३. जन्मस्थानाचा वाद	..	५७–६९
४. चरित्रविषयक अनुमानें	..	७०–९४
५. कालिदासाचीं काव्यें	..	९४–१३८
६. कालिदासाचीं नाटकें	..	१३८–२१६
७. कालिदासीय ग्रंथांचे विशेष	..	२१६–२५५
८. कालिदासीय विचार	..	२५६–२८४
९. कालिदास व उत्तरकालीन ग्रंथकार	..	२८५–२९०
कालिदासस्तुतिकुसुमाञ्जलिः	..	२९१–२९४
कांही संदर्भग्रंथ व लेख	..	२९५–२९६
सूची	..	२९७–३०२

का लि दा स

प्रकरण पहिलें

कालनिर्णय

ख्यातिं कामपि कालिदासकृतयो नीताः शकारातिना ।

अभिनन्दकृत रामचरित.

आपलें संस्कृत वाङ्मय अनेक विषयांत अत्यंत समृद्ध आहे. धर्म, तत्त्वज्ञान, व्याकरणादि शास्त्रें, काव्यें, नाटकें इत्यादि विविध विषयांवरचे शेंकडो ग्रंथ प्रकाशित झाले आहेत व कित्येक हस्तलिखितावस्थेंत प्रकाशनाचीं वाट पाहत आहेत. शिवाय अनेक कारणांनी कालाच्या उदरांत जे गडप झाले त्यांची तर गणनाच करतां येणें शक्य नाही. आज हजारो वर्षें शेंकडो ग्रंथकारांनी आपलें बुद्धिवैभव खर्च करून या ग्रंथसंपत्तींत भर टाकली आहे. पण अशा या विशाल ग्रंथभांडारांत ऐतिहासिक ग्रंथांची मात्र अत्यंत उणीव आहे. नाही म्हणावयास कल्हणाची ' राजतरंगिणी ', बाणाचें ' हर्षचरित ', राजशेखराची ' विद्धशालभञ्जिका ', पद्मगुप्ताचें 'नवसाहसांकचरित', बिल्हणाचें 'विक्रमांकदेवचरित' असे हाताच्या बोटांवर मोजतां येण्यासारखे कांही ग्रंथ आहेत. यांपैकी बहुतेक ग्रंथांत खऱ्या ऐतिहासिक कथानकाला असंभाव्य व अद्भुत गोष्टींची इतकी मुरड दिलेली आढळते व कविकल्पनेच्या इतक्या भराऱ्या मारलेल्या दिसतात की त्यांतून ऐतिहासिक भाग हुडकून काढणें कठीण होतें. प्राचीन काळच्या अशोक, विक्रमादित्य, समुद्रगुप्त, चंद्रगुप्त, भोज इत्यादि चक्रवर्ती नृपतींच्या कुलांविषयीं, त्यांच्या कारकीर्दींतील प्रमुख गोष्टींविषयीं, त्यांच्या स्वभावा-

विषयीं जर आपलें इतकें अज्ञान तर त्यांच्या आश्रयाने राहणाऱ्या ग्रंथकारांविषयी बोलावयासच नको. आता भवभूति, बाण, राजशेखर, बिल्हण असे कांही संस्कृत ग्रंथकार आहेत की ज्यांनी आपल्या ग्रंथांत स्वतःचें कुल, विद्वत्ता, राजाश्रय इत्यादि गोष्टींविषयीं अल्पस्वल्प माहिती दिली आहे. ती आधुनिक वाचकांचें समाधान करण्यापुरती नसली तरी इतर कवींच्या मानाने बरीच आहे यांत शंका नाही. या कवींनी अहंमन्यतेचा दोष पतकरूनही जर ही माहिती ग्रंथनिविष्ट केली नसती तर इतर ग्रंथकारांप्रमाणें त्यांच्याही बाबतींत विद्वानांत त्यांच्या कालाविषयीं रणें माजून राहिलीं असती. कारण त्यांच्या समकालीनांनी त्यांच्या हयातींत किंवा निधनानंतर त्यांची कितीही प्रशंसा केली असली, तरी त्यांपैकी एकालाही त्यांचीं चरित्रें लिहून ठेवण्याची बुद्धि झाली नसती, यांत संशय नाही.

खुद्द कालिदासाचीच गोष्ट घ्याना. सर्व प्राचीन व अर्वाचीन, एतद्देशीय व परदेशीय विद्वानांनी त्याची मुक्तकंठाने प्रशंसा करून संस्कृत कवींमध्यें त्याला अग्रपूजेचा मान दिला आहे व तन्निदर्शक कविकुलगुरु ही पदवी अर्पण केली आहे; इतकेंच नव्हे तर अखिल जगाच्या साहित्यसम्राटांच्या मालिकेंत त्याचें नांव गोवलें आहे. अशा या कविश्रेष्ठाचें कुल, चरित्र, विद्वत्ता, स्वभाव इत्यादिकांविषयीं विश्वसनीय अशी कितीशी माहिती आपणास प्राचीन वाङ्मयांत सापडेल? स्वतः अत्यंत विनयशील असल्याने त्याने आपल्या नाटकांत प्राचीन पद्धतीस अनुसरून स्वतःचा केवळ नामनिर्देश केला आहे व तोही आपल्या काव्यांत गाळला आहे. त्याची निरपेक्षता इतकी की ज्या उदार नृपतीचा त्याला आश्रय होता त्यावर द्रव्याच्या लालचीने त्याने केलेली एकही प्रशस्ति आढळत नाही, इतकेंच नव्हे तर कांही अप्रत्यक्ष उल्लेख वगळल्यास आपल्या काव्यांमध्यें स्वतःच्या प्रमाणें त्याच्याही नामाचा निर्देश त्याने केलेला नाही. महनीय विभूतींचीं, जगज्जेत्या सम्राटांचीं व श्रेष्ठ ग्रंथकारांची चरित्रें लिहिण्याची चाल आपणांमध्यें नसल्यामुळें त्याच्या काळानंतर लौकरच त्याच्या चरित्राविषयींची विश्वसनीय माहिती लुप्त झाली व तिची जागा भाकड दंतकथांनी बळकाविली. अशा अनेक दंतकथा प्राचीन काळच्या विद्वानांत प्रचलित होत्या व त्यांपैकी कांही बल्लालकवीच्या 'भोजप्रबंध' या इतर दृष्टीने रमणीय व

रसाळ पण ऐतिहासिक दृष्टचा गचाळ ग्रंथांत एकत्रित केल्या आहेत. हा ग्रंथ इ. स. च्या सोळाव्या शतकांत म्हणजे कालिदासानंतर शेंकडो वर्षांनी लिहिला गेल्यामुळें त्याला ऐतिहासिक महत्त्व काडीचेंही नाही. परंपरागत प्राचीन ऐतिहासिक गोष्टी या ग्रंथांत कवीने गोळा केल्या असें मानावें तर तेंही संभवनीय दिसत नाही. कारण, या ग्रंथांत कालिदासाला भवभूति, भारवि, दण्डी इत्यादि कवींचा समकालीन म्हणून वर्णिलें आहे पण या ग्रंथकारांच्या ग्रथांतील व इतर बलवत्तर प्रमाणांवरून ते कालिदासानंतर अनेक वर्षांनी निरनिराळ्या काळीं होऊन गेले असें विद्वानांनी सिद्ध केलें आहे. शिवायं या सर्वांचा आश्रयदाता म्हणून वर्णिलेला जो प्रसिद्ध धारानरेश भोज तो त्या सर्वांनंतर कित्येक शतकांनी म्हणजे इ. स. च्या अकराव्या शतकांत होऊन गेला असें खुद्द त्याच्या ताम्रपटावरून सिद्ध झालें आहे. तेव्हा यावरून कालिदासादि कवींच्या चरित्रांकरितां हा ग्रथ किती निरुपयोगी आहे हें दिसून येईल.

परंपरागत विश्वसनीय माहितीच्या अभावी कालिदासाचें जन्मस्थान, काल व चरित्र यांविषयी अनेकांनी अनेकविध तर्क केले आहेत. या सर्वांत त्याच्या कालाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व इतर सर्व प्रश्नांच्या विवेचनाला मूलभूत असल्याने त्याचा या प्रकरणांत विचार करूं.

कालिदासाच्या कालाच्या दोन स्पष्ट मर्यादा सर्व विद्वानांनी मान्य केल्या आहेत. कालिदासाने आपल्या 'मालविकाग्निमित्र' नाटकाचें संविधानक शुंगवंशांतील राजा अग्निमित्र याच्या चरित्रांतून घेतलें आहे. हा अग्निमित्र मौर्य वंशाचा उच्छेद करून मगध साम्राज्य बळकावणाऱ्या सेनापति पुष्यमित्राचा मुलगा. याचा काल इ. स. पूर्वी सुमारें १५० हा विद्वानांनी निश्चित केला आहे. तेव्हा इ. स. १५०च्या पलीकडे कालिदासाचा काल नेतां येत नाही. ही झाली त्याच्या कालाची पलीकडील मर्यादा. यानंतर कालिदासाचा स्पष्ट नांवाने उल्लेख प्रथम उत्तरेंतील कनोजच्या हर्ष (इ. स. ६०६–६४७) नामक सम्राटाचा आश्रित जो प्रसिद्ध संस्कृत कवि बाणभट्ट, त्याच्या 'हर्षचरिता'च्या प्रस्तावनेंत व दक्षिणेंतील बादामी नामक पूर्वचालुक्यांच्या राजधानीपासून ईशान्येस १५ मैलांवर असलेल्या 'ऐहोळे' (कानडी 'अय्यावोळे') या गावीं जुन्या जैनमंदि-

रांत एका शिलाखंडावर कोरलेल्या इ. स. ६३४च्या रविकीर्ति या जैन कवीच्या प्रशस्तींत आढळतो. हे दोन्ही उल्लेख इ. स. च्या सातव्या शतकांतील आहेत. याच्या अलीकडे कालिदासाचा काल ओढतां येत नाही. या दोन मर्यादांत कालिदासाच्या कालाविषयीं पुढील मतें प्रतिपादिलेली आढळतात—१. इ.स. पूर्वी पहिलें शतक (रा. चिंतामणराव वैद्य); २. इ.स. च्या चौथ्या शतकाचा उत्तरार्ध (डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर आदिकरून बरेच हिंदी व बहुतेक युरोपीय विद्वान); ३. इ. स. चें पांचवें शतक (प्रो. पाठक); ४. इ. स. चें सहावें शतक (प्रो. मॅक्स्मुल्लर, म. म. हरप्रसाद शास्त्री). आता हीं मतें ज्या प्रमाणांवर अधिष्ठित झालीं आहेत त्यांची सत्यासत्यता उपलब्ध असलेल्या पुराव्याच्या कसोटीवर घासून ठरवूं.

१. इसवीसनापूर्वी पहिलें शतक

(१) कालिदास शककर्त्या विक्रमादित्याच्या दरबारीं राजकवि म्हणून होता अशी प्राचीन पंडितांची परंपरागत समजूत आहे. कालिदासानेंही आपल्या 'विक्रमोर्वशीय' या नाटकाच्या नांवांत व त्याच नाटकांतील पात्रांच्या संभाषणांत दोन ठिकाणीं * विक्रम या शब्दाचा सहेतुक उपयोग केलेला दिसतो. तेव्हा शेक्सपीयरने आपल्या नाटकांत इंग्लंडाच्या जेम्स् राजाचा जसा उल्लेख केला आहे तसाच कालिदासानेंही आपल्या आश्रयदात्याचा श्लेषद्वारा गर्भित उल्लेख केला असावा असें दिसतें. व त्यावरून तो एखाद्या विक्रमादित्याच्या दरबारीं असावा असें अनुमान होतें. हा विक्रमादित्य सध्या चालू असलेल्या विक्रमसंवताचा संस्थापक अशी प्रचलित समजूत आहे. हा विक्रमसंवत् इ. स. पूर्वी ५७व्या वर्षी सुरू झाला. तेव्हा कालिदासही इ. स. पूर्वी पहिल्या शतकांत होऊन गेला, असें प्राचीन परंपराभिमानी मानतात. हेंच मत रा. चिंतामणराव वैद्य, प्रो. र. ना. आपटे, प्रो. शारदारंजन रे, अलाहाबाद विश्वविद्यालयांतील संस्कृतचे प्रोफेसर चट्टोपाध्याय यांनी विविध प्रमाणें पुढे मांडून स्थिर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांतील मुख्य प्रमाणांचा पुढे थोडक्यांत विचार करूं. पण या

---

*दिष्ट्या महेन्द्रोपकारपर्याप्तेन विक्रममहिम्ना वर्धते भवान्। विक्रमोर्वशीय अं.१.
अनुत्सेकः खलु विक्रमालङ्कारः। विक्रमोर्वशीय अं. १.

मतावर पहिला मुख्य आक्षेप हा की ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत विक्रमादित्य नांवाचा राजा होऊन गेला याला निश्चित प्रमाण सापडत नाही. या राजाच्या पूर्वीच्या अशोकादि भारतवर्षीय राजांचे शिलालेख सापडतात पण या विक्रमादित्याचा एकही लेख अद्यापि उजेडांत आला नाही. संस्कृत व प्राकृत वाङ्मयांत विक्रमादित्याचे क्वचित् उल्लेख आढळतात हें खरें. उदाहरणार्थ, हालाच्या प्राकृत 'सतसई'मध्यें विक्रमादित्याच्या दातृत्वाचा, कथासरित्सागर व बृहत्कथामञ्जरीमध्यें त्याच्या भूतवेतालादिकांवर मिळविलेल्या विजयाचा व जैनांच्या कालकाचार्य कथानकामध्यें त्याने केलेल्या शकांच्या पराभवाचा उल्लेख आहे. पण हे सर्व ग्रंथ ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकानंतर कित्येक शतकांनी झालेले आहेत, त्यामुळें त्यातील वर्णनावर किती विश्वास ठेवावा हा प्रश्न आहे. दुसरें असें की विद्वानांनी त्या काळच्या इतिहासाची जी संगति लाविली आहे तीत या विक्रमादित्याला कोठेही निश्चित स्थान लाभत नाही. ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत शकांनी हिंदुस्थानावर स्वारी करून काठेवाड, माळवा, महाराष्ट्र, कोकण इत्यादि प्रांत आपल्या अंमलाखाली आणले होते यांत संशय नाही; कारण त्यांचा एक क्षत्रप नहपान व त्याचा जांवई ऋषभदत्त (प्राकृत 'उषवदात') यांचे लेख नाशिक कार्ले वगैरे ठिकाणीं सापडले आहेत, त्यांत त्या प्रकारचें वर्णन आहे. पण या नहपानाचा पराभव करून ज्याने शकांस या प्रांतांतून पिटाळून लावलें त्या गौतमीपुत्र सातकर्णीने विक्रमादित्य ही पदवी धारण केल्याचें त्याच्या कोरीव लेखांवरून दिसत नाही. तसेंच एखादा संवत् स्वतःच्या नांवाने सुरू केल्याचेंही दिसत नाही. शिवाय ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेलेल्या एका विक्रमादित्याने हा संवत् चालू केला असता तर त्याच्याशीं त्याचें नांव लौकरच संलग्न व्हावयास पाहिजे होतें. पण वस्तुस्थिति अशी आहे की इ. स.च्या ९व्या शतकांत 'विक्रमकाल' या सामासिक शब्दाचा उपयोग 'एक विशिष्ट शक' या अर्थी प्रथमच केलेला आढळतो व या ठिकाणींही विक्रमपदाने 'विक्रमादित्य' हा अर्थ विवक्षित आहे काय याबद्दल शंका आहे. विक्रम सं. १०५०मध्यें लिहिलेल्या अमितगतीच्या 'सुभाषितरत्नसंदोहां'त प्रथम शकाच्या नांवांतील 'विक्रम' हा शब्द विक्रमादित्य नृप या अर्थी निःसंदिग्ध रीतीने योजिलेला आढळतो. प्रो. कोलहॉर्न

याने या शकाच्या अनेक मित्यांचें निरीक्षण करून असें अनुमान काढलें आहे की हा शक कोणी विक्रमादित्याने सुरू केला नसून त्याशी त्याचें नांव हळू हळू संलग्न होत गेलेलें दिसतें. याचें कारण असें की जसा शालिवाहन शकाचा प्रथमपासून चैत्रांत आरंभ होत असे तसाच विक्रमसंवताचा कार्तिकांत म्हणजे शरदृतूंत होत असे. या ऋतूंत राजेलोक लढाईस जात म्हणून त्या ऋतूला विक्रमकाल असें हर्षचरितादि अनेक संस्कृत ग्रंथांत म्हटलें आहे. शरद् ऋतूंत आरंभ होणें हें विक्रमसंवतार्चे वैशिष्ट्य असल्याने त्यालाही कवि विक्रमकाल म्हणूं लागले. पुढे या सामासिक शब्दाचा खरा अर्थ स्मरणांतून गेल्यावर लोक त्याचा 'विक्रमादित्याने चालू केलेला काल किंवा शक' या अर्थी उपयोग करूं लागले व अशा रीतीने विक्रमादित्याचें नांव या शकाशीं हळू हळू संलग्न झालें. डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांचे मतें हा शक माळव्यांत पुष्कळ वर्षें चालू होता व त्या प्रांतांत (चौथ्या शतकांत) द्वितीय चंद्रगुप्त या विख्यात, पराक्रमी व दानशूर राजाने विक्रमादित्य ही पदवी धारण करून राज्य केलें होतें. पुढे कित्येक शतकांनी या शकाचा आरंभ कोणी व कसा केला याचें लोकांस विस्मरण पडल्यावर (चंद्रगुप्त) विक्रमादित्याच्या नांवाशीं त्याचा संबंध जोडण्यांत आला असावा. वरील दोन उपपत्तींपैकी कोणतीही स्वीकारली तरी ख्रिस्तीशकाच्या ९व्या शतकापर्यंत विक्रमादित्याने हा शक चालू केला ही समजूत प्रचलित नव्हती, हें स्पष्ट आहे. शिवाय या शकाचे अगदी पहिले म्हणजे संवत् ४८०, ४९३–५२९, ५८९चे शिलालेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांत 'मालवानां गणस्थित्या' 'श्रीमालवगणाम्नाते,' 'मालवगणस्थितिवशात्' असा एखादा शब्दसमुच्चय योजून या शकाचा उल्लेख केला आहे. त्यावरून हा शक प्रथम मालवगणाने सुरू केला असावा असें अनुमान होतें. पाणिनीच्या अष्टाध्यायीवरून (५. ३.११४) प्राचीन काळीं या 'मालव' लोकांचा आयुधजीविसंघ होता, म्हणजे पेशव्यांच्या वेळच्या गारद्यांप्रमाणें हे लोक वेतन घेऊन कोणाच्याही बाजूने लढत असत, असें दिसतें. अलेक्झांडरास हे शूर लढवय्ये पंजाबांत आढळले. पुढे पंजाब सोडून हे हळू हळू दक्षिणेकडे सरकले व सध्याच्या माळवा प्रांताच्या उत्तरेस त्यांनी एक 'गण' म्हणजे प्रजासत्ताक राज्य स्थापलें व आपल्या गणाच्या नांवाने नाणीं पाडलीं. अशीं शेंकडो नाणीं राजपुतान्यांत

नगर या गावीं सापडलेलीं इतिहासज्ञांस माहीत आहेत. त्यांपैकी कित्येकांवर 'मालवानां जय' किंवा 'मालवगणस्य जय' असे शब्द आढळतात, त्यावरून त्यांनी तत्कालीन एखाद्या बलाढ्य शत्रूवर--कदाचित् शकांवर--विजय मिळविला असावा असें बॅ. काशीप्रसाद जयस्वाल यांनी अनुमान केलें आहे. आपल्या गणराज्याच्या स्थापनेचें किंवा बलाढ्य शत्रूवर मिळविलेल्या विजयाचें स्मरण राहावें म्हणून त्यांनी हा शक चालू केला असें दिसतें. पुढे ते माळव्यांत येऊन राहिल्यावर तेथेही लोक त्याचा उपयोग करूं लागले. तथापि हा मूळचा मालवगणाचा शक ही जाणीव होती तोंपर्यंत म्हणजे इ. स. च्या सहाव्या शतकापर्यंत मालवांचें नाव त्याशीं संबद्ध झालेलें आढळतें यांत आश्चर्य नाही.

वरील विवेचनावरून ख्रिस्तपूर्व पहिल्या शकांत विक्रमादित्य नांवाच्या राजाने सध्याचा विक्रमसंवत् सुरू केला ही प्रचलित समजूत निराधार आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईल. ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांतील विक्रमाचें अस्तित्व याप्रमाणें संशयित ठरल्यावर कालिदास हाही त्या काळीं होऊन जाणें संभवनीय नाही; कारण त्याचा आश्रयदाता कोणी विक्रमादित्य असावा हें त्याच्या ग्रंथांतर्गत उल्लेखांवरून दिसतें असें वर दाखविलें आहे. असो. आता या मताच्या सिद्धयर्थ जीं इतर प्रमाणें पुढे मांडलीं जातात त्यांपैकी कांही महत्त्वाच्या प्रमाणांचें परीक्षण करूं—

(२) रघुवंशाच्या सहाव्या सर्गांत इंदुमतीस्वयंवराचें वर्णन करतांना खालील श्लोक आले आहेत—

> अथोरगाख्यस्य पुरस्य नाथं दौवारिकी देवसरूपमेत्य।
> इतश्चकोराक्षि विलोकयेति पूर्वानुशिष्टां निजगाद भोज्याम् ॥५९॥
> पाण्ड्योऽयमंसार्पितलम्बहारः कलृप्ताङ्गरागो हरिचन्दनेन।
> आभाति बालातपरक्तसानुः सनिर्झरोदार इवाद्विराजः। ॥६०॥

यांत पाण्ड्य राजा उरगपुर येथे राज्य करीत होता असें म्हटलें आहे. पुढे ६३व्या श्लोकांत* 'या पाण्ड्य राजाशीं लग्न करून तूं दक्षिण दिशेची सवत हो' असा सुनंदेने इंदुमतीस उपदेश केला आहे. तसेंच सर्ग ४

---

* रत्नानुविद्धार्णवमेखलाया दिशः सपत्नी भव दक्षिणस्याः।

श्लोक ४९ मध्येंही रघूने दक्षिणेंत पांड्यांचा पराभव केला असें कवीने वर्णिलें आहे. पुष्कळदा अनवधानाने मोठमोठे कवि सुद्धा ऐतिहासिक काल-विपर्यासाचा (anachronism) दोष करीत असतात व नकळत स्वकालीन परिस्थिति वर्णीत असतात. काव्यशास्त्रदृष्ट्या हा दोष गणला असला तरी त्याबद्दल संशोधक प्राचीन संस्कृत कवीस धन्यवादच देतात. कारण पुष्कळ वेळां अशा स्थलीं कवीच्या कालनिर्णयाचें एखादें अचूक गमक सापडतें. या दृष्टीने वरील श्लोकांचा विचार करून रा. चिंतामणराव वैद्यांनी कालिदास ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.* तो असा—वरील श्लोकांत पांड्य राजे दक्षिणेंत बलाढ्य असून 'उरगपुर' येथे राज्य करीत होते असें वर्णिलें आहे. मल्लिनाथ व हेमाद्रि यांनी उरगपुर म्हणजे नागपुर असें म्हटलें आहे. हें अर्थातच मध्यप्रांतांचें नागपूर असणें शक्य नाही. कारण तें दक्षिणेंत नाही किंवा त्या प्रांतावर पांड्यांचा कधी अमल होता असेंही दिसत नाही. तेव्हा उरगपुर म्हणजे हल्लीचें 'उरैयूर' असावें. प्राकृत व्याकरणाच्या नियमां-प्रमाणें उरगपुर यांतील 'ग' व 'प' या व्यंजनांचा लोप होऊन व मध्यें एक 'य' घुसून उरैयूर हें नांव सिद्ध होणें शक्य आहे. ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकांत करिकाल नामक प्रसिद्ध चोल नृपतीने पराभव करीपर्यंत पांड्य राजे दक्षिणेंत प्रबल होते. करिकालाने त्यांचा पराभव केल्यावर त्यांनी उरैयूर येथून कावेरीपत्तनम् येथे आपली राजधानी नेली. त्यापूर्वी उरैयूर हीच पां-ड्यांची राजधानी असावी. इ. स. च्या तिसऱ्या शतकांत पांड्य राजे पुनः प्रबळ झाले पण त्यानंतर त्यांची राजधानी उरैयूर नसून मदुरा ही होती. वरील श्लोकांत कालिदासाने स्वकालीन परिस्थिति वर्णिली आहे, असें मानलें तर त्याचा काल ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकापूर्वी असला पाहिजे, कारण त्या शतकानंतर उरैयूर ही केव्हाही पांड्य नृपतींची राजधानी नव्हती.

वरील प्रमाण परीक्षणाच्या कसोटीस उतरत नाही. उरगपुर पासून उरैयूर हें नांव सिद्ध होणें अशक्य नाही हें खरें. पण यांत गोम ही की, उरैयूर ही कधीकाळीं पांड्यांची राजधानी होती याला इति-हासाचा अगर दंतकथांचाही पुरावा नाही. याच्या उलट, मदुरा हीच

*Annals of the Bhandarkar Institute, Vol. II, p. 63

अगदी प्राचीन काळापासून पांड्यांची राजधानी होती, असें व्हिन्सेंट स्मिथ प्रभृति इतिहासकार म्हणतात. मदुरा या गावाचें तामिळ नांव 'अळवाय' आहे व त्याचा अर्थ नाग असाच आहे. पण उरगपुर याने मदुरा ही कवीस विवक्षित आहे असें मानलें तर हें प्रमाण 'ख्रिस्तपूर्व पहिलें शतक' या पक्षाप्रमाणें 'ख्रिस्तोत्तर चवथें किंवा पांचवें शतक' या पक्षालाही साधक होईल. कारण ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकापासून सातव्या शतकांत पल्लवनृपति सिंहविष्णु याने पराभव करीपर्यंत पाण्ड्यनृप दक्षिणेंत प्रबल होते व त्यांची राजधानी मदुराच होती हें प्रसिद्धच आहे. तेव्हा वरील प्रमाण निर्णायक होऊं शकत नाही.

(३) **मालविकाग्निमित्रांतील अनावश्यक उल्लेख**—कै० प्रो० शिवरामपंत परांजपे यांनी 'मेघदूतावरून कालिदासाविषयी' (साहित्यसंग्रह, भाग १ पृ० ८८) या आपल्या सरस निबंधांत असें म्हटलें आहे की, 'माल विकाग्निमित्र' नाटकांत इरावती व धारिणी दोन उपनायिका घालणें, धारिणीचा भाऊ वीरसेन हा जातीने कमी दर्जाचा होता हें कथानकाला जरूर नसलेलें विधान करणें, नाटकाच्या पांचव्या अंकांत पुष्यमित्राने आपल्या पत्रांत 'विगतरोषचेतसा' म्हणजे 'राग टाकून' ये असें जें अग्निमित्राला लिहिलें आहे त्यांतील रागाचें कारण न सांगणें, इत्यादि अनावश्यक गोष्टींवरून कालिदासाला शुंगकालीन बारीक सारीक गोष्टींची माहिती होती, म्हणून तो अग्निमित्राच्या किंवा त्याच्या जवळच्या काळांत होऊन गेला असावा. अशाच तऱ्हेचें मत प्रो. चट्टोपाध्याय यांनीही प्रकट केलें आहे व त्यावरून शुगांच्या कथा लोकाच्या स्मरणांतून जाण्यापूर्वी म्हणजे अग्निमित्राच्या काळापासून एका शतकाच्या आंत अथवा ख्रिस्तपूर्व ५७ च्या सुमारास कालिदास होऊन गेला असावा असें मानलें आहे.

त्याच उल्लेखांवरून विद्वान संशोधक निरनिराळीं अनुमानें कशीं काढूं शकतात याचें हें उत्तम उदाहरण आहे. कारण कालिदास हा गुप्तकालांत (ख्रिस्तोत्तर पांचव्या शतकांत) होऊन गेला असें मानणाऱ्या दुसऱ्या एका महाराष्ट्रीय संशोधकाने साडेपांचशें वर्षांनंतर कवीला अशा बारीक ऐतिहासिक गोष्टींचें ज्ञान असणें शक्य नाही असें गृहीत धरून वर उल्लेखिलेलीं पात्रें व प्रसंग या नाटकांत घालण्यांत व

अशीं विधानें करण्यांत कालिदासाचा उद्देश निराळाच होता असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी केलेली कारणमीमांसा येणेंप्रमाणें:— "कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रां'त तत्कालीन समाजावर टीका करून टाळ्या मिळविण्याचा हेतु मुळींच लपत नाही. एखाद्या राणीला दारू पिऊन झिंगलेली अशी रंगभूमीवर आणणें, राणीच्या भावाचा अकरमासेपणा चव्हाट्यावर आणणें इत्यादि गोष्टी नाटकांत आणण्यास कवीस बरेंच धारिष्ट पाहिजे हें उघड आहे.....(म्हणून) कवीला आपलें नाटक प्राचीन काल दाखविणारें आहे असें ढोंग करणें अत्यंत उपयुक्त होतें. गावांतल्या लोकांमध्यें राणीची चेष्टा चांगली केली म्हणून हशा पिकवावयास सांपडतो व राणीची देखील तिला दारू पिण्यास ऐतिहासिक आधार आहे अशी समजूत करून देऊन शाबासकी मिळविणें कवीस शक्य होतें."

'मालविकाग्निमित्रां'तील वरील गोष्टींवरून काढलेलीं दोन्ही अनुमानें सयुक्तिक भासत नाहीत. शुंगकालानंतर ५००।५५० वर्षांनी झालेल्या कालिदासास त्या कालाविषयीं बारीक सारीक माहिती असणें शक्य नाही हें म्हणणें आम्हांस पटत नाहीं. कारण त्याच्याही नंतर २००।२५० वर्षांनी होऊन गेलेल्या बाणाच्या 'हर्षचरितां'त त्या कालाविषयीं जी माहिती दिसते ती सध्या उपलब्ध असलेल्या कोणत्याही पुराणांत दिसत नाही. उदाहरणार्थ, या सर्व पुराणांत सेनापति पुष्यमित्राने बृहद्रथ मौर्यास ठार मारून गादी बळकाविली असा उल्लेख आहे. पण त्यास केव्हा व कसें मारलें याविषयीं कांहीच माहिती मिळत नाही. ती माहिती बाणाने, हर्ष दिग्विजयास निघाला असतां त्यास गजसैन्याधिपति स्कंदगुप्त याने जो उपदेश केला, त्यांत पुढीलप्रमाणें दिली आहे—'सैन्याची पाहणी करण्याच्या मिषाने मूर्ख बृहद्रथ राजाला बोलावून सेनापति पुष्यमित्राने त्यास ठार मारलें. कालिदासानंतर कित्येक वर्षांनी होऊन गेलेल्या विशाखदत्ताला शुंगकालाच्याही पूर्वी दीडशें वर्षें झालेल्या मगधांतील राज्यक्रांतीवर सविस्तर ऐतिहासिक उल्लेख घालून नाटक रचतां येतें, तर त्यापेक्षा कमी कालाच्या व्यवधानानंतर कालिदासास तरी तसें कां करतां येऊं नये ? सध्याच्या पेक्षा जास्त ऐतिहासिक साधनें कालिदासकाळीं अस्तित्वांत असावींत असें वाटतें. प्राचीन काळीं राजांच्या वंशावळीच नव्हे तर त्यांच्या कारकीर्दीत

होऊन गेलेल्या महत्त्वाच्या गोष्टींचें टांचण करून ठेवण्याचा प्रघात होता. अशा प्रकारचें कलिंगदेशच्या खारवेल नांवाच्या राजाच्या कारकीर्दीचें सविस्तर वर्णन हाथीगुम्फेमध्यें खडकांवर कोरलेलें प्राचीन इतिहासाच्या अभ्यासकांस माहीत आहे. अशा प्रकारचे शुगराजाच्या कारकीर्दीचे वृत्तांत कालिदासकालींही शुग व गुप्त या दोन्ही राजांची राजधानी झालेल्या पाटलिपुत्र शहरीं अस्तित्वांत असणें व ते गुप्तकालीन कालिदासास उपलब्ध होणें असंभवनीय नाही.

(४) **अश्वघोषाच्या ग्रंथांतील साम्य**—इ. स. १८९३ मध्यें अश्वघोषाचें 'बुद्धचरित' व इ. स. १९१० मध्यें त्याच कवीचें 'सौंदरनंद' प्रसिद्ध झाल्यापासून विद्वानांचें लक्ष या काव्यांत व कालिदासाच्या ग्रंथांत दिसणाऱ्या साम्याकडे वळलें व त्यांच्यांत दोन तट पडले. प्रो. कोवेल सारख्या युरोपीय व कांही हिंदी संशोधकांनी, या साम्यावरून कालिदासाने आपल्या कल्पना अश्वघोषाच्या काव्यांतून घेतल्या, अर्थात् तो त्यानंतर म्हणजे इ. स. च्या पहिल्या शतकानंतर* होऊन गेला, असें मानलें, तर उलट प्रो. शारदारंजन रे, प्रो. चट्टोपाध्याय वगैरेंनी अश्वघोषानेच कालिदासाच्या कल्पना चोरल्या असें दाखवून ख्रिस्तपूर्व पहिलें शतक हा कालिदासाचा काळ निश्चित करण्याचा प्रयत्न केला. या वादाचा विचार करण्यापूर्वी एक गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे, ती ही की यांपैकी कोणतेंही मत सिद्ध झालें तरी त्यामुळें त्यांपैकी कोणाही कवीच्या अभिमान्यांस वाईट वाटण्याचें कारण नाही. कारण राजशेखराने म्हटल्याप्रमाणें 'सर्वोऽपि परेभ्य एव व्युत्पद्यते,' प्रत्येक ग्रंथकार पूर्वजांचें भांडवल घेऊन व्यापार करीत असतो. तेव्हा निर्विकार मनाने या दोन कवींचें कालदृष्ट्या पौर्वापर्य ठरविण्याकरितां या साम्यस्थलांचा विचार करण्यांत अडचण येऊं नये. हें साम्य दोन प्रकारचें आहे—प्रसंगसाम्य व शब्दार्थोक्तिसाम्य. पैकी पहिल्याचा विचार करतां अशीं कांही साम्यस्थळें अश्वघोषाचें

* अश्वघोष हा सुप्रसिद्ध कुशानवंशीय सम्राट् कनिष्क याचा समकालीन होता. पुष्कळ हिंदी व युरोपीय विद्वानांचे मतें कनिष्काने इ. स. ७८ मध्यें सुरू होणारा सध्याचा शालिवाहन शक स्थापला, यावरून अश्वघोषाचा काळ ख्रिस्तोत्तर पहिलें शतक हा धरला आहे.

'सौंदरनंद' व कालिदासाचें 'कुमारसंभव' यांत आढळतात. अश्वघोषाच्या काव्यांत शाक्यकुलोत्पन्न नंदाने बौद्धधर्म कसा स्वीकारला याची कथा आहे. बुद्धाने विविध प्रकारांनी संसारत्याग करण्याविषयीं नंदाला उपदेश केला, तरी भिक्षु होण्यास त्याचें मन घेईना. पुढे फारच आग्रह झाल्यावर त्याने मोठ्या नाखुषीने संमति दिली व आपलें मुंडन करविलें. ही बातमी सुंदरीला कळतांच तिला अत्यंत दुःख झालें. तिच्या शोकाचें वर्णन या काव्याच्या सहाव्या सर्गांत आलें आहे. त्यांत व 'कुमारसंभवां'त शंकराने मदनाला भस्म केल्यावर रतीने केलेल्या विलापाचें जें वर्णन आलें आहे, त्यांत कांही ठिकाणीं बरेंच साम्य आढळतें. तसेंच त्यानंतरच्या सर्गांत वर्णिलेल्या नंदविलापांत व 'रघुवंशां'तल्या अजविलापांत कांही बाबतीत प्रसंगसाम्य आहे. तथापि त्यांपैकी एकावरून दुसरा सुचला असला पाहिजे असें म्हणण्याइतकें तें निर्णायक नाही. अशाच तऱ्हेचे आणखीही कांही समान प्रसंग या दोन कवींच्या काव्यांत दाखवितां येतील. 'बुद्धचरितां'त (सर्ग ३) शीततूंत तरुण गौतम पित्राज्ञेने विहारार्थ नगराबाहेर जात असतां त्याला पाहण्याकरितां पुरस्त्रियांची झालेली गर्दी व 'कुमारसंभवां'त (सर्ग ७) विवाहाकरितां शंकर हिमालयाच्या ओषधिप्रस्थ नामक नगरांत व 'रघुवंशां'त (सर्ग ७) इंदुमतीस्वयंवरानंतर अज कुंडिनपुरांत प्रवेश करतांना तदवलोकनार्थ नगरस्त्रियांची उडालेली धांदल यांतील प्रसंगसाम्याकडे संशोधकांचें लक्ष गेलें व त्यावरून दोन्ही पक्षांनी भिन्नभिन्न अनुमानें काढली आहेत. पण या बाबतींतही, असले प्रसंग नेहमी घडतात यामुळें प्रतिभासंपन्न कवीचें त्याकडे साहजिक लक्ष जाणें शक्य असतें असें म्हणतां येईल. इ० स० च्या १० व्या शतकांत होऊन गेलेल्या पद्मगुप्त कवीनेही आपल्या 'नवसाहसांकचरित' काव्यांत या तऱ्हेचाच प्रसंग वर्णिला आहे, त्यावरूनही ही गोष्ट स्पष्ट होईल. दुसरें असें की या दोन्ही कवींच्या वर्णनांत फारच थोडें कल्पनासाम्य आहे. दोन्ही वर्णनें काळजीपूर्वक वाचून खालील एका ठिकाणीं मात्र आम्हांस किंचित् कल्पनासाम्य आढळलें—

अश्वघोष—वातायनेभ्यस्तु विनिःसृतानि परस्परोपासितकुंडलानि।
स्त्रीणां विरेजुर्मुखपंकजानि सक्तानि हर्म्येष्विव पंकजानि॥

बुद्ध० ३, १९.

कालिदास–तासां मुखैरासवगन्धगर्भैर्व्याप्तान्तराः सान्द्रकुतूहलानाम् ।
विलोलनेत्रभ्रमरैर्गवाक्षाः सहस्रपत्राभरणा इवासन् ॥
कुमार० ७, ६२; रघु० ७, ११.

या दोन वर्णनांत खिडक्यांतून पाहणाऱ्या स्त्रियांच्या मुखांना कमलसमूहाची उपमा दिली आहे. अश्वघोष ही उपमा देऊन थांबला आहे तर कालिदासाच्या पद्यांत त्याच्या नेहेमीच्या पद्धतीप्रमाणें या कल्पनेचा पूर्ण विकास केला आहे. यावरून अनुमानच काढावयाचें तर कालिदासाची कल्पना नंतरची असावी हेंच म्हणतां येईल.

आता शब्दार्थसाम्याचा विचार करूं. प्रो. चट्टोपाध्याय यांनी 'कालिदासाचा काल' (*The Date of Kalidasa*) या आपल्या निबंधात कालिदास व अश्वघोष यांच्या काव्यांतील शब्दार्थसाम्य कसोशीने तपासलें असून त्याचीं बरींच उदाहरणें दिली आहेत. पण त्यांपैकी चार पांचच विशेष साम्य दाखवितात. कांही तर अशी आहेत की ती इतरत्रही–उदाहरणार्थ वाल्मीकि रामायणांतही–आढळतात. तेव्हा त्यावरून कोणतेंही अनुमान काढणें योग्य होणार नाही. उदाहरणार्थ खालील पद्यांतील साम्य पहा—

अश्वघोष—वाता ववुः स्पर्शसुखा मनोज्ञा दिव्यानि वासांस्यवपातयन्तः ।
सूर्यः स एवाभ्यधिकं चकाशे जज्वाल सौम्यार्चिरनीरितोऽग्निः ॥
बुद्ध० १, ४१.

कालिदास–दिशः प्रसेदुर्मरुतो ववुः सुखाः प्रदक्षिणार्चिर्हविरग्निराददे ।
बभूव सर्वं शुभशंसि तत्क्षणं भवो हि लोकाभ्युदयाय ताहशाम् ॥
रघु० ३, १४.

या दोन उताऱ्यांत बरेंच कल्पनासाम्य आहे यांत शंका नाही. तथापि अशीं वर्णनें करण्याचा सर्वसाधारण कविसंप्रदाय असल्याने यांपैकी एक वर्णन वाचल्याशिवाय दुसरें सुचलेंच नसतें असें म्हणतां येत नाही. शिवाय दोघाही कवींनी आपल्या कल्पना वाल्मीकिरामायणांतून घेतल्या असणें शक्य आहे. विश्वामित्राबरोबर रामलक्ष्मण यज्ञरक्षणार्थ अयोध्येतून निघाल्या वेळेचें वाल्मीकीने केलेलें वर्णन पहा—

ततो वायुः सुखस्पर्शो नीरजस्को ववौ तदा ।
विश्वामित्रगतं रामं दृष्ट्वा राजीवलोचनम् ॥
पुष्पवृष्टिर्महत्यासीद्देवदुंदुभिनिःस्वनैः ।
शंखदुंदुभिनिर्घोषः प्रयाते तु महात्मनि ॥ बालकाण्ड १२, ४–५.

सरस्वतीच्या साम्राज्यांत विशिष्ट कल्पनांचा मक्ता कोणाही कवीला दिला नाही. म्हणून कल्पनासाम्याबरोबरच उक्तिसाम्य असेल तरच उसनवारीचा आरोप लागू पडेल. अशीं फारच थोडीं स्थळें या दोन कवींच्या काव्यांत दाखवितां येतात. त्यांतील कांहींचा विचार करूं.

१. अश्वघोष–तं गौरवं बुद्धगतं चकर्ष भार्यानुरागः पुनराचकर्ष ।
सोऽनिश्चयान्नापि ययौ न तस्थौ तरंस्तरङ्गेष्विव राजहंसः ॥
सौन्दर० ४, ४२.

कालिदास — तं वीक्ष्य वेपथुमती सरसाङ्गयष्टि-
र्निक्षेपणाय पदमुद्धृतमुद्वहन्ती ।
मार्गाचलव्यतिकराकुलितेव सिन्धुः
शैलाधिराजतनया न ययौ न तस्थौ ॥ कुमार० ५, ८५.

२. अश्वघोष–आदित्यपूर्वं विपुलं कुलं ते नवं वयो दीक्षमिदं वपुश्च ।
कस्मादियं ते मतिरक्रमेण भैक्षाक एवाभिरता न राज्ये ॥
बुद्ध० १०, ४.

कालिदास–एकातपत्रं जगतः प्रभुत्वं नवं वयः कान्तमिदं वपुश्च ।
अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन् विचारमूढः प्रतिभासि मे त्वम् ॥
रघु० २, ४७.

३. अश्वघोष–द्वंद्वानि सर्वस्य यतः प्रसक्तान्यलाभलाभप्रभृतीनि लोके ।
अतोऽपिनैकान्तसुखोऽस्ति कश्चिन्नैकान्तदुःखः पुरुषः पृथिव्याम् ॥
बुद्ध० ११, ४३.

कालिदास–कस्यैकान्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ॥ मेघदूत ११४.

या उतार्‍यांतील साम्य आश्चर्यकारक आहे व यावरून एका कवीचीं काव्यें दुसऱ्याने वाचलीं असावींत असें निःसंशयपणें म्हणतां येईल. पण केवळ या

उताऱ्यांवरून कोणी कोणाची नक्कल केली हें सांगणें कठीण आहे. अश्वघोषापेक्षा कालिदासाच्या वरील पद्यांत अधिक लालित्य आहे हें कोणीही कबूल करील. पण अश्वघोष हा महान तत्त्वज्ञानी होता; सर्वसाधारण जनांचें मन आकर्षण करण्याकरितां आपण ही काव्यें लिहावयास घेतलीं, असें त्याने स्वत:च म्हटलें आहे. त्याची प्रतिभाही असामान्य होती यांत संशय नाही. तथापि काव्यनिर्मिति हा त्याचा प्रधान उद्देश नसल्याने आपल्या काव्याचें संस्करण करण्याकडे त्याचें तितकें लक्ष नव्हतें. याच्या उलट कालिदासाचें. त्यामुळें "त्याने अश्वघोषाच्या कल्पना व कांही प्रमाणांत शब्दयोजनाही उचलून त्यांच्यावर जास्त संस्कार करून त्या आपल्या काव्यांत योजिलेल्या दिसतात" असें कांही म्हणतील तर दुसरे "सर्वच ठिकाणीं कालिदासापेक्षा अश्वघोषाच्या काव्यांत कृत्रिमता जास्त दिसते व संस्कृत काव्येतिहासांत 'जितकी जास्त कृत्रिमता तितका कवि नंतरचा' हा सामान्य नियम असल्याने अश्वघोष कालिदासानंतरचा", असें प्रतिपादितील. तेव्हा या वादाचा निर्णय करण्याकरितां दुसरें कांही गमक पाहिलें पाहिजे. उदाहरणार्थ एकाचे कांही विशिष्ट शब्दप्रयोग होते ते दुसऱ्याने उचलले असें दाखवितां आलें तर या बाबतीत निर्णय देण्यास मदत होईल. या दृष्टीने या कवींचीं काव्यें वाचतांना आम्हांस एक प्रमाण दिसलें तें वाचकांपुढे मांडतों.

अश्वघोषाचीं काव्यें वाचतांना त्याने 'प्रागेव' या शब्दद्वयाचा उपयोग संस्कृत 'किमुत' अर्थी म्हणजे 'मग....विषयीं काय विचारावें!' असा अर्थ व्यक्त करण्यास अनेकदा केलेला आढळतो. उदाहरणार्थ खालील श्लोक पहा—

> एवमाद्या महात्मानो विषयान् गर्हितानपि ।
> रतिहेतोर्बुभुजिरे प्रागेव गुणसंहितान् ॥ बुद्ध० ४, ८१.

नीतिशास्त्रज्ञ उदायी नामक गौतमाचा मित्र त्याचें विरक्त मन विषयोपभोगाकडे वळविण्याकरितां प्राचीन कथांतून अनेक उदाहरणें देऊन म्हणतो, 'अशा प्रकारें मोठमोठ्या लोकांनी भोगलालसेने निंद्य विषयांचाही उपभोग घेतला आहे, मग चांगल्या विषयांविषयीं तर बोलावयासच नको.' 'प्रागेव' याचा या अर्थी उपयोग संस्कृत बौद्ध वाङमयांत इतरत्रही* अनेक ठिकाणीं

*याप्रमाणेंच बुद्ध० ४, १०; आर्यशूरकृत जातकमाला पृ. ५१ इत्यादि स्थळें पहा.

आढळतो पण हिंदु वाङ्मयांत कोठेही आढळत नाही व म्हणून प्रो. आपटयांच्या संस्कृत कोशांत व इतर अमरकोशादि प्राचीन संस्कृत कोशांतही त्याचा हा अर्थ दिलेला नाही. पण आश्चर्याची गोष्ट ही की कालिदासाच्या 'ऋतुसंहार' या काव्यांत एका श्लोकात (६,२३) त्याचा असा प्रयोग केला आहे—

कुन्दैः सविभ्रमवधूहसितावदातै-
रुद्योतितान्युपवनानि मनोहराणि
चित्तं मुनेरपि हरन्ति निवृत्तरागं
प्रागेव रागमलिनानि मनांसि यूनाम्॥

'विलासी युवतींच्या हास्याप्रमाणें शुभ्र अशीं जीं कुन्दपुष्पें त्यांनी उज्ज्वल झालेलीं उपवनें मुनीचेंही विरक्त चित्त आकर्षितात, मग अनुरागयुक्त अशी तरुणांचीं मनें ती आकर्षितील यांत नवल काय ?'

यांतील 'प्रागेव' याचा हा प्रयोग संस्कृत टीकाकारांस इतका अपरिचित आहे की त्यांपैकी एकाने 'मुनिचित्तापहरणात्प्रागेव' असें त्याचें व्याख्यान केलें आहे. पण तें असावें तितकें समर्पक नाही. यावरून कालिदासाने संस्कृत बौद्ध ग्रंथ, विशेषतः आपल्या पूर्वीच्या कवींचीं काव्यें, वाचलीं होतीं हें सिद्ध होत नाही काय ? कालिदास ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला असें मानलें तर त्यापूर्वी संस्कृत भाषेंत बौद्ध वाङ्मय होतें असें मानावें लागेल. पण ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकांत महायान पंथाचा उत्कर्ष झाल्यावरच बौद्ध लोक संस्कृत भाषेंत ग्रंथरचना करूं लागले. तत्पूर्वी त्यांचे ग्रंथ पाली भाषेंत होते हें विद्वानांस माहीत आहे. तेव्हा कालिदासास अश्वघोषापूर्वी म्हणजे ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत घालतां येत नाही. याच्या उलट तो गुप्तकालांत किंवा तदनंतर झाला असल्यास प्रथम प्रथम त्याने आपल्या पूर्वीचीं बौद्ध कवींचीं काव्यें वाचलीं असतील व त्यांतील कांही विशिष्ट शब्दप्रयोग न कळत त्याच्या प्रथम प्रथमच्या काव्यांत आले असतील. पुढे हे प्रयोग हिंदु ग्रंथांत येत नाहीत असें ध्यानांत आल्यावर ते त्याने टाळले असतील असें अनुमान करतां येतें.

(५) **भीटा येथील पदक**—इ. स. १९०९–१० मध्यें प्रयागाजवळ असलेल्या भीटा या गावीं केलेल्या उत्खननांत एक मोठया आकाराचें

रेवाळ माती–(terra cotta) चें पदक सापडलें. त्यावर मध्यभागीं चार घोड्यांच्या रथांत दोन व्यक्ति बसलेल्या दिसतात. पुढे जरत्कारू-सारखा एक अस्थिपंजर मात्र राहिलेला मनुष्य, मागच्या बाजूस एक झोपडी व जवळच एका वृक्षाजवळ एक ललनाकृतीही दिसते. खालच्या बाजूस मत्स्यकमलादिकांनी युक्त असा तलाव व मध्यभागीं एक व्यक्ति व त्याच्या बाजूस दोन हरिणें व एक पिसारा उभारून नाचत असलेला मोर हीं दृग्गोचर होतात.* यावरून हया पदकांत 'शाकुंतला'च्या प्रथमांकांतील दृश्य दाखविलें आहे असें प्रो. शारदारंजन रे यांनी अनुमान केलें आहे. रथांतील दोन व्यक्ति त्या दुष्यन्त व त्याचा सारथि, पुढील जरत्कारू-सारखा मनुष्य म्हणजे कण्वाश्रमांतील तापसी, झाडाजवळची स्त्री म्हणजे शकुंतला, असें त्यांचें म्हणणें आहे. हें पदक शुंगकालांतील आहे असें कांही विद्वानांचें मत आहे. त्यावरून कालिदास ख्रिस्ती शकापूर्वी होऊन गेला असें प्रो. रे यांचें अनुमान आहे.†

या अनुमानांतही कांही तथ्य नाही. आधी हें पदक शुंगकालांतीलच असें विधान करण्यास भक्कम पुरावा नाही. दुसरी गोष्ट ही की पदका-वरील सीन 'शाकुंतलां'तील आहे असें मानण्यास कांही अडचणी आहेत. रथाच्या पुढे हरिण पळत आहे असें दाखविलें नाही. पुढे जागा नव्हती म्हणून तो खाली दाखविला असें म्हणावें तर तेथे एक नमून दोन हरिण दिसतात व तेथेही ते भीतीने पळत नसून विहार करीत आहेत असें वाटतें. कारण जवळच मोर आपला पंखाकृति पिसारा उभारून नाचतांना दिसतो. यावरून तरुण गौतम रथांत बसून विहार करण्याकरितां जात असतां त्याला मार्गांत एक वृद्ध मनुष्य भेटतो व त्यावरून त्याला वार्द्धक्याची प्रथम कल्पना येते असें जें अनेक प्राचीन बौद्ध ग्रंथांत वर्णिलेलें आढळतें तेंच येथे शिल्पकाराने दाखविलें असावें. ही कल्पना जास्त सयुक्तिक भासते. 'बुद्धचरितां'तील असे अनेक प्रसंग प्रस्तरांदिकांवर चित्रित करण्याचा

*Cambridge History of India, Vol.I (Ancient India) मध्यें दिलेला या पदकाचा फोटो पहा.

†Ray: *Kalidasa's Shakuntala (1920)*, Introduction p.9.

पूर्वी प्रघात होता हें सांची येथील तोरणांवरून सिद्ध झालें आहे. उलट 'शाकुंतला'दि नाटकांतील दृश्यें अशा प्रकारें पदकांवर उमटविण्याचा प्रघात नव्हता व त्यांत कांही हेतूही दिसत नाही.*

कालिदास ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला हें मत अनेक भारतीय विद्वानांनी प्रतिपादिलें आहे व त्याला दंतकथांचा आधार असल्यावरून सर्वसाधारण वाचकांचा तेंच सत्य मानण्याचा स्वाभाविक कल असतो, म्हणून या मताचें इतकें सविस्तर परीक्षण केलें. या मताच्या सिद्धघर्थ कालिदासकालीन कायदा, त्याच्या ग्रंथांतील अकृत्रिम-रम्यता, इत्यादि प्रमाणें कांही शोधकांनी पुढे मांडलीं आहेत, पण तीं सर्वांना पटण्यासारखीं नाहीत. विस्तारभयास्तव या पक्षाचें परीक्षण येथेच संपवून दुसऱ्या मताकडे वळूं.

ख्रिस्तोत्तर पांचवें शतक

रघुवंशाच्या चौथ्या सर्गांत रघूच्या दिग्विजयाचें वर्णन करितांना कालिदासाने खालील श्लोक घातले आहेत—

ततः प्रतस्थे कौबेरीं भास्वानिव रघुर्दिशम् ।
शरैरुस्त्रैरिवोदीच्यानुद्धरिष्यन् रसानिव ॥
विनीताध्वश्रमास्तस्य वंक्षुतीरविचेष्टनैः ।
दुधुवुर्वाजिनः स्कंधाच्छ्रमकुंकुमकेसरान् ॥
तत्र हूणावरोधानां भर्तृषु व्यक्तविक्रमम् ।
कपोलपाटनादेशि बभूव रघुचेष्टितम् ॥ रघुवंश, ४,६६–३८.

या श्लोकांत रघूने उत्तरेंत वंक्षु नदीच्या तीरावर हूणांचा पराभव केला असें वर्णन आलें आहे. 'अमरकोशा'च्या क्षीरस्वामी या टीकाकारानेही केशराला बाल्हीक कां म्हणतात याचें स्पष्टीकरण करतांना या श्लोकांचा उल्लेख केला आहे, त्यावरून ही वंक्षु नदी बाल्हीक (पूर्वीचा बॅक्ट्रिया किंवा सध्याचा बल्ख) या देशांतून वाहणारी ऑक्सस् नदीच होय हें स्पष्ट आहे. हूणांनी ऑक्सस् नदीवर इ स. ४५० च्या सुमारास आपलें राज्य स्थापलें व पुढे लौकरच

*K. Chattopadhyaya : *The Date of Kalidasa*, pp. 157–8.

हिंदुस्थानावर स्वारी केली. ही स्वारी कुमारगुप्ताच्या कारकीर्दीच्या शेवटीं झाली असावी. तिचा युवराज स्कन्दगुप्ताने मोठ्या शौर्याने प्रतिकार केला असें इ. स. ४५५-४५६ च्या काठेवाडांतील गिरनार पर्वताजवळच्या शिलालेखावरून सिद्ध झालें आहे. 'रघुवंशां'त हूण ऑक्सस नदीवर होते असें कालिदासाने वर्णिलें आहे. ही परिस्थिति त्याच्या वेळची असावी व त्यावरून तो ग्रंथ इ. स. ४५० (ऑक्सस नदीच्या कांठीं हूणराज्य स्थापित होण्याचा काळ) व ४५५-४५६ (गिरनार शिलालेखाचा काल) यांच्या दरम्यान लिहिला असला पाहिजे. म्हणून कालिदास पांचव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास होऊन गेला असावा असें प्रो. पाठक यांनी प्रतिपादिलें आहे.*

हें अनुमानही निर्णायक आहे असें वाटत नाही. इ. स. च्या पांचव्या शतकापर्यंत हिंदी लोकांस हूण लोकांची माहिती नव्हती असें जें प्रो. पाठकांनी गृहीत धरलें आहे तें खरें नाही. पारश्यांच्या 'अवेस्ता' ग्रंथांत व आपल्या 'महाभारतां'तही हूणांचा उल्लेख आहे. इ. स. च्या तिसऱ्या शतकांत लिहिलेल्या 'ललितविस्तर' ग्रंथांत बुद्धाने आपल्या बाळपणीं शिकलेल्या लिपींचीं नांवें आलीं आहेत त्यांत हूणलिपीचा अंतर्भाव केलेला आहे. ख्रिस्तपूर्व १४० च्या सुमारास हूणांनी 'यूएची' (ज्यांना पुढे कुशान ही संज्ञा प्राप्त झाली त्या) लोकांना ऑक्सस् नदीच्या दक्षिणेस पिटाळून लावलें. तेव्हापासून ऑक्सस्च्या उत्तरेस त्यांचा अंमल असावा किंवा निदान वरचेवर त्या बाजूस त्यांची टोळधाड येत असावी. तेव्हा ख्रिस्तोत्तर पांचव्या शतकांत त्यांनी ऑक्सस् नदीच्या कांठीं राज्य स्थापीपर्यंत ते त्या नदीच्या उत्तरेस आहेत हें कालिदासासारख्या चोकस माणसास माहीत नसणें अशक्य आहे. व म्हणून त्याचा काळ इ. स. च्या पांचव्या शतकाच्या मध्यापर्यंत ओढण्याची जरूरी नाही.

ख्रिस्तोत्तर सहावें शतक

इ. स. च्या सहाव्या शतकांत हिंदुस्थानांत संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन झालें, त्या वेळीं कालिदास झाला असावा, असें मत प्रो. मॅक्समूलरने प्रथम पुढे मांडलें. अनेक कारणांमुळें त्याचें हें मत आता कोणी मानीत नाही.

*K. B. Pathak : *Meghaduta* (1916) Introduction, X.

पण अलीकडे कांही विद्वानांनी दुसऱ्या कांही प्रमाणांवरून तें मत सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. कै. महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री यांनी 'बिहार व ओरिसा रीसर्च सोसायटी जर्नल'च्या व्हॉ. १ व २ मध्यें व धारचे रा. का. कृ. लेले व शि. का. ओक यांनी 'विविधज्ञानविस्तार' पु० ५३ मध्यें या मताच्या सिद्धयर्थ अनेक प्रमाणें पुढे मांडली आहेत. विस्तारभयास्तव त्यांच्या प्रत्येक प्रमाणाचा येथे विचार करणें शक्य नाही. तथापि कांही मुख्य प्रमाणें थोडक्यांत पुढे मांडून त्यांचें परीक्षण करूं.

(१) **यशोधर्मन्–विक्रमादित्य व मातृगुप्त–कालिदास.** प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यूएनत्संग हा इ. स. ६२९ ते ६४५ पर्यंत हिंदुस्थानांत प्रवास करीत होता. त्याने माळव्यांत (Molapo) शिलादित्य या नांवाच्या राजाने सुमारें ५३० ते ५८० पर्यंत पन्नास वर्षे राज्य केलें असें म्हटलें जाहे. कल्हणकृत 'राजतरंगिणी'वरून असें दिसतें की उज्जैनीच्या विक्रमादित्याने काश्मीरच्या सिंहासनावर आपला विद्वान मित्र व कवि मातृगुप्त यास बसविलें होतें. विक्रमादित्याच्या मृत्यूनंतर मातृगुप्ताने गादी सोडली व नंतर राज्याचा खरा वारस प्रवरसेन हा राजा झाला. त्याने स्थापिलेलें प्रवरपूर ह्यूएनत्संगाच्या वर्णनावरून सहाव्या शतकांत वसलेलें दिसतें. तेव्हा विक्रमादित्याचाही काळ सहावें शतक हाच धरला पाहिजे. यास्तव ह्यूएनत्संगने वर्णिलेला माळव्याचा राजा शिलादित्य व हा विक्रमादित्य हे एकच असावेत. 'राजतरंगिणी'त या विक्रमादित्याने शकांचा उच्छेद केला असें म्हटलें आहे. याच शतकांत माळव्यांत यशोधर्मदेव नांवाचा एक प्रबळ राजा होऊन गेला. त्याचे दोन कोरीव लेख* मंदोसर येथे सापडले आहेत. त्यांवरून त्याने मिहिरकुल या बलाढ्य हूण राजाचा पराभव केला होता, आपलें साम्राज्य गुप्त व हूण राजांच्या साम्राज्यापेक्षाही जास्त विस्तीर्ण केलें होतें व 'राजाधिराज' 'परमेश्वर' हीं बिरुदें धारण केलीं होतीं असें समजतें. यशोधर्मन् हाच ह्यूएनत्संगाचा शिलादित्य व कल्हणाचा हर्ष-विक्रमादित्य. याने पराजित केलेल्या हूणांनाच कल्हणाने व अल्बेरुणीने शक म्हटलें असावें. या विक्रमादित्याने ज्याला काश्मीरच्या सिंहासनावर बसविलें तो

* यांपैकी एक इ. स. ५३२चा आहे.

मातृगुप्त हाच कालिदास असावा. मातृगुप्ताने काश्मीरच्या राज्याचा त्याग केल्यावर प्रवरसेन गादीवर आला. त्याच्या नांवाने प्रसिद्ध असलेलें 'सेतुबंध' हें प्राकृत काव्यही विक्रमादित्याचे आज्ञेवरून कालिदासाने लिहिलें अशी विद्वानांत आख्यायिका प्रचलित होती असें त्या काव्याच्या एका अकबरकालीन टीकाकाराच्या उल्लेखावरून दिसतें. त्यावरूनही विक्रमादित्य, प्रवरसेन व कालिदास हे समकालीन होते हेंच सिद्ध होतें.

वरील प्रमाणावर अनेक ठिकाणीं आक्षेप घेतां येईल. ह्यूएनत्संग ज्याला 'मोलापो' (Molapo) म्हणतो तो प्रदेश कोणता याबद्दल विद्वानांत पुष्कळ चर्चा झाली आहे. तिचा विचार करून व्हिन्सेन्ट स्मिथ* या प्रसिद्ध इतिहासलेखकाने ठरविलें आहे की मही नदीचें खोरें, साबरमतीच्या पूर्वेकडील थोडा भाग व दक्षिण राजपुतान्याचा डोंगराळ प्रदेश या भागालाच ह्यूएनत्संग 'मोलापो' म्हणत असावा. त्याची राजधानी उज्जैनी नव्हती. कारण याच चिनी प्रवाशाने पुढे उज्जैनीचें राज्य निराळें होतें असें वर्णिलें आहे. ह्यूएनत्संगने ज्याची अत्यंत धार्मिक म्हणून स्तुति केली आहे तो यशोधर्मन् नसून वलभीचा पहिला शिलादित्य होय असें प्रो. सिल्व्हन् लेव्ही यांनी दाखविलें आहे. 'राजतरंगिणी' हा ग्रंथ इ.स.च्या बाराव्या शतकांत लिहिलेला. तो त्या काळच्या इतिहासापुरता विश्वसनीय असला तरी प्राचीन काळाविषयीं तसा नाही. उलट त्यांत बऱ्याच असंभवनीय व अतिशयोक्तीच्या गोष्टी भरलेल्या आहेत हें सिद्ध झालें आहे. यशोधर्मन् हाच विक्रमादित्य असता तर त्याने 'राजाधिराज' व 'परमेश्वर' या विरुदांप्रमाणें विक्रमादित्य ही मानार्ह पदवी आपल्या लेखांत उल्लेखिली असती. त्याला 'शकारि' तर मुळींच म्हणतां येत नाही. कारण ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकांत शकांचें नांव कोठेच येत नाही. मातृगुप्त हाच कालिदास असता तर कल्हणाने त्याच्या वर्णनार्थ जे दोनशें श्लोक लिहिले त्यांत एकदा तरी तसा उल्लेख केला असता. मातृगुप्ताने प्रवरसेनाकरितां 'सेतुबंध' काव्य लिहिलें असणें शक्य नाही. कारण—(१) 'राजतरंगिणी'त तसा उल्लेख नाही; (२) प्रवरसेनाचें व विक्रमादित्याचें वैर होतें असें

Early Histry of India (3rd. Ed.) p. 323.

कल्हणाने वर्णिलें आहे तेव्हा प्रवरसेनाकरितां विक्रमादित्याने कालिदासास तें काव्य लिहिण्यास आज्ञा केली असेल असें वाटत नाही; (३) प्रवरसेन राज्यावर आल्यावर त्याने आग्रह केला तरी मातृगुप्त काश्मीरांत राहिला नाही, तर लागलीच काशीस जाऊन त्याने संन्यास घेतला (राजतरङ्गिणी ३, २९०-३२०), असें कल्हणाने वर्णिलें आहे. यावरून वरील गोष्ट अशक्य होय हें दिसून येईल.

(२) **वराहमिहिराच्या ग्रंथांतील साम्य**—वराहमिहिर सहाव्या शतकांत होऊन गेला हें निश्चित आहे. त्याने दृक्प्रत्ययानुरूप अयनबिंदु निश्चित केले व त्याच्या वेळेपासून वर्षाऋतूची प्रवृत्ति आषाढाचे आरंभीं मानण्यांत येऊं लागली. तत्पूर्वी श्रावणांत दक्षिणायनाचा व म्हणून वर्षाऋतूचा आरंभ मानला जात असे असें त्याच्या ग्रंथांतील विधानांवरून दिसतें. कालिदासाने आपल्या 'मेघदूतां'त 'आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुम्' इत्यादि वर्णनांत वर्षाऋतूचा आरंभ आपल्या वेळीं आषाढांत होत होता असें दाखविलें जाहे. म्हणून तो वराहमिहिराचा समकालीन किंवा नंतरचा असावा. इतरत्रही अनेक ठिकाणीं वराहमिहिराच्या ग्रंथांतून त्याने ज्योतिषविषयक कल्पना घेतलेल्या दिसतात. याकरितां खालील उदाहरणें पहा—

(अ) **वराहमिहिर—भूच्छायां स्वग्रहणे भास्करमर्कग्रहे प्रविशतीन्दुः।**
बृहत्संहिता—राहुचार.

कालिदास—छाया हि भूमेः शशिनो मलत्वे-
नारोपिता शुद्धिमतः प्रजाभिः॥ रघु० १४, ४०.

या दोन्ही ठिकाणीं भूमीच्या छायेमुळें चंद्राला ग्रहण लागतें असें म्हटलें आहे.

(आ) **वराहमिहिर—सलिलमये शशिनि रवेर्दीधितयो मूर्छितास्तमो नैशम्।**
बृहत्संहिता-चंद्रचार.

कालिदास-पुपोष वृद्धिं हरिदश्वदीधितेरनुप्रवेशादिव बालचंद्रमाः।
रघु० ३, २२.

या दोन्ही स्थळीं चंद्र सूर्याच्या किरणांनी प्रकाशित होतो ही कल्पना आली आहे. तेव्हा वराहमिहिर व कालिदास हे दोघेही विक्रमादित्याच्या नवरत्नांपैकी होते या परंपरागत गोष्टींत तथ्य असावें.

वरील प्रमाणही विशेष प्रबळ नाही. आषाढ महिन्यांत वर्षारंभ वराहमिहिरापूर्वीही कित्येक वर्षे होत असला पाहिजे. त्यामुळें कालिदास वराहमिहिराचा समकालीन किंवा नंतरचा असणें जरूर नाही. कारण आषाढ महिन्यांत पाऊस पडण्यास सुरुवात होते हें दिसत असल्यावर कालिदासाने आपल्या काव्यांत तसें विधान केले यांत आश्चर्य नाही. त्यावरून त्याचा काळ वराहमिहिराच्या काळाच्या मागे पुढे शेपन्नास वर्षांनी असला पाहिजे इतकेंच आपणांस म्हणतां येईल. आता वर जी ज्योतिषविषयक कल्पनासाम्याचीं स्थळें दाखविलीं त्यांपैकी पहिल्या ठिकाणीं कालिदास चन्द्रग्रहणाविषयीं बोलत नसून चन्द्रावर दिसणाऱ्या डागाचें कारण सांगत आहे हें स्पष्ट आहे. दुसऱ्या ठिकाणची चंद्र सूर्यकिरणांनी प्रकाशित होतो ही कल्पना फार प्राचीन आहे. कारण ख्रिस्तपूर्व आठव्या शतकांतील यास्काच्या निरुक्तांतही ती 'अथाप्यस्यैको रश्मिश्चन्द्रमसं प्रति दीप्यते तदेतेनोपेक्षितव्यम्। आदित्यतोऽस्य दीप्तिर्भवति।' (अ. २, ६) याप्रमाणें दिलेली आढळते. तेव्हा या कारणामुळें कालिदासास वराहमिहिराचा समकालीन मानणें युक्त होणार नाही.

(३) **दिङ्नागाचार्यांचा मेघदूतांतील उल्लेख**—कालिदासाने आपल्या 'मेघदूत' काव्यांत यक्षाला अलकेचा मार्ग सांगतांना

स्थानादस्मात्सरसनिचुलादुत्पतोदङ्मुखः खं
दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावलेपान्॥ मेघदूत १४.

या पद्यार्धांत श्लेषाने स्वसमकालीन निचुल व दिङ्नाग या दोन विद्वानांचा उल्लेख केला आहे असें दक्षिणावर्त व मल्लिनाथ या टीकाकारांनी म्हटलें आहे. 'त्यांपैकी रामगिरीच्या जवळपास राहणारा व कालिदासाचा सहाध्यायी निचुलकवि हा कालिदासाच्या काव्यावरील आक्षेप दूर करीत असे, तर दिङ्नाग हा कालिदासाने आपल्या कल्पना दुसऱ्याच्या ग्रंथांतून चोरल्या असें मोठ्या अभिनिवेशाने हातवारे करून सांगत असे. तेव्हा त्या आचार्याच्या स्थूलहस्तांना दूर सारून, हे मेघा, तूं उत्तरेकडील आपला मार्ग आक्रमण कर, असें कालिदास यक्षमुखाने मेघास सांगत आहे.' दिङ्नाग हा प्रसिद्ध बौद्ध तत्त्वज्ञ इ. स. च्या सहाव्या शतकांत होऊन गेला. कारण त्याचा गुरु वसुबंधु हा इ. स. ४८० पर्यंत हयात होता. यावरूनही कालिदास हा सहाव्या शतकांत होऊन गेला हें सिद्ध होतें.

या प्रमाणांतही विशेष 'राम' नाही. कालिदास आपल्या काव्यांत क्वचित श्लेष योजतो हें खरें. तथापि शक्य तेथे श्लेषाचा उपयोग करण्याची बाण, सुबंधु, श्रीहर्ष यांच्यासारखी त्याला संवय नव्हती. तेव्हा तसेंच कांही विशेष प्रमाण असल्याशिवाय श्लेषमूलक वैयक्तिक उल्लेख त्याच्या काव्यांत न पाहणेंच बरें. दुसरें असें की 'दिङ्नागानां' हया पदाने कवीला आपल्या प्रतिस्पर्ध्याचा उल्लेख करावयाचा असता तर तो खचित बहुवचनाचा उपयोग करताना. शिवाय दिङ्नाग हा एक नैयायिक होता. काव्यशास्त्राचा त्याचा व्यासंग होता असा कोठे उल्लेख नाही. तेव्हा त्याने कालिदासाचे दोष दाखविण्याची उठाठेव केली असेलसें वाटत नाही. वरील पद्यांत निचुल व दिङ्नाग या व्यक्तीचा उल्लेख आहे असें मानलें तरी वरील काळ सिद्ध होत नाही. डॉ. कीथ, प्रो. मॅक्डोनेल वगैरेंच्या मतें दिङ्नाग इ. स. ४०० च्या सुमारास होऊन गेला. त्याचा गुरु वसुबन्धु हा वामनाच्या 'काव्यालंकारसूत्रवृत्ती'तील एका उल्लेखावरून चन्द्रगुप्तपुत्राचा सचिव होता असें दिसतें. पुष्कळ विद्वानांचे मतें हा चन्द्रगुप्त म्हणजे गुप्तकालसंस्थापक पहिला चंद्रगुप्त (इ. स. ३१९–३३०) व त्याचा पुत्र म्हणजे प्रसिद्ध सम्राट् समुद्रगुप्त. तेव्हा वसुबन्धु हा चौथ्या शतकाच्या मध्याच्या सुमारास व त्याचा शिष्य दिङ्नाग त्याच शतकाच्या अंतीं होऊन गेला असावा हें उघड आहे.

(४) **'ज्योतिर्विदाभरणां'तील उल्लेख**–'ज्योतिर्विदाभरण' ग्रंथाच्या बाविसाव्या अध्यायांत तो ग्रंथ शकारि विक्रमादित्याच्या आश्रयास असणाऱ्या कालिदासाने रचला व तो कवि त्याच्या नवरत्नांपैकी एक होता असें म्हटलें आहे.* ग्रंथांतील कांही ज्योतिषविषयक उल्लेखांवरून हा ग्रंथ तेराव्या शतकांतील असें मानण्यांत येतें; पण या ग्रंथकाराने वराहमिहिराने दिलेला कलियुगारंभ मानला असल्याने ग्रंथाचा रचनाकाल इ. स. ५८० हा येतो. या ग्रंथांत व कालिदासाच्या काव्यांत अनेक ठिकाणीं कल्पनासाम्य आढळतें.† शेवटच्या विक्रमप्रशस्तीची भाषा असावी तितकी जोरदार नाही हें खरें, पण यावर असें म्हणतां येईल की महाकवीच्या

*धन्वन्तरिक्षपणकामरसिंहशङ्कुवेतालभट्टघटखर्परकालिदासाः।
ख्यातो वराहमिहिरो नृपतेः सभायां रत्नानि वै वररुचिर्नव विक्रमस्य ॥ २२, १०.
†ज्योति० ४, ८५ व कुमार० १, ३ पहा.

सर्वच ग्रंथांतील भाषासौष्ठव सारखें असतें असें नाही. उदाहरणार्थ भाषेच्या पुराव्यावरून 'ऋतुसंहार' व 'मालविकाग्निमित्र' हे ग्रंथ कालिदासाचे असावे किंवा नसावे यावद्दल पुष्कळ दिवस विद्वानांस संशय होता. तेव्हा कालिदास इ. स. च्या सहाव्या शतकांत यशोधर्मन् विष्णुवर्धन याच्या दरबारीं होऊन गेला असावा.

वरील मतही सयुक्तिक भासत नाही. 'ज्योतिर्विदाभरण' हा ग्रंथ सहाव्या शतकांतील असें कबूल केलें तरी तो रघुवंशादि उत्कृष्ट ग्रंथ लिहिणाऱ्या कालिदासाचा असणें शक्य नाही. या ग्रंथांतील निर्देश (अ० २२, श्लो० २० पहा) खरा मानावयाचा तर तो कालिदासाने रघुवंशादि काव्यांनंतर लिहिला असें मानलें पाहिजे. या वेळीं कालिदास परिणतप्रज्ञ झाला होता. त्याच्या हातून या ग्रंथांतल्या सारखी सदोष भाषा लिहिली जाणें शक्य नाही. 'ऋतुसंहार' व 'मालविकाग्निमित्र' यांचा दाखला येथे उपयोगी पडणार नाही, कारण ते ग्रंथ कवीने प्रथम लिहिले हें स्पष्ट आहे. तेव्हा त्यांत कवीची भाषाशैली तितकी मधुर व निर्दोष दिसत नसल्यास नवल नाही. तेव्हा कालिदासाच्या नांवावर दुसऱ्या कोणी हा ग्रंथ दडपून दिला किंवा दुसऱ्या कोणी कालिदास नामक ग्रंथकाराने हा लिहिला असावा. अशा प्रकारचे तीन कालिदास राजशेखराच्या काळीं (इ. स. चें १० वें शतक) माहीत होते. त्यांस उद्देशून त्याने म्हटलें आहे–

एकोऽपि जीयते हन्त कालिदासो न केनचित् ।
शृंगारे ललितोद्गारे कालिदासत्रयी किमु ॥

शृंगाररस वर्णन करण्यांत व मधुर भाषाशैलींत एका कालिदासाची बरोबरी करणारा अद्यापि कोणी झाला नाही, मग तीन कालिदासांना (अर्थात निरनिराळ्या विषयांत) मागे टाकणारा कोठला सापडावयाला !

येथवर कालिदासकालविषयक कांही मतांचें परीक्षण करून तीं सयुक्तिक नाहीत हें दाखविलें. आता आम्हांस संमत असलेलें मत सप्रमाण पुढे मांडतों.

कालिदास सहाव्या शतकांत होऊन गेला या मताला कांही आधार नाही हें वर दाखविलें आहे. याच्याही पुढे जाऊन तो पांचव्या शतकाच्या

द्वितीयार्धापूर्वी केव्हा तरी होऊन गेला असावा असेंही आपणांस एका प्रमाणावरून म्हणतां येतें त्याकडे आता वळूं.

मध्यहिंदुस्थानांत मन्दसोर येथे इ. स. ४७३ चा एक शिलालेख डॉ. फ्लीटने आपल्या गुप्तकालीन शिलालेखांच्या पुस्तकांत* प्रसिद्ध केला आहे. या लेखांत लाट म्हणजे मध्य व दक्षिण गुजराथ येथून निघून मन्दसोर येथे येऊन वसति केलेल्या कोष्टयांच्या संघाने कुमारगुप्ताच्या कारकीर्दीत इ. स. ४३७ मध्यें एक सूर्यमंदिर बांधलें व पुढे इ. स. ४७३मध्यें त्याचा जीर्णोद्धार केला, त्याचें वर्णन आलें आहे. त्या प्रसंगीं संघाने वत्सभट्टि नामक कवीकडून एक प्रशस्ति तयार करवून ती एका शिलाखंडावर कोरून ठेवली. या प्रशस्तींत अनेक ठिकाणीं कालिदासाच्या काव्याचें अनुकरण केलेलें दिसतें असें डॉ० बुल्हर, कीलहॉर्न, मॅकडोनेल, कीथ वगैरे विद्वानांनी दाखवून दिलें आहे. उदाहरणार्थ, खालील साम्य पहा—

कालिदास—विद्युत्वन्तं ललितवनिताः सेन्द्रचापं सचित्राः
संगीताय प्रहतमुरजाः स्निग्धगंभीरघोषम्।
अन्तस्तोयं मणिमयभुवस्तुंगमभ्रंलिहाग्राः
प्रासादास्त्वां तुलयितुमलं यत्र तैस्तैर्विशेषैः॥ मेघदूत, ६६.

वत्सभट्टि—चलत्पताकान्यबलासनाथान्यत्यर्थशुक्लान्यधिकोन्नतानि।
'तडिल्लताचित्रसिताभ्रकूटतुल्योपमानानि गृहाणि यत्र॥ श्लो०१०.

या दोन्ही पद्यांत उत्तुंग गृहांची व मेघांची एकाच प्रकारची तुलना आली आहे. तसेंच खालील साम्यही लक्षांत घेण्यासारखें आहे–

कालिदास—
निरुद्धवातायनमन्दिरोदरं हुताशनो भानुमतो गभस्तयः।
गुरूणि वासांस्यबलाः सयौवनाः प्रयान्ति काले ऽत्र जनस्य सेव्यताम्॥
न चंदनं चंद्रमरीचिशीतलं न हर्म्यपृष्ठं शरदिन्दुनिर्मलम्
न वायवः सांद्रतुषारशीतला जनस्य चित्तं रमयन्ति सांप्रतम्॥
ऋतुसंहार ५, २–३.

वत्सभट्टि–रामासनाथभवनोदरभास्करांशुवह्निप्रतापसुभगे जलशीतलीने।
चंद्रांशुहर्म्यतलचंदनतालवृंतहारोपभोगरहिते हिमदिग्धपद्मे॥
श्लो० ३१.

---

*Dr. Fleet: *Gupta Inscriptions* (No. 18).

यांतील वत्सभट्टीच्या पद्यांत कालिदासाच्या श्लोकांचें प्रतिबिंब स्पष्टपणें पडलेलें दिसतें. वत्सभट्टि हा अगदी साधारण प्रतीचा कवि. त्याच्या कृतींत अनेक दोष विद्वानांनी दाखविले आहेत.* तेव्हा त्यानेच कालिदासाच्या कल्पना उसन्या घेतल्या असाव्यात असें सहजच अनुमान होतें व या प्रमाणावरून कालिदास पांचव्या शतकाच्या द्वितीयार्धापूर्वी होऊन गेला असावा असें निश्चित विधान आपणांस करतां येतें.

आता कालिदासाच्या काळाची पलीकडील मर्यादा जरा जास्त निश्चितपणें ठरवितां येते काय पाहूं. कालिदासाने वात्स्यायनाच्या कामशास्त्राचा फार काळजीपूर्वक अभ्यास केला होता असें दिसतें. विवाहित स्त्रीचीं कर्तव्यें सांगतांना वात्स्यायनाने खालील सूत्रें लिहिलीं आहेत—

श्वश्रूश्वशुरपरिचर्या तत्पारतंत्र्यमनुत्तरवादिता। ... भोगेष्वनुत्सेकः। परिजने दाक्षिण्यम्। ... नायकापचारेषु किञ्चित्कलुषिता नात्यर्थं निवदेत्।

कामसूत्र, पृ० २३९, २३६.

या इतस्ततः विखुरलेल्या वचनांस एके ठिकाणीं गुंफून कालिदासाने कण्वमुखाने नववधूस खालील पद्यांत उत्कृष्ट उपदेश केला आहे—

शुश्रूषस्व गुरून् कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने
भर्तुर्विप्रकृताऽपि रोषणतया मा स्म प्रतीपं गमः।
भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भोगेष्वनुत्सेकिनी
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयः॥

शाकुन्तल ४, १७.

'शाकुंतलां'त जे सर्वोत्कृष्ट चार श्लोक आहेत म्हणून म्हणतात त्यांत वरील श्लोकाची गणना रसिकांनी एकमताने केली आहे. पण त्या श्लोकांतील मूळ कल्पना वात्स्यायनाच्या हें वरील उतार्‍यांच्या तुलनेवरून स्पष्ट होईल. तेव्हा कालिदास वात्स्यायनानंतर झाला असला पाहिजे. वात्स्यायनाचा काल कामशास्त्रांतील राजकीय परिस्थितीच्या उल्लेखांवरून खिस्तोत्तर तृतीय शतकाचा मध्य हा विद्वानांनी ठरविला आहे.† तेव्हा कालिदास इ. स. २५० नंतर होऊन गेला असावा.

---

*डॉ. बुल्हर यांचा लेख—*Indian Antiquary*, Vol. 54, pp. 146-7.

†H. C. Chakladar : *Social Life in Ancient India*, p. 33.

तेव्हा इ. स. २५० ते ४५० या दोनशें वर्षांत कालिदासाचा काळ शोधला पाहिजे. कालिदास हा उज्जैनीस रहात असावा असें त्याच्या ग्रंथांवरून दिसतें. त्याचा आश्रयदाता कोणी 'शकारि' विक्रमादित्य असावा असें परंपरागत गोष्टी व त्याच्या ग्रंथांतील 'विक्रम' नांवावरील श्लेष यावरून अनुमान होतें हें वर दाखविलेंच आहे. या प्रकरणाच्या आरंभीं जें ११ व्या शतकांतील अभिनन्द कवीचें वचन उद्धृत केलें आहे त्यांतही कालिदासाचे ग्रंथ कोणा शकारीच्या आश्रयाने प्रसिद्धि पावले असें म्हटलें आहे. वरील दोनशें वर्षांच्या काळांत द्वितीय चन्द्रगुप्त व त्याचा नातु स्कंदगुप्त या दोघांनीच विक्रमादित्य ही पदवी धारण केली होती, असें त्यांच्या नाण्यांवरून दिसतें. त्यांपैकी द्वितीय चन्द्रगुप्त यालाच 'शकारि' म्हणतां येईल. कारण याने इ. स. ३९५ च्या सुमारास काठेवाडच्या परकी शकवंशीय क्षत्रपांचा समूळ उच्छेद करून तो प्रांत आपल्या राज्यास जोडला असें शिलालेख व नाणीं यांवरून सिद्ध झालें आहे. त्याची राजधानीही उज्जैनीस होती. शिवाय तो मोठा दानशूर म्हणून प्रसिद्ध होता व त्याचा विद्वानांस उदार आश्रय असे. कौत्स शाब नांवाच्या त्याच्या एका सांधिविग्रहिक मन्त्र्याने मध्य हिंदुस्थानांत उदयगिरि येथे एक लेख* कोरविला आहे. त्यांत त्याने आपला शब्दार्थन्यायलोकज्ञ व कवि म्हणून स्पष्ट निर्देश केला आहे. त्यावरून विद्वान माणसांस मोठमोठ्या हुद्द्यांवर नेमण्याची त्याची पद्धत होती असें दिसतें. तो स्वतःही मोठा विद्वान होता. कालिदास, मेंठ इत्यादि विद्वानांप्रमाणें उज्जैनीच्या ब्रह्मसभेपुढे त्याने स्वतःही परीक्षा दिली होती असें राजशेखराच्या काव्यमीमांसेंत उद्धृत केलेल्या एका प्राचीन वचनावरून दिसतें.† राजशेखराने म्हटल्याप्रमाणें राजाच कवि असल्यावर सर्व लोक काव्य करूं लागतात व त्यांना त्याचा आश्रय मिळतो. तेव्हा या चन्द्रगुप्त विक्रमादित्याच्याच आश्रयास कालिदास असावा असें अनुमान करतां येतें.

---

*Dr. Fleet: *Gupta Inscriptions* (No. 6).

†श्रूयते चोज्जयिन्यां काव्यकारपरीक्षा।—इह कालिदासमेण्ठावत्रामररूपसूरभारवयः। हरिचन्द्रचन्द्रगुप्तौ प्रकाशिताविह विशालायाम्॥—काव्यमीमांसा अ. १०.

'कवीन्द्रवचनसमुच्चया'दि प्राचीन श्लोकसंग्रहांत विक्रमादित्याच्या नांवावर दिलेले श्लोक द्वितीय चन्द्रगुप्तानेच रचले असावे.

कालिदासाच्या चरित्राविषयीं जी थोडी माहिती अलीकडे उपलब्ध झाली आहे त्यानेही वरील अनुमानास बळकटी येते. क्षेमेन्द्राच्या 'औचित्य-विचारचर्चे'त अधिकरणौचित्याचें उदाहरण म्हणन खालील श्लोक कालिदासाच्या 'कुन्तलेश्वरदौत्य' नामक ग्रंथांतून घेतला आहे--

इह निवसति मेरुः शेखरः क्ष्माधराणा-
मिह विनिहितभाराः सागराः सप्त चान्ये।
इदमहिपतिभोगस्तम्भविभ्राजमानं
धरणितलमिहैव स्थानमस्मद्विधानाम्॥

औचित्यविचारचर्चा पृ. १४०.

या श्लोकांतील स्थानवर्णनाचें औचित्य क्षेमेन्द्राने येणेंप्रमाणें व्यक्त केलें आहे. "सम्राटाचा दूत माण्डलिकराजाच्या सभेंत गेला असतां त्याला आपल्या प्रभूच्या पदवीला अनुरूप अशी मानाची जागा मिळाली नाही. तेव्हा तो कार्यवशात् भूमीवरच बसला (व इतर मानकऱ्यांनी चेष्टा केली तेव्हा) धीरगंभीर स्वराने म्हणतो--'शेषफणारूपी स्तंभांनी निश्चल झालेलें हें भूमितलच आम्हांस योग्य स्थान आहे. कारण पर्वतश्रेष्ठ मेरु व सातही महासागर या आसनावरच विराजमान आहेत व त्यांच्या इतकीच माझी योग्यता आहे." हा दूत किंवा वकील कोण व तो कोणत्या सम्राटाचा हें समजण्यास नुकतेंच एक साधन उपलब्ध झालें आहे. थोड्या वर्षांपूर्वी मद्रासेकडे धाराधीश भोजराजाचा 'शृंगारप्रकाश' हा ग्रंथ ज्ञात झाला. त्याच्या आठव्या प्रकाशांत कालिदासाच्या तोंडीं खालील श्लोक घातला आहे--

असकलहसितत्वात्क्षालितानीव कान्त्या
मुकुलितनयनत्वाद्व्यक्तकर्णोत्पलानि।
पिबति मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणाम्
त्वयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः॥

[तुझ्यावर (राज्याचा) भार टाकून कुन्तलदेशाचा राजा किंचित् हास्याने ज्यांच्यावर कांति पसरली आहे, नयन झाकले असल्याने ज्यांच्या कर्णावरचीं कमलें स्पष्ट दिसत आहेत अशीं सुरापानाने सुगन्धित झालेलीं आपल्या प्रियांचीं मुखें चुंबीत आहे.] अर्थातच कालिदास हा स्वतःच वकील म्हणून कुन्तलेश्वर नामक सामन्ताच्या दरबारीं गेला होता असें

दिसतें. परत उज्जैनीस गेल्यावर विक्रमादित्याने कुन्तलेश काय करीत असतो असें विचारल्यावरून, वरील श्लोकांत कालिदासाने कुन्तलेश तुझ्यावर राज्याचा भार टाकून स्त्रियांशीं विलास करण्यांत दंग असतो असें उत्तर दिलें आहे. हा श्लोक भोजाच्या 'सरस्वतीकंठाभरणां'त व राजशेखराच्या 'काव्यमीमांसें'तही उद्धृत केला आहे व राजशेखराने वरील श्लोकांत थोडा बदल करून—

पिबतु मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणां
मयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः।

काव्यमीमांसा, अ० ११.

म्हणजे 'माझ्यावर भार टाकून कुन्तलेश तसें करो' असें विक्रमादित्याने कालिदासाला उत्तर दिलें, असें दाखविलें आहे. कालिदास हा मोठा विद्वान् व चतुर मुत्सद्दी होता हें त्याच्या ग्रंथांवरून आम्ही पुढे दाखविणार आहों. तेव्हा त्याला आपला वकील म्हणून सामन्तसभेंत विक्रमादित्याने पाठविलें असलें तरी त्यांत आश्चर्य नाही.

आता हा कुन्तलेश कोण याचा विचार करूं. या प्रश्नावर आतापर्यंत दोन मतें व्यक्त झालीं आहेत. दक्षिणमहाराष्ट्र व म्हैसूरचा उत्तरभाग यास साधारणपणें कुन्तल असें म्हणत. म्हैसूर संस्थानांत शिमोगा जिल्ह्यांत तालगुंड येथे कदंबांचा एक शिलालेख सापडला आहे. त्यांत काकुस्थवर्मन् या राजाने आपली मुलगी देऊन गुप्तराजाच्या कुळाला प्रसिद्ध केलें असें म्हटलें आहे. त्यावरून चन्द्रगुप्त विक्रमादित्याने या राजाची मुलगी आपल्या मुलाकरितां केली असावी व तो विवाहसंबंध जुळवून आणण्याच्या नाजूक कामावर कालिदासाची योजना झाली असावी, असें मुंबईच्या सेंट झेविअर कॉलेजांतील इतिहासाचे अध्यापक फादर हेरास यांनी अनुमान केलें आहे.* पण त्याला विशेष आधार दिसत नाही. कारण तालगुंडच्या लेखांत अमक्याच गुप्तराजाने कदम्बराजकन्या वरिली असें दिलें नाही. शिवाय वर दिलेल्या श्लोकांत सूचित केल्याप्रमाणें कदम्बनृपतीचें राज्य चंद्रगुप्ताच्या तंत्राने चाललें होतें याला पुरावा नाही. आणखी असें की

*J. B. O. R. S. Vol. XII, Part IV.

काकुस्थवर्म्याच्या व चन्द्रगुप्ताच्या काळांत ५० । ६० वर्षांचें अंतर आहे. तेव्हा वरील अनुमान बरोबर आहे असें वाटत नाही.* याच्या उलट प्रो. कृष्णस्वामी ऐयंगार यांनी हा कुन्तलेश्वर म्हणजे चन्द्रगुप्त-विक्रमादित्याचा नातु वाकाटक नृपति दुसरा प्रवरसेन असावा असें म्हटलें आहे तेंच सयुक्तिक दिसतें.† चन्द्रगुप्ताने आपली मुलगी प्रभावतिगुप्ता ही वाकाटक घराण्यांतील राजा द्वितीय रुद्रसेन यास दिली होती. हा विवाह इ. स. ३९५ च्या सुमारास झाला असावा असें व्हिन्सेंट स्मिथ्ने दाखवून दिलें आहे. रुद्रसेन पुढे लौकरच मरण पावला. त्यास दिवाकरसेन व दामोदरसेन असे दोन (कांहींच्या मतें तीन) पुत्र होते. ते लहान असल्यामुळें त्यांच्यातर्फे प्रभावतिगुप्ता पुष्कळ वर्षें राज्यकारभार पहात होती. त्यांपैकी एक मुलगा (द्वितीय) 'प्रवरसेन' या नांवाने राज्य करूं लागला. प्रवरसेन लहान असतांना चन्द्रगुप्ताच्या तत्राने राज्यकारभार चालला होता व वाकाटकांच्या दरबारीं गुप्तांच्या अधिकारिवर्गाचें वर्चस्व होतें हें प्रभावतिगुप्तेच्या ताम्रपटावरून दिसतें. कारण त्या ताम्रपटांत वाकाटकांच्या ताम्रपटांतल्याप्रमाणें वाकाटकवंशाची वंशावळ दिली नसून प्रभावतिगुप्तेने आपल्या माहेरच्या गुप्तघराण्याचीच वंशावळ दिली आहे. असो. पुढे प्रवरसेन वयांत आल्यावर तो राज्यकारभार कसा करतो हें जाणण्याच्या इच्छेने विक्रमादित्याने कालिदासास विदर्भांत पाठविलें असावें. कालिदास विदर्भांत कांही दिवस राहिलेला दिसतो. वाकाटक नृप यात्रेच्या निमित्ताने रामटेकास जात येत असत असें रा० य. रा. गुप्ते यांनी संपादिलेल्या ऋद्धपूरच्या प्रभावतिगुप्तेच्या ताम्रपटावरून‡ दिसतें. कालिदासही तेथे वरचेवर जात येत असला पाहिजे व म्हणूनच त्याने आपल्या 'मेघदूत' काव्यांत यक्षाचें निवासस्थान रामगिरी (रामटेक) होतें असें वर्णिलें आहे. उज्जैनीस परत गेल्यावर विक्रमादित्याने विचारल्यावरून कालिदासाने प्रवरसेन राज्यकारभार पहाण्याचें सोडून विलासांत मग्न असतो असा रिपोर्ट वरील श्लोकांत

*वरील मजकूर लिहून झाल्यानंतर प्रसिद्ध झालेला श्री. लक्ष्मीनारायण राव यांचा या विषयावरील लेख पहा. *Indian Historical Quarterly* Vol. IX pp. 197-201.

†Aiyangar: *Studies in Gupta History* p. 54.

‡भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष ३, अंक २-४ पृ. ९९

केला आहे. द्वितीय प्रवरसेनाचा आजा पहिला पृथ्वीषेण याने कुन्तल देश जिंकून आपल्या राज्यास जोडला होता असें अजंठा येथील एका शिलालेखावरून दिसतें. तेव्हापासून वाकाटक नृपतींस कुन्तलेश म्हणत असत.

कालिदास चन्द्रगुप्तकालीन होता याला आणखीही एक प्रमाण देतां येतें. 'सेतुबंध' किंवा 'रावणवहो' (संस्कृत 'रावणवध') या नांवाचें प्राकृत भाषेंत लिहिलेलें एक मोठें काव्य प्रसिद्ध आहे. याची बाणाने 'हर्षचरिता'च्या प्रास्ताविक श्लोकांत स्तुति केली आहे त्यावरून तें इ. स. च्या सात व्या शतकापूर्वी लिहिलें गेलें यांत संशय नाही. हें काव्य विक्रमादित्याच्या आज्ञेने प्रवरसेनाकरितां कालिदासाने लिहिलें, असें एका टीकाकाराचें विधान वाचकांच्या लक्षांत असेलच. तो प्रवरसेन काश्मीरचा राजा असणें शक्य नाही हें आपण मागे निश्चित केलें आहे. चन्द्रगुप्त विक्रमादित्य व वाकाटक (द्वितीय) प्रवरसेन यांचा संबंध लक्षांत घेतां तें काव्य चन्द्रगुप्ताच्या आज्ञेने कालिदासाने लिहिलें किंवा निदान तपासलें असावें असें वाटतें. या काव्याच्या पहिल्या आश्वासाच्या ९ व्या पद्यांत हें काव्य राजाने गादीवर आल्यावर लौकरच रचलें असें म्हटलें आहे. या श्लोकांवर टीका करतांना रामदास या टीकाकाराने प्रवरसेन म्हणजे भोजदेव असें कित्येक म्हणतात, असें लिहून ठेवलें आहे. विदर्भाच्या राजघराण्यास 'भोज' अशी संज्ञा होती हें कालिदासाच्या रघुवंशावरून स्पष्ट आहे. शिवाय 'भरतचरित' या काव्याचा कर्ता कृष्णकवि यानेही 'सेतुबंध'काव्य कुन्तलेशाने रचलें असें म्हटलें आहे.* वाकाटकांस कुन्तलेश म्हणत असत असें आम्ही वर दाखविलें आहे. त्यावरून वाकाटक प्रवरसेन हाच त्या काव्याचा कर्ता व याच्याच दरबारीं कालिदास वकील म्हणून राहिला होता हें सिद्ध होतें.

कालिदास द्वितीय चन्द्रगुप्त विक्रमादित्य याच्या आश्रयास होता असें मानलें तरच त्याच्या ग्रंथांत तत्कालीन राजकीय घटनांचें प्रतिबिंब पडलें आहे असें दाखवितां येतें. 'मालविकाग्निमित्र' नाटक वाकाटक नृप द्वितीय रुद्रसेन व चन्द्रगुप्तकन्या प्रभावतिगुप्ता यांच्या विवाहप्रसंगी लिहिलें असावें. वाकाटकांच्या दरबारीं असतांना कालिदासाने 'मेघदूत' रचलें व

---

*जलाशयस्यान्तरगाढमार्गमलब्धबन्धं गिरिं चौर्यवृत्त्या ।
लोकेष्वलंकान्तमपूर्वसेतुं बबन्ध कीर्त्या सह कुन्तलेशः ॥ (१, ४).

'सेतुबंध' काव्य लिहिलें अगर तपासलें असें वर दाखविलें आहे.'विक्रमोर्वशी-यां'त विक्रमादित्याच्या नांवाचा संबंध उघड दिसतो. चन्द्रगुप्तपुत्र कुमारगुप्त याच्या जन्मोत्सवप्रसंगीं 'कुमारसंभव' लिहिला असावा. 'रघुवंशां'तील रघुदिग्विजयवर्णनांत कवीला द्वितीय चन्द्रगुप्ताचा दिग्विजय अभिप्रेत असावा. अशा प्रकारचा संबंध दुसऱ्या कोणत्याही राजाच्या बाबतींत दाखवितां येत नाही हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

वरील विवेचनावरून कालिदास द्वितीय चन्द्रगुप्त विक्रमादित्याच्या आश्रयास होता हें स्पष्ट होईल. चन्द्रगुप्ताने इ. स. ३८० पासून ४१३ पर्यंत राज्य केलें. म्हणून कालिदास चौथ्या शतकाच्या शेवटीं व पांचव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेला असावा.

प्रकरण दुसरें

कालिदासकालीन परिस्थिति

महीतलस्पर्शनमात्रभिन्नमृद्धं हि राज्यं पदमैन्द्रमाहुः ।

रघुवंश, २, ५०.

मागील प्रकरणांत आपण कालिदासाचा काळ निश्चित केला. त्या काळीं कालिदासासारखा अद्वितीय संस्कृत कवि उत्पन्न होण्यास काय कारणें झालीं तीं अजमावण्याकरितां तत्कालीन राजकीय, धार्मिक व सामाजिक परिस्थितीचें थोडक्यांत निरीक्षण करूं.

परिस्थितीचा थोर लोकांच्या कार्यावर किती परिणाम होतो या-विषयीं दोन मतें आहेत. कोणी म्हणतात थोर मनुष्य ईश्वराचें देणें. तो एखाद्या काळच्या परिस्थितीमुळें उत्पन्न झाला असें मानणेंच गैर आहे. पुष्पाचा सुगंध सभोवार पसरण्यास त्याची वेल उद्यानांतच वाढली असली पाहिजे असें थोडेंच आहे ! याच्या उलट कित्येक वेळां 'वनलता आपल्या गुणांनी उद्यानलतांना मागे टाकतात', असें कालिदासानेच म्हटलें आहे. या

म्हणण्यांत अगदीच तथ्य नाही असें नाही. श्रेष्ठ मनुष्यांत दैवी अंश असतो असें आपल्या भगवद्गीतेंतच म्हटलें आहे. व पुष्कळदा थोर लोक आपल्या गुणांच्या प्रभावाने प्रतिकूल परिस्थितीसही अनुकूल करून घेतात असें आपण पाहतों. तथापि त्यांच्या कार्यावर परिस्थितीचा मुळीच परिणाम घडत नाही असेंही म्हणतां येत नाही. ॲडिसनने एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें जगांत एके ठिकाणीं ओझ्याच्या भाराखालीं दडपून गेलेला जरत्कारू हमाल दिसतो तर दुसरीकडे एकादा सँडो वारभर कपडा घेऊन बारीक सुईने टाके मारतांना दृष्टीस पडतो. तेव्हा प्रत्येक मनुष्यास योग्य ती परिस्थिति मिळत नाही व तिच्या अभावीं त्याच्या अंगच्या गुणांचा पूर्ण विकास होत नाही हेंच खरें. अरण्यांतील लता आपल्या फुलांनी आसमंतांतील भाग सुगंधित करीत असते पण एखाद्या रसिकाशिवाय तिच्या गुणांचें कौतुक कोण करणार ? याच न्यायाने कालिदासाच्या अगोदर त्याच्या पेक्षा कमीजास्त प्रतिभेचे ग्रंथकार झाले नसतील असें कोणी म्हणावें ? पण ते झाले असल्यास, 'निराश्रया न शोभन्ते पण्डिता वनिता लताः' या सुभाषितांत म्हटल्याप्रमाणें त्यांना राजाश्रय मिळाला नसल्यामळें व जनाभिरुचीचीही त्यांस मदत नसल्याकारणाने त्यांच्या ग्रंथांचीं नांवेंही आज लुप्त झालीं आहेत. तेव्हा कालिदासाच्या हातून इतकी उत्कृष्ट ग्रंथरचना होण्यास तत्कालीन परिस्थिति त्याला अनुकूल असली पाहिजे असें वाटल्यावाचून राहत नाही.

कालिदासकालीन परिस्थितीचें सम्यग्ज्ञान होण्यास तत्पूर्वीच्या कालाचें सिंहावलोकन करणें अवश्य आहे. विश्वसनीय ऐतिहासिक साधनांवरून आपल्या भारतवर्षाचा इतिहास ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकापासून स्थूलरूपाने ज्ञात झाला आहे. ख्रिस्तपूर्व ३२६ या वर्षी अलेक्झांडरने हिंदुस्थानावर स्वारी केली. त्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत नंद राजांचें साम्राज्य भरभराटींत होतें. त्यांची राजधानी मगधांत पाटलिपुत्र येथे होती. अलेक्झांडर परत गेल्यावर चन्द्रगुप्ताने विष्णुगुप्त–चाणक्य या पाताळयंत्री मुत्सद्याच्या साहय्याने मगधांत राज्यक्रान्ति घडवून आणली व ती संधि साधून स्वतः गादी बळकावली. चन्द्रगुप्ताने पुढे आपल्या राज्याची उत्तम व्यवस्था लावली व मोठ्या पराक्रमाने सेल्यूकस निकेटर या यवना-

धिपतीचा पराभव करून बलुचिस्थान, अफगाणिस्थान व पंजाब हा मुलूख आपल्या राज्यास जोडला. त्याचा मंत्री चाणक्य उर्फ कौटिल्य याचा 'अर्थ-शास्त्र' या नांवाचा राजनीतिविषयक उत्कृष्ट ग्रंथ अलीकडे प्रकाशित झाला आहे, त्यावरून तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीची चांगली कल्पना येते. चन्द्रगुप्तानंतर त्याचा मुलगा बिंदुसार व नातू अशोक यांच्या कारकीर्दीत मगध साम्राज्याचा चोहो बाजूंस विस्तार झाला. उत्तरेस हिंदुकुश पर्वतापासून दक्षिणेस म्हैसूरपर्यंत व पश्चिमेस बलुचिस्थानापासून पूर्वेस बंगालपर्यंत सर्व प्रदेश अशोकाच्या अमलाखालीं होता. एवढ्या मोठ्या साम्राज्याची व्यवस्थाही अशोकाने चोख ठेवली होती.

अशोकाने आपल्या शिलालेखांत लोकांनी बौद्ध श्रमणांप्रमाणेंच ब्राह्मणांस मान द्यावा असें म्हटलें आहे. तथापि त्याच्या कारकीर्दीत संस्कृत विद्येस उत्तेजन मिळालेलें दिसत नाही. बौद्धधर्माच्या प्राचीन संप्रदाया-प्रमाणें त्याचे लेख तत्कालीन जनपदभाषेंत लिहिलेले आहेत. अशोक ख्रिस्तपूर्व २३२ या वर्षीं वारला. त्याच्यानंतर त्याचें राज्य सुमारें पन्नास वर्षेंच टिकलें. ख्रिस्तपूर्व १८५ च्या सुमारास शुगवंशीय पुष्यमित्राने बृहद्रथ नांवाच्या शेवटल्या मौर्य राजास ठार मारून गादी बळकावली. राज्यासना-वर स्थिर झाल्यावर पुष्यमित्राने हिंदुधर्मीयांवर अशोकादि बौद्धधर्मीय राजांनी घातलेलीं नियंत्रणें काढून घेतलीं. त्याने स्वतः दोन अश्वमेध केले असा उल्लेख अयोध्येस नुकत्याच सांपडलेल्या एका शिला-लेखांत* आहे. त्यावरून त्याने वैदिकधर्मानुयायांस पशुवधात्मक यज्ञयाग करण्यास परवानगी दिली होती हें दिसून येतें. त्याने संस्कृतविद्येस उत्तेजन दिलें होतें. पतंजलीने आपला महाभाष्य हा व्याकरणावरचा सर्वमान्य ग्रंथ पुष्यमित्राच्याच कारकीर्दीत लिहिला व स्वतः त्याच्या हातून यज्ञ करविला असा महाभाष्यांत उल्लेख आहे.

अशोक हिंदुस्थानांत राज्य करीत असतां हिंदुकुशाच्या पलीकडे ख्रिस्तपूर्व २५० च्या सुमारास बॅक्ट्रिया येथे ग्रीकांनी एक स्वतंत्र राज्य स्थापलें होतें. अशोकानंतरचे मौर्य राजे प्रबळ नसल्याने या ग्रीक लोकांनी पूर्वेकडे हातपाय पसरण्यास आरंभ केला व हळू हळू पंजाब व सिंध हे प्रांत घ-

Epigraphia Indica, Vol. XX p. 54.

शांत घातले. पुष्यमित्राच्या अश्वमेधाचा घोडाही यवनसेनेने अडविला होता. पण त्या वेळीं पुष्यमित्राचा नातु वसुमित्र याने आपल्या पराक्रमाने यवनांचा पाडाव करून घोडा परत मिळविला, असा कथाभाग 'मालविकाग्निमित्रां'त आला आहे तो खरा दिसतो. शुंगांचें राज्य ख्रिस्तपूर्व ७३ च्या सुमारास नाहीसें होऊन त्याच्या जागीं काण्व हे ब्राह्मण राजे आले. त्यांनी सुमारें ४५ वर्षें राज्य केल्यावर त्यांचा दक्षिणच्या आंध्रांनी पाडाव करून साम्राज्यसत्ता बळकावली. शेवटले शुंग व काण्व यांच्या राजवटींत हिंदुधर्मास व संस्कृतविद्येस उत्तेजन मिळालें असावें. 'मनुस्मृती'ला सध्याचें स्वरूप याच कालांत प्राप्त झालें असें संशोधकांचें मत आहे. तथापि एकंदरींत हा काळ फारच धामधुमीचा गेला.कारण या अवधींत शकयवनांच्या अनेक स्वाऱ्या झाल्या असें गर्गसंहितेंतील 'युगपुराणा'वरून दिसतें. एकदा तर अम्लात नांवाच्या शकाधिपतीने पाटलिपुत्रावर स्वारी केली व तें शहर ताब्यांत आल्यावर त्यांतील लोकांची सरसहा कत्तल केली व चातुर्वर्ण्याबाहेरचे (शक) लोक आणून त्यांची तेथे वसति केली. शकयवनांच्या स्वाऱ्यांमुळें देशांत जी भीषण परिस्थिति उत्पन्न झाली तिचें हृदयद्रावक वर्णन गर्गाचार्यांनी येणेंप्रमाणें केलें आहे—"या दारुण महायुद्धांत राष्ट्रांतील सर्व पुरुष कामास आल्यामुळें स्त्रियांना सर्व कामें करावीं लागलीं. त्यांनी नांगर धरले व धनुष्यबाण घेऊन शेतांचें रक्षण केलें. जिकडे तिकडे स्त्रिया संघ करून राहूं लागल्या. पुरुष इतके दुर्मिळ झाले की एकेकाला दहा दहा वीस वीस स्त्रिया वरूं लागल्या. ग्रामांत तसेंच नगरांतही स्त्रियाच सर्व व्यवहार पाहूं लागल्या. चातुर्वर्ण्याची घडी विसकटून गेली. शूद्र ब्राह्मणांचीं कर्में करू लागले व जटावल्कलें धारण करून परिव्राजक म्हणून हिंडूं लागले. वैदिक धर्मांत परकीयांचा प्रवेश झाला व जिकडे तिकडे दंभाचें साम्राज्य पसरलें. गृहस्थाश्रमांतील आपत्तींस कंटाळून लोक भराभर संन्यास घेऊं लागले. याच कालांत दोन वर्षें अवर्षण पडल्याने मोठा दुष्काळ पडून हजारो लोक मृत्युमुखीं पडले."

गेल्या महायुद्धानंतरही बेल्जम व फ्रान्स यांतील परिस्थितीचें वर्णन ज्यांनी वाचलें आहे त्यांना गर्गाचार्यांच्या वरील वर्णनांत अतिशयोक्ति वाटणार नाही. 'गर्गसंहिता' ह्या ग्रंथांत काण्वांच्या राजवटीच्या

अखेरीपर्यंतचेंच वर्णन आलें असल्यामुळें, शेवटच्या काण्व राजाच्या कारकीर्दीच्या अखेरीस तो लिहिला गेला असावा, असें अनुमान होतें.* तेव्हा त्यांतील हकीकत विश्वसनीय मानण्यास हरकत नाही. परकीयांच्या या स्वाऱ्यांमुळें उत्तर हिंदुस्थानांत कांही काळ अत्यंत बंडाळी माजून राहिली होती. या अवधींत अनेक हिंदु व जैन ग्रंथांचा नाश झाला असावा. पातंजल महाभाष्यांत प्रसंगोपात्त आलेल्या उताऱ्यांवरून शुंगकाळीं काव्यवाङ्मय बरेंच समृद्ध असलें पाहिजे असें दिसतें. हें सर्व वाङ्मय, तसेंच बरेचसे प्राचीन श्रौत व स्मार्त ग्रंथ, पुराणें, वगैरेंचा पुढे मागमूसही राहिला नाही. खुद्द महाभाष्याचीही एकही प्रत उत्तरेस उपलब्ध नव्हती म्हणून चन्द्राचार्य या वैयाकरणाने दक्षिणेंतून तो ग्रंथ महाप्रयासाने मिळवून त्याचा उत्तरेंत प्रचार केला असें भर्तृहरीच्या वाक्यपदीयांत म्हटलें आहे.

अशोकाच्या मृत्यूनंतर लौकरच दक्षिणेंत आंध्रांनी आपलें स्वातंत्र्य पुकारलें. यांचा मूळ पुरुष सिमुक सातवाहन हा होता. त्याच्या नंतर गादीवर आलेल्या श्री शातकर्णीने अश्वमेध यज्ञ केल्याचा नाणेघाटांतील कोरीव लेखांत उल्लेख आहे.† याशिवाय या लेखांत गवामयन, आप्तोर्याम गार्गत्रिरात्र इत्यादि श्रौत यज्ञ केल्याचा व त्यावेळीं ब्राम्हणांना हजारो गाई, घोडे व कार्षापण (त्यावेळचीं नाणीं) दिल्याचें वर्णन आहे. त्यावरून अशोकाच्या मृत्यूनंतर लौकरच उत्तरेप्रमाणें दक्षिणेंतही वैदिकधर्माने राजाश्रयाच्या बळावर डोकें वर काढलेलें दिसतें. उत्तरेंत धुमाकूळ घालत असतां शकांनी दक्षिणेंतही राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला व कांही काळ तो सिद्धीसही गेला. दक्षिणेंतील स्वाऱ्यांत भूमक व नहपान या नांवाच्या शकांनी पुढाकार घेतला. नहपान पुढे बऱ्याच मोठ्या प्रदेशाचा 'क्षत्रप' किंवा प्रांताधिपति झाला. शिलालेख व नाणीं यांवरून नहपानाच्या अंमलाखाली काठेवाड, राजपुतान्याचा कांही भाग, माळवा, गुजराथ, उत्तर कोकण, नाशिक व पुणें जिल्हे इतका प्रदेश असावा असें दिसतें.

---

*See Prof. K. H. Dhruva's article, "*Historical Contents of the Yuga Purana.*" *J. B. O. R. S.* Vol. XXI pp. 18—66.

† Nanaghat Cave Inscription—*Archaeological Survey of Western India*, Vol. X. p. 60 ff.

नहपानाने महाराष्ट्रांत अंमल बसविला त्या वेळीं सातवाहनांना देशत्याग करावा लागला. पण लौकरच गौतमीपुत्र सातकर्णीने संधि साधून नहपानाच्या वंशजांचा पूर्ण पराभव करून त्याच्या वंशाचा समूळ उच्छेद केला व उज्जैनीपर्यंत आपलें राज्य पसरविलें. गौतमीपुत्राने नहपानाचीं नाणीं लोकांकडून मागवून घेऊन त्यांवर आपला शिक्का मारून त्यांचा पुनः प्रचार करविला. या वंशांत पुढे वासिष्ठीपुत्र पुलुमायि, यज्ञश्री सातकर्णी वगैरे बरेच राजे होऊन गेले. पुराणांतील गणनेप्रमाणें आंध्रांनी सुमारें ४५० वर्षें म्हणजे ख्रिस्तपूर्व २२५ पासून ख्रिस्तोत्तर २२५ पर्यंत राज्य केलें असावें.

सातवाहन राजे वैदिकधर्मानुयायी होते. नाशिकच्या एका लेखांत गौतमीपुत्राला क्षत्रियांचा दर्प हरण करणारा व 'एकब्राह्मण' असें म्हटलें आहे त्यावरून ते ब्राह्मणही असावेत. शकांच्या अमदानींत चाललेल्या चातुर्वर्ण्यसंकराला त्यांनी आळा घातला, असें नाशिकच्या एका लेखावरून दिसतें. तथापि त्यांचा बौद्ध धर्मासही आश्रय होता. गौतमीपुत्र, त्याची माता बालश्री, त्याची राणी व मुलगा पुलुमायि या सर्वांनी बौद्धभिक्षूंकरितां लेणीं कोरविलीं, त्यांच्या चरितार्थाकरितां गांव दान दिले, वगैरे उल्लेख नाशिक व कार्ले येथील लेण्यांत आढळतात, त्यावरून त्यांच्या कारकीर्दीत दोन्ही धर्मांच्या अनुयायांना समानतेने वागविण्यांत येत होतें असें दिसतें. सातवाहन राजे वैदिकधर्मानुयायी होते तरी त्यांनी संस्कृत विद्येला आश्रय दिल्याचें दिसत नाही. कथासरित्सागरांत एका सातवाहन राजाला जलविहाराच्या वेळीं स्त्रीने उच्चारलेल्या 'मोदकैस्ताडय' (अंगावर पाणी मारूं नको) या साध्या वाक्याचा अर्थ कळला नाही असें म्हटलें आहे. राजशेखराच्या काव्यमीमांसेंत कुन्तलाधिपति सातवाहनाने आपल्या अन्तःपुरांत प्राकृत भाषाच वापरली पाहिजे असा सक्त नियम केला होता, असें म्हटलें आहे, त्यावरूनही वरील गोष्टींत तथ्य दिसतें. शिवाय सातवाहनांचे सर्व लेख प्राकृत भाषेतच आहेत. बौद्धधर्माच्या प्रचारापासून प्रथम पाली व नंतर प्राकृत भाषांना जें महत्त्व आलें तें पुढे गुप्त राजांच्या अमदानीपर्यंत तसेंच राहिलें.

शकांनंतर उत्तर हिंदुस्थानांत प्रथम पल्हवांचें व नंतर कुशानांचें साम्राज्य पसरलें. कुशानवंशांतील कुजूल काडफीसस्, वीम काडफीसस्, कनिष्क, हुविष्क व वासुदेव यांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. वीम काडफीसस्ने हिंदु धर्म स्वीकारला असें दिसतें. कारण त्याच्या नाण्यांवर त्याला 'माहेश्वर' असें म्हटलें आहे व शिव व नंदी यांच्या आकृतीही उमटविल्या आहेत. सर्व कुशान राजांत कनिष्क हा श्रेष्ठ गणला जातो. दक्षिणेंत सध्या चालू असलेला शालिवाहन शक हा कनिष्काने इ. स. ७८ या वर्षीं सुरू केला असें बहुतेक विद्वानांचें मत आहे. याचीं नाणीं काबूलपासून गाझीपूरपर्यंत सापडतात. एकदा तर त्याने पाटलिपुत्रावर चाल करून तेथील पंडित अश्वघोष यास पकडून आपल्या राजधानीस नेलें. दक्षिणेंत काठेवाड व माळवा येथे राज्य करणारे क्षत्रप याचे अंकित होते, त्यावरून याच्या हिंदुस्थानांतील राज्यविस्ताराची कल्पना येईल. तो स्वतः बौद्धधर्मीय होता. त्या धर्माच्या प्रसारार्थ त्याने स्तूप बांधले व विद्वान भिक्षूंची काश्मीरांत एक परिषद भरविली. या परिषदेचा अध्यक्ष प्रसिद्ध तत्त्वज्ञ व कवि अश्वघोष हा होता.

ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकाच्या अखेरीस कुशान साम्राज्याचा ऱ्हास होऊं लागला. त्यानंतर त्यांचें राज्य पांचव्या शतकांत हूणांच्या स्वाऱ्या होईपर्यंत पंजाब व काबूल या प्रांतांवरच राहिलें होतें. दक्षिणेंत माळवा व काठेवाड या प्रांतांत शकवंशीय क्षत्रपांनी चौथ्या शतकाच्या अखेरीपर्यंत टिकाव धरला होता. दक्षिणेंत आंध्रसाम्राज्याचाही तिसऱ्या शतकाच्या आरंभीं अस्त झालेला दिसतो. कुशान व आंध्र साम्राज्यें ज्या प्रदेशांत पसरलीं होती त्यांत अनेक लहान लहान राज्यें उत्पन्न झालीं. हीं राज्यें चौथ्या शतकांत गुप्तांनी उत्तरेंत व वाकाटकांनी दक्षिणेंत आपलें राज्य पसरीपर्यंत जीव धरून होतीं, असें गुप्त व वाकाटक यांच्या कोरीव लेखांवरून दिसतें.

येथवर केलेल्या ऐतिहासिक सिंहावलोकनावरून ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकापासून ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकापर्यंतच्या राजकीय स्थितीची वाचकांस कल्पना येईल. शुंगसाम्राज्याच्या अंतापासून गुप्तांच्या उदयापर्यंत सुमारें चार शतकें उत्तर हिंदुस्थानांत हिंदुधर्माला व संस्कृतविद्येला कोणी

बलाढ्य राजा पुरस्कर्ता मिळाला नाही. *दक्षिणेंत महाराष्ट्रांतील आंध्रराजे वैदिकधर्मानुयायी होते तरी त्यांचें लक्ष संस्कृतविद्येकडे नव्हतें. या काळांतले बहुतेक सर्व लेख प्राकृत भाषेंत आहेत. नाण्यांवर राजांचीं नांवें व बिरुदें प्राकृत भाषेंतच लिहिलेलीं आढळतात. जनतेंतही बौद्धधर्माचा सर्वत्र प्रसार झाल्याने दानधर्माचा ओघ स्तूप व चैत्यें (देवळें) बांधण्यांत, बौद्ध भिक्षूंस राहण्याकरितां लेणीं कोरविण्यांत, आणि स्तूप व लेणीं यांना शोभा आणण्याकरितां शिल्पकाम व चित्रकाम करण्यांत खर्च झालेला दिसतो. सांची व भरहूत येथील स्तूपांस व कार्ले, नाशिक, अजंठा इत्यादि ठिकाणाच्या लेण्यांस राजे लोकांप्रमाणेंच श्रेष्ठी, व्यापारी, सोनार, सुतार, कारकून इत्यादि विविध धंद्यांच्या लोकांनी, तसेंच शकयवनादि परकीयांनीही देणग्या दिलेल्या विद्यमान कोरीव लेखांवरून दिसतात, त्यावरून वरील गोष्ट स्पष्ट होईल.† या काळांतील एकही वैदिक धर्मीय देवालय अगर शिल्पकाम अस्तित्वांत नाही यावरूनही हेंच अनुमान निघतें. या काळांतही हिंदुधर्म टिकून राहिला होता व क्वचित् स्थळीं त्याला राजाश्रय मिळाला असेल, नाही असें नाही. उदाहरणार्थ, उत्तरेंत वीम काडफीसस् व माळव्यांत रुद्रदामन् यांसारख्या क्षत्रपांनी हिंदुधर्म स्वीकारलेला दिसतो व त्यांचा त्यास थोडा फार आश्रयही असावा. विशेषतः क्षत्रपांची राजधानी उज्जैनी येथे संस्कृत विद्येस उत्तेजन मिळत गेलें असेल. इ. स. १५० च्या रुद्रदामन्च्या गिरनार येथील शिलालेखावरून त्याच्या काळीं व्याकरणादि शास्त्रें, संगीतादि कला, गद्यपद्य काव्यवाङ्मय व तदुपयोगी अलंकारशास्त्र यांचा अभ्यास होत असावा असें दिसतें क्षत्रपांच्या राज्यांतच भास, सौमिल्ल, कविपुत्र इत्यादिकांची नाटकें व वात्स्यायनाचें कामसूत्र लिहिलें गेलें असावें. सर्वसाधारण जनतेचें संस्कृतविद्येकडे लक्ष

---

* गुप्तराजांच्या उदयापूर्वी सुमारें शंभर वर्षें नागवंशी राजांनी उत्तर हिंदुस्थानांत अश्वमेधयज्ञ करून हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें व संस्कृत विद्येला आश्रय दिला असें कॅ. जयस्वाल म्हणतात *(History of India 150 to 350 A. D. p. 7)*. हें मत विद्वत्संमत म्हणावयाचें आहे.

† Cf. Dr. Sir R. G. Bhandarkar : *A Peep into the Early History of India*, (1920) p. 43.

नव्हतें तरी विद्वानांवर आपल्या लालित्यादिगुणांनी तिने मोहनी टाकावयास सुरवात केली होती यांत संशय नाही. कारण तसें नसतें तर अश्वघोषासारख्या कट्टर बौद्धधर्मीयाने आपलीं काव्यें संस्कृतांत रचलीं नसतीं. 'सौंदरनंद' काव्याच्या अखेरीस 'लोकांचें लक्ष अन्य विषयांकडून काढून मोक्षाकडे लावण्याकरितां मधांतून कडू औषध द्यावें त्याप्रमाणें मी हें संस्कृत काव्य रचलें आहे,' असें त्याने स्पष्ट म्हटलें आहे. तथापि या चारशें वर्षांच्या काळांत नांव घेण्यासारखे संस्कृत काव्यनाटकादि ग्रंथ फारसे निर्माण झाले नाहीत. याच्या उलट याच काळांत पाली वाङ्मय भरभराटीस आलें व प्राकृतांतही बृहत्कथादि ग्रंथ निर्माण झाले. यावरून संस्कृत विद्येला राजाश्रय मिळाल्याचीं उदाहरणें अपवादात्मकच होत हें दिसून येईल.

या काळांत हिंदुधर्मास विशेष राजाश्रय नव्हता व जनतेंतही त्याचा प्रसार बौद्धधर्माच्या मानाने कमी होता. तरी त्यांतील विचारी लोक नव्या काळास अनुसरून त्याची पुनर्घटना करण्यांत गुंतले होते असें दिसतें. वैदिकधर्माचीं तत्त्वें सर्वसाधारण लोकांस समजावीं म्हणून पूर्वीच्या संक्षिप्त व दुर्बोध सूत्रग्रंथांबद्दल मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति यांसारख्या स्मृति सुबोध अनुष्टुप् छंदांत लिहिल्या गेल्या. महाभारत व रामायण या ग्रंथांसही सध्याचें रूप याच काळांत प्राप्त झालें असावें. बौद्ध व जैन धर्माचा अहिंसेवर कटाक्ष आहे व तें तत्त्व सर्वमान्य होत आहे असें पाहून या स्मृतींतही तें तत्त्व मान्य करण्यांत आलें व पूर्वीच्या हिंसाविधानात्मक वचनांस पुष्कळ अपवाद घालण्यांत आले. या काळाच्या आरंभीं शिव, कुबेर, अश्विनीकुमार, धर्म, इंद्र, संकर्षण, वासुदेव इत्यादि देवतांची पूजा होत असे, असें कौटिलीय अर्थशास्त्र व नाणेघाटांतील सातवाहनांचे शिलालेख* यांवरून दिसतें. यांतून पुढे ब्रह्मा, विष्णु व शिव या देवांना प्राधान्य आलें. याशिवाय स्कंद सूर्य इत्यादिकांची पूजाही प्रचारांत आली. पूर्वीपासून तत्त्वज्ञान हें वैदिकधर्माचें वैशिष्ट्य होतें. उपनिषदांत ईश्वर, जीव व जगत् यांविषयीं अनेक

*Bühler : *Nanaghat Cave Inscription*, *A. S. W, I.* Vol. IX, pp. 60 ff..

ठिकाणीं खोल व उद्बोधक विचार विखुरलेले होते, त्यांचा समन्वय करून वेदान्तसूत्रें लिहिलीं गेलीं. तसेंच सांख्य, योग, न्याय, मीमांसा, इत्यादि शास्त्रांचीं मूलभूत सूत्रें याच काळांत निर्माण झालीं. हें सर्व वाङ्मय पाहिलें असतां बौद्धधर्माशीं टक्कर देण्यास वैदिकधर्माने कशी तयारी चालविली होती व राजाश्रयाची संधि सापडतांच त्याचा त्याने कसा पाडाव केला हें ध्यानांत घेईल.

तिसऱ्या शतकाच्या शेवटीं उत्तर हिंदुस्थानांत गुप्त व विदर्भांत वाकाटक हीं घराणीं उदयोन्मुख असलेलीं दृष्टीस पडतात. यांपैकी पहिल्या घराण्याचा संस्थापक महाराज गुप्त हा मगधांतील एका संस्थानाचा राजा होता. पहिल्या दोन पिढ्यांत गुप्तांचें राज्य गंगेच्या काठाकाठाने मगधापासून अयोध्येपर्यंत पसरलें होतें. महाराज गुप्ताचा नातु पहिला चन्द्रगुप्त याने वैशालीच्या लिच्छवीकुलोत्पन्न राजकन्येशीं विवाह केला. या विवाहाच्या योगाने वैशाली व मगध हीं राज्यें एका छत्राखालीं आलीं व त्यामुळें चन्द्रगुप्ताचें सामर्थ्य वाढलें. पुढे त्याने आसपासचीं लहान राज्यें जिंकून आपल्या राज्यास जोडलीं व नंतर 'महाराजाधिराज' ही पदवी धारण केली. आपला व लिच्छवि कुळाचा सन्मान्य संबंध जाहीर करण्याकरितां त्याने स्वतःच्या व पत्नीच्या नांवाने सोन्याचीं नाणीं पाडलीं. त्याने एक नवीन शकही सुरू केला. त्याला पुढे गुप्तशक हें नांव प्राप्त झालें. त्याचा मुलगा समुद्रगुप्त हा त्याच्यापेक्षाही शूर व महत्वाकांक्षी निघाला. त्याने उत्तर हिंदुस्थानांतील अनेक राजांचा उच्छेद करून त्यांचा प्रदेश आपल्या राज्यास जोडला व दक्षिण हिंदुस्थानांतही स्वारी केली. या दिग्विजयानंतर त्यानें हरिषेण नामक आपल्या दरबारच्या कवीला आपला पराक्रम गद्यपद्यात्मक काव्यांत वर्णन करावयास सांगून तें वर्णन अशोकाच्या शिलास्तंभावर कोरून ठेविलें.* तो स्तंभ अद्यापि प्रयागच्या किल्ल्यांत आहे व त्यावरील लेख थोडा खराब झाला आहे तरी त्यावरून त्याच्या दिग्विजयाची पूर्ण कल्पना येते.

---

* See "Allahabad Stone Pillar Inscription of Samudragupta" *(G. I. no. I)*.

समुद्रगुप्त हा हिंदुधर्माचा कट्टा अभिमानी व पुरस्कर्ता होता. त्याने दिग्विजय संपल्यावर अश्वमेध यज्ञ केला व तद्विषयक नाणीं पाडलीं. पुष्यमित्र शुंगाच्या कालानंतर जवळ जवळ पांचशें वर्षे उत्तर हिंदुस्थानांत एखादा अपवाद वगळल्यास बहुधा कोणी अश्वमेध केल्याचें नमूद नाही. त्यामुळें समुद्रगुप्तास त्याच्या वंशजांच्या लेखांत 'चिरोत्सन्नाश्वमेधाहर्ता' असें यथार्थ विशेषण दिलें आहे. त्याच्या 'अश्वमेध' नाण्यांवर त्याचें 'अश्वमेधपराक्रमः' हें बिरुद आढळतें. समुद्रगुप्त हा मोठा विद्वान, रसिक व कलाभिज्ञ होता. प्रयागच्या शिलास्तंभावरच्या लेखांत 'त्याला विद्वानांची संगति फार आवडे, त्याने स्वतः शास्त्रांचें अध्ययन केलें होतें व आपल्या कुशाग्रबुद्धीने बृहस्पतीस व संगीतनैपुण्याने तुम्बरूस व नारदास लज्जित केलें होतें, उत्कृष्ट काव्यनिर्मितीमुळें त्याला कविराज ही पदवी मिळाली होती, हरिषेणादि कवि त्याच्या सांनिध्यांत काव्य करण्यास शिकले', असें म्हटलें आहे.

समुद्रगुप्त इ. स. ३७५ च्या सुमारास कालवश झाला असावा. त्यानंतर त्याचा पुत्र चन्द्रगुप्त-विक्रमादित्य गादीवर आला असें आतापर्यंत समजत असत. पण अलीकडे चार पांच वर्षांत झालेल्या संशोधनावरून* समुद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा रामगुप्त ह्याला गादी मिळाली असें दिसतें. पंजाब व काबूल येथे राज्य करणाऱ्या कुशानांनी समुद्रगुप्तापुढे मान वाकविली होती पण त्याच्या निधनानंतर त्यांनी चळवळ करण्यास सुरवात केली असावी. त्यांचें पारिपत्य करण्याकरितां रामगुप्ताने त्यांच्यावर स्वारी केली. त्याच्या बरोबर त्याचा बंधु चन्द्रगुप्त व राणी ध्रुवस्वामिनी ही होती. या स्वारींत त्याला अपयश आलें व आपल्या राणीला शत्रूच्या अंतःपुरांत पाठवून देण्याच्या अपमानास्पद अटीवर त्याने आपली व आपल्या लोकांची मुक्तता करवून घेतली. त्याचा भाऊ चंद्रगुप्त हा मोठा शूर व कुलाभिमानी होता. त्याला ही अट मुळीच मान्य झाली नाही. पण त्या वेळीं शत्रूच्या कचाट्यांत सापडल्यामुळें ती कबूल करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. तथापि तो मोठा युक्तिबाज व धैर्यवान्

* डा. अ. स. आळतेकर यांचा *J. B. O. R. S., Vol. XIV*, p. 223 वरील 'एक नवीन गुप्तराजा' हा लेख व आमचा यवतमाळच्या 'शारदाश्रम' वार्षिकां'तील (१९३३) 'रामगुप्तचरित्रावर नवीन प्रकाश' हा लेख पहा.

होता. त्याने स्वतः स्त्रीवेष घेऊन व आपल्या बरोबर स्त्रीवेषधारी सैनिक घेऊन शकनृपतीच्या शिबिरांत प्रवेश केला व संधि साधून त्याला ठार मारलें व त्याच्या सेनेचा फडशा उडविला. ध्रुवस्वामिनीला अर्थातच आपल्या भ्याड पतीबद्दल अत्यंत तिरस्कार व चन्द्रगुप्ताबद्दल प्रेम वाटूं लागलें. पुढे चन्द्रगुप्ताने आपल्या भावास पदच्युत करून गादी बळकाविली. गुप्तांच्या घराण्यांत कर्तृत्ववान पुरुषासच गादी मिळावी असा नियम दिसतो, त्यावरून राज्यांतील विचारी व प्रबळ मन्त्र्यांचेंही त्यास साहाय्य असावें असें वाटतें. नंतर त्याने ध्रुवस्वामिनीशीं विवाह केला व तिजपासून त्याला कुमारगुप्त व गोविंदगुप्त हे पुत्र झाले. त्याची कुबेरनागा नांवाची दुसरीही एक राणी होती तिजपासून त्याला प्रभावतिगुप्ता ही मुलगी झाली.

गादीवर आल्यावर चंद्रगुप्तानें प्रथम उत्तरेंतील कुशान राजाचा पाडाव केला व त्यानंतर माळवा व काठेवाड येथे राज्य करणाऱ्या क्षत्रपांवर चाल केली. हे शकवंशीय क्षत्रप कुशानवंशीय राजांनी सिंध, काठेवाड व माळवा या प्रांतांवर नेमलेले मूळचे प्रांताधिपति होत. त्यांचें त्या भागांत सुमारें सव्वातीनशें वर्षें राज्य चालू होतें व शेवटीं शेवटीं उत्तरेंतील त्यांच्या सम्राटांची सत्ता संपुष्टांत आल्यावर ते बाह्यतः आपणांस क्षत्रप किंवा महाक्षत्रप म्हणवत असले तरी एकंदरींत स्वतंत्रच होते. अशा बलिष्ठ शत्रूचा पराजय करण्यास दुसऱ्या एखाद्या प्रबल राजाच्या साहाय्याची अपेक्षा होती. त्यावेळेस विदर्भांत वाकाटक घराणें उदयास आलें होतें. या घराण्याचा मूळ पुरुष विंध्यशक्ति याचें नांव पुराणांत व अजंठ्याच्या एका त्रुटित लेखांतही आलें आहे. अजंठ्याच्या लेखांत त्याला द्विज म्हटलें आहे त्यावरून आंध्रांप्रमाणेंच वाकाटक हेही ब्राह्मण असावेत. विंध्यशक्ति मगधाच्या महाराजगुप्ताचा समकालीन असावा. त्याचा मुलगा पहिला प्रवरसेन याने अग्निष्टोम, आप्तोर्याम, इत्यादि श्रौतयाग केले होते. पुढे या वंशांत पृथ्वीषेण या नांवाचा महापराक्रमी राजा झाला तो समुद्रगुप्ताचा समकालीन होता. अजंठ्याच्या लेखांत याने कुन्तल देश जिंकला होता असें म्हटलें आहे व त्याचे दोन शिलालेख बुन्देलखंडांत अजयगढ संस्थानांत सापडले आहेत. त्यावरून त्याचें राज्य महाराष्ट्र, विदर्भ व

बुन्देलखंडाचा कांही भाग यांत पसरलेलें दिसतें. समुद्रगुप्ताने दक्षिणेंतील पूर्वकिनाऱ्यालगतचे देश जिंकले पण पश्चिमेकडील देश पादाक्रान्त न करतांच तो मागे फिरला. त्यावरून त्याने वाकाटकांशीं दोन हात करण्याचें मुद्दाम टाळलें असावें असें दिसतें. वाकाटक व क्षत्रप यांची राज्यें एकमेकांस लागून होतीं त्यावरून त्यांमध्यें राजनीतीच्या सामान्य तत्त्वाप्रमाणें वितुष्ट असलें पाहिजे. तेव्हा चन्द्रगुप्ताने वाकाटकांशीं स्नेहसंबंध जोडून क्षत्रपांवर चाल केली व त्यांचा पुरा नायनाट केला. राजकारणाने घडून आलेला हा संबंध दृढ करण्याकरितां त्याने आपली मुलगी प्रभावतिगुप्ता पृथ्वीषेणाच्या मुलास म्हणजे द्वितीय रुद्रसेन यास दिली. ही गोष्ट इ.स. ३९५च्या सुमारास घडली असावी, असें नाणीं व शिलालेख यांवरून संशोधकांनी अनुमान केलें आहे.*

क्षत्रपांचा समूळ उच्छेद केल्यावर काठेवाड व माळवा हे प्रांत चन्द्रगुप्ताने आपल्या राज्यास जोडले, उज्जैनी येथे आपली राजधानी नेली व विक्रमादित्य ही पदवी धारण केली. तेव्हापासून उज्जैनीशी विक्रमादित्याचें नांव संलग्न झालें आहे. यानंतर थोड्याच वर्षांनी त्याचा जामात दुसरा रुद्रसेन हा मरण पावला. त्यावेळीं त्याचे दामोदरसेन व दिवाकरसेन हे मुलगे अल्पवयी होते. म्हणून चन्द्रगुप्ताने आपल्या दरबारचे धोरणी व कर्तबगार अधिकारी विदर्भास पाठवून तेथील कारभार चालविण्यास आपल्या मुलीस मदत केली. प्रवरसेन वयांत आल्यावर त्यास गादी मिळाली. त्यानंतर तो राज्यकारभार कसा करतो हें पाहण्यास चन्द्रगुप्ताने आपल्या दरबारचा मुत्सद्दी व कवि कालिदास यास विदर्भास पाठविलें. त्यावेळची हकीकत पहिल्या प्रकरणांत आलीच आहे.

हयाप्रमाणें चन्द्रगुप्ताचें राज्य सर्व उत्तर हिंदुस्थानभर पसरलें होतें व दक्षिण हिंदुस्थानांतही महाराष्ट्र व विदर्भ यांचा राज्यकारभार त्याच्या तंत्राने चालला होता. त्याच्या विस्तृत साम्राज्यांत हिंदुधर्माचा सर्वत्र प्रसार झालेला दिसतो. या वेळेपासून हिंदु देवांस दिलेल्या देणग्यांचे कोरीव लेख दृष्टीस पडतात. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या मथुरेच्या शिला-

* V. A. Smith : *The Vakataka Dynasty of Berar in the Fourth & Fifth Century A. C.* (*J.R.A.S.* for 1914 p. 317.)

लेखांत एका शैव आचार्याने शिवलिंगाची प्रतिष्ठा केल्याचा उल्लेख आहे. त्याच्या एका मांडलिकाने उदयगिरि येथे विष्णु व चंडिका यांच्या मूर्ति कोरविलेल्या अद्यापि विद्यमान आहेत. तेथेच दुसऱ्या एका शिलालेखांत चन्द्रगुप्ताच्या वीरसेन नांवाच्या परराष्ट्रमन्त्र्याने शिवाच्या पूजेकरितां एक गुहा कोरल्याचा निर्देश आहे. विदर्भांत प्रभावतिगुप्तेने रामटेकावर कार्तिक शुद्ध द्वादशीस श्रीरामचन्द्राच्या पायांजवळ दिलेला ताम्रपट प्रसिद्ध आहे. चन्द्रगुप्त व त्याचा जामात रुद्रसेन हे विष्णुभक्त होते, तर चन्द्रगुप्ताचा नातु द्वितीय प्रवरसेन हा शिवोपासक होता. या सर्व उल्लेखांवरून चन्द्रगुप्ताच्या साम्राज्यांत हिंदुधर्माची कशी भरभराट झाली तें दिसून येतें.

चन्द्रगुप्त हा स्वतः मोठा विद्वान, रसिक व संस्कृतविद्येचा अभिमानी होता. उज्जयिनीच्या विद्वत्परिषदेपुढे त्याने कालिदासादि इतर कवींप्रमाणेंच स्वतः परीक्षा दिली होती हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्याच्या एका सुवर्णमुद्रेवर त्याला 'रूपकृती' असें म्हटलें आहे. त्यावरून त्याने रूपकें-(नाटकें)-ही लिहिलीं असावींत असें दिसतें त्याने आपल्या अन्तःपुरांतही संस्कृत भाषाच उपयोगांत आणली पाहिजे असा नियम केला होता. त्याच्या सुवर्णमुद्रांवर त्याचें श्लोकार्धांत निरनिराळ्या प्रकारें अलंकारिक वर्णन केलें आहे त्यावरूनही त्याचें संस्कृत भाषेवरील प्रेम दिसून येतें. संस्कृत विद्येला असा पुरस्कर्ता मिळाल्यावर ती अत्यंत वैभवसंपन्न झाली तर त्यांत नवल काय? चन्द्रगुप्त विद्वान लोकांना मोठमोठ्या अधिकारांवर नेमीत असे. त्याचा परराष्ट्रमंत्री कौत्सगोत्रीय वीरसेन शाब हा व्याकरण, अर्थशास्त्र व न्याय यांत निष्णात असून कवीही होता असें त्याच्या लेखांत म्हटलें आहे. मुद्राराक्षस नाटकाचा कर्ता विशाखदत्त हाही चन्द्रगुप्ताच्या दरबारीं होता असें कांही विद्वानांचें मत आहे. या कवीच्या 'देवीचन्द्रगुप्तम्' नांवाच्या नाटकांतील कांही उतारे अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यावरून वर दिलेली रामगुप्ताची हकीकत जुळविली आहे. याशिवाय कामन्दकाचें नीतिसार हा अर्थशास्त्रावरचा ग्रंथ व कांही पुराणें-ही या कालांत झालीं असावीं असें संशोधकांचें म्हणणें आहे. या कालांत स्थापत्य, शिल्पकला, चित्रकला इत्यादि कलाही ऊर्जितावस्थेस आल्या.

गुप्तकालीन इमारती अद्यापि क्वचित् ठिकाणी दृष्टीस पडतात. उदयगिरि येथे व इतरत्र तत्कालीन शिल्पकलेचें व अजिठ्याच्या लेण्यांत चित्रकलेचें थोडेसें काम अवशिष्ट आहे त्यावरून या कलांमध्यें तत्कालीन कारागिरांनी किती प्रावीण्य मिळविलें होतें त्याची कल्पना येते.

चन्द्रगुप्ताच्या राज्यांत सर्वत्र शांतता, सुव्यवस्था व सौराज्य होतें असें तत्कालीन लेखांवरून दिसतें. हिंदु, बौद्ध, जैन इत्यादि हिंदुस्थानांतील सर्व धर्मांच्या अनुयायांना आपापल्या धर्माच्या आज्ञांप्रमाणें वागण्यास स्वातंत्र्य होतें. समुद्रगुप्ताच्या दिग्विजयापासून राज्याचा विस्तार वाढला. अनेक राजांकडून खंडणी येऊं लागली, व्यापाराचे मार्ग खुले झाले, शूर व कर्तबगार मनुष्यांस आपले अंगचे गुण दाखविण्यास संधि मिळाली व विद्वानांच्या विद्वत्तेचें चीज होऊं लागलें. देशांतील सुबत्तेचें प्रतिबिंब तत्कालीन नाण्यांत दिसून येतें असें म्हणतात. चन्द्रगुप्ताचीं सोन्याचीं नाणीं अनेक प्रकारचीं व विपुल सांपडतात, त्यावरून त्याच्या राज्यांतील भरभराटीचें अनुमान करतां येतें. फा हायन्ने उत्तर हिंदुस्थानांत शेंकडो मैल प्रवास केला पण त्याला कोठेही चोरांकडून त्रास झाला नाही यावरून चन्द्रगुप्ताच्या राज्यांतील सुव्यवस्थेची कल्पना येते. 'सर्व लोक सुखी व आनंदी असून गुणोत्कर्षांत एकमेकांवर वरचढ करण्याचा प्रयत्न करीत आहेत असें दिसतें', असें त्याने लिहून ठेवलें आहे. देशांत सर्वत्र धर्मशाळा व धर्मार्थ दवाखाने होते व त्यांत अन्नपाण्याची व औषधाची मोफत सोय केली जात असे. राज्यकारभार मोठ्या दक्षतेने चालविण्यांत येई व अपराध्यांस शिक्षा सौम्य प्रमाणांत दिली जात असे. सारांश त्या वेळच्या लोकांना आपण रामराज्यांत आहों असें वाटत असल्यास नवल नाही.

या गुप्तकालीन परिस्थितीचें प्रतिबिंब आपणास कालिदासाच्या काव्यांत पडलेलें दिसतें. प्रो. कीथ यांनी म्हटल्याप्रमाणें कालिदासाच्या सर्व ग्रंथांत स्वकालीन परिस्थितीविषयीं संतोष व समाधान दिसतें तें गुप्तकालीन सार्वत्रिक संपन्नतेचें द्योतक असावें. तसेंच त्याच्या ग्रंथांत दिग्विजय, अश्वमेधयाग वगैरेंचें जें वर्णन आलें आहे त्यांतही तत्कालीन परिस्थिति इतिहासाच्या वाचकांस स्पष्ट दिसते. दिलीप, रघु, राम इत्यादि एकापेक्षा एक गुणाने वरचढ असलेल्या राजर्षींचीं चरित्रें रसाळवाणीने

वर्णन करीत असतां कालिदासाच्या मनश्चक्षूंपुढे समुद्रगुप्त, चन्द्रगुप्त यांसारख्या शूर, धीर, विद्वान प्रतिभासंपन्न रसिक व उदार राजाधिराजर्षींचीं उदाहरणें असल्यास नवल नाही. वसिष्ठाश्रमाकडे जात असतां दिलीपाला ब्राह्मणांना स्वतः दिलेल्या अग्रहार ग्रामांत यज्ञस्तंभ दिसले; त्याची प्रजा मनूने घालून दिलेल्या मर्यादेपासून एक रेंसभरही ढळली नाही; आपल्याकडे गुरुदक्षिणेकरितां आलेला विद्वान ब्राह्मण विमुख जाऊं नये म्हणून प्रत्यक्ष कुबेरावर चाल करण्याचा रघूने निश्चय केला; अतिथीच्या राज्यांत व्यापाऱ्यांना नद्या आपल्या घरच्या कूपासारख्या वाटूं लागल्या व ते दरीखोऱ्यांतून घरांतल्याप्रमाणें निःशंकपणें फिरूं लागले; तसेंच खाणींतून रत्नें, शेतांतून उत्कृष्ट पीक व अरण्यांतून हत्ती या रूपांनी पृथिवी स्वरक्षणाबद्दल त्याला मोबदला देऊं लागली; उज्जयिनींतील दुकानांत कोट्यवधि तेजःपुंज मौक्तिकहार, शंख व शिंपले तसेंच हिरवेगार पाचूचे खडे व पोंवळीं व्यवस्थितपणाने लावलेलीं पाहून समुद्रांत आता केवळ पाणीच शिल्लक राहिलें आहे काय असें कोणालाही वाटत असे; उज्जैनी वैभवसंपन्न असल्यामुळें तिला विशाला हें सार्थ नांव प्राप्त झालें होतें; आपलें सुचरित कमी झाल्यामुळें स्वर्गस्थ लोक तेथे येऊन राहिले व त्यांनी आपली अवशिष्ट पुण्याई खर्चून हा स्वर्गाचा एक रम्य भागच निर्माण केला कीं काय असें वाटे; विदर्भ सौराज्यामुळें रम्य झाला होता; त्याची राजधानी समृद्ध होती; इत्यादि वर्णनें कालिदासाच्या ग्रंथांत वाचतांना बहुश्रुत वाचकास आपण गुप्तकालांतच आहों असें वाटल्यावाचून राहत नाही. कोणत्याही कवीच्या ग्रंथांत, विशेषतः समाजस्थितीच्या वर्णनांत तत्कालीन परिस्थितीचें प्रतिबिम्ब न कळत पडत असतें. तेव्हा कालिदासाच्या ग्रंथांत तें दिसलें तर नवल नाही.

प्रकरण तिसरें

जन्मस्थानाचा वाद

Others abide our question. Thou art free!
We ask and ask—Thou smilest and art still,
Outtopping knowledge.*

Matthew Arnold

कालिदासाच्या कालाविषयींच्या विविध मतांचें परीक्षण करून तो उज्जैनीच्या द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्याच्या काळीं होऊन गेला असावा असें आपण पहिल्या प्रकरणांत निश्चित केलें, त्यावरून त्याच्या आयुष्याचा उत्तर भाग उज्जैनीस गेला असावा हें उघड आहे व या-विषयीं सर्वांचें ऐकमत्य आहे. तथापि तो मूळचा कोठला, त्याची जन्मभूमि कोणत्या प्रांतांतील, स्वभावतः संस्कारक्षम अशा त्याच्या मनावर कोणत्या प्रदेशांतील निसर्गाचा व व्यवहाराचा प्रथम ठसा उमटला याविषयीं शोधकांनी अनेक मतें प्रकट केलीं आहेत. त्यांचा थोडक्यांत विचार करूं.

या बाबतींत आपल्या भावनाप्रधान बंगाली बंधूंच्या मताचा प्रथम विचार केला पाहिजे. अखिल भारताला ललामभूत झालेला असा हा कवि आपल्या प्रांतांत उत्पन्न झाला असें ते अभिमानाने प्रतिपादितात. कलक-त्याला त्यांनी एक कालिदास–संशोधन–समिति स्थापिली आहे व तिच्या वतीने दरवर्षी ते आषाढ प्रतिपदेला निबंधवाचन, व्याख्यान, गायन, वादन, इत्यादि कार्यक्रमाने ,कालिदास उत्सव' साजरा करीत असतात. मूर्शिदाबादेंत गड्डा शिगरु या गांवीं कालिदासाचा जन्म झाला असें त्यांनी ठरविलें असून त्या ठिकाणीं त्याचें स्मारक करण्याचा त्यांनी प्रयत्न चाल-

* आंग्लकविसम्राट शेक्सपियराविषयींची ही उक्ति कविकुलगुरु कालिदासासही लागू पडेल.

विला आहे. तेथे एक कालिदास–जन्मपीठोत्सव कमिटी स्थापन झाली आहे. तिने एक कालिदास–पाठशाळा चालविली आहे व प्रतिवर्षी सरस्वतीपूजोत्सवाच्या वेळी तेथे साहित्यसम्मेलनाचा व इतर मनोरंजक कार्यक्रम करण्यात येतो. सरकारच्या मदतीने त्यांनी तेथे एक तलाव खोदवून त्याला कालिदाससागर असें नाव दिलें आहे. कालिदासाला तीन स्त्रिया होत्या व त्यांच्या सहवासांत तो निरनिराळ्या ठिकाणी राहत होता. विद्युन्माला या आपल्या पत्नीसह त्याने वृक्षानीतला गांवी कांही दिवस वास केला, श्रीपाट दोगाछिया या गांवी त्याने आपला द्वितीय संबंध व पुत्राचा विवाह केला, अशा बंगाल्यांत अद्यापि दंतकथा प्रचलित आहेत.* दंतकथांचा पुरावा सर्वस्वी विश्वसनीय नसतो हें आपण मागे पाहिलेंच आहे. तेव्हा कालिदास बंगाली होता हें सिद्ध करण्याकरितां बंगाली संशोधक जीं प्रमाणें पुढें आणतात त्यांचा विचार करणें जरूर आहे.

(१) कवीच्या कालिदास ह्या नांवावरूनच तो बंगाली होता हें सिद्ध होतें. कालिदास हा प्रथम अगदी अडाणी होता पण पुढे तपश्चर्येने प्रसन्न झालेल्या काली देवीच्या कृपेने तो विद्वान व प्रतिभासंपन्न कवि झाला व नंतर कालिदास या नांवाने प्रसिद्ध झाला अशी आख्यायिका सर्व प्रांतांच्या प्राचीन परंपरेच्या पंडितास माहीत आहे. काली देवीची पूजा बंगाल्यांतच सर्वत्र होते व कालिदास हें नांव अद्यापि बंगाल्यांतच पुष्कळ लोक धारण करतात यावरून कालिदास हा मूळचा बंगालचा हें सिद्ध होतें.

या प्रमाणांत विशेष तथ्य दिसत नाही. कालिदास हा एखाद्या देवतेच्या कृपेने एकदम उत्कृष्ट कवि बनला ही लौकिक समजूत निराधार आहे हें आम्ही पुढे दाखविणार आहों. शिवाय कालिदास हा कालीदेवतेचा भक्त होता असें दिसत नाही. त्याच्या ग्रंथाच्या आरंभीं त्या देवतेची स्तुति आढळत नाही. 'ऋतुसंहारा'दि जे सात ग्रंथ कालिदासाचे म्हणून सर्वमान्य झाले आहेत, त्यांमध्यें कालीदेवतेचें वर्णन फक्त एका

* वरील माहिती कालिदाससमितीच्या 'कालिदासजन्मपीठसभार अनुष्ठानपत्र' या बंगाली चोपड्यावरून घेतली आहे.

श्लोकांत (कुमार० ७, ३९) व तेंही भगवान् शंकर विवाहाकरितां हिमालयगृहीं जात असतांना ती त्यांच्या परिवारांत होती म्हणून आलें आहे.* त्यावरून कवीने कालिदास हें नांव कालीदेवतेच्या भक्तीमुळें धारण केलें नसून तें त्याच्या मातापितरांनी त्याच्या बालपणीं ठेवलें होतें हें उघड आहे. इसवी सनाच्या चौथ्या पांचव्या शतकांत काली देवतेची पूजा माळव्यांत प्रचलित असावी असें वाटतें. उदयगिरि येथे एका गुहेंत द्वादशभुजा देवीची गुप्तकालांतील मूर्ति अद्यापि भग्नावस्थेंत विद्यमान आहे. तिला डॉ. भांडारकर आदि विद्वान् चंडिका म्हणतात† पण ती कालीही असणें शक्य आहे. उज्जैनीला अद्यापि कालीचें देवालय दृष्टीस पडतें. मध्य हिंदुस्थानांत काली, चामुण्डा यांसारख्या उग्र देवतांची पूजा कालिदासानंतरही एकदोन शतकें चालू होती हें सातव्या शतकांतील भवभूतीच्या 'मालतीमाधवां'त मालतीला पद्मावतीच्या (सध्याचें नरवार) स्मशानांत कांही कापालिकांनी चामुण्डेपुढे बळी देण्याकरितां नेलें होतें, असा प्रसंग घातला आहे त्यावरून सिद्ध होईल. तेव्हा कालिदासाचे आईबाप काली देवतेचे उपासक असल्याने त्यांनी कवीचें नांव कालिदास ठेवलें, पण कवि स्वतः सौम्यप्रकृति असल्याने कालीभक्त नसून शिवभक्तच होता, असें स्पष्ट दिसतें. हिंदुधर्माच्या उत्क्रमणावस्थेच्या त्या काळीं माता पिता एका देवतेचे, तर मुलें दुसऱ्या देवतेचीं उपासक असत असें दृश्य तत्कालीन इतिहासांत दिसतें. उदाहरणार्थ, द्वितीय चन्द्रगुप्ताची मुलगी प्रभावतिगुप्ता व जांवई द्वितीय रुद्रसेन विष्णूचे उपासक होते तर त्यांचा मुलगा द्वितीय प्रवरसेन हा शिवभक्त होता, यावरूनही वरील गोष्ट सिद्ध होईल.

(२) कालिदासाने 'मेघदूतां'त रामगिरीवर यक्ष 'आषाढस्य प्रथमदिवसे' म्हणजे आषाढाच्या पहिल्या दिवशीं मेघ पाहता झाला असें म्हटलें आहे. बंगाल्यांत सौर मान प्रचलित असल्याने तेथे चैत्र वैशाख

* 'कुमारसंभव' ९, ४९ या श्लोकांतही पार्वतीचें मनारंजन करण्याकरितां कालीने विकट नृत्य केलें त्याचें वर्णन आहे. पण तो व त्यानंतरचे सर्ग कालिदासाचे नसावेत असें संशोधकांचें मत आहे. याविषयीं विवेचन पुढे पांचव्या प्रकरणांत केलें आहे.

† Dr. Sir R. G. Bhandarkar : *A Peep into the Early History of India*, p. 52.

इत्यादि महिन्यांचे दिवस इंग्रजी महिन्यांच्या तारखांप्रमाणें एकोणतीस ते एकतीसपर्यंत मोजतात. तेथें शुक्ल व कृष्ण हे चान्द्रमासाचे निदर्शक शब्द प्रचलित नाहीत व महिन्याचे तसे दोन पंधरवडेही मानीत नाहीत. कालिदास हा बंगाली होता व म्हणूनच 'आषाढस्य शुल्कपक्षे प्रतिपदि तिथौ' असें न लिहितां 'आषाढस्य प्रथमदिवसे' असें लिहिता झाला. मनुष्य कोठेही रहात असला तरी त्याचे पूर्व संस्कार लुप्त होत नाहीत. म्हणून कालिदास पुढे माळव्यांत किंवा विदर्भांत कामानिमित्त रहात असला तरी आपलें बंगाली पंचांग विसरला नाही. तो स्वतः उत्तम ज्योतिषी होता. त्याने 'ज्योतिर्विदाभरण' नामक ज्योतिषविषयक सर्वमान्य ग्रंथ लिहिला आहे, तेव्हा त्याला सूर्योदयापासून दुसऱ्या दिवशींच्या सूर्योदयापर्यंतच्या काळास दिवस आणि चंद्र व सूर्य यांच्या भिन्न गतीमुळें त्यांच्यामध्ये १२ अंश अंतर पडण्यास लागणाऱ्या काळास तिथि म्हणतात ही साधीही गोष्ट माहीत नव्हती असें म्हणतां येत नाही. तेव्हा पक्ष व तिथि यांचा उल्लेख न करतां त्याने दिवस या शब्दाचा प्रयोग केला आहे, त्यावरून त्याचें बंगदेशीयत्व सिद्ध होते.

हें प्रमाणही परीक्षणाच्या कसोटीस उतरत नाही. कालिदासाला 'आषाढ महिन्याच्या आरंभीं' एवढाच अर्थ विवक्षित असल्याने त्याने 'आषाढस्य प्रथमदिवसे' असा प्रयोग केला आहे. एखाद्या काव्यांत शुक्लपक्षे प्रतिपत्तिथौ यासारख्या प्रयोगाची अपेक्षा करणें बरोबर होणार नाही. दुसरें असें की सध्या कालगणनेच्या ज्या विविध पद्धति हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांत प्रचलित आहेत त्या तशाच पूर्वीही कालिदासकालीं होत्या हें प्रथम सिद्ध केलें पाहिजे. त्या बाबतींत कोरीव लेखांचा पुरावा अत्यंत विश्वसनीय म्हणून लक्षांत घेण्यासारखा आहे. ख्रिस्तपूर्व व ख्रिस्तोत्तर एक दोन शतकांतील महाराष्ट्रांत सातवाहनांच्या व क्षत्रपांच्या आणि मथुरेस क्षत्रप व कुशानवंशीय कनिष्कादि राजांच्या लेखांत मित्या दिलेल्या आढळतात. त्यांवरून असें दिसतें की त्या काळीं वर्षाचे ग्रीष्म, वर्षा व हेमन्त हे तीन ऋतु मानीत असत. या ऋतूंचे दक्षिणेंत* आठ पक्ष व प्रत्येक

* 'रञो वासिठिपुतस सिरि पुळुमयिस संवछरे छठे ६ गिम्हपखे पचमे ५ दिवसे' हा नाशिकच्या लेण्यांतील वासिष्ठीपुत्र श्रीपुलुमायि या सातवाहन राजाच्या लेखांतील कालनिर्देश पहा. (*Ep. Ind.* Vol. VIII p. 59.)

पक्षाचे १५ दिवस व उत्तरेंत* चार महिने व प्रत्येक महिन्याचे सुमारें तीस दिवस अशी गणना केली जात असे. त्यावेळीं चैत्र, वैशाख इत्यादि नांवें फारशीं प्रचारांत नव्हतीं. काठेवाड व माळवा येथे शकक्षत्रपांच्या आश्रयाने ज्योतिर्विद्येच्या अभ्यासास उत्तेजन मिळून, चैत्रादि मास, शुक्ल किंवा कृष्ण पक्ष व तिथि ही सध्या हिंदुस्थानांत बहुतेक प्रांतांत प्रचलित असलेली कालगणनापद्धति सुरू झाली व ती क्षत्रपांच्या अगदी आरंभीच्या लेखांतही दृष्टीस पडते. पुढे हळू हळू इतर प्रांतांत तिचा प्रसार झाला. तथापि कालिदासकाळीं म्हणजे ख्रिस्तोत्तर चौथ्या व पाचव्या शतकांत पक्ष व तिथि या शब्दांचाच माळवा व विदर्भ या प्रांतांत सर्रास उपयोग केला जात होता असें दिसत नाही. उदाहरणार्थ सांचीच्या द्वितीय चन्द्रगुप्ताच्या आम्रकार्दव नामक सेनापतीच्या लेखाच्या शेवटी 'सं९३ भाद्रपद दि ४' व कुमारगुप्ताच्या कारकीर्दीत कोरलेल्या मानकुवार येथील मूर्तीवर 'संवत् १२९ ज्येष्ठमास दि १८' असाच कालनिर्देश केला आहे. कालिदासाच्या 'मेघदूता'तील कालाचा उल्लेख अगदी याच तऱ्हेचा आहे. द्वितीय प्रवरसेनाच्या दुदिया गांवच्या ताम्रपटांत 'संवत्सर २३ वर्षापक्ष ४ दिवस १०' असाःउल्लेख केला आहे. त्यावरूनही प्राचीन पद्धति त्या काळीं अगदीच प्रचारांतून गेली नव्हती हें उघड आहे. कांही लेखांत शुक्ल किंवा कृष्ण पक्षाचा निर्देश असला तरी दिन शब्दाचाच प्रयोग केला आहे. तिथीचा नाही.† त्यावरून दिन व तिथि यांमधील जो बारीक भेद बंगाली संशोधक पुढे मांडतात तो तत्कालीं मान्य झाला नव्हता हें स्पष्ट आहे. तेव्हा 'आषाढस्य प्रथमदिवसे' या वचनावरून कवीच्या बंगदेशीयत्वाबद्दलचें अनुमान योग्य दिसत नाही.

कालिदासाच्या ग्रंथांचें निःपक्षपातीपणाने वाचन केल्यास तो बंगाली होता असें मानण्यास एकही निश्चित गमक सापडत नाही. जेथे कवि जन्मला, लहानपणीं खेळला बागडला, त्या ठिकाणचे संस्कार त्याच्या

---

*'महारजस्य काणिष्कस्य सं ३ हे ३ दि २२ एतये पुर्वये' हा कनिष्काच्या कारकीर्दीत सारनाथ येथे बौद्धछत्रस्तंभावर कोरलेल्या लेखांतील कालनिर्देश पहा.

† विश्ववर्मन्‌चा गांगधर येथील शिलालेख (*G. I.* No. 17).

मनावर दृढ असावेत, त्या स्थलावर त्याचें विशेष प्रेम असावें, त्याचा उल्लेख त्याचे ग्रंथांत वरचेवर यावा, अशी आपली अपेक्षा असते. पण कालिदासाच्या ग्रंथांत बंगालविषयीं तसे उल्लेख दिसत नाहीत. म्हणून कालिदास बंगाली होता असें म्हणतां येत नाही.

आता आपण 'कालिदास काश्मीरांत जन्मला' या मताकडे वळूं. हें मत दिल्ली युनिव्हर्सिटीचे संस्कृत प्रोफेसर पंडित लक्ष्मीधर कल्ला यांनी एक स्वतंत्र पुस्तक* लिहून अनेक प्रमाणांनी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या सर्वांचा येथे विचार करणें शक्य नाही. तथापि त्याचें म्हणणें थोडक्यांत पुढे मांडून त्याचा विचार करूं.

"कालिदासाच्या ग्रंथांत हिमालयाचें विस्तृत व सूक्ष्म वर्णन येतें हें सर्वांस माहीत आहे. 'कुमारसंभवां'त हिमालयाच्या वर्णनानेच काव्यास आरंभ झाला आहे; 'मेघदूता'तील यक्षाचें निवासस्थान अलका ही हिमालयावरच होती; 'विक्रमोर्वशीयां'त पुरूरवस् व उर्वशी यांची प्रथम भेट काश्मीराजवळ गंधमादन पर्वतावर झाली व पुढे उर्वशीचा वियोग झाल्यावर राजा त्याच पर्वतावर भटकूं लागला; 'रघुवंशां'त पहिल्या सर्गांत दिलीप वासिष्ठाश्रमास जातो तोही हिमालयावरच; 'शाकुंतलां'तील कण्व व मारीच यांचे आश्रम याच पर्वतश्रेष्ठावर कवीने वसविले आहेत; यावरून हिमालयावर त्याचें किती प्रेम होतें तें दिसून येईल. ही सर्व स्थळें काश्मीरांत सिंधु नदीच्या खोऱ्यांत होती हें सिद्ध करतां येतें. उदाहरणार्थ वसिष्ठाश्रमाजवळ गंगाप्रपात होता; त्या ठिकाणीं दिलीप रक्षण करीत असलेल्या वसिष्ठाच्या धेनूवर एका सिंहाने झडप घातली. कालिदासाने त्या सिंहाला 'भूतेश्वरपार्श्ववर्ती' म्हटलें आहे. काश्मीरांत वरील प्रदेशांत भूतेशतीर्थ प्रसिद्ध आहे. काश्मीरांतच सिंधु व मालिनी नद्या, शचीतीर्थ, सोमतीर्थ व ब्रह्मसर हीं तीर्थें व शक्रघाट हीं सापडतात. आपल्या कथानकाच्या सोईसाठीं शचीतीर्थ व शक्रघाट हीं हस्तिनापुराजवळ होतीं असें कवीने वर्णिलें असलें तरी तीं नांवें त्याला पूर्वपरिचित असल्यामुळेंच सुचलीं असावीं. 'रघुवंशां'त (२, ३५) वसिष्ठधेनूवर झडप घालणारा सिंह आपणांस निकुंभाचा मित्र म्हणतो. हा निकुंभ कोण याचा टीकाकारांस उलगडा

* Lachhmidhar Kalla: *The Birth-Place of Kalidasa* (1926).

झाला नाही. पण काश्मीरच्या 'नीलमतपुराणां'त कुबेराने दुष्ट पिशाचांबरोबर युद्ध करून त्यांस काश्मीरातून हाकून देण्याकरितां निकुंभाची योजना केली होती, अशी कथा आली आहे, त्यावरून कालिदासास काश्मीरच्या प्राचीन कथांचें ज्ञान होतें असें दिसतें. काश्मीरच्या कांही विशिष्ट रीतिरिवाजांचें व लौकिक समजुतीचेंही प्रतिबिंब कालिदासाच्या ग्रंथांत पडलेलें दिसतें. विवाहप्रसंगी सासूने किंवा दुसऱ्या कोणी सौभाग्यवती स्त्रीने वराच्या मस्तकाला माला बांधावी असा काश्मीरांत रिवाज आहे, हें तद्देशीय विवाहपद्धतीवरून दिसतें. 'रघुवंशांत'ही इंदुमतीने अजाच्या गळ्यांत स्वतः माळ न घालतां आपल्या सुनन्दा नामक उपमातेकडून ती घालविली आहे. मासे मारण्याच्या निंद्य वृत्तीमुळें धीवर जातीला काश्मीरांत बहिष्कृत मानतात असें 'ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी' नामक काश्मीरी टीकेंत म्हटले आहे. 'शाकुंतलां'तही शकुंतलेची अंगठी एका धीवराला सांपडते; पुढे त्याला नगररक्षक पकडतात; त्यांपैकी एकजण धीवराच्या धंद्याला उद्देशून ' विशुद्ध इदानीमाजीवः ' (मोठा पवित्र धंदा !) असे उद्गार काढतो व त्यावर, 'हा माझा पिढीजाद धंदा असल्यामुळें निंद्य नाही' अशा अर्थाचें तो धीवर उत्तर करतो या प्रवेशांतही वर सांगितलेली काश्मीरांतील समजूतच प्रतिबिम्बित झाली आहे. कालिदास काश्मीरी शैव मताचा म्हणजे 'प्रत्यभिज्ञादर्शना'चा अनुयायी होता असें दिसतें. या दर्शनांत सदाशिव हें एकच सर्वव्यापि तत्त्व मानलें आहे. त्याचीं शिव व शक्ति हीं दोन रूपें सृष्टिनिर्माणाकरितां होतात. शक्तीच्या साहाय्याने शिव चराचर सृष्टि उत्पन्न करतो व स्वतःही नियतीस्तव शक्तीचें आवरण घेऊन जीव बनतो. या आवरणामुळें त्याला स्वतःचें विस्मरण पडतें. पुढे गुरूपदेशाने, अध्यात्मदर्शनाभ्यासाने किंवा इतर कांही कारणाने जीवाचें आवरण नष्ट झाल्यावर त्याला आपल्या पूर्वस्वभावाची ओळख (प्रत्यभिज्ञा) पटते व नंतर त्याचें परमतत्त्वाशीं ऐक्य होतें. या तत्त्वज्ञानांत एक प्रकारच्या नियतीमुळें जीवास स्वतःच्या सत्यस्वरूपाचें विस्मरण पडतें व नंतर कांही कारणाने मधला आवरणरूपी पडदा दूर झाल्यावर स्वस्वरूपाचें ज्ञान होतें, ही कल्पना मुख्य आहे व ती कालिदासाच्या सर्व नाटकांत आली आहे. उदाहरणार्थ,'मालविकाग्निमित्र' नाटकांत सिद्धादेशामुळें मालविकेला वर्षभर

अज्ञातवासांत राहावें लागलें. पुढे तिच्या दासी विदिशेस आल्यावर तिची विदर्भराजकन्या म्हणून सर्वांस ओळख पटली; 'विक्रमोर्वशीया'त उर्वशी कुमारवनांत गेल्याबरोबर कार्तिकेयाच्या शापाने लता झाली, पुढे राजाला संगमनीय मणि मिळाल्यावर त्याच्या योगाने तिला पूर्व रूप प्राप्त झालें; 'शाकुंतला'त दुर्वासाच्या शापाने दुष्यन्ताला शकुंतलेची विस्मृति पडली, पण अंगठी दिसल्याबरोबर त्याची स्मृति जागृत झाली; या सर्व कथानकांवरून कालिदासाच्या नाटकांवर प्रत्यभिज्ञादर्शनाची कशी छाप बसली आहे तें दिसून येईल. 'शाकुंतला'च्या भरतवाक्यांत शंकराला 'परिगतशक्ति' असें मुद्दाम कवीने विशेषण योजिलें आहे यावरून कालिदास काश्मीरी होता हें सिद्ध होतें. 'मेघदूता'त अलकानगरींत यक्षाच्या निवासस्थानाचें वर्णन आलें आहे त्यांत कल्पनेच्या पुष्कळ भराऱ्या असल्या तरी कवि आपल्या जन्मस्थानाचें वर्णन करतो आहें असें स्पष्ट दिसतें. अलकानगरी कैलास पर्वतावर होती असें कवीने वर्णिलें आहे. हा कैलास म्हणजें काश्मीरांतील हरमुकुटपर्वतच होय. येथे शंकर वास करतात असें म्हणतात. 'नीलमतपुराणा'त श्रीशंकर प्रयागापासून हरमुकुटपर्वतापर्यंत ज्या मार्गाने गेले त्याचें वर्णन आलें आहे. त्यांना वाटेंत नैमिषारण्य, गंगाद्वार, कुरुक्षेत्र, विष्णुपद, हंसद्वार व उत्तरमानसतीर्थ, ही स्थानें लागलीं असें त्या पुराणांत म्हटलें आहे. यापैकी बहुतेक स्थलांचें वर्णन कवीने 'मेघदूता'त यक्षमुखाने केलें आहे, त्यावरूनही कवीच्या मनांत मेघाला हरमुकुटपर्वतावरच नेण्याचें होतें यांत संशय नाही. अलकेंतील यक्षाच्या निवासस्थलाचें जें वर्णन आलें आहे, तें हरमुकुट पर्वताच्या पायथ्याशीं वसलेल्या प्राचीन मयग्रामास (म्हणजे सध्याच्या मणिगांवास) अक्षरशः लागू पडतें. जवळच्या टेकडीवरून सर्व गांवाचा देखावा दृष्टीस पडतो. तिच्या पायथ्याशीं दगडांनी बांधलेलें एक सुंदर सरोवर आहे. त्याला तेथील लोक फार पवित्र मानतात. हीच यक्षाच्या घराजवळची वापी. गांवापासून थोड्या अंतरावर मोठमोठ्या शिलांचा संचय आहे तोच मेघदूतांतील कुबेराचा प्रासाद असावा. येथून थोडया अंतरावर खालच्या बाजूस वसिष्ठाचा आश्रम व भूतेशाचें पवित्र देवालय आहे. गांवाच्या 'मयग्राम' या नांवावरून पूर्वी येथे यक्षांची वसति असावी. अकराव्या शतकापर्यंत

मयग्राम इतिहासांत प्रसिद्ध होतें. विविध प्रकारचीं पुष्पें, नृत्यगीतादि कला, सुरापान, इत्यादिकांचें जें वर्णन मेघदूतांत आलें आहे, तें काश्मीरासच लागू पडतें, कारण त्या तऱ्हेची काश्मीरची वर्णनें कल्हणाचो 'राजतरंगिणी', बिल्हणाचें 'विक्रमांकदेवचरित' वगैरे ग्रंथांत येतात. म्हणून आपल्या काळीं भरभराटींत असलेल्या मयग्राम या आपल्या जन्मभूमीचें तसें वर्णन कालिदासाने केलें असल्यास त्यांत आश्चर्य नाही.

इ. स. च्या सहाव्या शतकांत हूणांच्या काश्मीरावर स्वाऱ्या झाल्या. त्या काळच्या धांदलींत कालिदासास पत्नी व जन्मभूमि यांचा त्याग करावा लागला व इतर काळच्या काश्मीरी पंडितांप्रमाणें तो राजाश्रयार्थ भटकूं लागला. 'ऋतुसंहारां'त विन्ध्य पर्वताजवळील प्रदेशाची उष्णता कवीला अतिशय तापदायक होऊन त्याला प्रियेची वारंवार आठवण झालेली दिसते. यक्षाची विरहावस्था वर्णन करण्याच्या मिषाने कालिदासाने स्वतःचें वियोगदुःख वर्णिलें आहे. यक्षाचें निवासस्थान तीच कवीची जन्मभूमि व ती काश्मीरांत होती हें आम्ही दाखविलें आहे. त्यावरून कालिदास काश्मीरी होता असें आपणांस म्हणतां येतें."

प्रो. लक्ष्मीधर कल्ला यांनी अनेक प्रमाणांनी आपलें मत सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे पण तो सफल झाला आहे असें वाटत नाही. वरील मतावर अनेक आक्षेप घेतां येतात. प्रथमतः कालिदास हें नांव काश्मीरी दिसत नाही. भामह, रुद्रट, कैयट, जय्यट, मम्मट, कल्हण इत्यादि अनेक काश्मीरी पंडितांचीं नांवें 'राजतरंगिणी' व इतर ग्रंथ यांवरून आपणांस ज्ञात झाली आहेत. पण कालिदासासारखें नांव त्या नाममालिकेंत आढळत नाही. दुसरें असें की कालिदास काश्मीरी असता तर कल्हणासारखा चौकस व साक्षेपी ग्रंथकार तसा उल्लेख आपल्या ग्रंथांत केल्याशिवाय राहता ना. बिल्हणाच्या जीवनक्रमाचें 'राजतरंगिणी'त जें वर्णन आलें आहे त्यावरूनही वरील गोष्ट सिद्ध होते. शिवाय कालिदासाचें भौगोलिक ज्ञान अतिशय बिनचूक होतें असें त्याच्या ग्रंथांवरून दिसतें. हिंदुस्थानच्या सर्व भागांचें-किंबहुना हिंदुस्थानच्या बाहेरच्याही कांही प्रदेशांचें-वर्णन 'रघुवंश,' 'मेघदूत' इत्यादि ग्रंथांत आलें आहे, पण त्यांत कोठेही चक

आढळत नाही, उलट प्रत्येक ठिकाणचें वैशिष्ट्य मोजक्या शब्दांत सांगण्याची कालिदासाची हातोटी सर्वांनी वाखाणिली आहे. असा हा कवि काश्मीरांतील अप्सरस्तीर्थ, शचीतीर्थ, शक्रावतार हीं स्थळें आपल्या कथानकाच्या जरूरीस्तव हस्तिनापुराजवळ आहेत म्हणून दडपून देईल असें वाटत नाही. तीं खरोखरच त्या ठिकाणीं असलीं पाहिजेत असें वाटल्याशिवाय राहत नाही. शिवाय यांतील कांही स्थळें दुसऱ्या ग्रंथावरून ज्ञात होतात त्यावरून तीं काश्मीरांतीलच होत असें म्हणतां येत नाही. उदाहरणार्थ, 'महाभारतां'तही कण्वाचा आश्रम मालिनी नदीच्या तीरावर होता असा उल्लेख आला आहे, त्यावरूनच कालिदासाने 'शाकुंतलां'त तसें वर्णन केलें आहे हें उघड आहे. कैलास, अलका, मन्दाकिनी यांच्याविषयींच्या ज्या भौगोलिक कल्पना इतर ग्रंथांवरून होतात त्याच कालिदासाच्या ग्रंथांत दिसल्या पाहिजेत. हीं स्थलें काश्मीरांत आहेत असें साधारणतः कोणीही मानीत नाही. कालिदासाच्या ग्रंथांत निर्दिष्ट केलेल्या नद्यांचीं, तीर्थांचीं व आश्रमांचीं नांवें 'नीलमत पुराणां'तील काश्मीरवर्णनांत आलीं आहेत. पण तें पुराण इ. स. च्या चौथ्या पांचव्या शतकाइतकें जुनें वाटत नाही. उलट पद्मपुराणाप्रमाणेंच त्या पुराणाने हीं व्यक्तीचीं व स्थलांचीं नांवे कालिदासाच्या ग्रंथावरून घेतलेलीं दिसतात.

काश्मीरच्या विशिष्ट रीतिरिवाजाचीं म्हणून जीं उदाहरणें प्रो. कल्ला यांनी दिलीं आहेत तींही निर्णायक वाटत नाहीत. 'शाकुंतलां'तील वर उल्लेखिलेल्या प्रवेशांत धीवरास समाजाने बहिष्कृत केलें असा कोठेही उल्लेख नाही. कालिदासकालीं बौद्धमताचा लोकांच्या मनावर इतका पगडा बसला होता की धीवराचा धंदाही त्यांस हिंसेमुळें निंद्य वाटूं लागला होता. म्हणून कालिदासाने स्वकालीन लोकांस जातिप्राप्त कर्में करण्यांत पाप नाही हें त्या प्रवेशांत सांगितलें आहे. त्यांत काश्मीरांतच प्रचलित असलेल्या समजुतीचा उल्लेख पाहणें योग्य होणार नाही.

कालिदासाच्या तत्त्वज्ञानाचा विचार करतांना तो काश्मीरी शैव संप्रदायाचा अनुयायी होता काय, याचा निर्णय करूं. सध्या येथे एवढें सांगण्यास हरकत नाही की तें मत श्रीशंकराचार्यांच्या केवलाद्वैतमताशीं बरेंच जुळतें; त्यामुळें तें त्यांच्या कालानंतर काश्मीरांत प्रसार पावलें

असावें. शिवाय कालिदासाच्या ग्रंथांत तें कोठेही स्पष्टपणें आलें नाही. कालिदासाच्या नाटकांत एखाद्या शापाने कांही काळ प्रेमी जीवांची ताटातूट व नंतर त्यांचें मीलन होतें ही कल्पना प्रधान आहे यांत शंका नाही. पण ही कल्पना कवीस प्रत्यभिज्ञादर्शनावरून सुचली असें म्हणण्यास आधार नाही. कारण जशी ही ताटातूट शापमूलक असते तसेंच जीवाची विस्मृतीही शापमूलक असते, असें प्रत्याभिज्ञार्शन म्हणत नाही. शाकुंतलाच्या भरतवाक्यांतील 'परिगतशक्ति' या विशेषणाचा पार्वतीसहित असाही अर्थ करतां येतो; त्यावरूनही कवि प्रत्यभिज्ञादर्शनानुयायी अतएव काश्मीरी होता हें सिद्ध होत नाही.

कोणताही कवि एखादा प्रसंग स्वतः अनुभविल्याखेरीज केवळ कल्पनाशक्तीने त्यांचें चित्र काढू शकत नाही हें खरें. पण त्यावरून कालिदासाचें घर अलकेंत होतें, त्याच्या घरच्या विहिरीच्या पायऱ्या पाचूच्या शिळांनी बनविल्या होत्या, तीत सोन्याचीं कमळें होतीं व त्यांचें दांडे वैडूर्याचे होते असें म्हणणें योग्य होणार नाही. उत्तरमेघांत कवीने आपल्या कल्पनाशक्तीस स्वैर मोडून अलकेंतील वैभवाचें, सौंदर्याचें व चैनीचें वर्णन उत्कट रीतीने केलें. त्यांत वस्तुस्थिति पाहणें गैर होईल, आणखी असें की इ. स. च्या चौथ्या शतकात कालिदासासारखा कवि उत्पन्न होण्यास काश्मीरांत तशी परिस्थिति होती हेही सिद्ध झालें नाही. या सर्व कारणांमुळें कालिदास काश्मीरी होता हें विधान परीक्षणाच्या कसोटीस उतरत नाही.

कालिदासाने हिंदुस्थानांतील अनेक प्रांतांची वर्णनें हुबेहूब केलीं असल्याने प्रत्येक प्रांतास तो आपलाच असें वाटण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, त्याच्या अनेक ग्रंथांत विदर्भाचा संबध येतो. त्याच्या 'मालविकाग्निमित्र' नाटकांत विदर्भराजकन्येच्या प्रेमकथेचें संविधानक आहे, 'मेघदूता'तील रामगिरि म्हणजे रामटेक हें मागे सांगितलेंच आहे, 'रघुवंशा'त विदर्भराजकन्या इन्दुमती हिचा स्वयंवर व तिच्या निधनानंतर अजाचा शोक ज्यांत वर्णिला आहे ते म्हणजे सहावा व आठवा हे सर्ग उत्कृष्ट गणले जातात. पांचव्या सर्गांत 'ऋद्धां विदर्भाधिपराजधानीम्' (५,४०) 'सौराज्यरम्यानपरो विदर्भान्' (५, ६०) अशीं विदर्भाच्या समृद्धी-

विषयीं व सुराज्याविषयीं वचनें आलीं आहेत. कवीने आपले सर्व ग्रंथ वैदर्भी रीतींत लिहून तिला विद्वज्जनाच्या आदरास पात्र केलें. यावरून कालिदास वैदर्भ होता असेंही प्रतिपादणें शक्य आहे व एका संशोधकाने तसें प्रतिपादिलें आहेही.* तथापि विदर्भातील कोणत्याही एका भागाची विशेष बारकाईची माहिती त्याने कोठेही दिली नाही. विदर्भराजदरबारीं कवि प्रथम आला त्या वेळीं त्याला तेथील अधिकारी वर्गाने कसें वागविलें तें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. त्यावरून कालिदास परक्या प्रांतांतून आला होता असें स्पष्ट दिसतें. म्हणून विदर्भास त्याच्या जन्मभूमीचा मान देणें योग्य होणार नाही.

कै. म० म० हरप्रसाद शास्त्री व प्रो. शि. म. परांजपे यांनी विदिशेजवळच्या बारीक स्थळांचें कालिदासाने वर्णन केलें आहे असें दाखविलें आहे. 'हीं स्थलें एकंदर सहा असून त्यांपैकी नीचैर्गिरि हा एक डोंगर आहे. आणि वेत्रवती, निर्विंध्या, सिंधु, गन्धवती आणि गंभीरा या पांच नद्या आहेत. यांपैकी नीचैर्गिरि हा आपल्या नांवाप्रमाणें लहानसा व ठेंगणासा डोंगर असावा. आणि या पांच नद्या तर बोलून चालून अप्रसिद्धच आहेत. त्यांतील कांही हल्लीच्या नकाशांतून व जुन्या वर्णनांतून क्वचित् सांपडतात आणि कांही कालिदासाने वर्णिल्या आहेत म्हणून त्या उज्जैनीच्या व विदिशेच्या आसपास कोठे तरी असल्या पाहिजेत असें मानावें लागतें.' (साहित्यसंग्रह भाग १ पृ० ९६). या पर्वतावर व नद्यांवर कालिदासाचें अत्यंत प्रेम असलें पाहिजे असें दिसतें व त्यावरून प्रो. परांजपे यांनी कालिदास हा विदिशेचा व म. म. हरप्रसाद शास्त्री यांनी तो मंदोसरचा रहिवासी व यशोधर्मदेवाचा आश्रित असावा असें प्रतिपादलें आहे. पण तें मनास पटत नाही. विदिशा व उज्जैनी यांच्या मधल्या बारीक सारीक नद्यांचें कालिदासाने वर्णन केलें आहे हें खरें; तथापि खुद्द विदिशेच्या वर्णनास त्याने सारे दोनतीनच श्लोक घातले आहेत. तो यशोधर्मदेवाच्या काळापूर्वी शंभरसवाशें वर्षें होऊन गेला असें आपण पहिल्या प्रकरणांत ठरविलें आहे. कालिदासाच्या काळीं विदिशेवर कोणा

* F. G. Peterson : *A Note on Kalidasa*, *J. R. A. S.* 1926 p. 726.

प्रबळ राजाचें राज्य होतें असें दिसत नाही. तेव्हा इतर बऱ्याच स्थलांच्या मानाने कालिदासाने मंदोसर व विदिशा यांचें वर्णन जास्त केलें असलें तरी त्या वर्णनांत मातृभूमीवरच्या प्रेमाची उत्कटता व्यक्त होत नाही.

पण विदिशेनंतर ज्या नगरीची वाट कवीने यक्षमुखाने मेघास सांगितली आहे त्या उज्जैनीच्या वर्णनांत मात्र तो अगदी तल्लीन झालेला दिसतो. रामटेकाहून कैलासास जातांना विदिशा व मंदोसर कदाचित् वाटेवर पडतील; पण उज्जैनी बरीच दूर पश्चिमेस राहते. म्हणून 'उत्तर दिशेस जाणाऱ्या तुला जरी थोडें वाकडें जावें लागलें, तरी मेघा ! उज्जैनीच्या सौधांवर क्षणभर टेकण्यास अनमान करू नको' असा आग्रह यक्ष मेघास करीत आहे. कालिदासाने उज्जैनीच्या वर्णनास पुरे अकरा श्लोक दिले आहेत. या श्लोकांत उज्जैनीच्या अगणित संपत्तीचें, सिप्रा नदीवरून पहाटे वाहणाऱ्या मंजुळ, सुगंधि व शीत वायूचें, तेथील निरनिराळ्या स्थलांबद्दल प्रसिद्ध असलेल्या प्राचीन कथांचें,त्या नगरीतील प्रसिद्ध महाकाल नामक शिवाच्या देवालयाचें, देवाच्या सायंकालच्या आरतीच्या वेळीं होणाऱ्या वेश्यानृत्याचें व रात्रीं प्रियकरांस भेटण्यास जाणाऱ्या अभिसारिकांचें कवीने इतकें सुंदर वर्णन केलें आहे की उज्जैनीचें तत्कालीन स्वरूप वाचकांच्या मनश्चक्षूपुढे पूर्णपणें उभें राहतें. इतकें विस्तृत वर्णन अलकेशिवाय दुसऱ्या कोणत्याही नगरीचें कवीने केलें नाही हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अलका ही बोलून चालून स्वर्गीय नगरी. तिचें वर्णन करतांना कवीने आपल्या कल्पनाशक्तीस स्वैर सोडलें असलें तर त्यांत आश्चर्य नाही. पण ज्या अर्थी दुसऱ्या कोणत्याही भूलोकच्या नगरीविषयीं कालिदासाचें प्रेम इतकें उचंबळून येत नाही त्या अर्थी उज्जैनीसच त्याचे बाळपणापासूनचे दिवस गेले असावेत हें उघड आहे.

— —

प्रकरण चौथें

चरित्रविषयक अनुमानें

लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति ।

उत्तररामचरित

कालिदासाच्या चरित्राविषयीं खालील दंतकथा* प्राचीनपरंपराभिज्ञ पंडितांत प्रचलित आहेत—

कालिदास हा एका ब्राह्मणाचा मुलगा होता. तो पांच सहा महिन्यांचा असतांना त्याचे आईबाप वारले व तो पोरका झाला. अशा अवस्थेंत दैववशात् तो एका गवळ्याच्या दृष्टीस पडला. त्याने त्याला घरीं नेऊन लहानाचा मोठा केलें. स्वत: गौरवर्ण व शरीराने सुकुमार असल्याने तो इतर गवळ्यांच्या मुलांत खेळत असला तरी सहज ओळखूं येई. तथापि त्याला मुळीच शिक्षण न मिळाल्यामुळें वयाच्या अठरा वर्षांपर्यंत तो अगदी अडाणी राहिला. जेथे तो राहत होता त्या नगराच्या राजाला एक अतिशय रूपवती व कलाभिज्ञ अशी मुलगी होती. ती उपवर झाल्यावर तिच्याकरितां राजाने पुष्कळ वर पाहिले पण त्यांपैकी एकही अखिलशास्त्रकलाविशारद नसल्याने तिला पसंत पडेना. शेवटीं राजाने कंटाळून वरसंशोधनाचें काम प्रधानावर सोपविलें. प्रधानाला कांही कारणाने राजकन्येचा सूड घ्यावयाचा होता. एकदां तो गच्चीवर बसला असतां हा गवळ्याच्या मुलाबरोबर जात असलेला ब्राह्मणकुमार त्याला दिसला. लागलीच त्याला एक युक्ति सुचली. त्याने त्याला आपल्या वाड्यांत बोलाविलें व आपल्या येथील अत्यंत मौल्यवान् वस्त्रालंकारांनी त्याला भूषित करून व बरोबर अनेक तरुण शास्त्रीपंडितांचा लवाजमा देऊन राजकन्येला निरोप पाठविला की काशीचे एक मोठे विद्वान् पंडित आले आहेत तरी त्यांची

* R. V. Tullu: *Traditionary Account of Kalidasa*, (*Ind. Ant.* Vol. XII pp. 115-7.)

परीक्षा घेऊन आदरसत्कार करावा. तिच्या अनुमतीने त्याला शिष्यसमुदायासह राजसभेंत आणलें. तेथील पंडितांनी त्याच्या शिष्यांपुढेच हात टेकले, तेव्हा राजकन्येला त्याची परीक्षा घेण्याची जरूरी वाटली नाही. तो स्वतः गौरकाय व देखणा असल्यामुळें राजकन्येचें त्याच्यावर प्रेम बसलें व लौकरच त्यांचा विवाह झाला. पण पुढे चार दोन दिवसांत त्याचें बिंग बाहेर पडलें. तेव्हा त्याला ठार मारण्याचा धाक घालून तिने त्याच्याकडून सर्व वस्तुस्थिति समजून घेतली. त्या वेळीं तिला अत्यंत दुःख झालें तथापि विवाह होऊन गेल्यावर काय करणार ? नंतर तिने त्याला काली देवीची उपासना करण्यास सांगितलें. त्यानेही देवीच्या पायाजवळ धरणें धरलें व ती प्रसन्न होईना तेव्हा स्वतःचा शिरश्छेद करण्यासही तो तयार झाला. त्याची भक्ति व दृढनिश्चय पाहून देवी प्रसन्न झाली व त्याच्या मस्तकावर तिने वरदहस्त ठेविला. तेव्हापासून तो अत्यंत विद्वान् व प्रतिभासंपन्न कवि झाला व कालिदास या नांवाने प्रसिद्धि पावला.

कालिदास परत आल्यावर राजकन्येस भेटला. त्यावेळीं तिने त्याला 'अस्ति कश्चिद्वाग्विशेषः' (आपल्या वाणींत कांही फरक झाला काय?) म्हणून विचारलें. या वेळीं कालिदासाची वैखरी देवीच्या प्रसादाने पवित्र झाली होती म्हणून त्याने 'अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः' असा आरंभ करून 'कुमारसंभव', 'कश्चित्कान्ताविरहगुरुणा' इत्यादि प्रकारें 'मेघदूत' व 'वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये' अशा मंगलाने युक्त असा 'रघुवंश' अशीं तीन काव्यें घडाघड म्हणून दाखविलीं. पुढे त्याचे अनेक ग्रंथ झाले व त्याची कीर्ति दिगंतरी पसरली. अशा रीतीने आपला भाग्योदय करणाऱ्या राजकन्येस मात्र तो मातृवत् ब गुरुवत् मानूं लागला. त्यामुळें चिडून जाऊन राजकन्येने तुला स्त्रीच्या हातूनच मृत्यु येईल म्हणून शाप दिला. तेव्हापासून कालिदासाच्या आयुष्याला निराळेंच वळण लागलें. त्याचा बराच काळ वेश्यांच्या सहवासांत जाऊं लागला. एकदा सिंहलद्वीपांत आपला मित्र जानकीहरणकर्ता कुमारदास यास तो भेटण्याकरितां गेला असतां तेथील वेश्येचे तोंडून 'कमले कमलोत्पत्तिः श्रूयते न तु दृश्यते' हया श्लोकार्धाच्या पूर्तीकरितां राजाने मोठें बक्षीस लावल्याचें त्यास समजलें. त्याने लागलीच

बाले तव मुखाम्भोजात्कथमिन्दीवरद्वयम्' असा श्लोकार्ध रचून त्या समस्येची पूर्ति केली. राजाने देऊं केलेल्या बक्षिसाच्या लोभाने वेश्येने कालिदासाला गुप्तपणें ठार मारलें. पण कुमारदासास संशय आला म्हणून त्याने दरडावून विचारतांच तिने आपला गुन्हा कबूल केला. आपल्या प्रिय मित्राचा अशा रीतीने अंत झाल्याचें समजल्यावर राजाला अतिशय वाईट वाटलें व त्याने दुःखाच्या भरांत कालिदासाच्या चितेवरच स्वतःस जाळून घेतलें. कालिदासास जेथे अग्नि दिला ती जागा अद्यापि सिंहलद्वीपांत माटर नांवाच्या दक्षिण प्रांतात किरिदी नदीच्या मुखाजवळ दाखवितात असें कै. म. म. डॉ. सतीशचन्द्र विद्याभूषण यांनी म्हटलें आहे.

राजदरबारीं असतां कालिदासाने आपल्या प्रतिभेने व समस्यापूर्तीने अनेक प्रसंगीं पंडितांस व आपल्या आश्रयदात्या विक्रमादित्यास चकित केल्याच्या अनेक आख्यायिका पंडितवर्गास माहीत आहेत. अशा कित्येक आख्यायिका बल्लालकवीने कालिदास अकराव्या शतकांतील दानशूर भोजराजाच्या सभेंत होता असें कल्पून 'भोजप्रबंधा'त दिल्या आहेत. त्यासारख्याच एकदोन येथे देतों—

एकदा एका पंडिताने राजसभेंत येऊन 'अम्भोधिर्जलधिः पयोधिरुदधिर्वारांनिधिर्वारिधिः।' अशी समुद्रवाचक सहा संस्कृत पर्यायशब्द जींत गुंफिले आहेत अशी ओळ म्हटली व समस्यापूर्ति करण्याबद्दल पंडितांस आव्हान केलें. सर्व पंडित स्तब्ध बसले व त्याला जयपत्र मिळणार इतक्यांत कालिदासाने पुढे होऊन खाली दिल्याप्रमाणें श्लोक पुरा केला.

अम्बा कुप्यति तात मूर्ध्नि विधृता गङ्गेयमुत्सृज्यताम्
विद्वन् षण्मुख सन्ततं मयि रता तस्या गतिः का वद।
कोपाटोपवशाद्विवृद्धवदनः प्रत्युत्तरं दत्तवान्
अम्भोधिर्जलधिः पयोधिरुदधिर्वारांनिधिर्वारिधिः॥

"एके दिवशीं कुमार कार्तिकेयाने श्रीशंकराला म्हटलें 'बाबा तुम्ही या गंगेला डोक्यावर चढविलेली पाहून आईला फार राग आला आहे.' श्रीशंकरांनी उत्तर केलें 'अरे पण जी सदैव माझ्यावर प्रेम करते तिने कोठे जावें?' त्याबरोबर कार्तिकेयाला राग येऊन त्याच्या सहाही मुखांतून 'अम्भोधिः जलधिः पयोधिः' इत्यादि प्रकारें सागरवाचक शब्द बाहेर पडले!"

या समस्यापूर्तीने तो पंडित खजील झाला, पण राजास अतिशय आनंद झाला हें सांगावयास नकोच.

ईश्वरी कृपा नसली तर विद्या संपादन करण्यास अत्यंत श्रम पडतात हें माहीत असल्याने कालिदास गरीब अज्ञ ब्राह्मणांस राजदरबारी पारितोषिक मिळविण्यास मदत करीत असे. एके प्रसंगीं एक ब्राह्मण राजसभेंत आला. त्याला पुरुषसूक्ताची पहिलीच ओळ येत होती, तेवढी त्याने सभेंत म्हणून दाखविली; पण तेवढ्याने राजा थोडाच संतुष्ट होणार! कालिदास त्या सभेंत होता व ब्राह्मणाच्या मुद्रेवरून त्याचें विद्वत्तेचे भांडवल संपुष्टांत आलेलें त्याने ताडलें. पण त्या गरीब ब्राह्मणास साहाय्य करण्याकरितांतो पुढे होऊन म्हणाला—"महाराज! या ब्राह्मणाने आपली मोठ्या खुबीने स्तुति केली आहे. त्याच्या म्हणण्याचा आशय हा—

सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात्।
चलितश्चकितश्छत्रस्तव सैन्ये प्रधावति॥

'राजा! तुझें सैन्य शत्रूवर चाल करीत असतां शेष पृथ्वीच्या भाराने स्वस्थानापासून चळतो, इन्द्र चकित होतो व सूर्य धुळीने झाकला जातो.' या श्लोकांत कालिदासाने मोठ्या खुबीने यथासंख्य अलंकार साधून राजाकडून त्या गरीब ब्राह्मणास मोठें पारितोषिक मिळवून दिलें.

याप्रमाणें नमुन्यादाखल कांही दंतकथा व आख्यायिका वर उद्धृत केल्या आहेत, त्यावरून त्यांची तऱ्हा कळून येईल. अशा आख्यायिकांवर किती विश्वास ठेवावा याविषयीं पहिल्या प्रकरणांत (पृ. १०) आम्हीं थोडें विवेचन केलें आहे. अशा प्रकारच्या कालिदासचरित्रविषयक आख्यायिका तिबेटी भिक्षु तारानाथ (ख्रिस्तोत्तर १७वें शतक) याच्या ग्रंथांत प्रथम आढळतात, त्यावरून त्या कालिदासाच्या काळानंतर हजार बाराशें वर्षांनंतर रच्या आहेत हें दिसून येईल. बाण, अभिनंद, सोड्ढल्ल, वगैरेंनी कालिदास प्रशस्तिपर अनेक श्लोक लिहिले आहेत, तथापि या आख्यायिकांना अनुकूल असा एकही उल्लेख त्यांत सांपडत नाही. कालिदास व कुमारदास यांच्या सख्याविषयींचा उल्लेखही सोळाव्या शतकांतील एका सीलोनी ग्रंथांत प्रथम दिसतो. त्यामुळें तोही विश्वसनीय मानतां येत नाही. 'जानकीहरण'कर्त

कुमारदास हा इ. स. ५१७–५२६मध्यें ज्याने राज्य केलें तो सिंहलद्वीपचा राजा असणें शक्य नाही व त्या कवीचा काळ इ. स. ७००–७५० हा असावा असें प्रो. कीथ* यांनी अनेक प्रमाणांनी दाखविलें आहे. मागे पहिल्या प्रकरणांत विविध प्रमाणांवरून कालिदास इ. स. ४००च्या सुमारास होऊन गेला असावा असें आपण निश्चित केलें आहे, त्यावरूनही वरील आख्यायिकेंत कांही तथ्य नाहीं हें दिसून येईल.

विश्वसनीय परंपरागत आख्यायिकांच्या अभावीं आपणांस कवीच्या समग्र ग्रंथांचें आलोडन करून तच्चरित्रविषयक माहितीचे कण जमविले पाहिजेत. प्रत्येक ग्रंथकाराच्या विद्वत्तेचें, मतांचें व स्वभावाचें प्रतिबिंब त्याच्या ग्रंथांत पडत असतें हें तत्त्व आता सर्वमान्य झालें आहे. शेक्सपीयरसारख्या ज्या ग्रंथकारांच्या चरित्राविषयीं आपणांस विश्वसनीय माहिती नाही, त्याच्या ग्रंथांतील विविध प्रकारच्या उल्लेखांवरून अनुमानें करून आपलें व वाचकांचें समाधान करण्याचा पाश्चात्य चरित्रकारांचा संप्रदाय आहे, त्यास अनुसरून खालील प्रयत्न केला आहे. अशा प्रयत्नाने कवीच्या चरित्रांतील विविध प्रसंग ज्ञात होणें शक्य नसतें. तसेंच कवीचे सर्व ग्रंथ लक्षांत न घेतां एखाद्या ठिकाणच्या उल्लेखाचा कीस काढून अनुमान करीत गेलें तर अंधगजन्यायाने पुष्कळदा फसगत होते. तथापि या मर्यादा लक्षांत ठेवून कवीच्या ग्रंथांचें परीक्षण केलें असतां पुष्कळ मनोरंजक माहिती मिळेल व ती दंतकथांपेक्षा जास्त विश्वसनीय ठरेल यांत संशय नाही.

कालिदास हा ब्राह्मणकुळांत जन्मला होता यांत संशय नाही. गुप्तकालांत हिंदुधर्माचें व संस्कृतविद्येचें पुनरुज्जीवन झालें त्या वेळीं क्षत्रिय-वैश्यादि इतर जातींचे लोकही संस्कृतविद्येंत पारंगत होत असत असें समुद्रगुप्त, चन्द्रगुप्त, हरिषेण इत्यादिकांच्या कवित्वनैपुण्याबद्दल जे कोरीव लेखांत उल्लेख आढळतात त्यावरून सिद्ध होतें; तथापि कालिदासाच्या बहुतेक सर्व ग्रंथांत ऋषींचीं, विद्वान् ब्राह्मणांचीं व यज्ञकर्त्या यजमानांचीं शब्दचित्रें आपुलकीच्या भावनेने काढलेलीं दिसतात व शाकुंतलांत त्याने

*Keith : *The Date of Kumaradasa*, *J.R. A. S.* 1901, pp. 578-582.

स्वत: वैदिक वृत्तांत रचलेला एक श्लोक घातला आहे, त्यावरून त्याच्या ब्राह्मणजातीविषयी संशय राहत नाही. तो मंदोसरचा रहिवासी असावा असे कल्पून म० म० हरप्रसाद शास्त्री यांनी तो दसोरा ब्राह्मण असावा असे म्हटलें आहे तें मात्र मान्य करतां येत नाही. कारण मंदोसरपेक्षा उज्जैनीशीच त्याचा जास्त संबंध दिसतो हें आपण मागे पाहिलेंच आहे.

प्राचीन काळी विविध विद्यांचा अभ्यास करण्याकरितां हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं विद्यापीठें होतीं. पंजाबांत तक्षशिला, मगधांत नालंदा, काठेवाडांत वलभी, माळव्यांत उज्जैनी, या ठिकाणच्या विद्यापीठांचें सुंदर वर्णन प्राचीन पाली वाङ्मयात व चिनी यात्रेकरूंच्या प्रवासवर्णनांत आढळतें. याशिवाय ठिकठिकाणी विद्वान् ब्राह्मणांनी स्थापिलेली गुरुकुलें असत. अशा ठिकाणी वेदवेदांगें, व्याकरणज्योतिषादि शास्त्रें, न्यायमीमांसादि दर्शनें यांचेंच केवळ अध्ययन होत नसे, तर सुधामधुर काव्येही निर्माण करण्यास प्रोत्साहन मिळत असे, असें बाणाच्या 'हर्षचरिता'वरून दिसतें. बाण कालिदासानंतर दोन शतकांनी होऊन गेला; तथापि त्याने वर्णिलेली परिस्थिति तत्कालीं नवीन निर्माण झाली नसून प्राचीन काळापासून चालत आली होती यात संशय नाही. अशा एखाद्या गुरुकुलांत कालिदासाचा अभ्यास झाला असावा असें वाटतें. 'रघुवंशा'च्या पहिल्या सर्गांत वसिष्ठाच्या आश्रमाचें कवीने फार सुंदर वर्णन केलें आहे. दिलीप राजा आपल्या पत्नीसह सायंकाळी आश्रमांत पोंचला. त्यावेळी, वनांतून समिधा, दर्भ व फळें घेऊन तपस्वी आश्रमांत परत येत होते; पर्णकुटिकांच्या द्वाराजवळ ऋषिपत्नी हरिणांपुढे नीवाराचे दाणे टाकीत होत्या व तीं हरिणेंही त्यांच्या सभोवतीं अपत्यांप्रमाणें उड्या मारीत होतीं; ऋषिकन्या वृक्षांच्या आलवालांत पाणी ओतून पक्ष्यांनी तें निःशंक प्यावें म्हणून दूर जात होत्या; अंगणांत नीवार वाळ्याच्या राशी केल्या होत्या व जवळच हरिणें रवंथ करीत बसली होतीं; सायंकाळच्या यज्ञकर्मांत अग्नीस अर्पिलेल्या हविर्भागाचा सुगंध जिकडे तिकडे पसरला होता; इत्यादि दृश्य त्याच्या दृष्टीस पडलें. नंतर रात्रीं दर्भांच्या बिछान्यावर तो निजला व पहाटे वसिष्ठशिष्यांच्या अध्ययनघोषाने तो जागृत झाला असें कवीने वर्णिलें आहे. याच

काव्याच्या पांचव्या सर्गांतही वरतंतूच्या, 'शाकुंतलां'त कण्व व मारीच यांच्या व 'विक्रमोर्वशीयां'त च्यवनाच्या आश्रमाचें जें मनोहर वर्णन आले आहे, त्यावरून तत्कालीन आश्रमांतील व्यवस्था, नियम व अभ्यासक्रम यांचा कवीस चांगला परिचय होता असें दिसतें.

अशा गुरुकुलांत चौदा विद्यांचा अभ्यास होत असे, असें कालिदासाने म्हटलें आहे. त्या विद्या याज्ञवल्क्यस्मृतींत येणेंप्रमाणें सांगितल्या आहेत—

पुराणन्यायमीमांसाधर्मशास्त्राङ्गमिश्रिताः।
वेदाः स्थानानि विद्यानां धर्मस्य च चतुर्दश॥

'चार वेद, शिक्षाव्याकरणादि सहा अंगें, पुराण, न्याय, मीमांसा व धर्मशास्त्र या चौदांना विद्या अशी संज्ञा आहे व हींच धर्माचींही मूलस्थानें होत.' कवीने श्रुति, स्मृति, इतिहास, पुराण, दर्शनें, शैवपांचरात्रादि मतें, अर्थशास्त्र, कामशास्त्र व नाट्यशास्त्र ही राजसिद्धान्तत्रयी, निरनिराळ्या देशांतील लोकव्यवहार, याशिवाय धनुर्वेद, रत्नपरीक्षा, योगशास्त्र इत्यादि विषयांचा अभ्यास करावा असें प्राचीन आचार्यांचें मत राजशेखराने उद्धृत केलें आहे. (काव्यमीमांसा, अ. ८). कालिदासाने यांपैकी बहुतेक विषयांचें मार्मिक अध्ययन केलें होतें असें त्याच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून दाखवितां येतें.

या उल्लेखांचा विचार करण्यापूर्वी एकदोन गोष्टी लक्षांत ठेवणें जरूर आहे. वर निर्दिष्ट केलेल्या विषयांपैकी कोणत्याही विषयावर कालिदासाने एखादा स्वतंत्र ग्रंथ लिहिला नाही, किंवा एखादा संस्कृत वाङ्मयाचा इतिहास लिहून त्यांत त्या सर्वांचा परामर्श घेतला नाही. या विषयांचे उल्लेख कथानक वर्णन करण्याच्या ओघांत, उपमादि अलंकारांच्या प्रयोगांत किंवा पात्रांच्या संभाषणांत सहजगत्या आलेले अत एव तुरळक आहेत. कालिदास अतिशय विद्वान् असला तरी विनयशील होता; म्हणून त्याने कोठेही आपलें पांडित्य दाखविण्याचा प्रयत्न केला नाही. तथापि त्याची ग्रंथसामग्री विविधविषयप्रचुर असल्याने त्यांत अनेक विषयांचे उल्लेख कमीजास्त प्रमाणांत येतात व त्यायोगें त्या त्या विषयांचें त्याचें ज्ञान अजमावतां येतें.

कालिदासाचें शिक्षण एखाद्या गुरुकुलांत झालें असल्यास त्याने एक किंवा अनेक वेदाचा अभ्यास केला असला पाहिजे. ऋग्वेदाचा व त्याच्या उदात्तादि स्वरांचा उल्लेख 'कुमारसंभव'(२,१२) व 'रघुवंश'(१५, ७६) यांत आला आहे. यजुर्वेदांतील अश्वमेधयज्ञाचा 'मालविकाग्निमित्रां'त व राज्यरक्षणार्थ उपयोगीं पडणाऱ्या अथर्ववेदाच्या मंत्रांचा उल्लेख 'रघु वंशां'त आला आहे. कालिदासाला 'विक्रमोर्वशीय' नाटकाचें संविधानक-ऋग्वेद, (१०,९५) व शतपथ ब्राह्मण (५, १-२) यांवरून सुचलें असावें. त्याने योजिलेल्या कांही उपमांवरूनही त्याचा ब्राह्मणग्रंथांशीं परिचय दिसून येतो. दिलीपाची राणी सुक्षिणा ही यज्ञपत्नी जी दक्षिणा तिच्या सारखी होती (रघु. १, ३१) ही कल्पना 'यज्ञो गन्धर्वस्तस्य दक्षिणा अप्सरसः' या ब्राह्मणवाक्यावरून सुचलेली दिसते. 'परमेश्वराने जलांत स्ववीर्य टाकलें व त्यापासून चराचर सृष्टि उत्पन्न झाली', ही कल्पना व 'सृष्टि उत्पन्न करण्याकरितां परमेश्वराने स्त्रीपुरुषात्मक रूपें धारण केली' ही 'कुमारसंभवां'तील कल्पना कालिदासाने, ब्राह्मणग्रंथांतून किंवा मनु-स्मृतीतून घेतली असावी. तथापि एकंदरीत कर्मकांडापेक्षा ज्ञानकांडाकडेच कवीचा जास्त ओढा दिसतो. उपनिषदांतील अध्यात्मविद्येनेच तीन्ही वेद शोभतात असें त्याने 'मालविकाग्निमित्रां'त म्हटलें आहे. 'कुमारसंभवां'तील ब्रह्मदेव व शिव आणि 'रघुवंशां'तील विष्णु यांचीं वर्णनें उपनिषदांच्या अभ्यासाने निश्चित झालेल्या त्याच्या एकेश्वरमताचीं निदर्शक आहेत. 'द्रव संघातकठिनः स्थूलः सूक्ष्मो लघुर्गुरुः। व्यक्तो व्यक्ततरश्चासि' इत्यादि परस्परविरोधि विशेषणांनी केलेली ब्रह्मदेवाची स्तुति वाचतांना 'अस्थूल-मनणु, अन्हस्वमदीर्घम्' इत्यादि उपनिषदांतील वचनांची आठवण होते. उपनिषदांतील परम तत्त्व जें ब्रह्म त्याचाही एके ठिकाणीं उल्लेख आला आहे (कुमार. ३, १५). कालिदासाने भगवद्गीतेचा चांगलाच अभ्यास केलेला दिसतो. त्यांतील अक्षर, क्षेत्र व क्षेत्रज्ञ या संज्ञा, समाधींत चित्त नियमन करणारा योगी निवांत स्थलींच्या दीपाप्रमाणें असतो, ही उपमा व स्थावर सृष्टींत हिमालय ही परमेश्वराची विभूति आहे ही कल्पना या सर्वांचा कवीने 'कुमारसंभवां'त उपयोग केला आहे (कुमार० ३,५०; ६,७७; ३,४८, इ.).

याशिवाय भारतीय तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांचाही त्याने अभ्यास केला होता. सर्व सृष्टीत एकच तत्त्व भरलेलें आहे, ब्रह्मा, विष्णु व शिव हीं त्याची निरनिराळी रूपें होत, ही वेदान्ताची कल्पना त्याच्या सर्व ग्रंथांत आढळते. पुरुष (आत्मा) हा उदासीन आहे, सृष्टींत सर्वत्र दिसणारी प्रवृत्ति ही प्रकृतीची होय, हा सांख्यांचा सिद्धांत 'कुमार-संभवां'त (२, १३) उल्लेखिला आहे. पण द्वैतवादी सांख्यांचें हें मत कवीस पसंत नसल्याने प्रकृति व पुरुष हीं दोन्ही तत्त्वें परमेश्वराचीं रूपेंच होत अशी मुरड त्याने त्यास दिली आहे. योगाचा तर कालिदासास चांगलाच परिचय दिसतो. 'कुमारसंभवा'च्या तृतीयसर्गांत ध्यानस्थ बसलेल्या श्रीशंकरांचें वर्णन कवीने तीन श्लोकांत सविस्तर व सुंदर रीतीने केलें आहे व पुढे एका श्लोकांत (३, ५८) योगाने आपल्या हृदयांतील परमात्म्याचें दर्शन होतें असें सुचविलें आहे. पर्यंङ्कबन्ध (कुमार०३,४५), वीरासन (रघु०१३,५२) इत्यादि योगासनांचाही कवीने कांही ठिकाणीं निर्देश केला आहे. न्याय व वैशेषिक या तत्त्वज्ञानांच्या पारिभाषिक संज्ञांचा उपयोग करण्याचा कोठे प्रसंग आला नाही; तथापि त्यांचेंही ज्ञान कवीस होते यांत संशय नाही, कारण 'रघुवंशां'त एके ठिकाणीं (१३,१) शब्द आकाशाचा गुण आहे या वैशेषिकांच्या मताचा त्याने उल्लेख केला आहे.

कालिदासाने ठिकठिकाणीं स्मृतींतील विविध विषयांचा उल्लेख केला आहे. स्मृति ही श्रुतीस अनुसरते म्हणून प्रमाण असें त्याने एका उपमेंत सुचविलें आहे (रघु०२, २). 'कुमारसंभवां'तील शिवपार्वतीच्या व 'रघुवंशां'तील अज–इंदुमतीच्या विवाहाचें वर्णन गृह्यसूत्रांस अनुसरून आहे. विवाहानंतर निदान तीन रात्रींपर्यंत दंपतींनी ब्रह्मचर्याने रहावें व भूमीवर आपली शय्या घालावी असा जो गृह्यसूत्रांत नियम आढळतो तदनुसार श्रीशंकरांनी आचरण केलें असें कवीने वर्णिलें आहे (कुमार०७,९४). मनुस्मृतींत चालून दिलेल्या नियमांप्रमाणें दिलीपाची प्रजा वागत होती (रघु०१, १७), धर्मशास्त्रांतील नियमांस अनुसरून बिनवारसा मनुष्याची संपत्ती राजाकडे जाते (शाकुं०६), इत्यादि विधानांवरून कालिदासाने मनुस्मृतीसारख्या धर्मशास्त्रांचा अभ्यास केला होता असें दिसतें. याशिवाय

त्याने व्याकरण, अर्थशास्त्र, कामशास्त्र इत्यादिकांचाही सूक्ष्म अभ्यास केला होता. 'कुमारसंभवां'तील 'पुराणस्य कवेस्तस्य' (२,१७) या श्लोकांतील 'चतुष्टयी शब्दानां प्रवृत्तिः' हा शब्दप्रयोग त्याने पातंजल महाभाष्यावरून घेतला आहे. कालिदासाने ठिकठिकाणीं उमा, रघु, अज, चन्द्र, तपन, शतक्रतु इत्यादि नांवांची व्युत्पत्ति दिली आहे व कांही सुंदर व्याकरणविषयक उपमा योजिल्या आहेत, त्यावरून त्याचा व्याकरणशास्त्राचा व्यासंग प्रत्ययास येतो. विक्रमादित्याने कालिदासास आपला वकील म्हणून वाकाटकांच्या दरबारीं पाठविलें होतें हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. अर्थात् त्याचा राजकारणाचा चांगलाच अभ्यास असावा. त्याच्या ग्रंथांवरूनही तीच गोष्ट सिद्ध होते. 'मालविकाग्निमित्रां'त 'गादीवर नुकताच बसलेल्या शत्रूचा उच्छेद करणें सोपें जातें,' याविषयीं एका तंत्रकाराचें वचन कवीने उद्धृत केलें आहे व 'कुमारसंभवां'त (३, ६) 'शुक्रनीती'चा स्पष्ट निर्देश केला आहे. सप्ताङ्ग, यातव्य, प्रकृति, प्रशमन, मूल, प्रत्यन्त, पार्ष्णि इत्यादि अर्थशास्त्रांतच येणाऱ्या अनेक पारिभाषिक संज्ञा कवीने ठिकठिकाणीं योजिल्या आहेत. 'रघु हा धर्मविजयी होता', 'सुह्मदेशच्या लोकांनी वैतसी वृत्तीचा अवलंब करून आपले प्राण वाचविले', 'विदर्भाचा राजा अग्निमित्राचा प्रकृत्यमित्र (स्वभावशत्रु) होता' इत्यादि विधानांत कालिदासाचें अर्थशास्त्राचें ज्ञान स्पष्टपणें दिसून येतें. दिवस व रात्र यांच्या निरनिराळ्या भागांत राजाने कसें आचरण ठेवावें याविषयीं अर्थशास्त्रकारांनी नियम घालून दिले आहेत, त्याप्रमाणें अतिथि राजा वागत असे असें 'रघुवंशां'त म्हटलें आहे. अर्थशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें अग्निमित्र, पुरूरवस् व दुष्यन्त यांची अमात्यपरिषद् होती व तिच्या सल्ल्याने ते राजे राज्यकारभार करीत असत; पुरूरवस् राजाच्या राजधानींतील व्यवस्था 'नागरिक' पहात असे असें कालिदासाने दाखविलें आहे. कालिदासाचें राजकारणांतील ध्येय अत्यंत उच्च होतें हें त्याने दुष्यन्त, दिलीप, रघु, अतिथि वगैरे राजर्षींचीं जीं उदात्त चित्रें रंगविलीं आहेत त्यावरून स्पष्ट आहे. तथापि त्याचा विचार पुढे स्वतंत्र प्रकरणांत करणें योग्य होईल.

अर्थशास्त्राप्रमाणें कामशास्त्राचाही कवीने सूक्ष्म अभ्यास केला होता. मागे पहिल्या प्रकरणांत कण्व मुनीने शकुंतलेला केलेल्या उपदेशांतील बहुतेक कल्पना कालिदासाने वात्स्यायनाच्या 'कामसूत्रां'तून घेतल्या आहेत हें दाखविलें आहे. किंबहुना 'शाकुंतला'च्या पहिल्या अंकांतील दुष्यन्त व शकुन्तलेच्या सख्या यांच्यामधील संभाषणाचा रमणीय प्रसंग वात्स्यायनाच्या 'कामसूत्रां'तील 'कन्यासंप्रयुक्तक' नामक अधिकरणावरून कवीस सुचला असावा. त्या अधिकरणांत लज्जापरवश तरुणीने प्रियकराशीं कसें बोलावें हें वात्स्यायनाने सांगितलें आहे (कामसूत्र पृ. २०२–३). "तिने आपल्या सखीच्या द्वारा भाषणास आरंभ करावा, तें चालू असतां खाली मान घालून हंसावें, तिने अतिशयोक्ति केल्यास तिच्यावर रागवावें, सखीने 'हिने मला असें सांगितलें' असे बळेंच म्हणावें, त्यावर तिने तिचा निषेध करावा, प्रियकराने उत्तराची याचना केली तरी बोलूं नये, बोललीच तर मला हें मुळीच माहीत नाही अशा अर्थाचें अस्पष्ट बोलावें, प्रियकराकडे पाहून स्मित करावें व कटाक्ष फेकावे." या उतार्‍यांत दिलेल्या सूचनांचा कालिदासाने वरील प्रसंगीं चांगलाच उपयोग केला आहे. विवाहप्रसंगीं पार्वतीचें करग्रहण करतांना शिवाच्या हाताला घाम सुटला व पार्वतीच्या अंगावर रोमांच उभे राहिले असें कालिदासाने वर्णिलें आहे तें 'कामसूत्रां'तील प्रथम संगमाच्या वर्णनास अनुसरून नाही हें खरें. तथापि विस्मृतीमुळें कवीच्या हातून ही चूक घडली असावी. पुढे ती लक्षांत येतांच 'रघुवंशां'त 'कामसूत्रां'तल्या प्रमाणें अज–इंदुमतीची अवस्था त्याने वर्णिली आहे. 'कामसूत्रां'त नगरांत राहणाऱ्या विलासी व दाक्षिण्यसंपन्न नागरकांचें सविस्तर वर्णन आलें आहे. त्याला अनुलक्षून कवीने 'साधु आर्य! नागरकोऽसि।' 'अन्यसंक्रान्तप्रेमाणो नागरका अधिकं दक्षिणा भवन्ति।' असें 'विक्रमोर्वशीयां'त व 'नागरकवृत्त्या शान्तयैनाम्' असें 'शाकुंतलां'त म्हटलें आहे.* अग्निमित्राच्या प्रेमसंबंधांत मदत करणाऱ्या विदूषकास इरावती राणी 'कामतन्त्रसचिव' ही पदवी बहाल करते त्यावरूनही कवीस कामशास्त्राची चांगली माहिती होती हें दिसून येईल.

* H. C. Chakladar : *Social Life in Ancient India*, p. 217

'शाकुन्तला'दि उत्कृष्ट नाटकें निर्माण करणाऱ्या कवीने नाटचशास्त्राचा उत्तम अभ्यास केला होता हें सांगण्याची आवश्यकता नाही. आद्य नाटचशास्त्रकार भरतमुनीने अष्टरसात्मक 'लक्ष्मीस्वयंवर' नामक नाटकाचा प्रयोग स्वर्गांत अप्सरांकडून करविला होता. त्या वेळीं उर्वशीने संभाषणांत एक अक्षम्य चूक केली व त्यामुळें तिला मुनीने शाप दिला, असा प्रसंग 'विक्रमोर्वशीयां'त (अंक ३) आला आहे. त्या ठिकणीं संधि, वृत्ति, रस, राग इत्यादि पारिभाषिक संज्ञांचा कवीने उपयोग केला आहे. नाटकांप्रमाणें साभिनय गायनयुक्त नृत्यही त्याला चांगलेंच अवगत होतें हें 'मालविकाग्निमित्रा'च्या पहिल्या अंकावरून स्पष्ट दिसतें. त्या प्रसंगीं छलिक, भाविक, पंचांगाभिनय वगैरे संज्ञा कवीने योजिल्या आहेत.

याशिवाय ज्योतिःशास्त्र, आयुर्वेद व धनुर्वेद हेही विषय कवीने उत्तम प्रकारें अभ्यासिले होते असें म्हणतां येतें. जामित्र, उच्चसंस्थ (कुमार० ७, १; रघु० ३, १३) इत्यादि संज्ञांवरून त्याचें ग्रहज्योतिषाचें ज्ञान दिसून येतें, तर 'तारकासुर हा धूमकेतूप्रमाणें लोकांच्या नाशास उत्पन्न झाला,' (कुमार० २, ३२) 'शत्रूवर चाल करणारा राजा शुक्रयुक्त दिशा वर्ज्य करतो त्याप्रमाणें मदन नन्दीची नजर चुकवून शिवाच्या तपोवनांत प्रवेश करता झाला,' (कुमार० ३, ४३) 'चंद्राचा उत्तरफल्गुनी नक्षत्राशीं योग असतां मैत्र मुहूर्तावर सौभाग्यवती व पुत्रवती स्त्रियांनी पार्वतीची वेणीफणी केली' (कुमार० ७, ६), 'मंगळ वक्रीगतीने पूर्व राशीवर येतो त्याप्रमाणें राणी इरावती कदाचित् परत येईल' (माल० ३) इत्यादि विधानांवरून त्याला फलज्योतिषही अवगत होतें हें उघड आहे. रात्रीच्या प्रशांत काळीं चंद्र व तारका यांच्याकडे पाहत बसण्याचा त्याला नाद असावा; नाही तर 'एष चित्रलेखाद्वितीयामुर्वशीं गृहीत्वा विशाखासमीपगत इव चन्द्रः उपस्थितो राजर्षिः' (विक्र० १), 'किमत्र चित्रं यदि विशाखे शशाङ्कलेखामनुवर्तते' (शाकु० ३) यांसारख्या सुंदर उपमा व दृष्टांत त्याला सुचले नसते. वैद्यशास्त्रांतील प्रमेयांचा व उपायांचा त्याने ठिकठिकाणीं उपयोग केला आहे. 'भोजनाची वेळ टळली तर दोष उत्पन्न होतो असें वैद्य म्हणतात' (माल० १), 'मित्रा ! मद्यपानास कंटाळलेल्यास खडीसाखर

मिळावी त्याप्रकारें ही मालविका तुझ्या दृष्टीस पडत आहे' (माल०३) यासारख्या विदूषकाच्या नर्मगर्भ उक्तींत व 'प्रिय अशा दुष्ट मनुष्याचाही सर्पाने दंश केलेल्या अंगुलीप्रमाणें दिलीप त्याग करीत असे' (रघु०१,२८) अशा प्रकारच्या उपमांत त्याचें आयुर्वेदाचें ज्ञान प्रतिबिम्बित झालेलें आहे. 'आलीढ', 'वाजिनीराजना' इत्यादि संज्ञांवरून व 'राजाने रानटी हत्तीस मारूं नये' इत्यादि त्याने उल्लेखिलेल्या नियमांवरून त्याचें धनुर्वेदाचें परिशीलन व्यक्त होतें. असो.

व्याकरण, अर्थशास्त्र, ज्योतिःशास्त्र इत्यादि तर्ककर्कश बुद्धिप्रधान शास्त्रांप्रमाणें संगीत, चित्रकला, प्रसाधनकला इत्यादि प्रयोगसाध्य ललितकलाही कालिदासास चांगल्या अवगत होत्या हें त्याच्या ग्रथांतील उल्लेखांवरून दाखवितां येतें. संगीतामध्यें गीत, वाद्य व नृत्य यांचा अन्तर्भाव होतो. पैकी नृत्याचे उल्लेख मागे दाखविले आहेत. वाद्यांचे वीणेसारखीं तन्तुवाद्यें, मृदंगाप्रमाणें चर्मावृत वाद्यें, मुरलीसारखीं छिद्रयुक्त वाद्यें व टाळ, झांजा यांसारखीं घनवाद्यें असे चार प्रकार मानतात. यांपैकी बहुतेकांचें वर्णन कालिदासाच्या ग्रंथांत आलें आहे. नारदमुनि गोकर्णक्षेत्रस्थ शंकराच्या दर्शनास जात असता त्यांच्या वीणेवर घातलेली सुरकुसुमांची माला इंदुमतीच्या वक्षःस्थलावर पडली व त्यायोगें तिला मृत्यु आला असा प्रसंग 'रघुवंशां'त आला आहे. 'कुमारसंभवां'त प्रातःकाळीं स्वरांच्या आरोहावरोहास अनुसरून तारांवर हात फिरविणाऱ्या किन्नरांच्या मंगल गीतांनी शंकर जागृत झाले असें कवीने वर्णिलें आहे. त्या ठिकाणीं सतारीसारखें तन्तुवाद्य अभिप्रेत आहे. त्याप्रमाणेंच 'मेघदूतां'तही यक्षस्त्री सद्गदित कंठाने पतिगुणवर्णनपर गीत गात असतांना अश्रूंनी भिजलेल्या सतारीच्या तारा साफ करीत असेल असें म्हटलें आहे. वाद्यांमध्यें मृदंग कवीला विशेष आवडत होता असें दिसतें. त्याच्या बहुतेक ग्रंथांत मृदंगवादनाचें वर्णन आलें आहे. 'मालविकाग्निमित्रां'त मृदंगवादनाने मालविकेचें नृत्य होण्याची वेळ झाली असें सर्वांस समजल्याचें दाखविलें आहे. अलकेंत संगीताकरितां मृदंग वाजवीत असत असें कवीने 'मेघदूतां'त म्हटलें आहे. अग्निवर्ण राजा नर्तकींच्या नाचाच्या वेळीं स्वतः मृदंगाची साथ धरत असे असें 'रघुवंशां'त वर्णिलें आहे. मृदंगवादनाने

मेघगर्जनेची भ्रांति होऊन मयूर नृत्य करूं लागतात असें कवीने पुष्कळ ठेकाणीं वर्णन केले आहे. याशिवाय रघूचा जन्म, इंदुमतीचा स्वयंवर, अतिथि राजाचें राज्यारोहण वगैरे प्रसंगींच्या उत्सववर्णनांत तूर्य किंवा सनई या वाद्याचा व युद्धवर्णनांत शंखवादनाचा उल्लेख आला आहे. सुरेल वादनाने मन प्रसन्न होतें तर बेसुर वाजविण्याने श्रोत्यांस त्रास होतो हें कालिदासाने एका उपमेंत दाखविलें आहे (कुमार० १,४५), त्यावरूनही त्याची वादनाभिरुचि व्यक्त होते.*

कालिदासाच्या अनेक ग्रंथांत गायनाचें वर्णन आलें आहे. 'मालविकाग्निमित्रा'च्या पहिल्या अंकांत साभिनय गीताने मालविका राजावरचें आपलें प्रेम व्यक्त करते; 'शाकुन्तला'च्या प्रस्तावनेंत विद्वत्परिषदेच्या मनोरंजनार्थ नटी ग्रीष्मवर्णनपर गीत गाते व त्यायोगें सर्व प्रेक्षक तल्लीन होऊन चित्रासारखे तटस्थ राहतात; पुढे पांचव्या अंकांत एक राणी रागाने ओथंबलेली गीतिका गाऊन स्वतःचा त्याग केल्याबद्दल राजाचा अप्रत्यक्ष रीतीने उपालंभ करते; 'कुमारसंभवां'त मदनदाहानंतर निराश झालेल्या पार्वतीच्या सद्गदित कंठांतून त्रिपुरविजयगीत, ऐकून किन्नरी ढळढळां अश्रू गाळतात; 'रघुवंशां'त कुश व लव यांनी मधुरकंठाने गाइलेलें मनोहर रामचरित श्रवण करून सर्व परिषद् शोकाकुल होते इत्यादि प्रसंगांच्या वर्णनाने उत्तम गायनाचा श्रोत्यांच्या मनावर कसा परिणाम होतो हें कवीने दाखविलें आहे. मार्जना, करण, वर्णपरिचय, षड्ज, मध्यम इत्यादि गायनवादनाच्या पारिभाषिक संज्ञाही त्याने योजिल्या आहेत, त्यावरून त्या कलांचा त्याचा अभ्यास व्यक्त होतो.

नृत्य, गायन व वादन या कलांप्रमाणें चित्रकलाही कालिदासाला उत्तम रीतीने अवगत होती. त्याने आपल्या ग्रंथांत कागदांवर व भितीवर काढलेलीं चित्रें, खांबावर कोरलेल्या आकृती, देवांच्या प्रतिमा वगैरे चित्रकलेच्या निरनिराळ्या प्रकारांचा उल्लेख व वर्णन केलें आहे. त्याच्या ग्रंथांतील दुष्यंत, पुरूरवा आणि यक्ष हे तीन नायक, 'रघुवंशां'तील अग्निवर्ण राजा, 'मेघदूता'तील यक्षस्त्री हीं सर्व उत्तम चित्रकार म्हणून दाखविलेलीं आहेत. 'मालविकाग्निमित्रां'तील धारिणी व 'शाकुंत-

* के. ल. ओगले : कालिदास आणि ललितकला (वि. श्रा. वि. पु.५७ पृ. २१३).

लां'तील शकुंतलेच्या सख्याही चित्रकलेच्या शोकी दिसतात. त्याच्या नाटकांतील अनेक प्रसंग चित्राच्या दर्शनावर किंवा लेखनावर बसविलेले आहेत. 'मालविकाग्निमित्रां'त अग्निमित्राला मालविकेचें प्रथम दर्शन धारिणीची दासी म्हणून एका चित्रांत होतें व तिच्या सौंदर्याने त्याचें मन आकृष्ट होतें, पुढे एका प्रसंगीं राजाचें चित्र दृष्टीस पडल्यावर त्यांत इरावतीकडे निरखून पाहणाऱ्या राजास पाहून तिच्याविषयीं मालविकेला मत्सर वाटतो; 'मेघदूतां'त यक्ष आपले विरहदुःख सहन करण्याकरितां क्रुद्ध झालेल्या आपल्या प्रियेचें गेरूने चित्र काढून आपण तिच्या पायां पडतों असें दाखविण्याचा बेत करतो तोंच डोळ्यांत भराभर अश्रु येऊन त्याचा प्रयत्न विफल होतो; 'शाकुतलां'त शकुंतलेच्या प्रत्यादेशानंतर पश्चात्ताप पावलेला राजा कण्वाश्रमांत शकुंतलेचें त्याला प्रथम दर्शन झालें त्या प्रसंगाचें चित्र अर्धवट काढतो या सर्व प्रसंगांवरून कथानकाच्या विकासाकरितां व पात्रांच्या भावनाविष्काराकरितां कालिदासाने आपल्या ग्रंथांत चित्रकलेचा कसा मार्मिकपणाने उपयोग करून घेतला आहे तें दिसून येतें. वर सांगितलेलें दुष्यन्ताने काढलेलें चित्र अपुरें होतें तें पूर्ण करण्याकरितां आणखी काय काय काढलें पाहिजे तें राजाने खालील श्लोकांत सांगितलें आहे, त्यावरून सुंदर चित्राला पार्श्वभूमीची किती आवश्यकता असते हें कवीला उत्कृष्ट रीतीने अवगत होतें असें दिसून येतें—

कार्या सैकतलीनहंसमिथुना स्रोतोवहा मालिनी
पादास्तामभितो निषण्णहरिणा गौरीगुरोः पावनाः।
शाखालम्बितवल्कलस्य च तरोर्निर्मातुमिच्छाम्यधः
शृङ्गे कृष्णमृगस्य वामनयनं कण्डूयमानां मृगीम्॥

शाकुन्तल, ६, १७.

(या चित्रांत अद्यापि मालिनी नदी, तिच्या वाळवंटांत बसलेलीं हंसांची जोडपीं, जवळच ज्याच्यावर हरिण बसले आहेत अशा हिमालयाच्या पायथ्याच्या पवित्र टेकड्या, तसेंच ज्याच्या शाखांवर वल्कलें वाळत घातलीं आहेत असें एक झाड व त्याच्या छायेंत कृष्णमृगाच्या शिंगावर वामनेत्र खाजवीत असलेली हरिणी इतक्या गोष्टी मला काढावयाच्या आहेत.) राजाने काढलेलें चित्र इतकें हुबेहुब होतें की शकुन्त-

ध्या मातेची मैत्रीण गुप्तरूपाने उभी होती तिलाही तें पाहून शकुंतला पल्या समोर जणू काय उभी आहे असें वाटले. यानंतर शकुन्तलेच्या ागावर कोण कोणते पुष्पालंकार घालावयाचे त्याचें राजाने वर्णन केले हे. पार्श्वभूमि, भावनाविष्कार, समुचित अलंकार या गोष्टींचें इतक्या रकाईने वर्णन करणारा कवि स्वतः उत्तम चित्रकारही असला पाहिजे तें वाटल्याशिवाय राहत नाही. 'कुमारसंभवां'त पार्वती तारुण्यांत येत सता तिचे निरनिराळे अवयव हळू हळू उठावदार दिसूं लागले ही त्पना व्यक्त करण्याकरिता चित्रकाराच्या ब्रशाने हळू हळू स्पष्ट णाऱ्या चित्राची मार्मिक उपमा कवीने दिली आहे. "चित्रकार प्रथम ऱ्या चित्राचा बारीक रेघांनी आराखडा काढतो, नंतर त्यात केसाचा खणीने म्हणजे ब्रशाने रंग भरतो. नुसता आराखडा काढला असता तांतही निरनिराळे सर्व भाग यथोचित समाविष्ट झालेले असतातच ण त्यांचा स्पष्ट उठावदारपणा त्यात रंग भरल्यानंतरच दिसून येतो..... ाशाने चित्र जसें उमलतें ही उपमा' कवि स्वतः चित्रकार असल्याशिवाय ाला सुचणें अशक्य नसलें तरी फार कठीण असतें"* असें जे रा. ओगले ांनी म्हटलें आहे तें कोणासही मान्य होण्यासारखेच आहे. कालिदास-ाळीं अजंठा येथील कांही गुहांतील चित्रें रंगविली गेलीं असा कोरीव खांचा पुरावा आहे, त्यावरून तत्कालीन चित्रकलेचें श्रेष्ठत्व दिसून येतें.

कालिदासाला स्वदेशाच्या इतिहासभूगोलाचें बारीक ज्ञान होतें सें दिसतें. 'मालविकाग्निमित्र' नाटकातील सविधानक त्याच्या काळा* र्वी पांचशें साडे पांचशें वर्षांपूर्वी घडलेलें. तथापि त्या काळची कालि-ासाची माहिती अगदी बरोबर असल्याचें अलीकडे उजेडांत येऊ ागलेल्या ऐतिहासिक साधनांवरून सिद्ध होत आहे. कांही वर्षांपूर्वी हाराष्ट्रांतील एका विद्वान् संशोधकाने असें म्हटलें होतें की कालिदासाने मालविकाग्निमित्र' नाटकांत पुष्यमित्र हा स्वामिवधाचें रक्त हातावर न ांडलेला असा सेनापतिपदावरच दाखविला आहे, पण त्याने अश्वमेध ज्ञ केला असेंही वर्णिलें आहे, त्यावरून एक तर त्यास राजकारणाचें ज्ञान व्हतें किंवा पुष्यमित्राला अशा सोज्वळ स्थितींत दाखविण्यांत त्याने

* के. ल. ओगले : कालिदास आणि चित्रकला (वि. ज्ञा. वि., पु. ५८, पृ. ३५७).

आपल्या सदसद्विवेकबुद्धीस चूप वसविलें असलें पाहिजे; तसेंच पुष्यमित्राने केलेला यज्ञही अश्वमेधच होता याला पुरावा नाही. कालिदासाला जी ऐतिहासिक साधनें उपलब्ध होतीं तीं सर्वच सध्या अस्तित्वांत नसल्याने वरच्या सारख्या विधानांचें खंडण करणें कठीण जातें. तथापि सुदैवाने या बाबतींत तत्कालीन शिलालेखाचा* अत्यंत विश्वसनीय असा पुरावा अलीकडे उपलब्ध झाला आहे, त्यावरून असें दिसतें की पुष्यमित्राने एक नव्हे तर दोन अश्वमेध केले होते व तदनंतरही आपली सेनापति हीच पदवी कायम ठेविली होती. तेव्हा कालिदासावर वरील दोन्ही आरोप लागू होत नाहीत; व त्याची ऐतिहासिक माहिती अगदी बिनचूक होती हें सिद्ध होतें.

कालिदासाच्या ग्रंथांत अनेक देशांचें पर्वतांचें, नद्यांचें व शहरांचें वर्णन आलें आहे, तथापि त्यांत कोठेही चूक आढळत नाही. 'कुमार-संभवा'च्या आरंभीं व 'मेघदूता'त त्याने हिमालयाचें विस्तृत व यथातथ्य वर्णन केलें आहे. भारवीसारख्या इतर कवींनीही हिमालयाचें वर्णन केलें आहे, पण त्यांत वस्तुस्थितीपेक्षा कल्पनेवरच जास्त भर दिलेला आहे. कालिदासाचें तसें नाही. हिमालयावर यात्रेच्या निमित्ताने अगर उन्हाळ्यांत जाणारे लोक तेथील मेघांचें, रात्रीं प्रकाशमान होणाऱ्या औषधींचें वगैरे जें वर्णन कवीने केलें आहे तें अगदी यथातथ्य आहे, असें सांगतात. वंक्षु अगर सिंधु नदीच्या तीरावर केशराची झाडें होतात असें दुसऱ्या कोणाही कवीने वर्णिलें नाही. बंगाल्यांतील शालीचें, दक्षिणेंतील ताम्रपर्णीच्या कांठच्या मोत्यांच्या कारखान्यांचें वगैरे कवीने केलेलें वर्णन वस्तुस्थितीस अनुसरून आहे. त्यावरून स्वतः कवीने दूरदूरच्या प्रांतांत प्रवास केला असावा किंवा निदान चंद्रगुप्ताच्या साम्राज्यांत कामाच्या निमित्ताने दूरच्या प्रांतांत नेमलेल्या अधिकारी वर्गापासून व निरनिराळ्या देशांतून व्यापारानिमित्त येणाऱ्याजाणाऱ्या व्यापाऱ्यांपासून चौकसपणाने माहिती जमविली असावी. असो.

वर उल्लेखिलेल्या विषयांशिवाय कोश, छंद व अलंकार या विषयांवरच्या ग्रंथांचें कवीने अध्ययन केलें असलें पाहिजे हें सांगण्याची

Ep. Ind. Vol. XX p. 54.

जरूरी नाही. स्वत: काव्य करण्यापूर्वी कवीने पुरातन कवींच्या ग्रंथांचा अभ्यास करावा असें राजशेखराने म्हटलें आहे. कालिदासानेही आपल्या पूर्वीच्या व्यास-वाल्मीक्यादि महर्षींचे भारतरामायणादि ग्रंथ, कांही पुराणें, अश्वघोषादि कवींचीं काव्यें, भास-सौमिल्ल-कविपुत्रादि नाटककारांचीं नाटकें यांचा मार्मिक अभ्यास केला होता असें त्याच्या ग्रंथांतील प्रत्यक्षाप्रत्यक्ष पुराव्यावरून ह्मणता येतें. 'विक्रमोर्वशीया'तील (अ०४) 'राजा कालस्य कारणम्' ही म्हण,* 'रघुवंशा'तील (२,५३) 'क्षतात्त्रायते इति क्षत्रियः' ही क्षत्रिय शब्दाची व्युत्पत्ति, 'मालविकाग्निमित्रां'तील 'तिलक' पुष्पाच्या नांवावरील श्लेष वगैरे कल्पना त्याने महाभारतातून घेतल्या असाव्या. रामायणांतील वर्षा व हेमन्तऋतुवर्णनाची छाप त्याच्या 'ऋतुसंहारा'वर पडलेली स्पष्ट दिसते. 'रघुवंशा'तील राजांची वंशावळ त्याने प्राचीन पुराणग्रंथांतून घेतली असावी. अश्वघोषाचीं काव्यें त्याने वाचलीं होतीं हें मागेच आपण निश्चित केलें आहे. भासादि नाटककारांच्या ग्रंथांतून त्याने कांही कल्पना व प्रसंग आत्मसात् करून आपल्या प्रतिभेच्या भट्टीत त्यांना रमणीय रूप दिलें आहे हें पुढे एका प्रकरणांत दाखवूं.

मनुष्य कितीही विद्वान्, शास्त्रज्ञ व कलानिपुण असला तरी त्याचें चारित्र्य शुद्ध नसेल तर त्याच्या हातून उच्च प्रतीचें वाङ्मय निर्माण होणें शक्य नाही. 'कवीचा जसा स्वभाव तसें त्याचें काव्य; जसा चित्रकार तसें त्याचें चित्र असा सामान्य नियम आहे' असें जें राजशेखराने म्हटलें आहे (का०मी०अ. १०) तें अगदीं खरें आहे. कालिदासाच्या दुर्दैवाने त्याच्या चरित्राची विश्वसनीय माहिती लौकरच लुप्त झाली व तिच्या जागीं प्रसार पावलेल्या दंतकथांनी त्याच्या चरित्राचें अगदी विकृत स्वरूप लोकांपुढे मांडलें. तेव्हा राजशेखराच्या वरील नियमास अनुसरून कवीच्या ग्रंथांवरून त्याचा स्वभाव कसा असावा हें आपणांस अजमावावयाचें आहे.

कालिदासाचे एकंदर ग्रंथ लक्षांत घेतां तो मोठा रंगेल व विनोदी स्वभावाचा होता याविषयीं संशय रहात नाही. त्याच्या सर्व ग्रंथांत शृंगार

---

* मुनयोऽपि व्याहरन्ति राजा कालस्य कारणमिति।

† म. भा. उद्योगपर्व १३२, १६; शान्तिपर्व २९, १३८; वनपर्व १५८, ६८.

रसाला प्राधान्य आहे व म्हणन त्याला एका सुभाषितांत ,कवितादेवीचा विलास ' म्हणून वर्णिलें आहे. नाटकांतील विविध प्रसंग व विशेषत: विदूषकाचें पात्र निर्माण करण्यांत त्याचा विनोदी स्वभाव दृष्टीस पडतो. तो मोठा मोकळ्या मनाचा होता. कोणाबरोबरही सात पावलें चालले अथवा थोडें संभाषण केलें की मैत्री होते असें त्याने म्हटलें आहे (कुमार० ५,३९; रघु० २,५८). 'पुरुषांचें स्त्रियांवरचें प्रेम चंचल असेल पण त्यांचें मित्रप्रेम चिरस्थायि असतें,' (कुमार० ४,२८) या त्याच्या उक्तीवरून त्याच्या मित्रप्रेमाची कल्पना करतां येते. त्याचें हृदय अत्यंत कोमल होतें. दिवसा सूर्यप्रकाशाने निस्तेज झालेल्या चंद्राच्या कोरीकडे पाहून त्याला अत्यंत दु:ख होई (कुमार० ५, ४८). समाजांतील धीवरासारख्या हलक्या दर्जाच्या लोकांचींही चित्रें त्याने मोठ्या मार्मिकपणें रंगविलीं आहेत यावरून त्याची त्यांच्याविषयींची सहानुभूति व्यक्त होते. कोणत्याही व्यक्तीच्या स्वभावांतील मर्म हुडकून काढण्यांत त्याचा हातखंडा असावा, नाही तर 'शाकुंतला'तील घटकेंत पगडी फिरविणाऱ्या पोलीस शिपायाचें पात्र त्याच्या हातून निर्माण झालें नसतें. त्याला गुणांबद्दल आदर होता व्यक्तीबद्दल नव्हता, हें त्याच्या 'स्त्रीपुमानित्यनास्थैषा वृत्तं हि महितं सताम्,' (कुमार० ६, १२) या उक्तीवरून दिसून येईल. मनुष्यप्राण्यांप्रमाणेंच सृष्टींतील हरिणमयूरादि इतर प्राण्यांवर त्याचें निरतिशय प्रेम होतें. आपण त्यांच्यावर प्रेम केलें तर तेही आपणांशीं ममतेने वागतात हें त्याने 'शाकुंतला'च्या चौथ्या अंकांत दाखविलें आहे. त्याच्या बहुतेक नायिका लतावृक्षांवर अपत्यनिर्विशेष प्रेम करणाऱ्या आहेत व 'मेघदूता'त व इतरत्र त्याने अनेक वृक्षांचें, लतांचें व पुष्पांचें मनोहर वर्णन केलें आहे, त्यावरून त्याचें निसर्गप्रेम व स्वत:च्या निरीक्षणाने मिळविलेली बिनचूक माहिती दिसून येते.

कालिदासाचें कौटुंबिक वर्तन निरपवाद नव्हतें असा प्रवाद आहे, पण त्याला त्याच्या ग्रंथांत मुळीच आधार नाही. गृहस्थाश्रमाची 'सर्वोपकारक्षम,' (रघु० ५, १०) म्हणून त्याने थोरवी गाइली आहे 'पतिपत्नीप्रेम हें सार्वत्रिक आहे. भगवान् शंकरासारख्या असामान्य इन्द्रियनिग्रही योग्यावरही त्याने आपला पगडा बसविला, मग सामान्य जनांची काय कथा!' असें त्याने 'कुमारसंभवा'त (६, ९५) म्हटलें आहे. त्याच्या ग्रंथांत

स्त्रियांविषयीं अतिशय आदर दाखविला आहे. धार्मिक कृत्य करणें तर स्त्रियांवाचून मुळीच शक्य नाही (कुमार० ६,१३); विवाहसंबंध जुळवून आणण्यांत स्त्रिया फारच हुशार असतात (कुमार० ६,३२); 'कन्येच्या विवाहाच्या बाबतींत, पुरुष प्रायः स्त्रियांच्या मताने चालतात' (कुमार० ६,८५); 'पतिव्रता स्त्रियाही पतीच्या इच्छेविरुद्ध जात नाहीत' (कुमार० ६,८६) इत्यादि 'कुमारसंभवां'तील उक्तींनी कौटुम्बिकजीवन सुखकर होण्यास पतिपत्नींनी परस्परांच्या मतांस व इच्छेस मान देऊन वागावें असें कवीने सुचविलें आहे. त्याच्या सर्व नायिका प्रेमळ, सुस्वभावी, व ललितकलानिपुण आहेत. 'रघुवंशां'तील अजविलापांत आदर्श पत्नी कशी असते तें त्याने सुचविलें आहे. इन्दुमती ही अजाची गृहस्वामिनी, बिकट प्रसंगीं सल्ला देणारा मन्त्री, एकांतांतील सखी व ललितकलेंतील प्रिय शिष्या होती (रघु० ८, ६७) असें त्याने वर्णिलें आहे. 'कुमारसंभवां'तील 'प्रियेषु सौभाग्यफला हि चारुता' (५,१), 'स्त्रीणां प्रियालोकफलो हि वेषः' (७, २२) इत्यादि उक्तींवरून व 'मेघदूतां'तील विरहिणी यक्षपत्नीच्या वर्णनावरून पतिव्रता स्त्रीविषयीं कालिदासाचे काय विचार होते तें दिसून येतें. वेश्येच्या घरीं रात्रंदिवस लोळत पडणाऱ्या कवीच्या हातून इंदुमती, यक्षपत्नी, शकुन्तला व सीता या स्वाभिमानी, सुशील व प्रेमळ पतिव्रतांचीं शब्दचित्रें काढलीं जाणें अशक्य आहे.

कालिदासाचें प्रेमळ हृदय लहान मुलांच्या सहवासांत आनंदित होत असावें असें वाटतें. मुलाच्या योगाने पतिपत्नीचें परस्परांवरचें प्रेम कमी न होतां वृद्धिगत होत जातें (रघु० ३,२४), असें त्याने म्हटलें आहे. 'तपश्चर्या व दान यांनी मिळणारें पुण्य परलोकांतच उपयोगी पडतें पण शुद्धवंशांतील संतति इहपरलोकीं सुख देते' (रघु० १,६९), अशी मुलांची महती त्याने गाइली आहे. त्याच्या ग्रंथांत अनेक ठिकाणीं लहान मुलांचीं सुंदर वर्णनें आलीं आहेत. 'लहानगा रघु दाईने सांगितल्याप्रमाणें बोबडे बोल बोले, तिचा हात धरून सभेंत येई, तिने शिकविल्याप्रमाणें नमस्कार करी व अशा रीतीने आपल्या पित्याचा आनंद वृद्धिगत करी,' असें मोठें मनोहर वर्णन त्याने 'रघुवंशां'त (३,२५) घातलें आहे व त्याच्या

यथार्थत्वामुळें स्वभावोक्तीचें उत्कृष्ट उदाहरण म्हणून तें 'साहित्यदर्पणां'त उद्धृत केलें आहे. 'शाकुंतलां'तही (७,१७) 'ज्याच्या दांतांच्या कळ्या नुकत्याच दिसूं लागल्या आहेत, कांही कारण नसतांच जीं हसत असतात, ज्यांचे बोल अस्पष्ट पण रमणीय असतात, अशा मुलांना मांडीवर घेऊन त्यांच्या धुळीने माखलेल्या अंगाने ज्यांचीं वस्त्रें मलिन होतात ते धन्य होत !' असें सुंदर वर्णन आलें आहे. स्वतःचें मूल दृष्टीस पडतांच तें आपलें असें माहीत नसतांही पुरूरवा व दुष्यन्त यांच्या मनांत अपत्य-स्नेहाचा उमाळा आला असें त्याने आपल्या नाटकांत दाखविलें आहे; त्यावरून अपत्यप्रेम ही मनुष्याच्या स्वभावांतील एक नैसर्गिक कोमल भावना आहे हा भाव त्याने व्यक्त केला आहे. मनुष्यांच्या जीवनांत अत्यंत कारुण्योत्पादक असे प्रसंग येतात त्यांमध्यें कन्येला पतिगृही पाठविण्याच्या प्रसंगाची गणना करण्यांत येते. अशा वेळीं तिच्या पित्याच्या हृदयांत जी कालवाकालव सुरू होते तिचें हृदयस्पर्शी शब्दचित्र त्याने 'शाकुंतला'च्या चौथ्या अंकांत काढलें आहे. कण्वासारख्या प्रेमळ पित्याचें शब्दचित्र रंगविणाऱ्या कालिदासाला अपत्यप्रेमाची जाणीव नव्हती असें कोणता सहृदय वाचक म्हणेल ?

कालिदासाला द्वितीय चन्द्रगुप्तासारख्या सार्वभौम राजाचा उदार आश्रय होता व त्याच्या आयुष्याचा उत्तरभाग राजदरबारीं गेला होता, हें आपण पाहिलेंच आहे. राजसभेंत नेहमी असणाऱ्या कवीच्या दृष्टींतून तेथील चालीरीती, राजेलोकांच्या आवडीनिवडी, प्रसंग पडेल त्याप्रमाणें सेवकांस मान देऊन त्यांच्याकडून काम करून घेण्याची त्यांची सवय ह्या गोष्टी निसटणें शक्य नाही. या दृष्टीने 'कुमारसंभवा'च्या तिसऱ्या सर्गांतील इंद्राच्या दरबारचें वर्णन वाचण्यासारखें आहे. 'प्रयोजन पडेल त्याप्रमाणें आश्रितांवर राजेलोकांचें प्रेम कमी जास्त होत असतें' (कुमार० ३,१) 'चतुर लोक प्रभूला योग्य वेळीं प्रार्थना करून आपलें कार्य करून घेतात' (कुमार० ७,९३) इत्यादि उक्ति स्वानुभवाने किंवा मार्मिक निरीक्षणाने कवीला सुचलेल्या दिसतात. भगवान् शंकर विवाहार्थ निघाले त्या वेळीं त्यांनी जवळच असलेल्या गणानें समोर धरलेल्या तरवारींत आपलें रूप पाहिलें, त्यांच्यावर सूर्याने छत्र धरलें, प्रथम

ब्रह्मदेव व नंतर विष्णु यांनी त्यांचा जयजयकार केला, नंतर आपणास दर्शन करवावें म्हणून इन्द्रादि देवांनी नन्दीला खूण केली व त्याने त्यांना शिवापुढे नेलें. त्यांनी अत्यंत विनीत होऊन नमस्कार केला, शंकरांनीही शिरःकम्पाने ब्रह्मदेवाचा, चार शब्द बोलून विष्णूचा, स्मित करून इंद्राचा व दृष्टिक्षेपाने इतर सर्व देवांचा सन्मान केला, असें कवीने 'कुमारसंभवां'त (७,३६-४६) वर्णिलें आहे. त्यांत राजदरबारीं दिसून येणारा पौर्वापर्यक्रम, ज्याची जशी योग्यता असेल तसा त्याला मिळणारा मान वगैरे गोष्टी स्पष्ट दिसून येतात. राजदरबारी असल्यामुळें कालिदासाच्या वाणीत सभ्यता व रुबाब दिसून येतो. 'विक्रमोर्वशीयां'त उर्वशीला परत स्वर्गांत जाण्याकरितां राजाला विचारावयाचें आहे, तेव्हा ती चित्रलेखामुखाने 'महाराजांनी परवानगी दिली तर माझ्या प्रिय मैत्रिणीसारखी महाराजांची कीर्ति मी स्वर्गास नेऊं इच्छितें' अशी राजास विनंती करते. 'शाकुंतलां'त 'महाराजांच्या मधुर भाषणाने मला धीर वाटतो, म्हणून आपणास विचारतें की महाराजांनी कोणत्या राजर्षीचा वंश अलंकृत केला आहे, कोणत्या देशांतील लोकांस स्वविरहाने उत्कंठित केलें आहे व कोणत्या कारणाने आपल्या अतिशय सुकुमार देहाला या तपोवनांत येण्याचे क्लेश दिले आहेत?' असें प्रियंवदा दुष्यंतास म्हणते. या भाषणांत कालिदासाचें राजसभोचित शिष्टसंप्रदायाचें ज्ञान उत्कृष्ट रीतीने व्यक्त झालें आहे

कालिदास जाडा विद्वान् होता तरी अतिशय विनीत होता. 'मालविकाग्निमित्र' व 'विक्रमोर्वशीय' हीं नाटकें आणि 'मेघदूत', 'कुमारसंभवा'दि काव्यें लिहिल्यावर कोणालाही आपल्या कृतीबद्दल गर्व झाला असता. त्याच्यापेक्षा कमी सरस ग्रंथनिष्पत्ति करणाऱ्या जगन्नाथ पंडिताच्या दर्पोक्ति प्रसिद्धच आहेत. पण 'शाकुंतला'सारखें अद्वितीय नाटक व 'रघुवंशा'सारखें विविध रसांनी ओथंबलेलें अप्रतिम महाकाव्य विद्वत्परिषदेपुढे ठेवतांना कवीने कोण शालीनता दाखविली आहे! कालिदास विनीत असला तरी एखाद्या राजाश्रयलोलुप लाळघोट्या पण्डिताप्रमाणें स्वाभिमानशून्य नव्हता; नाही तर त्याच्या तोंडून मार्गे दिलेली 'इह निवसति मेरुः' इत्यादि उक्ति निघाली नसती आणि स्वाभिमानी शकुन्तला व सीता

यांचीं शब्दचित्रें त्याच्या लेखणींतून बाहेर पडलीं नसतीं. अशा या विद्वान् कलाभिज्ञ, प्रेमळ, विनोदी, चतुर व स्वाभिमानी पुरुषश्रेष्ठाच्या चरित्राचा दंतकथांनी विपर्यास करावा व तो परपराभिमान्यानी आज शेंकडो वर्षें मान्य करावा हा केवळ दैवदुर्विलास होय !

कालिदासाची राहणी कशा प्रकारची होती व त्याच्या जीविताचा दैनंदिन क्रम कोणत्या प्रकारचा होता हें समजण्यास विश्वसनीय साधन उपलब्ध नाही. तथापि राजशेखराच्या 'काव्यमीमांसे'त (अ० १०) आदर्श कवीचें जीवनवृत्त कशा प्रकारचें असावें याचे वर्णन आलें आहे, नें काल्पनिक असलें तरी वस्तुस्थितीशीं फारसें विसंगत नसावें असें वाटतें, म्हणून येथे दिलें आहे—" कवीने नेहेमी शुचि असावें. शौच तीन प्रकारचें असतें. वाक्-शौच, मनःशौच व कायशौच. यांपैकी पहिले दोन प्रकार शास्त्राभ्यासाने उपन्न होतात. कायशौचांत पायांचीं नखें काढणें, मुखांत ताम्बूल असणें, शरीराला सुगन्धिद्रव्याचा किंचित् लेप असणें, उंची पण भपकेदार नसलेलें वस्त्र धारण करणें, डोक्यांत पुष्पें घालणें यांचा अंतर्भाव होतो. शुद्ध वर्तन हें सरस्वतीचें आकर्षक असतें. कवीचें घर संमार्जनाने स्वच्छ केलेलें असावें. त्यांत साही ऋतूंस योग्य अशीं निरनिराळीं स्थानें असावीं. जवळपास वृक्षवाटिका, क्रीडापर्वत, वापी, पुष्करिणी, पाटकालवे, मोर, हरिण इत्यादि पशु, सारस, चक्रवाक, हंस, चकोर, क्रौंच, शुकसारिकादि पक्षी, उन्हाचा ताप निवारण करण्याकरितां धारागृह, लतामण्डप इत्यादि साधनें व झोंके घेण्यास झोपाळा असावा. काव्य करून थकलेल्या मनाला विसांवा मिळण्यासाठी तेथे परिजनांचा कलकलाट नसावा. त्याचे परिचारक अपभ्रंशभाषाप्रवीण, दासी मागधभाषाभिनिवेशी, अन्तःपुरांतील सेवक प्राकृतसंस्कृतभाषाभिज्ञ व मित्र सर्वभाषावेत्ते असावे. त्याचा लेखक सर्व भाषाकुशल, शीघ्रवाक्, हस्ताक्षर उत्तम असलेला, खूणा जाणणारा, नानालिपिज्ञ व स्वतः काव्य करण्यास शिकलेला असावा. रात्रीं बेरात्रीं असा मनुष्य जवळ नसल्यास यांपैकी कांही गुण असलेला मनुष्य असला तरी चालेल. ठराविक वेळ नेमून न दिल्यास कामें होत नाहीत; म्हणून कवीने दिवस रात्रीचे प्रहराप्रहराचे आठ भाग करावे. सकाळीं उठून संध्यावंदन केल्यावर सारस्वतसूक्ताचा त्याने जप करावा. नंतर विद्यागृहांत सुखासीन होऊन काव्याला

उपयुक्त अशा विद्योपविद्याचें प्रहरभर अध्ययन करावें; कारण पुनः पुनः वाचन करण्यासारखें प्रतिभोत्पत्तीचें दुसरें साधन नाही. दुसऱ्या प्रहरी काव्य रचावें. मध्यान्हाच्या सुमारास स्नान करून भोजन करावें. भोजनानंतर मित्रांची काव्यसभा भरवावी. तींत समस्यापूर्ति, मातृकाभ्यास, चित्रबंध वगैरेंचा अभ्यास करावा. चौथ्या प्रहरी पूर्वाह्णीं केलेल्या काव्याचें स्वतः एकटयाने किंवा कांही थोडया मित्रांबरोबर परीक्षण करावें. रचनेच्या ओघात विवेचक दृष्टि रहात नाही, म्हणून अशा तऱ्हेचे परीक्षण आवश्यक आहे. त्या वेळी अधिक असेल तें गाळावें; न्यून असेल तें रचावें; जेथे रचना योग्य झाली नसेल तेथे बदलावी; कांही विसरले असेल तर आठवावें. सायंकाळीं संध्यावंदन व सरस्वतीची उपासना करावी. रात्रीं परीक्षण केलेला भाग स्वच्छ लिहून ठेवावा. पुढे दोन प्रहर झोंप घ्यावी. चांगल्या निद्रेने आरोग्य चांगले राहतें. चौथ्या प्रहरी प्रयत्नाने उठावें. कारण ब्राह्ममुहूर्तीं मन प्रसन्न असतें व निरनिराळे विषय दृष्टीपुढे येतात." राजशेखराच्या वरील वर्णनांत कांही ठिकाणी अतिशयोक्ति दिसते; तथापि विक्रमादित्यासारख्या दानशूर सार्वभौम नृपतीचा उदार आश्रय असलेल्या कालिदासाची राहणी वरील प्रकारची असणे अगदीच असंभवनीय वाटत नाही.

कालिदासाचें आयुर्मान किती होतें याविषयीं कोठे निश्चित माहिती मिळत नाही. तथापि याही बाबतीत अनुमान करण्यास जागा आहे. कालिदासाच्या सर्व ग्रंथांत 'ऋतुसंहार' व 'मालविकाग्निमित्र' हे आरंभीं व 'रघुवंश' हा शेवटी लिहिला असावा. 'रघुवंशा'च्या अठराव्या सर्गांत आपल्या सहाव्या वर्षी गादीवर आलेल्या सुदर्शन नामक बालराजाच्या सुंदर काव्यमय वर्णनास कालिदासाने पंधरा श्लोक घातले आहेत. 'रघुवंशां'तील शेवटल्या राजांचा अनुक्रम विष्णुपुराणांतील वंशावलीशीं बराच जुळतो. तथापि त्या किंवा इतरही उपलब्ध पुराणांत सुदर्शन बालवयांत गादीवर आला होता, असा उल्लेख आढळत नाही. तेव्हा हें वर्णन कवीला प्रत्यक्ष दृश्यावरून सुचलें असावें. अजंठ्याच्या एका लेखांत वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेनाचा पुत्र आठ वर्षांचा असतां गादीवर आला व त्याने उत्तम प्रकारें राज्य केलें

असा उल्लेख आहे.* त्या काळीं कालिदास विदर्भांत असावा. या बालराजाचा काल बॅ. जयस्वालनी इ. स. ४३५–४७० हा ठरविला आहे. 'मालविकाग्निमित्र' इ. स. ३९५ च्या सुमारास प्रथम रंगभूमीवर आलें असें आम्ही पुढे दाखविलें आहे. त्या वेळीं कालिदास अगदी तरुण म्हणजे वीस पंचवीस वर्षांचा असावा. तेव्हा वर उल्लेखिलेल्या बालराजाच्या राज्यारोहणप्रसंगीं त्याचें वय साठ पासष्ट वर्षांचें असावें असें वाटतें. यानंतर थोडयाच काळाने त्याचें देहावसान झालें असावें; कारण 'रघुवंशा'चा यापुढील एकच सर्ग उपलब्ध आहे. संस्कृत ललितवाङ्मयांत कालिदासाच्या इतकी विपुल ग्रंथरचना राजशेखराखेरीज दुसऱ्या कोणाही कवीची नाही. त्यामुळेंवर अनुमित केलेलें कालिदासाचें आयुर्मान असंभवनीय वाटत नाही.

प्रकरण पांचवें

कालिदासाचीं काव्यें

क इह रघुकारे न रमते।

सुभाषित

उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीमुळें एखाद्या ग्रंथकाराचें नांव एकदा प्रसिद्ध झालें म्हणजे त्याच्या नांवावर अनेक ग्रंथ खपूं लागतात. विशेषत: प्राचीन काळीं स्वत:च्या प्रसिद्धीपेक्षा आपल्या ग्रंथांचा प्रसार जनतेंत सर्वत्र व्हावा अशी ग्रंथकारांची इच्छा असल्यामुळें अगदी साधारण प्रतीचे ग्रंथही उत्कृष्ट ग्रंथकाराच्या माथीं मारलेले दिसून येतात. कित्येक वेळीं एकाच नांवाचे अनेक ग्रंथकार निरनिराळ्या काळीं होऊन गेलेले असतात, पण

---

* Burgess and Bhagavanlal Indraji : *Inscription in Ajanta Cave XVI* (*A. S. W. I.*) वरील दोन राजांच्या वयांत दोन वर्षांचा फरक आहे हें खरें, पण तो कालिदासाने मुद्दाम केला असावा. रसोत्कर्षाकरितां ऐतिहासिक कथानकांतही कालिदासाने असा फरक केला आहे असें आनंदवर्धनाने ट म्हटलें आहे. (ध्वन्यालोक पृ. १४८)

कालाच्या प्रचंड ओघांत त्यांचे वैयक्तिक भेद नष्ट होऊन ते आपल्यापैकी एका विशेष प्रसिद्ध अशा व्यक्तीमध्यें लय पावतात असेंही दिसून येतें. कालिदासाच्या बाबतीतही असेंच कांही झाले असलें पाहिजे. ऑफ्रेक्ट् साहेबांनी आपल्या 'बृहत्संस्कृतग्रंथसूची'त कालिदासाच्या नांवावर तीस पस्तीस ग्रंथ दिले आहेत. त्यांमध्यें काव्यनाटकांबरोबर ज्योतिष, रत्नपरीक्षा, देवतास्तुति वगैरे विविध विषयांवरचे ग्रंथ आढळतात. यांपैकी बहुतेक ग्रंथ कालिदासाच्या नांवावर दडपलेले किंवा एखाद्या उत्तरकालीन कालिदास नामक कवीने रचलेले असावे. उदाहरणार्थ, 'नलोदय' हें काव्य घ्या. कवीने या काव्यांत यमकादि शब्दालंकारांचा अतिरेक केला आहे व त्यामुळें बहुतेक ठिकाणीं अर्थ अगदी दुर्बोध झाला आहे. 'रघुवंशा'दि काव्यांत कालिदासाचें शब्दालंकारांकडे विशेष लक्ष दिसत नाही. त्यामुळें हा ग्रंथ सकृद्दर्शनींच कालिदासाचा नसावा अशी शंका येत होती व आता ग्रंथाच्या अंतःपरीक्षणावरून तो ख्रिस्तोत्तर दहाव्या शतकांत होऊन गेलेल्या वासुदेव नामक कवीने रचला असें सिद्ध झालें आहे.* अशा ग्रंथांचा आपणांस येथे विचार करावयाचा नाही.

'ऋतुसंहार', 'मालविकाग्निमित्र', 'कुमारसंभव', 'विक्रमोर्वशीय', 'मेघदूत', 'कुन्तलेश्वरदौत्य', 'शाकुंतल' व 'रघुवंश' हे आठ ग्रंथ मात्र कालिदासाने रचले असावे असें आपणांस निश्चयाने म्हणतां येतें. याशिवाय 'सेतुबन्ध' किंवा 'रावणवहो' या प्रवरसेनाच्या नांवावर प्रसिद्ध असलेल्या प्राकृत काव्यांतही कालिदासाचा हात असावा असें मागें पहिल्या प्रकरणांत आपण अनुमान केलें आहे. वरील नऊ ग्रंथांपैकी 'कुन्तलेश्वरदौत्य'खेरीज बाकीचे ग्रंथ आज उपलब्ध आहेत. 'कुन्तलेश्वरदौत्य' कालिदासाचेंच याबद्दल क्षेमेन्द्राच्या 'औचित्यविचारचर्चे'त (पृ०१३९) स्पष्ट विधान आहे. राजशेखराची 'काव्यमीमांसा', 'शृंगारप्रकाश' वगैरे ग्रंथांत त्यांतील उतारे आले आहेत, त्यांवरून तें एक नाटक असावें असें दिसतें. बाकीच्या संस्कृत ग्रंथांत 'ऋतुसंहार', 'कुमारसंभव', 'मेघदूत' व 'रघुवंश' हीं काव्यें व 'मालविकाग्नि मित्र', 'विक्रमोर्वशीय' व 'शाकुंतल' हीं नाटकें आहेत. हे आठ ग्रंथ

*A. S. R. Aiyar: *Authorship of the Nalodaya*, J. R. A. S. for 1925 p. 263.

वर दिलेल्या क्रमानेच कवीने लिहिले असावे असें पुढे दाखविलें आहे. या प्रकरणांत कालिदासाच्या काव्यांचें व पुढील प्रकरणांत त्याच्या नाटकांचें विवेचन करूं.

कालिदासाच्या काव्यांचें समालोचन करण्यापूर्वी तत्पूर्वकालीन कवींच्या ग्रंथांचें सिंहावलोकन करणें आवश्यक आहे. आपल्या अत्यंत प्राचीन संस्कृत काव्यांचा पूर्ण लोप झाला असला तरी काव्यकलेचा उगम वैदिक कालापर्यंत नेऊन भिडवितां येतो. ऋग्वेदांतील उषादेवतेची विविध अलंकारांनी नटलेलीं सुंदर वर्णनें ज्यांनी रचलीं, वरुणदेवाच्या सूक्तांत ज्यांनी आपल्या हृदयांतील कालवाकालव व्यक्त करून करुणा भाकली, ज्यांचीं दाशराज्ञ सूक्तासारखीं युद्धांचीं वर्णनें अद्यापि ऋग्वेदांत अवशिष्ट आहेत, त्या आद्य ऋषिवर्यांना शृंगार, करुण व वीररसात्मक काव्यें करतां येत नव्हतीं असें म्हणणें शक्य नाही. तथापि वर सांगितल्याप्रमाणें हीं सर्व काव्यें आता नामशेषही राहिलीं नाहीत. उपलब्ध ग्रंथांत आदिकाव्याचा मान 'रामायणा'सच दिला पाहिजे. 'रामायणां'तील रामाची पितृभक्ति, भरताचें भ्रातृप्रेम वगैरे गोष्टी अत्यंत हृदयस्पर्शी असून त्या काव्यांतील विविध प्रसंग कवीनें कुशल हातानें रेखाटले आहेत. यांतील विविध कल्पना, शब्दप्रयोग व उपमादि अलंकार लुटून अश्वघोषकालिदासादि कवींनी आपलीं काव्यें सजविलीं आहेत. उदाहरणार्थ, 'बुद्धचरित' काव्यांतील बुद्धाच्या अंतःपुरांतील निद्रित स्त्रियांचें वर्णन कवीला रामायणांतील हनुमानाने लंकेंत पाहिलेल्या तत्सदृश दृश्याच्या वर्णनावरून सुचलें असावें. इतर महाकाव्यांप्रमाणें यांतही वृत्तवैचित्र्य साधलें आहे. असो.

पण 'रामायण' किती झालें तरी धार्मिक बुद्धीने रचलेलें महाकाव्य. तेव्हा लौकिक दृष्टीने रचलेल्या प्राचीन काव्यांचे उल्लेख कोठे सांपडतात काय हें पाहिलें पाहिजे. असे उल्लेख प्रथम पतंजलीच्या 'महाभाष्यां'त व्याकरणाच्या नियमांचीं उदाहरणें म्हणून आलेले आहेत. पतंजलीचा काल ख्रिस्तपूर्व द्वितीय शतकाचा मध्य हा आता निश्चित झाला आहे त्यामुळें त्यांचें विशेष महत्त्व आहे. 'वरतनु संप्रवदन्ति कुक्कुटाः', 'प्रियां मयूर प्रतिनर्नृतीति,' 'प्रथते त्वया पतिमती पृथिवी' इत्यादि 'महाभाष्यां'त प्रसंग-

वशात् आलेल्या उदाहरणांवरून पतंजलीच्या काळीं विविधवृत्तांत रचलेलें अलंकारादिकांनी युक्त असें बरेंचसें काव्यवाङ्मय अस्तित्वांत होतें याविषयीं संशय राहत नाही. यानंतरच्या काळांतही काव्यनिर्मिति चालू राहिली होती हें कोरीव लेखांवरून दिसून येतें. उदाहरणार्थ, काठेवाडांतील जुनागढ शहराजवळील क्षत्रप रुद्रदामन्च्या संस्कृत शिलालेखाच्या लेखकास काव्यकलेच्या सर्व अंगांचा परिचय होता, असें त्या लेखावरून स्पष्ट दिसतें.

पण हे लेख आलंकारिक भाषेंत व काव्यदृष्टीने लिहिले असले तरी गद्यांत आहेत. कालिदासाला ज्यांच्या ग्रंथांपासून स्फूर्ति मिळाली असेल अशा तत्पूर्वकालीन कवींचीं बहुतेक काव्यें विशाल कालोदरांत गडप झालीं आहेत. तथापि सुदैवाने त्यांपैकी एका कवीचे–अश्वघोषाचे–ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यावरून तत्कालीन काव्यरचनेची कल्पना करतां येते. अश्वघोष हा जातीने ब्राह्मण असून मूळचा अयोध्येचा राहणारा. त्याच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून त्याने उपनिषदें, भगवद्गीता व सांख्यादि दर्शनें यांचा चांगला अभ्यास केला होता असें दिसतें. पुढे त्याने बौद्धधर्माचा स्वीकार केला. संस्कृत वाङ्मयांत अश्वघोषाचें नांव त्याच्या 'सौंदरनंद' व 'बुद्धचरित' या काव्यांनी चिरकाल राहील. यांपैकी पहिल्या काव्याचे अठरा सर्ग आहेत व त्यांत गौतमबुद्धाने नंद नामक आपल्या सावत्र भावास बौद्धधर्माची दीक्षा दिली त्या प्रसंगाचें सविस्तर वर्णन आलें आहे. 'बुद्धचरिता'चे सतरा सर्ग आहेत पण त्यांपैकी पहिले तेराच अश्वघोषाचे असून बाकीचे गेल्या शतकांत अमृतानंद नामक कवीने रचले असा त्यांत स्पष्ट उल्लेख आहे. पहिल्या तेरा सर्गांत गौतमबुद्धाच्या जन्मापासून मारविजयापर्यंतची कथा आली आहे.

'सौंदरनंद' काव्याच्या शेवटीं कवीनें हें काव्य आपण आनंदप्राप्तीकरितां लिहिलें नसून विषयोपभोगमग्न लोकांचें लक्ष बौद्धधर्मांत उपदेशिलेल्या मोक्षमार्गाकडे लागावें म्हणून रचलें आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. अश्वघोष स्वतः मोठा प्रतिभावान् कवि होता. शिवाय त्याने रामायणादि पूर्वकालीन काव्यांचा चांगला अभ्यास केला होता, म्हणून त्याचीं हीं दोन्ही काव्यें सरस वठलीं आहेत. त्याची भाषा साधी पण अव्याजमनोहर आहे. त्याने बुद्ध व नंद यांच्या चरित्रांतील वेचक काव्यमय प्रसंग घेऊन

त्यांना उपमादि अलंकारांनी भूषविलें आहे. नंदाने भिक्षु होण्याचा निश्चय केल्याचें समजल्यावर सुंदरीने केलेला शोक, गौतम उद्यानांत जातांना पौरस्त्रियांची उडालेली धांदल, ज्या रात्रीं तो आपलें घर सोडून निघाला त्या रात्रीं त्याने पाहिलेलें स्त्रियांचें किळसवाणें स्वरूप, गौतमाला वनांत पोचवून छंदक एकटाच कपिलवास्तूला आला त्यावेळीं पौरजनांस झालेलें दुःख, वगैरे प्रसग कवीच्या अप्रतिम वर्णनशैलीने वाचकांच्या मनश्चक्षूंपुढे हुबेहूब उभे राहतात. मागें पहिल्या प्रकरणांत अश्वघोष व कालिदास यांच्या काव्यांतील कांही समान कल्पनांचीं स्थळें दिलीं आहेत त्यांवरून कालिदासाने अश्वघोषाच्या काव्यांचा चांगलाच अभ्यास केलेला दिसून येईल. या अभ्यासामुळें रमणीय कल्पना व शब्दसमूह याप्रमाणेंच अश्वघोषाच्या कांही विशिष्ट लकबाही कालिदासाच्या काव्यांत आलेल्या दिसतात. उदाहरणार्थ—

बभूव स हि संवेगः श्रेयसस्तस्य वृद्धये ।
धातोरधिरिवाख्याते पठितोऽक्षरचिन्तकैः ॥ सौंदरनंद १२,९.

यासारख्या व्याकरणविषयक उपमा, 'यथाऽदेवं दिवि देवसंघा दिव्यैर्विशेषैर्महयाञ्चक्रुः ।' व 'कार्यस्य कृत्वा हि विवेकमादौ सुखोधिगन्तुं मनसो विवेकः' यासारखे कांटेतोलपणें पाहिले असतां अपाणिनीय प्रयोग यांचें कालिदासाच्या काव्यांत सहजगत्या अनुकरण झालेलें दृष्टीस पडतें.* पण कालिदास स्वतः जास्त काळजीपूर्वक व निर्दोष रचना करणारा कलाभिज्ञ असल्यामुळें त्याने अश्वघोषाच्या ग्रंथांतील अनेक दोष टाळले आहेत. उदाहरणार्थ, अकार्ष्टाम्, अवर्धिष्ट यांसारखे श्रुतिकटू शब्दप्रयोग, 'नृपोपविश्य' यासारख्या संधीच्या व 'गृहयं', 'विवर्धयित्वा', 'परिपालयित्वा' यांसारख्या धातुसाधितांच्या चुका, भट्टिकाव्यांतल्याप्रमाणें 'अवर्धिष्ट' 'अवृधत्' इत्यादि तृतीय भूतकाळच्या वैकल्पिक क्रियापदरूपांच्या प्रयोगाचा अतिरेक वगैरे गोष्टी त्याने दोषार्ह म्हणून काळजीपूर्वक टाळलेल्या दिसतात. अश्वघोषाच्या काव्यांतील यथासंख्य, पादान्त यमक वगैरेसारखे विशेष रमणीय नसलेले किंवा कृत्रिम

* रघु० १५, ९; ९, ६१; ४, ३ पहा.

दिसणारे अलंकार, कांही पठनास अवघड असलेलीं वृत्तें, हीही कवीने बुद्धिपुरःसर योजिली नसावीं. एकंदरीत मधुकरवृत्तीने अश्वघोषाच्या काव्यातून सुदर तेवढाच भाग घेऊन कालिदासानें आपले ग्रथ रचले असें म्हणण्यास हरकत नाही.

अश्वघोषानंतरच्या काळांत त्याच्यापेक्षा सरस काव्यें निर्माण करणारे कवि निर्माण झाले असावे, पण त्यांचीं काव्यें आज उपलब्ध नाहीत. तथापि कालिदासापूर्वी किती निर्दोष व सरस काव्यनिष्पत्ति होत असे याची कल्पना येण्यासाठी हरिषेणाच्या प्रयाग येथील शिलास्तम्भावर कोरलेल्या प्रशस्तीतून* एक उतारा घेऊं. दुसऱ्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ही प्रशस्ति चम्पूकाव्याचा उत्कृष्ट नमुना आहे. तिचा प्रथमार्ध पद्यांत असून द्वितीयार्ध बहुतेक गद्यांत आहे. गद्यभागांत आलंकारिकांच्या नियमाप्रमाणें समासप्राचुर्य असलें तरी अनुप्रास, उपमा, श्लेष इत्यादि अलंकारांचा परिमित उपयोग व शब्दांचें नादमाधुर्य यांनी त्याला फार रमणीयत्व आलें आहे. पण या भागापेक्षा त्याचीं पद्यें उत्कृष्ट असावीं. शिलास्तम्भाचा पृष्ठभाग खराब झाल्यामुळें प्रशस्तीचा प्रथमार्ध ठिकठिकाणीं खंडित झाला आहे; तथापि खालील एकाच श्लोकावरून हरिषेणाच्या काव्यकलेची कल्पना करतां येईल—

आर्यो ह्रीत्युपगुह्य भावपिशुनैरुत्कर्णितै रोमभि :।
सभ्येषूच्छ्वसितेषु तुल्यकुलजम्लाननोद्वीक्षितः।
स्नेहव्याकुलितेन बाष्पगुरुणा तत्त्वेक्षिणा चक्षुषा
यः पित्राभिहितो निरीक्ष्य निखिलां पाह्येवमुर्वीमिति॥

या श्लोकांत आपल्या वृद्धपणीं पहिल्या चन्द्रगुप्ताने समुद्रगुप्तास आपला उत्तराधिकारी नेमलें त्या प्रसंगाचें हृदयंगम वर्णन आलें आहे. या श्लोकाची स्तुति डॉ. बुल्हरने पुढे लिहिल्याप्रमाणें मुक्तकंठाने केली आहे–" या प्रसंगाचें यापेक्षा थोडक्यांत व अधिक हुबेहूबपणाने चित्र काढणें शक्य नाही. यांत एकही शब्द अधिक नाही. हा श्लोक वाचतांना वृद्ध चंद्रगुप्ताच्या राजसभेंतील दृश्य आपल्या डोळ्यांसमोर

* Fleet : *Gupta Inscriptions*, No. 1

उभें राहतें. आपल्यालाच गादी मिळावी अशी अपेक्षा असलेले त्याचे पुत्र एकीकडे बसले आहेत, तर दुसरीकडे राजा कोणा अयोग्य माणसाची निवड तर करणार नाहीना अशी भीति वाटणारे सभासद त्याच्या निकालाची वाट पाहत आहेत ! अशा प्रसंगीं 'हाच योग्य पुरुष आहे' असें बोलून रोमांचित शरीराने राजाने समुद्रगुप्तास आलिंगन दिलें व प्रेमामुळें अश्रुपूर्ण झालेल्या अशा तत्त्वेक्षी दृष्टीने त्याच्याकडे पाहून त्याला म्हटलें 'हया सर्व पृथ्वीचें पालन कर.' हे राजाचे शब्द ऐकतांच इतर राजकुमारांचीं मुखें म्लान झालीं, पण सभासदांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. हें पद्य थोडक्यांत शब्दचित्र काढणाऱ्या भारतीयांच्या कलेचें एक उत्कृष्ट उदाहरण आहे." अशा काव्यनिर्मितीनंतर कालिदासाच्या 'मेघदूता'सारखीं सर्वांगसुंदर काव्यें निर्माण झालीं तर त्यांत आश्चर्य वाटावयास नको.

ऋतुसंहार

कालिदासाच्या सर्व काव्यांत 'ऋतुसंहार' हें जरा कमी प्रतीचें गणलें जातें त्यावरून तें कालिदासकृत असेल काय असा विद्वानांस संशय येत होता. पण तो अस्थानी होता असें अनेक प्रमाणांनी दाखवितां येतें. या काव्यांतील दोन श्लोक (६, १७ व २०) वल्लभदेवाच्या 'सुभाषितावली'त कालिदासाचे म्हणून दिले आहेत. मागें पहिल्या प्रकरणांत इ. स. ४७३ च्या मंदोसर येथील प्रशस्तीत वत्सभट्टीने 'ऋतुसंहारा'तील कांही श्लोकांचें अनुकरण केलेलें दाखविलें आहे. त्यावरूनही हें काव्य इ. स. च्या पांचव्या शतकाइतकें प्राचीन आहे यांत संशय रहात नाही. शिवाय कालिदासाला ऋतुवर्णनाची मोठी आवड होती असें दिसतें. त्याच्या बहुतेक ग्रंथांत एकाना एका ऋतूचें वर्णन आलें आहे. 'कुमारसंभवां'त वसन्ताचें, 'विक्रमोर्वशीय' व 'मेघदूत' यांत वर्षर्तूचें, 'शाकुंतलां'त ग्रीष्माचें व 'रघुवंशां'त प्रायः सर्वच ऋतंचें वणन कवीने केलें आहे. सरस्वती देवीच्या उपासनेला आरंभ करतांना निसर्गवर्णनाशिवाय दुसरा उचित व सोपा विषय कोणता असणार ? यांत एखाद्या कथानकाचा संबंध येत नसल्यामुळ स्फूर्ति येईल तेव्हा व सवडीप्रमाणें श्लोक रचून ते मागाहून एकत्र गुंफतां येतात. हाच विषय कवीने प्रथम

घेण्याचें दुसरेंही एक कारण संभवतें. मागें दुसऱ्या प्रकणांत सांगितल्याप्रमाणें इ. स च्या दुसऱ्या तिसऱ्या शतकांत कुशानसाम्राज्यामुळें हिंदुस्थानाचा पूर्व व पश्चिम देशांशीं व्यापार वाढून संपत्तीचा ओघ देशांत वाहूं लागला. ऐश्वर्याबरोबर चैनही आलीच. त्यामुळें मध्यमवर्गांतील लोकांची राहणी सुधारून त्यांचें ललितकलांकडे अधिक लक्ष जाऊं लागलें. त्या काळीं नगरांत राहणाऱ्या विलासी व कलाभिज्ञ नागरकांचें वात्स्यायनाच्या 'कामसूत्रां'त वर्णन आलें आहे, त्यावरून त्यांचें ललितकलांस व वाङ्मयास कसें उत्तेजन मिळे हें दिसून येतें. प्रत्येक नागरकाच्या घरीं त्याच्या खास दिवाणखान्यांत एका उंच टेबलावर केशरचनेला लागणारें सामान, पुष्पमाला, ताम्बूल, अत्तरें वगैरे ठेविलेलीं असत. भितींतील फळयांवर वीणा, चित्रकर्माला उपयुक्त असे रंग, ब्रश वगैरे सामान व त्याच्या जवळ एखादें काव्यही दृष्टीस पडे. सायंकाळीं चांगला पोषाक करून नागरक 'गोष्ठी' किंवा मित्रसमाज जमे त्या ठिकाणीं जाई. तेथे तात्कालिक काव्यरचना, समस्यापूर्ति, पुस्तकवाचन, प्रतिमालास्पर्धा (भंडया) इत्यादिकांत त्याचा वेळ जाई. या समाजांत कलाभिज्ञ, विदुषी व चतुर अशा गणिकांनाही बोलावण्यांत येई व केव्हा केव्हा त्यांच्या घरींही बैठकी होत; त्या वेळीं काव्यनिर्मिति व कलानैपुण्य यांमध्यें स्पर्धा सुरू होई. अशा प्रसंगीं ऋतुवर्णनासारखे विषय सहजच सुचणारे असतात. कालिदासाने 'ऋतुसंहार' काव्य रचलें तेव्हा त्याला राजाश्रय असावा असें वाटत नाही; कारण राजाश्रयाचा किंवा राजसभेंतील दृश्याचा त्यांत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष एकही उल्लेख दिसत नाही. कित्येक श्लोकांत त्याच त्याच कल्पना पुनः पुनः आल्या आहेत. कांही श्लोक प्रियेस उद्देशून लिहिले असले तरी दुसरे कितीएक 'स्त्रियांच्या सहवासांत तुझा उष्णकाळ सुखांत जावो,' (२,२८) याप्रमाणें पुरुषास उद्देशून रचलेले दिसतात. त्यावरून हें खण्डकाव्य खण्डशः नागरकसमाजांत रचलें असावें असें वाटतें.

'ऋतुसंहार' काव्याचे सहा सर्ग असून प्रत्येकांत सोळापासून अठ्ठावीसपर्यंत श्लोक आहेत. त्यांत ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमन्त, शिशिर व वसन्त या सहा ऋतूंचें क्रमाने वर्णन आलें आहे. प्रत्येक ऋतच्या वर्णनांत त्या ऋतूचा वृक्षलतांवर व पशुपक्ष्यांवर झालेला परिणाम व त्या ऋतूच्या

आगमनानें कामिजनांच्या चित्तवृत्तीत व वर्तनांत दिसून येणारा फरक व त्यांच्या मनांत उत्पन्न होणारे विविध विचार यांचें कवीने सुदर वर्णन केलें आहे. उदाहरणार्थ, ग्रीष्म ऋतूचें खालील उदाहरण घ्या–

रवेर्मयूखैरभितापितो भृशं विदह्यमानः पथि तप्तपांसुभिः।
अवाङ्मुखो जिह्मगतिः श्वसन्मुहुः फणी मयूरस्य तले निषीदति॥

ऋतु० १, १३.

या श्लोकांत 'सूर्याच्या अत्यंत उष्ण किरणांनी वरून व तापलेल्या धुळीने खालून अंगाला चटके बसत असल्यामुळें विव्हल होऊन धापा टाकणारा वक्रगति साप जातिवैर विसरून मयूराच्या छायेंत जाऊन बसतो' असें कवीने वर्णन केलें आहे. ग्रीष्म ऋतूंत चांदणें फार रमणीय वाटतें, पाण्यांत नेहेमी डुंबत राहावें अशी इछा होते, रात्रीं गच्चीवर प्रियांसमवेत मदनोद्दीपक सुरापान व वीणावादन यांत कामी लोक काल घालवितात, रात्रीं धवल हर्म्यपृष्ठावर सुखनिद्रा घेणाऱ्या स्त्रियांचीं मुखें पाहून जणूं काय लज्जेने चन्द्र पांढरा फटफटीत होतो, इत्यादि वर्णनाने ग्रीष्म ऋतूचा कामिजनांवर होणारा परिणाम कवीने दाखविला आहे. ग्रीष्म ऋतूनंतर पावसाळा येतो. तेव्हा तृषाकुल चातक पक्ष्यांनी याचना केल्यामुळें जलभाराने नम्र झालेले मेघ मनोहर ध्वनि करून जलवृष्टि करतात, त्यावेळीं प्रवासी जनांना आपल्या स्त्रियांची आठवण होऊन अत्यंत दुःख होतें, इत्यादि कल्पना वर्षा ऋतूच्या वर्णनांत आल्या आहेत. शरदृतूचें वर्णन करतांना कवि म्हणतो—

काशांशुका विकचपद्ममनोज्ञवक्त्रा
सोन्मादहंसरवनूपुरनादरम्या।
आपक्वशालिरुचिरानतगात्रयष्टिः
प्राप्ता शरन्नववधूरिव रूपरम्या॥ ऋतु० ३,१

'काशरूपी वस्त्र नेसलेली, प्रफुल्ल कमल हेंच जिचें मुख आहे, उन्मत्तहंसरूपी नूपुराच्या नादाने जी रमणीय दिसते व आपक्व साळीचीं रोपें हीच जिची सुंदर शरीरयष्टि आहे अशी नववधूप्रमाणें सुस्वरूप दिसणारी शरद् प्राप्त झाली आहे.' पुढे शरदृतूंत रात्री चंद्रप्रकाशाने, नद्या हंसांनी, तळीं सारस पक्ष्यांनी, अरण्यें पुष्पभाराने लवलेल्या सप्तपर्ण वृक्षांनी, व उपवनें मालतीपुष्पांनी पांढरीं सफेत दिसतात,

इत्यादि वर्णन आलें आहे. चौथ्या व पांचव्या सर्गांत कवीने हेमन्त व शिशिर ऋतूंचें वर्णन केलें आहे. पण तें पहिल्या तीन सर्गांइतकें सुंदर उतरलें नाही. या ऋतूंत नजरेंत भरतील असे सृष्टिसुंदरीचे पुष्पादि अलंकार दिसत नाहींत म्हणून कवीने केवळ सृष्टिवर्णनाला चार पांचच श्लोक दिले आहेत व इतर श्लोकांत युवयुवतींच्या प्रेमाचें, लीलांचें व संभोगाचेंच वर्णन केलें आहे. यापेक्षा वसन्तवर्णन जास्त चांगलें साधलें आहे. वसन्तांत वृक्ष सपुष्प, जल पद्मयुक्त, स्त्रिया मदनपरवश, वायु सुगन्धि, संध्याकाल सुखकर व दिवस रम्य असतात असें या ऋतूचें वैशिष्ट्य एकाच श्लोकांत कवीने सांगितलें आहे. पुढील श्लोकांतील वसन्तवायूचें वर्णन पहा—

आकम्पयन् कुसुमिताः सहकारशाखा
विस्तारयन्परभृतस्य वचांसि दिक्षु ।
वायुर्विवाति हृदयानि हरन्नराणां
नीहारपातविगमात् सुभगो वनान्ते ॥ ऋतु० ६, २२.

'धुकें नाहीसें झाल्यामुळें सुखकर वाटणारा वायु पुष्पयुक्त आम्रशाखा हलवीत, कोकिलांचे आलाप सर्व दिशांस पसरवीत व जनांचीं अंतःकरणें आकर्षण करीत वाहत आहे.' या श्लोकांत कालिदासाच्या उत्तरकालीन काव्यांत दिसून येणारें गाम्भीर्य, लालित्य वगैरे गुण दिसून येतात.

एकंदरींत 'ऋतुसंहारा'त कवीचें बाह्य सृष्टीवरील प्रेम व शृंगाररसाविषयीं आवड व्यक्त होते. या काव्यांत त्याने स्वभावोक्तीवरच विशेष भर दिला आहे. कांही ठिकाणीं उपमा, उत्प्रेक्षा व रूपक हे साधे अर्थालंकार आढळतात, पण त्यांत नंतरच्या काव्यांतील अलंकारांची हृद्यता अनुभवास येत नाही. शिवाय अर्थान्तरन्यास या गोड अलंकाराचें यांत एकही उदाहरण नाही. कवीच्या शब्दरचनेंत अद्यापि लालित्य कमी आहे. अनेक ठिकाणीं पुनरुक्ति, ' तडिल्लताशक्रधनुर्विभूषिताः पयोधराः ' (२, १९) इत्यादि स्थलीं लतादि शब्दांचा अनावश्यक प्रयोग, क्वचित् व्याकरणनियमभंग इत्यादि दोषही यांत दिसून येतात. हें काव्य रचतांना 'रामायणा'च्या किष्किधाकांडांतील वर्षा व शरदृतूंचीं वर्णनें कवीस

माहीत होतीं असें कांही समानार्थक शब्दप्रयोग व कल्पना यांवरून म्हणतां येतें. खालील उदाहरणें पहा–

रामायण–बालेन्द्रगोपान्तराचित्रितेन विभाति भूमिर्नवशाद्वलेन ।
गात्रानुपृक्तेन शुकप्रभेण नारीव लाक्षोक्षितकम्बलेन ॥ ४,२८, २४

ऋतुसंहार–प्रभिन्नवैदूर्यनिभैस्तृणाङ्कुरैः समाचिता प्रोत्थितकन्दलीदलैः ।
विभाति शुक्लेतररत्नभूषिता वराङ्गनेव क्षितिरिन्द्रगोपकैः॥ २.५

पावसाळ्यांत हिरव्यागार गवतावर तांबडे इंद्रगोप किडे दिसूं लागतात त्यांचें वर्णन करतांना रामायणांत त्यांना लाखेच्या खडीची व 'ऋतुसंहारां'त रक्तवर्ण रत्नांची उपमा दिली आहे. कालिदासाची उपमा सरस आहे; तथापि नव्या हरळीला भूमीच्या पोपटी रंगाच्या वस्त्राची जी मनोहर उपमा रामायणांत कवीने योजिली आहे तिचा मागमूसही कालिदासाच्या श्लोकांत नाही. रामायणांतील इतर श्लोकांतही नव्या नव्या कल्पना, उत्प्रेक्षादि अलंकार योजिलेले दिसतात, त्यामुळें त्या दोन ऋतूंचें वर्णन फारच रमणीय झालें आहे. 'ऋतुसंहारां'तील वर्णन त्यापुढे बरेंच फिकें पडतें. तथापि या काव्यावरून कवीच्या मार्मिक सृष्टिनिरीक्षणाची, उज्ज्वल नैसर्गिक प्रतिभेची व विकासक्षम कलानैपुण्याची कल्पना येते यांत संशय नाही; व यामुळें या काव्यानेही त्या काळीं त्याची जनतेंत प्रसिद्धि झाली असावी. यानंतर लौकरच द्वितीय चन्द्रगुप्ताने वाकाटकांच्या साहाय्याने क्षत्रपांचा पराभव करून त्यांचे माळवा व काठेवाड हे प्रांत आपल्या राज्यास जोडले व उज्जैनी ही आपली राजधानी केली. वाकाटकांशीं जमलेला स्नेहसंबंध दृढतर करण्याकरितां त्याने आपली मुलगी प्रभावतिगुप्ता रुद्रसेन वाकाटकास दिली. त्या विवाहोत्सवप्रसंगीं कालिदासाचें 'मालविकाग्निमित्र' रंगभूमीवर आलें असावें. या नाटकाचा पुढील प्रकरणांत विचार करूं. या नाटकाने कालिदासाचा चंद्रगुप्ताशीं जो संबंध जडला तो पुढे दृढतर होत गेला असावा. पुढे लौकरच ध्रुवदेवीपासून त्याला कुमारगुप्त हा पुत्र झाला. त्या प्रसंगीं कालिदासाने आपलें 'कुमारसंभव' रचण्यास सुरवात केली असावी. त्या काव्याचें आता समालोचन करूं.

कुमारसंभव

सध्या उपलब्ध असलेल्या 'कुमारसंभवा'च्या प्रतींत सतरा सर्ग आढळतात, पण पूर्वी याचे बावीस सर्ग असावेत असें कांही लोकांचें म्हणणें आहे. याच्या उलट हें काव्य कवीने अर्धवट टाकलें असून त्याचे मूळचे आठच सर्ग असावेत असेंही पुष्कळ विद्वानांचें मत आहे. त्याचा पुढे विचार करूं.

तारकासुराने ब्रह्मदेवाच्या वराने प्रबळ होऊन देवांस त्रास दिल्यामुळें त्यांनी ब्रह्मदेवाच्या सूचनेवरून शिव व पार्वती यांचा विवाह घडवून आणला व त्या संबंधापासून उत्पन्न झालेल्या कार्तिकेयाला सेनापति करून त्याच्याकडून तारकासुराचा वध करविला असें कथानक या काव्यांत वर्णिलें आहे. काव्याच्या आरभीं कवीने हिमालयाचें फार सुंदर वर्णन केलें आहे. पुढे त्याला मेनकेपासून झालेली कन्या पार्वती हिच्या जन्माचें, बाल्याचें व यौवनाचें मनोहर वर्णन आहे. एकदा तिला पित्याच्या जवळ बसलेली पाहून नारदाने ही पुढे शिवाची अर्धांगी होईल असें भविष्य वर्तविलें होतें, म्हणून हिमालयाने तिला यौवन प्राप्त झाल्यावरही तिच्या विवाहाची खटपट केली नाही. त्यावेळेस भगवान् शंकर हिमालयपर्वतावरच तपश्चर्या करीत बसले होते, त्यांची सेवा करण्यास त्याने तिला आज्ञा केली. (सर्ग १) त्या सुमारासच तारकासुराच्या जाचास कंटाळून इन्द्रादि देव ब्रह्मदेवास शरण गेले. त्यांच्या स्तुतीनें संतुष्ट होऊन ब्रह्मदेवाने सांगितलें की मी स्वतःच तारकासुरास वर दिल्यामुळे त्याचा नाश करणें योग्य होणार नाही. करितां तुम्ही शिव व पार्वती यांचा विवाह जुळवून आणा. त्यापासून होणारा पुत्र तारकासुराचा पराजय करून तुम्हाला त्याच्या जाचांतून मुक्त करील. (सर्ग २) स्वर्गास परत गेल्यावर इन्द्राने मदनाला पाचारण केलें व ध्यानस्थ शंकराच्या मनांत पार्वतीविषयक प्रेम उत्पन्न करण्याच्या कामगिरीवर त्याची योजना केली. आपला मित्र वसन्त व स्त्री रति यांना घेऊन मदन हिमालय पर्वतावर आला. तेथे भगवान् शंकराच्या मनांत कामवासना उत्पन्न करण्याकरितां वसन्ताने सर्वत्र आपलें साम्राज्य पसरलें. शंकर ध्यानस्थ बसले होते त्या लतागृहाच्या द्वारावर नन्दी पहारा करीत होता

त्याची दृष्टि चुकवून मदनाने आंत प्रवेश केला. त्यावेळीं योगासन घालून भगवान् शंकर परमात्मदर्शनांत मग्न होते. थोडचा वेळाने त्यांची समाधि उतरल्यावर त्यांच्या अनुमतीने नन्दीने पार्वतीला आंत आणलें. तिने त्यांच्या पदकमली पुष्पोपहार अर्पण करून गंगानदीत उत्पन्न होणाऱ्या कमलांच्या शुष्क बीजांची माला त्यांना देण्याकरितां पुढे केली. ते ती घेत असतां योग्य संधि पाहून मदनाने आपल्या धनुष्यावर संमोहन नामक बाण लावला. त्यामुळें शंकराच्या चित्तवृत्तीत चलविचल झाली. पण तिचें संयमन करून त्यांनी तिचें कारण हुडकण्याकरितां सभोवार दृष्टि फेकली तों त्यांना धनुष्यावर बाण लावून आपल्यावर नेम घेत असलेला मदन दृष्टीस पडला. त्याबरोबर क्रोधाने त्यांच्या तृतीय नेत्रांतून वन्हि बाहेर पडून त्याने मदनाला भस्म केलें. (सर्ग ३) आपल्या पतीची ती अवस्था पाहतांच रतीला एकदम मूर्च्छा आली. पुढे भानावर आल्यावर तिने शोक केला. तिचें सान्त्वन करण्यास मदनाचा मित्र वसन्त तेथे आला, त्याला पाहून तर तिचें दुःख दुणावलें व ती अनेक गोष्टी आठवून ओक्साबोक्शी रडूं लागली. दुःखातिशयाने ती देहत्याग करणार तोंच आकाशवाणी झाली की शिव जेव्हा पार्वतीशी विवाह करतील त्या वेळीं मदनाला जिवंत करतील, तोंपर्यंत तूं त्याच्या देहाचें रक्षण कर. (सर्ग ४) आपल्या समक्ष मदनाला भस्मसात् केलेलें पाहून पार्वतीची अत्यंत निराशा झाली व तिने शिवप्राप्तीकरितां अतिशय उग्र तपश्चर्या आरंभिली. त्यामुळें सतुष्ट होऊन भगवान् शंकर ब्रह्मवर्चसाने तेजःपुंज दिसणाऱ्या जटाधारी ब्रह्मचाऱ्याचें रूप धारण करून तेथे आले व पार्वतीने केलेल्या पूजेचा स्वीकार करून, तिला, सर्व परिस्थिति अनुकूल असतांही यौवनावस्थेंत इतकें उग्र तप करण्याचें कारण विचारलें. तिच्या सखीकडून, तिचें मन शंकरांवर बसलें आहे व त्यांच्या प्राप्तीकरितांच ही तपश्चर्येने आपलें शरीर शोषवीत आहे, असें समजतांच ब्रह्मचाऱ्याने शंकरांची खूप निंदा केली. त्यांच्या सर्पभूषणाचें, रक्तबिंदू गळत असलेल्या गजचर्मरूपी प्रावरणाचें, स्मशानवासाचें, अकिंचनत्वाचें व तृतीयनेत्रत्वामुळें आलेल्या कुरूपतेचें भडक वर्णन करून असल्या वराचा

नाद सोडून दे असा तिला उपदेश केला. ब्रह्मचाऱ्याचें तें भाषण ऐकतांच पार्वतीचा क्रोध अनावर झाला, तथापि तिने त्याचें म्हणणें खोडून काढून आपला त्यांच्या प्राप्तीबद्दलचा निश्चय पुनः प्रकट केला. त्यावर ब्रह्मचारी कांही बोलणार तोंच ती उठून चालूंही लागली. तेव्हा शंकरांनी प्रकट होऊन तिला थांबविलें व आजपासून मी तुझ्या तपश्चर्येनें विकत घेतलेला तुझा दास झालों आहे असें सांगितलें. (सर्ग ५) नंतर शंकरांनी अरुन्धतीसहित सप्तर्षींना हिमालयाकडे पाठवून पार्वतीबद्दल मागणी घातली. त्यानेही पत्नीच्या अनुमतीने ती मान्य केली. (सर्ग ६) पुढे मंगल तिथीवर शिवपार्वतीचा विवाह झाला. त्यावेळेस पार्वतीच्या वेषभूषेचें, तिच्या सखीनी केलेल्या विनोदाचें, शंकर हिमालयगृही येण्यास निघाले तेव्हा त्यांच्या परिवाराचे, त्यांच्या पुरप्रवेशाच्या वेळीं झालेल्या नगरस्त्रियांच्या गडबडीचें व नंतर विवाहसंस्काराचें विस्तृत व रम्य वर्णन कवीने केलें आहे. (सर्ग ७) विवाहानंतर शंकरांनी पार्वतीसह विविध प्रकारचे उपभोग घेण्यांत शेकडो ऋतु घालविले. (सर्ग ८) तेव्हा इंद्रादि देवांनी अग्नीस पारावत रूपाने शिवपार्वतीच्या विवाहस्थलीं पाठविलें. त्याला पाहून शंकराना प्रथम राग आला तरी त्याने सर्व वस्तुस्थिति सांगितल्यावर ते संतुष्ट झाले व त्याच्या ठिकाणीं त्यांनी आपलें वीर्य टाकलें. (सर्ग ९) तें दुःसह झाल्यामुळें इन्द्राच्या सांगण्यावरून त्याने तें स्वर्गगेंत टाकलें; तिलाही त्याचा ताप सहन होईना म्हणून तितक्यांत स्नानास आलेल्या सहा कृत्तिकांच्या देहांत तिने तें वाटून दिलें. तेथे त्याचा गर्भ झाला; पण कृत्तिकांना त्याचा भार सहन न झाल्यामुळें त्यांनी वेतसवनांत त्याचा त्याग केला. (सर्ग १०) त्याच सुमारास शंकरपार्वती विमानांत बसून त्या मार्गाने जात होते त्यांनी त्याला ओळखलें व स्वगृहीं नेलें. तेथे सहा दिवसांतच तो मोठा होऊन सकल शस्त्रशास्त्रांत प्रवीण झाला. (सर्ग ११) पुढे इंद्रादिकांच्या विनंतीवरून शंकरांनी त्याला देवसेनेचा अधिपति करून स्वर्गास पाठविलें. (सर्ग १२) त्याला पुढे करून देवांनी तारकासुरावर चाल केली. (सर्ग १३) त्यानेही लढाईची तयारी केली व अनेक अपशकुन झाले तरी त्यांना न जुमानतां कुमाराशीं भयंकर युद्ध केलें. शेवटीं

त्याच्या बाणाने विद्ध झाल्यामुळें तो युद्धांत मरण पावला. त्याबरोबर कुमाराच्या शिरावर स्वर्गीय पुष्पांची वृष्टि झाली व इन्द्राला पुनः स्वर्गाचें आधिपत्य मिळालें. (सर्ग १४-१७)

'कुमारसंभवा'च्या सतरा सर्गांपैकी एकंदर आठ सर्गांवरच अरुणगिरिनाथ, मल्लिनाथ वगैरेंची टीका आहे. 'कुमारसंभव' या काव्याच्या नांवावरून कुमाराच्या जन्मापर्यंतचीच कथा कवीला वर्णावयाची होती असेंही कित्येक लोक अनुमान करतात; पण तें तितकेंसें सयुक्तिक भासत नाही. कारण कुमारगुप्ताच्या जन्मोत्सवप्रसंगीं हें काव्य कवीने लिहावयास घेतलें असल्यास त्याने त्यास तें नांव मुद्दाम दिलें असण्याचाही संभव आहे. शिवाय या आठ सर्गांत कुमाराच्या जन्मापर्यंतचाही कथाभाग येत नाही हें वर दिलेल्या सारांशावरून दिसून येईल. तेव्हा हें काव्य अपूर्णच राहिलें असावें असें वाटतें. सातव्या व आठव्या सर्गांत शिवपार्वतीच्या संभोगाचें उत्तान वर्णन आहे तें सदभिरुचीस सोडून असल्यामुळें आनंदवर्धनादि आलंकारिकांनी कवीस दोष दिला आहे. (ध्वन्यालोक पृ. १४७) या वर्णनाने पार्वतीला राग आल्यामुळें तिच्या शापाने हें काव्य अपूर्ण राहिलें, अशीही एक दंतकथा अरुणगिरिनाथ याने उल्लेखिली आहे, त्यावरून कालिदासकाळींही अशा तऱ्हेचे आक्षेप घेतले असावेत व त्यामुळें कवीने हें अर्धवटच सोडून दिलें असावें असें वाटतें. कारण कांही असलें तरी नवव्या सर्गापासूनचा भाग कालिदासाच्या हातचा दिसत नाही. पहिल्या भागांतील सर्गांच्या मानाने यांतील सर्ग श्लोकसंख्येने लहान दिसतात. साठापेक्षा ज्यांत कमी श्लोक आहेत असे सर्ग सबंध 'रघुवंशां'त दोन व 'कुमारसंभवा'च्या अष्टसर्गात्मक पहिल्या भागांतही फक्त एक इतकेच आले आहेत. याच्या उलट 'कुमारसंभवा'च्या दुसऱ्या भागांतील नऊ सर्गांपैकी सात या तऱ्हेचे आहेत. या सर्गांची भाषाशैलीही पूर्वभागांतल्याइतकी सफाईदार दिसत नाही. यांतील उपमा अर्थान्तरन्यासादि अलंकार व एकंदर वर्णन कालिदासाच्या इतर ग्रंथांतल्यासारखें मनोरम वठलें नाही. 'उपाविशत्सुरेन्द्रेणादिष्टं सादरमासनम्,' (१०, ४) वगैरे ठिकाणचा यतिभंग, 'परित्यजध्वम्,' (१२,३६) 'मद्विग्रहमधि' (१०,१२) 'शत्रुविजेष्यमाणम्' (१३,२१)

यांसारखे व्याकरणदुष्ट प्रयोग, 'च' 'हि' यांसारख्या पादपूरणार्थक अव्ययांचा सढळ उपयोग, 'अहो अहो देवगणाः सुरेन्द्रमुख्याः शृणुध्वं वचनं ममैते।' (१२, ५४) यासारख्या नीरस पंक्ति, यावरून हा उत्तरभाग 'कुमारसंभव' अपूर्ण राहिलेलें पाहून कोणा कमी प्रतीच्या कवीने रचला असावा असें वाटतें. अश्वघोषाच्या 'बुद्धचरिता'च्याही बाबतीत असा प्रकार झाला असल्याचें आपण मागें पाहिलेंच आहे. असो.

या काव्यांत महादेव, पार्वती व मदन ह्याच तीन मुख्य व्यक्ति आहेत. त्यांचें स्वरूप, स्वभाव व कृति यांच्या वर्णनांत कवीने आपलें शक्ति-सर्वस्व खर्चलें आहे. महादेव व पार्वती या दिव्य व्यक्ति. एक त्रैलोक्याचा पिता तर दुसरी जगन्माता. अशा अलौकिक विभूतीच्या विचारविकारांचें वर्णन करतांना सर्व प्रकारें अनोचित्य टाळणें जरूर होतें. पण केवळ अद्‌भुत रूपाने कवीने त्यांचें वर्णन केलें असतें तर वाचकांना त्यांत आपलेपणा वाटला नसता. या दोन्ही मर्यादा संभाळण्यांत कवीने मोठें कौशल्य प्रकट केलें आहे. महान् इंद्रियनिग्रही, सदैव तपश्चर्येंत मग्न, चित्ताची किंचित् चलबिचल झाली असतां तिला कारणीभूत झालेल्या मदनाला देहान्त शिक्षा देणारा कठोरहृदय भगवान् शंकर पार्वतीच्या उग्र तपश्चर्येने व तिच्या स्थिरप्रेमाने प्रसन्न होतो, तिच्याशीं होणाऱ्या विवाहाची आतुरतेने वाट पाहतो, तिच्याशी विविध प्रकारें विलास करतो, आपल्या संध्यावंदनामुळें ती रागावली असतां तिची समजूत घालतो, असें मोठें मनोहर चित्र कवीने रंगविलें आहे. स्वतःच्या सौंदर्याचा यथार्थ अभिमान बाळगणारी पण मदनदाहानंतर निराश झालेली, शिवप्राप्तीकरितां घोर तपश्चर्येने आपलें सुकुमार शरीर शोषविणारी, गुरुजनांपुढे अत्यंत नम्र होणारी, पण दुर्जनांना वाक्‌ताडन करणारी, पतीच्या संध्यावंदनानेही सवतीमत्सर वाटणारी, अशी पार्वती व जगांत सर्वत्र स्थापित झालेल्या आपल्या साम्राज्यामुळें गर्विष्ठ होऊन प्रत्यक्ष शंकरालाही मोह पाडीन अशी बढाई मारणारा, पण मनांत साशंक असल्याने द्वारपाल नंदीची दृष्टि चुकवून शंकर तपश्चर्या करीत असलेल्या ठिकाणी चोरून प्रवेश करणारा मदन, यांचीं स्वभावचित्रेंही मनोवेधक उतरलीं आहेत.

पहिल्या आठ सर्गांतील सर्वच प्रसंग कवीने मोठ्या कुशलतेने रेखाटले आहेत. तथापि त्यांतल्या त्यांत प्रारंभींचें हिमालयाचें व तृतीय-सर्गांतील अकालिक वसन्तऋतूंतील वनश्रीचें वर्णन, चौथ्यांतील रति-विलाप, पांचव्या सर्गांतील बटुवेषधारी शंकर व पार्वती यांचें संभाषण, हीं उत्कृष्ट साधलीं आहेत. या काव्यांत संभोग व विप्रलंभ हे शृंगाराचे दोन्ही प्रकार व करुणरस हे मुख्यत्वाने आले आहेत. स्थलाभावास्तव यांतील उत्कृष्ट स्थलें विस्ताराने देतां येत नाहींत; तथापि पुढील उदाहरणांवरून वाचकांस कांही कल्पना येईल—

आभेखलं संचरतां घनानां छायामधः सानुगतां निषेव्य ।
उद्वेजिता वृष्टिभिराश्रयन्ते शृङ्गाणि यस्यातपवन्ति सिद्धाः ॥
कुमार० १. ५.

(ज्या हिमालयाच्या मध्यभागाभोवतीं फिरणाऱ्या मेघांची छाया खालच्या शिखरांवर सेवन करून ते वृष्टि करूं लागले असतां त्रासून जाऊन सिद्ध उच्च शिखरांवर जाऊन सूर्यप्रकाशांत बसतात.) या श्लोकांतील वर्णन अगदी यथातथ्य आहे असें सिमला, नैनिताल वगैरे ठिकाणीं जाऊन राहिलेले लोक सांगतात.

कुबेरगुप्तां दिशमुष्णरश्मौ गन्तुं प्रवृत्ते समयं विलङ्घ्य ।
दिग्दक्षिणा गन्धवहं मुखेन व्यलीकनिःश्वासमिवोत्ससर्ज ॥
कुमार० ३,२५.

या पद्यांत अकालीं वसन्तागमामुळें वाहणाऱ्या दक्षिण दिशेच्या वायूचें आलंकारिक वर्णन आलें आहे. पूर्वी दिलेलें वचन मोडून आपला प्रियकर दुसरीकडे जाऊं लागला असतां ज्याप्रमाणें एखादी स्त्री दुःखाने सुस्कारे टाकते त्याप्रमाणें अकालीं सूर्य उत्तरेकडे जाऊं लागला म्हणून दक्षिणदिशा जणूं काय वायुरूपाने उसासे टाकूं लागली.

मदनदाहानंतर रतीने केलेला विलाप वाचून ज्याच्या डोळ्यांत अश्रु उभे रहात नाहीत असा सहृदय वाचक विरळा ! आपल्या डोळ्यांदेखत पतीच्या देहाचें भस्म झालेलें पाहतांच रतीला प्रथम तर मूर्च्छाच आली. कांही वेळाने भानावर आल्यावर तिने धरणीवर अंग टाकलें,

तिचे केश अस्ताव्यस्त झाले व तिच्या आक्रोशाने सभोंवतालचें वनही जणूं समदुःख झालें. मदनाचे निरनिराळे गुण व विलास आठवून ती शोक करूं लागली, त्याचें वर्णन अत्यंत हृदयद्रावक झालें आहे. उदाहरणार्थ खालील श्लोक पहा—

हृदये वससीति मत्प्रियं यदवोचस्तदवैमि कैतवम्।
उपचारपदं न चेदिदं त्वमनङ्गः कथमक्षता रतिः॥ कु. ४, ९.

'तूं माझ्या हृदयांत वसत आहेस' असें मला बरें वाटण्यासाठी तूं म्हणत होतास, पण तें मिथ्या होतें हें मला आता कळून आलें; नाही तर तूं अनंग (देहरहित) झाल्यावर ही रति जशीच्या तशी कशी राहिली असती? या श्लोकांत शब्द अगदी साधे योजिले आहेत तरी त्यांत रतीचा शोक उत्तम रीतीने व्यक्त झाला आहे.

पांचव्या सर्गांतील ब्रह्मचाऱ्याचें छद्मी भाषण व त्यावर पार्वतीचें सडेतोड उत्तर हीं दोन्ही उत्कृष्ट साधली आहेत. शंकराचें अकिंचनत्व, स्मशानवास, इत्यादि दोष ब्रह्मचाऱ्याने दाखविले, तेव्हा पार्वती त्यास काय उत्तर देते पहा—

अकिंचनः सन् प्रभवः स सम्पदां त्रिलोकनाथः पितृसद्मगोचरः।
स भीमरूपः शिव इत्युदीर्यते न सन्ति याथार्थ्यविदः पिनाकिनः॥
कुमार० ५, ७७.

(शंकर स्वतः दरिद्री असले तरी दुसऱ्याला संपत्तिमान् करतात; त्रैलोक्याचे स्वामी असूनही स्मशानांत रहातात, त्यांचें रूप भयंकर असलें तरी त्यांना लोक शिव म्हणतात, तेव्हा त्यांचें यथार्थ ज्ञान कोणालाही झालें नाही हेंच खरें.) शंकराची कुळकथा कोणाला माहीत नाही या आक्षेपास उद्देशून ती पुढे म्हणते—

विवक्षता दोषमपि च्युतात्मना त्वयैकमीशं प्रति साधु भाषितम्।
यमामनन्त्यात्मभुवोऽपि कारणं कथं स लक्ष्यप्रभवो भविष्यति॥
कुमार० ५, ८१.

(स्वतः नतद्रष्ट असलास तरी शंकरांचा दोष म्हणून सांगतांना तूं त्यांचा एक गुणच सांगितला आहेस. ज्यांच्यापासून प्रत्यक्ष सृष्टिकर्ता ब्रह्मदेव उत्पन्न झाला असें लोक म्हणतात त्यांचा जन्म केव्हा झाला हें कोण सांगूं शकेल?)

आपल्या अनुभवाचें ज्यांत सारसर्वस्व साठविलें आहे अशीं वचनें अर्थान्तरन्यासरूपाने देण्याची कालिदासाची पद्धति या काव्याच्या पहिल्या आठ सर्गांत उत्कृष्टपणें दृष्टीस पडते. उदाहरणार्थ खालील उक्ति पहा— एको हि दोषो गुणसंनिपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवांकः। (१,३) स्वजनस्य हि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते। (४,२६); न रत्नमन्विष्यति मृग्यते हि तत्। (५,४५); मनोरथानामगतिर्न विद्यते। (५,६४); इत्यादि. यांपैकी कित्येक वचनें लोकांच्या जिव्हाग्री असून योग्य प्रसंगीं त्यांचा म्हणीसारखा उपयोग केला जातो, हें सर्वांस माहीत आहेच.

कालिदासाने आपल्या काव्याची कथा कोठून घेतली याबद्दल विद्वानांत मतभेद आहे. शिव व स्कंद पुराणांत कार्तिकेयाची कथा दिली आहे तिच्या वर्णनांत व 'कुमारसंभवां'तील वर्णनांत कल्पना व उक्ति यांचें साम्य ठिकठिकाणी आढळतें. उदाहरणार्थ खालील स्थळें पहा—

१. शिवपुराण–द्वयोरपि भवान् श्रेष्ठः सर्वगः सर्वशक्तिमान्।
वज्रं च निष्फलं स्याद्वै त्वं तु नैव कदाचन॥
कुमारसंभव–वज्रं तपोवीर्यमहत्सु कुण्ठं त्वं सर्वतोगामि च साधकं च।
३, १२.

२. शिवपुराण–अन्येषां गणना नास्ति पातयामि हरं यदि।
कुमारसंभव–कुर्या हरस्यापि पिनाकपाणेर्धैर्यच्युतिं के मम धन्विनोऽन्ये॥
३, १०.

यासारख्या स्थलींच्या विलक्षण साम्यावरून कालिदासाने शैव व स्कंद पुराणांतून आपली कथा घेतली असें कित्येक लोक म्हणतात, पण तें बरोबर वाटत नाही. सध्याचीं अठरा पुराणें व्यासकृत आहेत अशी लोकांची समजूत असली तरी त्यांचा बहुतेक भाग अलीकडचा आहे. तेव्हा तीं कालिदासापुढे होतीं असें मानण्यास पुरेसा पुरावा नाही. उलट 'कुमारसंभवां'तील प्रसंगांच्या जुळवाजुळवींत जे कौशल्य दृष्टीस पडतें तें कालिदासाचेंच असावें असें त्याच्या इतर ग्रंथांच्या पुराव्यावरून म्हणतां येतें. विवाहानंतर अंग देशांत श्रीशंकर तपश्चर्या करीत असतां मदनाने त्यांच्यावर शस्त्र उगारलें म्हणून त्यांनी त्याला अनंग केलें अशी कथा वाल्मीकिरामायणांत (बाल० स० २३) आली आहे, ती कालिदासाला

माहीत असावी.* पण कलेच्या दृष्टीने तिच्यांत बदल करणें कवीला जरूर वाटलें. म्हणून त्याने मदनाला भस्म केलें तो प्रसंग पार्वतीच्या विवाहापूर्वी हिमालयावर घडला असें वर्णिलें आहे. शिवाय केवळ बाह्यरूपावर अवलंबून असणारें प्रेम टिकाऊ नसतें, जें अनेक आपत्तींत व हालअपेष्टांत अविचल राहतें तेंच खरें प्रेम हें आपलें मत त्याने या प्रसंगाने दाखविलें आहे. या मताचाच विकास पुढे 'शाकुन्तलां'त झालेला दृष्टीस पडतो. तेव्हा 'कुमारसंभवा'च्या पहिल्या आठ सर्गांतील प्रसंगांची रचना व वर्णन हीं कालिदासाचीं स्वतःचीं असून त्यांचें अनुकरण शिव, स्कंद व इतरही अनेक पुराणांत झालेलें दिसतें. यानंतरच्या सर्गांतील वर्णन मात्र कोणा नंतरच्या कवीने स्कंद पुराणांतून घेतलें असावें असें जें डॉ. विंटर्निट्झ यांनी म्हटलें आहे† तें सर्वमान्य होण्यासारखें आहे.

मेघदूत

हें खण्डकाव्य कवीने राजकारणास्तव विदर्भांत कांही काल वास केला त्यावेळीं लिहिलें असावें असें आपण मागें पहिल्या प्रकरणांत ठरविलें आहे (पृष्ठ ३९–४०). यांत पुढील कथाभाग आला आहे—

अलका नगरीतील एका यक्षाने आपल्या कामांत कांही प्रमाद केल्यामुळें कुबेराने एक वर्षभर तुझें सामर्थ्य नष्ट होईल असा त्याला शाप दिला. तेव्हा त्याला अलकानगरी सोडावी लागली व सीतादेवीने स्नान केल्यामुळें जेथील उदक पवित्र झालें आहे अशा रामगिरीवरील आश्रमांत तो एकटाच येऊन राहिला. तेथे आठ महिने झाल्यावर आषाढ महिन्याच्या आरंभीं वर्षाऋतु आला, त्यावेळीं मेघदर्शनाने त्याला प्रियाविरह दुःसह झाला. आपल्या प्रियपत्नीचीही अशीच अवस्था झाली असेल असें जाणून त्याने त्या मेघालाच आपला दूत म्हणून पाठविण्याचें ठरविलें. वास्तविक धूम, अग्नि, जल, वायु वगैरेंच्या समवायाने उत्पन्न झालेला अचेतन मेघ यक्षाचा संदेश कसा नेणार ? पण मदनार्त यक्षाला इतका विवेक कोठला !

* या प्रकारचा उल्लेख रघु. ११,१३ मध्यें आला आहे पण तो प्रक्षिप्त असावा. कांही प्राचीन टीकाकारांनीही तो श्लोक गाळला आहे.

† *Geschichte der indischen Litteratur*, Band III, 58.

त्याने त्या पर्वतावर नुकतींच उमललेलीं कुटजपुष्पें त्याला अर्पण करून व त्याची स्तुति करून नंतर अलकेचा मार्ग सांगण्यास सुरवात केली. मालक्षेत्र, आम्रकूट पर्वत, विन्ध्य पर्वताच्या पायथ्याशीं खडकांनी विभागलेली नर्मदा नदी इत्यादिकांचें वर्णन करून यक्षाने मेघास दशार्ण देशाच्या राजधानीचा–विदिशेचा–मार्ग सांगितला आहे.

नीचैराख्यं गिरिमधिवसेस्तत्र विश्रान्तिहेतो-
स्त्वत्संपर्कात्पुलकितमिव प्रौढपुष्पैः कदम्बैः।
यः पण्यस्त्रीरतिपरिमलोद्गारिभिर्नागराणा-
मुद्दामानि प्रथयति शिलावेश्मभिर्यौवनानि ॥ मेघ० २५.

'त्या ठिकाणीं नीचैर्गिरि नामक लहान टेकडीवर विश्रांतीकरितां तूं बसावें. प्रफुल्ल झालेल्या कदम्बपुष्पांनी युक्त अशी ती टेकडी जणूं काय तुझ्या संयोगामुळें रोमांचित झालेली दिसेल. त्या ठिकाणच्या गुहांत वेश्यांनी उपयोग केलेल्या सुगंधि द्रव्यांच्या परिमलावरून तेथील 'नागर' लोकांचें उद्दाम यौवन उत्कृष्ट रीतीने व्यक्त होत आहे.' नंतर उज्जयिनी नगरी वाटेवर पडत नव्हती तरी तेथे जाण्याचा यक्षाने मेघाला आग्रह केला आहे. उज्जयिनीचें वर्णन कवीने फार विस्तृत व मनोहर केलें आहे. उदाहरणार्थ 'महाकाल' शिवाच्या देवालयांतील आरतीच्या वेळचें वेश्यानृत्याचें वर्णन पहा—

पादन्यासक्वणितरशनास्तत्र लीलावधूतै
रत्नच्छायाखचितवलिभिश्चामरैः क्लान्तहस्ताः।
वेश्यास्त्वत्तो नखपदसुखान् प्राप्य वर्षाग्रबिन्दू-
नामोक्ष्यन्ते त्वयि मधुकरश्रेणिदीर्घान् कटाक्षान् ॥ मेघ० ३७.

'नृत्य करितांना पादनिक्षेपाने ज्यांचे कमरपट्टे मधुर आवाज करीत आहेत, रत्नकांतियुक्त मुठी असलेल्या व लीलेने ढाळलेल्या चामरांनी ज्यांचे हात दमले आहेत अशा वेश्या वर्षारंभीचे नखक्षतांना आनंददायक होणारे जलबिंदु तुजपासून प्राप्त झाल्यावर तुझ्याकडे भृंगमालेप्रमाणें दीर्घ असे कटाक्ष फेकतील.' नंतर मार्गांत लागणारी गंभीरानदी, देवगिरि नामक पर्वतावरील कार्तिकेयाचें देवालय, चर्मण्वती (चंबळा) नदी, दशपुर (हल्लीचें मंदोसर), ब्रह्मावर्त देश, कुरुक्षेत्र, सरस्वती व गंगा या नद्या व शेवटीं हिमालय व त्यावर

वसलेली अलका यांचें थोडक्यांत पण मनोरम वर्णन करून कवीनें आपल्या काव्याचा पूर्वार्ध समाप्त केला आहे. या भागांत रामगिरीपासून अलकेपर्यंतच्या मार्गावर लागणारे पर्वत, नद्या, देश, नगर, ग्राम, वने व उपवनें यांचें रमणीय वर्णन आल्यामुळें हा भाग अत्यंत चित्ताकर्षक झाला आहे. यांत ठिकठिकाणीं कवीच्या कल्पनेचा रम्य विलास दृष्टीस पडतो. पण हीं स्थलें सर्वांच्या परिचयाचीं असल्यामुळें कवीला यात आपल्या कल्पनाशक्तीला स्वैर सोडतां येईना. म्हणून उत्तरार्धांत अलकानगरीच्या व यक्षगृहाच्या वर्णनांत त्याने आपल्या प्रतिभेनें नूतन सृष्टि निर्माण करून कल्पनाशक्तीला यथेच्छ विहार करण्यास मोकळीक दिली आहे. उत्तरार्धाच्या आरंभीं यक्षाने अलकेचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. "बा मेघा ! अलका नगरीतील गगनचुंबित प्रासाद चित्रादिकांनी सुशोभित, मृदंगध्वनीने युक्त व रत्नखचित आहेत. तेथे राहणाऱ्या यक्षाना सदैव तारुण्याचा उपभोग घेतां येतो. तेथील वृक्ष व कमलिनी नेहमी सपुष्प, मयूर आनंदित व रात्री चंद्रप्रकाशयुक्त असतात. तेथील हर्म्याच्या स्फटिकयुक्त पृष्ठभागावर बसून तुझ्याप्रमाणेंच गम्भीर अशा मृदङ्गाचे बोल ऐकत यक्ष स्वस्त्रियांसमवेत मद्यपान करीत असतात. त्या ठिकाणीं चित्रविचित्र रंगांचीं वस्त्रें, मद्य, अलंकारार्थ पल्लव व पुष्पें, पायांना लावण्याचा लाक्षाराग, इत्यादि स्त्रियांना लागणारी सर्वप्रकारची वेषभूषा एकटा कल्पवृक्ष पुरवीत असतो. तेथे श्रीशंकरांचा साक्षात् वास असल्याने मदन आपल्या धनुष्याचा उपयोग करीत नाही; पण त्याचें कार्य चतुर स्त्रियांच्या अमोघ कटाक्षांनीच होऊन जातें. अशा प्रकारच्या अलकेंत कुबेराच्या गृहाच्या उत्तरेस माझें घर आहे, तें तुला इंद्रधनुष्याप्रमाणें रमणीय अशा तोरणामुळें दुरूनही सहज दिसेल. त्याच्या उद्यानांत माझ्या पत्नीने वाढविलेला व सहज हाताला येतील अशा पुष्पांच्या भाराने लवलेला असा एक लहान मंदारवृक्ष आहे. जवळच पाचूच्या पायऱ्या असलेली व सुवर्णकमलांनी युक्त अशी एक विहीर आहे. तिच्या कांठीं सुंदर इंद्रनीलरत्नखचित शिखर असलेला व सुवर्णकदलींनी वेष्टिलेला असा क्रीडापर्वत आहे. त्या ठिकाणी माधवीमण्डपाच्या जवळ रक्ताशोक व बकुल हे वृक्षही तुला दिसतील. त्यांच्या मध्यभागीं रत्नखचित अशा सुवर्णयष्टीवर स्फटिकाचा एक

फलक आहे, त्यावर सायंकाळीं माझी प्रिया कंकणनादानें मधुर झालेल्या करतलरवाने मोराला नाचवीत असते. या सर्व खुणा ध्यानांत ठेवून तूं माझें घर हुडकून काढ. मागें सांगितलेल्या क्रीडापर्वतावर बसून तूं आपली विद्युद्दृष्टि माझ्या गृहांत फेकल्यास पुढील दृश्य तुझ्या दृष्टीस पडेल—

आलोके ते निपतति पुरा सा बलिव्याकुला वा
मत्सादृश्यं विरहतनु वा भावगम्यं लिखन्ती।
पृच्छन्ती वा मधुरवचनां सारिकां पञ्जरस्थां
कच्चिद्भर्तुः स्मरसि रसिके त्वं हि तस्य प्रियेति॥ मेघ० ९०.

"माझी प्रियपत्नी देवतांच्या पूजेंत निमग्न झालेली, विरहाने कृश असें माझें मनोगम्य चित्र काढीत असलेली, किंवा 'ज्याचें तुझ्यावर अत्यंत प्रेम होतें त्या आपल्या धन्याची तुला आठवण येते का ग?' असें मधुर कंठाच्या सारिकेला विचारीत असलेली तुझ्या दृष्टीस पडेल." कदाचित् माझ्याविषयीं एखादें गाणें रचून तें वीणा वाजवून म्हणण्याचा ती प्रयत्न करीत असेल, परंतु पुनः पुनः स्वतः रचलेले आलाप तिला आठवत नसतील; किंवा विरहाचे किती दिवस राहिले, तें भूमीवर पुष्पें लावून ती मोजीत असेल. विरहाने अत्यंत कृश झालेली, अभ्यंग-स्नान न केल्यामुळें जिचे केश अत्यंत रुक्ष होऊन कपोलावर पडले आहेत, सर्व अलंकार वर्ज्य करून अत्यंत दुःखाने जिने बिछान्यावर अंग टाकलें आहे अशा माझ्या प्रियेला पाहून तुलाही नूतनजलरूपी अश्रु गाळावेसे वाटतील. त्या वेळीं तिला निद्रा लागली असल्यास तूं प्रहरभर गर्जना न करतां ती जागृत होण्याची वाट पहा. कारण महा-प्रयासाने प्राप्त झालेल्या स्वप्नांत ती माझें गाढ आलिंगनसुख अनुभवीत असेल, त्यामध्यें तुझ्या गर्जनेने व्यत्यय येऊं नये. ती तुझ्या जलबिंदूंनी शीतल झालेल्या वायूने जागृत झाल्यावर तिला माझें कुशल सांगून पुढील संदेश निवेदन कर—

श्यामास्वंगं चकितहरिणीप्रेक्षणे दृष्टिपातं
वक्त्रच्छायां शशिनि शिखिनां बर्हभारेषु केशान्।

उत्पश्यामि प्रतनुषु नदीवीचिषु भ्रूविलासान्
हन्तैकस्थं क्वचिदपि न ते चण्डि सादृश्यमस्ति ॥ मेघ० १०९.

'प्रियंगुलतेंत तुझें अंग, भयत्रस्त हरिणीच्या दृष्टिक्षेपांत तुझे कटाक्ष, चन्द्राच्या ठिकाणीं तुझी अंगकांति, मयूराच्या पिसाऱ्यांत तुझा केशकलाप, नदीच्या लहान लहान लहरीत तुझे भ्रूविलास असावेत असें मला प्रथम वाटतें, पण हे कोपिष्ठ स्त्रिये ! यांपैकी एकाही ठिकाणीं मला तुझें सादृश्य दिसत नाही.'

त्वामालिख्य प्रणयकुपितां धातुरागैः शिलायां
मात्मानं ते चरणपतितं यावदिच्छामि कर्तुम् ।
अस्रैस्तावन्मुहुरुपचितैर्दृष्टिरालुप्यते मे
क्रूरस्तस्मिन्नपि न सहते संगमं नौ कृतान्तः ॥ मेघ० ११०.

'प्रेमातिशयामुळें मजवर रागावलेल्या तुझें चित्र शिलेवर गेरूने काढून मी तुझ्यापुढे नमस्कार घालतों आहें असें दाखविण्याचा प्रयत्न करतों, पण तितक्यांत शोकभराने माझी दृष्टि अश्रुपूर्ण होते. क्रूर कृतान्ताला अशा रीतीनेही होणारा आपला संगम सहन होत नाही.' स्वप्नांत तुझें दर्शन झाल्यावर आलिंगनसुखार्थ मी आपले बाहू पसरतों, तें पाहून वनदेवतांच्या नेत्रांतून तरुकिसलयांवर मोत्यांसारखे स्थूल अश्रुबिंदु पडतात. विवेकाने मी आपलें विरहदुःख सहन करतों त्याप्रमाणेंच तूंही करावें; कारण—

कस्यैकान्तं सुखमुपगतं दुःखमेकान्ततो वा
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण । मेघ० ११४.

'कोणाला सदैव सुख किंवा दुःख प्राप्त झालें आहे ? चाकाच्या धावेप्रमाणें मनुष्यमात्राची अवस्थाही उच्च नीच होत असते.' भगवान् विष्णु आपल्या सर्पशयनावरून उठल्याबरोबर माझ्या शापाचा शेवट होणार आहे. तेव्हां आणखी चार महिने तूं आपलें दुःख सहन कर. नंतर आपण शरदृतूंतील उत्कृष्ट चांदण्यांत विविध प्रकारचे उपभोग घेऊं. माझ्या प्रार्थनेस मान देऊन किंवा माझ्यावरच्या प्रेमामुळें अथवा अनुकंपेमुळें हें माझें काम केल्यावर, मेघा ! वर्षाकाळामुळें ज्याचें सौंदर्य वृद्धिंगत झालें आहे असा तूं इष्टदेशाप्रत गमन कर. मजप्रमाणें तुला यापुढे क्षणभरही तुझी प्रिया विद्युल्लता हिचा वियोग न होवो !

एकशेंवीस श्लोकांच्या या खण्डकाव्यांत कवीने आपलें शक्ति-सर्वस्व वेचलें आहे. यामध्यें त्याची सौंदर्यान्वेषिणी दृष्टि व कलाभिज्ञता स्पष्टपणें दिसून येते. एखादा कुशल चित्रकार आपल्या कलमाच्या चार सहा फटकाऱ्यांनी एखादी रम्य आकृति निर्माण करतो, त्याप्रमाणें कालिदासाने यांतील प्रत्येक श्लोकांत मोजक्या शब्दांनी एक एक मनोहर चित्र काढलें आहे. यांतील शब्दरचना पैलू पाडलेल्या हिऱ्याप्रमाणें निर्दोष व उज्ज्वल झाली आहे, यांतील अर्थरूपी रत्नांना उपमा, उत्प्रेक्षा, अर्थान्तर-न्यास इत्यादि सुंदर अलंकारांचें कोंदण लाभल्यामुळें तीं अधिकच खुलून दिसतात. कालिदासाने एवढेंच काव्य रचलें असते तरी त्याची जगांतील अत्युत्कृष्ट कवींमध्यें गणना झाली असती इतकें हें काव्य सरस उतरलें आहे. वर दिलेल्या सारांशांत उद्धृत केलेल्या श्लोकांवरून वरील विधानाची प्रतीति वाचकांस पाहतां येईल. तथापि आणखीही कांही उदाहरणें देतां येतील.

चर्मण्वती (चंबळा) नदीचें वर्णन करतांना यक्ष मेघास म्हणतो–

त्वय्यादातुं जलमवनते शार्ङ्गिणो वर्णचौरे
तस्याः सिन्धोः पृथुमपि तनुं दूरभावात्प्रवाहम्।
प्रेक्षिष्यन्ते गगनगतयो नूनमावर्ज्य दृष्टी-
रेकं मुक्तागुणमिव भुवः स्थूलमध्येन्द्रनीलम्॥ मेघ० ४८.

'त्या नदीचा प्रवाह मोठा आहे तरी आकाशांतून पाहणाऱ्या लोकांस तो अरुंदच दिसतो; त्यामुळें कृष्णाच्या वर्णाची चोरी करणारा (म्हणजे तत्स-दृशकृष्णवर्ण असा) तूं त्या नदीचें जल प्राशन करण्याकरितां वाकला असतां गगनचारी लोकांची दृष्टि तुजकडे आकर्षित होऊन आपण भूमीचा मध्ये इंद्रनील मणि घातलेला मोत्यांचा एकसरच जणूं कांही पाहतों आहों असें त्यांस वाटेल.' यांत नदीच्या शुभ्र जलप्रवाहावर मेघ वाकला असतां त्यावर केलेली इन्द्रनीलमध्यमणियुक्त मुक्ताहाराची उत्प्रेक्षा किती हृदयंगम आहे बरें !

हिमालयावर वसलेल्या अलकेचें वर्णन पहा—

तस्योत्संगे प्रणयिन इव स्रस्तगंगादुकूलां
न त्वं दृष्ट्वा न पुनरलकां ज्ञास्यसे कामचारिन्।

या यः काले वहति सलिलोद्गारमुच्चैर्विमाना
मुक्ताजालग्रथितमलकं कामिनीवाभ्रवृन्दम् ॥ मेघ० ६५.

'कामचारीमेघा ! जिच्या अंगावरचें शुभ्र वस्त्र बाजूला सरकलें आहे अशी एखादी स्त्री आपल्या प्रियकराच्या मांडीवर बसावी, त्याप्रमाणें हिमालयाच्या उत्संगावर वसलेली व जिच्या बाजूने गंगानदी वाहत आहे अशी अलकानगरी दृष्टीस पडतांच तिला तूं ओळखल्याशिवाय राहणार नाहीस. वर्षाकालीं उच्च हर्म्यावर जल वर्षणाऱ्या मेघसमूहाच्या योगाने ती मोत्याची जाळी केशकलापांत घातलेल्या मुग्ध स्त्रीसारखी दिसत असते.' या श्लोकांत श्लेष व उपमा यांचा सुंदर संयोग झाला आहे.

'कुमारसंभवा'प्रमाणें या काव्यांतही कवीने ठिकठिकाणीं उचित अर्थान्तरन्यासांचा उपयोग केला आहे. 'कामार्त्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु' [प्रेमविव्हल झालेले लोक सचेतन व अचेतन वतूंस्मधील भेद जाणण्यास असमर्थ असतात ; 'रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय' [रिक्त (जलादिरहित, पक्षीं दरिद्री) असलेल्या सर्वांना हलकेपणा प्राप्त होतो, पूर्णतेपासून (पक्षीं श्रीमंतीमुळें) गौरव (जडपणा, पक्षीं मान) मिळतो]; 'स्त्रीणामाद्यं प्रणयवचनं विभ्रमो हि प्रियेषु' [हावभाव हेंच स्त्रियांच्या प्रियजनविषयक प्रेमाचे प्रथमोद्गार होत]; 'प्रायः सर्वो भवति करुणावृत्तिरार्द्रान्तरात्मा' [ज्यांचें अन्तःकरण (पक्षीं अन्तर्भाग) आर्द्र आहे असे प्रायः सर्व कनवाळू असतात]—इत्यादि सामान्य वचनांनी कवीच्या वर्णनाला ठिकठिकाणीं उत्तम रंग आला आहे.

या काव्यांत सर्वत्र विप्रलम्भ शृंगाराचें साम्राज्य दृष्टीस पडतें. विशेषतः उत्तर भागांत यक्ष आपल्या पत्नीची व आपली विरहावस्था वर्णन करतो ते श्लोक अत्यंत कारुण्योत्पादक उतरले आहेत. यक्षपत्नीच्या वर्णनांत कालिदासाने आदर्श गृहिणीचें सुंदर चित्र काढलें आहे. कालिदासाच्या इतर नायिकांप्रमाणें ती अत्यंत सुंदर तर आहेच; शिवाय ती विविधकलानिपुण, सहृदय व प्रेमळ अशी पतिव्रता आहे. अशा स्त्रीच्या विरहावस्थेचें चित्र कवीने मोठ्या कौशल्याने व हलक्या हाताने काढलें आहे.

या काव्यांत सर्वत्र कवीने मन्दाक्रान्ता वृत्ताचा उपयोग केला आहे. 'कुमारसंभवा'त कालिदासाने अनुष्टुभ्, उपेन्द्रवज्रा, वियोगिनी, रथोद्धता

यांसारख्या आटोपशीर व रचण्यास सुलभ अशा वृत्तांची योजना केली होती. या वृत्तांपेक्षा मन्दाक्रान्ता हें मोठें व रचण्यास अवघड आहे; पण यांत एखादी कल्पना पूर्णत्वाने मांडण्यास पुरेसा अवकाश सांपडतो व त्याच्या नांवाप्रमाणेंच त्याची गतीही मंद असल्याने विप्रलंभशृंगाराच्या वर्णनास योग्य असें तें आहे. कालिदासापूर्वीच्या कवींनी याचा फारसा उपयोग केलेला दिसत नाही. नाही म्हणावयास हरिषेणाच्या प्रयागच्या प्रशस्तीच्या एका त्रुटित श्लोकांत तें योजिलेलें दिसतें. तेव्हा हें वृत्त लोकप्रिय करण्याचें श्रेय कालिदासासच दिलें पाहिजे. कालिदासाने 'मालविकाग्निमित्रां'त त्याचा प्रथम उपयोग केलेला दिसतो. परंतु त्या नाटकांत 'मेघदूतां'तल्याप्रमाणें तें सफाईदारपणाने योजिलेलें दिसत नाही. 'मेघदूत' काव्यांत मात्र आरंभापासून अखेरपर्यंत कालिदासाने त्याचा सारख्याच कौशल्याने उपयोग केलेला दृष्टीस पडतो.

'मेघदूत' काव्यावें विवेचन संपविण्यापूर्वी एकदोन प्रश्नांचा विचार केला पाहिजे. यक्ष ज्या रामगिरीवर येऊन राहिला होता तो कोणता पर्वत याबद्दल विद्वानांत ऐकमत्य झालेलें नाही. कांहींच्या मतें हा रामगिरि म्हणजे मध्यप्रांतांतील सिरगुजा संस्थानांतील रामगढ नामक डोंगर होय. येथे वनवासांत असतांना राम, सीता व लक्ष्मण यांनी स्नान केलें अशी परंपरागत समजूत प्रचलित आहे. व 'मेघदूतां'त (श्लोक१२) वर्णिल्याप्रमाणें येथील एका शिलेवर श्रीरामचंद्राचीं पावलें उमटलेलीं अद्यापि दाखवितात. येथे बरेच प्राचीन अवशेष विद्यमान आहेत. या डोंगरावरच्या सीतावेंगा व जोगिमारा या गुहांत ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांतील कोरीव लेख अद्यापि विद्यमान आहेत, त्यावरून हा डोंगर फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे यांत संशय नाही. तथापि रामगढ हाच रामगिरि हें मत सर्वमान्य होण्यासारखें नाही. कारण हा पर्वत अमरकंटकच्या ईशान्येस आहे, दक्षिणेस नाही. 'मेघदूतां'त यक्षाने 'रामगिरीहून उत्तरेस जातांना प्रथम मालक्षेत्र व नंतर आम्रकूट पर्वत तुला लागेल' असें मेघास सांगितलें आहे. कालिदासाचें बिनचूक भौगोलिक ज्ञान लक्षांत घेतां त्याच्या हातून दिशाविपर्यासाची एवढी ढोबळ चूक झाली असेल असें वाटत नाही. तेव्हा 'मेघदूतां'तील रामगिरीचा शोध दुसरीकडे केला पाहिजे. असा

विचार करतां नागपूरजवळचें 'रामटेक' हाच रामगिरि असावा असें वाटतें. हें स्थानही पुरातन काळापासून फार प्रसिद्ध आहे. येथे वाकाटक नृप द्वितीय प्रवरसेनाचा एक ताम्रपट सांपडला आहे व त्याच राजाच्या वऱ्हाडांतील ऋद्धपूरच्या ताम्रपटांत तर 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' असा स्थलनिर्देश केला आहे. त्यावरूनही वरील बाबतींत संशयास जागा राहत नाही. या पर्वताच्या पायथ्याशीं एक विशाल टेकाड उत्खननाची वाट पाहत आहे. तेथील प्राचीन विटांच्या आकारावरून तें स्थल गुप्तकालीं प्रसिद्ध असावें असा तज्ज्ञांचा तर्क आहे. मालक्षेत्र याच्या उत्तरेस सातपुड्याच्या पठारावर असावें असें वाटतें; कारण कल्याणीच्या चालुक्यांच्या एका उत्कीर्ण लेखांत* द्वितीय आचुगी या राजाने 'माल' देश काबीज केल्यावर जबलपूर जवळच्या त्रिपुरीच्या हैहयांचा पराभव केला आहे असें म्हटलें आहे. असो.

द्वितीय चन्द्रगुप्ताची कन्या व द्वितीय प्रवरसेनाची माता प्रभावतिगुप्ता ही यात्रेच्या निमित्ताने रामटेकास जात असे असें तिच्या ऋद्धपूरच्या ताम्रपटावरून दिसतें. तिच्या बरोबर कालिदासही तेथे गेला असतां त्याला या काव्याची मूळ कल्पना सुचली असावी. या कल्पनेचा विस्तार करण्यांत त्याला रामायणाचें साहाय्य झालें असावें. वाल्मीकीच्या आदिकाव्यांत संपातीने हनुमानादि वानरांस लंकेची वाट सांगितली. नंतर हनुमान सागर ओलांडून लंकेंत गेला. तेथे अशोकवनिकेंत त्याला सीता दिसली. तेव्हा तिची खात्री करण्यासाठी त्याने रामाच्या विरहावस्थेचें वर्णन केलें व रामाने दिलेली अंगठी खूण म्हणून सीतेस दिली, असा कथाभाग आला आहे. रामायणांत रामाच्या विरहावस्थेच्या वर्णनांत खालील श्लोक आले आहेत—

अनिद्रः सततं रामः सुप्तोऽपि च नरोत्तमः।
सीतेति मधुरां वाणीं व्याहरन् प्रतिबुध्यते॥
दृष्ट्वा फलं वा पुष्पं वा यद्यान्यस्त्रीमनोहरम्।
बहुशो हा प्रियेत्येवं श्वसंस्त्वामभिभाषते॥ सुंदरकांड३६, ४४-५.

* *Ep. Ind.* XIX, 227.

यांतील व 'मेघदूतां'तल्या कल्पनांतील साम्य वाचकांच्या लक्षांत येईलच. 'मेघदूतां'तही यक्षाने मेघास अलकेचा मार्ग सांगितला आहे व त्याच्या बरोबर अंगठीसारखी कांही खूण पाठविणें शक्य नसल्याने त्याने मेघास आपल्या कांही आठवणी सांगून त्यायोगें आपल्या पत्नीची खात्री पटविण्यास सांगितलें आहे. शिवाय, " 'मी तुझ्या पतीचा प्रियमित्र आहें व त्याचा संदेश घेऊन तुझ्याकडे आलों आहें' असें तूं म्हटल्याबरोबर उत्कंठित होऊन माझी पत्नी सीतेने मारुतीचा सन्मान केला त्या प्रकारें तुझा सन्मान करील" असें यक्षाने मेघास म्हटलें आहे (मेघ० १०५). त्यावरूनही रामायणांतील वरील प्रसंग कवीच्या मनांत घोळत होता यांत संशय नाही. वर दाखविल्याप्रमाणें रामायण व मेघदूत यांत किंचित् प्रसंगसाम्य व कल्पनासाम्य दिसत असलें तरी इतर ठिकाणीं कालिदासाची प्रतिभा स्वतंत्रपणें मनोहर सृष्टि निर्माण करीत आहे. अलकेच्या मार्गावरचीं नगरें, ग्राम, पर्वत, नद्या वगैरेंच्या, तसेंच अलकेच्या व यक्षगृहाच्या वर्णनांत आणि यक्षपत्नीच्या विरहावस्थेचें शब्दचित्र रेखाटण्यांत कालिदासाची प्रतिभा सर्वस्वीं अनूणी होती यांत संशय नाही.

सेतुबंध

विदर्भांत असतांना कालिदासाने द्वितीय प्रवरसेनास 'सेतुबंध' काव्य रचण्यास मदत केली असावी. हें काव्य 'महाराष्ट्री' नामक प्राकृत भाषेंत लिहिलें असून त्याचे १५ आश्वास म्हणजे सर्ग आहेत. यांत श्रीरामचंद्रांनी सागरावर सेतु बांधून कपिसैन्यासह लंकेवर चाल केली व तेथें घनघोर युद्ध करून रावणाचा वध केला, इतका कथाभाग आला आहे. म्हणून या काव्याला 'दहमुहवहो' (दशमुखवध) असेंही म्हणतात. कालिदासाप्रमाणें प्रवरसेनही शिवोपासक होता असें त्याच्या ताम्रपटांतील उल्लेखांवरून दिसतें. तथापि कालिदासाने 'रघुवंशां'त जसें रामचरित गाइलें आहे, तसेंच प्रवरसेनानेही या काव्यांत केलें असल्यास आश्चर्य नाही. कदाचित् त्याने आपल्या विष्णूपासक मातेच्या आज्ञेवरूनही हें रचलें असेल. काव्याचा विषय रामचरित असल्याने आरंभींचे चार श्लोक विष्णुस्तुतिपर आहेत पण पुढील चार श्लोकांत कवीने आपल्या इष्टदेवतेची–शिवाची–स्तुति केली आहे.

या काव्यांत ठिकठिकाणीं सुंदर कल्पना, मनोहर अलंकार व हृदयंगम वर्णनें आढळतात म्हणून दण्डीने आपल्या 'काव्यादर्श' नामक अलंकारग्रंथांत या काव्याला 'सूक्तिरत्नांचा सागर' असें म्हटलें आहे व बाणकवीने या 'सेतूने' कपिसेनेप्रमाणें प्रवरसेनाची कीर्ति सागर पार करून गेली अशी श्लेषगर्भ स्तुति केली आहे. या काव्यांत कांही ठिकाणीं आपण कालिदासाच्या काव्यांतील कल्पना वाचीत आहों असें वाटतें. उदाहरणार्थ खालील श्लोक पहा.

पढमं विअ मारुइणा हरिसभरिज्जन्तलोअणेण मुहेन ।
जणअतणआपउत्ती पच्छा वाआइ णिरवसेसं सिट्ठा ॥

'मारुतीने आपल्या हर्षोत्फुल्लनयनमुखाने प्रथम सीतेची बातमी रामास कळविली व नंतर ती शब्दांनी निवेदन केली.' ही कल्पना कालिदासाच्या 'रघुवंशां'तही (सर्ग २, ६८) आली आहे. तथापि एकंदरींत अशीं साम्यस्थलें थोडीं आहेत. त्यावरून कालिदासाने हें काव्य स्वतः न रचतां प्रवरसेनाकडून रचविलें असावें किंवा ते तपासून दिलें असावें. काव्य रचतांना प्रवरसेनास पुष्कळच अडचणी येत होत्या, ठिकठिकाणीं चुका होत होत्या त्या दुरुस्त करून पुढे निर्दोष रचना करणें कठीण जात होतें, हें त्याने स्वतःच खालील श्लोकांत सांगितलें आहे—

अहिणवराआरद्धा चुक्कक्खलिएसु विहडिअपरिट्ठविआ।
मेत्तिव्व पमुहरसिआ णिव्वोढुं होइ दुक्करं कव्वकहा ॥

'ज्याप्रमाणें नूतन प्रेमभरांत मैत्री उत्पन्न होते, पुढे अपराधाने तींत खंड पडतो; पण मित्र रसिक असल्यास त्याचें परिमार्जन झाल्यावर ती पूर्ववत् होते, पण एकंदरींत ती शेवटपर्यंत टिकविणें कठीण जातें; तद्वत् नुकत्याच गादीवर आलेल्या राजाने आरंभिलेली व ठिकठिकाणीं चुकांची दुरुस्ती करून निर्दोष झालेली व रसिकांना आकृष्ट करणारी अशी ही कथा अखेरपर्यंत रचणें कठीण जात आहे.' अशा अडचणीच्या वेळीं प्रवरसेनाला कालिदासाची मदत झाली असावी. तथापि ही सर्व कृति कालिदासाची स्वतःची असण्याचा संभव नसल्याने हिचें जास्त वर्णन न करतां आपण कालिदासाच्या यानंतरच्या काव्याकडे वळूं.

रघुवंश

हें काव्य कालिदासाच्या सर्व काव्यग्रंथांत उत्कृष्ट असें गणलें जातें. यांत दृग्गोचर होणारें त्याचें परिणतप्रज्ञत्व व प्रतिभाशालित्व लक्षांत घेतां तें त्याने इतर काव्यांनंतर रचलें असावें याविषयीं संशय राहत नाही. उपलब्ध प्रतींत याचे एकोणीस सर्ग आहेत व त्यांत एकंदर अठ्ठावीस राजांचें वर्णन आलें आहे. त्यांपैकी रघु हा अत्यंत पराक्रमी व दानशूर राजा होऊन गेला त्याच्या वंशांतील राजांचें या काव्यांत वर्णन आलें असल्यामुळें त्याला कवीने 'रघुवंश' असें नांव दिलें आहे.

प्रारंभीं शब्दार्थांचें सम्यग्ज्ञान होण्याकरितां शब्दार्थांप्रमाणेंच नित्य-संबद्ध अशा पार्वतीपरमेश्वरांना वंदन करून कवीने मोठ्या विनयाने आपल्या विषयाचें महत्त्व व त्या मानाने आपलें मंदमतित्व निर्दिष्ट केलें आहे. तो म्हणतो, 'उंच मनुष्याच्या हाताला येईल असें फळ तोडण्या-करितां एखाद्या खुज्या माणसाने हात वर केला असतां जसा तो उपहा-सास्पद होतो, त्याप्रमाणेंच मन्दबुद्धि असूनही कवियशःप्राप्तीची इच्छा करणाऱ्या माझी स्थिति होणार आहे. तथापि अगोदरच ज्यामध्यें छिद्र केलें आहे अशा रत्नांत सूत्राला जाण्याला प्रयास पडत नाही, त्याप्रमाणेंच पूर्वसूरींनी वर्णिलेल्या या वंशांत माझीही गति होणार आहे.' नंतर 'रघुवंशां'तील राजांच्या उदात्त चरित्रांचें सामान्यतः वर्णन करून कवीने 'सुवर्णाची अग्नीमध्यें ज्याप्रकारें परीक्षा होते त्या प्रकारेंच सज्जनांनी माझ्या काव्याची परीक्षा करावी' असें म्हटलें आहे. पहिल्या सर्गांत मनुवंशांतील दिलीप राजाचें वर्णन आलें आहे. दिलीप हा महाकाय, विद्वान्, धार्मिक व शूर असा राजा होता; त्याचें राज्यः समुद्रवलयांकित पृथ्वीवर पसरलें होतें; तरी त्याला पुत्र नव्हता. म्हणून एके दिवशीं अमात्यांवर राज्यकारभार सोपवून आपली सुदक्षिणा नामक प्रियपत्नी व थोडे अनुचर यांसह तो वसिष्ठाश्रमास गेला. तेथे पोचल्यावर त्याने आपलें दुःख ऋषीला निवेदन केलें. तेव्हा वसिष्ठ म्हणाले, "राजा, पूर्वी एके दिवशीं इंद्राला भेटून परत मर्त्यलोकाला येतांना वाटेंत कल्पतरूच्या छायेंत कामधेनु उभी होती तिला प्रदक्षिणा करण्यास तूं विसरलास,

तेव्हा तिने 'माझ्या संततीची सेवा केल्याशिवाय तुला अपत्य होणार नाही' असा तुला शाप दिला. त्यामुळें तुला मूल होत नाही. त्या सुरभीची कन्या नन्दिनी माझ्या आश्रमांत आहे तिची सेवा कर. ती प्रसन्न झाल्यास तुझी इच्छा पूर्ण करील." दिलीपानेही तसें करण्याचा निश्चय केला. (सर्ग १). दुसऱ्या दिवसापासून राजाने आपल्या सर्व अनुयायांस रजा दिली व गोड गवताचा चारा घालणें, पाणी पाजणें, खाजविणें, डांस हाकविणें, पाहिजे तेथे जाऊं देणें, इत्यादि प्रकारें स्वतः नन्दिनीची सेवा करण्यास आरंभ केला. या प्रकारें तीन आठवडे गेल्यावर एके दिवशी नन्दिनीच्या मनांत राजाची परीक्षा पाहण्याचें आलें म्हणून ती हिमालयाच्या गुहेंत शिरली. त्या धेनूवर प्रहार करण्याचें हिंस्र पशूंच्या मनांतही येणें शक्य नाही असें वाटल्यावरून राजा हिमालयाची शोभा पाहण्यांत गर्क झाला होता. इतक्यांत गुहेंतील सिंहाने नन्दिनीवर झडप घातली. धेनूच्या आक्रंदनाने राजाचें लक्ष तिजकडे गेलें व तो सिंहाला ठार मारण्यास भात्यांतून बाण काढणार तोंच त्याचा हात त्याला चिकटून राहिला. तें पाहून सिंह मनुष्यवाणीने राजास म्हणाला "राजा! मी निकुम्भाचा मित्र व शिवाचा एक किंकर आहें. माझें नांव कुम्भोदर. हा समोर देवदार वृक्ष दिसतो आहे ना? तो पार्वतीने स्वतः पाणी घालून वाढविला आहे. एके दिवशीं वन्य गजाने आपल्या गंडस्थलाच्या घर्षणाने याची साल काढली, तेव्हा पार्वतीला फार दुःख झालें. म्हणून श्रीशंकरांनी मला सिंहाचें रूप देऊन, 'गुहेजवळ आलेल्या प्राण्यांस मारून आपली उपजीविका कर' अशी आज्ञा केली. मी सध्या उपोषित आहें व ही गाय माझें भक्ष्य झाली आहे. तेव्हा तुझें येथे कांही चालणार नाही. परत, जा." राजाने म्हटलें 'सर्व स्थावरजंगमात्मक सृष्टीची उत्पत्ति, पालन व लय करणाऱ्या भगवान् शंकरांची आज्ञा मला प्रमाण आहे. पण माझ्या गुरूचें हें गोधन माझ्या समक्ष नष्ट होत असतां त्याची उपेक्षा करणेंही शक्य नाही. म्हणून मी तुला आपला देह अर्पण करतों. त्याचा स्वीकार करून तूं हिला सोड.' 'एका गाईकरितां जगाचें साम्राज्य, आपलें तारुण्य व सुंदर देह यांचा नाश करणें मूर्खपणाचें होणार आहे,' वगैरे सांगून सिंहाने राजाला स्वनिश्चयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, पण

राजा ऐकेना. तेव्हा त्याने त्याचें म्हणणें कबूल केलें. राजाचा बाहु मुक्त झाला व तो सिंहापुढे मान खाली घालून बसला. आता आपल्यावर सिंहाची झडप पडणार असें त्याला वाटलें. पण त्या ऐवजीं आकाशांतील विद्याधरांच्या हातांनी त्याच्यावर पुष्पवृष्टि झाली. तो सिंह नन्दिनीने राजाची परीक्षा पहाण्यासाठी मायेने उत्पन्न केला होता. राजाच्या भक्तीने ती संतुष्ट झाली व पुत्रप्राप्तीकरितां आपलें दुग्ध पिण्याविषयी तिने त्याला सांगितलें. आश्रमास परत आल्यावर राजाने वनांत घडलेला वृत्तांत ऋषीस व स्वपत्नीस निवेदन केला. रात्रीं होम व वत्स यांना दिल्यावर अवशिष्ट राहिलेलें दूध वसिष्ठाच्या अनुज्ञेने राजा व राणी यांनी घेतलें. दुसऱ्या दिवशीं व्रताचें उद्यापन करून ती उभयतां राजधानीस परत गेलीं. (सर्ग २). लौकरच राणी गरोदर राहिली व यथाक्रम पांचही ग्रह उच्चीचे असतां तिला मुलगा झाला. राजाने त्याचें नांव रघु असें ठेवलें. तो सर्वशस्त्रास्त्रांत प्रवीण झाला असें पाहून राजाने त्याला युवराज केलें व अश्वरक्षणार्थ त्याची योजना करून अश्वमेध यज्ञ करण्यास आरंभ केला. याप्रमाणें नव्याण्णव यज्ञ निर्विघ्नपणें समाप्त झाले. शंभराव्या यज्ञाच्या वेळीं इंद्र अदृश्य रूपाने येऊन अश्व घेऊन गेला. नन्दिनीच्या कृपेने रघूस त्याचें कपट दिसून आलें, तेव्हा त्याने इन्द्राला युद्धार्थ आव्हान केलें. पुढे त्यांचें भयंकर युद्ध झालें. रघूच्या शौर्याने संतुष्ट झालेल्या इन्द्राने 'अश्वाशिवाय दुसरा कोणताही वर माग' असें म्हटलें, 'तेव्हा अश्वाशिवाय यथाविधि समाप्त केलेल्या यज्ञाचें पुण्य माझ्या पित्यास मिळावें,' अशी इच्छा रघूने प्रदर्शित केली. इंद्राने तें कबूल केल्यावर रघु परत गेला. यज्ञ समाप्त झाल्यावर दिलीपाने रघूला राज्याभिषेक करून स्वतः सुदक्षिणेसह तपोवनाकडे प्रयाण केलें. (सर्ग ३). रघूने आपल्या सुराज्याने लोकांस दिलीपाचा विसर पाडला. लोकांच्या रञ्जनामुळें त्याची राजा ही पदवी सार्थ झाली. शरदृतु प्राप्त झाल्यावर तो षड्विध सैन्य घेऊन दिग्विजयार्थ निघाला. प्रथम त्याने पूर्व दिशेचे सुह्म, वंग इत्यादि देश जिंकून गंगेच्या प्रवाहांत आपले जयस्तम्भ उभारले. नंतर तो दक्षिणेकडे वळला. कलिङ्ग देशाच्या राजाचा पराभव करून त्याने त्याला मुक्त केलें व करभार देण्यास लावलें, पण त्याचें राज्य काढन घेतलें नाही. पुढे पूर्व

किनाऱ्याने चाल करून त्याने कावेरी पार केली व पाण्ड्य राजांचा पराभव करून त्यांच्याकडून ताम्रपर्णी नदीच्या मुखाशीं मिळणाऱ्या मोत्यांचा करभार घेतला. दक्षिण दिशेचे मलय व दर्दुर पर्वत आक्रमण केल्यावर त्याने सह्य पर्वत ओलांडून केरल व अपरान्त (कोंकण) येथील राजांचा पराजय केला. पुढे पारसीकांना जिंकण्यास तो स्थलमार्गानेच निघाला. नंतर झालेल्या घोर युद्धांत त्याने आपल्या बाणांनी यवनांची लांब दाढी असलेलीं शिरें छाटून त्यांनी भूमि आच्छादून टाकिली. उत्तरेकडच्या दिग्विजयांत हूण, काम्बोज वगैरे देशच्या राजांचा पराजय करून व खंडणी घेऊन तो हिमालयाकडे वळला. तेथील उत्सवसंकेतादि गणांशीं त्याचें युद्ध झाल्यावर त्यांनी त्याचें स्वामित्व कबूल करून त्याला नजराणा दिला. नंतर कामरूप (आसाम) च्या राजाने रत्नरूपी पुष्पांनी त्याच्या पदकांतीची पूजा केली. याप्रमाणें भारतवर्षाच्या चारी दिशांचीं राज्यें जिंकून आणलेली व आपली स्वत:ची सर्व संपत्ति हिचा त्याने विश्वजित् नामक यज्ञांत व्यय केला.(सर्ग ४). विश्वजित् यज्ञानंतर रघूच्या खजिन्यांत अगदीच शिल्लक नव्हती. अशा वेळी वरतन्तु ऋषीचा शिष्य कौत्स हा गुरुदक्षिणेनिमित्त चौदा कोटी सुवर्ण मागण्यास रघूकडे आला. अशा विद्वान् ब्राह्मणास विमुख पाठविण्याने रघूची दुष्कीर्ति झाली असती. राजेलोकांनी अगोदरच शक्य तो कारभार दिला असल्याने त्यांच्याकडून जास्ती मिळणें शक्य नव्हतें, म्हणून रघूने प्रत्यक्ष धनपति कुबेरावर चाल करण्याचा निश्चय केला. तें समजतांच कुबेराने त्याच्या खजिन्यांत सुवर्णाची वृष्टि केली, ती सर्वच सुवर्णाची रास रघूने कौत्सास देऊं केली. पण त्या निःस्पृह ब्राम्हणाने आपल्या गुरुदक्षिणेव्यतिरिक्त एक कवडीही घेतली नाही. पुढे कौत्साच्या आशीर्वादाने रघूस अज नांवाचा पुत्र झाला. तो वयांत आल्यावर विदर्भराजाने आपली भगिनी इन्दुमती हिच्या स्वयंवरार्थ निमन्त्रण केल्यावरून रघूने त्यास सैन्यासह पाठविलें. वाटेंत नर्मदातीरीं अजाने बाण मारल्यामुळें प्रियंवद नामक गन्धर्वाची हस्तियोनींतून मुक्तता झाली. त्याचा मोबदला म्हणून त्याने त्याला संमोहन नामक गान्धर्व अस्त्र दिलें. कुण्डिनपुरास पोचल्यावर अजाचें मोठ्या थाटाने स्वागत झालें. नंतर तो आपल्या शिबिरांत पोचला. त्या रात्रीं अजाला उशीरां निद्रा लागली.

पहाटे त्याला जागृत करण्याकरितां वैतालिकांनी प्रभातवर्णनपर श्लोक रचून म्हटले. हे सर्वच श्लोक अत्यंत उत्कृष्ट असल्याने स्वतः वाग्देवीने हे रचून कालिदासास दिले अशी आख्यायिका प्रचलित आहे. उदाहरणार्थ यांतील दोन खाली दिले आहेत.

ताम्रोदरेषु पतितं तरुपल्लवेषु
निर्धौतहारगुलिकाविशदं हिमाम्भः ।
आभाति लब्धपरभागतयाधरोष्ठे
लीलास्मितं स. शनार्चिरिव त्वदीयम् ॥ रघु० ५, ७०.

'ज्यांचा आंतील भाग तांबडा आहे अशा तरूंच्या (कोमल) पल्लवांवर धुवून स्वच्छ केलेल्या मौक्तिकांप्रमाणें शुभ्र असें दंव पडलें आहे. त्यामुळें तें तुझ्या अधरोष्ठावर पडलेल्या दन्तकान्तियुक्त लीलास्मिताप्रमाणें खुलून दिसत आहे.'

भवति विरलभक्तिर्म्लानपुष्पोपहारः
स्वकिरणपरिवेषोद्भेद शून्याः प्रदीपाः ।
अयमपि च गिरं नस्त्वत्प्रबोधप्रयुक्ता-
मनुवदति शुकस्ते मञ्जुवाक् पञ्जरस्थः ॥ रघु० ५,७४.

रात्रीं केलेला पुष्पोपहार म्लान झाल्यामुळें त्याची रचना विरल झाली आहे. आता दिव्यांच्या प्रकाशाचें वलय दिसत नाही. आणि हा पिंजऱ्यांतील मधुरकंठाचा पोपट तुला जागृत करण्याकरितां आम्ही म्हटलेले श्लोक पुन्हा म्हणत आहे.'

नंतर अज जागृत होऊन व यथाविधि आपलीं नित्यकर्में आटोपून स्वयंवरमंडपाकडे गेला. (सर्ग ५). तेथे अनेक राजे जमले होते. कांही वेळाने बन्दी लोक राजांची स्तुति करीत असतां व उपवनांतील मयूरांना नाचविणारा शंखांचा ध्वनि होत असतां, पालखींत बसून इन्दुमती सखींसह मंडपांत आली. तिला पाहतांच राजेलोकांच्या शृंगारचेष्टा सुरू झाल्या. त्यांचें मनोहर वर्णन कालिदासाने केलें आहे. नंतर इन्दुमतीची सखी सुनन्दा तिला घेऊन प्रत्येक राजाजवळ जाऊन त्याचें वर्णन करूं लागली. या प्रसंगीं निरनिराळ्या देशांच्या राजांचे वैयक्तिक

गुण, त्यांची संपत्ति, त्यांच्या पूर्वजांची कीर्ति, त्यांच्या देशांतील सुंदर स्थळें इत्यादिकांचें अत्यंत रम्य व भौगोलिक दृष्ट्या निर्दोष वर्णन कालिदासाने केलें आहे, तें सर्वच मुळांतून वाचण्यासारखें आहे. उदाहरणार्थ कांही उतारे दिले आहेत.

अंगराजाचें वर्णन करतांना सुनन्दा म्हणते—

अनेन पर्यासयताश्रुबिन्दून् मुक्ताफलस्थूलतमान् स्तनेषु ।
प्रत्यर्पिताः शत्रुविलासिनीनामुन्मुच्य सूत्रेण विनैव हाराः ॥ रघु० ६,२८.

'या राजाने शत्रुस्त्रियांना स्तनांवर मोत्यांप्रमाणें स्थूल अश्रुबिंदु गाळावयास लावून (जणूं काय) सूत्रविरहित त्यांचे हारच त्यांना परत केले आहेत.' या श्लोकांत या राजाच्या शत्रूंच्या स्त्रिया आपले मोत्यांचे हार टाकून देऊन सदैव अश्रु गाळीत असतात असें वर्णन करून अंगदेशच्या राजाने आपल्या शत्रूंचा पुरा निःपात केला असें सुनंदेने मोठ्या खुबीने ध्वनित केलें आहे. इन्दुमती पांड्य राजाजवळ आली त्यावेळीं सुनन्दा म्हणते—

पांड्योऽयमंसार्पितलम्बहारः क्लृप्ताङ्गरागो हरिचन्दनेन ।
आभाति बालातपरक्तसानुः सनिर्झरोद्दार इवाद्रिराजः ॥ रघु० ६,६०.

या श्लोकांत द्रविडवंशीय बृहत्काय व कृष्णवर्ण, पण रक्तचंदनाची उटी लावलेल्या व गळ्यांत लांब मौक्तिकहार घातलेल्या पांड्यराजास, जो प्रातःकाळच्या सूर्यकिरणांनी रक्तवर्ण झाला आहे व ज्याच्या तटावरून जलप्रवाह वाहत आहेत अशा पर्वताची अनुरूप उपमा दिली आहे. मगध, अंग, अवन्ति, अनूप, शूरसेन, कलिंग इत्यादि देशांच्या राजांचें मोहक वर्णन सुनंदेने केलें, तथापि त्यांपैकी एकही इंदुमतीच्या मनास येईना. तेव्हा शेवटीं ती अजाजवळ आली. त्यावेळीं मात्र सर्वांगसुंदर अशा त्या राजपुत्रास पाहून इंदुमतीचें मन तात्काळ त्याजकडे आकृष्ट झालें. तें पाहून सुनन्देनेही त्याचें सविस्तर वर्णन केलें व शेवटीं 'कुल, रूप, यौवन, विनयादि गुण यांनी हाच तुला योग्य आहे. यालाच तूं वर; रत्नाला सुवर्णाचें कोंदण मिळूं दे', असा तिला उपदेश केला. इन्दुमतीचें प्रेम त्याच्यावर बसलेलें पाहून ती

थट्टेने तिला म्हणाली 'आर्ये, चला आपण दुसऱ्या राजाकडे जाऊं'. पण तें आता इन्दुमतीला थोडेंच रुचणार ! ती तिच्याकडे रागाने पाहूं लागली. अशा, अज-इन्दुमतीच्या या अनुरूप संयोगामुळें सर्व पौरजनांना आनंद झाला. (सर्ग ६). नंतर त्या दोघांना घेऊन विदर्भाधिपतीने आपल्या नगरात प्रवेश केला. त्यावेळीं झालेल्या पौरस्त्रियांच्या धांदलीचें कालिदासाने फार सुंदर वर्णन केलेलें मागे सांगितलेंच आहे. पुढे अज–इन्दुमतीचा यथाविधि विवाह झाला. नंतर विदर्भाधिपतीने अजाला इन्दुमतीसह स्वदेशास परत जाण्याविषयीं अनुज्ञा दिली. आपल्याला इन्दुमती न मिळाल्यामुळें क्रुद्ध झालेल्या राजांनी अजाला वाटेंत गांठून त्याजबरोबर भयंकर युद्ध केलें. अजाचें सैन्य थोडें असल्यामुळें पराभव पावून पळूं लागलें. तरी अज रणभूमीवर शौर्याने लढत होता. शेवटीं सर्व राजांनी आपलीं सैन्यें एकत्र करून सर्व प्रकारच्या आयुधांनी एकदम त्याजवर निकराचा हल्ला केला. तेव्हा अजाने प्रियंवद गन्धर्वाने दिलेल्या संमोहनास्त्राचा प्रयोग करून त्या सर्वांना रणभूमीवर गाढ निद्रावश करविलें व या प्रकारें त्यांचा पराभव करून तो इंदुमतीसह अयोध्येस जाऊन पोहोंचला. (सर्ग ७). नंतर रघूने त्याला गादीवर बसविलें व आपण आपल्या पूर्वजांप्रमाणें तपश्चर्येकरितां अरण्यांत जाण्याची तयारी केली. पण अजाला आपल्या पित्याच्या वियोगाची कल्पना दुःसह झाली. तेव्हा त्याच्या अत्याग्रहावरून नगराबाहेर एका स्थली तो राहूं लागला. अजाकरितां कांही वर्षें याप्रकारें घालविल्यावर रघु आपल्या योगाभ्यासाने सायुज्य मुक्ति मिळविता झाला. कांही काळाने अजाला दशरथ नांवाचा पुत्र झाला. एके दिवशीं इन्दुमतीसह तो नगरोपवनांत विहार करीत असतां भगवान् नारद आकाशमार्गाने गोकर्णस्थ शंकरांच्या दर्शनार्थ जात होते, त्यांच्या वीणेवरची दिव्य पुष्पांची माला वाऱ्याने निसटून इन्दुमतीच्या वक्षःस्थलावर पडली. त्याबरोबर ती तात्काळ गतप्राण झाली. तें पाहून अजाला अत्यंत दुःख झालें. तो नानाप्रकारें तिचे गुण आठवून शोक करूं लागला.

त्यागिय यदि जीवितापहा हृदये किं निहिता न हन्ति माम् ।
विषमप्यमृतं क्वचिद्भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया ॥ रघु० ८,४६.

' हत्या मालेनें जर मृत्यु येत असेल तर मी ही स्वतः हृदयावर ठेविली

असतां मला कां मारीत नाही ? अथवा ईश्वरेच्छेने विषाचें अमृत व अमृताचें विष होतें हेंच खरे. '

गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ ।
करुणाविमुखेन मृत्युना हरता त्वां वद किं न मे हृतम् ॥ रघु० ८,६७.

' तूं माझी गृहिणी, मन्त्री, एकान्तांतील सखी व ललितकलाप्रयोगाच्या वेळची प्रियशिष्या होतीस. निर्दय मृत्यूने तुला नेऊन माझे कोणतें नुकसान केले नाही ? ' राजाचा शोक कमी होईना असें पाहून त्याच्या गुरूने आपल्या शिष्याबरोबर त्यास संदेश पाठविला. "जन्मलेल्या सर्व प्राण्यांस मृत्यु हा ठेवलेलाच आहे. तू शोकाने देहत्याग केलास तरी तुला इन्दुमती मिळणार नाही, कारण 'परलोकजुषां स्वकर्मभिर्गतयो भिन्नपथा हि देहिनाम्' (रघु० ८, ८५). [परलोकांतील प्राण्यांची गति स्वकर्मानुसार भिन्नभिन्न असते.] स्वतःच्या आत्म्याचा व देहाचाही वियोग होणार आहे, तर मग बाह्य विषयांच्या वियोगाने शहाण्या मनुष्याचें चित्त कां व्यथित व्हावें ? म्हणून तूं शोकवश होऊं नको,' पण या उपदेशाने राजाचें समाधान झाले नाही. तथापि कुमार दशरथ अगदी अल्पवयस्क होता म्हणून त्याने आठ वर्षे कशीं बशीं घालविलीं व तो वयांत आल्यावर त्याने सरयू व गंगा यांच्या पवित्र संगमावर प्रायोपवेशनाने देह ठेविला. (सर्ग ८). दशरथाने गादीवर बसल्यावर अत्यंत न्यायाने राज्य केलें त्याच्या राज्यांत रोगाचेंही नांव नव्हतें, मग शत्रूची स्वारी कशी व्हावी ? राजाला मृगया, द्यूत, सुरा व परस्त्री यांपैकी कसलेंही व्यसन नव्हतें. त्यामुळें त्याच्या राज्यांतील प्रजा अतिशय सुखी होती. त्याला कौसल्या, सुमित्रा व कैकेयी अशा तीन स्त्रिया होत्या. एकदा वसन्तसमय प्राप्त झाला असतां राजाला मृगया करण्याची इच्छा झाली, तेव्हा सचिवांच्या अनुज्ञेने तो वनांत गेला. त्याच्या मृगयेचें कालिदासाने फार सुंदर वर्णन केले आहे. मृगया करतां करतां अरण्यांत रात्र झाली म्हणून राजा तेथेच राहिला. पहाटे तमसा नदीच्या तीरावर वृद्ध मातापितरांचा एकुलता एक मुलगा घट भरत असतां हत्तीची भ्रांति होऊन राजाने बाण मारला, तो वर्मी लागून तो मुलगा खाली पडला. तें कळतांच त्या वृद्ध पित्याने तुलाही माझ्याप्रमाणे

वृद्धापकाळीं पुत्रशोकाने मृत्यु येईल असा शाप दिला व स्वतः अग्नि-काष्ठें भक्षण केलीं. (सर्ग ९).

यापुढच्या सहा सर्गांत कालिदासाने रामकथा वर्णिली आहे. ती सर्वश्रुत असल्याने सविस्तर देण्याची जरूरी नाही. दशरथाने पुष्कळ वर्षें राज्य केलें तरी त्याला पुत्र होईना, म्हणून ऋष्यशृंगादि ऋषींनी त्याच्या-करितां पुत्रकामेष्टि याग करण्यास आरंभ केला. त्याचवेळीं रावणाच्या जाचास कंटाळून देव विष्णूस शरण गेले व त्यांनी त्याची स्तुति केली. विष्णूने अवतार घेऊन रावणाचा वध करण्याचें वचन दिलें. त्यानंतर यज्ञांतील चरु भक्षण केल्यावर कौसल्येस राम, सुमित्रेस लक्ष्मण व शत्रुघ्न आणि कैकेयीस भरत हे पुत्र झाले. (सर्ग १०). ते कुमारावस्थेंत असतांना विश्वामित्र ऋषि यज्ञरक्षणार्थ रामलक्ष्मणांस स्वाश्रमास घेऊन गेला. वाटेंत रामाने ताटकेचा वध केला. यज्ञसमाप्तीनंतर विश्वामित्राबरोबर ते मिथिला नगरीस गेले. तेथे रामाने शिवधनुभंग केल्यावर त्या चारही भावांचा तेथे विवाह झाला. परत जातांना रामाने परशुरामाचा पराभव केला. (सर्ग ११). कैकेयीने वर मागितल्यावरून राम, लक्ष्मण व सीता वनवासास गेले. पंचवटीत रहात असतां रामाने खरादि राक्षसांचा वध केला. पुढे रावणाने मुनिवेषाने येऊन सीताहरण केलें. नतर सुग्रीवाशी सख्य करून व समुद्रावर सेतु बांधून रामाने कपिसैन्यासह लंकेवर चाल केली व रावणाचा वध केला. सीताशुद्धीनतर बिभीषण, लक्ष्मण, सीता इत्यादि-कांसह राम विमानमार्गें निघाला. (सर्ग १२). विमानांतून जातांना पूर्वी ज्या ज्या स्थलीं राम, लक्ष्मण व सीता यांनी वास केला होता त्या सर्व स्थलांचें मनोहर वर्णन कवीने तेराव्या सर्गात केलें आहे.पुढील सर्गांत रामा-दिकांचा अयोध्याप्रवेश, सीतेच्या चारित्र्याविषयीं जनापवाद, रामाज्ञेने लक्ष्मणाने वाल्मीकीच्या आश्रमाजवळ केलेला तिचा त्याग व तिने लक्ष्मणा-बरोबर रामास पाठविलेला संदेश इत्यादि विषय कवीने वर्णिले आहेत. सीतेच्या संदेशांत तिचा कोमल स्वभाव, करुणावस्था, पातिव्रत्य हीं उत्कृष्ट रीतीने प्रतिबिम्बित झालीं आहेत. ती म्हणते—

साहं तपः सूर्यनिविष्टदृष्टिरूर्ध्वं प्रसूतेश्चरितुं यतिष्ये ।
भूयो यथा मे जननान्तरेऽपि त्वमेव भर्ता न च विप्रयोगः ॥ रघु० १४,६६

निष्कारण आपला त्याग करणाऱ्या पतीविषयीं असे उद्‌गार एका आर्य स्त्रीच्याच मुखातून निघतील ! पधराव्या सर्गांत शंबूकवध, कुशलवांचें रामाच्या सभेंत रामचरितगायन, पुढे भूमीच्या उदरांत सीता अदृश्य होणें, रामादिकांचें स्वर्गगमन, इत्यादि विषय आले आहेत.

निर्याणापूर्वी रामाने आपल्या राज्याचे विभाग करून त्यांवर आपल्या व भावांच्या मुलांची योजना केली होती. त्याप्रमाणें कुश दक्षिण कोसलांत कुशावती येथे राज्य करीत होता. रामानंतर अयोध्यानगरीची वाताहत झाली. एके दिवशीं मध्यरात्री कुश बिछान्यावर पडला असतां त्याला एका प्रवासी तेजःपुंज स्त्रीची आकृति आपल्या खोलींत दिसली. ती अयोध्यानगरीची अधिदेवता होती. तिने रामराज्यांत ती नगरी कशी सुसमृद्ध होती, पण रामनिर्याणानंतर तिची कशी शोचनीय अवस्था झाली, याचें अत्यंत हृदयस्पर्शि वर्णन केले व कुशाला परत अयोध्येस जाण्याविषयीं आग्रह केला. त्याप्रमाणें कुश स्वजनांसह निघाला. अयोध्येस पोचल्यावर एके दिवशीं अन्तःपुरस्त्रियांसह जलविहार करीत असतां अगस्त्यमुनीने रामास दिलेलें व रामापासून कुशास प्राप्त झालेलें दिव्य कंकण सरयू नदीत पडलें. पाणबुड्यांनी पुष्कळ प्रयत्न केला तरी तें सापडेना. तेव्हा 'कुमुद' नांवाच्या नागाने तें लपविलें असावें असें वाटून कुशाने गरुडास्त्राची योजना केली त्यामुळें त्रस्त होऊन तो नागराज त्या डोहांतून वर आला व कुमुद्वती नामक आपल्या कन्येसह त्याने तें कुशास अर्पण केलें. (सर्ग १६). कुशाला कुमुद्वतीपासून अतिथि नामक पुत्र झाला. तो त्याच्या नंतर गादीवर बसला. तो अर्थशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें दिवसरात्रीचे विभाग करून आपलीं कर्तव्यें पार पाडीत असे. तारुण्य, रूप, संपत्ति इत्यादि सर्व अनुकूल असतांही तो गर्विष्ठ झाला नाही. त्याचें वर्तन राजनीतीत सांगितल्याप्रमाणें असे. (सर्ग १७). अठराव्या सर्गांत बावीस राजांचें वर्णन आलें आहे. त्यांपैकी पहिल्या एकवीस राजांच्या वर्णनास कवीने प्रत्येकीं एक दोन श्लोकच दिले आहेत. शेवटचा सुदर्शन राजा बाळपणांतच गादीवर आला. तो अल्पवयस्क असला तरी अमात्यांच्या साहाय्याने त्याने राज्यकारभार कसा चालविला होता याचें सुंदर वर्णन या सर्गाच्या शेवटीं आलें आहे. यानंतरच्या व उपलब्ध प्रतींतील

शेवटच्या सर्गांत सुदर्शन राजाचा मुलगा अग्निवर्ण याचें वर्णन कवीने सविस्तरपणाने केलें आहे. त्याच्या पित्याने सर्व शत्रूंचा मोड केला असल्याने राज्यरक्षणार्थ अग्निवर्णाला मुळीच प्रयास पडले नाहीत. त्याने काही वर्षे राज्यकारभार पाहिला; पण पुढे तें काम सचिवांवर सोपवून तो स्त्रियांसह विषयोपभोगांत रममाण झाला. रात्रंदिवस अन्तःपुरांत विहार करतांना त्याला आपल्या प्रजेची कधीच आठवण झाली नाही. मन्त्र्यांनी विशेष आग्रह केला म्हणून खिडकीतून एक पाय बाहेर काढून त्याने तद्द्वारा प्रजेला दर्शन दिलें! या अत्यंत विषयासक्त, व्यसनी राजाच्या विलासांचें कालिदासाने केलेलें सविस्तर वर्णन वाचून अग्निवर्णाच्या वर्तनाची किळस येते, तथापि कवीच्या वर्णनशक्तीबद्दल आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. अग्निमित्र स्वतः अत्यंत कलाकुशल होता. वेश्या नृत्य करीत असतां तो स्वतः मृदङ्गवादनाने त्यांच्या नर्तनांतील दोष दाखवून त्यांना लज्जित करीत असे. केवळ अन्तःपुरांतील स्त्रियांचा उपभोग घेऊन संतुष्ट न झाल्यामुळें त्याची दृष्टि सुंदर दासी व वेश्या यांजकडेही जात असे. स्त्रीसंग व सुरापान यांनी त्याची प्रकृति खालावली व त्याला क्षयाचा विकार जडला. वैद्यांनी उपदेश केला तरी तो स्त्रीसंगापासून निवृत्त होईना, कारण 'स्वादुभिस्तु विषयैर्हृतस्ततो दुःखमिन्द्रियगणो निवर्तते।' (रघु० १९,४९). [इन्द्रियांना रम्य विषयांची एकदा चटक लागली की त्यांपासून त्यांना निवृत्त करणें कठीण जातें.] राजाचें दर्शन बरेच दिवस न झाल्यामुळें प्रजेला त्याच्या प्रकृतीविषयीं काळजी लागली, तथापि सचिवांनी त्याच्या रोगाची वार्ता पसरूं दिली नाही. शेवटीं तो मृत्यु पावल्यावर त्याला नगरोपवनांत त्यांनी गुप्तपणें अग्निसंस्कार दिला व त्याची राणी गर्भवती असल्याने तिलाच राज्याभिषेक करून तिच्या नांवाने राज्यकारभार चालविला. (सर्ग १९).

एकोणिसाव्या सर्गाचा शेवट आकस्मिकपणें झालेला दिसतो. कांही वर्षांपूर्वी धारानगरीत 'रघुवंशा'चे सव्वीस सर्ग असल्याची बातमी एका शास्त्रीबुवांनी प्रसिद्ध केली होती व कै. रा. ब. शं. पां. पंडित यांनीही उज्जयिनींत 'रघुवंशा'चे वीस ते पंचवीस हे सर्ग विद्यमान असल्याचें ऐकलें होतें. तथापि ते अद्यापि प्रकाशित झाले नाहीत, त्यामुळें या वार्तांवर विश्वास ठेवतां येत नाही. कवीने यापुढील सर्ग लिहिले नसल्यास त्याचें

कारण त्याचें आजारीपण अगर मृत्यु हें असावें. कारण कांही असलें तरी 'कुमारसंभवा'प्रमाणें हेंही काव्य कवीच्या हातून अपूर्णच राहिलें असावें, असें दिसतें. 'विष्णुपुराणां'त अग्निवर्णानंतर आणखी आठ राजांचें वर्णन आलें आहे. असो.

'रघुवंश' हें काव्य अत्यंत उत्कृष्ट असून इतर काव्यांच्या मानानें साध्या भाषेंत लिहिलें असल्याने आबालवृद्ध संस्कृतज्ञांस सारखेंच प्रिय झालें आहे. यावर लिहिलेल्या तेहेतीस टीकांचीं नांवें प्रसिद्ध आहेत त्यावरूनही त्याची लोकप्रियता व्यक्त होते. कालिदासाने इतरही उत्कृष्ट काव्यें व नाटकें लिहिलीं असलीं तरी संस्कृत ग्रंथकार व सुभाषितकार त्याचा 'रघुकार' म्हणूनच उल्लेख करतात, यावरूनही या काव्याचें उत्कृष्टत्व प्रत्ययास येतें.

'कुमारसंभव' व 'मेघदूत' हीं या पूर्वीचीं काव्यें अधिक प्रमाणबद्ध व आटोपशीर आहेत. 'कुमारसंभवां'त एकाच नायकाच्या–भगवान् शंकराच्या–चरित्रांतील एका विशिष्ट प्रसंगाचें वर्णन करावयाचें होतें. तसेंच 'मेघदूतां'तही एकाच नायकाच्या व नायिकेच्या विरही अवस्थेचें शब्दचित्र रेखाटावयाचें होतें. त्यामुळें हीं दोन्ही काव्यें रचनेच्या दृष्टीने सुटसुटीत झालीं आहेत. 'रघुवंशा'चें तसें नाही. त्यांत एकंदर तीस राजांचें वर्णन आलें आहे व हे राजे सामान्यतः शूर, न्यायी, विद्वान्, संयमी व दातृत्वशाली असले तरी त्यांच्या चरित्रांतील भिन्न भिन्न प्रसंगांच्या वर्णनांत एकसूत्रीपणा व प्रमाणबद्धता राहणें शक्य नाही. तथापि दुसऱ्या एका दृष्टीनें पाहिल्यास तें त्यांच्यापेक्षा सरस आहे यांत संशय नाही. 'कुमारसंभव' व 'मेघदूत' यांतील नायक दैवी किंवा अतिमानुष कोटींतले. त्यांच्या विचारविकारांच्या वर्णनांत वाचकांस तितकासा आपलेपणा वाटणें शक्य नाही. याच्या उलट 'रघुवंशां'त कांही ठिकाणीं कवीने अद्भुतत्वाची जोड दिली असली, तरी यांतील नायक या भूतलावर वावरणाऱ्या व्यक्ति होत्या. त्यांच्यापैकी बहुतेकांचीं चरित्रें उदात्त असलीं तरी केवळ अद्भुतरसपूर्ण नाहीत. त्यामुळें वाचकांस त्यांच्याविषयीं कुतूहल, आदर व सहानुभूति वाटल्याशिवाय राहत नाही. या काव्याच्या रचनेंतही

कवीची कल्पकता दिसून येते. दिलीपापासून दशरथापर्यंत 'रघुवंशां'तील राजे एक एक गुणांत श्रेष्ठ असे दाखविले आहेत. दिलीप हा भक्तिमान्, रघु दानशूर, अज प्रेमळ व दशरथ राजगुणसंपन्न होता. पण रामाच्या स्वभावांत या सर्वच गुणांचें मधुर मिश्रण झालें होतें. रामाच्या चरित्रांत सीतेला झालेल्या अन्यायामुळें, किंवा दुसऱ्या कांही कारणामुळें, त्याच्यानंतर 'रघुवंशा'च्या ऐश्वर्याला ओहोटी लागली. पहिल्या एक दोन पिढ्यांत–कुश व अतिथि यांच्या राजवटींत–पूर्वजांच्या पुण्याईने व कांही अंशीं त्या राजांच्या वैयक्तिक गुणामुळें तो ऱ्हास जाणवला नाही. पण त्यापुढे त्याची गति वाढत गेली. अतिथीनंतरच्या एकवीस राजांच्या आयुष्यांत वर्णन करण्यासारखा प्रसंग कवीला दिसला नाही व त्यानंतर गादीवर आलेल्या अग्निवर्ण राजाने तर विषयोपभोगांत निमग्न होऊन आपल्या पूर्वजांचें शुभ्र यश कलंकित केलें. प्रजेच्या रक्षणाची, पोषणाची व शिक्षणाची पितृवत् काळजी घेणारा इंद्रियनिग्रही दिलीप राजा आणि रात्रंदिवस विषयोपभोगांत मग्न असणारा व प्रजेने दर्शनार्थ धरणें धरल्यावर मन्त्र्यांच्या आग्रहावरून खिडकींतून एक पाय बाहेर काढून 'याच्या दर्शनाने आपली तहानभूक भागवा' असें प्रजेस सांगणारा अग्निवर्ण राजा, यांच्या चरित्रांतील जमीनअस्मानाचा फरक सर्व साधारण वाचकासही जाणवल्याशिवाय राहत नाही. कालिदासाने दोघांचींही चरित्रें सारख्याच कुशलतेने रंगविलीं असलीं, तरी समाजापुढे त्याला कोणता आदर्श ठेवावयाचा होता हें समजणें कठीण नाही.

पहिल्या सर्गाच्या आरंभीं पूर्वसूरीच्या ग्रंथांस अनुसरून मी रघुवंशवर्णन करणार आहें असें कवीने सूचित केलें आहे. यापैकी वाल्मीकिरामायणाचा आधार त्याच्या नऊ ते पंधरा या सात सर्गांस होता हें स्पष्ट आहे. पण इतर ग्रंथ कोणते असावे तें सध्या समजण्यास मार्ग नाही. पुराणांतही या सर्जांची नामावलि दिली आहे, पण तिच्यांत व 'रघुवंशां'तील राजांच्या अनुक्रमांत बराच फरक दिसतो. उदाहरणार्थ, दिलीप व रघु यांच्यामध्यें वाल्मीकिरामायणांत दोन, वायुपुराणांत एकोणीस व विष्णुपुराणांत अठरा राजांची नांवें दिलीं आहेत. शिवाय या ग्रंथांत राजांचीं केवळ नांवेंच दिलीं

आहेत, त्यांच्या चरित्राचें कांहींच वर्णन केलेलें दिसत नाही.* त्यामुळें या ग्रंथकारांविषयीं कवि इतके आदराचे उद्‌गार काढील असें वाटत नाही. तेव्हा दुसरेच कांही ग्रंथ कालिदासापुढे होते असें वाटतें. भासाच्या 'प्रतिमा'नाटकांतही दिलीपापासून दशरथापर्यंतचा राजक्रम 'रघुवंशां'तल्या प्रमाणेंच दिला आहे, त्यावरूनही दोघांही कवींनी समान ग्रंथांचा उपयोग केला होता हें स्पष्ट आहे. 'रघुवंशा'च्या अठराव्या सर्गांत एकवीस राजांची पुराणांतल्याप्रमाणें केवळ नामावळी आली आहे, त्यावरून त्यांच्याविषयीं कालिदासपूर्वकालीन ग्रंथांत कांही विशेष माहिती नसावी असें वाटतें. दिलीप, रघु व अज यांच्या बाबतींतही बऱ्याच अंशीं तीच स्थिति असण्याचा संभव आहे. तसें असल्यास अशा अपूर्ण सामग्रीचा उपयोग करून 'रघुवंशां'तील उदात्त चरित्रांचे उत्तुंग प्रासाद निर्माण करणाऱ्या कवीच्या प्रतिभेचें कौतुक करावें तेवढें थोडें आहे.

अकराव्या शतकांतल्या सोड्ढल कवीने आपल्या 'उदयसुंदरी' नामक चम्पू ग्रंथांत निरनिराळ्या कवींचे विशेष सांगतांना कालिदासाला 'रसेश्वर' अशी संज्ञा दिली आहे व त्याचें रसवर्णननैपुण्य लक्षांत घेतां ती अन्वर्थ आहे यांत संशय नाही. कालिदासाच्या इतर ग्रंथांत एखाददुसऱ्या रसाचा परिपोष केलेला आढळतो. पण प्रायः सर्वच प्रमुख रसांचा परिपोष 'रघुवंशा'शिवाय दुसऱ्या कोणत्याही एका ग्रंथांत दिसत नाही.'रघुवंशां'त मात्र अग्निवर्ण राजाच्या विलासाच्या वर्णनांत शृंगार, रघु, अज व राम इत्यादिकांच्या युद्धाच्या वर्णनांत वीर, अजविलापांत करुण,वसिष्ठ व वाल्मीकि यांच्या आश्रमाच्या आणि संसारनिवृत्त रघूच्या वर्णनांत शांत, हे रस प्रमुखत्वाने आले आहेत. याशिवाय ताडकावधासारख्या प्रसंगाच्या वर्णनांत

---

* पद्मपुराणांत दिलीपापासून दशरथापर्यंतच्या राजांचें वर्णन रघुवंशांतल्याप्रमाणेंच केलें आहे व त्यांत अनेक ठिकाणीं शब्दसाम्य व कल्पनासाम्यही आढळतें म्हणून कालिदासाने आपलें काव्य रचतांना पद्मपुराणाचा आधार घेतला होता असें डॉ. विंटरनिट्झसारखे कित्येक विद्वान् अनुमान करतात. पण तें सयुक्तिक दिसत नाही. पद्मपुराणाने कालिदासाच्या ग्रंथांचा उपयोग केल्यामुळें हें साम्य आलें आहे, हें आम्ही पुढें दाखविलें आहे.

बीभत्सादि रसांच्या किंचित् छटा दृष्टीस पडतात. कवीची भाषा सर्वत्र मधुर व प्रसादयुक्त आहे. ठिकठिकाणीं उपमा, उत्प्रेक्षा, अर्थान्तरन्यास इत्यादि अर्थालंकारांनी तिला नटविलें आहे. कालिदासाचा शब्दालंकारांवर कोठेही फारसा भर दिसत नाही. तथापि नवव्या सर्गांत ग्रीष्मऋतु व दशरथराजाची मृगया यांचें वर्णन करतांना 'यमवतामवतां च धुरि स्थितः,' 'रणरेणवो रुधिरे रुधिरेण मुरद्विषाम्' इत्यादि ठिकाणीं यमक व अनुप्रास या शब्दालंकारांची हौसही त्याने फेडून घेतली आहे. तथापि एकंदरींत कवीने अलंकाराचा अगर वर्णनाचा अतिरेक न होऊं देण्याविषयीं अत्यंत काळजी घेतली आहे. सर्वत्र वाच्यार्थापेक्षा व्यंग्यार्थावरच भर दिला आहे व वृत्तांचा यथोचित उपयोग केला आहे. सुबोध रचना, रम्य अलंकार, मधुर भावतरंग, मनोहर सृष्टिवर्णन इत्यादिकांमुळें 'रघुवंशा'तील राजर्षींच्या उदात्त चरित्राचें हें सर्वांगसुंदर काव्य संस्कृत भाषेत अद्वितीय म्हणून गणलें गेलें आहे.

प्रकरण सहावें

कालिदासाचीं नाटकें

वासन्तं कुसुमं फलं च युगपद् ग्रीष्मस्य सर्वं च यद्
यच्चान्यन्मनसो रसायनमतः सन्तर्पणं मोहनम् ।
एकीभूतमभूतपूर्वमथवा स्वर्लोकभूलोकयो–
रैश्वर्यं यदि वाञ्छसि प्रिय सखे ! शाकुन्तलं सेव्यताम् ॥

जर्मन कवि गटे

'मालविकाग्निमित्र' नाटकाच्या प्रस्तावनेंत सूत्रधाराने 'या वसन्तोत्सवांत कालिदासाचें 'मालविकाग्निमित्र' नामक नाटक करावें अशी विद्वत्परिषदेची मला आज्ञा झाली आहे' असें म्हणतांच परिपार्श्वक विचारतो, 'प्रथितयश अशा भास, सौमिल्ल, कविपुत्र इत्यादिकांचीं

नाटकें टाकून या आधुनिक कालिदास नामक कवींच्या नाटकाविषयीं विद्वानांना इतका आदर कां बरें असावा ?' त्यावर सूत्रधार म्हणतो—

पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ।
सन्तः परिक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ॥ मालं० १,२

'जुनीं काव्यें तेवढीं चांगलीं, नवें काव्य मात्र सदोष, असा कांही नियम नाही. सज्जन लोक परीक्षा करून त्यांतील चांगले असेल तेंच स्वीकारतात; मूर्ख माणसें मात्र दुसऱ्याच्या मताप्रमाणें चालणारीं असतात.' या संभाषणांत कवीने आपलें नाटक भासादि प्राचीन व प्रसिद्ध कवींच्या नाटकांपेक्षा गुणाने श्रेष्ठ आहे असें रसिकांस आत्मप्रत्ययाने सांगितलें आहे. त्यांत किती तथ्य आहे तें पाहण्यासाठी कालिदासपूर्वकालीन कवीच्या नाट्यवाङ्मयाचा थोडक्यांत परामर्श घेतला पाहिजे.

इतर भारतीय शास्त्रे व कला यांप्रमाणेंच नाट्यकलाही अत्यंत प्राचीन काळीं यज्ञकर्मांच्या अनुषंगाने हिंदुस्थानांत अस्तित्वांत आली व उत्क्रांत झाली असें वाटतें. अश्वमेधादि यज्ञप्रसंगीं अवान्तर कर्मांमधील फुरसतीच्या वेळीं शुनःशेपादि प्राचीन आख्यानें म्हटली जात असत असें वैदिक वाङ्मयांतील उल्लेखांवरून दिसतें. अशा प्रसंगीं वैदिक देवतांच्या चरित्रविषयक नाटकांचा प्रयोग होत असावा. हीं नाटकें अर्थातच उत्तरकालीन नाटकांप्रमाणें सर्वांगपरिपूर्ण नसतील. तथापि त्यांमध्यें संस्कृत नाट्यकलेचें बीज सापडतें यांत संशय नाही. ऋग्वेदादि वेदांचें अध्ययन शूद्रादिकांना निषिद्ध असल्यामुळें त्रेतायुगांत सर्व वर्णांना ज्याचें सारखेंच अध्ययन करतां येईल असा एखादा वेद उत्पन्न करावा अशी इन्द्रादि देवांनी प्रार्थना केल्यावरून ब्रह्मदेवाने नाट्यवेद नांवाचा पांचवा वेद निर्माण केला, अशी प्राचीन आख्यायिका भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्रां'त दिली आहे. त्यावरून वेदबाह्य वर्णांस धार्मिक शिक्षण देणें हाही त्यावेळच्या नाट्यकलेचा एक उद्देश असावा असें वाटतें. तैत्तिरीय ब्राह्मणांतील पुरुषमेधप्रसंगीं दिल्या जाणाऱ्या बलींच्या यादींत शैलूषाचा अन्तर्भाव केला आहे. शैलूष म्हणजे नट. तेव्हा वैदिक व ब्राह्मण काळांत नटांचें व त्यावरून नाट्यकलेचें अस्तित्व सिद्ध होतें. प्रसिद्ध संस्कृत व्याकरणकार पाणिनि हा

पुष्कळांच्या मतें ख्रिस्तपूर्व ६००च्या सुमारास होऊन गेला. त्याच्या अष्टाध्यायींत 'पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुनटसूत्रयोः' (४, ३, ११०) व 'कर्मन्दकृशाश्वादिनिः' (४, ३, १११) या दोन सूत्रांत शिलालि व कृशाश्व यांनी केलेल्या नटसूत्रांचा उल्लेख आहे. ख्रिस्तपूर्व १५० च्या सुमारास होऊन गेलेल्या पतंजलीच्या महाभाष्यांत तर नाटकांचा रंगभूमीवर प्रयोग होत होता याबद्दल साक्षात् पुरावा सापडतो. त्या ग्रंथांत कंसवध, व बलिबंध हीं नाटकें शोभिक किंवा नट करून दाखवीत असें म्हटलें आहे.

भरताच्या नाट्यशास्त्रांत 'अमृतमथन' व 'त्रिपुरदाह' या नाटकांचा व हरिवंशांत कंसवध, प्रलंबवध व चाणूरमर्दन यांचा उल्लेख आला आहे. तथापि हीं प्राचीन नाटकें आता नामशेष झालीं आहेत. काव्यांप्रमाणें नाट्यवाङ्मयांतही अत्यंत प्राचीन उपलब्ध ग्रंथ बौद्धांचेच आहेत. बौद्धधर्मांत प्रथम प्रथम नाट्यकलेवर बहिष्कार घातला होता. तथापि या कलेने समाजाचें मन आकर्षित केलें आहे, त्यामुळें तिचा धर्मप्रसारार्थ चांगला उपयोग करतां येईल असें ध्यानांत आल्यावर बौद्ध लेखक नाट्यकलेचा आदरपूर्वक उल्लेख करूं लागले व स्वतःही नाटकें लिहूं लागले. अशा प्रकारच्या तीन नाटकांच्या हस्तलिखित ताडपत्रांचे कांही लहानमोठे तुकडे सन १९१० मध्यें मध्य आशियांत सांपडले. त्यांपैकी एकाचें नांव 'शारिपुत्रप्रकरण' किंवा 'शारद्वतीपुत्रप्रकरण' असें होतें. तें अश्वघोषाने रचलें होतें असा स्पष्ट उल्लेख त्या नाटकाच्या शेवटच्या पत्रावर केलेला आढळतो. यांत शारिपुत्र व मौद्गलायन्य यांनी बुद्धाचा उपदेश ग्रहण करून बौद्ध धर्म स्वीकारला हा विषय आला आहे. दुसऱ्या दोन नाटकांपैकी एक 'प्रबोधचंद्रोदय' नाटकाच्या धर्तीचें आहे. त्यांत बुद्धि, धृति, कीर्ति व बुद्ध हीं पात्रें आलीं आहेत. तिसरें नाटक 'मृच्छकटिका'सारखें असून त्यांत मगधवती नामक वेश्या, कोमुदगन्ध नांवाचा विदूषक, नायक, दुष्ट (किंवा खलपुरुष) इत्यादि पात्रें दिसतात. उपलब्ध झालेले ताडपत्रांचे खंड अत्यंत लहान असल्यामुळें या नाटकांत कथानकरचना, स्वभावपरिपोष इत्यादिकांत अश्वघोषाने किती प्रगति केली होती हें समजण्यास मार्ग नाहीं.

कालिदासपूर्वकालीन नाटककारांमध्यें अश्वघोषाप्रमाणेंच भासाचाही प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. इ. स. १९१० मध्यें कै. वा. महा-

महोपाध्याय पंडित गणपति शास्त्री यांनी मलबारमध्ये सापडलेलीं तेरा नाटकें प्रकाशित केलीं तोंपर्यंत भासाचें नाव कालिदास, बाण, वाक्पतिराज, राजशेखर, अभिनवगुप्त इत्यादिकांच्या ग्रंथांतील उल्लेखांवरूनच ज्ञात होतें. सध्या उपलब्ध झालेल्या तेरा नाटकांपैकी 'प्रतिमा' व 'अभिषेक' या नाटकांत रामचरित वर्णिलें असल्यामुळें त्यांचीं कथानकें रामायणांतून घेतली आहेत. यांपैकी 'प्रतिमे'चे सहा अंक असून त्यांत रामाच्या यौवराज्याभिषेकापासून वनवास संपल्यावर दशमुखवधानंतर तो सीता-लक्ष्मणादिकांसह अयोध्येस परत आला तेथपर्यंतचा कथाभाग आला आहे. 'मध्यमव्यायोग', 'पंचरात्र', 'दूतवाक्य', 'दूतघटोत्कच', 'कर्णभार' व 'ऊरुभंग' या सहा नाटकांचीं कथानकें महाभारतांतून घेतलीं आहेत. यांपैकी 'पंचरात्रा'चे तीन अंक असून त्यांत, दुर्योधनाने एका यज्ञप्रसंगी द्रोणाचार्यांस पांडवांची बातमी पांच दिवसात लागल्यास त्यांस अर्धे राज्य देण्याचें वचन दिलें होतें, त्याप्रमाणें उत्तरगोग्रहणांत ते प्रगट झाल्यावर त्याने तें दिलें, असें कथानक घातलें आहे. बाकीचीं पांच नाटकें एकांकी आहेत. 'मध्यमव्यायोगां'त भीमाने एका ब्राह्मणाच्या मुलास घटोत्कचाच्या तावडींतून सोडविलें तो प्रसंग, 'दूतवाक्यां'त श्रीकृष्णाची शिष्टाई, 'दूतघटोत्कचां'त अभिमन्युवधानंतर श्रीकृष्णाने कौरवांस पाठविलेला निरोप, 'कर्णभारां'त कर्णाने ब्राह्मणवेषधारी इन्द्रास दिलेलें आपल्या कवचकुण्डलांचें दान, 'ऊरुभंगां'त भीमदुर्योधनयुद्ध व दुर्योधनाचा ऊरुभंग हे विषय वर्णिले आहेत. 'बालचरिता'चे पांच अक असून त्यांत कृष्णाच्या जन्मापासून कंसवधापर्यंतची कथा आली आहे, ती हरिवंशांतून घेतली असावी. 'प्रतिज्ञायौगंधरायण,' व 'स्वप्नवासवदत्त' यांचे अनुक्रमें चार व सहा अंक आहेत व त्यांत उदयनकथा वर्णिली असल्याने त्यांस पैशाची भाषेंतल्या बृहत्कथेचा आधार होता असें दिसतें. राहिलेल्या 'अविमारक' व 'चारुदत्त' या नाटकांचे अनुक्रमें सहा व चार अंक असून त्यांची कथानकें कवीने आपल्या कल्पनाशक्तीने निर्मिली असतील किंवा प्राचीन बृहत्कथेंतूनच घेतलीं असतील.

या तेरा नाटकांपैकी एकाचें 'स्वप्नवासवदत्त' हें नांव हस्तलिखित प्रतींत आढळतें. जल्हणाने 'सूक्तिमुक्तावली'त उद्धृत केलेल्या राजशेखरा-

च्या श्लोकावरून भासाने 'स्वप्नवासवदत्त' नामक नाटक लिहिलें होतें असें दिसतें. त्यावरून, उपलब्ध झालेलें 'स्वप्नवासवदत्त' व तत्सदृश इतर बाराही नाटकें भासाचीं असावीं असा पंडित गणपति शास्त्री यांनी तर्क केला व तो बहुतेक युरोपीय व बऱ्याच हिंदी विद्वानांनी मान्य केला आहे.

अश्वघोष, भास व कालिदास यांच्या नाटकांतील प्राकृत रूपांचा विचार करून भास हा अश्वघोषानंतर व कालिदासापूर्वी होऊन गेला असावा असें विद्वानांनी ठरविलें आहे. शिवाय अश्वघोषाच्या 'बुद्धचरितां'तल्यासारखा (१३, ६०) एक श्लोक भासाच्या 'प्रतिज्ञायौगंधराणां'त आढळतो. कालिदासाच्या वेळीं भास हा बराच प्राचीन होता हें 'मालविकाग्निमित्रा'च्या प्रस्तावनेवरून दिसतें. तेव्हा त्याचा काळ इ. स.चें तिसरें शतक हा मानावा लागतो.

भासाच्या नाटकांत विशेष रचनाकौशल्य दिसत नाही. 'अभिषेक', 'बालचरित', 'दूतवाक्य' इत्यादि नाटकांत रामायण व महाभारत यांतील प्रसंग बहुतेक जसेच्या तसेच घेतले आहेत. 'प्रतिमा', 'पंचरात्र', 'प्रतिज्ञायौगंधरायण', 'स्वप्नवासवदत्त' वगैरे नाटकांत कथानकाच्या सोईकरितां व वैचित्र्यार्थ मूळ गोष्टींत कवीने बरेच फरक केलेले दिसतात; तथापि गुंतागुंतीचें कथानक घेऊन त्याचे धागेदोरे शेवटल्या अंकांत उकलण्याकडे त्याची प्रवृत्ति दिसत नाही. त्याच्या पात्रांचीं संभाषणें चटकदार असून त्यांत त्यांच्या स्वभावाचें प्रतिबिंब स्पष्टपणें पडलेलें दिसतें. या सर्व नाटकांची भाषा, साधी, प्रसादयुक्त व थोडक्यांत पुष्कळ अर्थ व्यक्त करणारी आहे. तींत उपमा, उत्प्रेक्षा, अर्थान्तरन्यास, यथासंख्य यांसारखे कवीला अगदी सहज सुचलेले असेच अलंकार योजिलेले दिसतात. त्यांत कोठेही क्लिष्टता कृत्रिमता व ओढाताण दिसत नाही. भासाने महाभारत, रामायण व बृहत्कथा यांचा चांगलाच अभ्यास केला असल्याने त्यांतील अनेक कल्पना व शब्दप्रयोग त्याच्या नाटकांत दिसतात यांत आश्चर्य नाही. या ग्रंथांच्या अभ्यासामुळें त्याच्या नाटकांतल्या पद्यांत व क्वचित् गद्यांतही 'स्मराम्यवन्त्याधिपतेः सुतायाः' (स्वप्न०) व 'ज्ञायतां कस्य पुत्रेति' (बालचरित) अशा संधीच्या, 'स्त्रीगतां पृच्छसे कथाम्' (पंचरात्र) 'आपृच्छ पुत्रकृतकान्' (प्रतिमा) अशा क्रियापदांच्या व 'रुदन्तीम्' (दूतवाक्य)

'गृहय' (दूतघटोत्कच), 'समाश्वासितुम्' (अभिषेक) या प्रकारच्या धातुसाधितांच्या रूपांच्या चुका आढळतात. तसेंच वरील कारणामुळेंच त्याची कथानकें कृतिमय (full of action) झालेलीं दिसतात. भासाची कल्पनाशक्ति दांडगी होती, तरी विवेचकशक्ति कमी प्रतीची होती असें दिसतें. नाही तर 'पंचरात्रा'च्या प्रथमांकाच्या विष्कंभकांतील अग्नीचें पाल्हाळाने केलेलें वर्णन कथानकास अनावश्यक असल्याने त्याने संक्षेपिलें असतें. तसेंच 'द्वावेव दोर्भ्यां समरे प्रयातौ हलायुधश्चैव वृकोदरश्च' (पंचरात्र) यांतील अर्थाकडे नजर दिल्यावर 'हलायुध' या बलरामाच्या नांवाचें अनौचित्य त्याच्या लक्षांत आलें असतें. अशा प्रकारचीं अनेक स्थळें त्याच्या नाटकांतून दाखवितां येतील. शब्दयोजनेकडे त्याने विशेष लक्ष न दिल्यामुळें त्याच्या नाटकांत नादमाधुर्य कमी आढळतें. तथापि त्याच्या नाट्यकृतीची विविधता, विशालता व सहजरम्यता लक्षांत घेतां कालिदासापूर्वीच्या काळांत त्याचें नांव सर्वांमुखी झालें असल्यास त्यांत नवल नाही.

अश्वघोषाच्या काव्यांप्रमाणें भासाच्या नाटकांचाही कालिदासाने मार्मिकपणें अभ्यास केलेला दिसतो. त्यामुळें त्यांतील कांही रम्य कल्पना कालिदासाच्या प्रतिभेने व नादमधुर शब्दयोजनेने रम्यतर झालेल्या त्याच्या ग्रंथांत दृष्टीस पडतात. अशीं कल्पनासादृश्याचीं एकवीस स्थळें कै. शि. म. परांजपे यांनी 'साहित्यसंग्रहां'तील (भाग १) एका लेखांत दिलीं आहेत. त्याखेरीज आपणही उदाहरणार्थ दोन तीन येथे घेऊं—

१. भास-अथवा सर्वमलंकारो भवति सुरूपाणाम्। प्रतिमा १.
कालिदास-किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम्। शाकु० १.

२. भास-वाचानुवृत्तिः खलु अतिथिसत्कारः। प्रतिमा ५.
कालिदास-भवतीनां सूनृतयैव गिरा कृतमातिथ्यम्॥ शाकु० १.

३. भास-अल्पं तुल्यशीलानि द्वन्द्वानि सृज्यन्ते। प्रतिमा १.
कालिदास-समानयंस्तुल्यगुणं वधूवरं
चिरस्य वाच्यं न गतः प्रजापतिः॥ शाकु० ५.

वरील अत्यंत साम्य असलेलीं स्थळें लक्षपूर्वक पाहिलीं असतां कालिदासाचें शब्दयोजनेंतील कौशल्य लक्षांत येतें. त्याच्या पहिल्या नाटकांतील–'मालविकाग्निमित्रां'तील–कांही प्रसंग त्याला 'स्वप्नवासवदत्ता'वरून सुचले असा-

वेत. तथापि कालिदास जास्त कल्पक, कलाभिज्ञ व सौंदर्यान्वेषी असल्याने त्याचे ग्रंथ भासाच्या ग्रंथांपेक्षा अधिक निर्दोष व रमणीय झाले आहेत. आपल्या नाटकांत अनावश्यक असा एकही प्रसंग किंबहुना एकही पद्य किंवा वाक्य न घालण्याची त्याने काळजी घेतली आहे. शिवाय देवाच्या आयुधांनी मनुष्यरूपाने अवतीर्ण होणें यासारखे अद्‌भुत प्रसंग, रंगभूमीवर प्रत्यक्ष युद्धाचा धागडधिंगा, एकाच पद्याचे भाग निरनिराळ्या पात्रांनी म्हणून तें पुरें करणें, यासारख्या कृत्रिम वाटणाऱ्या गोष्टी व अपाणिनीय व्याकरणप्रयोग त्याने मुद्दाम टाळलेले दिसतात. याप्रमाणें भासाच्या ग्रंथांतील कांही रम्य कल्पना व प्रसंग घेऊन व त्याचे दोष टाकून कालिदासाने आपलीं काव्यें व नाटकें रचिलीं असल्याने तीं रसिकांस तत्कालीं भासाच्या नाटकांपेक्षा जास्त प्रिय झालीं होतीं असें दिसतें.

'मालविकाग्निमित्रा'च्या प्रस्तावनेंत सौमिल्ल व कविपुत्र यांचाही प्रसिद्ध प्राचीन नाटककार म्हणून कालिदासाने उल्लेख केला आहे. पण त्यांविषयीं निश्चित माहिती मिळत नाही. राजशेखराच्या एका श्लोकांत रामिल व सोमिल यांनी मिळून 'शूद्रककथा' लिहिली होती असें म्हटलें आहे. पण तो सोमिल व कालिदासाने उल्लेखिलेला सौमिल्ल एकच की काय तें समजत नाही. शिवाय ती 'शूद्रककथा' कोणत्या प्रकारची होती हें समजण्यास मार्ग नाही. 'मृच्छकटिक' हें नाटक या दोन कवींनी मिळून लिहिलें व तें शूद्रकाच्या नांवावर प्रसिद्ध केलें असें कांही लोक समजतात. पण तसें असणें शक्य नाही. कारण एक तर त्यांतील संविधानक शूद्रकाविषयीं नाही. दुसरें असें की 'मृच्छकटिक' भासाच्या चारुदत्ताची दुसरी व सुधारून वाढविलेली आवृत्ति होय हें मत आता पुष्कळांनी मान्य केलें आहे. भासाचीं नाटकें लुप्तप्राय झाल्यावरच कोणीतरी हें काम केलें असावें. अशा प्रकारचें नाटक लिहिणाऱ्याची कालिदास इतकी प्रशंसा करील असें वाटत नाही. राहिलेल्या तिसऱ्या कविमित्र नामक नाटककाराबद्दल तर कांहीच माहिती मिळत नाही.

मालविकाग्निमित्र

विदर्भाधिपति वाकाटकांच्या साहाय्याने माळवा व काठेवाड येथे राज्य करणाऱ्या क्षत्रपांचा उच्छेद केल्यावर द्वितीय चन्द्रगुप्ताने उज्जयिनी ही

आपली दुसरी राजधानी केली व पुढे लौकरच वाकाटकांशीं जमलेला स्नेह-संबंध दृढ करण्याकरितां राजपुत्र द्वितीय रुद्रसेन यास आपली कन्या प्रभावतिगुप्ता दिली. हा विवाह उज्जयिनीतच मोठ्या थाटाने झाला असावा. अशा प्रसंगीं एखाद्या नाटकाचा प्रयोग केला जात असे. राजशेखराची 'विद्धशालभञ्जिका', बिल्हणाची 'कर्णसुंदरी' वगैरे संस्कृत नाटकें अशाच प्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आलेलीं दिसतात. तेव्हा प्रभावतिगुप्तेच्या विवाहप्रसंगीं एखाद्या चांगल्या नाटकाची निवड करावी असें चन्द्रगुप्ताने विद्वत्परिषदेस सांगितलें असावें. त्यावेळीं भासाचीं अनेक नाटकें विद्वानांसमोर होतीं. विशेषतः त्याचें 'स्वप्नवासवदत्त' त्यांतील संविधानकाची प्रमाणबद्धता, पात्रांच्या स्वभावांचें मार्मिक पृथक्करण इत्यादि गुणांनी गाजलेलें होतें. शिवाय त्याचा प्रेमळ व स्त्रीदाक्षिण्ययुक्त नायक उदयन आणि पतीवर निस्सीम प्रेम करणारी, त्याचें राज्य वृद्धिगत व्हावें म्हणून राजनीतिज्ञ मन्त्र्याच्या आग्रहावरून स्वतःच्या मृत्यूची खोटी बातमी पसरवूं देऊन अज्ञातवासांत स्वेच्छेने राहणारी व प्रत्यक्ष आपल्या सवतीबद्दल मत्सर न बाळगतां तिला स्वकौशल्याने अलंकृत करणारी नायिका वासवदत्ता यांच्याविषयी उज्जयिनीच्या लोकांस कौतुक व अभिमान वाटत असे. त्यांच्या कथा तेथील लोकांच्या तोंडीं होत्या. पूर्वी उदयनाने जेथून वासवदत्तेस पळवून नेलें ती जागा ते मोठ्या प्रेमाने दाखवीत असत, असें कालिदासाच्याच 'मेघदूता'वरून दिसतें. तेव्हा प्राचीन भासाचें 'स्वप्नवासवदत्त' की उदयोन्मुख तरुण कवि कालिदासाने लिहिलेलें 'मालविकाग्निमित्र' पसंत करावें, हा प्रश्न विद्वत्सभेपुढे होता. कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रा'चें संविधानकही त्या प्रसंगीं लोकांस प्रिय होण्यासारखेंच होतें. चन्द्रगुप्ताने जसा परकीय क्षत्रपांचा पराभव करून उत्तर हिंदुस्थानांत हिंदूंचें एकछत्री साम्राज्य स्थापिलें व हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें. त्याप्रमाणेंच पुष्यमित्र शुंगाने बौद्धधर्माचा पाडाव करून हिंदुधर्माला त्याच्या कचाट्यांतून सोडविलें होतें व त्याच्या अल्पवयस्क नातवाने–वसुमित्राने–अश्वमेधप्रसंगीं अश्वाचें संरक्षण करून बलाढ्य ग्रीकांच्या सैन्याचा पुरा मोड केला होता. शिवाय कालिदासकालीं जसा माळवा व विदर्भ येथील राजघराण्यांचा

विवाहाने संबंध जडला होता, तसाच शुंगांच्या काळीं अग्निमित्राने विदर्भ राजकन्या मालविका हिच्याशीं विवाह करून घडवून आणला होता. संविधानकवैचित्र्य व पात्रस्वभावरेखन, यांत कालिदासाचें नवें नाटक 'स्वप्नवासवदत्ता'स हार जाणारें नव्हतें व काव्यगुण, सृष्टिवर्णन इत्यादि गुणांत तर तें वरचढ होतें. तेव्हा इतर नाटकांपेक्षा तेंच विद्वानांस पसंत पडलें असावें. तथापि कांही लोकांस ही निवड पसत पडली नसावी; म्हणून कालिदासाने आपल्या नाटकाच्या प्रस्तावनेंत, 'माझ्या नाटकांची प्राचीन नाटककारांच्या कृतीशीं तुलना करून श्रेष्ठ ठरेल त्याचा स्वीकार करा. केवळ जुनें तें सोनें म्हणून त्याची अवहेलना करूं नका', असें प्रेक्षकांस सांगितलेलें दिसतें.

'मालविकाग्निमित्र' कालिदासाचें की दुसऱ्या कोणा उत्तरकालीन कवीचें याविषयी पूर्वी कांही लोकांना संशय होता, पण अनेक प्रमाणांवरून आता त्याचें निरसन झालें आहे. इतर नाटकांप्रमाणें यांतील मंगल श्लोक शिवस्तुतिपर आहे; यांतील प्रस्तावनाही इतर नाटकांप्रमाणें लहानशी असून तींत कवीचें नांव स्पष्टपणें दिलें आहे; कालिदासाचें मार्मिक निरीक्षण व सृष्टिवर्णनाची आवड हीं यांत उत्कटपणें दिसून येतात; कित्येक स्थळीं त्याच्या इतर ग्रंथांतील कल्पना निराळ्या शब्दांनी व्यक्त केलेल्या यांत दिसून येतात; या सर्व प्रमाणांवरून त्याच्या या नाटकाच्या कर्तृत्वाविषयी संशय राहत नाही.

'मालविकाग्निमित्रा'चे पांच अंक असून त्यांतील संविधानक बरेंच गुंतागुंतीचें आहे. पहिल्या अंकांत प्रस्तावनेनंतर एक 'विष्कंभक' नामक छोटा प्रवेश घातला आहे. त्यांत कौमुदिका व बकुलावलिका या दासींच्या व गणदास नामक नाट्याचार्याच्या संभाषणांत धारिणी राणीने स्वतः-करितां करविलेल्या सर्पमुद्रांकित अंगठीचा उल्लेख करून कवीने प्रेक्षकांस नायिकेविषयीं थोडी प्रास्ताविक माहिती सांगितली आहे. धारिणी राणी-चा हलक्या जातीचा वीरसेन नामक भाऊ नर्मदातीरीं सरहद्दीवरच्या किल्ल्यावर नेमला होता. त्याने मालविका ही शिल्पकलेंत निपुण होऊन धारिणी राणीची चांगली सेवा करील असें वाटून तिला दासी म्हणून पाठविलें होतें. राणीने तिला संगीत शिकविण्याकरितां गणदासाची योजना

केली होती. तिच्या हुशारीवरून त्याला ती कोणा थोर कुलांतील असावी असा संशय आला होता. एके दिवशीं राणी एका चित्रकाराने परिजनासमवेत काढलेलें आपलें चित्र पाहत असतां तिचा पति राजा अग्निमित्र तेथे आला व त्याने मालविकेच्या रूपाने आकृष्ट होऊन, ती कोण, कोठली, म्हणून चोकशी सुरू केली. त्यावरून धारिणीला संशय येऊन मालविका राजाच्या दृष्टीस पडूं नये म्हणून ती अतिशय जपूं लागली. इतकी माहिती अगदी थोडक्या शब्दांत सांगून कवीने वाचकांचें कुतूहल जागृत केलें आहे. यानंतर मुख्य प्रवेशास सुरवात होते. प्रथम राजा व अमात्य हे प्रवेश करितात. त्यांच्या संभाषणावरून प्रेक्षकांस कळते की मगधांत नुकतीच राज्यक्रांति झाली असून मौर्य राजास पदच्युत करून व त्याच्या सचिवास कारागृहांत टाकून अग्निमित्राच्या बापाने–पुष्यमित्राने–गादी बळकाविली आहे. याच वेळेस विदर्भाच्या गादीविषयीही दोघा चुलत भावांत कलह उद्भवला होता. त्यांपैकी एक–माधवसेन–आपली बहीण अग्निमित्रास देऊं करून त्याची मदत मागण्याकरितां विदिशेस जात असतां त्याच्या चुलत भावाने इकडे गादी बळकावून त्याला आपल्या सीमेवरच्या अधिकाऱ्यांकडून कैद करविलें. अग्निमित्राने त्याच्या व त्याच्या बहिणीच्या सुटकेविषयीं त्याला लिहिलें, तेव्हा त्याने 'माझा मेहुणा व मौर्यराजाचा सचिव यास आपण कैद केलें आहे, त्यास आपण सोडून दिलें तर मीही माधवसेनाची सुटका करीन. माधवसेनाला पकडण्याच्या गडबडींत त्याची बहीण कोठे नाहीशी झाली आहे तिच्याही शोधार्थ यत्न करीन,' असें उत्तर पाठविलें आहे. अग्निमित्राला विदर्भाचें राज्य पादाक्रान्त करावयाचें होतें त्याला हें आयतेंच निमित्त सांपडतें. तेव्हा तो विदर्भावर चाल करून जाण्यास आपल्या सेनापतीस आज्ञा करतो. हें राजकारण संपल्यावर अमात्य जातो व नंतर विदूषक प्रवेश करतो. त्याच्या व राजाच्या संभाषणावरून त्याने राजाला मालविका प्राप्त करून देण्याकरितां कांही युक्ति योजली आहे, असें प्रेक्षकांस समजतें इतक्यांत गणदास व हरदत्त या दोन नाट्याचार्यांत विदूषकाच्या चिथावणीवरून भांडण उद्भवून ते दोघेही त्याचा निर्णय करून घेण्याकरितां राजाकडे येतात. धारिणीचा गणदासाला आश्रय असल्यामुळें आपण कांही निकाल दिला तर राणी रागावेल या सबबीवर

राजा राणीसमक्ष पण्डितकौशिकी नामक परिव्राजिकेने निकाल द्यावा असें सुचवितो तें दोघांस मान्य झाल्यावर कंचुकी त्यांस बोलावून आणतो. राणीस हा त्यांचा कलह आवडत नाही व 'जो स्वतः अत्यंत निपुण असून दुसऱ्यास शिकविण्यांतही तरबेज असतो तोच श्रेष्ठ शिक्षक, तेव्हा तुम्ही आपापल्या शिष्यांकरवीं परीक्षा द्या व अंगसौष्ठव स्पष्टपणें दिसण्याकरितां पात्रें नेपथ्यविरहित असू द्या' असें परिव्राजिका म्हणते, तेव्हा तर तिचा संशय दृढतर होतो. कारण या निमित्ताने मालविकेला डोळे भरून पाहतां यावें असें राजाचें कारस्थान या कलहाच्या मुळाशी असावें असें तिला वाटतें व ती 'राजकार्यांत आपण याप्रमाणेंच निपुणता दाखवाल तर किती चांगलें होईल' असा राजास टोमणा मारते. तथापि गणदासाच्या आग्रहावरून ती या नाट्यपरीक्षेला कबूल होते. पडद्यामागील मृदंगध्वनि ऐकू येऊं लागल्यावर त्यांची तयारी झाली असें समजून सर्वजण तिकडे जातात. (अंक १). याप्रमाणें पहिल्या अंकांत कथानकाला आरंभ होतो. त्या वेळची राजकीय परिस्थिति थोडक्यांत सांगून कवीने नायिकेबद्दल प्रेक्षकांच्या मनांत कुतूहल उत्पन्न केलें आहे. मुख्य प्रवेशांत गणदास व हरदत्त यांचा कलह, मालविका राजाच्या दृष्टीस पडूं नये म्हणून राणीची धडपड, तिला पाहण्याविषयीं राजाची आतुरता, धूर्त परिव्राजिकेचा निःपक्षपातीपणाचा आव व विदूषकाची गणदासास चिथावणी, त्याचा उपहास व विनोद हीं उत्तम साधलीं आहेत. यांत थोडक्यांत कथानक रंगविण्याची कालिदासाची कला उत्तम प्रकारें दिसून येते. सर्वच पात्रांचीं भाषणें चटकदार झालीं आहेत. त्यांत पाल्हाळ अगर अनावश्यक भाग कोठेही नाही. दुसऱ्या अंकाचें स्थल राजवाड्यांतील संगीतशाला हें आहे. राजा, विदूषक, धारिणी व परिव्राजिका यांच्यासमोर छलिक नांवाच्या नाट्याचा प्रयोग व्हावयाचा आहे. हरदत्तापेक्षा गणदास वयोवृद्ध असल्याने त्याला आपल्या शिष्यकरवीं शिक्षणनैपुण्य प्रथम दाखविण्याची परिव्राजिका आज्ञा करते, तेव्हा मालविका प्रवेश करते. विदूषकाला व राजाला ती चित्रांतल्यापेक्षाही सुंदर दिसते. राजा तिच्या सौंदर्याचें खालीलप्रमाणें वर्णन करतो.

दीर्घाक्षं शरदिंदुकान्ति वदनं बाहू नतावंसयोः
संक्षिप्तं निबिडोन्नतस्तनभुरः पार्श्वे प्रसृष्टे इव।

मध्यः पाणिमितो नितम्बि जघनं पादावरालाङ्गुली
छन्दो नर्तयितुर्यथैव मनसः श्लिष्टं तथास्या वपुः ॥ माल० २, ३.

'हिचे नयन विशाल आहेत; मुखाची कांति शरदृतूतील चन्द्राच्या सारखी आहे; भुज स्कंधभागीं (किंचित्) लवलेले दिसतात; अशिथिल व उन्नत अशा स्तनांनी वक्षःस्थल व्यापिलें आहे; पार्श्वभाग रेखीव दिसतो; कमर तर फक्त वीतभर रुंद आहे; नितबभाग स्थूल व पायांची बोटें किंचित् वक्र आहेत. (सारांश) नृत्याचार्याला पसत पडेल असेंच हिचे शरीर बनले आहे.' नंतर मालविका साभिनय पद गाऊन दाखविते. ते झाल्यावर मालविका परत जावयाची, पण राजाला तिला स्वस्थपणें डोळे भरून पाहतां यावें म्हणून विदूषक म्हणतो, 'थांब जरा. यांत थोडा क्रमभंग झाला आहे तो मला विचारावयाचा आहे.' धारिणीला मालविका तेथे असणें आवडत नाही, पण गणदासाच्या आग्रहावरून ती गप्प बसते. 'यांत तुम्हाला कोणता दोष दिसला' असें गणदासाने विचारतांच विदूषक म्हणतो, 'परीक्षा घेणाऱ्यांना विचारा. नंतर मी सांगेन!' परिव्राजिका व राजाही तिच्या अभिनयादिकांची स्तुति करतात. तेव्हा विदूषक म्हणतो, 'अहो प्रथमप्रयोग दाखविण्यापूर्वी ब्राह्मणाची पूजा करावी लागते ती तुम्ही विसरलां.' विदूषक नाटचांतील काही दोष काढील असें सर्वांस वाटलें होतें. त्याचें हें अनपेक्षित उत्तर ऐकून सर्वच हसूं लागतात व मालविकाही मंदस्मित करते, तें पाहून राजाला तर आपल्या नेत्रांचें पारणें फिटलें असें वाटतें. तो म्हणतो—

स्मयमानमायताक्ष्याः किञ्चिदभिव्यक्तदशनशोभि मुखम्।
असमग्रलक्ष्यकेसरमुच्छ्वसदिव पंकजं दृष्टम् ॥ माल० २, १०.

यांत कालिदासाने स्मितामुळें ज्याचे दत किंचित् दिसत आहेत अशा मालविकेच्या मुखाला उमलू लागलेल्या कमळाची सुदर उपमा दिली आहे. विदूषकाच्या वरील टीकेवर गणदास म्हणतो, 'रंगभूमीवर नेपथ्यसहित संगीताचा प्रयोग असता तर आपल्या सारख्या महाब्राह्मणाला आम्ही कसें विसरलों असतों?' नंतर मालविका परत जा . आता हरदत्ताची शिष्या व राजाची तरुण स्त्री इरावती हिचें नाटच पाहावयाचें, पण राजाला त्याबद्दल मुळीच उत्सुकता नसते. इतक्यांत वैतालिक पडद्यांत मध्याह्नकाळाचें सुदर

वर्णन करतो. तें ऐकून विदूषक म्हणतो, 'अहो आता तर भोजनाची वेळ झाली. ती टळली तर दोष उत्पन्न होतो असें वैद्य म्हणतात.' तेव्हा हरदत्ताचा प्रयोग पाहण्याचें दुसऱ्या दिवसावर टाकून सर्वजण मध्याह्नकृत्याकरितां जातात. (अंक २). या अंकांतही मालविकेचें नाटच, ती रंगभूमीवर जास्त वेळ राहावी म्हणून विदूषकाने योजिलेली युक्ति, तें पाहून झालेला राणीचा जळफळाट, वगैरे गोष्टी उत्तम साधल्या आहेत. इरावतीच्या नाटयाचें प्रदर्शन कथानकाला आवश्यक नसल्याने कवीने मुद्दाम मोठ्या खुबीने टाळलें आहे. यावरून या बाबतीतील त्याचा संयम उत्कृष्टपणें दिसून येतो. मालविकेचें सौंदर्य, नाटच व उभें राहण्याची ऐट यांचें वर्णन करतांना कालिदासाची सूक्ष्म निरीक्षणशक्ति व वैतालिकाच्या पद्यांत त्याची सृष्टिवर्णनाची आवड स्पष्टपणें दिसून येते. विदूषकाचा विनोद केवळ हास्योत्पादक नसून कथानकाला पोषक आहे. तिसऱ्या अंकाच्या आरंभीं एक लहान प्रवेश घातला आहे, त्यांतील संभाषणें दुसऱ्या अंकांतील प्रयोगदर्शनानंतर दोनचार दिवसांनी झालेलीं दिसतात. पण्डितकौशिकेची परिचारिका कांही निमित्ताने प्रमदवन नामक उद्यानांत जाते. तेथे तिला उद्यानपालिका भेटते. त्यांच्या सभाषणावरून आपल्याला तीन गोष्टी कळतात. (१) इरावतीचा नाटचप्रयोग पाहिल्यावर परिव्राजिकेने निकाल दिला की दोन्ही आचार्य आपल्या कलेंत सारखेच निपुण आहेत, पण गणदासाला चांगली शिष्या लाभल्यामुळें त्याची सरशी झाली; (२) राजाने मालविकेला पाहिली त्या दिवसापासून त्याचें मन तिच्यावर फार बसलें आहे, मालविकेचीही तशीच स्थिति झाल्यामुळें ती वापरलेल्या मालतीमालेप्रमाणें म्लान झाली आहे; (३) उद्यानांत वसंत ऋतु सुरू झाला तरी सुवर्णाशोक वृक्षाला फुलें येईनात हें धारिणीला कळविण्याकरितां उद्यानपालिका राजवाड्याकडे जाण्यास निघते. यानंतरच्या मुख्य प्रवेशांत राजा व विदूषक यांच्या संभाषणावरून समजतें की इरावती राणीने आपली सखी निपुणिका पाठवून राजास विनंती केली होती की वसन्त ऋतु सुरू झाला आहे, तरी आपणाबरोबर झोपाळ्यावर बसून झोके घ्यावे अशी माझी इच्छा आहे. राजानेही तिला प्रथम हो म्हटलें होतें. मागाहून आपलें मन मालविकेवर बसलें आहे असें राणीच्या ध्या-

नांत येईल असें वाटून तो तिकडे जाण्याचें टाळीत होता, पण विदूषकाच्या आग्रहावरून ते दोघेही प्रमदवनाकडे जातात. उद्यानांत गेल्यावर राजा वसन्तऋतूची शोभा वर्णन करतो. हें वर्णन फार बहारीचें उतरलें आहे. इतक्यांत मालविकाही तेथे येते. तिच्या स्वगत भाषणावरून समजतें की विदूषकाने कांही खोडी केल्यामुळे धारिणी झोपाळ्यावरून खाली पडली व तिचा पाय दुखावला. त्यामुळें सुवर्णाशोकाला फुलें येण्याला जरूर तो लत्ताप्रहार देण्यासाठी तिने मालविकेला पाठविलें आहे व पांच रात्रीच्या आंत त्याला फुलें आलीं तर मी तुझी इच्छा पूर्ण करीन असें वचनही दिलें आहे. नंतर ती एका शिलेवर बसते. तिला दुरून पाहतांच राजा व विदूषक दोघेही तिच्या नकळत तिजजवळ येऊन उभे राहतात. तितक्यांत मालविकेच्या पायांना अलक्तक लावण्याकरितां व नूपुर घालण्याकरितां तिची सखी बकुलावलिका तेथे येते. राजा उद्यानांत गेला असें समजल्यामुळें इरावती व तिची दासी निपुणिका हयाही तेथे येतात व संभाषणें ऐकत उभ्या राहतात. विदूषकाने प्रथमच 'राजावर प्रेम करण्यांत मालविकेला प्रोत्साहन दे,' असें बकुलावलिकेला सांगून ठेवलें होतें. त्याप्रमाणें मालविकेच्या पायाला अलक्तक लावतांना व नूपुर घालतांना ती मोठ्या चातुर्याने तें काम करते. मालविकेला धारिणीची फार भीति वाटते. तेव्हा ती म्हणते 'अग भ्रमराचा त्रास सोसावा लागेल म्हणून का कोणी वसन्तऋतूचें सर्वस्व असा आंब्याचा मोहोर कर्णावर अलंकार म्हणून ठेवत नाही!' तिचे पाय अलंकृत झाल्यावर त्यांच्यांत पुढील संभाषण होतें—

बकुलावलिका—एष उपारूढराग उपभोगक्षमः पुरतस्ते वर्तते।
मालविका (सहर्षम्)—किं भर्ता।
बकुलावलिका (सस्मितम्)—न तावद्भर्ता। एषोऽशोकशाखावलम्बी पल्लवगुच्छः। अवतंसयैनम्।

यांत राजा व अशोकपल्लव यांस सारखेच लागू पडणारे 'राग' व 'उपभोग' हे श्लेषयुक्त शब्द योजून बकुलावलिकेने मोठ्या चातुर्याने मालविकेच्या तोंडून तिचें प्रेम व्यक्त करविलें आहे. राजा तें आडून ऐकतच असतो, त्यामुळें त्याला अत्यंत आनंद होतो हें सांगावयास नकोच. नंतर राजाला प्रकट होण्याला कांही निमित्त पाहिजे होतें, म्हणून विदूषक प्रथम पुढे होऊन

म्हणतो, 'अग, आमच्या महाराजांचा प्रियवयस्य अशा या अशोकाला लाथ मारणें बरें का?' त्यावर 'राणीच्या आज्ञेने हिने असें केलें, हिला क्षमा करावी' असें बोलून बकुलावलिका मालविकेकडून राजाला नमस्कार करविते. नंतर 'आनंदरूपी पुष्प पुष्कळ दिवस मला लाभलें नाही, तेव्हा तुझ्या स्पर्शामृताने माझी ही इच्छा पूर्ण कर' असें राजाने म्हणतांच इरावती पुढे होऊन रंगाचा बेरंग करते. 'तूं येईपर्यंत हिच्याशीं बोलून मी मनोरंजन करीत होतों' असें बोलून राजा आपल्या वर्तनावर सारवासारव करण्याचा प्रयत्न करतो. पण इरावतीचें त्याने थोडेंच समाधान होणार? तितक्यांत कमरेंतून गळून पडणारा कमरपट्टा घेऊन ती राजाला मारायला धावते व राजा तिच्या पायां पडतो तरी त्याकडे लक्ष न देतां आपल्या दासीसह निघून जाते. (अंक ३). चौथ्या अंकाच्या आरंभीं राजा व विदूषक यांच्या भाषणावरून आपणांस कळते की इरावतीने तक्रार केल्यावरून धारिणीने मालविका व बकुलावलिका याना तळघरांत कोंडून ठेवलें आहे व 'माझी मुद्रेची अंगठी पाहिल्याशिवाय त्यांना सोडूं नको' म्हणून पहारेकरणीला ताकीद दिली आहे.

नंतर राजाच्या विनतीवरून तिला सोडविण्याची युक्ति योजून विदूषक राजाला धारिणीदेवीच्या समाचाराकरितां पाठवितो व आपणही रिक्तहस्ताने तिला भेटूं नये म्हणून उद्यानांतून फुलें आणण्याच्या मिषाने मागे राहतो. प्रतिहारीलाही तो आपल्या कटांत सामील करून घेतो. नंतर धारिणी व परिव्राजिका हवाशीर जागीं बोलत बसल्या होत्या तेथे राजा जातो. त्यांचें थोडें संभाषण होतें तोंच विदूषक यज्ञोपवीताने आंगठ्याला घट्ट बांधून घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतो व म्हणतो, 'राणीसाहेबांच्या दर्शनाकरितां फुलें घेऊन यावें म्हणून मी प्रमदवनांत गेलों होतों. तेथे अशोकाचीं फुलें खुडण्यासाठी मी उजवा हात पुढे केला तोंच त्याच्या ढोलींतून निघून एका सापाने हा पहा येथे दंश केला.' तें ऐकून राणीला फार वाईट वाटतें. नंतर त्याला ध्रुवसिद्धि नामक राजवैद्याकडे पाठवितात. त्याच्याकडून निरोप येतो की सर्पाची मुद्रा जिच्यावर आहे अशी एखादी वस्तु घेऊन पाणी मंतरावयाचें आहे. तशी कांही वस्तू असल्यास पाठवा. राणी आपल्याजवळची सर्पमुद्रांकित अंगठी त्या कार्याकरितां देते व काम

झाल्याबरोबर परत करण्याबद्दल बजावते. नंतर 'राजाला ग्रहाची बाधा आहे, तेव्हा सर्व बंदिवानांची मुक्तता करावी असें ज्योतिष्यांनी सांगितल्यावरून इरावतीला वाईट वाटूं नये म्हणून धारिणी राजाकडून मालविका व बकुलावलिका यांची मुक्तता करीत आहे, ही तिची अंगठी पहा!' असें म्हणून व ती सर्पमुद्रांकित अंगठी दाखवून विदूषक त्यांची मुक्तता करतो व त्यांना प्रमदवनांत पाठवितो. राजाही जरूरीचें काम पाहण्याच्या निमित्ताने राणीजवळून निसटून गूढ मार्गाने तेथे जातो. तेथे विदूषकही त्याला भेटतो. राजाची व मालविकेची गांठ घालून दिल्यावर विदूषक व बकुलावलिका तेथून जातात. विदूषक बाहेर एका शिलातलावर बसतो व तेथे त्याला झोप लागते. तें इरावतीची दासी पाहते व आपल्या स्वामिनीला कळविते. तेव्हा त्याची प्रकृति आता कशी आहे तें पाहण्यासाठीं इरावती दासीसह तेथे येते, तों विदूषक 'मालविके, तूं इरावतीलाही मागें टाक' असें स्वप्नांत बरळतो तें ऐकून इरावतीला राग येतो. तेव्हा त्याला भिवविण्यासाठी तिची दासी सापासारखी वाकडी असलेली काठी विदूषकाच्या अंगावर टाकते. तो घाबरून ओरडतो. तें ऐकून राजा, मालविका व बकुलावलिका तेथे येतात, तें पाहून इरावतीचा क्रोध अनिवार होतो. ती तें सर्व धारिणीला कळविण्यासाठी दासीला पाठविते. आता या प्रसंगांतून आपली कशी सुटका करून घ्यावी असा पेच राजाला पडला असतां धारिणीची लहान मुलगी वसुमती पिंगट रंगाच्या वानराने घाबरविली असल्याचें समजतें, तेव्हा स्वतः इरावतीच तिला उगी करण्याकरितां राजाला तिकडे पाठविते. तें पाहून विदूषक आपल्याशीं म्हणतो, 'शाबास पिंगलवानरा! शाबास! तूं वेळेवर आपल्या सोबत्याच्या रक्षणार्थ आलास!' इतक्यांत पडद्यांत 'अहो काय हें आश्चर्य! पांच रात्री व्हावयाच्या अगोदरच सुवर्णाशोकाला कळ्या आल्या! हें मला राणीला कळविलें पाहिजे!' असे उद्यानपालिकेचे शब्द ऐकूं येतात. तेव्हा, 'तुझे मनोरथ पूर्ण करून राणी आपलें वचन पाळील,' असें बोलून बकुलावलिका मालविकेला धीर देते व त्याही उद्यानपालिकेबरोबर राणीकडे जातात.

तिसऱ्या व चौथ्या अंकांत अनेक प्रसंग घातल्यामुळें त्यांत कथानकाची गति शीघ्र झालेली दिसते. त्यांत इरावतीने अगदी आयत्या वेळीं येऊन राजाला व मालविकेला एकांतांत पकडणें या प्रसंगाची पुनरुक्ति झाली आहे; तथापि एकंदरीत त्यांत वैचित्र्य पुष्कळ आहे. विदूषकाची मालविकेला सोडविण्याची युक्ति अत्यंत नामी आहे. सर्पमुद्रांकित अंगठीचा पुढे असा उपयोग करावा लागेल हें जाणून कालिदासाने पहिल्याच अंकांत तिचा उल्लेख केला आहे, त्यावरून त्याचें रचनाकौशल्य प्रत्ययास येतें. विदूषक शिलातलावर बसल्याबरोबर त्याला झोप लागून तो स्वप्नांस बरळूंही लागतो हें थोडें अस्वाभाविक वाटतें. पण 'स्वप्नवासवदत्त' नाटकांतही या प्रकारचाच एक प्रसंग भासाने घातला आहे, त्यावरून केवळ कालिदासच या बाबतींत दोषी ठरत नाही. विदूषकाच्या भाषणांत नेहेमीप्रमाणें विनोद भरपूर आला आहे. आपल्या समोर मालविकेची स्तुति केलेली ऐकतांच इरावतीचें तोंड पाहण्यासारखें होत असेल ! (अंक ४).

पांचव्या अंकाच्या पहिल्या छोट्या प्रवेशांतील उद्यानपालिका व धारिणीचा सेवक सारसक यांच्या संभाषणावरून असें कळतें की धारिणीचा मुलगा वसुमित्र याची अश्वमेधतुरंगाचें रक्षण करण्याच्या कामीं योजना झाल्यामुळे त्याला दीर्घायुष्य प्राप्त व्हावें म्हणून राणी ब्राह्मणांस सुवर्णदक्षिणा देत असते. राणीच्या भावाने–वीरसेनाने–विदर्भनृपतीवर विजय मिळविला असून माधवसेनाची मुक्तता केली आहे. त्याने मौल्यवान् रत्नें व शिल्पकारिका दासी नजराणा म्हणून पाठविल्या आहेत. नंतरच्या मुख्य प्रवेशांत नुकत्याच फुललेल्या सुवर्णाशोकाला पाहण्यासाठी सालंकृत मालविका व परिव्राजिका यांसह धारिणी प्रमदवनाकडे जाते व राजालाही तेथे बोलावते. ते सर्व तेथे जमल्यावर कंचुकी माधवसेनाकडून आलेल्या दोघां संगीतनिपुण दासीना घेऊन येतो. त्या तेथे आल्याबरोबर मालविकेला आपल्या धन्याची बहीण म्हणून ओळखतात. माधवसेनाला पकडल्यावर त्याच्या सुमति नामक सचिवाने हिला गुप्तपणें तेथून नेलें होतें असें त्या सांगतात. नंतरची हकीकत परिव्राजिका पुढीलप्रमाणें सांगते,–'आर्य सुमति हा माझा वडील भाऊ. हिला घेऊन तो एका व्यापाऱ्यांच्या तांड्यास जाऊन मिळाला. अरण्यांतून जात असतां त्यांच्यावर चोरांनी हल्ला

केला, त्यावेळीं त्यांच्याशीं शौर्याने लढून माझ्या भावाने देह ठेविला. तें पाहून मला मूर्छा आली. पुढे मी भानावर येऊन पाहिलें तों ही कोठे दिसेना. तेव्हा भावाच्या शरीराला अग्निसंस्कार देऊन मी आपल्या देशांत आलें व काषाय वस्त्रें धारण केलीं. या मालविकेला वीरसेनाने सोडविलें व नंतर दासी म्हणून धारिणीदेवीकडे पाठविलें. हिचे वडील असतांना एका भविष्य जाणणाऱ्या साधूने सांगितलें होतें की हिला वर्षभर दासी होऊन राहावें लागेल. तें घडून येत आहे असें पाहून मी याविषयीं कोणाजवळ बोललें नाही.' मालविका ही यःकश्चित् दासी नसून राजकन्या आहे, तिला आपण उगीच वाईट रीतीने वागविलें याबद्दल राणीला पश्चात्ताप होतो व तिचें राजाशीं लग्न लावण्याचा ती निश्चय करते. अमात्यपरिषदेच्या संमतीने राजा विदर्भाचें राज्य यज्ञसेन व माधवसेन यांमध्य वाटून देतो व वर्धा नदी ही त्यांच्या राज्याची मर्यादा ठरवितो. इतक्यांत पाटलीपुत्राहून सेनापति पुष्यमित्राचें खालील मजकुराचें पत्र येतें. 'यज्ञाचा घोडा सिन्धुनदीच्या दक्षिणतीरावर यवनांनी पकडला होता; पण कुमार वसुमित्राने त्यांचा पाडाव करून तो सोडविला. करितां राग टाकून सर्व राण्यांसह तुम्ही यज्ञसमारंभार्थ इकडे निघून यावें.' आपल्या पुत्राचा पराक्रम ऐकून धारिणीला अत्यंत आनंद होतो; व ती इरावतीच्या समतीने राजाला मालविका अर्पण करते. राजा तिचा स्वीकार करण्यास लाजतो, तेव्हा राणी किंचित् हंसून विचारते 'मग काय माझी अवज्ञा करावयाची?' त्यावर विदूषक म्हणतो 'राणीसाहेब हा लोकाचार आहे! विवाहाच्या वेळीं प्रत्येक नवरा लाजत असतो.' नंतर परिव्राजिका माधवसेनाकडे जाण्यास परवानगी मागते, पण राजा व राणी तिला आपल्याजवळच राहण्याविषयीं आग्रह करतात. शेवटीं भरतवाक्याने अंक समाप्त होतो. (अंक ५).

या अंकांत एकामागून एक इतक्या गोष्टी घडून येतात की त्यामुळें मालविकेचा राजाशीं विवाह लावण्याशिवाय गत्यंतर नाही असें धारिणीला होऊन जातें. ठराविक मुदतींत आपल्या प्रिय सुवर्णाशोकाला कळचा आल्यामुळें राणीला आपलें वचन पाळणें भाग होतें. तशांत मालविका कोणी हीन कुळांतील नसून राजकन्या आहे व तिला आपण बटकीसारखी वागवून व तळघरांत कोंडून भयंकर अन्याय केला आहे, हें

धारिणीच्या मनाला लागून राहतें. तितक्यांत तिच्या अल्पवयस्क मुलाने मोठमोठ्या योद्धयांनाहीज्याचा अभिमान वाटावा असा पराक्रम गाजविला अशी वार्ता कळल्यामुळें त्या आनंदांत ती स्त्रीस्वभावसुलभ मत्सर विसरून राजाला मालविका देण्यास तयार होते यांत आश्चर्य नाही.

'मालविकाग्निमित्रा'चें संविधानक गुंतागुंतीचें असलें तरी त्यांत वैचित्र्यपूर्ण प्रसंगांची वाण नाही. विदूषकाने मालविका राजाच्या दृष्टीस पाडण्याकरितां व पुढे ती कैदेत पडल्यावर तिची सुटका करण्याकरितां योजिलेल्या युक्त्याही नामी आहेत. या नाटकांत त्याचा विनोद केवळ खाद्यपेयांवर अधिष्ठित नसून कथानकाशीं सुसंबद्ध व मनोहर असा झाला आहे. कालिदासाने या नाटकाचें संविधानक कोठून घेतलें तें समजत नाही. तथापि त्यांतील पुष्यमित्राचा अश्वमेध, वसुमित्राने यवनांवर मिळविलेला विजय, विदर्भाधिपतीचा पराभव, त्याच्या राज्याची वाटणी व त्याच्या घराण्यांतील राजकन्येशीं अग्निमित्राचा विवाह, इतक्या गोष्टी ऐतिहासिक दिसतात. पुष्यमित्राची सेनापति ही पदवी व त्याने केलेला अश्वमेध यांच्या ऐतिहासिकत्वाबद्दल तर संशय घेण्यास जागाच नाही. कारण त्यांचा उल्लेख अयोध्येच्या शुंगकालीन शिला लेखांत स्पष्टपणें आलेला मागें (पृ० ८६) दाखविला आहे. कालिदासकाळीं अग्निमित्राची विलासप्रियता ही परंपरागत गोष्टीवरून लोकांस माहीत असावी. या नाटकाचें संविधानक रचण्यांत त्याला कदाचित् गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'चा उपयोग झाला असेल. ही 'बृहत्कथा' मूळ पैशाची भाषेंत होती. ती सध्या उपलब्ध नाही. पण तिचीं सारांशरूपाने दोन रूपांतरें—सोमदेवाचा 'कथासरित्सागर' व क्षेमेंद्राची 'बृहत्कथामंजरी' हीं सध्या उपलब्ध आहेत. त्यांत पुढील गोष्ट आली आहे.

'उज्जयिनी येथील राजा महासेन याच्या वासवदत्ता नामक मुलींचा विवाह वत्सदेशाचा राजा उदयन याच्याशीं झाला होता. वासवदत्तेच्या पालक नांवाच्या भावानें आपण स्वत: जिंकून आणलेली एक बन्धुमती नांवाची राजकन्या आपल्या बहिणीस भेट म्हणून पाठविली. ती रूपवती असल्याने वासवदत्तेने तिचें नांव मञ्जुलिका असें ठेवून तिला गुप्त ठेवली. पुढे एके दिवशीं उद्यानलतागृहांत वसंतक नांवाचा आपला प्रियमित्र

विदूषक यास घेऊन फिरत असतां उदयनाने तिला पाहिली व तिच्याशीं गुप्तपणें गांधर्व विवाह केला. हें तेथेच लपून असलेल्या वासवदत्तेने पाहिलें त्यामुळें तिला क्रोध येऊन ती वसंतकाला बांधून घेऊन गेली. तेव्हा राजा तिच्या माहेरच्या सांकृत्यायनी नामक परिव्राजिका मैत्रिणीला शरण गेला व तिच्या साहाय्याने त्याने वसंतकास सोडवून आणलें. राणीच्या अनुमतीने परिव्राजिकेने बन्धुमती राजास अर्पण केली.' (कथासरित्सागर पृ० ५६).

'मालविकाग्निमित्रा'च्या संविधानकांत व वरील कथानकांत असणारें साम्य वाचकांच्या लक्षांत येईल. दोहोंतही नायिका प्रथम गुप्तरूपाने असणें, विदूषकाच्या साहाय्याने उद्यानलतागृहात भेटणें, नंतर बन्दीवास व शेवटीं परिव्राजिकेच्या साहाय्याने नायिकेशीं राजाचा विवाह, या गोष्टी समान आहेत. दोन्ही कथानकांत फरकही अर्थात् पुष्कळच आहे. तथापि कथानक कोठून तरी घेऊन त्यांत जरूर ते फरक करण्याची कालिदासाची संवय लक्षात घेतां 'मालविकाग्निमित्रा'चें संविधानक बृहत्कथेंतून घेतलें असणें असंभवनीय नाही. पांच रात्रीत अशोकाला फुलें आलीं पाहिजेत या अटीची कल्पना भासाच्या 'पंचरात्र' नाटकावरून कौंशिला सुचली असेल. तसें असलें तरी पहिल्या व दुसऱ्या अंकांतील नाट्याचार्यांचा कलह व मालविकेचा नाट्यप्रयोग, मालविकेस सोडविण्याकरितां विदूषकाने योजिलेली युक्ति वगैरे गोष्टी कवीच्या कल्पनाशक्तीनेच निर्मिलेल्या दिसतात

या नाटकाचें कथानक एकंदर आठदहा दिवसांतच आटपत असल्याने कालिदासाच्या इतर नाटकांतल्याप्रमाणें यांत स्वभावविकासाला अवकाश नाही. यांतील सर्व पात्रें आरंभापासून अखेरपर्यंत एकाच प्रकारचीं राहतात. तसेंच ही कवीची प्रथम नाट्यकृति असल्यामुळें यांतील पात्रांच्या निरनिराळ्या मनोविकारांचें आविष्करण करण्याचा प्रयत्नही कवीने केलेला दिसत नाही. या नाटकांत अग्निमित्र व विदूषक हीं पुरुषपात्रें व मालविका, धारिणी, इरावती व परिव्राजिका हीं स्त्रीपात्रें मुख्य आहेत. हरदत्त, गणदास, बकुलावलिका, निपुणिका इत्यादि गौणपात्रें होत. कालिदासाच्या सर्व नायकांत अग्निमित्र हा कनिष्ठ प्रतीचा दिसतो. संस्कृत आलंकारिकांच्या वर्गीकरणाप्रमाणें पाहतां तो धीरललित प्रकारचा

आहे. 'रघुवंशां'तील अग्निवर्णाप्रमाणें तो राजकारणाकडे अगदीच दुर्लक्ष करीत नाही हें खरें; तथापि त्याच्या अंगीं शौर्य, धैर्य, इत्यादि उदात्त गुण मुळीच दिसत नाहीत. या नाटकांतील त्याचें उद्दिष्ट म्हणजे कसेंही करून मालविकेशीं संबंध घडवून आणावयाचा हें दिसतें. बाकी स्वारी बोलण्यांत मोठी मिठ्ठास ! स्त्रीदाक्षिण्य याच्या रोमरोमांत भिनलेलें ! मालविकेबरोबर एकांतांत पकडल्यावर इरावतीसारख्या चण्डिकेला प्रसन्न करण्याकरितां तो तिच्या पायांही पडतो. आपल्या प्रेमाभिलाषाच्या पूर्तीकरितां हा सदैव विदूषकावर अवलंबून राहिलेला दिसतो. मालविका याच्या दृष्टीस पडावी म्हणून युक्ति योजिली विदूषकाने; पुढे एकांतांत पकडल्यावर तेथून निसटावें कसें हें सुचविलें विदूषकानेच; मालविकेला तळघरांत कोंडल्यावर तेथून तिची सुटका करवून तिची व याची प्रमदवनांत गांठ घातली तीही विदूषकानेच. तेव्हा हरघडीं उपयोगी पडणारा हा 'कामतन्त्रसचिव' याच्या जवळ नसता तर याची अवस्था मोठी कठीण झाली असती असें वाटल्याशिवाय राहत नाही. अग्निमित्र हा तत्कालीन राजनीतीच्या व कालिदासाच्याही दृष्टीने आदर्शभूत राजा होता, असें एका महाराष्ट्रीय विद्वानाने म्हटलें आहे. पण तें सयुक्तिक दिसत नाही. कर्त्यासवरत्या मुलाचा हा बाप अन्तःपुरांत अनेक स्त्रिया असतां आणखी एका–तारुण्यांत जिने नुकतेंच पदार्पण केलें आहे अशा–दासीवर अनुरक्त होतो. तिच्याशीं चोरून लगट करतांना पकडला गेल्यावर आपल्या स्त्रीच्या पायां पडतो, पण पुनः आपला नाद सोडीत नाही, बापाने अश्वमेध यज्ञ आरंभिला असून दिग्विजय करण्याकरितां अश्व सोडला असतां त्याच्या मार्गे स्वतः जाऊन त्याचें रक्षण करण्याचें स्वतःचें कर्तव्य सोडून आपल्या अल्पवयस्क कुमारास तें करण्यास पाठवितो, विदर्भदेशावरही स्वतः स्वारी करीत नाही, तर त्यावेळीं अन्तःपुरांत प्रेमचेष्टा करण्यांत दंग असतो—अशा विलासी व कर्तव्यशून्य राजाला, आपल्या इतर ग्रंथांत दिलीप, रघु, राम इत्यादि राजर्षींची उदात्त चरित्रें रसाळ वाणीने वर्णन करणारा कालिदास आदर्श मानील असें वाटत नाही. तेव्हा या नाटकांत कवीने स्वकालीन सामान्य राजेलोकांचीं अंतःपुरांतील कारस्थानें वर्णिलीं असावीं असें वाटतें.

कालिदासाच्या सर्व नायकांत अग्निमित्र कनिष्ठ, तर त्याच्या सर्व विदूषकांत 'मालविकाग्निमित्रां'तील गौतम नामक विदूषक अत्यंत हुशार आहे. इतर विदूषकांप्रमाणें हा खाद्यपेयांचा भोक्ता व झोपाळू आहेच. पण तो त्यांसारखा विसराळू व सांगकाम्या नाही, उलट कारस्थानें रचण्यांत अतिशय निपुण आहे. शिवाय तो हजरजबाबी असून उपहास करण्यांत कुशल आहे. राजाशीं त्याचा अत्यंत स्नेह आहे. त्याला मालविकेची प्राप्ति व्हावी म्हणून तो नाना प्रकारच्या युक्त्या योजितो. दोन नाट्याचार्यांत कलह घडवून आणतो; मालविकेला प्रमदवनांत पाठवावें म्हणून कांही खोडी करून राणीचा पाय दुखवितो; शेवटीं राणीकडून अगठी मिळविण्याकरितां आपणास विषबाधा झालेली दाखवितो; त्यावरून कारस्थानाचें जाळें विणण्याप्रमाणें अभिनयकलेंतही तो अत्यंत तरबेज दिसतो. इरावती त्याचें नैपुण्य पाहून त्याला 'कामतंत्रसचिव' ही पदवी बहाल करते, तेव्हा तो म्हणतो 'राणीसाहेब! कामनीतीचें एक अक्षरही मला येत असेल तर मी गायत्रीमंत्रही विसरेन!' अशा बुद्धिमान् मनुष्याला परंपरेस अनुसरून कालिदासाने खादाड व झोपाळू दाखविलें आहे. तथापि त्यांतील विसंगतपणा लौकरच त्याच्या लक्षांत आलेला दिसतो. शिवाय इतका हुशार मित्र दाखविण्याने नायक हा अगदीच मेषपात्र ठरतो. त्यामुळें आपल्या इतर नाटकांत त्याने विदूषकास प्राचीन परंपरेप्रमाणेंच रंगविलें आहे.

मालविका ही विदर्भराजकन्या, पण दैवदुर्विलासाने तिला दासी म्हणून राबावें लागतें. ती अत्यंत सुस्वरूप व नाट्यकलेंत निपुण अशी दाखविली आहे. पूर्वी आपला अग्निमित्राशीं विवाह होण्याचें घाटत होतें हें तिला माहीत असावें. तथापि दैववशात् दास्य प्राप्त झाल्यावर तें उच्च पद प्राप्त होणें अशक्य आहे याची तिला जाणीव आहे. राजाचें मन आपल्यावर बसलें आहे व तो आपल्या संगमासाठी आतुर आहे असें समजल्यावर मागचा पुढचा विचार न करतां व आढेवेढे न घेतां ती कबूल होते, त्यामुळें या बाबतींत पार्वती व शकुंतला या कालिदासाच्या इतर नायिकांइतकी ती धीरप्रकृति दिसत नाही. शिवाय, अज्ञातवासांतील कष्ट अनुभवीत असतां तिला आपल्या पूर्वीच्या वैभवाची स्मृति कधी झाली होती असें तिच्या भाषणांवरून दिसत नाही, हेंही जरा अस्वाभाविक दिसतें. धारिणी व इरा-

वती यांच्या स्वभावांतील विरोध कालिदासाने उत्तम प्रकारें दाखविला आहे. धारिणी ही मध्यम वयाची असून पट्टराणी आहे. अन्तःपुरांत सर्वांनाच तिचा वचक आहे. आपल्या पतीने फुलपाखरूवृत्तीने नित्य नव्या नव्या स्त्रीवर आषक व्हावें हें तिला मुळीच आवडत नाही. मालविका ही तर यःकश्चित् दासी. तेव्हा राजाचें तिजकडे लक्ष गेलें आहे असें समजतांच सावध होऊन ती त्याच्या दृष्टीस पडूं नये म्हणून प्रयत्न करते. तथापि ती प्राप्त झाल्याशिवाय आपला पति सुखी होणार नाही हें ध्यानांत आल्यावर ती त्याला अर्पण करण्याइतकी उदार होते. आपल्या पुत्राला दीर्घायुष्य लाभून विजय प्राप्त व्हावा एतदर्थ ती दररोज नियमाने दान देते. आपल्या भेटीकरितां फुलें खुडत असतांना विदूषकास सर्पदंश झाला हें समजतांच तिला अत्यंत वाईट वाटतें. यासारख्या प्रसंगांनी तिच्या स्वभावांतील कोमल छटा कवीने व्यक्त केल्या आहेत. याच्या उलट इरावती तरुण, नृत्यगायनादि शिकणारी व राजाचें मन आपल्यावरून उडून जाऊं नये म्हणून थोरल्या राणीला सांगून मालविकेला बंदिवासांत टाकणारी मत्सरी व मानी स्त्री दिसते. या दोन राण्यांच्या वयांतील व स्वभावांतील फरक दिसून येण्याकरितां कालिदासाने मद्यप्राशन केलेल्या इरावतीस रंगभूमीवर आणलें आहे. ज्यांचें तारुण्य उलटून गेलें आहे त्या स्त्रिया मद्यप्राशन करीत असत असा कोठेही उल्लेख नाही. तेव्हा या प्रसंगाने कालिदासास स्वकालीन राणीवर टीका करावयाची होती हें मागें (पृ० १८) उल्लेखिलेलें एका विद्वानाचें म्हणणें पटण्यासारखें नाही.

पण्डितकौशिकी ही माधवसेनाच्या सचिवाची बहीण. बिचारीवर अकाली वैधव्यप्रसंग आला होता. पुढे भावाच्या मृत्यूने तर तिचा राहिलेला आधारही तुटला. तेव्हा विषण्ण होऊन तिने संन्यासाश्रमाचा स्वीकार केला. तत्कालीन परिस्थितींत राजकुलांत प्रवेश करून घेण्यास तिला फार प्रयास पडले नसावेत. तेथे मालविकेला पाहतांच पूर्वी संकल्पिल्याप्रमाणें व एका सिद्धाने भविष्य वर्तविल्याप्रमाणें अग्निमित्राशीं तिचा विवाह घडून येणें शक्य आहे असें तिला वाटतें व त्यासाठी ती विदूषकास मदत करते. सबंध नाटकांत मालविकेने तिला ओळखल्याचें दिसत नाही हें मात्र आश्चर्य आहे. कालिदासाने गौणपात्रेंही थोडक्यांत

उत्तम रीतीने रंगविलीं आहेत. हरदत्त व गणदास या नाटचाचार्यांचा आपल्या कलेविषयीं अभिमान व परस्परांविषयींचा मत्सर, बकुलावलिकेचें आपल्या सखीवरचें निष्कपट प्रेम व तिच्याकरितां संकटें सोसण्याची तयारी, निपुणिकेचें मालविकादिकांच्या अर्धवट व आडून ऐकलेल्या संभाषणावरून अनुमान काढण्यांत दिसून येणारें नैपुण्य, हींही कालिदासाने उत्तम रीतीने दाखविलीं आहेत. 'मालविकाग्निमित्रा'ची भाषा प्रसादपूर्ण व मनोहर आहे. तींत कोठेही क्लिष्टपणा व कृत्रिमता दिसत नाही. या नाटकांत कालिदासाने अलंकारांचा अतिरेक न होऊं देण्याची काळजी घेतली आहे. कवीचें हें प्रथमचेंच नाटक असल्याने त्याने त्यांत 'मायूरी मदयति मार्जना मनांसि' इत्यादि ठिकाणीं तरुण कवींना विशेष आवडणाऱ्या अनुप्रासादि शब्दालंकारांचा उपयोग केला आहे. दोन तीन प्रसंगीं श्लेषाचाही खुबीने प्रयोग केलेला दिसतो. तथापि त्याच्या इतर ग्रंथांप्रमाणें यांतही उपमादि अर्थालंकारांचें प्राचुर्य दिसून येतें. एकंदरींत या नाटकाने त्याचें नांव सर्वांमुखीं होऊन त्याला चन्द्रगुप्त-विक्रमादित्याचा कायमचा आश्रय मिळाला असावा. पुढे मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें चन्द्रगुप्ताला कुमारगुप्त नामक पुत्र झाला त्याप्रसंगीं कालिदासाने आपलें 'कुमारसंभव' काव्य रचलें. नंतर कांही वर्षांनी राजपुत्राला यौवराज्याभिषेक झाला त्यावेळीं त्याचें दुसरें नाटक 'विक्रमोर्वशीय' रंगभूमीवर आलें असावें. कारण या नाटकाच्या शेवटीं पुरूरव्याच्या आयु नामक पुत्रास यौवराज्याभिषेक केल्याचा प्रसंग वर्णिला आहे. त्या नाटकाकडे आता आपण वळूं.

विक्रमोर्वशीय

या नाटकाचे पांच अंक आहेत. आरंभींच्या नांदींत कालिदासानें आपल्या इतर नाटकांप्रमाणें श्रीशंकराची स्तुति केली आहे. नंतर सूत्रधार पुढे येतो व प्रेक्षकांस उद्देशून म्हणतो, 'आमच्या प्रार्थनेस मान देण्याकरितां किंवा या नाटकाच्या उदात्त नायकाचा गौरव करण्याकरितां कालिदासाची ही कृति आपण लक्षपूर्वक ऐकावी.' या वेळीं

कवीची चांगलीच प्रसिद्धि झाल्यामुळें त्याला या नाटकाच्या गुणवर्णनपर कांही सांगावें लागलें नाही असें दिसतें. नंतर आगामि पात्रांच्या प्रवेशाची सूचना देऊन सूत्रधार निघून जातो व मुख्य प्रवेशास सुरवात होते. प्रथम रम्भा, मेनका इत्यादि अप्सरा प्रवेश करतात व मदतीकरितां ओरडतात. तें ऐकून सूर्यपूजा करून परत येत असलेला पुरूरवा राजा त्यांच्याजवळ जाऊन चौकशी करतो. त्यांच्याकडून त्याला असें कळतें की कुबेरभवनाहून परत येत असतां उर्वशी नामक सुंदर अप्सरेला व तिच्या चित्रलेखा नांवाच्या सखीला केशि नामक दैत्याने पकडलें आहे. तें ऐकतांच त्यांना हेमकूट शिखरावर थांबावयास सांगून राजा त्याच्या पारिपत्यार्थ जातो व थोडयाच वेळाने चित्रलेखेने सावरलेल्या मूर्च्छित उर्वशीला घेऊन परत येतो. नंतर कांही वेळाने उर्वशी भानावर येते. त्या वेळचें तिचें सौंदर्य पाहून राजा अगदी मोहित होऊन जातो. तो म्हणतो—

अस्याः सर्गविधौ प्रजापतिरभूच्चन्द्रो नु कान्तप्रभः
शृंगारैकरसः स्वयं नु मदनो मासो नु पुष्पाकरः ।
वेदाभ्यासजडः कथं नु विषयव्यावृत्तकौतूहलो
निर्मातुं प्रभवेन्मनोहरमिदं रूपं पुराणो मुनिः ॥ विक्र० १,८.

'ह्या सुंदरीला निर्माण करणारा विधाता रम्य कान्तीचा चंद्र, शृंगाररसपर मदन की कुसुमाकर वसन्त असावा बरें ? कारण वेदाभ्यासाने अरसिक झालेल्या व उपभोग्य विषयांविषयीं ज्याला मुळीच औत्सुक्य नाही अशा ब्रह्मदेवरूपी जरठ ऋषीला इतकें मनोहर रूप कसें निर्माण करतां येणार !' उर्वशीचेंही मन राजाच्या शौर्याने व गोड भाषणाने आकृष्ट होतें. नंतर ते सर्व एके ठिकाणी जमून बोलत असतात तों चित्ररथ गन्धर्व तेथे येतो व राजास म्हणतो, 'महाराज, नारदऋषीकडून उर्वशीहरणाची बातमी समजल्याबरोबर इन्द्राने तिला परत मिळविण्यासाठी गन्धर्वसेनेला आज्ञा केली पण मार्गांत आम्ही भाटांकडून आपल्या विजयाचें वर्णन ऐकून येथे आलों आहों. तरी आपण हिला घेऊन इन्द्राकडे चलावें. आपण इन्द्राचें मोठेंच प्रिय केलें आहे.' 'इन्द्राच्या प्रभावाने त्याच्या पक्षाचे मजसारखे लोक

'अनुत्सेकः खलु विक्रमालङ्कारः' [निगर्वीपणा हें शौर्याला भूषणच आहे]. या भाषणांत कालिदासाने आपला आश्रयदाता विक्रमादित्य हा गर्वरहित आहे असें श्लेषद्वारा सूचित केलें आहे. प्रेक्षकांत बसलेल्या विक्रमादित्याला ही गर्भित स्तुति आवडली असेल हें सांगवयास नकोच. नंतर अप्सरा व गंधर्व आकाशमार्गें जातात. पण वेलीत अडकलेली मोत्यांची एकावली सोडविण्याच्या मिषाने राजाला पुनः एकदा पहाण्याकरितां उर्वशी जरा मागें राहते. नंतर राजाही स्वनगरी परत जातो. (अंक १). यानंतर सुमारें एका पंधरवड्याने दुसऱ्या अंकांतील गोष्टी घडलेल्या दिसतात. आरंभीं एक छोटा प्रवेश घातला आहे, त्यावरून आपणांस असें कळतें की राजाने आपलें मन उर्वशीवर बसलें आहे ही गोष्ट विदूषकाला कळविली होती व त्याला ती गुप्त ठेवण्याबद्दल बजावलें होतें. पण काशीराजाची मुलगी व पुरूरव्याची राणी औशीनरी हिला राजाचें मन दुसऱ्या कोणा स्त्रीवर बसल्याचा संशय आल्यावरून तिने आपल्या निपुणिका नामक दासीला पाठविलें आहे. ती मोठ्या युक्तीने विदूषकाकडून तें रहस्य काढून घेते. नंतर राजकार्य पाहून झाल्यावर राजा विदूषकासह प्रवेश करतो. मनोविनोदनार्थ कोठे जावें असें राजाने विचारतांच विदूषक उत्तर करतो, 'चला आपण सैंपाकघरांत जाऊं. तेथे पंचपक्वान्नें तयार करण्याकरितां जमविलेली सामग्री पाहून आपलें मन रमविणें शक्य आहे.' राजाला अर्थातच ही सूचना पसंत पडत नाही! तेव्हा ते प्रमदवनांत जातात. तेथे वसन्तागमनामुळें आलेल्या आम्रमंजरी पाहून राजाचें मन जास्तच अस्वस्थ होतें. तेव्हा उर्वशीसमागमाचा एखादा उपाय शोधण्यासाठी राजाने सांगितल्याप्रमाणें विदूषक विचार करीत बसतो. राजाला भावी समागमाचे सूचक असे शुभ शकुन होतात. त्यामुळें तोही आशेने वाट पाहत बसतो. इतक्यांत विमानांत बसून उर्वशी व चित्रलेखा तेथे येतात. विदूषक व राजा यांस विचारमग्न पाहून ते काय बोलतात तें ऐकण्यासाठी त्या तिरस्करिणी विद्येने अदृश्य होऊन जवळच उभ्या राहतात. इतक्यांत विदूषक म्हणतो 'राजा! सापडला मला उपाय! स्वप्नांत समागम करून देणारी निद्रा सेवन कर किंवा उर्वशीचें चित्र काढून तें सारखें पाहत रहा.' राजा म्हणतो, 'हे दोन्ही उपाय शक्य नाहीत. माझें हृदय मदनशरांच्या शल्यांनी युक्त

असल्यामुळें मला प्रियेचा समागम करविणारी निद्रा प्राप्त होणें शक्य नाही. बरें तिचें चित्र काढावें तर तें पूर्ण व्हावयाच्या अगोदरच माझ्या नेत्रांत अश्रु उभे राहिल्याशिवाय राहणार नाहीत. मला होत असलेला हा दारुण मदनसंताप उर्वशीला समजत नाही असें दिसतें.' तें ऐकतांच उर्वशी आपली मदनबाधा वर्णन करणारे दोन श्लोक रचून ते एका भूर्जपत्रावर लिहिते व तें राजापुढे टाकते. राजाला ते वाचून प्रत्यक्ष उर्वशी भेटल्याइतका आनंद होतो. त्याच्या अंगुलींना घाम सुटतो. तेव्हा अक्षरें खराब होऊं नयेत म्हणून तो तें भूर्जपत्र विदूषकाजवळ देतो. नंतर उर्वशी व चित्रलेखा प्रकट होतात. त्यांचें थोडें संभाषण होतें तोंच 'भरताने अप्सरांस शिकविलेल्या अष्टरसयुक्त नाटकाचा प्रयोग पाहण्याची इंद्राला इच्छा आहे, तरी उर्वशीला घेऊन तूं लौकर ये,' असें एक देवदूत चित्रलेखेस सांगतो. तेव्हा राजाची अनुज्ञा घेऊन मोठ्या कष्टाने उर्वशी सखीसह परत जाते. नंतर मनोविनोदाकरितां राजा विदूषकाकडे तें भूर्जपत्र मागतो. त्याच्या हातून तें पूर्वीच गळून वाऱ्याने दुसरीकडे गेलें होते. तेव्हा तो म्हणतो—'इथे तें कुठेंही दिसत नाही. उर्वशीच्या मार्गाने गेलें असें दिसतें.' या हलगर्जीपणाबद्दल राजा त्याची कानउघाडणी करतो. नंतर ते दोघेही त्याचा शोध करूं लागतात. तोंच निपुणिका दासीसह औशीनरी राणी तेथे येते. तिच्या नूपुरांत तें भूर्जपत्र जाऊन अडकतें. निपुणिका तें राणीला वाचून दाखविते व हा उर्वशीचा प्रेमलेख असावा असें अनुमान करते. नंतर राणी पुढे होऊन म्हणते ' महाराज ! आपण शोधीत आहां तें हें भूर्जपत्र घ्या ! ' मी दुसरेंच कांही पहात होतों अशी राजा बतावणी करतो. पण तिने राणीचें थोडेंच समाधान होणार ? तेव्हा तिला प्रसन्न करण्याकरितां राजा तिच्या पायां पडतो. त्याकडे लक्ष न देतां ती दासीसह निघून जाते. तेव्हा विदूषक म्हणतो, 'ही निघून गेली हें आपणांस बरेंच झालें. ज्याचे डोळे आले आहेत अशा माणसाला दिव्याची ज्योत समोर असलेली सहन होत नाही.' त्यावर राजा उत्तर करतो, 'मित्रा असें नाही. उर्वशीवर माझें प्रेम बसलें असलें, तरी राणीविषयीं माझ्या मनांत पूर्वीप्रमाणेंच आदर आहे.' नंतर मध्याह्नसमय झाल्यामुळें दोघेही स्नानभोजनार्थ जातात. (अंक २). तिसऱ्या अंकाच्या आरंभींही एक लहान प्रवेश घातला आहे. त्यांतील

पल्लव व गालव या भरतमुनींच्या शिष्यांच्या संभाषणावरून आपल्याला असें समजतें की उर्वशी स्वर्गास परत गेल्यावर इन्द्रसभेसमोर सरस्वतीने रचलेल्या 'लक्ष्मीस्वयंवर' नामक नाटकाचा प्रयोग झाला. त्यांत मेनकेने वारुणीची व उर्वशीने लक्ष्मीची भूमिका घेतली होती. स्वयंवरप्रसगीं वारुणीने लक्ष्मीला विचारलें, 'सखे ! हे विष्णूसह सर्व लोकपाल येथे आले आहेत. यांपैकी कोणावर तुझें मन बसलें आहे ?' त्यावर तिनें 'पुरुषोत्तमावर' असें उत्तर द्यावयाचें पण 'बुद्धिः कर्मानुसारिणी' या न्यायाने लक्ष्मीवेषधारी उर्वशीच्या मुखांतून 'पुरूरव्यावर' असे शब्द चुकून बाहेर पडले व सर्वांचा विरस झाला. तेव्हा भरतमुनींनी रागावून 'तुझें स्वर्गांतील स्थान नष्ट होईल' असा शाप दिला. पण इन्द्राने नाटक-प्रयोग संपल्यावर खाली मान घालून बसलेल्या उर्वशीला म्हटलें, 'पुरूरवा राजा मला युद्धांत साहाय्य करतो तेव्हा त्याला इष्ट तें मला केलें पाहिजे; करितां तूं त्याकडे जा व तुझ्या मुलाचें त्याला दर्शन होईपर्यंत त्याजवळ रहा.' मागील अंकांतील गोष्टी घडल्या त्याच दिवशीं तिसऱ्या प्रहरीं वरील प्रकार झाला असावा. त्या दिवशी रात्री घडलेला वृत्तांत यानंतर-च्या मुख्य प्रवेशांत वर्णिला आहे. आरंभी कंचुकी प्रवेश करतो व पुढील-प्रमाणें सायंकाळचें वर्णन करतो—

> उत्कीर्णा इव वासयष्टिषु निशानिद्रालसा बर्हिणो
> धूपैर्जालविनिःसृतैर्वडभयः संदिग्धपारावताः ।
> आचारप्रयतः सपुष्पबलिषु स्थानेषु चार्चिष्मतीः
> सन्ध्यामंगलदीपिका विभजते शुद्धान्तवृद्धाजनः ॥ विक्र० ३, २.

या श्लोकांत संध्यासमयाचें सुंदर वर्णन केलें आहे. नंतर राजा व विदूषक प्रवेश करतात. तेव्हा 'मणिहर्म्याच्या गच्चीवरून आज रात्री चन्द्र चांगला दिसेल. तरी त्याचा रोहिणीशी संयोग होईपर्यंत महाराजांसमवेत पाहत बसावें अशी माझी इच्छा आहे'—असा राणीचा निरोप कंचुकी राजास कळवितो. तेव्हा ते सर्व गच्चीवर जातात. तेथे उदयोन्मुख चन्द्राच्या किरणांनी अंधकार नाहीसा होत आहे असें पाहून राजा त्या दृश्याचें खालीलप्रमाणें वर्णन करतो—

उदयगूढशशाङ्कमरीचिभिस्तमसि दूरमितः प्रतिसारिते।
अलकसंयमनादिव लोचने हरति मे हरिवाहनदिङ्मुखम्॥ विक्र० ३,६.

'उदयपर्वताआड असलेल्या चन्द्राच्या किरणांनी अंधकार दूर सारला असतां ही पूर्वदिशेचें मुख जणूं काय वेणी फणी केल्यासारखें दिसत आहे व माझ्या नेत्रांना आनंदवीत आहे.' या वर्णनांत समासोक्ति व उत्प्रेक्षा या अर्थालंकारांचा मधुर संयोग झाला आहे. चन्द्र हा पूर्वदिशेचा पति. तो क्षितिजावर आला नव्हता तेव्हा विरहिणी स्त्रीचे केश तैलादिसंस्कार नसल्यामुळें तिच्या मुखावर पसरतात तसा अंधकार पूर्वदिशा व्यापून राहिला होता. पण उदयोन्मुख चन्द्राच्या किरणांनी अंधकार दूर सारल्यामुळें पूर्व दिशेचें मुख वेणीफणी करून पतीच्या आगमनाची प्रतीक्षा करणाऱ्या स्त्रीच्या मुखासारखें दृष्टीस आनंद देत आहे, असा राजाचा आशय आहे. तितक्यांत चन्द्र उगवला तें पाहून विदूषक म्हणतो, 'हा पहा मोडक्या मोदकासारखा दिसणारा चन्द्र उगवला आहे!' विदूषक हा मोठा अधाशी; तेव्हा त्याच्या उपमा खाद्यपेयांदिकांतूनच घेतल्या असणार! ते याप्रमाणें बोलत बसले आहेत तों अभिसारिकेचा वेष केलेली उर्वशी व चित्रलेखा या बिमानांतून तेथे येतात. आपल्या विरहाने झुरत असलेल्या राजाचें भाषण ऐकून उर्वशी प्रकट होणार, तोंच उपहाराचें सामान घेतलेल्या दासीसह औशीनरी राणी तेथे येते. तिने शुभ्रवस्त्र नेसलें होतें, सौभाग्यदर्शक असेच अलंकार अंगावर घातले होते व व्रतस्थ असल्यामुळें अभिमान टाकला होता. तिला पाहून उर्वशीलाही तिच्याबद्दल आदर वाटतो. राजा तिला देवी ह्मणून संबोधितो तें पाहून ती म्हणते, 'खरोखर हिला देवी ही पदवी चांगली शोभते. तेजस्वीपणांत इंद्राणीपेक्षा ही कोणत्याही प्रकारें कमी नाही.' नंतर चन्द्रकिरणांचें गन्धपुष्पादिकांनी अर्चन करून व विदूषकाला उपायन देऊन राणी राजाचीही पूजा करते व हात जोडून म्हणते— 'या रोहिणीचन्द्राच्या जोडप्याला साक्षी ठेवून मी सांगतें की, जिच्यावर आपलें प्रेम आहे व जी आपल्या समागमाला उत्सुक आहे, तिच्याशीं आजपासून मी प्रेमाने वागेन.' त्यावर विदूषक आपल्याशींच म्हणतो, 'हातांतून मासा निसटल्यावर धीवर म्हणतो, बरें झालें, मला पुण्य लागेल.' नंतर राणी गेल्यावर उर्वशी व चित्रलेखा प्रकट होतात. प्रथमचें स्वागत

कुशलप्रश्नादि झाल्यावर चित्रलेखा राजाला विनंती करते की वसंत ऋतु संपल्यावर उष्णकाळीं मला सूर्याची सेवा करावयाची आहे, तरी माझ्या सखीला स्वर्गाची आठवण न होईल असें करावें. त्यावर विदूषक म्हणतो, 'अहो तुमच्या स्वर्गांत ना खाणें ना पिणें ! केवळ माशासारखें डोळ्याची उघडझांप न करतां राहावें लागतें !' नंतर चित्रलेखा गेल्यावर रात्र बरीच झाली असें पाहून ते सर्व आंत जातात. (अंक ३). यानंतर चौदा पंधरा वर्षांनी घडलेल्या गोष्टी चौथ्या अंकांत वर्णिल्या आहेत. मध्यंतरी झालेला वृत्तांत चित्रलेखा व सहजन्या या अप्सरांच्या संभाषणांत आपणांस कळतो. मागील अंकांत वर्णिल्याप्रमाणें राजा व उर्वशी यांचा समागम झाल्यावर कांही काळाने राज्यकारभार अमात्यांवर सोंपवून राजा उर्वशीसह गन्धमादनपर्वतावर विहार करण्यास गेला. तेथे एकदा मन्दाकिनीच्या तीरावर वाळूच्या टेकड्या करून खेळत असलेल्या विद्याधरकुमारीकडे राजा निरखून पहात होता. त्यावरून उर्वशीला राग येऊन ती तेथून निघून गेली व कार्तिकस्वामीच्या वनांत शिरली. कार्तिकस्वामी हा आजन्म ब्रह्मचारी व स्त्रीदर्शन अनिष्ट मानणारा. त्याने 'या अरण्यांत कोणा स्त्रीने प्रवेश केल्यास ती लता होईल' असा नियम केला होता. त्याप्रमाणें उर्वशीचेंही रूपांतर झालें. इकडे उर्वशीचा विरह सहन न होऊन राजा रानोमाळ भटकूं लागला आहे व वर्षाऋतूचे मेघ दिसूं लागल्यामुळें त्याची अवस्था जास्तच कठीण होणार आहे, असें त्यांच्या संभाषणावरून आपणांस कळतें. नंतर मुख्य प्रवेशांत उर्वशीवियोगाने वेडा झालेला राजा प्रवेश करतो व मेघ, लता, वृक्ष, पशु, पक्षी इत्यादिकांस आपल्या स्त्रीची बातमी विचारीत भटकत राहतो. आकाशांतून जलवर्षाव करणाऱ्या मेघालाच उर्वशीहरण करणारा राक्षस समजून राजा म्हणतो–'अरे दुरात्म्या ! थांब. माझ्या प्रियतमेला घेऊन कोठे चाललास ? अरे हा पर्वतशिखरावरून आकाशांत उडी मारून माझ्यावरच बाणांची वृष्टि करतो आहे !' थोडा विचार केल्यावर हा राक्षस नसून मेघ आहे असें राजाला वाटतें—

नवजलधरः संनद्धोऽयं न दृप्तनिशाचरः
सुरधनुरिदं दूराकृष्टं न नाम शरासनम् ।

अयमपि पटुर्धारासारो न बाणपरंपरा
कनकनिकषस्निग्धा विद्युत् प्रिया न ममोर्वशी ॥ विक्र० ४,१.

थोडें पुढे गेल्यावर त्याला भूमीवर पडलेलें व ओष्ठरागाने रक्तवर्ण झालेल्या अश्रुबिन्दूंनी अंकित असें उर्वशीचें हिरवें स्तनांशुक सापडलें असें वाटतें, पण निरखून पाहतो तों इन्द्रगोप नांवाचे तांबडे किडे जिच्यावर पसरले आहेत अशी नव्या गवताची हरळी. असें हिंडतां हिंडतां त्याला एक रक्तवर्ण मणी दिसतो. 'जिच्या वेणीत हा घालण्यसाठी द्यावयाचा ती माझी प्रियाच आता दुर्लभ झाल्यामुळे याला घेऊन काय करावयाचें?' असें राजाला वाटतें. पण इतक्यांत, 'पार्वतीच्या पायाच्या अलक्तकापासून झालेला हा मणी लौकरच प्रियजनाचा संगम घडवून आणतो; तेव्हा तूं तो अवश्य घे.' असे एका ऋषीचे शब्द ऐकून राजा तो उचलून घेतो व जवळच पुष्परहित असताही मनोरम दिसणाऱ्या लतेस आलिंगितो तों उर्वशी प्रकट होते. नंतर 'आपण राज्य सोडून आल्यास फार काळ झाला, प्रजा मला दोष देत असतील' असें म्हणून उर्वशी परत जावें असें सुचविते. त्याप्रमाणें ती दोघें राजधानीस जातात. (अंक ४). यानंतर लौकरच पांचव्या अंकांतील गोष्टी घडल्या आहेत. परत आल्यावर एके दिवशी गंगायमुनांच्या संगमावर राण्यासह स्नान करून राजा वस्त्रालंकार धारण करीत असतां एका गृध्राने तो सगमनीय मणी मांसखंड समजून उचलून नेल्याचें त्यास समजतें. तेव्हा तो तसाच उठून बाहेर येतो व त्यास मारण्याकरितां धनुष्यबाण मागतो. ते आणण्यापूर्वीच तो गृध्र दृष्टीच्या टप्प्याच्या पलीकडे जातो. तें पाहून 'सायंकाळीं तो एखाद्या वृक्षावर बसेल, तेव्हा त्यावर नजर ठेवावी,' अशी आपली आपली आज्ञा नगराध्यक्षास कळविण्यास राजा कंचुकीस सांगतो. नंतर विदूषकाबरोबर त्याविषयीं बोलत असतां कचुकी तो मणि व एक बाण घेऊन परत येतो. बाणावरील अक्षरें वाचतांच तो आपणांपासून उर्वशीस झालेल्या आयु नांवाच्या कुमाराचा आहे असें राजास समजतें. तेव्हा त्याला फार आश्चर्य वाटतें. तो म्हणतो 'माझा व उर्वशीचा फक्त नैमिषेय सत्राच्या वेळीं वियोग झाला होता, त्यावेळीं सुद्धा ती गर्भवतीही असल्याचें दिसलें नाही मग प्रसूति कोठली ?' यावर विदूषक उत्तर करतो, 'अरे ! उर्वशी ही

दिव्यांगना ! दिव्य स्त्रिया मानुषी स्त्रियांप्रमाणेंच सर्व बाबतींत असतात असें समजूं नको.' याप्रमाणें ते बोलत बसले आहेत तों कंचुकी प्रवेश करतो व च्यवनाश्रमांतून एक तापसी कुमाराला घेऊन आली असल्याचें राजाला कळवितो. कुमाराला पाहतांच त्याच्या व राजाच्या चेहऱ्यांतील सादृश्य विदूषकाच्या लक्षांत येतें. राजालाही वात्सल्यप्रेमाचें भरतें येतें. तो म्हणतो—

बाष्पायते निपतिता मम दृष्टिरस्मिन्
वात्सल्यबन्धि हृदयं मनसः प्रसादः।
सञ्जातवेपथुभिरुज्झितधैर्यवृत्ति-
रिच्छामि चैनमदयं परिरब्धुमङ्गैः॥ विक्र० ५, ९.

'याला पाहिल्याबरोबर माझ्या नेत्रांत अश्रु उभे राहिले आहेत, हृदय वात्सल्यपूर्ण व मन प्रसन्न झालें आहे. स्वतःचा धीरस्वभाव टाकून कम्पित अशा अंगांनी याला कवटाळावें अशी मला इच्छा होत आहे.' कुमारालाही तत्सदृश प्रेमाचा अनुभव येतो. नंतर तापसी म्हणते, 'जन्मल्याबरोबर या कुमाराला उर्वशीने माझ्या स्वाधीन केलें. भगवान् च्यवनांनी याचे जातकर्मादि संस्कार करून याला धनुर्विद्या शिकविली. आज पुष्पें, समिधा वगैरे आणण्याकरितां ऋषिकुमारांबरोबर बाहेर गेला असतां याने मांस-खण्ड तोंडांत धरलेल्या व झाडावर बसलेल्या एका गृध्राला मारलें. तेव्हा च्यवनऋषीनी मला बोलावून याला परत करावयास सांगितलें आहे.' नंतर कुमार राजाला नमस्कार करतो. तेव्हा राजा म्हणतो, 'हा तुझ्या पित्याचा प्रियमित्र ब्राह्मण बसला आहे, याला निःशंकपणें वन्दन कर.' त्यावर विदूषक म्हणतो, 'याला भीति कां वाटावी ? आश्रमांत वास केल्यामुळें याने माकडें पाहिलींच असतील !' नंतर उर्वशी प्रवेश करते. कुमाराला पाहतांच तिच्या हृदयांतही अपत्यस्नेहाचा उमाळा येतो; पण पतीला आपल्या पुत्राचें दर्शन झाल्यामुळें इन्द्राच्या आज्ञेप्रमाणें आता त्याचा व आपला वियोग होणार हा विचार मनांत येतांच तिच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागतात. राजाला त्याचें कारण समजतांच तो कुमाराला राज्याभिषेक करून आश्रमांत जाण्याचा निश्चय करतो. पण इतक्यांत नारदऋषि

तेथे येतात व इंद्राचा पुढील निरोप राजाला कळवितात—'राजा, त्रिकालदर्शी मुनींनी पुढे सुरासुरांचा संग्राम होणार आहे असें सांगितलें आहे. तूं आमचा युद्धांतील साहाय्यक म्हणून, तूं आताच शस्त्रसंन्यास करूं नको. ही उर्वशी जन्मभर तुझी सहधर्मचारिणी म्हणून राहील.' नंतर इन्द्राने पाठविलेल्या जलादिकांनी अप्सरा आयूला यौवराज्याभिषेक करतात. नारदादिकांस कुमाराने नमस्कार केल्यावर औशीनरी राणीला नमस्कार करण्यास त्याला सर्व जण घेऊन जातात व भरतवाक्याने नाटक समाप्त होतें. (अंक ५).

'मालविकाग्निमित्र' व 'अभिज्ञानशाकुंतल' या कालिदासाच्या इतर नाटकांच्या नांवाप्रमाणें प्रस्तुत नाटकाचें 'विक्रमोर्वशीय' हें नांव अनुरूप भासत नाही. पुरूरव्याचें विक्रम हें नांव होतें असा कोठेही उल्लेख आलेला नाही. तेव्हा विक्रमाने म्हणजे पराक्रमाने प्राप्त करून घेतलेल्या उर्वशीविषयी हें नाटक असल्याने त्याला विक्रमोर्वशीय हें नांव कवीने दिलें, अशी उपपत्ति लावावी लागते. असें नांव देण्यांत आपल्या आश्रयदात्याचें नांव आपल्या कृतीशीं संलग्न करण्याचा हेतु असावा. वरील हेतूनेच त्याने विक्रम हा शब्द या नाटकांत दोन ठिकाणीं योजिला आहे हें मागें दाखविलेंच आहे.*

कालिदासाने या नाटकाचें कथानक कोठून घेतलें तें निश्चयपूर्वक सांगतां येत नाही. पुरूरवा व उर्वशी यांची प्रेमकथा अत्यंत प्राचीन आहे हें ऋ० १०. ९५ या सूक्तावरून दिसून येतें. या सूक्तांत पुरूरवा व उर्वशी यांचा संवाद दिला आहे. सूक्ताची भाषा कांही ठिकाणीं दुर्बोध आहे, तथापि त्याचा सामान्यतः अर्थ समजण्यास फारशी अडचण येत नाही. शिवाय त्या सूक्ताचा संदर्भ व कांही ऋचांचें स्पष्टीकरण शतपथ ब्राह्मणांत (५, १–२) आढळतें त्यावरून खालील गोष्ट दिली आहे. "उर्वशी नांवाच्या अप्सरेचें पुरूरव्यावर प्रेम बसून ती त्याच्या सहवासांत कांही काल राहत होती. प्रथमतःच तिने पुढील अटी घातल्या होत्या. 'माझे दोन मेंढे नेहमी माझ्या शयनागारांत बांधले पाहिजेत व तूं नग्न असतांना कधीही माझ्या

* राजशेखराने आपल्या 'प्रचण्डपाण्डव' नाटकाच्या व आर्यक्षेमीश्वराने आपल्या 'चण्डकौशिक' नाटकाच्या नांवांत आपल्या आश्रयदात्या राजाच्या नांवाचा गर्भित उल्लेख केला आहे हें आम्ही अन्यत्र दाखविलें आहे. शारदाश्रमवार्षिक १९३१, पृ २६.

दृष्टीस पडूं नये. राजाने त्या दोन्ही अटी कबूल केल्या होत्या. कालान्तराने उर्वशी गरोदर झाली. इकडे उर्वशी गेल्यामुळें स्वर्ग शून्यवत् भासूं लागला म्हणून तिला परत आणण्यासाठी गन्धर्वांनी एक युक्ति योजिली. त्यांनी एका रात्रीं मेंढ्यांना उचलून नेऊन मारण्यास सुरुवात केली. त्यांचें ओरडणें ऐकून उर्वशी म्हणाली, 'माझ्या या लाडक्यांचें रक्षण करण्यास येथे कोणीच नाही काय?' तेव्हा राजा नग्नावस्थेंत तसाच लगबगीने त्यांच्या रक्षणार्थ धावला. तो उर्वशीच्या दृष्टीस पडावा म्हणून गन्धर्वांनी तितक्यांत विजेचा लख्ख उजेड पाडला. आपल्या अटीप्रमाणें उर्वशी सोडून जाऊं लागली तेव्हा राजाने तिला परोपरीने विनविलें, त्यावेळचा त्यांचा संवाद ऋग्वेदाच्या वरील सूक्तांत दिला आहे. 'तुझ्या प्रेमाने वेडावून मी भटकत राहीन कडेलोटाने प्राणत्याग करीन व आपलें शरीर कोल्हयाकुत्र्यांकडून खाववीन,' असें राजा म्हणाला. तेव्हा उर्वशी उत्तर करते, 'पुरूरव्या ! आपला कडेलोट करून घेऊं नको किंवा प्राणही टाकूं नको ! तुझ्या शरीराला कोल्हेकुत्रे इजा न करोत! तूं परत जा ! स्त्रियांचें प्रेम स्थिर नसतें. त्यांचीं हृदयें लांडग्यांच्या सारखीं असतात.' शेवटीं तिला दया येऊन वर्षाच्या शेवटीं एक रात्रभर त्याच्या बरोबर राहण्याचें तिने कबूल केलें. नंतर त्याने गन्धर्वांना संतुष्ट केलें व त्यांनी सांगितल्याप्रमाणें मनुष्यलोकीं स्वर्गीय अग्नि आणून व यज्ञ करून गन्धर्वरूप प्राप्त करून घेतलें." शतपथ ब्राम्हणांतील वरील गोष्ट थोडया फार फरकाने विष्णु व भागवत या पुराणांतही आली आहे. उर्वशीला मित्रावरुणांचा शाप झाल्यामुळें मनुष्यलोकीं वास्तव्य करावें लागलें ही अधिक माहिती त्या पुराणांत आढळते. याशिवाय या गोष्टीचें एक निराळेंच स्वरूप 'कथासरित्सागरां'त दिसून येतें तेंही स्वकालीन 'बृहत्कथे'वरून कालिदासाला परिचित असावें. 'कथासरित्सागरां'त, पुरूरवा हा विष्णुभक्त असल्याने विष्णूने उर्वशी त्याला देण्याविषयीं इन्द्राला आज्ञा केली; एके दिवशीं तो तिच्यासह इन्द्रसभेंत बसला असतां रंभेने नृत्यांत कांही चूक केल्यावरून राजा हसला; तेव्हा नृत्याचार्य तुम्बरु याला राग येऊन त्याने उर्वशीचा व तुझा वियोग होईल अशा शाप दिला; पुढे तपश्चर्येने विष्णूला संतुष्ट करून राजाने उर्वशीची प्राप्ति करून घेतली.

पुरूरवा व उर्वशी यांच्या प्रेमकथांचीं वरील कालिदासकालीन स्वरूपें लक्षांत घेतल्यास कवीची कल्पकता या नाटकांत उत्तम रीतीने दिसून येईल. उर्वशीला कांही शाप झाल्यामुळें थोडे दिवस मृत्युलोकीं वास्तव्य करावें लागलें होतें व तिने घातलेल्या अटी राजाने मोडल्यामुळें ती परत स्वर्गीं गेली, असें 'शतपथ ब्राह्मण' व पुराणें यांत वर्णिलें होतें तर 'बृहत्कथें'त तुम्बरूच्या शापाने राजाचा व तिचा वियोग झाला असें दाखविलें होतें. या सर्व घटनांचा कालिदासाने आपलें संविधानक रचनांना मार्मिकपणें उपयोग करून घेतला आहे. पहिल्या अंकांतील उर्वशीहरणाचा व तदनंतर पुरूरवा व उर्वशी यांच्या प्रथमदर्शनाचा रम्य प्रसंग कवीच्या प्रतिभेनें नवीनच निर्माण केलेला दिसतो. तिसऱ्या अंकांत उल्लेखिलेला भरतमुनीचा शाप बृहत्कथेंतील तुम्बरूच्या शापावरून कवीला सुचला असावा. 'शतपथ ब्राह्मण' व पुराणें यांत वर्णिलेल्या उर्वशीच्या अटी कलेच्या दृष्टीने रम्य नसल्याने त्या जागीं कवीने पुत्रदर्शनाची अट घातली आहे. चौथ्या अंकांतील कार्तिकस्वामीचा नियम, त्यामुळें उर्वशीचें रूपपरिवर्तन, पुरूरव्याचा शोक इत्यादि प्रसंग व सबंध पांचवा अंक हीं कालिदासाच्याच कल्पकतेचीं फळें होत. कुमाराचें दर्शन झाल्याबरोबर उर्वशीस स्वर्गास परत जावें लागलें असतें तर राजाही तपश्चर्येकरितां आश्रमांत जाता व त्यायोगें नाटकाचा अंत दुःखपर्यवसायी झाला असता. संस्कृत नाट्यशास्त्राच्या नियमाप्रमाणें असें करणें शक्य नव्हतें, म्हणून शेवटल्या अंकांत नारदाकडून इंद्राचा निरोप राजाला कळवून कालिदासाने नाटकाचा शेवट गोड केला आहे. या नाटकाच्या पहिल्या तीन अंकांतल्या संविधानकासारखी कथा मत्स्यपुराणांत दिलेली आढळते, त्यावरून कालिदासाने ती तेथून घेतली असावी असें कित्येक विद्वानांनी म्हटलें आहे. पण सध्याच्या पुराणांच्या प्रती विश्वसनीय नाहीत. त्यांत वेळोवेळीं नव्या नव्या कथा घुसडलेल्या आहेत हें आता सिद्ध झालें आहे. म्हणून मत्स्य पुराणानेच पुरूरवा व उर्वशी यांच्या प्रेमकथेचें इतर पुराणांत दिसणारें स्वरूप टाकून देऊन त्याच्या जागीं 'विक्रमोर्वशीयां'तील रम्य कथानक संक्षिप्तरूपाने दिलें आहे असें म्हणतां येतें.*

* 'मत्स्य पुराणां'तील कथेंत 'बृहत्कथा' व 'विक्रमोर्वशीय' यांतील वर्णनांचें

'विक्रमोर्वशीया'चें संविधानक कालिदासाच्या पहिल्या नाटकांतल्या-इतकें गुंतागुंतीचें नाही.कथानकाच्या नागमोडी वळणांत प्रेक्षकांचें चित्त रोधण्यापेक्षा स्वभावरेखनाच्या रम्य दर्शनानें तें आकृष्ट करणें बरें असें कवीला वाटलें असावें. कारण कांही असलें तरी 'मालविकाग्निमित्रा'च्या मानाने यांत सविधानकचातुर्य बरेंच कमी दिसतें. दुसऱ्या व तिसऱ्या अंकांतील कांही घटनांची कथानकाच्या गतीला आवश्यकता भासत नाही. उदाहरणार्थ, त्या अंकांतील औशीनरी राणीचे प्रवेश विरोधदर्शनाने उर्वशीच्या स्वभावाला जास्त उठाव मिळावा याकरितांच घातलेले दिसतात. यांतील भाषा मात्र पहिल्या नाटकांतल्याप्रमाणेंच प्रासादिक, सौष्ठवयुक्त व सालंकृत आहे. यांत संभोग व विप्रलभ या द्विविध शृंगाराचा उत्तम परिपोष झाला आहे. तथापि चौथ्या अंकांत आरंभापासून अखेरपर्यंत राजा जवळ जवळ एकाच पद्धतीने शोक करीत असलेला दाखविला आहे. शोक रसाचा उठाव होण्याकरितां इतर रसाची योजना केली नाही त्यामुळें तो अंक कंटाळवाणा होतो.

'मालविकाग्निमित्रा'च्या मानाने या नाटकांत पात्रें संख्येने कमी असलीं, तरी जास्त काळजीपूर्वक रंगविलेलीं आहेत. यांत पुरूरवा, विदूषक व आयु हीं पुरुषपात्रें आणि उर्वशी व औशीनरी ही स्त्रीपात्रे प्रमुख आहेत. पुरूरवा हा नायक धीरोदात्त आहे. हा अत्यंत शूर, प्रेमी व दाक्षिण्यसंपन्न असा दाखविला आहे. नाटकाच्या आरंभीं केशि दैत्यावर त्याने मिळविलेल्या विजयाने तो उर्वशीप्रमाणेंच प्रेक्षकांचेंही मन आकृष्ट करून घेतो. त्याच्या शौर्यामुळें प्रत्यक्ष इंद्रालाही त्याच्या मदतीची जरूरी लागते. विनयाने तर त्याचें शौर्य जास्तच खुलून दिसते. उर्वशीवर त्याचें निस्सीम प्रेम असल्यामुळें तिचा विरह होतांच तो अगदी बेडाबून जातो आणि लतावृक्षांस व पशुपक्ष्यांस तिची बातमी विचारीत

(मागील पानावरून पुढे चालू)

मिश्रण झालेलें दिसतें. कारण त्यांत 'लक्ष्मीस्वयंवरप्रसंगीं मेनका व रंभा यांच्या बरोबर लक्ष्मीरूपधारिणी उर्वशी नाचत असतां भरताने शिकविलेला अभिनय विसरली' असें म्हटलें आहे. स्वयंवरप्रसंगीं प्रत्यक्ष वधूला नाचावयाला लावल्याने होणारें अनौचित्य ही कथा मत्स्यपुराणांत घुसडणाऱ्याच्या लक्षांत आलेलें दिसत नाही.

भटकत राहतो. कालिदासाच्या इतर नाटकांतील नायकांप्रमाणें हाही बहुपत्नीक आहे. तथापि याला आपल्या ज्येष्ठ राज्ञीच्या गुणांबद्दल आदर आहे. अन्य स्त्रीवर आपलें प्रेम गेलें आहे हें तिच्या लक्ष्यांत आल्यास तिला अत्यंत वाईट वाटेल म्हणून शक्य तों ही गोष्ट तिजपासून लपवून ठेवण्याचा तो यत्न करतो. अग्निमित्राच्या मानाने याचा स्वभाव बरा दाखविला असला, तरी दुष्यन्ताचे प्रजावात्सल्यादि गुण याच्यामध्यें दिसत नसल्याने हा त्याच्यापेक्षा कमी प्रतीचा ठरतो. या नाटकांतील माणवक नामक विदूषक 'मालविकाग्निमित्रां'तील गौतमाप्रमाणेंच खाद्यलोलुप आहे, पण बुद्धीने मात्र त्याच्यापेक्षा फारच कमी प्रतीचा दिसतो. राजाला मालविकेचें प्रथम दर्शन व पुढे समागम होण्याकरितां गौतम नाना प्रकारच्या युक्त्या योजतो, पण हा माणवक राजाचें उर्वशीवर प्रेम बसलें आहे एवढीही गुप्त गोष्ट औशीनरीच्या चतुर दासीपासून लपवूं शकत नाही. त्याच्या भोळसरपणामुळेंच औशीनरी राणीच्या प्रवेशांना अवसर मिळतो. खाद्यपेयादिकांतून घेतलेल्या उपमादि अलंकारांनी व स्वतःच्या कूरूपतेने इतर पात्रांचें व प्रेक्षकांचें मनोरंजन करणें एवढेंच याचें काम आहे. कथानकाला वळण देण्यांत याचा फारसा उपयोग होत नाही. तिसरें पुरुषपात्र राजकुमार आयूचें. 'मालविकाग्निमित्रां'तील कुमार वसुमित्र रंगभूमीवर येत नाही. त्याच्या शौर्याविषयीचें वर्णन ऐकून प्रेक्षकांस त्यास पाहण्याची इच्छा होते पण ती अतृप्त राहते. कालिदासाने या नाटकांत प्रथमच एका अल्पवयस्क कुमारास रंगभूमीवर आणलें आहे. वसुमित्रापेक्षा आयु हा वयाने लहान आहे. तथापि त्याचा स्वभावपरिपोष चांगला झाला आहे. त्याचें धनुर्विद्येंतील नैपुण्य, आपल्या पित्याविषयीं वाटणारें सहजप्रेम व च्यवनाश्रमांतील प्राण्यांवरील त्याची ममता हीं थोडक्यांत पण उत्तम रीतीने दाखविलीं आहेत. स्त्रीपात्रांत उर्वशी ही प्रमुख आहे. ही अप्सरा असल्याने स्वरूपाने अप्रतिम आहे हें सांगावयास नकोच. संस्कृत नाट्यशास्त्रकारांच्या वर्गीकरणाप्रमाणें ही 'साधारणा' व 'प्रगल्भा' आहे. हिचें पुरूरव्यावर निस्सीम प्रेम आहे. आपली उपभोगलालसा तृप्त झाल्यावर पतीविषयीं बेपर्वाई दाखविणारी व त्याच्या विनवणीस 'स्त्रियांची मैत्री शाश्वत नसते, त्यांचीं हृदयें लांडग्यांच्या सारखीं

असताम्,' असें निर्लज्जपणाने उत्तर देणारी अत्यंत स्वार्थी स्त्री असें तिचें स्वरूप ऋग्वेदादि प्राचीन ग्रंथांत दिसतें, पण कालिदासाच्या प्रतिभेच्या मुशींतून बाहेर पडल्यावर तिचा स्वभाव बराच बदललेला दिसतो. राजाला पुत्रदर्शन झाल्यावर इंद्राने घातलेल्या अटीप्रमाणें आपणास पतीचा वियोग होणार या कल्पनेने तिला अत्यंत दुःख होतें. तथापि तिचा स्वार्थीपणा समूळ नष्ट झालेला दिसत नाही. स्वतःच्या उपभोगाकरितां पोटच्या गोळघाला जन्मदिनापासून दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यांत तिला यत्किंचित्ही वाईट वाटलेलें दिसत नाही. तिच्या स्वभावांत स्त्रीजनसुलभ मत्सर आहेच. तथापि औशीनरी राणीची गंभीर आकृति दृष्टीस पडतांच तिला तिच्याबद्दल आदर वाटल्याशिवाय राहत नाही. पुत्राला यौवराज्याभिषेक झाल्यावर ती त्याला ज्येष्ठ माते़ला–औशीनरी राणीला–नमस्कार करण्यास घेऊन जाते. यावरून तिजविषयींचा तिचा आदर व्यक्त होतो. कालिदासकाळीं श्रीमंत, चैनी व रंगेल नायक विदुषी व विविधकलाभिज्ञ वेश्यांच्या संगतींत कसे रममाण होत असत याचें उत्तम चित्र वात्स्यायनाच्या 'कामसूत्रां'त दृष्टीस पडतें. अशा नागरकांच्या पत्नी मात्र आपल्या पतीच्या बाहेरख्यालीपणाकडे दुर्लक्ष करून त्याच्याशीं प्रेमाने वागत, गृहव्यवस्था पहात व सदैव विविध कर्तव्यांत निमग्न असत, असें त्याच ग्रंथावरून दिसतें. अशा प्रेमळ पण मानी व गंभीर स्वभावाच्या गृहिणीचें चित्र कालिदासाने औशीनरी राणीच्या रूपाने रंगविलेलें दिसतें. उर्वशीवर प्रेम बसलें तरी पुरूरवा औशीनरी राणीला आदराने वागवितो हें पाहून चित्रलेखा 'अन्यसंक्रान्तप्रेमाणो नागरका अधिकं दक्षिणा भवन्ति' असें म्हणून उर्वशीचें समाधान करते. त्यावरून हें नाटक लिहितांना स्वकालीन नागरकांचें व त्यांच्या सुशील व सद्गुणी पतिव्रता गृहिणींचें चित्र कवीच्या मनश्चक्षूपुढे होतें यांत संशय नाही. औशीनरीला राजाचें अप्सरःकामुकत्व आवडत नाही व ती प्रथम त्याच्या बाह्यात्कारीं प्रेमळ पण निःसार भाषणाला तुच्छ लेखून निघून जाते. पण पुढे पश्चात्ताप पावून ती प्रियानुप्रसादन व्रताच्या मिषाने राजाची गाठ घेते व त्याला प्रिय असलेल्या स्त्रीबरोबर आपण प्रेमाने वागण्यास तयार असल्याचें स्पष्ट सांगून त्याचा मार्ग निष्कंटक

करते. केवढा हा स्वार्थत्याग ! 'मालविकाग्निमित्रां'तील धारिणीही स्वार्थत्यागी व उदार होते, पण ती आपल्या वचनांत सापडल्यावर व पुत्रविजयाच्या महोत्सवांत ! तिच्यापेक्षा औशीनरीचा स्वार्थत्याग जास्त निरपेक्ष व म्हणून सरस आहे. उर्वशी व औशीनरी या दोघींचेंही राजावर निस्सीम प्रेम आहे. पण उर्वशीचें प्रेम भोगमूलक तर औशीनरीचें त्यागमूलक हा त्यांतील महत्त्वाचा फरक कवीने दाखविला आहे. संसारांतील हालअपेष्टांनी किंवहुना प्रियजनांच्या उपेक्षेनेही जें प्रेम कमी होत नाही व ज्याची परिणति अखेर आत्मत्यागांत होते, तेंच खरें प्रेम हें आपलें मत आपल्या इतर ग्रंथाप्रमाणें या नाटकांतही कवीने औशीनरी राणीचें पात्र रंगवून व्यक्त केलें आहे.

शाकुन्तल

'मालविकाग्निमित्र' व 'विक्रमोर्वशीय' हीं आपापल्या परीने रम्य असलेलीं नाटकें कालिदासाने लिहिलीं असलीं तरी नाटककार म्हणून याची कीर्ति त्याच्या शेवटच्या सर्वांगसुंदर व निर्दोष अशा 'अभिज्ञानशाकुंतला'वरच अवलंबून राहील. यांतील संविधानकचातुर्य, स्वभावरेखाटन, रसपरिपोष, भाषासौष्ठव इत्यादि गुणांवर लुब्ध होऊन प्राचीन रसिकांनी यास सर्व संस्कृत नाटकांत श्रेष्ठ गणलें होतें. इ. स. १७८९ मध्यें सर वुइल्यम् जोन्स् या विद्वानाने एका संस्कृतपंडिताच्या साहाय्याने याचें इंग्रजीत भाषांतर केलें, तें पुष्कळ ठिकाणीं सदोष होतें, तरी त्याने युरोपीय विद्वानांना वेड लावलें. त्याचीं निरनिराळ्या युरोपीय भाषांत भाषांतरें झालीं व सध्या जगांतील अशी एकही प्रमुख भाषा नाही की जींत शाकुंतलाचें एखादें तरी भाषांतर सापडणार नाही. या नाटकाच्या शेवटच्या अंकांतील लहान बालकाच्या निरागस हास्याचें व बोबड्या बोलांचें मनोहर वर्णन वाचून शेझी ह्या फ्रेंच विद्वानास आनंदाच्या उकळ्या फुटून तो नाचूं लागला गटे. ह्या जगप्रसिद्ध जर्मन कवीने तर या नाटकाचें भाषांतर वाचून त्याची खालीलप्रमाणें प्रशंसा केली–

चित्तीं वांछिसि तूं वसंतकुसुमें, शीतर्तुचीं वा फळें
आत्मा मोहित हृष्ट, तुष्टहि तसा, हो पुष्ट ज्याच्या बळें ।

पृथ्वी स्वर्गहि इच्छिशी उभय ते एक्या पदीं बोधिले
घे तूं नाम 'शकुंतला' मग तुला तें सर्वही लाधलें ॥ *

कालिदासाच्या सर्व ग्रंथांत हें नाटक उत्कृष्ट असल्याने 'कालिदासस्य सर्वस्वमभिज्ञानशकुंतलम्' ही उक्ति सर्वमान्य झाली आहे. असो. प्राचीन कालापासून 'शाकुंतल' लोकप्रिय झाल्याने त्याच्या हस्तलिखित प्रती हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत सापडतात, पण त्यांमध्ये अनेक फरक आढळतात. त्या सर्वांचा विचार करून विद्वानांनी काश्मीरी, बंगाली, देवनागरी व मद्रासी अशा चार पाठपरंपरा निश्चित केल्या आहेत. तथापि या सर्वांची सूक्ष्म परीक्षा करून कालिदासाच्या सर्वोत्कृष्ट नाटकाचें मूळ स्वरूप ठरविलें जाणें अत्यावश्यक आहे. तें होईपर्यंत देवनागरी प्रतीतील पाठ त्यांतल्या त्यांत बरे वाटल्यामुळें ती प्रत खालील विवेचनाकरितां घेतली आहे.

याही नाटकाच्या आरंभीं कवीने शिवस्तुतिपर नांदी घातली आहे व तींत श्रीशंकराच्या प्रत्यक्ष दिसणाऱ्या अष्टविध स्वरूपाचें वर्णन केलें आहे. नंतर सूत्रधार नटीस बोलावतो व 'या विद्वत्परिषदेपुढे कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतल' नामक नवीन नाटकाचा प्रयोग करावयाचा आहे. तेव्हा प्रत्येक पात्राच्या कामाबद्दल काळजी घ्यावी' असें तिला सुचवितो. 'आपण नाटक चांगलें बसविलें असल्यामुळें त्यांत कांही कमी पडणार नाही' असें नटीने सांगतांच तो म्हणतो—

आ परितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् ।
बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः ॥ शाकु० १, २.

या श्लोकांत कालिदास सूत्रधारमुखाने, आपण नाटकरचनेंत कुशल असलों तरी आपल्या कृतीने विद्वज्जनांना संतोष झाला असें समजेपर्यंत आपलें समाधान होणार नाही, असें मोठ्या विनयाने सुचवीत आहे. नंतर नटी ग्रीष्मसमयवर्णनपर एक गीत गाते त्याची स्तुति करण्याच्या मिषाने दुष्यन्ताच्या प्रवेशाची सूचना करून सूत्रधार नटीसह निघून जातो व मुख्य अंकास आरंभ होतो. प्रथम हरणाचा पाठलाग करणारा रथस्थ राजा दुष्यन्त व सूत प्रवेश करतात. नेम धरून राजा त्याला बाण मारणार तोंच 'राजा! हा आश्रममृग

* भाषांतरकार—कै. गं. ज. आगाशे (वि. ज्ञा. वि. मार्च १९१९).

आहे, याला मारूं नको' असें ओरडत एक वैखानस दोन शिष्यांसह त्याच्या आड येतो. त्याच्या विनंतीला मान देऊन राजा आपला बाण परत घेतो. तें पाहून संतुष्ट होऊन तो 'तुला चक्रवर्ती पुत्र होवो!' असा त्याला आशीर्वाद देतो व जवळच मालिनी नदीतीरावर असलेल्या आश्रमांत जाऊन तेथील आतिथ्याचा स्वीकार करण्याविषयीं सांगतो. तेथील कुलपति कण्व ऋषि शकुन्तला नामक आपल्या कन्येला अतिथींचा सत्कार करण्यास सांगून तिच्या प्रतिकूल दैवाची शांति करण्यासाठी सोमतीर्थीं लुकतेच गेले आहेत असें वैखानसाकडून राजाला कळतें. वैखानस शिष्यांसह निघून गेल्यावर राजा तपोवनाकडे रथ हाकण्यास सारथ्यास सांगतो. तपोवनाजवळ पोहोचल्यावर तेथील जनांस उपसर्ग होऊ नये म्हणून तो रथांतून उतरतो व आपलें धनुष्य व अलंकार सारथ्याच्या स्वाधीन करून विनीत वेषाने तपोवनांत शिरतो. त्यावेळी त्याला बाहुस्पंदनाचा शुभशकुन होतो. थोडा पुढे जातो तों जवळच झाडाच्या राईत कोणी बोलल्यासारखें त्याला ऐकूं येतें, म्हणून तो तिकडे जाऊं लागतो तों तीन तापसकन्यका कळशा घेऊन लहान झाडांना पाणी घालण्याकरितां आपल्याकडेच येत असलेल्या त्याला दिसतात. तेव्हा तो एका झाडाच्या छायेंत त्यांची वाट पाहत राहतो. त्यांच्या संभाषणावरून त्यांपैकी एक कण्वाची मुलगी शकुन्तला व दुसऱ्या दोन अनसूया व प्रियंवदा नामक तिच्या सख्या आहेत असें त्याला कळतें. वल्कल नेसलेल्या शकुंतलेला पाहून तो आपल्याशींच म्हणतो "हिच्या सुंदर शरीराला वल्कल योग्य नाही हें खरें; तथापि त्याने तिला शोभा येत नाही असें नाही, कारण 'जातीच्या सुंदरांना कांहीही शोभतें!'" इकडे शकुंतला व तिच्या सख्या यांच्यांत थट्टामस्करी चालते. कोमल पालवी आलेल्या आम्रवृक्षाला बिलगून असलेल्या वनज्योत्स्ना नामक बहरलेल्या मोगरीच्या वेलीला पाहत शकुंतला उभी राहते, तें पाहून प्रियंवदा म्हणते–'अनसूये, शकुंतला वनज्योत्स्नेला इतकी न्याहाळून पाहते आहे याचें कारण आलें का ध्यानांत ? वनज्योत्स्नेचा जसा अनुरूप वृक्षाशीं संयोग झाला आहे तसा माझाही योग्य पतीशीं होईल काय? असें तिला वाटत आहे.' यावर 'हें तुझ्या मनचेंच कांहीतरी!' असें शकुंतला उत्तर करते. तथापि त्यावरून शकुंतला अविवाहित आहे असें राजाला कळतें; तेव्हा प्रतिलोम विवाह निषिद्ध असल्यामुळें 'ही कण्वमुनीची असवर्ण स्त्रीपासून झालेली

कन्या असेल काय? किंवा संदेह कशाला? ज्याअर्थी माझें थोर मन हिच्यावर बसलें आहे त्या अर्थी माझ्यासारख्या क्षत्रियाने विवाह करण्यासारखीच ही असली पाहिजे,' असे विचार त्याच्या मनांत येतात. इतक्यांत मोगरीला पाणी घातल्यामुळें बिचकून उडालेला भ्रमर शकुन्तलेच्या मुखाभोवतीं घिरट्या घालूं लागतो तें पाहून राजाला त्याचा हेवा वाटतो. तो म्हणतो–

चलापाङ्गां दृष्टिं स्पृशसि बहुशो वेपथुमतीं
रहस्याख्यायीव स्वनसि मृदु कर्णान्तिकचरः।
करं व्याधुन्वत्याः पिबसि रतिसर्वस्वमधरं
वयं तत्त्वान्वेषान्मधुकर! हतास्त्वं खलु कृती॥ शाकु० १, २३.

यांत राजाने भ्रमराचें कामुकरूपाने वर्णन केलें आहे व शेवटीं 'आम्ही सत्यान्वेषणांत गुंग झाल्यामुळें फसलों आहों, भ्रमरा! तूं मात्र कृतकृत्य झाला आहेस!' असे उद्गार काढले आहेत. या श्लोकांत समासोक्ति व व्यतिरेक या अलंकारांचा मधुर संयोग झाला आहे. भ्रमराने फारच त्रास दिल्यामुळें शकुन्तला आपल्या सख्यांना मदतीकरितां बोलाविते. तेव्हा त्या थट्टेने म्हणतात, 'आम्ही कोण तुझें रक्षण करणार! दुष्यन्ताला हांक मार! तपोवनांचें रक्षण राजानेच केलें पाहिजे.' ही वेळ प्रकट होण्यास चांगली आहे असें वाटून राजा पुढे होतो व म्हणतो, 'दुर्विनीतांचें शासन करणारा पौरव राजा पृथ्वीवर राज्य करीत असतां मुग्ध अशा तपस्विकन्यांना कोण हा त्रास देत आहे?' अनपेक्षितपणें परपुरुष तेथे उपस्थित झालेला पाहून त्या सर्व प्रथम थोड्या गडबडतात. पण पुढे त्याचें मनःपूर्वक स्वागत करतात. राजाला पाहतांच शकुंतलेच्या मनांत प्रेमविकार उद्भवतो. आपण राजा आहों हें कळलें तर या मनमोकळेपणाने आपणाशीं बोलणार नाहीत असें वाटून 'राजाने धर्मखात्यावर मला अधिकारी नेमलें आहे. या तपोवनांतील धर्मकृत्यें निर्विघ्नपणें चाललीं आहेत की नाही हें पाहण्यासाठी मी येथे आलों आहें' असें तो त्यांस सांगतो. त्यांच्याकडून त्याला शकुंतलेविषयीं पुढील हकीकत कळते– 'विश्वामित्र ऋषीच्या उग्र तपश्चर्येला भिऊन देवांनी त्याला मोह पाडण्याकरितां मेनका नामक अप्सरा पाठविली होती तिच्यापासून त्याला ही शकुंतला कन्या झाली. मातेने टाकल्यावर कण्व ऋषींनी हिचें संगोपन केलें म्हणून ते हिचे वडील. योग्यसा वर मिळाल्यास हिचें लग्न करण्याचा त्यांचा विचार

आहे. आपल्या विवाहाविषयींची ही चर्चा ऐकून शकुंतला रागाने गौतमी आत्याबाईकडे तक्रार करण्याकरितां जावयास निघते. तेव्हा तिला परत फिरविण्याकरितां प्रियंवदा म्हणते, 'मी तुझ्याकरितां दोन झाडांना पाणी घातलें आहे. तें माझें ऋण प्रथम फेड, मग जा हवी तर!' त्यावर 'वृक्षसिंचनानेच ही अत्यंत श्रमली आहे. म्हणून मीच हिला ऋणमुक्त करतों,' असें म्हणून राजा प्रियंवदेला आपली अंगठी देतो. तिच्यावरील त्याच्या नांवाची अक्षरें वाचतांच त्या आश्चर्यचकित होतात, तें पाहून राजा म्हणतो 'मी दुसरा कोणी आहे असें समजूं नका; ही राजाने दिलेली आहे.' त्यावर प्रियंवदा म्हणते 'तर मग ही आपल्याच अंगुलींत असूं द्या! आपल्या शब्दानेच ही ऋणमुक्त झाली आहे.' याप्रमाणें त्यांचें संभाषण चालू असतां, 'मृगयाविहारी दुष्यन्त राजा तपोवनाजवळ आला आहे. त्याच्या रथाला बुजून हा हत्ती हरणांची दाणादाण करीत तपोवनांत शिरत आहे. तरी त्यांतील प्राण्यांचें रक्षण करा.' असे शब्द त्यांच्या कानांवर येतात. तेव्हा राजाच्या अनुज्ञेने त्या आपल्या पर्णकुटिकेकडे जातात. जातांना शकुन्तला मात्र आपल्या पायाला बोचलेले दर्भांकुर काढण्याच्या व कोरांटीच्या फांदीला अडकलेलें वल्कल सोडविणाच्या मिषाने थोडा वेळ मागें राहून राजाकडे पुनः एकदा पाहते व नंतर त्यांच्याबरोबर निघून जाते. (अंक १). यानंतर दुसऱ्याच दिवशीं घडलेल्या गोष्टी दुसऱ्या अंकांत वर्णिल्या आहेत. तपोवनाजवळच राजाने आपल्या सैनिकांसह तळ दिला होता, तेंच या अंकाचें स्थळ. प्रथम विदूषक प्रवेश करतो व म्हणतो 'या मृगयाशील राजाच्या संगतीने मी अगदी त्रासलों आहें! हा येथे हरिण, हा पहा वराह, हा इकडे वाघ, असें ओरडत या ग्रीष्मऋतूंत रानावनांतून हिडावें, झाडाचीं पानें आंत पडून कडवट झालेलें पाणी प्यावें, वेळीं अवेळीं सळईवर भाजलेलें मांस खावें, या प्रकारें आमचे दिवस चालले आहेत. रात्रीं सुखाची झोपही भरपूर घेऊं देत नाहीत. काल माझ्या दुर्दैवाने राजाला तापसकन्यका शकुन्तला दिसली. आता तर परत जाण्याची तो गोष्टही काढीत नाही.' याप्रमाणें विदूषक आपणाशींच कुरकुरत असतां राजा प्रवेश करतो. शकुंतलेवर मन बसल्यामुळें राजालाही मृगयेविषयीं औत्सुक्य राहिलें नव्हतें. तेव्हा ती थांबविण्याविषयीं विदूषकाने केलेली विनंती तो मान्य करतो व त्याप्रमाणें

सेनापतीस आज्ञा करतो. नतर एका झाडाच्या छायेंत ते बसले असतां विदूषकाने विचारल्यावरून राजा त्याला शकुंतलेच्या जन्माविषयीची हकीकत सांगतो. नंतर कोणत्या मिषाने पुनः आश्रमांत जावें याचा विचार राजा करीत असतां दोन ऋषिकुमार प्रवेश करतात व 'कण्वमुनि येथें नसल्यामुळें राक्षस यज्ञकर्मांत विघ्नें आणतात, तरी आपण कांही दिवस आश्रमांत राहावें,' अशी आश्रमवासी जनांची प्रार्थना राजाला कळवतात. राजा ती आनंदाने मान्य करतो. ते गेल्यावर 'शकुंतला पाहण्याची तुला उत्सुकता आहे काय ?' असें तो विदूषकाला विचारतो. त्यावर तो उत्तर करतो, 'प्रथम तुडुंब भरून वाहत होती; पण राक्षसांच्या वृत्तांताने आता तिचा थेंबही उरला नाही.' इतक्यांत राजधानीहून एक दूत येतो व 'आजपासून चौथ्या दिवशीं पुत्रपिण्डपालन नामक व्रताचें पारणें आहे त्यावेळीं चिरंजीवाने जरूर परत यावें,' असा राजमातेचा निरोप कळवितो. तेव्हा काय करावें असा राजाला पेच पडतो. शेवटीं, 'माझ्या मातेने तुला पुत्रवत् मानले आहे, म्हणून तूं परत जा व मी तपस्विकार्यांत गुंतलों आहें हें तिला सांगून तिचें पुत्रकृत्य पार पाड,' असें तो विदूषकास सांगतो. घरीं गेल्यावर हा कदाचित् शकुंतलेची वार्ता अन्तःपुरांतील स्त्रियांस सांगेल असें वाटून राजा विदूषकास म्हणतो 'ऋषींच्या शब्दाला मान देण्याकरितां मी आश्रमांत जात आहें. त्या तापसकन्येविषयी मला मुळींच अभिलाष नाही. मी मागे थट्टेने बोललों तें खरें समजूं नको हो !' (अं. २). यानंतर महिना पंधरा दिवसांनी तिसऱ्या अंकांतील वृत्तान्त घडलेला दिसतो. प्रथम एक लहान प्रवेश घातला आहे, त्यांतील शिष्याच्या भाषणावरून राजाच्या सांनिध्याने यज्ञकर्म निर्विघपणें पार पडलीं आहेत असें आपणास समजतें. नंतर राजा प्रवेश करतो आणि मदन व चन्द्र यांच्याकडून आपणांस होणारा त्रास वर्णन करतो. या मध्याह्नाच्या वेळीं बहुतकरून शकुंतला मालिनी नदीच्या तीरीं सखींबरोबर बोलत बसली असेल असें वाटून तो तिकडे जातो तों एका लतागृहाजवळ तिचीं पावलें उमटलेलीं त्याला दिसतात. पुढे जाऊन पाहतो तों त्याला पुष्पांनी आच्छादिलेल्या एका शिळेवर बसलेली व सखीबरोबर बोलत असलेली शकुंतला दिसते. तेव्हा त्यांचे विश्रंभालाप ऐकण्यासाठी तो

तेथेच झाडाआड उभा राहतो. दुष्यन्ताला पाहिल्या दिवसापासून शकुंतला खंगत चालली होती, तेव्हा तिचा विकार प्रेममूलकच असावा असें वाटून अनसूया तिला म्हणते, 'शकुन्तले ! आम्हाला प्रेमविषयक गोष्टी कळत नाहीत, तरी इतिहासग्रंथांत मदनार्त जनांची जशी अवस्था वर्णिली आहे तशी तुझी स्थिति दिसते. सांग बरें, तुला कशामुळें हा ताप होत आहे ? विकाराची चिकित्सा केल्याशिवाय उपाय योजणें बरें नव्हे.' तरीही लज्जेने शकुंतला कांही बोलत नाही. प्रियंवदाही तिला आपलें मनोगत सांगण्याविषयीं आग्रह करते. तेव्हा शकुन्तला म्हणते, 'सख्यांनो ! तो तपोवनाचें रक्षण करणारा राजा मला दिसला तेव्हापासून तद्विषयक अभिलाषाने माझी अशी अवस्था झाली आहे. तेव्हा तुमचीही या गोष्टीस संमति असल्यास त्यांना माझी दया येईल असें करा. नाही तर मला तिलोदक द्यावयास तयार व्हा !' तिच्या सख्यांना पौरवश्रेष्ठ राजर्षीवर तिचें प्रेम बसलें आहे हें समजल्यावर आनंद होतो. राजाचीही प्रेमाने तिच्यासारखीच अवस्था झाली आहे हें प्रियंवदेने पाहिलें होतें, म्हणून ती शकुन्तलेला म्हणते 'तूं एक मदनलेख रचून या कमलपत्रावर नखांनी कोरून लिही. मी तो देवाच्या प्रसादाच्या रूपाने फुलांत लपवून त्याच्या हातीं पोचवीन.' नंतर शकुन्तला आपला मदनताप व्यक्त करणारी एक प्राकृत गाथा रचून कमलपत्रावर कोरते व ती सख्यांस वाचून दाखविते. ती ऐकून राजा पुढे होतो व मदनाने आपली स्थिति जास्तच वाईट केल्याचें वर्णन करतो. नंतर प्रियंवदा त्याला शकुंतलेचा स्वीकार करण्याविषयीं विनंती करते. त्यावर शकुंतला म्हणते 'प्रियंवदे ! अन्तःपुरांतील स्त्रियांच्या विरहाने उत्कंठित झालेल्या राजर्षीला कां उगीच अडवतेस ?' अनसूयाही म्हणते 'मित्रा ! राजेलोकांना अनेक स्त्रिया असतात. म्हणून आमच्या प्रियसखीच्या आप्तांना दुःख होणार नाही अशा रीतीने तूं तिला वागवावें.' यावर राजा उत्तर करतो, 'मला स्त्रिया अनेक असल्या तरी समुद्रवलयांकित पृथिवी व ही तुमची सखी यांवरच माझ्या कुलाची प्रतिष्ठा अवलंबून राहील.' या आश्वासनाने त्या दोघींस समाधान वाटतें व त्या हरिणबालकाला त्याच्या मातेकडे पोचविण्याच्या मिषाने तेथून निघून जातात. त्यांच्या मागन शकुं-

तलाही जाऊं लागते, पण राजा तिला अडवितो व ' गान्धर्व विधीने पुष्कळ क्षत्रियकन्यांचे विवाह झाले आहेत, तेव्हा तुला आपल्या वडील माणसांची भीति बाळगण्याचें कारण नाही,' असें सांगून तिची समजूत घालूं लागतो. तितक्यांत 'हे चक्रवाकवधू, आपल्या सहचराचा निरोप घे. रात्र जवळ आली.' असे शब्द ऐकूं येतात. तेव्हा शकुन्तला राजाला 'गौतमी आत्या माझ्या समाचारार्थ येत आहे तरी आपण झाडाआड लपावें,' असें सुचविते. नंतर प्रियंवदा व अनसूया यांसह गौतमी प्रवेश करते व शकुंतलेच्या प्रकृतीबद्दल विचारपूस करून तिच्या मस्तकावर दर्भोदक शिंपडते. त्या वेळीं सायंकाळ झाली असल्याने ती शकुन्तलेलाही आपल्याबरोबर घेऊन जाते. जातांना शकुन्तला 'हे संतापहारक लताकुंजा ! पुनरपि उपभोग घेतां यावा म्हणून मी आता तुझा निरोप घेतें,' असें म्हणून दुष्यन्ताला पुनः आपली गाठ घेण्याविषयीं सुचविते. तितक्यांत 'राजा ! सायंकाळच्या यज्ञकर्माच्या वेळीं वेदीच्या सभोवार आकाशस्थ राक्षसांच्या भयंकर छाया दिसत आहेत,' असे शब्द राजाला ऐकूं आल्यामुळें तोही यज्ञरक्षणार्थ निघून जातो. (अंक ३). चौथ्या अंकाच्या आरंभीं एक विष्कंभक घातला आहे. त्यांत शकुन्तलेच्या सौभाग्यदेवतेच्या पूजेकरितां अनसूया व प्रियंवदा फुलें वेचीत असलेल्या दृष्टीस पडतात. त्यांच्या भाषणावरून आपणांस असें कळतें की यज्ञ समाप्त झाल्यामुळें ऋषींच्या अनुज्ञेने राजा आपल्या राजधानीस परत गेला आहे. इतक्यांत 'हा मी आलों आहें हो !' असे आश्रमाजवळ एका अतिथीने उच्चारलेले शब्द त्यांस ऐकूं येतात. शकुन्तला आश्रमांत असली तरी शून्यमनस्क आहे, म्हणून अतिथीच्या सत्काराकरितां त्या जावयास निघतात, तोंच 'ज्याच्याविषयीं एकाग्रतेने विचार करीत असल्यामुळें माझ्यासारख्या तपोधनाचें आगमन तुझ्या लक्षांत येत नाही तो तुझा प्रियकर तूं आठवण करून दिलीस तरी तुला ओळखणार नाही,' असा त्याचा भयंकर शाप ऐकूं येतो. पुढे जाऊन पाहतात तों तो कोपिष्ठ ऋषि दुर्वास ! तेव्हा त्याला प्रसन्न करण्याकरितां प्रियंवदा जाते. 'माझा शाप अन्यथा होणार नाही, पण खुणेची वस्तु दाखविल्यावर त्याची निवृत्ति होईल,' असें त्याने सांगिल्यावर त्यांचें मन थोडें स्वस्थ होतें. कारण शकुन्तलेजवळ दुष्यन्ताची आंगठी होतीच. तिच्या योगें शापाची बाधा

होणार नाही असें त्यांस वाटतें. शकुन्तला जात्याच कोमल मनाची अस ल्यामुळें हया शापवृत्तान्ताने तिच्या मनाला मोठा धक्का बसेल अ वाटून त्याविषयीं त्या तिच्याजवळ कांही बोलत नाहीत. यानतर कांहं महिने झाल्यावर मुख्य अंकांतील प्रसंग घडलेला आहे. 'माझ्या अंगठीवरच एक एक अक्षर तू मोजीत जा. सर्व अक्षरे संपण्याच्या आंत तुला घेऊ जाण्यास मी माणसें पाठवीन,' असें वचन राजाने शकुन्तलेस दिलें होतें पण कित्येक महिने गेले तरी तो चिठीही पाठवीत नाही; त्यामुळें का करावें या विवंचनेंत अनसूया असतां प्रियंवदा प्रवेश करून म्हणते "प्रवासा हून परत आल्यावर कण्वबाबा अग्निगृहात गेले तोंच आकाशवाणी त्यांना शकुन्तलेला दुष्यन्तापासून गर्भ राहिल्याचें कळविलें. तेव्हा 'वत्से सच्छिष्याला दिलेल्या विद्येप्रमाणें तुझ्याविषयी आता मला काळजी राहिली नाही' असे बोलून त्यांनी आपला आनंद व्यक्त केला. ते आजच ऋषी बरोबर तिला सासरी पाठविणार आहेत. तर चल तिच्या पाठवणीची तयार करावयाला." नंतर त्या शकुंतलेला तापसी आशीर्वाद देत होत्या ते जातात व बकुलमालेसारखे आश्रमांत मिळणारे साधे अलंकार तिच्य अंगावर घालू लागतात. तिच्या सौदर्याला ते अनुरूप नाहीत हें ध्यानां येऊन त्यांना वाईट वाटते तों तपोवनांतील वनदेवतांनी दिलेलें रेशम वस्त्र, लाक्षाराग व विविध प्रकारची भूषणें दोन ऋषिकुमार त्यांस आणू देतात. 'आम्ही स्वतः असे अलंकार घातले नाहीत; तथापि चित्रकले आम्हांस ज्ञान असल्याने तदनुरोधाने आम्ही हे तुझ्या अंगावर घालतों असें त्या शकुंतलेस म्हणतात. इतक्यांत स्नान करून कण्व महर्षि तेथे येतात शकुंतला आज सासरी जाणार या विचाराने त्यांस अत्यंत वाईट वाटतं ते म्हणतात—

यास्यत्यद्य शकुन्तलेति हृदयं संस्पृष्टमुत्कण्ठया
कण्ठः स्तम्भितबाष्पवृत्तिकलुषश्चिन्ताजडं दर्शनम् ।
वैक्लव्यं मम तावदीदृशमहो स्नेहादरण्यौकसः
पीड्यन्ते गृहिणः कथं नु तनयाविश्लेषदुःखैर्नवैः ॥ शाकु० ४,६.

'आज शकुंतला जाणार आहे या विचाराने माझें हृदय दुःखाने भरून आं आहे, कंठ सद्गदित झाला आहे, चिंतेने दृष्टि जड झाली आहे. अरण्य

वासी मी जर कन्याप्रेमाने इतका व्याकुळ होत आहें तर संसारी लोकांची कन्याविरहाने प्रथम कशी बरें अवस्था होत असेल!' शकुंतला त्यांच्या पायां पडते तेव्हा 'तूं भर्त्याला अत्यंत प्रिय हो व तुला चक्रवर्ती पुत्र होवो!' असा ते तिला आशीर्वाद देतात. अग्नींना प्रदक्षिणा केल्यावर ते सर्व मार्ग चालू लागतात. तेव्हा तपोवनतरूंना उद्देशून कण्व ऋषि म्हणतात—

पातुं न प्रथमं व्यवस्यति जलं युष्मास्वपीतेषु या
नादत्ते प्रियमण्डनापि भवतां स्नेहेन या पल्लवम्।
आद्ये वः कुसुमप्रसूतिसमये यस्या भवत्युत्सवः
सेयं याति शकुंतला पतिगृहं सर्वैरनुज्ञायताम्॥ शाकु० ४, ९.

'तुम्हांला पाणी पाजल्याशिवाय जी स्वतः पाणी पिण्याचें मनांत आणीत नाही, भूषणांची आवड असूनही जी तुमच्या प्रेमास्तव पल्लव खुडत नाही, तुम्हांला प्रथम बहर येतो तेव्हा जिला अत्यानंद होतो अशी ही शकुन्तला पतिगृहीं जात आहे. सर्वांनी तिला अनुज्ञा द्यावी.' तेव्हा प्रत्यक्ष तपोवनदेवता तिला आशीर्वाद देतात. ती चालली असतां सर्व तपोवन दुःखाने व्याकुळ होतें. हरणांच्या मुखांतून दर्भाचे घास गळून पडतात, मोर आपलें नृत्य थांबवितात, लताही शुष्कपर्णांच्या मिषाने अश्रु गाळताहेत असें दिसतें. शकुंतला आपल्या वनज्योत्स्ना नामक लताभगिनीस भेटते, गर्भिणी मृगी प्रसूत होईल तेव्हा आपणांस कळविण्याबद्दल कण्वऋषीस सांगून ठेवते, आणि आपल्या वस्त्रास बिलगणाऱ्या व स्वतः वाढविलेल्या पोरक्या हरिण बालकाची समजूत घालते. नंतर ते सर्व क्षीरवृक्षाच्या छायेखाली जातात. तेव्हा कण्व आपला पुढील संदेश सांगतात—

अस्मान् साधु विचिन्त्य संयमधनानुच्चैः कुलं चात्मनः
त्वय्यस्याः कथमप्यबान्धवकृतां स्नेहप्रवृत्तिं च ताम्
सामान्यप्रतिपत्तिपूर्वकमियं दारेषु दृश्या त्वया
भाग्यायत्तमतः परं न खलु तद्वाच्यं वधूबन्धुभिः॥ शाकु० ४,१७.

'आम्ही संयमधन आहों, तुझें कुळ उच्च आहे व बांधवांच्या प्रोत्साहनाशिवाय हिने स्वतःच आपलें हृदय तुला अर्पण केलें आहे, हया गोष्टी

ध्यानांत घेऊन इतर स्त्रियांप्रमाणें तूं हिला वागवावें. याच्या पलीकडच्या गोष्टी दैवावर अवलंबून आहेत. त्यांचा वधूच्या बांधवांनी उच्चार करूं नये.' नंतर शकुंतलेसही ते एका श्लोकांत सुंदर उपदेश करतात. तो श्लोक मागे पहिल्या प्रकरणांत दिला आहे. (पृष्ठ ३५ पहा.) कदाचित् पतीला तुझी ओळख पटली नाही तर ही अंगठी दाखव असें तिच्या सख्यांनी सांगतांच शकुंतलेच्या हृदयांत धस्स होतें. तेव्हा, 'त्रिण्याचें कांही कारण नाही,' 'अतिस्नेहः पापशङ्की,' असें बोलून त्या तिची काळजी दूर करतात. 'सूर्य वर आला आहे; आता पित्याला परत जाण्याला सांग,' असें गौतमी सुचविते. तेव्हा शकुंतलेला पितृवियोग दुःसह होऊन ती विचारते 'बाबा पुनः केव्हा मला हें तपोवन दृष्टीस पडेल ?' त्यावर कण्व ऋषि म्हणतात—

भूत्वा चिराय चतुरन्तमहीसपत्नी,
दौष्यन्तिमप्रतिरथं तनयं निवेश्य।
भर्त्रा तदर्पितकुटुम्बभरेण सार्धं
शान्ते करिष्यसि पदं पुनराश्रमेऽस्मिन् ॥

शाकु० ४, २०.

'पुष्कळ काळ समुद्रवलयांकित पृथ्वीची सपत्नी (सम्राज्ञी) झाल्यावर ज्याला कोणीही प्रतिस्पर्धी उरला नाही अशा आपल्या पुत्राला गादीवर स्थापून व त्यावर कुटुंबाचा भार सोपवून मग तूं आपल्या पतिसमागमें या शान्त आश्रमांत परत येशील.' तेव्हा शकुन्तला म्हणते 'बाबा, तपश्चर्या करून तुमचें शरीर कृश झालें आहे. तेव्हा माझ्याकरितां कष्टी होऊं नका.' शकुन्तला व गौतमी शिष्यांबरोबर निघून जातात, तेव्हा कण्व ऋषि म्हणतात—

अर्थो हि कन्या परकीय एव तामद्य संप्रेष्य परिग्रहीतुः।
जातो ममायं विशदः प्रकामं प्रत्यर्पितन्यास इवान्तरात्मा ॥ शाकु० ४,२२.

'कन्या हें परक्याचें धन होय म्हणून तिला पतीकडे पाठविल्यावर एखादी ठेव मालकाला परत केल्याप्रमाणें माझें मन स्वस्थ झालें आहे.' (अंक ४). कन्येला पतिगृहीं पाठवितांना कण्वांना झालेला शोक, त्यांनी तिला केलेला बहुमूल्य उपदेश, तिच्या भावी ऐश्वर्याचें रम्य चित्र व ती गेल्यावर त्यांना वाटलेलें समाधान हीं ज्यांत वर्णन केलेलीं आहेत ते वर उद्धृत केलेले

चार श्लोक सर्व 'शाकुन्तलां'त उत्कृष्ट गणले जातात. पांचव्या अंकाचें स्थळ दुष्यन्ताचा राजवाडा हें आहे. राजा व विदूषक बोलत बसले असतां हंसपदिका खालील आशयाचें एक गीत गाते 'भ्रमरा ! तूं नव्या नव्या मधाचा लोभी आहेस. आम्रमंजरीचें तसें चुंबन घेऊन आता केवळ कमलवासाने संतुष्ट होणारा तूं तिला कसा अगदी विसरलास बरें ?' आपण हंसपदिकेवर एकदा प्रेम केलें होतें म्हणन आता वसुमती राणीचा उल्लेख करून ती आपणांस टोचून बोलत आहे असें राजाच्या ध्यानांत येतें. तेव्हा आम्हांला चांगला टोमणा मारलास असें तिला कळविण्यास राजा विदूषकास तिजकडे पाठवितो. त्या गीताच्या अर्थाचा विचार करीत असतां राजाच्या मनाला कसली तरी हुरहुर लागून राहते, पण तिचे कारण त्याला समजत नाही. याप्रमाणें तो सचिंत बसला असता कचुकी 'कण्व ऋषीचा निरोप घेऊन स्त्रियांसहित कांही तपस्वी आले आहेत,' अशी वर्दी देतो. तेव्हा राजा आपल्या उपाध्यायास त्यांचा सत्कार करून अग्निगृहांत घेऊन येण्यास सांगतो व स्वतः तेथे जाऊन त्यांची वाट पाहत राहतो. ऋषीबरोबर आलेल्या अवगुण्ठित शकुन्तलेच्या रम्य आकृतीने राजाची दृष्टि आकर्षित होते, तथापि 'परस्त्रीकडे निरखून पाहणें योग्य नाही' असें म्हणून तो मनःसंयम करतो. त्याने नमस्कार केल्यावर त्यास आशीर्वाद देऊन शाङ्गरव कण्वाचा पुढील निरोप सांगतो. 'एकांती तूं माझ्या मुलीचें पाणिग्रहण केलेंस त्याला मी संमति दिली व त्यामुळें मला आनंदही झाला आहे; कारण तुम्ही दोघेही परस्परानुरूप आहां. तेव्हा आता या आपल्या गर्भवती पत्नीचा स्वीकार कर.' राजाचें मन दुर्वासशापाने ग्रस्त झाल्यामुळें त्याला शकुन्तलेची मुळीच आठवण होत नाही; म्हणून तो म्हणतो, 'काय ? हिचें मी पूर्वीच पाणिग्रहण केलें आहे ?' त्यावर 'कृतकर्माचा पश्चात्ताप झाल्यामुळें तूं धर्माची अवहेलना करीत आहेस काय ? कारण बहुधा ऐश्वर्याने उन्मत्त झालेल्या लोकांत अशा तऱ्हेचे विकार दृष्टीस पडतात,' असें शाङ्गरव टोचून बोलतो. गौतमीही त्याला ओळख पटण्याकरितां शकुंतलेचें अवगुंठन दूर करते. शकुंतलेचें सौंदर्य पाहून राजा चकित होतो, तरी अधर्मभीतीनें तो तिचा स्वीकार करण्यास तयार होत नाही. तेव्हा शाङ्गरव रागाऊन म्हणतो, 'एखाद्या चोराला त्याने चोर-

लेलें धन बक्षीस द्यावें त्याप्रमाणें तूं भ्रष्टविलेली आपली कन्या मुनींनी तुला अर्पण केली आहे. त्यांचे तू चांगलेच उपकार फेडीत आहेस !' तरी राजा कबूल होत नाही. तेव्हा त्याची खात्री करण्याकरितां अंगठी दाखवावी म्हणून शकुतला पाहूं लागते, पण ती बोटात दिसत नाही. तेव्हा सहजच गौतमी म्हणते, ' शक्रघाटावर शचीतीर्थाला नमस्कार करतांना तुझ्या बोटांतून ती गळून पडली असावी. ' त्यावर राजा ' हाच तो स्त्रियांचा हजरजबाबीपणा! ' असा टोमणा मारतो. नंतर आश्रमांत घडलेल्या गोष्टी याला सांगितल्या तर याची खात्री पटेल असें वाटून शकुतला भोळेपणाने तसें करते, पण त्याला तें सर्व कारस्थान असावे असें वाटतें. तपोवनांत वाढलेल्या या शकुतलेला लबाडी कशी ती मुळीच माहीत नाही असा गौतमीने निर्वाळा देतांच राजा म्हणतो, 'हे तापसवृद्धे!

स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु
संदृश्यते किमुत याः प्रतिबोधवत्यः ।
प्रागन्तरिक्षगमनात्स्वमपत्यजात-
मन्यैर्द्विजैः परभृताः खलु पोषयन्ति ॥ शाकु० ५, २२.

' मानवेतर प्राण्यांमध्येंही स्त्रियांचा नैसर्गिक धूर्तपणा दिसून येतो. मग ज्ञात्या स्त्रियांविषयी तर विचारावयासच नको; आकाशांत उडून जाण्यापूर्वी कोकिळा दुसऱ्या पक्ष्याकडून आपल्या पिलाचें पोषण करवितात. ' राजाने कोकिळाचा दृष्टांत आपल्या विधानाला पोषक म्हणून सहज दिला होता. पण त्याच्या श्लोकांतील अन्तरिक्षगमन, द्विज व परभृत हे शब्द द्वयर्थी असल्यामुळें ' परोपजीवी अप्सरा आपलीं मुलें अन्य ब्राह्मणांकडून पोसवितात ' असाही ध्वनि निघत होता. राजा अशा रीतीने आपल्या मातेची निंदा करीत आहे असें साहजिक वाटून शकुतलेचा क्रोध अनावर होतो. ती उसळून म्हणते, 'अनार्या! तू आपल्यावरून दुसऱ्याची पारख करीत आहेस. गवताने आच्छादिलेल्या कूपासारखा धर्माचें पांघरूण घेतलेला तूं! तुझी बरोबरी कोण करील ?' तिचा अकृत्रिम कोप पाहून राजाच्या मनांत संदेह उत्पन्न होतो, पण खात्री होत नाही. तेव्हा 'ही तुझी पत्नी आहे. हिला स्वीकार, नाही तर टाकून दे; आम्ही चाललों.' असें म्हणून ते तापसकुमार चालूं लागतात. तेव्हा शकुंतलाही त्यांच्या

बरोबर जाऊं लागते. तेव्हा शाङ्गरव तिच्या अंगावर ओरडतो, 'ए ढालगज पोरी ! हवें तसे वागतेस होय?' शकुतला भीतीने कापूं लागते, तेव्हा पुरोहित एक तोड सुचवितो. तो म्हणतो, 'महाराज! आपणास प्रथमच चक्रवर्ती पुत्र होईल असा साधु पुरुषांनी आशीर्वाद दिला आहे; तेव्हा हिला प्रसूतीपर्यंत माझ्या घरीं राहूं द्या. हिचा मुलगा चक्रवर्तिचिन्हांनी युक्त असल्यास आदरपूर्वक हिचा स्वीकार करावा; नाही तर हिला पित्याकडे पाठवावें.' राजा त्याला कबूल होतो. नंतर ते सर्व जातात. थोड्या वेळाने पुरोहित प्रवेश करून म्हणतो, 'महाराज, कण्वशिष्य गेल्यावर ती आपल्या दैवाला दोष देत रडूं लागली. इतक्यांत अप्सरस्तीर्थाजवळ एक स्त्रीरूपी तेजस्वी मूर्ति आली व तिला घेऊन अदृश्य झाली.' 'पूर्वीच आम्ही त्या वस्तूचा त्याग केला आहे. आता त्याबद्दल व्यर्थ तर्क कशाला', असें म्हणून राजा विश्रांतीकरितां निघून जातो. (अं. ५). यानंतर थोड्याच दिवसानी घडलेल्या गोष्टी सहाव्या अंकांत दाखविल्या आहेत. आरंभीच्या प्रवेशकांत नगराधिकारी राजश्यालक व दोन शिपाई एका कोळ्याला राजाची अंगठी चोरण्याच्या आरोपावरून मुसक्या बांधून आणितात. तुला ही कोठे सापडली असें विचारतांच—

कोळी–मी शक्रघाटाजवळ राहणारा कोळी आहें.

शिपाई–अरे चोरा, आम्ही काय तुझी जात विचारली होती ?

राजश्यालक–सूचका, याला सर्व क्रमाने सांगू दे. मध्येंच अडथळा आणूं नको.

दोन्ही शिपाई–जशी साहेबांची आज्ञा.

कोळी–जाळें, गळ वगैरे टाकून मी मासे पकडतों व कुटुंबाचें पोट भरतों.

श्यालक–फारच चांगला धंदा !

कोळी–महाराज ! असें म्हणूं नका. निंद्य असलें तरी जातिप्राप्त कर्म टाकूं नये. ब्राह्मण स्वभावाने दयार्द्र असला तरी यज्ञकर्मांत पशुहिंसा करण्यापुरता निष्ठुर बनतो.

नंतर 'मी एके दिवशीं पकडलेला तांबडा मासा चिरला तों आंत ही अंगठी सांपडली. ती विकण्याकरितां मी लोकांना दाखविली, तों आपण मला

पकडलें,' असें तो त्यांस सांगतो. त्यावर इयालक ती अंगठी घेऊन राजाकडे जातो. ती पाहून राजाला शकुंतलेची आठवण होते म्हणून तो त्या अंगठीच्या मूल्याइतके पैसे कोळ्याला देण्याची आज्ञा करितो. घटकेपूर्वी कोळ्याला वधस्तंभाकडे नेण्याची तयारी करणारे शिपाई त्याला बक्षीस मिळालेलें पाहतांच त्याचे जिवलग दोस्त बनतात व आपली मैत्री मद्यपानाने दृढ करण्याकरितां गुत्त्याकडे जातात. नंतर मेनकेची मैत्रीण सानुमती नामक अप्सरा राजकुलांत काय चाललें आहे हें पाहण्यासाठी राजवाड्याच्या प्रमदवनांत प्रवेश करते. तिला वसन्तऋतु सुरू झाला तरी राजवाड्यांत कोठेही उत्सवाचें चिन्ह दिसत नाही म्हणून आश्चर्य वाटतें. इतक्यांत दोन उद्यानपालिका प्रवेश करितात व नवीन आलेला आंब्याचा मोहोर खुडून कामदेवाला अर्पण करतात, तोंच कञ्चुकी प्रवेश करून त्याबद्दल त्यांना रागें भरतो. 'आम्ही नुकत्याच परगांवाहून आलों आहों, त्यामुळें महाराजांनी वसन्तोत्सवाला मनाई केल्याचें माहीत नव्हतें. पण तिचें कारण काय?' असें त्यांनी विचारतांच कञ्चुकी म्हणतो, 'महाराजांना अंगठी दिसल्याबरोबर शकुंतलेशीं आपण पूर्वी विवाह केला होता याची आठवण झाली व मोहाने आपण तिचा त्याग केला याबद्दल त्यांना पश्चात्ताप झाला. तेव्हापासून त्यांना रम्य वस्तु दृष्टीसमोर नकोतशा झाल्या आहेत व रात्रभर त्यांचा डोळ्याला डोळा लागत नाही. मनाच्या अस्वस्थतेमुळे त्यांनी उत्सवाला बंदी केली आहे.' नंतर त्या आपल्या कामाला निघून जातात व राजा विदूषकासह प्रवेश करतो. 'गेल्या रात्रीं फार जाग्रण झाल्यामुळे आज न्यायासनावर बसून काम पाहण्याचें आमच्या मनांत नाही; तरी पौरजनांचें कांही काम तुम्ही पाहिलें असल्यास लिहून पाठवावें,' असा निरोप अमात्यास सांगावयास राजा प्रतिहारीला पाठवितो व कंचुकीलाही आपल्या कामासाठी जावयास सांगतो. नंतर तो विदूषकासह मनोविनोदनार्थ माधवीमंडपांत जातो. 'मित्रा, आता मला शकुन्तलेविषयीं सर्व स्मरतें. ती आली त्यादिवशीं तूं मजजवळ नव्हतास; पण पूर्वी कधीही तिच्याबद्दल तूं चकार शब्द काढला नाहीस हें कसें? माझ्यासारखी तुलाही भूल पडली काय?' असें राजाने विचारतांच विदूषक म्हणतो, "मला सर्व आठवत होतें. पण सर्व सांगून झाल्यावर 'ही सर्व थट्टा बरें!

यांतलें कांहींही खरें नाही,' असें आपणच म्हणालां. मीही मठ्ठ बुद्धीचा ! तेव्हा आपलें बोलणें मला खरें वाटलें. अथवा होणार तें चुकत नाही हेंच खरें." शकुंतलेला तिच्या मातेच्या–मेनकेच्या–सखीनी उचलून नेलें असावें असें राजास वाटतें. शकुंतलेच्या अंगुलीवर राहण्याचें भाग्य अंगठीला लाभलें असतांही ती गळून पडली यावरून तिचीही पुण्याई संपुष्टांत आली असावी असें त्यास वाटतें. इतक्यांत शकुंतलेचें चित्र काढलेला फलक घेऊन एक दासी येते. राजाचें चित्रकलानैपुण्य पाहून जवळच अदृश्यपणें उभी असलेल्या सानुमतीला आश्चर्य वाटतें. राजाने त्या फलकावर तीन स्त्रियांची चित्रें काढलीं होती. त्यांतली कोणती शकुंतला असें विचारतांच विदूषक उत्तर करतो, 'मला वाटतें जलसेकामुळें ज्याचे कोमल पल्लव टवटवीत दिसत आहेत अशा आम्रवृक्षाजवळ वेणीची गांठ सैल झाल्यामुळें जिच्या केशांतून फुलें गळली आहेत, जिच्या मुखावर घर्मबिन्दु दिसत आहेत, जिचे भुज विशेषेंकरून गळलेले दिसत आहेत अशी किंचित् थकलेली ही शकुंतला व दुसऱ्या तिच्या सख्या.' त्या चित्रांत शकुंतलेच्या मुखाभोवतीं घिरटया घालून भ्रमर तिला त्रास देत होता असें दाखविलें होतें. तो खरोखरचाच भ्रमर आहे असें वाटून राजा त्याला उद्देशून बोलूं लागतो. तेव्हा विदूषक म्हणतो, 'महाराज हें चित्र आहे चित्र !' तेव्हा सानुमती म्हणते, 'खरेंच! हें चित्र आहे हें मलाही आताच समजलें. मग चित्रित केलेला प्रसंग स्वतः अनुभविलेल्याची स्थिति काय वर्णावी! ' इतक्यांत दासी प्रवेश करून म्हणते, "मी रंगांची पेटी आणीत होतें, तों वाटेंत वसुमती राणीसाहेबांनी मला पाहिलें आणि माझ्या हातून पेटी काढून घेऊन 'मी स्वतः ही नेऊन देतें ' असें म्हणाल्या. त्या इकडेच येत आहेत." तें ऐकतांच राजा विदूषकाजवळ चित्रफलक देऊन त्याला मेघप्रतिच्छन्द प्रासादांत पाठवितो. इतक्यांत प्रतिहारी अमात्याकडून कागदपत्र घेऊन येते. त्यांत 'जलमार्गाने व्यापार करणारा धनमित्र नांवाचा व्यापारी जहाज फुटल्यामुळें बुडून मेला. तो निपुत्रिक असल्यामुळें त्याची सर्व संपत्ति सरकारजमा व्हावी' असें अमात्याने लिहून पाठविलें होतें. त्यावर त्याची एखादी स्त्री गरोदर आहे काय याची चौकशी करण्यास राजा सांगतो व तसें असल्याचें प्रतिहारी-कडून समजल्यावर त्या गर्भाला पित्याची सर्व संपत्ति द्यावी अशी

आज्ञा करतो व 'प्रजेमध्यें कोणाचा संबंधी मृत झाला असल्यास त्याच्या जागीं पापकर्माखेरीज इतर बाबतीत दुष्यन्ताला मानावें' अशी द्वाही फिरविण्यास सांगतो. आपण स्वतः निपुत्रिक असल्याने आपल्या मृत्यूनंतर पितरांना पिंड मिळणार नाहीत या कल्पनेने त्याला अत्यंत शोक होतो. इतक्यांत मेघच्छन्द प्रासादाच्या गच्चीवरून मदनीकरितां ओरडणाऱ्या विदूषकाचा स्वर ऐकूं येतो. कोणी राक्षसाने त्याला पकडलें असावें असें वाटून राजा बाण मारणार, तोंच इन्द्राचा सारथि मातलि प्रवेश करून म्हणतो, 'महाराज! मला इन्द्राने असुरयुद्धांत साहाय्यार्थ आपणाकडे पाठविलें आहे. मी येथे आलों तेव्हा आपण शोकमग्न दिसलां म्हणून आपणांस राग आणण्यासाठी मी विदूषकाला मार दिला.' नंतर अमात्यास राज्यकारभार पाहण्यास सांगून राजा मातलीबरोबर निघून जातो. (अं. ६). सातव्या अंकाच्या आरंभी रथस्थ राजा व मातलि स्वर्गातून खाली उतरत आहे असा प्रवेश घातला आहे. इन्द्राने जाण्याविषयी मला परवानगी दिली त्या वेळी त्याने माझा अतिशय गौरव केला असें राजाने म्हणतांच मातलि म्हणतो, 'पूर्वी नरसिंहाच्या नखांनी व आता आपल्या बाणांनी सुखोपभोगांत रत असलेल्या इन्द्राचे सर्व शत्रु नष्ट केले. तेव्हा इन्द्राच्या कोणत्या सन्मानाला आपण पात्र नाही?' मातलीकडून आपण हेमकूट पर्वतावर सुरासुरांच्या पित्याच्या—मारीच ऋषीच्या—आश्रमाजवळ आलों आहों असें समजल्यावर त्यांना नमस्कार करण्यास राजा तेथे उतरतो नंतर राजाच्या आगमनाची वार्ता कळविण्याकरितां मातलि पुढे जातो व राजा तेथेच झाडाखाली बसतो. तेथे त्याला बाहुस्पंदनाच्या शुभ शकुन होतो. इतक्यांत सिंहिणीचें दूध अर्धवट प्यालेल्या सिंहशावकाला खेळण्याकरितां त्याच्या मातेपासून बलात्काराने ओढणारा एक बालक व त्याचें निवारण करणाऱ्या दोन तापसी त्याच्या दृष्टीस पडतात. त्यांच्या भाषणांवरून ऋषींनी त्याचें सर्वदमन असें सार्थ नांव ठेवलें असल्याचें राजाला कळतें. बालकाला पाहतांच राजाच्या मनांत पुत्रप्रेम उत्पन्न होतें. त्याने सिंहाच्या छाव्याला सोडावें म्हणून तापसी त्याला दुसरें खेळणें देऊं करते. त्याबरोबर 'दे, कुठे आहे तें.' असें म्हणून तो हात पसरतो. त्यावरचीं चक्रवर्तिचिह्नें राजाला

दिसतात. विशेषत: त्याचा खोडकर स्वभाव पाहून त्याला जवळ घ्यावें असें राजाला वाटतें. तो म्हणतो–

आलक्ष्य दन्तमुकुलाननिमित्तहासै-
रव्यक्तवर्णरमणीयवचःप्रवृत्तीन् ।
अङ्काश्रयप्रणयिनस्तनयान्वहन्तो
धन्यास्तदङ्गरजसा मलिनीभवन्ति ॥ शाकु० ७,१७.

'कांही कारण नसतां हसल्यामुळें ज्यांचे कळचांसारखे दांत किंचित् दिसत आहेत, ज्यांचे बोबडे बोल चित्ताकर्षक वाटतात, पित्याच्या मांडीवर बसण्यासाठी जे अतिशय उत्सुक असतात अशा धुळीने माखलेल्या बालकांना घेऊन जे मलिन होतात ते धन्य होत !' सर्वदमन आपलें ऐकत नाही असें पाहून तापसी दुष्यन्ताची मदत मागते. राजाने हाक मारतांच सर्वदमन त्याच्याकडे जातो. त्या दोघांच्या चेहऱ्यांतील विलक्षण साम्य पाहून तापसीला आश्चर्य वाटतें. तिच्याकडून राजाला कळतें की तो बालक पुरुवंशोत्पन्न आहे व त्याच्या मातेचें अप्सरांशीं नातें असल्याने ती त्या आश्रमांतच प्रसूत झाली होती. इतक्यांत दुसरी तापसी मातीचा रंगीत मोर आणण्यास गेली होती ती परत येऊन म्हणते, 'सर्वदमन, हें शकुन्तलावण्य पहा!' सर्वदमन वर्णसादृश्यामुळें 'शकुन्तलेला पहा' असा अर्थ समजतो, तेव्हा तो म्हणतो, 'कुठे आहे माझी आई?' या प्रसंगावरून त्याच्या मातेचें नांवही शकुतलाच आहे असें राजाला कळतें. तथापि नांवासारखीं नांवें पुष्कळ असतात आणि इतरही सादृश्य दिसत असलें तरी कदाचित् शेवटी हें सर्व मृगजलवत् मिथ्या ठरेल अशी राजाला शंका येते. इतक्यांत 'याच्या मनगटावरचा राखीचा ताईत कोठे दिसत नाही,' असें तापसी म्हणते; तों 'सिंहाबरोबर हा दगामस्ती करीत असतां त्याचा ताईत येथे पडला पहा' असें म्हणून तापसी नको म्हणत असतां दुष्यन्त तो उचलूनही घेतो. दुष्यन्ताने निषेधाचें कारण विचारल्यावरून ती पुढील हकीकत सांगते—'भगवान् मारीच ऋषीनी या बालकाच्या जातकर्मसमयीं अपराजिता नामक औषधी घालून हा ताईत मनगटावर बांधला होता. याचे मातापिता किंवा आपण स्वत: यांच्याखेरीज दुसऱ्या कोणीही हा

भूमीवर पडला असतां त्यास हात लावूं नये. हात लावल्यास तो सर्प होऊन डसेल, असें त्यांनी सांगितलें होतें. याचा प्रत्ययही आम्हांस अनेकदा आला आहे.' या प्रसंगाने तर दुष्यन्ताचा संशय पूर्णपणें नाहीसा होतो. झालेला वृत्तान्त शकुंतलेला सांगण्यास तापसी निघून जाते. तिच्या बरोबर बालकही जाऊं लागतो, तेव्हा दुष्यन्त म्हणतो, 'पुत्रा, थांब, माझ्याबरोबर आईकडे जाशील.' त्यावर 'दुष्यन्त माझे बाबा, तुम्ही नव्हे,' असें सर्वदमनाचें उत्तर ऐकून राजाची जास्तच खात्री होते. इतक्यांत मळकें वस्त्र नेसलेली व एकपेडाची वेणी घातलेली शकुतला प्रवेश करते. पश्चात्तापाने फिकट झालेल्या राजाला ती एकदम ओळखत नाही; पण लोकरच तिची खात्री पटते व ती त्याचा जयजयकार करते. 'कोण ग हा?' असें सर्वदमनाने विचारतांच 'वत्सा, तुझ्या दैवाला विचार!' असें म्हणून ती रडूं लागते. 'प्रिये मी तुला टाकून दिलें हें तुझ्या मनाला लागून राहूं नये; कारण त्यावेळीं माझ्या मनाला कांही विलक्षण मोह पडला होता,' असें बोलून राजा तिच्या पायां पडतो. शकुन्तला त्याला उठविते व ते सर्व मारीच मुनीच्या दर्शनार्थ जातात. मारीच ऋषि व त्यांची पत्नी अदिति त्या दोघांस आशीर्वाद देतात. मारीच ऋषींकडून दुर्वासशापाचा वृत्तान्त कळल्यावर दुष्यन्ताला आपण दोषमुक्त झाल्याबद्दल आनंद होतो. शकुन्तलेसही पतीने आपणास विनाकारण टाकलें नव्हतें हें समजल्यावर बरे वाटतें. नंतर राजाच्या विनंतीवरून मारीच ऋषि कण्वमुनींना हा सर्व वृत्तांत कळविण्याकरितां एका ऋषिकुमाराला पाठवितात व दुष्यन्ताला पत्नी व पुत्र यांसह राजधानीस जाण्यास अनुज्ञा देतात. नंतर भरतवाक्याने नाटक समाप्त होतें.

कालिदासाने या नाटकाचें कथानक कोठून घेतलें याविषयीं सुदैवाने वादविवाद करण्यास फारशी जागा नाही. अनंत कथारत्नांचा सागर असा जो आपला प्राचीन 'महाभारत' ग्रंथ त्याच्या आदिपर्वांत सुमारें तीनशें श्लोकांत शकुंतलेची गोष्ट वर्णिली आहे, तिची व शाकुंतलाची तुलना केल्यास कालिदास चें अनुपम रचनाकौशल्य व कलाभिज्ञत्व ध्यानांत येईल. वास्तव महाभारतांतील गोष्ट प्रथम संक्षेपाने दिली आहे.*—

* या सारांशाकरितां भांडारकर ओरिएंटल इन्स्टिटयूटने अत्यंत परिश्रमाने संशोधन करून प्रकाशित केलल्या आदिपर्वाच्या आवृत्तीचा उपयोग केला आहे.

एके दिवशी पुरुकुलोत्पन्न दुष्यन्त राजा बरोबर मोठें सैन्य, अमात्य, पुरोहित वगैरे घेऊन शिकारीस गेला. बराच वेळ शिकार केल्यानंतर ते काश्यपाश्रमी पोचले. तपोवनाबाहेर सैन्यास ठेवून व राजचिन्हें अंगावरून उतरून त्याने पुरोहित व अमात्य यांसह आश्रमांत प्रवेश केला. थोडे पुढे गेल्यावर अमात्यादिकांस एके जागी सोडून तो एकटाच कण्वाच्या पर्णकुटिकेकडे वळला. त्या वेळीं कण्वऋषि फळे आणण्याकरितां बाहेर गेले होते; तथापि त्याची सुंदर कन्या शकुन्तला पर्णकुटिकेत होती. तिने त्याचे स्वागत केले. तिला पाहतांच राजाच्या मनांत कामविकार उत्पन्न झाला. त्याने विचारल्यावरून शकुंतलेने आपला जन्मवृत्तांत त्याला सविस्तरपणें सांगितला. तेव्हा नानाप्रकारच्या वस्त्रालंकारांचें आमिष दाखवून त्याने तिला आपली पत्नी होण्याबद्दल विनंती केली. 'माझे बाबा फळें आणण्याकरितां बाहेर गेले आहेत, ते घटकाभराने येतील व नंतर मला अर्पण करतील,' असें शकुंतलेने सांगून पाहिलें. पण राजाने 'गान्धर्वविवाह क्षत्रियांस विहित आहे. तूं स्वतःचें दान करण्यास समर्थ आहेस.' इत्यादि बोलून तिचें मन वळविलें; पण आपली संमति देण्यापूर्वी, माझ्यापासून होणाऱ्या मुलाला आपल्या पश्चात् गादी मिळाली पाहिजे, अशी शकुंतलेने अट घातली व ती राजाने मान्य केली. नंतर राजाने तिच्याशीं गान्धर्वविधीने विवाह केला व थोडा वेळ तिच्याबरोबर घालविला. शकुन्तलेला स्वनगरी नेण्यासाठी मोठें सैन्य पाठविण्याचें वचन देऊन (कण्वऋषि परत आल्यावर आपल्याला शाप देतील या भीतीने) तो तेथून निघून गेला. ऋषि परत आल्यावर शकुंतला लज्जेने त्यांच्यासमोर येईना. तेव्हा त्यानी अन्तज्ञानाने सर्व गोष्टी जाणून तिचें अभिनंदन केले व तिने मागितलेले वर दिले. वचन दिल्याप्रमाणें दुष्यन्ताने सैन्य तर पाठविलें नाहीच, पण तिच्याबद्दल विचारपूसही केली नाही. कालांतराने शकुंतला आश्रमांतच प्रसूत झाली. तिच्या मुलाचे जातकर्मादि संस्कार कण्वाने केले. तो सहा वर्षांचा झाला नाही तोंच व्याघ्रसिंहादि क्रूर पशूंस पकडून आणन त्यांच्याशीं खेळत असे, म्हणून आश्रमस्थ लोकांनी त्याचें नांव सर्वदमन असें ठेवलें. बल व पराक्रम यांनी युक्त असल्यामुळें तो युवराज होण्यास योग्य झाला असें पाहून कण्वाने शकुंतला व सर्वदमन यांस हस्तिनापुरास पोचविण्यास शिष्यांस

आज्ञा केली. राजदरबारीं पोचल्यावर शकुंतलेने मागील प्रसंगाची राजाला आठवण देऊन पुत्राचा स्वीकार करण्याबद्दल विनंती केली. 'तुझ्याबरोबर विवाह केल्याचें मला स्मरत नाही. पाहिजे तर रहा किंवा जा,' असें राजाने म्हणतांच, शकुंतलेला त्याचा अत्यन्त संताप आला. ती म्हणाली, 'राजा, एखाद्या हलकट माणसासारखा तूं काय खोटें बोलत आहेस ! मी म्हणतें तें खरें की खोटें हें तुझ्या मनाला माहीत आहे. पाप करतांना आपणाला कोणी पाहत नाही असें पापी मनुष्याला वाटतें, पण देव व त्याचा अन्तरात्मा हे सर्व पाहत असतात. भार्येला पुरुषाची अर्धाङ्गी म्हणतात. तिच्या ठिकाणी पुत्ररूपाने तिच्या पतीचा पुनः जन्म होतो. पुत्रापेक्षा अधिक आनन्ददायक अशी कोणती वस्तु या जगांत आहे ?' इत्यादि बोलून त्याचें मन वळविण्याचा तिने यत्न करून पाहिला, पण तो ऐकेना. तेव्हा 'असत्याबद्दर तुझी इतकी प्रीति आहे तर तुझी संगति मला नको. तूं याचा स्वीकार केला नाहीस तरी माझा मुलगा अखिल पृथ्वी पादाक्रान्त करील,' असें म्हणून ती पुत्रासह चालूं लागली. त्याबरोबर आकाशवाणी झाली की, 'दुष्यन्ता ! हा तुझाच मुलगा आहे. याचा स्वीकार कर.' तेव्हा राजा आनंदित होऊन पुरोहित, अमात्य इत्यादिकांस म्हणाला, 'ऐका हें देवदूताचें भाषण ! मी या मुलाचा पूर्वीच स्वीकार केला असता तर हा जन्माने शुद्ध आहे किंवा नाही याचा तुम्हांस संशय आला असता.' नंतर तो शकुंतलेला म्हणाला, 'मी असें केलें नसतें तर कामुकत्वामुळें मी यांचा स्वीकार केला असें लोक म्हणाले असते. रागाने तूं जे मला अपशब्द बोललीस त्याबद्दल मी तुला क्षमा केली आहे.' नंतर त्याने शकुंतलेला आपली पट्टराणी केली व भरताला युवराजपद दिलें.

महाभारतांतील वरील साधी व वैचित्र्यहीन गोष्ट वाचल्यावर तींतून जगांतील एका अत्युत्कृष्ट नाटकाची उत्पत्ति झाली असें कोणास सांगितलें तर खरेंही वाटणार नाही. खाणींतून काढलेला ओबडधोबड दगड पाहतांच त्यांतून पुढे एक अत्यंत रम्य आकृति निर्माण होणार आहे अशी कल्पना कोणास येते काय ? पण सामान्य जनाच्या चर्मचक्षूंना जें दिसत नाही तें कलावानाच्या प्रतिभात्मक दिव्यदृष्टीपुढे लपत नाही. व्यासांच्या

साध्या साधनसामग्रींत आपल्या प्रतिभेने निर्मिलेला वैचित्र्यपूर्ण प्रसंगांचा मालमसाला घातला असतां त्यांत उत्कृष्ट रसपरिपाक उतरेल असें कालिदासाला वाटलें असावें.* दुसरें असें की महाभारतांतील कथानक फार प्राचीन काळीं घडलेलें. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत त्यांतील कांही प्रसंग व विचार असंभाव्य व अनुचित वाटले नसले तरी कालिदास-कालीन सुसंस्कृत समाजाला ते पटले व आवडले नसते. शिवाय व्यासांच्या पुराणकथेंत नायक दुष्यन्त व नायिका शकुंतला हो केवळ स्वार्थाने प्रेरित झालेलीं दिसत होतीं. नाटकांतील त्यांचीं चित्रें रम्य व आकर्षक होण्यास त्यांच्या स्वभावांत विविध छटांचे रंग उचित प्रमाणांत मिसळणें जरूर होतें. या कारणास्तव कालिदासाने मूळ गोष्टींत अनेक फरक केले आहेत. 'शाकुंतलोपाख्यान' व 'शाकुंतल' यांतील कथानकांची तुलना केल्यास दुर्वास ऋषीचा शाप व त्याची निवृत्ति होण्यास जरूर असलेली मुद्रिका या दोन महत्त्वाच्या गोष्टी कवीने कल्पिल्या आहेत हें सकृद्दर्शनीच ध्यानांत येतें. यांपैकी पहिलीचा त्याने दोन प्रकारे उपयोग केला आहे. महाभारतांतील दुष्यन्त केवळ विषयासक्त, भ्याड व स्वार्थी दिसतो. कण्व एक दोन तासांनी परत येण्याचा संभव असतां त्यांची वाट न पाहतां त्यांच्या पश्चात् तो त्याच्या कन्येचा उपभोग घेता. विषयोपभोगाची तात्कालिक ऊर्मि शमल्यावर आपणांवर ऋषि रागावतील या भीतीने तो लागलीच राजधानीस निघून जातो. पुढे शकुंतलेला दिलेल्या वचनाला जागत नाही, इतकेंच नव्हे तर ती स्वतः पुत्रासह राजसभेत उपस्थित झाली असतां जनापवादाच्या भयाने स्वकर्तव्य करण्याचें टाळतो. आकाशवाणी झाली नसती तर स्वतःच्या निरपराधी पत्नीचा व पुत्राचा त्याग करण्यास त्याने मागे पुढे पाहिलें नसतें. अशा निकृष्ट कोटीतील नायकाचें पराक्रमी, प्रेमळ, पापभीरु व कर्तव्यतत्पर पुरुषांत रूपांतर करण्याकरितां कवीने योजिलेल्या किमयेचे दुर्वासाचा शाप हे एक प्रमुख

---

* हेंच आनंदवर्धनानेही 'ध्वन्यालोका'त (पृ. १४८) म्हटले आहे—इतिवृत्तवशायातां कथञ्चिद्रसाननुगुणां स्थितिं त्यक्त्वा पुनरुत्प्रेक्ष्याप्यन्तरा भीष्टरसोचित-कथोन्नेयो विधेयः यथा कालिदासप्रबन्धेषु ।

साधन आहे. त्या शापाने राजाचा स्मृतिभ्रंश झाला व म्हणूनच एरव्ही आपलीं कर्तव्यें कसोशीने करणारा राजा 'शाकुतल' नाटकांत परस्त्रीस्पर्श-भयाने स्वपत्नीचा त्याग करतांना दिसतो. पांचव्या अंकांतील दोन सत्प-क्षांच्या झगडयाचा हृदयंगम प्रसंग या शापानेच शक्य झाला आहे. सहाव्या अंकांतील दुष्यन्ताचा शोक व सातव्यांतील शकुंतलेचें अत्यंत कारुण्यो-त्पादक दृश्य यांची उभारणीही शापप्रसंगाच्या पायावरच झाली आहे. सारांश या शापाने नायक नायिकांस कांही काळ कष्ट दिले तरी अखेरीस त्यांच्या स्वभावांतील उदात्तपणा व्यक्त करून त्याने त्यास उपकृतच केलें आहे. कथानकालाही वैचित्र्यपूर्ण व रम्य प्रसंग पुरवून त्याने चित्ताकर्षक बनविलें आहे. याशिवाय हा शापप्रसंग घालण्यांत कालिदासाचा दुसरा-ही एक हेतु असावा. केवळ बाह्य रूपामुळे उत्पन्न झालेलें प्रेम वैषयिक अत-एव निकृष्ट दर्जाचें असतें. संकटाच्या भट्टीतून तावून सुलाखून बाहेर पड-ल्यावर त्यांतील स्वार्थीपणा नष्ट झाल्यामुळें त्याचें कर्तव्यांत रूपांतर होतें. अशा निरपेक्ष उदात्त प्रेमाची समाजाच्या धारणेला व अभ्युदयाला अत्यंत आवश्यकता असल्याने कालिदासाने आपल्या इतर ग्रंथांतही त्याचीं चित्रें रेखाटली आहेत. 'कुमारसभवां'तील पार्वती, 'मेघदूतां'तील यक्षपत्नी व 'विक्रमोर्वशीयां'तील राणी औशीनरी या अशा दिव्य प्रेमाच्या मूर्ति होत. 'विक्रमोर्वशीयां'त औशीनरी राणीचें पात्र उदात्त स्वरूपाचें असलें तरी प्रधान नाही, त्यामुळें कवीचा हा अभिप्राय त्यांत स्पष्टपणें प्रतीत होत नाही. ती उणीव या नाटकांत कवींने भरून काढली आहे.शकुंतलेच्या प्रेमाची परीक्षा करण्याकरितां त्याने दुर्वासशापाचा कुशलतेने उपयोग केला आहे. त्याच्या इतर नाटकांतही एकाद्या दैवी घटनेने नायक-नायिकांव रसंकटाचे प्रसंग आलेले दिसतात असे प्रसंग एकाद्या ऋषीच्या शापाने यावे हें अगदी साह-जिक आहे. शकुंतलेसारख्या प्रेमळ व पतिचिंतामग्न नायिकेला शाप देण्यास दुर्वासासारख्या निष्ठुर व कोपिष्ठ ऋषीशिवाय दुसरा कोण प्रवृत्त होणार? अनसूयेने म्हटल्याप्रमाणें 'अग्नीशिवाय दुसरा कोण दग्ध करूं शकेल?' शापामागून उश्शाप हा आलाच! शापाने राजाला शकुन्तलेची विस्मृति पडली होती म्हणून उश्शापाने त्याला तिची ओळख पटेल असें कांही करणें अवश्य होतें. अशा वेळीं मुद्रिकेसारख्या पूर्वपरिचित

साधनाची सहजच आठवण होणार. सीतेला आपली ओळख पटावी म्हणून हनुमानाने श्रीरामचंद्राची मुद्रिका आपल्या बरोबर घेतली असल्याचें कवीला माहीत होतें, किंबहुना मेघदूत रचतांना तो प्रसंग त्याच्या डोक्यांत घोळत होता, हें आपण मागें पाहिलेंच आहे. तेव्हा दुष्यन्तालाही शकुन्तलेची मुद्रिकादर्शनाने ओळख पटविण्याची कल्पना कवीला सुचावी यांत आश्चर्य नाही. बौद्धांच्या पाली भाषेंतील जातक ग्रंथांत गौतमबुद्धाच्या पूर्व जन्मातील गोष्टीची वर्णनें आलीं आहेत, त्यांतील 'कठ्ठहारि' जातकांत शाकुंतलाच्या सविधानकासारखी एक गोष्ट आढळते. "वाराणसी नगरांतील ब्रह्मदत्त राजा अरण्यांत एका सुन्दर स्त्रीला पाहतो; तिच्याशीं कांही वेळ रममाण होऊन नंतर तो स्वनगरीस परत जातो; पण जाते वेळीं तिच्या बोटांत खुणेकरितां मुद्रिका घालतो. पुढे ती स्त्री अरण्यांत प्रसूत होऊन तिला बोधिसत्व हा मुलगा होतो. तो मोठा झाल्यावर त्याला घेऊन ती राजाकडे जाते व खुणेची अंगठी दाखविते. राजा मुद्दामच आपण तिला ओळखत नाही असें दाखवितो. तेव्हा सत्यक्रियेशिवाय दुसरा उपाय नाही असें जाणून ती आपल्या मुलाचा पाय धरून त्याला आकाशांत फेकते व राजाला म्हणते, 'राजा, जर हा खरोखरीच तुझा मुलगा असेल तर तो अंतराळीं सुरक्षित राहील, नाही तर जमिनीवर पडून त्याच्या शरीराच्या ठिकऱ्या होतील.' बोधिसत्त्व अंतराळीं मांडी घालून राहतो तें पाहून कोणासही त्याच्या जन्माविषयीं संशय राहत नाही; तेव्हा राजाही त्याचा स्वीकार करून त्याला यौवराज्याभिषेक करतो." वरील गोष्टीवरून कालिदासाला मुद्रिकेची कल्पना सुचली असावी असें कांही युरोपीय विद्वानांचें मत आहे, पण तें मान्य होण्यासारखें नाही. वरील जातकांत व महाभारतांतील शकुंतलेच्या कथेंत बरेंच साम्य आहे, त्यावरून बौद्ध लोकानीच ती हिंदुग्रंथांतून घेऊन त्यांत थोडा फरक करून गौतमबुद्धाच्या पूर्वजन्माशीं तिचा संबंध जोडून दिलेला दिसतो. जातकग्रंथांतील इतरही अनेक कथांत त्यांनी असें केल्याचें दिसून येतें. कालिदासाच्या नाटकांत दुर्वासशापाचा व मुद्रिकेचा घनिष्ठ संबंध आहे, पण वरील गोष्टीत शापाचा उल्लेखही नाही. 'शाकुंतला'तील मुद्रिकाप्रकरणाची कल्पना कालिदासाला स्वाभाविकपणेंच कशी सुचली असावी तें वर दाखविलेंच आहे 'मालविका-

ग्निमित्रां'तही कवीने मुद्रिकेचा ओळख पटण्यासाठी उपयोग केला होता हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

मुद्रिकादर्शनाने राजाची स्मृति जागृत व्हावयाची तर शकुंतला प्रथम राजासमोर जाते त्यापूर्वी ती तिच्या बोटांतून गळणें व पुढे तिचा त्याग केल्यावर त्याला ती दिसणें हे ओघानेच आलें. हें कसें घडलें तें दाखविण्याकरितां कालिदासाने धीवर व शिपाई यांचा प्रवेश घातला आहे. त्यांत त्याची अलौकिक कल्पकता उत्कृष्टपणें दिसून येते. ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकांत होऊन गेलेल्या हिरोडोटस नामक ग्रीक इतिहासकाराच्या ग्रंथांत असाच एक प्रसंग वर्णिला आहे, त्यावरून ही कल्पना कालिदासाला सुचली असावी असें एका विद्वानाने प्रतिपादिलें आहे.* 'पालिक्रेटस नामक ग्रीक राजाने एके दिवशी आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी अत्यंत मौल्यवान पाचूचा खडा वर बसविलेली आपली मुद्रिका समुद्रांत टाकली. पुढे पाच सहा दिवसांनी एका धीवराने आणून दिलेल्या माशाच्या पोटांत ती त्याला सांपडली.' उपरिनिर्दिष्ट विद्वानांचे मतें ही गोष्ट कालिदासाला माहीत असावी. 'कारण इ. स. च्या पहिल्या शतकांत भडोच या बदरांतून माळवा व काठेवाड या प्रांतांचा पश्चिम देशाशी व्यापार चालत असे. या देशांतून हिंदुस्थानांतील राजांच्या उपभोगाकरितां अनेक सुंदर ग्रीक तरुणीही आणल्या जात. कालिदासाने आपल्या प्रांतांतील राजदरबारीं या यवनी पाहिल्या असाव्या; म्हणूनच त्याने शाकुंतलांत दुष्यन्त राजाबरोबर शिकारीच्या वेळीही यवनी होत्या असें दाखविलें आहे. या यवनीच्या तोंडून ही ग्रीक कथा कवीला माहीत झाली असावी.' या मतांत अनेक गोष्टी गृहीत धरल्या असल्यामुळें तें निश्चितपणें मान्य करतां येत नाही. हिरोडोटसने वर्णिलेली गोष्ट त्याच्या नंतर जवळ आठनऊशें वर्षे ग्रीक लोकांच्या—स्त्रियांच्याही—तोंडीं होती; अशा स्त्रियांचा व कालिदासाचा संबंध आला व त्यांच्या संभाषणांत ती गोष्ट आल्यामुळें कवीला तिजवरून शाकुंतलांतील प्रसंग सुचला असें मानावें लागतें. यांत फार दूरान्वय दिसतो. कालिदासाने इतर ठिकाणीं कोठेही ग्रीक कथांचा उपयोग केलेला दिसत नाही. तेव्हा या कल्पनेचें श्रेय कवीसच देणें योग्य होईल.ग्रीक व भारतीय तत्त्वज्ञानांतही

* *J. B. O. R. S*, Vol. VII. p. 97.

अनेक ठिकाणीं आश्चर्यकारक साम्य आढळतें; त्यासारखाच वरील प्रसंग आहे व त्याची उपपत्ति 'मानवी मन सर्वत्र सारखेंच असतें' असें म्हणूनच लावली पाहिजे.

दुर्वासशाप व मुद्रिका या दोन महत्त्वाच्या गोष्टी कवीला कशा सुचल्या असाव्या हें आपण येथवर पाहिलें. मूळकथेंत त्याने केलेल्या इतर फरकांचींही कारणें समजणें सोपें आहे. दुष्यन्त आश्रमांत गेला त्या वेळीं कण्वऋषि फलपुष्पादिकांकरितां अरण्यांत गेला होता. तो येण्यापूर्वी राजा शकुंतलेच्या जन्मासंबंधीं कथा ऐकतो, स्वत: लांबलचक भाषण करून तिचें मन वळवतो, तिच्याशीं रममाण होतो व निघूनही जातो, असें महाभारतांत वर्णिलें आहे. दोन तीन तासांच्या अवधींत या सर्व गोष्टी घडून येणें असंभवनीय व कलादृष्टीने असमर्थनीय ठरतें. शिवाय त्यावरून राजाचा उल्लूपणा व शकुंतलेचा स्वार्थी स्वभाव व्यक्त होतात हें वेगळेंच. कलाविलास व औचित्य यांकरितां या ठिकाणीं फरक करणें जरूर होतें म्हणून कालिदासाने कण्वऋषीला शकुंतलेच्या प्रतिकूल दैवाची शांति करण्याकरितां दूर सोमतीर्थीं पाठविलें आहे. तेथून येण्यास त्यास सहजच चार सहा महिने लागले असावेत. या अवधींत यज्ञरक्षणार्थ आश्रमवासीयांच्या विनंतीवरून दुष्यन्त आश्रमांत राहिला, त्याचा व शकुन्तलेचाही मदनसंताप उत्तरोत्तर वाढत गेला व तो अगदी असह्य झाला त्या वेळीं त्यांनी गान्धर्व विवाह केला असें कवीने दाखविलें आहे. यांत अस्वाभाविक असें कांहीही दिसत नाही. शकुंतलेचा अनुरूप पतीशीं गांधर्वविधीने विवाह झाला व ती गर्भवती आहे हें समजतांच कण्वाने तिला पतिगृहीं पाठविण्याचा निश्चय केला यांत कालिदासकालीन लोकांच्या स्त्रीविषयक समजुतीचें प्रतिबिंब पडलेलें दिसतें. त्या काळीं स्त्रियांच्या शालीनतेविषयींच्या कल्पनाही महाभारतकाळापेक्षा अगदी निराळ्या होत्या. त्यामुळें कालिदासाने आपल्या नाटकांत शकुंतलेच्या जन्माची हकीकत तिच्या तोंडीं न घालतां ती तिच्या मैत्रिणीकडून राजाला कळविली–किंवा सुचविली–आहे. महाभारतांतील शकुंतला स्वपुत्राला गादी मिळावी अशी अट स्वत: घालते व ती राजाने कबूल केल्यावरच त्याला

वश होते. यांत तिचा व्यावहारिकपणा दिसून आला तरी त्याबरोबर तिच्या हृदयांत सकृद्दर्शनी उत्पन्न होणाऱ्या प्रेमाचा प्रादुर्भाव झाला नव्हता हेंही सिद्ध होतें. कालिदासाची शकुंतला प्रेमपरवश झाली होती; तिला अशा अटी कशा सुचणार? तिच्या मैत्रिणी साहजिकच जास्त समयज्ञ होत्या; तथापि त्यांनीही 'राजाना अनेक स्त्रिया असतात, म्हणून ही आमची प्रियसखी तिच्या बांधवांच्या दुःखाला कारण होणार नाही असें आपण वागावें' एवढेच सुचविले आहे. अशा प्रसंगीं सर्व गोष्टी नायिकेकडून वदविणें उचित होणार नाही हें जाणून कवीने प्रियंवदा व अनसूया या शकुंतलेच्या प्रेमळ सख्यांची जोडी निर्माण केली आहे. याशिवाय शारद्वत व शार्ङ्गरव हे कण्वशिष्य, गौतमी ही शकुंतलेचें संगोपन करणारी वृद्ध तापसी, राजपुरोहित, माढव्य नामक विदूषक, वैखानस, सेनापति इत्यादि कथानकाच्या विकासाकरितां जरूर लागणारीं अनेक पात्रें कवीच्या कल्पकतेचीं अपत्यें होत. यांपैकी कांही पात्रें–शारद्वत, शार्ङ्गरव, पुरोहित, प्रियंवदा व गौतमी–हीं 'पद्मपुराणां'तील शकुंतलोपाख्यानांतही आढळतात. शिवाय त्यांतील कथा 'शाकुंतल' नाटकाच्या संविधानकाशी बहुतांशी जुळणारी आहे. म्हणून कालिदासाने 'पद्मपुराणां'तून आपल्या नाटकाची गोष्ट व कांही पात्रेंही घेतली असावी असें डॉ० विंटरनीट्झ् सारखे संशोधक म्हणतात. त्यांच्या मताचा येथे थोडक्यांत विचार करणें जरूर आहे.

'पद्मपुराण' व 'रघुवंश' यांत दिलीपापासून दशरथापर्यंतच्या राजांच्या वर्णनांत अनेक ठिकाणीं आश्चर्यकारक शब्दसाम्य व कल्पनासाम्य आढळतें त्याचा वर उल्लेख आला आहेच. त्यासारखेंच याही ठिकाणचें साम्य आहे. दुष्यन्त मृगाला मारूं लागला असतां वैखानसाने त्याचें निवारण करणें, पुढे आश्रमांत प्रवेश केल्यावर शकुंतलेस व तिच्या सख्यांस वृक्षांस पाणी घालतांना पाहणें, त्याने विचारल्यावरून शकुंतलेच्या सखीने तिच्या जन्माचा वृत्तान्त कथन करणें, दुष्यन्तगमनानंतर दुर्वासाचा शाप होणें, हस्तिनापुराच्या मार्गावर एका तीर्थांत मुद्रिका पडून अदृश्य होणें, पुढे दुष्यन्ताचा स्मृतिभ्रंश, शकुंतलाप्रत्यादेश, धीवराकडून मुद्रिकेची प्राप्ति व तदनंतर राजाचा पश्चात्ताप व शोक, शेवटीं स्वर्गांतून परत येत असतां मारीचाश्रमांत शकुंतला व सर्वदमन यांची भेट, इत्यादि प्रसंग 'शाकुंतल'

नाटकांत व 'पद्मपुराणां'त समान आहेत व त्यांचें वर्णनही बहुतांशीं त्याच शब्दांत केलें आहे. काही ठिकाणीं महत्त्वाचे फरकही आढळतात. 'महाभारता'प्रमाणें 'पद्मपुराणां'तही कण्वऋषि परगांवी गेला नसून फळें व पुष्पें आणण्याकरितां वनांत गेला होता व तो परत येण्यापूर्वी दुष्यन्त नगरास परत गेला असें वर्णिलें आहे. हस्तिनापुरास जातांना शारद्वत, शाङ्गरव व गौतमी यांप्रमाणें प्रियंवदाही शकुंतलेबरोबर होती. तीर्थांत स्नान करतांना शकुंतलेने तिच्याजवळ अंगठी दिली, ती तिने वस्त्रांत ठेवली नाही तोंच ती गडगडत जाऊन पाण्यांत पडली. त्या वेळीं प्रियंवदेने शकुंतलेला तो वृत्तांत कळविला नाही व शकुंतलेलाही तिची आठवण झाली नाही, पण राजासमोर मुद्रिकेची जरूरी लागली तेव्हा तिने ती प्रियंवदेजवळ मागितली, असें वर्णन 'पद्मपुराणांत' आलें आहे. 'शाकुंतला'प्रमाणेंच 'महाभारता'शींही 'पद्मपुराणा'चें कांही ठिकाणीं अत्यंत सादृश्य आढळतें. शकुंतलेला वश करण्याकरितां दुष्यंताचें प्रलोभनात्मक भाषण, कण्व ऋषींनी वनांतून परत आल्यावर केलेलें शकुंतलेचें अभिनन्दन, नंतर शकुंतलेने मागितलेले वर, राजाने स्वीकार न केल्यामुळें अत्यंत संतप्त होऊन शकुंतलेने त्याला केलेलें वाक्ताडन यांचें वर्णन 'महाभारतां'त व पुराणांत अगदी त्याच शब्दांत केलें आहे. असे सुमारें शंभर श्लोक या दोन ग्रंथांत समान आहेत. या साम्याचा विचार करितां (१) व्यास व कालिदास यांनी पद्मपुराणांतील कथा व कल्पना घेऊन त्या आपल्या ग्रंथांत घुसडून दिल्या; किंवा (२) 'पद्मपुराण'कर्त्याने 'शाकुंतला'तून कांही प्रसंग व 'महाभारतां'तून कांही भाषणें घेऊन व कांही स्वतःचें पदरचें घालून आपली गोष्ट सजविली; असे दोन पक्ष संभवतात. यांतून दुसराच पक्ष अधिक संभवनीय आहे असें आम्हांस वाटतें. 'हरिवंशां'त व 'भागवता'सारख्या इतर पुराणांत 'महाभारतां'तल्यासारखीच शकुंतलेची कथा दिली आहे. 'पद्मपुराणा'ची कथा जुनी असती तर ती त्याही पुराणांत आली असती. पुराणांतील गोष्टींत बहुधा शारद्वत, शाङ्गरव, गौतमी, प्रियंवदा यांसारख्या विशेष जरूर नसलेल्या पात्रांचा निर्देश आढळत नाही. 'पद्मपुराणां'तही शाङ्गरव व शारद्वत या दोन्ही मुनिशिष्यांचा नामनिर्देश असला तरी त्यांना स्वतंत्र भाषणें दिलीं नसल्याने तो अनावश्यक वाटतो. तेव्हा 'पद्मपुराणां'तील

शाकुंतलोपाख्यानांत हीं पात्रें आढळतात यांचें कारण लेखकाने तें कथानक कालिदासाच्या 'शाकुंतल' नाटकावरून संक्षेपाने घेतलें आहे, हें असावें असें वाटतें. मागें 'मत्स्यपुराणां'त कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीया'तील कांही प्रसंगांचा उल्लेख आला आहे असें दाखविलें आहे. त्याप्रमाणेंच 'पद्मपुराण'-कर्त्यानेंही 'शाकुंतलां'तील प्रसंग व 'महाभारतां'तील ओजस्वी भाषणें ही जोडून आपली शाकुंतलोपाख्यानाची कन्था बनविलेली दिसते.

'शाकुंतला'चें सविधानक 'मालविकाग्निमित्रां'तल्याप्रमाणें गुंतागुंतीचें नाही तथापि त्यांतील प्रसंगाची जुळणी इतक्या कौशल्याने केली आहे की प्रेक्षकांचें औत्सुक्य शेवटपर्यंत टिकून राहतें. त्यांतील विविध घटना एकांतून एक अशा अगदी स्वाभाविकपणें उद्भूत झालेल्या दिसतात. त्या सर्व मुख्य साध्याशीं कमीजास्ती प्रमाणांत संलग्न झाल्या आहेत. एक दोन ठिकाणीं आकाशवाणीसारख्या अद्भुत गोष्टींचा कथानकाच्या प्रगतीकरितां कवीने उपयोग केला आहे; तथापि तत्कालीन लोकांस त्या असंभवनीय वाटत नव्हत्या हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. या नाटकांतील प्रत्येक प्रवेश किंबहुना त्यांतील प्रत्येक प्रसंग सहेतुक घातलेला आहे. उदाहरणार्थ, पांचव्या अंकांतील हंसपदिकेचें गीत घ्या. त्यायोगें आगामि शकुंतलाप्रत्यादेशाची प्रेक्षकांस सूचना मिळते. त्यामुळें राजाला मागील वृत्तान्त स्पष्टपणें आठवत नाही; तथापि त्याच्या मनाला हुरहुर लागून राहते. शिवाय तें गीत ऐकल्यावरच आपला संदेश कळविण्याकरितां राजा विदूषकाला हंसपदिकेकडे पाठवितो. तो गेल्यावर शकुंतलेचा वृत्तान्त माहीत असलेलें व राजाच्या विश्वासांतलें असें कोणीही जवळ नसल्याने पांचव्या अंकांतील शकुंतलाप्रत्यादेशाचा प्रसंग अस्वाभाविक वाटत नाही. या सर्व कारणांस्तव त्या प्रसंगाची योजना कवीने पांचव्या अंकाच्या आरंभीं केली आहे. शेवटल्या अंकांत दुष्यन्ताला सर्वदमनाची ओळख हळूहळू पण एकापेक्षा एक बलवत्तर अशा कारणांनी पटते तो प्रसंगही उत्तम वठला आहे.

'शाकुंतल' नाटकांतील भाषा अत्यंत प्रसादयुक्त व रम्य आहे. त्यांत उपमा, उत्प्रेक्षा, स्वभावोक्ति, अर्थांतरन्यास यांसारखे अनेक मनोरम अलंकार आले आहेत. त्यांत कोठेही क्लिष्टता, कल्पनांची ओढाताण, दूरान्वय, वगैरे दोष दिसत नाहीत. प्रत्येक पात्राच्या तोंडीं त्याला शोभेल

अशी भाषा व सुचतील असेच अलंकार घालण्याची कवीने काळजी घेतली आहे. शकुंतला व तिच्या सख्या सदैव लतावृक्षादिकांच्या सहवासांत खेळणाऱ्या बागडणाऱ्या. तेव्हा त्यांच्या भाषणांत 'क इदानीं सहकारमन्तरेणातिमुक्तां पल्लवितां सहते,' 'को नामोष्णोदकेन नवमालिकां सिञ्चति' यांसारखे लतावृक्षावरून सुचणारे अलंकार घातले आहेत. कण्व ऋषि सदैव यज्ञयागात व अध्यापनकर्मांत निमग्न. तेव्हा त्याना 'दिष्ट्या धूमाकुलितदृष्टेरपि यजमानस्य पावक एवाहुतिः पतिता,' 'वत्से सुशिष्यपरिदत्तेव विद्याऽशोचनीयासि संवृत्ता' यांसारखे दृष्टांत व उपमा सुचाव्यात यांत आश्चर्य नाही. सदैव खाद्यलोलुप व विनोदी विदूषकाच्या स्वभावाचें प्रतिबिम्ब 'यथा कस्यापि पिण्डखर्जूरैरुद्वेजितस्य तिन्तिण्यामभिलाषो भवेत् तथा स्त्रीरत्नपरिभोगिणो भवत इयमभ्यर्थना' या उपमेंत स्पष्टपणें पडलेलें दिसतें. या नाटकांतील भाषणें लहान लहान व चटकदार असल्याने तीं वाचतांना व ऐकतांना वाचक-प्रेक्षकांचें चित्त रमून जातें व आपण नाटक पाहत नसून खरोखरीच आपल्या समोर घडलेले प्रसंग पाहत आहों असें प्रेक्षकांस वाटतें. यांतच कालिदासाच्या कलेचा उत्कर्ष आहे.

'शाकुंतलां'त संभोग व विप्रलभ असा द्विविध शृंगार, करुण व शांत हे प्रमुख रस आहेत. पहिल्या तीन अंकांत शृंगाराचें साम्राज्य आहे. तथापि प्रसंगाने इतरही अनेक रसांचा त्यांत अविर्भाव झालेला दिसतो. पहिल्या अंकाच्या आरंभीं दुष्यन्तापुढे जीवरक्षणार्थ पळणाऱ्या हरिणाच्या व त्याच अंकाच्या शेवटीं हत्तीने केलेल्या दाणादाणीच्या वर्णनांत भयानक, दुसऱ्या अंकांत विदूषकाच्या विनोदी भाषणांत हास्य, तिसऱ्या अंकाच्या शेवटीं राक्षसांच्या आगमनाने पुनः भयानक याप्रमाणें इतर रसांचें शृंगाराशीं मिश्रण झालें आहे. चौथ्या अंकांत आकाशवाणीच्या व वनदेवतांनी दिलेल्या वस्त्रालंकारांच्या वर्णनांत अद्भुतरसाची छटा आहे. पण त्या अंकांतील मुख्य रस करुण हाच होय. या अंकाला सबंध संस्कृतवाङ्मयांत तोड नाही असें एका सुभाषितकाराने म्हटलें आहे व तें सर्वसंमत झालें आहे. पांचव्या अंकांत दुष्यन्त व शकुन्तला यांच्या वाक्कलहाचा प्रसंगही मनोरम साधला आहे. राजाने टाकल्यामुळें संतप्त झालेल्या शकुन्तलेच्या भाषणाने रौद्र, पुढे तिची असहाय स्थिति पाहून करुण व शेवटीं अप्सर-

स्तीर्थाजवळ तो अदृश्य झाल्यामुळें अद्‌भुत अशा अनेक रसांचा अनुभव प्रेक्षकांस येतो. सहाव्यांत करुणशृंगाराचा परिपोष चांगला झाला आहे. 'विक्रमोर्वशीयां'तल्याप्रमाणें सबंध अंकांत एकच पात्र शोक करीत बसल्यास प्रेक्षकांस कंटाळा येतो व त्या रसाचाही उत्तम रीतीने उठाव होत नाही याचा अनुभव आल्याने या अंकांत राजाच्या करुणशृंगाराला विदूषकाच्या हास्यरसाची जोड दिली आहे. शेवटच्या अंकांत सर्वदमन व दुष्यन्त यांच्या भेटीच्या प्रसंगीं अद्‌भुत व वत्सल आणि शेवटी मारीच ऋषींच्या सांनिध्यांत शांत या रसांचा आविर्भाव होतो. नाटकाच्या शेवटीं प्रेक्षकांच्या चित्तवृत्ति अनेक रस अनुभविल्यावर शांतरसमग्न होतात.

आकर्षक संविधानक, मधुर भाषा, उत्कृष्ट वर्णनशैली, उत्कट रसपरिपोष इत्यादि गुण 'शाकुंतला'त आहेत; पण या सर्वांपेक्षा त्यांतील अत्यन्त कुशलतेने रेखाटलेल्या स्वभावचित्रांनीच रसिकांचें चित्त आकृष्ट केलें आहे. यांत दुष्यन्त, कण्व व विदूषक हीं पुरुषपात्रें व शकुंतला, अनसूया, प्रियंवदा ही महत्त्वाचीं स्त्रीपात्रें आली आहेत. याशिवाय संविधानकाच्या विकासाला अवश्य असे दुर्वास व मारीच हे ऋषि, गौतमी व अदिति या ऋषिपत्नी, सानुमती ही अप्सरा, शारद्वत व शाङ्गरव हे कण्वशिष्य, वैखानस, सेनापति, कंचुकी, राजश्यालक, धीवर, शिपाई, इत्यादि अनेक गौण पात्रें कवीने योजिलीं आहेत. या सर्वांत नायक दुष्यन्त व नायिका शकुन्तला यांच्या स्वभावरेखनांत त्याने आपलें शक्तिसर्वस्व खर्च केलें आहे.

कालिदासाच्या सर्व नायकांत दुष्यंत हा श्रेष्ठ आहे. हा आकाराने भव्य पण मनाने मृदु आहे. गम्भीर आकृति व गोड भाषण यांनी तो इतरांचें मन एकदम आकृष्ट करून घेतो. पुरूरव्याप्रमाणें हाही अत्यंत पराक्रमी आहे. यज्ञाचें रक्षण करण्यास त्याला धनुष्यावर बाण लावण्याचीही जरूरी भासत नाही. त्याच्या मौर्वीच्या टणत्कारानेच सर्व विघ्नें दूर होतात. तेव्हा विदूषकाबरोबर सर्व सैनिक पाठवून तो राक्षसनिवारणार्थ एकटाच आश्रमांत राहतो यांत नवल नाही. राक्षसांशीं युद्ध करण्यास प्रत्यक्ष इन्द्रही त्याला स्वर्गांत बोलावितो व त्याच्या विजयानंतर आपल्या पुत्रालाही हेवा वाटेल अशा रीतीने अर्धासन देऊन व स्वतःची मन्दारमाला त्याच्या गळ्यांत घालून त्याचा सन्मान करतो. राज्यांत त्याचा

विलक्षण दरारा आहे. त्याच्या प्रजेंतील अत्यंत निकृष्ट लोकही कुमार्गगामी नाहीत असें शार्ङ्गरव म्हणतो. शकुंतलेची अंगठी मिळाल्यावर त्याला पश्चात्ताप होतो म्हणून दुःखाने तो वसन्तोत्सव बंद ठेवतो. तेव्हा लता, वृक्ष व त्यांवर वास करणारे पक्षीही त्याची आज्ञा पाळीत आहेत असें कञ्चुकी वर्णन करतो, त्यांत यत्किंचित्ही अतिशयोक्ति सानुमतीला दिसत नाही. 'हा महाप्रभावी राजर्षि आहे' असे ती उद्गार काढते. दुष्यन्ताचा पराक्रम त्याच्या विनयाने अधिकच शोभून दिसतो. असुरांवर मिळविलेल्या विजयाने त्याला मुळीच गर्व होत नाही. हें सर्व इन्द्राच्या पुरस्काराचें फल असें तो मोठघा विनयाने म्हणतो. कण्वाश्रमांत प्रवेश करतांना 'तपोवनांत विनीत वेषाने गेलें पाहिजे,' असें म्हणून तो आपलीं उंची वस्त्रें व रत्नखचित अलंकार सारथ्याजवळ काढून ठेवतो. तो आपल्या पराक्रमाचा उपयोग दुष्टाचें शासन व आर्त जनांचें रक्षण करण्याकरतांच करीत असतो. तो अत्यंत धार्मिक, पापभीरु व प्रजापालनतत्पर आहे. कण्व ऋषीचे शिष्य आपणाकडे आले आहेत असें कंचुकीने कळवितांच, ऋषींच्या तपश्चर्येंत विघ्नें आली असतील काय, तपोवनांतील प्राण्यांना कोणी त्रास दिला असेल काय, माझ्या दुष्कृत्यामुळें तेथील लतांच्या बहरांत खंड पडला असेल काय, असे नानाप्रकारचे विकल्प त्याच्या मनांत येतात. आपण ऋषींचें रक्षण करतों त्याबद्दल ते आपल्या तपश्चर्येचा अंश देऊन पुरी भरपाई करतात असें त्यास वाटतें. तो सदैव प्रजेची काळजी वाहतो. लोकांना कुमार्गापासून परावृत्त करून, त्यांचीं भांडणें तोडून व रक्षण करून तो आपलें कर्तव्य उत्तम रीतीने पाळीत आहे असें दिसतें. माझ्या प्रजेंत कोणाचा संबंधी मृत झाल्यास दुष्कृत्यांखेरीज इतर बाबतींत त्याच्या ठिकाणीं मला मानावें अशी तो दवंडी पिटवितो. त्याला संपत्तीचा मुळीच लोभ नाही हें सांगणें नकोच. जलमार्गाने व्यापार करणारा श्रीमंत व्यापारी मृत झाल्यावर तत्कालीन कायद्याप्रमाणें त्याची सर्व मिळकत मिळत होती तरी न स्वीकारतां तो त्याच्या गर्भस्थ अपत्यास ती देऊन टाकतो. कालिदासाच्या नाटकांतील इतर नायकांप्रमाणें दुष्यन्तही बहुपत्नीक आहे. त्याच्या अन्तःपुरांत अनेक स्त्रिया असल्याने एकीवर प्रेम केलें की दुसरीला वैषम्य वाटणारच ! तेव्हा आपल्याकडे दुर्लक्ष केल्याबद्दल हंसपदिका त्याला टोमणा मारते यांत आश्चर्य

नाही. तथापि दिसेल त्या सुंदर स्त्रीवर आपक होण्याइतका तो मधुकरवृत्तीचा नाही. नाही तर शकुंतलेसारखी अत्यंत सुस्वरूप स्त्री चालून आली असतां त्याने जास्त खोलांत न जातां तिचा स्वीकार केला असता. परस्त्रीकडे निरखून पाहणें अयोग्य असें म्हणून तो प्रथम तिच्याकडे नीट पाहतही नाही. कण्वाश्रमांत गेल्यावर त्याला सुंदर कन्यका दिसतात व त्यांतही सौंदर्याची पुतळी अशी शकुंतला त्याचें मन आकृष्ट करते. प्रथम ही ब्राह्मणकन्यका असेल काय असा त्याला संशय येतो. तसें शेवटीं ठरतें तर इन्द्रियनिग्रह करून त्याने आपलें मन परावृत्त केलें असतें यांत संशय नाही. पण स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला विचारतां ती स्वतःला विवाह्य असावी असें त्याला वाटतें. शकुंतला व तिच्या सख्या यांच्या भाषणावरून त्याच्या अनुमानाला बळकटी येते व त्यांनी शकुंतलेचा जन्मवृत्तांत सांगितल्यावर तर मुळीच संशय राहत नाही. शकुंतलेचीही आपल्यासारखीच अवस्था झाली आहे असें पाहून त्याचा मदनविकार वाढत जातो. कण्व लौकरच परत येण्यासारखा असता तर तोंपर्यन्त त्याने अवश्य इन्द्रियनिग्रह केला असता. पण तिकडे शकुन्तलेची अतिशय वाईट अवस्था झाली होती. 'त्या राजर्षीकडून लौकर माझा स्वीकार झाला नाही तर मला तिलोदक द्यावयास तयार व्हा,' असे तिचे निर्वाणीचे उद्गार त्याने ऐकले होते. तेव्हा तिच्या सख्यांनी तिचा स्वीकार करण्याविषयीं विनंती केल्यावर तो ती आनंदाने मान्य करतो यांत आश्चर्य नाही.

'कण्वाश्रमरूपी स्वर्गांत लपून छपून पापाने प्रवेश केला त्याबरोबर कीटदष्ट कुसुमाप्रमाणें तेथील दिव्य सौंदर्य विशीर्ण व नष्ट होऊन गेलें. यानंतर लज्जा, संशय, दुःख, वियोग व पश्चात्ताप हीं आलीं. अखेरीस विशुद्धतर व उन्नततर अशा स्वर्गलोकांत क्षमा, प्रीति व शान्ति हीं दृग्गोचर होऊं लागलीं. 'शाकुन्तला'स Paradise Lost प्रमाणें Paradise Regained ही म्हणतां येईल.' असें डॉ. रवींद्रनाथ टागोरांनी 'शाकुन्तला'चें सार काढलें आहे. यांत दुष्यन्ताला स्वर्गांत चोरून प्रवेश करणाऱ्या पापाची आणि कुसुमाचा नाश करणाऱ्या किडयाची अशा दोन उपमा दिल्या आहेत. हया उपमा कालिदासाच्या दुष्यंतापेक्षा महाभारतांतील दुष्यंतालाच लागू पडतात. दुर्वासाच्या शापामुळें दुष्यंताला भूल पडली व म्हणून त्याने

शकुंतलेचा त्याग केला असें दाखवून कालिदासाने आपल्या नायकास या बाबतींत दोषमुक्त केलें आहे. सातव्या अंकांत मारीच ऋषीनी शापवृत्तान्त सांगितल्यावर राजा 'सुदैवाने मी या दोषांतून मुक्त झालों,' असें म्हणून समाधानाचा सुस्कारा टाकतो त्यावरूनही वरील विधान कविसंमत आहे हें दिसून येईल.

कालिदासाचा दुष्यन्त मनाचा अत्यंत कोमल आहे. निरपराधी पत्नीचा आपण त्याग केला ही गोष्ट त्याच्या मनाला लागून राहते. पश्चात्तापाने तो इतका वाळून जातो की शकुंतलाही प्रथम त्याला ओळखत नाही. तिची गाठ पडल्यावर महाभारतांतील दुष्यन्ताप्रमाणें 'तूं मला दुरुत्तरें बोललीस त्याबद्दल मी तुला क्षमा करतों,' असें तो आढ्यतेने म्हणत नाही, इतकेंच नव्हे तर तिच्या पायां पडून प्रांजलपणें तिची माफी मागतो. मातृभक्ति व पुत्रप्रेम या त्याच्या स्वभावांतील इतर कोमल छटाही कवीनें प्रसंगाने दाखविल्या आहेत. सारांश, पराक्रमी, विनयशील, धार्मिक, प्रेमळ व कर्तव्यतत्पर अशा या धीरोदात्त नायकाचें चित्र काढून कालिदासाने आपल्यापुढे आदर्श पुरुष उभा केला आहे.

ह्या नाटकांत नायिकेच्याही स्वभावाचा परिपोष उत्तम प्रकारें झाला आहे. नाटकाच्या आरंभीं शकुंतला ही लतावृक्षांवर स्वतःच्या भावंडांप्रमाणें प्रेम करणारी, आरंभापासून त्यांची काळजी घेऊन, त्यांना नांवें देऊन, वाढल्यावर त्यांचा विवाह करण्यांत आनंद मानणारी, स्वतःही यौवनाने मुसमुसल्यामुळें प्रियसख्यांच्या विवाहविषयक परिहासाचा विषय होणारी अशी एक मुग्धा तरुणी दिसते. तिचेंच शेवटल्या अंकांत पतिवियोगामुळें मलिन वस्त्रें व एक पेडाची वेणी धारण करणाऱ्या व व्रतोपासादिकांनी शरीर शोषविणाऱ्या पतिव्रता व अपत्यवत्सल अशा प्रौढ स्त्रींत रूपांतर झालेलें दृष्टीस पडतें. प्रातःकाळीं सृष्टिसतीने दंवबिंदूंनी न्हाऊं घातलेल्या कोमल कलिकेचा हळूहळू सुंदर पुष्पांत विकास होऊन सूर्याच्या प्रखर तापाने सायंकाळीं तें सुकूनही जावें तसें शकुंतलेच्या स्वभावांतील हें परिवर्तन आपल्या डोळ्यांसमोर घडून येतें, यांतच कालिदासाच्या कलेचा परमोत्कर्ष दिसून येतो. लहानपणींच तिला मातापितरांनी टाकलें

तरी कण्व व गौतमी यांनी आपल्या प्रेमाची पांखर तिजवर घालून तिला कोणत्याही बाबतींत कमी पडू दिलें नाही. सुदैवाने तिला प्रियंवदा व अनसूया या समवयस्क व प्रेमळ सख्या लाभल्या. त्यांच्या सहवासांत तिला लेखन, वाचन, काव्य, इतिहास इत्यादि विषयांबरोबर चित्रकले-सारख्या ललितकलांचेंही शिक्षण मिळालेलें दिसतें. आश्रमांतील लतावृक्ष व पशुपक्षी यांच्या सानिध्यात वाढल्यामुळें तिचें त्याच्यावर व त्याचेंही तिच्यावर निस्सीम प्रेम होतें. 'शकुंतले, तुझ्यापेक्षा कण्व-बाबांना आश्रमातील वृक्ष जास्त प्रिय आहेत असें मला वाटतें. कारण तूं नवमालिकेसारखी कोमल असताही त्यांनी तुला वृक्षांना पाणी घालण्यास लावलें आहे,' असे अनसूयेने थट्टेने म्हणतांच ती उत्तर करते, 'बाबांनी सांगितलें म्हणूनच मी यांना पाणी घालतें असें नाही. माझें यांच्यावर सख्ख्या भावडाप्रमाणें प्रेम आहे.' या प्रेमामुळेंच स्वभूषणांकरितां त्यांची पाने खुडणें तिच्या जिवावर येई. त्यांना प्रथम बहर येई तेव्हा ती उत्सव करी. पतिगृहीं जाताना वनज्योत्स्ना नामक लता-भगिनीला प्रेमाचें आलिंगन देण्यास ती विसरली नाही. आश्रमांतील पशुपक्ष्यांवरही तिचे तितकेंच प्रेम होतें. 'गर्भिणी असल्यामुळें पर्णकुटिकेच्या आसपास मन्द मन्द चालणारी हरिणी प्रसूत होईल, तेव्हा तो आनंदाची बातमी मला कळविण्याकरितां कोणाला तरी पाठवा.' असें ती कण्वऋषींस सांगते. लहाणपणीच आपल्याप्रमाणें पोरका झालेल्या हरिणबालकाचें तिने मातृवत् पालन केलेलें, तेव्हा आश्रमांतून निघतांना तो तिचें वस्त्र ओढतो त्या वेळीं तिला साहजिकच गहिवर येतो. अशा प्रेमळ शकुंतलेवर तपोवनांतील चराचर सृष्टीही प्रेम करते यांत आश्चर्य नाही. तिच्या जिवाभावाच्या मैत्रिणी अनसूया व प्रियंवदा यांस सोडून जातांना तिला झालेल्या दुःखाची कल्पनाही करवत नाही. कण्वऋषि तर तिचा अत्यत वत्सल पिता. त्याच्या अंकावर ती लहानपणापासून खेळलेली. 'मलयपर्वतावरून काढलेल्या चन्दनलतेप्रमाणें बाबांच्या अंकापासून परिभ्रष्ट झालेली मी दुसऱ्या ठिकाणीं कशी जिवंत राहूं शकेन ?' असें ती विचारते. निघण्याला उशीर होत होता, शाङ्गरव पुढे चलण्याची सूचना देत होता; तरी 'बाबा मला पुनः कधी हें

तपोवन दिसेल कांहो !' असें ती विचारीत राहते. 'बाळे अनुष्ठानाची वेळ होऊन गेली,' असें कण्वाने म्हणतांच तपश्चर्येने आधीच कृश झालेल्या आपल्या पित्याला आपल्या वियोगाचें दुःख सहन करवणार नाही असें तिच्या लक्षात येते. तेव्हा 'बाबा तुम्ही तपश्चर्येने कृश झालां आहां, माझ्याकरितां फार वाईट वाटून घेऊं नका,' असें ती त्यांस विनविते.

राजाला पाहतांच शकुतलेच्या मनांत पूर्वी अननुभूत असा प्रेम-विकार उत्पन्न होतो. त्याची धीरगंभीर आकृति, मधुर भाषण व असामान्य पराक्रम यांनी तिचें हृदय आकर्षित होतें. ती कामवश झाली होती तरी स्वाभाविक शालीनतेने आपला प्रेमविकार सख्यांजवळ सुद्धा बोलून दाख-वीत नाही. राजाशी बोलणें तर राहोच, पण त्याच्यासमोर ती उभीही राहत नाही. विदूषकाने विचारल्यावरून शकुतला आपल्यासमोर कशी आगली याचे राजाने पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे—

अभिमुखे मयि संहृतमीक्षितं हसितमन्यनिमित्तकृतोदयम्।
विनयवारितवृत्तिरतस्तया न विवृतो मदनो न च संवृतः॥

शाकु० २,११.

महाभारतांतील शकुन्तला आपली जन्मकथा सविस्तर वर्णन करते, राजाने भार्या होण्याविषयीं विनंती केल्यावर आपल्या अटी घालते व त्या कबूल झाल्यावर वश होते. राजाला पाहून ती कामवश झाल्याचें दिसत नाही. अशा धीट, व्यवहारदक्ष पण निष्प्रेम तरुणीचें कवीने आपल्या प्रतिभेने शालीन, मुग्ध व प्रेमपरवश बालिकेंत रूपांतर केलें आहे. कालिदासाची शकुन्तला मदनविकार अगदी असहय झाल्यावर व प्रेमळ सख्यानी अतिशय आग्रह केल्यावरच अनुराग व्यक्त करते. त्यांनी संमति दिली तरी वडि-लांच्या अनुज्ञेशिवाय राजाशीं समागम करण्याचे तिच्या मनांत येत नाही. क्षत्रियांना गांधर्वविवाह विहित आहे, तेव्हा तुझे वडील रागावणार नाहीत, अशी राजाने खात्री केल्यावरच ती त्याच्या म्हणण्यास कबूल होते. शेव-टल्या अंकांत ओळख पटल्यावर 'पुत्राचा हात धर, तुझ्यासह भगवान् मारीच ऋषींच्या दर्शनास जाण्याची माझी इच्छा आहे,' असें राजा म्हणतो, तेव्हा 'आपल्याबरोबर गुरुजनांसमोर जाण्याची मला लाज वाटते,' असें ती म्हणते. यासारख्या प्रसंगानी तिची विनयशीलता कवीने दाखविली आहे.

शकुंतलेचा स्वभाव अत्यंत सरळ किंबहुना भोळा आहे. पांचव्या अंकांत शापाने स्मृतिविभ्रम झालेल्या राजाला ओळख पटविण्याचे सर्व उपाय हरले. अंगठीही आयत्या वेळीं कोठे दिसेना, तेव्हा "मी वाढविलेला दीर्घापाङ्ग नामक हरिण आपल्या हातून पाणी पिईना, नंतर मी तेंच पाणी त्याला दाखविलें तेव्हा तो प्याला. त्यावेळीं आपण हंसून म्हणालां 'प्रत्येकाचा स्वजातीयांवर विश्वास असतो, दोघेही तुम्ही अरण्यवासी!" हो घडलेली गोष्ट सांगून ती त्याची खात्री करण्याचा प्रयत्न करते. याने का त्याची खात्री होणार! पण भोळ्या शकुंतलेला तेंही शक्य वाटतें! अशा ऋजुस्वभावी व प्रेमळ शकुंतलेवर प्रत्यादेशाचा वज्राघात होतो. गौतमी व शाङ्गरव यांनी परोपरीने सांगितलें तरी तें राजाला पटत नाही. म्हणून 'तूंच त्याची खात्री कर' असें शारद्वत तिला सांगतो. तेव्हा 'आर्यपुत्रा' असें त्याला उद्देशून ती पुढे बोलणार तोंच पतिपत्नीचें नातें राजा कबूल करीत नसल्याने या नांवाने त्याला संबोधणें योग्य नाही असें तिच्या लक्षांत येतें. म्हणून 'पौरवा' अशा साध्या नांवानेच ती त्याला हाक मारते. त्याची खात्री करण्याच्या प्रयत्नांत तिला यश येत नाही. उलट कोकिळेचा दृष्टांत देऊन स्त्रिया जात्याच लबाड असतात असें तो म्हणतो. त्याच्या भाषणांतील द्व्यर्थी शब्दांच्या प्रयोगावरून तो आपल्या मातेचीच निंदा करीत आहे असें शकुंतलेला वाटतें. तेव्हा तिचा संताप अनावर होतो व ती त्याला 'अनार्या!' असें संबोधून त्याच्या ढोंगीपणाबद्दल टाकून बोलते.

सीतेप्रमाणेंच शकुंतलाही महान् पतिव्रता आहे. नवऱ्याने कांही कारण नसतां टाकली असतांही ती सदैव त्याचें चिंतन करते व विरही स्त्रियांना विहित अशा रीतीने दिवस कंठते. सानुमतीच्या सांगण्यावरून राजाला पश्चात्ताप झाला आहे असें तिला कळतें व अदितीच्या आश्वासनावरून कांही काळाने पति आपला स्वीकार करील अशी तिला आशाही वाटते. त्या आशेवर ती अवलंबून राहते. शेवटीं राजाची भेट होते तेव्हा ती आपल्या प्रत्यादेशाबद्दल त्याच्यावर रागावत तर नाहीच; उलट तो पश्चात्तापाने स्वतःस दूषण देऊं लागला असतां 'माझ्या कृतकर्मामुळेंच एरव्ही दयार्द्र असणारे आपण माझ्या बाबतींत निष्ठुर झालां,' असें

बोलून त्याचें समाधान करते. सारांश कवीने शकुंतलेच्या रूपाने ऋजुस्वभावी, गुणी व कर्तव्यनिष्ठ अशा आदर्श हिंदुगृहिणीचें चित्र रेखाटलें आहे.

नायक व नायिका यांच्या स्वभावाचें शब्दचित्र काढण्यांत कालिदासाने आपलें शक्तिसर्वस्व खर्च केलें असलें तरी इतर पात्रेंही त्यानें थोडक्यांत पण मोठ्या कुशलतेने रंगविलीं आहेत. साम्यविरोधांनी परस्परांच्या स्वभावाचा उठाव व्हावा म्हणून त्याने कांही पात्रांच्या जोड्या योजिल्या आहेत. दुर्वास–कण्व, प्रियंवदा–अनसूया, शाङ्गरव–शारद्वत यांच्या स्वभावांचें प्रथक्करण केल्यास ही गोष्ट स्पष्ट होईल. दुर्वास हा अतिशय मानी, कोपिष्ठ व निष्ठुर ऋषि दिसतो. नुकत्याच परत गेलेल्या पतीच्या वियोगाने शून्यहृदय होऊन शकुंतला तच्चिन्तनांत मग्न झाली आहे असें त्याला दिव्य दृष्टीने दिसतें. तथापि हिने माझा अपमान केला अशी त्याची समजूत होऊन तो तिला पतिवियोगाचा दारुण शाप देतो. किती लहान अपराध व केवढी भयंकर शिक्षा !

दुर्वासाप्रमाणेंच कण्वही तपोनिष्ठ, महाप्रभावी व अन्तर्ज्ञानी आहे पण इतर बाबतींत याचें त्याच्याशीं अत्यंत वैषम्य आहे. दुर्वास कोपिष्ठ तर हा शांत, तो निष्ठुर तर हा अत्यंत मृदुहृदय व प्रेमळ. शकुंतला ही त्याला यदृच्छेने वनांत सांपडलेली मुलगी. तथापि त्याने स्वतःच्या मुली-प्रमाणें तिचें संगोपन करून तिला विविध प्रकारचें शिक्षण दिलें. 'शकुतला म्हणजे आमच्या कुलपतींचा जीव कीं प्राण' ['सा कुलपतेरच्छ्वसितमिव।'] असें त्याचा शिष्य म्हणतो तें खोटें नाही. तिच्या दैवाची शांति करण्या-करितां तो अतिशय लांबचा प्रवास करतो. आपल्या पश्चात् तिने विवाह केला याबद्दल तिच्यावर रागावत तर नाहीच, उलट दुष्यन्तासारखा गुणी मनुष्य आपल्या डोळ्यासमोर असतां त्यास शकुन्तला देण्याचें आपणांस कसें सुचलें नाही याचें त्याला आश्चर्य वाटतें व सुदैवानें तिने योग्य पतीची निवड केली याबद्दल त्याला आनंद होतो. हा आपला आशय त्याने 'दिष्ट्या धूमाकुलितदृष्टेरपि यजमानस्य पावक एवाहुतिः पतिता' या दृष्टान्ताने व्यक्त केला आहे. ती सासरीं जाऊं लागली असतां त्याचें हृदय दुःखाने भरून येतें, कण्ठ दाटन येतो, नेत्रांत अश्रु उभे राहतात. या प्रसंगीं माझ्यासारख्या अरण्यवासी मनुष्याची कन्याप्रेमाने जर अशी अवस्था

होते तर सांसारिक जनांची काय अवस्था होत असेल बरें, असें तो स्वतःलाच विचारतो. तो सदैव अरण्यांत राहत असला तरी त्याला व्यवहाराचें उत्तम ज्ञान आहे. शकुन्तलेने सासरीं कसें वागावें याविषयी त्याने केलेला उपदेश बहुमोल आहे. 'बाबा माझ्यासाठी शोक करूं नका,' असें शकुतलेने विनवितांच तो म्हणतो, 'तुझ्या प्रेमाचीं चिन्हें इतस्ततः दिसत असतां माझा शोक कसा बरें शांत होईल?' तथापि ती निघून गेल्यावर 'कन्या हें परक्याचें धन! तें मी आज ज्याचें त्यास परत केलें,' असा विवेक करून तो आपलें दुःख गिळून टाकतो. कण्वाच्या रूपाने कालिदासाने प्रेमळ पित्याचें हृदयस्पर्शी चित्र काढलें आहे.

तिसरा ऋषि मारीच हा दिव्यकोटींतील आहे. त्याच्या आश्रमांत स्वर्गांतील सर्व सुखसाधनें आहेत. पण त्यांमध्यें रममाण न होतां तेथील ऋषि तपश्चर्या करीत असतात. तेथे जातांच 'हें स्वर्गापेक्षा अधिक आनंदाचें स्थान' असे दुष्यन्त उद्गार काढतो. मारीच ऋषि हा इन्द्रादि देवांचा पिता. भगवान् विष्णूनेही वामनावतारी त्याचा पुत्र होऊन त्याच्यावर अनुग्रह केलेला. तो स्वतः आप्तकाम झाला तरी सदैव लोकहिताकरितां तपश्चर्येंत मग्न असतो. याच्या आश्रमांत शकुन्तलेला आश्रय मिळाला. याच्या पतिव्रताधर्माच्या विवरणाने शकुन्तलेला मानसिक शान्ति लाभली. ती प्रसूत झाली तेव्हा यानेच तिच्या मुलाचे जातकर्मादि संस्कार केले. अशा ज्ञाननिष्ठ व लोकहितैषी महात्म्याच्या आशीर्वादाने नाटकाची समाप्ति करण्यांत कवीने मोठें औचित्य दाखविलें आहे.

प्रियंवदा व अनसूया या दोन्ही शकुंतलेच्या अत्यंत प्रेमळ मैत्रिणी. दोघीही तिच्यासारख्याच विविधकलांत निष्णात. दोघीचेंही शकुंतलेवर निरतिशय प्रेम. तथापि त्यांच्या स्वभावांत पुष्कळ फरक आहे. अनसूया ही गंभीर, विवेकी, दूरदर्शी व व्यवहारज्ञ, तर प्रियंवदा स्वतःच्या नांवाप्रमाणेंच मधुर भाषण करणारी, सदैव आनंदी व विनोदी आहे. राजाचें स्वागत करण्यांत, शकुंतलेचा जन्मवृत्तांत सांगण्यांत व शेवटीं तिला चांगल्या रीतीने वागवावें अशी दुष्यन्ताला विनंती करण्यांत अनसूया पुढाकार घेते. तिचा गंभीर स्वभाव पाहून कण्व नेहेमी तिलाच उद्देशून बोलतो. याच्या उलट प्रियंवदेचा स्वभाव. शकुन्तलेची ती नेहेमी थट्टा

करीत असते. 'प्रियंवदेने माझें वल्कल घट्ट बांधलें आहे तें जरा सैल कर' असें शकुन्तलेने अनसूयेला सांगतांच ती म्हणते, 'आपले स्तन विशाल करणाऱ्या यौवनाला दोष दे! मला कां देतेस?' शकुन्तला बकुल वृक्षाजवळ उभी आहे असें पाहून प्रियंवदा तिला म्हणते, 'शकुतले! थोडा वेळ तेथेच रहा. तू जवळ असलीस की या लहानशा केसर वृक्षाशी लतेचा संयोग झाला आहे असें वाटतें.' शकुन्तलेलाही हें भाषण इतके आवडतें की 'म्हणूनच तुला प्रियंवदा म्हणतात!' असें ती म्हणते. दुर्वासासारखा निष्ठुर ऋषि शाप देऊन त्वरित गतीने जाऊं लागला असतां प्रियंवदाचे पुढे जाऊन आपल्या मधुर वाणीने त्याच्या मनांत शकुन्तलेविषयी किंचित् अनुकंपा उत्पन्न करते. ती सासरीं जाऊं लागली असतां दोघींनाही अतिशय दुःख होतें; तथापि आम्ही आपलें दुःख कसेंही करून विसरू, त्या बिचारीला सुख होवो अशा विचाराने त्या तिच्या भूषणादिकांची तयारी करतात. जातांना शकुन्तला आपली लाडकी वनज्योत्स्ना नामक लता ठेव म्हणून त्यांच्या स्वाधीन करते तेव्हा 'आम्हाला कोणाच्या स्वाधीन करतेस?' असें म्हणून त्या अश्रु गाळतात. शकुन्तला गेल्यावर तिच्यावरील प्रेमामुळें त्यांना तपोवन शून्यवत् भासतें. अशा निरागस व प्रेमळ मैत्रिणीची जोडी सबंध संस्कृत वाङ्मयांत आढळत नाही.

'शाकुन्तलां'तील माढव्य नामक विदूषक अगदीच सांगकाम्या आहे. 'विक्रमोर्वशीयां'तील माणवक भोळसटपणाने राजाच्या रहस्याचा स्फोट करतो तर हा माढव्य राजाने सांगितलेलें सर्व खरें मानून तोंडाला कुलूप घालतो. एक बोलून तर दुसरा न बोलून घाण करतो. बाकी इतर बाबतींत—आधाशीपणांत व विनोदी भाषणांत—दोघेही सारखेच! शार्ङ्गरव व शारद्वत या दोघां ऋषिकुमारांच्या स्वभावांतही भेद आहे. शार्ङ्गरव तापट व स्पष्टवक्ता आहे. शकुंतलेबरोबर पाठविलेल्या मंडळीत तोच मुख्य आहे. तो प्रथम कण्वसंदेश राजाला कळवून शकुंतलेचा स्वीकार करण्याविषयी विनंती करतो. राजा एकदम स्वीकार करीत नाही असें पाहून तो युक्तिवादाने त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न करतो, तरीही राजा ऐकत नाही असें पाहून संतप्त होऊन तो त्याला ऐश्वर्योन्मत्त

म्हणण्यास व त्याची चोराशीं तुलना करण्यास अनमान करीत नाही. याचें व राजाचें भांडण उत्तरोत्तर वाढत जातें असें पाहून शारद्वत मध्यें पडतो व 'आपण गुरूंचा संदेश कळविला आहे; आतां परत जाऊं या' असें सुचवितो. तो स्वभावाने जास्त सौम्य व विवेकी दिसतो.

शकुन्तलेच्या मातृस्थानी असलेली गौतमी, सिंहशावकाला त्याच्या मातेपासून काढून घेऊन त्याचे दांत मोजणारा निर्भय सर्वदमन, धन्याची मर्जी पाहून वागणारा सेनापति, गरीब पण स्वाभिमानी धीवर, सिद्ध-साधक बनून प्रथम अपराध्यास तंबी देणारे, पण त्याच्याजवळ पैसे दिसतांच दारूच्या आशेने घटकेंत पगडी फिरविणारे पोलिस शिपाई व त्यांचा अधिकारी, यांचीं चित्रेंही मनोवेधक उतरली आहेत. त्यांच्या-सारखीं माणसें आपल्या नेहेमीच्या व्यवहारांत दिसतात त्यावरून कालि-दासाच्या मार्मिक निरीक्षणाचें कौतुक वाटतें.

प्रकरण सातवें

कालिदासीय ग्रंथांचे विशेष

निर्गतासु न वा कस्य कालिदासस्य सूक्तिषु।
प्रीतिर्मधुरसान्द्रासु मञ्जरीष्विव जायते।

बाण–हर्षचरित.

मम्मटाने आपल्या 'काव्यप्रकाशां'त यशःप्राप्ति हें काव्यनिर्मितीचें प्रमुख प्रयोजन सांगितलें आहे व त्याच्या उदाहरणार्थ कालिदासाचा प्रामु-ख्याने उल्लेख केला आहे. 'ध्वन्यालोक' हा साहित्यशास्त्रावरील सर्वमान्य ग्रंथ लिहिणारा मार्मिक व सहृदय टीकाकार आनंदवर्धन याने एके ठिकाणीं 'अस्मिन्नतिविचित्रकविपरम्परावाहिनि संसारे कालिदासप्रभृतयो द्वित्राः पञ्चषा वा महाकवयः इति गण्यन्ते' [या जगतांत विविध प्रकारचे कवि उत्पन्न होत असले तरी त्यांपैकी कालिदासासारख्या दोघांतिघांना फार तर पांच–सहांनाच महाकवि ही पदवी देतां येईल] 'असें म्हटलें आहे. जयदेव

कवीने कालिदासाला 'कविकुलगुरु' ही अत्यंत श्रेष्ठ पदवी अर्पण केली आहे. एका सुभाषितकाराने तर 'पुरा कवीनां गणनाप्रसंगे कनिष्ठिकाऽधिष्ठितकालिदासा। अद्यापि तत्तुल्यकवेरभावादनामिका सार्थवती बभूव॥' [पूर्वी हाताच्या बोटावर कवीची गणना करण्याचा प्रसंग आला असतां कालिदासाच्या नावाने करगळी घातली; पण त्याच्या तोडीचा कवि त्या वेळी उत्पन्न झाला नसल्याने तिच्या जवळच्या बोटाला अनामिका म्हणूं लागले. अद्यापि तीच स्थिति असल्यामुळे त्या बोटाचें तें नांव सार्थ झालें आहे.] असें म्हणून कालिदासाचें अनन्यसामान्य स्थान दर्शविलें आहे. अर्वाचीन पाश्चात्य पंडितांनीही 'कालिदास हाच हिंदुस्थानचा शेक्सपीयर' इत्यादि वचनांनी त्याची मुक्तकंठाने स्तुति केली आहे व जगाच्या सर्वश्रेष्ठ कवींच्या मालिकेत त्याचें नांव गोविलें आहे. कालिदासाने प्राचीन व अर्वाचीन, पौरस्त्य व पाश्चात्य विद्वानांवर जी ही मोहनी घातली तिचें बीज कशांत आहे याचा आपणास या प्रकरणांत विचार करावयाचा आहे.

उत्कृष्ट काव्य वाचलें असतां प्रत्येक सहृदय वाचकास आनंद होतो, पण तो कां व कसा झाला यांचें विवेचन मात्र त्याला करतां येत नाही. एका कवीने म्हटल्याप्रमाणें 'घृतक्षीरद्राक्षामधुमधुरिमा कैरपि पदैर्विशिष्यानाख्येयो भवति रसनामात्रविषयः।' [तूप, दूध, द्राक्षें, मध यांची गोडी सर्वांच्या जिव्हेला तेवढी कळते पण ती कोणत्याही शब्दांनी वर्णन करतां येत नाही.] केवळ सामान्य वाचकांनाच' या बाबतींत आपलें दौर्बल्य जाणवतें असें मात्र नव्हे. प्राचीन काळापासून आजपर्यंत अनेक साहित्यकोविदांनी काव्यघटकांची छाननी करून काव्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे; पण कोणतेंही लक्षण अद्यापि सर्वसंमत झालें नाही. आपल्या भरतखंडांतही भरतादि अनेक साहित्यशास्त्रज्ञांनी काव्याच्या व्याख्या केल्या आहेत; पण त्यांच्यामध्येंही अत्यंत मतवैचित्र्य दृष्टीस पडतें. 'ध्वन्यालोक'कार आनंदवर्धन ध्वनि किंवा व्यंग्यार्थ याला प्राधान्य देऊन तो काव्याचा आत्मा असें म्हणतो, तर 'साहित्यदर्पण'कार विश्वनाथ 'वाक्य रसात्मकं काव्यम्' असें काव्याचें लक्षण करून रसाला श्रेष्ठ ठरवितो.

'काव्यालङ्कारसूत्रवृत्ति'कार वामन याने रीति किंवा विशिष्ट पदरचना हिलाच काव्याचा आत्मा मानलें आहे. याच्या उलट भामहादि आलंकारिक अलंकारांसच महत्त्व देतात. याशिवाय कुन्तकादि इतर ग्रंथकारांनीही आपापल्या मतांचा आग्रहाने पुरस्कार केला आहे. तथापि ध्वनि, रस, रीति व अलंकार हे या विषयांतील चार प्रमुख पक्ष होत. यांपैकी कोणता पक्ष सयुक्तिक आहे याचें येथे विवेचन करणें शक्य नाही. तथापि यांपैकी कोणताही पक्ष घेतला तरी कालिदासाचे ग्रंथ काव्यलक्षणाच्या कसोटीला पूर्णपणें उतरतात हें दाखवितां येईल.

१. **ध्वनि.** उत्कृष्ट काव्यांत शब्दांचा वरवर दिसणार वाच्यार्थ व क्वचित् तो गैरलागू झाल्यामुळें ध्यानांत येणारा लक्ष्यार्थ याव्यतिरिक्त ध्वनि किंवा व्यङ्ग्यार्थ हा एक निराळाच सहृदयहृदयाह्लादक असा अर्थ विवक्षित असतो व त्यामुळेंच त्याला रमणीयत्व येतें, असें मत प्रथम आनन्दवर्धनाने आपल्या 'ध्वन्यालोकां'त सविस्तर प्रतिपादिलें व त्याचा पुढे मम्मटादि साहित्यशास्त्रज्ञांनी पुरस्कार केला. ज्या काव्यांत वाच्यार्थापेक्षा व्यंग्यार्थ जास्त मनोहर असेल तें उत्कृष्ट काव्य, ज्यांत तो वाच्यार्थाइतकाच किंवा कमी प्रतीचा असेल तें मध्यम काव्य व ज्यांत व्यंग्यार्थ मुळीच नसून किंवा अत्यंत अस्पष्ट व दुर्बोध असून अलंकारादिकांवरच जास्त भर दिला असेल तें अधम काव्य, अशी काव्याची वर्गवारीही या ग्रंथकारांनी लाविली आहे. या दृष्टीने पाहतां कालिदासाचीं काव्यें उत्कृष्ट प्रतीचीं ठरतील यांत संशय नाही. कोणताही भाव स्पष्ट शब्दांनी न सांगतां खुबीने सूचित करण्यांत कालिदासाचा हातखंडा आहे. उदाहरणार्थ, हिमालयाजवळ अंगिरा ऋषीने श्रीशंकरांकरितां पार्वतीची मागणी केली असतां जवळच बसलेल्या पार्वतीचें कालिदासाने 'कुमारसंभवां'त केलेलें वर्णन पहा—

> एववादिनि देवर्षौ पार्श्वे पितुरधोमुखी।
> लीलाकमलपत्राणि गणयामास पार्वती॥ कुमार० ६,८४

'याप्रमाणें देवर्षि बोलत असतां पित्याजवळ मान खाली घालून बसलेली पार्वती (हातांतल्या) लीलाकमलाचीं पानें मोजीत होती.' या श्लोकांत एकही अलंकार नाही, तथापि त्यांतील कमलपत्रगणनाच्या वर्णनाने पार्व-

तीची लज्जा, आपल्या मनांतील प्रेम व आनंद हीं बाहेर दिसूं नयेत म्हणून तिने केलेला प्रयत्न ही उत्कृष्ट रीतीने सूचित झालीं आहेत. हा श्लोक उत्कृष्ट काव्याचें उदाहरण म्हणन साहित्यशास्त्रज्ञांनी उदाहृत केला आहे दुसरें मेघदूतांतील गंगेचें वर्णन घ्या—

तस्माद्गच्छेरनुकनखलं शैलराजावतीर्णा
जह्नोः कन्यां सगरतनयस्वर्गसोपानपङ्क्तिम्।
गौरीवक्त्रभ्रुकुटिरचनां या विहस्येव फेनैः
शम्भोः केशग्रहणमकरोदिन्दुलग्नोर्मिहस्ता ॥ मेघ० ५२.

'नंतर कनखलगिरीजवळ हिमालयावरून खाली पडणाऱ्या व सगरपुत्रांना स्वर्गारोहण करण्याकरितां सोपानपंक्ति झालेल्या जह्नुकन्ये (भागीरथी)-कडे तूं जा. तिने पार्वतीच्या कपाळावरील आठ्या पाहून जणूं काय फेनरूपी हास्य करीत चन्द्रापर्यंत आपले तरंगरूपी हात उंच करून श्रीशंकरांचें केशग्रहण केलें आहे.'

या श्लोकांत रूपक, उत्प्रेक्षा, समासोक्ति इत्यादि अलंकारांची गर्दी झाली आहे. तथापि सगरपुत्रांना स्वर्गप्राप्तीचें साधन झाल्यामुळें गंगेची पवित्रता व पार्वतीच्या मत्सरास न जुमानतां श्रीशंकरांनी तिला आपल्या शिरावर स्थान दिलें आहे त्यामुळें तिचें महत्त्वही सूचित झाल्यामुळेंच त्याला हृद्यता आली आहे. कालिदासाने योजिलेलें प्रत्येक पद किंबहुना लिंग, विभक्ति, वचन इत्यादि त्याचे अवयवही कसे रमणीयार्थ-व्यंजक असतात हें आनंदवर्धन, मम्मट इत्यादिकांनी अनेक उदाहरणांनी दाखविलें आहे. विस्तारभयास्तव तीं उदाहरणें येथे देतां येत नाहीत.

भवभूति, बाण इत्यादि इतर कवि व कालिदास यांच्या ग्रंथांत सकृद्दर्शनींच एक मोठा फरक साधारण वाचकांच्याही ध्यानांत येतो, त्याचा येथे उल्लेख करणें जरूर आहे. एखादी रम्य कल्पना मनांत आली की हे इतर कवि तिचें पाल्हाळीक वर्णन करीत सुटतात, पण कालिदास मोजक्या शब्दांनी तिचें रेखाचित्र काढून त्यांत रंग भरण्याचें काम वाचकांच्या सहृदयतेवर सोपवून देतो. त्यामुळें कालिदासाचीं काव्यें 'क्षणे क्षणे यन्नवतामुपैति' या रमणीयतेच्या कसोटीस पूर्णपणें उतरतात व

तीं वाचतांना केव्हाही कंटाळा येत नाही. उदाहरणार्थ, मदनदाहानंतर वसन्ताला पाहून रतीचें दुःख दुणावलें हा अर्थ व्यक्त करण्याकरितां कालिदासाने 'स्वजनस्य हि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते' या पंक्तींत 'विवृतद्वारमिव' हया चिमुकल्या उत्प्रेक्षेने बांध काढून घेतल्यामुळें भो धो वहाणाऱ्या पाण्याप्रमाणें दुःखाचा अनावर होणारा ओघ सूचित केला आहे. पण तशाच एका प्रसंगीं भवभूतीने एक सबंध श्लोक खर्ची घालून तिला विविध अलंकारांनी नटविलें आहे—

सन्तानवाहीन्यपि मानुषाणां दुःखानि सद्बन्धुवियोगजानि।
दृष्टे जने प्रेयसि दुःसहानि स्रोतःसहस्रैरिव संप्लवन्ते॥

उत्तररामचरित्र ४, ८.

मागे 'मालविकाग्निमित्रा'चें संविधानक देतांना कवीने इरावतीच्या नृत्याचा प्रसंग अनावश्यक म्हणून कसा खुबीने टाळला आहे यांचें आम्ही विवेचन केलें आहे. यासारख्या प्रसंगांनी कवीचा संयम व कलाभिज्ञता हीं उत्कृष्ट रीतीने प्रत्ययास येतात.

२. रस. वर वर्णिलेल्या ध्वनीचेच विषयभेदाने वस्तुध्वनि, अलंकारध्वनि व रसध्वनि असे तीन भेद आलंकारिकांनी मानले आहेत. त्यांपैकी रसध्वनि हा सर्वांत श्रेष्ठ होय. व्यंग्यव्यंजकभाव अनेक प्रकारें संभवत असला तरी काव्य-नाटकादि प्रबंधांत रसालाच प्राधान्य देऊन तदनुगुण अलंकारादिकांची योजना करावी असें आनंदवर्धनानेही म्हटलें आहे. यामुळें रसपक्षाला महत्त्व येऊन विश्वनाथाने आपल्या 'साहित्यदर्पणां'त रस हाच काव्याचा आत्मा असें प्रतिपादिलें आहे. साहित्यशास्त्रांत शृंगार, वीर, करुण, हास्य, रौद्र, भयानक, बीभत्स, अद्भुत व शांत असे नऊ रस मानतात. यांपैकी संभोग व विप्रलंभ असा दोन्ही प्रकारचा शृंगार आणि करुण या रसांचा कालिदासाच्या काव्यांत उत्तम परिपोष झाला आहे. विशेषतः शृंगाररसांतील त्याचें नैपुण्य पाहून जयदेवाने त्याला 'कविताकामिनीचा विलास' अशी संज्ञा दिली आहे. एका सुभाषितकाराने तर शृंगाररसांत व ललितपदयोजनेंत त्याच्याहून वरचढ कवि अद्यापि झाला नाही असें म्हटलें आहे. कालिदासाचीं तीन्ही नाटकें व 'कुमारसंभव व 'मेघदूत' हीं काव्यें शृंगाररसप्रधान असल्याने त्यांत इतर रसांचा फारसा

परिपोष होण्यास अवकाश नाही. तथापि प्रसंगवशात् हास्य, करुण भयानक इत्यादि अन्य रसांच्या छटाही त्यांत आल्या आहेत. 'रघुवंशा'त मात्र शृंगाराप्रमाणेंच इतरही प्रमुख रसांचा परिपोष उत्तम रीतीनें झालेला आढळतो, हें मागें (पृ० १३७) दाखविलेंच आहे.

कोणत्याही रसाचा पूर्ण परिपोष हाण्याला विभावानुभावादि तद्-घटकांचें सम्यग्वर्णन करणें आवश्यक असते. त्यामुळे रसाची उदाहरण मूळ ग्रंथांतूनच वाचली पाहिजेत. तथापि याही बाबतींत कालिदासाचें कौशल्य दाखविण्याकरितां एकदोन उदाहरणें येथे दिलीं आहेत—

नूनं तस्याः प्रबलरुदितोच्छूननेत्रं बहूनां
निःश्वासानामशिशिरतया भिन्नवर्णाधरोष्ठम्।
हस्तन्यस्तं मुखमसकलव्यक्ति लम्बालकत्वा-
दिन्दोर्दैन्यं त्वदुपसरणक्लिष्टकान्तेर्बिभर्ति ॥ मेघ० ८५.

या श्लोकांत यक्षाने कल्पनेने आपल्या विरहिणी पत्नीचें सुंदर वर्णन केलें आहे. रात्रंदिवस अश्रु गाळीत राहिल्याने सुजलेले तिचे डोळे, उष्ण निःश्वासामुळें विवर्ण झालेला तिचा अधरोष्ठ, हातावर टेकलेलें व लांब सडक केसांनी झाकल्यामुळें अर्धवट दिसणारें तिचें मुख यांच्या वर्णनाने यक्षपत्नीचें विरहदुःख आणि विषाद, चिन्ता इत्यादि मनोविकार उत्कृष्ट रीतीने व्यञ्जित झाले आहेत. शेवटच्या पंक्तींतील निदर्शनेने तिच्या मुखाची निस्तेजता सुचविली आहे. एकंदर वर्णनाने वाचकांस विप्रलंभ-शृंगाराची उत्तम प्रतीति होते

ईषत्तु किञ्चित्परिलुप्तधैर्यश्चन्द्रोदयारम्भ इवाम्बुराशिः।
उमामुखे बिम्बफलाधरोष्ठे व्यापारयामास विलोचनानि ॥ कुमार० ३,६७

या 'कुमारसंभवां'तील श्लोकांत शंकराच्या मनांत आकस्मिकपणें उद्भूत होण्याऱ्या रतिभावाचें सुंदर वर्णन आलें आहे.

३. रीति—इ. स.च्या आठव्या शतकांत होऊन गेलेल्या वामनाने आपल्या 'काव्यालंकारसूत्रवृत्ति' नामक ग्रंथांत रीति हाच काव्याचा आत्मा हें मत प्रतिपादिलें. पुढे 'ध्वन्यालोक'कारांचा ध्वनिवाद रसिकांस जास्त मान्य झाल्यामुळें वामनाचा रीतिवाद मागे पडला. तथापि त्यामुळें रीतीचें काव्यां-तील महत्त्व कमी होत नाही. विशिष्ट पदरचनेला वामनाने रीति ही संज्ञा

लावली आहे. त्याने वैदर्भी गौडी व पाञ्चाली अशा तीन रीति मानल्या आहेत. त्यांपैकी वैदर्भी ही सर्वांत श्रेष्ठ; कारण तींत सर्व गुणांचा समुच्चय असतो, असें त्याने म्हटलें आहे. वामनाने श्लेषादि दहा गुण मानले होते, पण त्यानंतरच्या मम्मटादि आलंकारिकांनी त्यांची छाननी करून माधुर्य ओजस् व प्रसाद ह्या तीनच गुणांना मान्यता दिली आहे.

कालिदासाने आपले सर्व ग्रंथ या सर्वोत्कृष्ट वैदर्भी रीतींतच लिहिले आहेत. वैदर्भी रीतीचे विशेष म्हणजे माधुर्यव्यञ्जक कोमलवर्णांचा उपयोग व दीर्घ समासांचा अभाव हे होत. संस्कृत भाषा जात्याच श्रुतिमनोहर आहे. तशांत कालिदासाने आपल्या सर्व ग्रंथांत टवर्गीय परुष वर्ण, संयुक्ताक्षरें व लांबलचक समास हे बुद्धचा टाळलेले आहेत. त्यामुळे त्याचे ग्रंथ एका ग्रंथकाराने म्हटल्याप्रमाणें मधाचीं पुटें दिल्यासारखे गोड झाले आहेत. कालिदासाच्या ग्रंथांत शृंगार व करुण हेच रस प्रमुख असल्यामुळें त्यांना अनुरूप अशीच त्याची भाषाशैली झाली आहे. कारण शृंगार–विशेषत: विप्रलंभशृंगार–व करुण यांमध्यें वाचकांचें मन अतिशय विरघळून जातें. त्यामुळें त्या रसांच्या वर्णनांत कोमलवर्णयुक्त रचनाच योग्य असते. आंग्ल कवि टेनिसनप्रमाणें नादमधुर शब्दयोजनेकडे कालिदासाने अतिशय लक्ष दिलेलें दिसतें. त्याने आपलीं काव्यें पुन: पुन: तपासून अनेक कल्पना व शब्द बदलले असावेत. 'रघुवंशा'च्या अकराव्या सर्गांतील ४७ व ४८ हे समानार्थक श्लोक कालिदासाचे असल्यास त्यांपैकी एक रचून झाल्यावर त्यांतील कल्पना व रचना मनाजोगी न झाल्यामुळें त्याने दुसरा रचला असावा. इतके परिश्रम घेऊन रचलेल्या काव्यांत क्लिष्टता व कृत्रिमता कोठेही आढळत नाही, तीं नवोन्मीलित पुष्पांप्रमाणें ताजीं व रसपूर्ण दिसतात, यांतच त्याच्या कलेचा परमोत्कर्ष आहे. ललितपदयोजनेवर कालिदासाचा अतिशय भर असल्यामुळें संस्कृतानभिज्ञ वाचकांचेंही मन त्याच्या श्रुतिमनोहर कृतींनी आकृष्ट केलें जातें. तसेंच कालिदासाने आपल्या ग्रंथांत समासांचा यथोचित उपयोग केल्यामुळें त्याच्या रचनेंत सर्वत्र सरलता, सुबोधता व प्रसाद हे गुण दृष्टीस पडतात. लांबलचक समासांनी रचनेस कशी क्लिष्टता व कृत्रिमता येते तें बाणाच्या 'हर्षचरित' व 'कादंबरी' या ग्रंथांवरून दिसतें. त्याच्या पल्लेदार समासांचा अर्थ

लावतांना वाचकवर्ग इतका त्रासून जातो की त्यांतील रम्य कल्पनांकडे त्याचें सहजच दुर्लक्ष होतें. प्रदीर्घ समासयोजना नाटकांत तर विशेषच रसहानि करते. उदाहरणार्थ, भवभूतीचें 'मालतीमाधव' नाटक घ्या. त्यांत स्त्रीपात्रांच्याही तोंडीं समासप्रचुर क्लिष्ट भाषा घातल्याने वाचकांचा अत्यंत विरस होतो. याच्या उलट कालिदासाच्या नाटकांतील संभाषणें सुटसुटीत व म्हणून स्वाभाविक व सहजसुंदर झालीं आहेत.

४. अलंकार. उत्कृष्ट काव्यांत बहुधा ध्वनि किंवा रस प्रतीत होत असला तरी सर्वत्र त्याची अपेक्षा करणें युक्त किंवा इष्टही होणार नाहीं. काव्यांचा प्रधान उद्देश आनंदप्राप्ति असल्याने ती भावनोद्रेकाप्रमाणेंच कल्पनाविलासानेंही होणें शक्य असतें. म्हणून भामहादि आलंकारिकांनी कल्पनेच्या विलासास–अलंकारांस–काव्यघटकांमध्यें मुख्य मानून त्यांचें सविस्तर वर्गीकरण व विवेचन केलें आहे. शिवाय अलंकारांच्या समुचित योजनेने रसोत्कर्षासही मदत होते हें वर दिलेल्या उदाहरणांवरून दिसून येईल. त्यामुळें महाकवीनी आपल्या काव्यांत त्यांचा उपयोग केला आहे.

अलंकारांचे शब्दालंकार, अर्थालंकार व शब्दार्थालंकार असे तीन भेद मानतात. अर्थालंकारांपेक्षा शब्दालंकार जास्त कृत्रिम व म्हणून रसिकांस कमी हृद्य वाटतात. कलाभिज्ञ कालिदासाने त्यांचा फारसा कोठे उपयोग केला नाही. रचनेच्या ओघांत जेथे ते सहज स्फूर्तीने आले तेथेच ते योजिले आहेत. उदाहरणार्थ, 'भुजे भुजंगेन्द्रसमानसारे भूमः स भूमेर्धुरमाससञ्ज।'(रघु.२,७४) 'सम्बन्धिनः सद्म समाससाद,' (रघु.७,१६) 'प्रजाः प्रजानाथ पितेव पासि।'(२,४८) इत्यादि पंक्तींतील अनुप्रास पाहावे. क्वचित् स्थलीं विवक्षित अर्थाचा प्रतिध्वनीही त्यांत दिसून येतो. उदाहरणार्थ, 'मायूरी मदयति मार्जना मनांसि' यांतील मकारानुवृत्तीने कवीन मृदंगाच्या तालाचें सुंदर अनुकरण केलेलें दिसतें.

यमक–या अलंकारांत कवीला मोठ्या प्रयत्नाने विशिष्ट शब्द हुडकून काढून योजावे लागतात, त्यामुळें त्याच्या रचनेंत कृत्रिमता येते व रसभंग होतो. म्हणून शृंगाररसाच्या–विशेषतः विप्रलंभ शृंगाराच्या–वर्णनांत यमकांचा उपयोग करूं नये असा ध्वनिकारांनी दंडक घालून

दिला आहे. कालिदासानेही आपल्या शृंगाररसप्रधान ग्रंथांत कोठेही यमकांचा विशेष उपयोग केलेला दिसत नाही. पात्रांच्या संभाषणांत तर तो त्याने काळजीपूर्वक टाळलेला आहे. इतरत्र–ज्या ठिकाणी त्याचा उपयोग दोषार्ह होणार नाही तेथे–त्याने त्याचा क्वचित् उपयोग केला आहे. उदाहरणार्थ, 'वधाय वध्यस्य शरं शरण्यः' (रघु० २,३०) 'मनुष्यवाचा मनुवंशकेतुम्' (रघु०२,३३) इ० पहा. नवव्या सर्गांतील पहिल्या ५४ श्लोकांत दशरथाची राज्यव्यवस्था, वसन्तऋतु, मृगया इत्यादिकांचे वर्णन करतांना त्याने चतुर्थपादाच्या आरभीं 'यमवतामवतां च धुरि स्थितः' (रघु० ९,१) 'सनगरं नगरन्ध्रकरौजसः' (रघु०९,२) इत्यादि यमकें योजिली आहेत. पण यांत शृंगारादिरसाचा संबंध येत नसल्यामुळें रसहानि हा दोष संभवत नाही. उलट कवीने योजिलेल्या यमकाच्या नादमाधुर्याने वाचकाचें मन आनंदित होते व त्याच्या भाषाप्रभुत्वाबद्दल कौतुक वाटतें.

श्लेष—द्व्यर्थी शब्दाच्या योजनेने या अलंकाराची उत्पत्ति होत असल्यामुळें त्याची गोडी चाखावयास रसिकतेपेक्षा विद्वत्ताच जास्त आवश्यक असते. त्याची हाक हृदयाला नसून बुद्धीलाच उद्देशून असते. कालिदासोत्तर काळात वाङ्मयांतही रसिकतेपेक्षा विद्वत्तेलाच जास्त मान मिळत गेल्याने कवीनी या अलंकाराचा सढळ हाताने उपयोग केला आहे. पण त्यामुळें त्यांची काव्यें दुर्बोध, बोजड व क्लिष्ट झालीं आहेत. कालिदासाने क्वचित् स्थलींच—जेथे त्यायोगें विशेष रम्यता येत असेल किंवा एकंदर वर्णनास तो आवश्यक असेल तेथेच—श्लेषाचा उपयोग केला आहे. मागे 'मालविकाग्निमित्रा'चें संविधानक देतांना मालविकेच्या तोंडून राजावर बसलेलें तिचें प्रेम व्यक्त करण्याकरितां कालिदासाने श्लेषाचा कसा खुबीने उपयोग केला आहे तें आम्ही दाखविलें आहे. त्याच नाटकाच्या पांचव्या अंकांत पुढील भाषणें घातलीं आहेत—

> विदू०–भो विश्रब्धो भूत्वा त्वमिमां यौवनवतीं पश्य ।
> देवी०–काम् ।
> विदू०–तपनीयाशोकस्य कुसुमशोभाम् ।

विदूषकाला सालंकृत व यौवनाने मुसमुसलेल्या मालविकेकडे राजाचें लक्ष वेधावयाचें होतें, पण त्याचे शब्द राणीने ऐकल्यामुळें तिच्या प्रश्नास

उत्तर देतांना 'यौवनवतीम्' या शब्दाचा श्लेषाने दुसरा अर्थ घेऊन व अशोक वृक्षाच्या पुष्पशोभेकडे त्याचा संबंध जोडून त्याने आपली सुटका करून घेतली आहे. या टिकाणीं छेकापह्नुति हा सुंदर अलंकार श्लेषयोजनेने साधला आहे.

तस्मिन् काले नयनसलिलं योषितां खण्डितानां
शान्तिं नेयं प्रणयिभिरतो वर्त्म भानोस्त्यजाशु।
प्रालेयास्रं कमलवदनात्सोऽपि हर्तुं नलिन्याः
प्रत्यावृत्तस्त्वयि कररुधि स्यादनल्पाभ्यसूयः॥ मेघ० ४१.

या श्लोकांत 'मेघा! प्रातःकाळीं आपल्या कमलिनीरूपी खण्डित स्त्रीच्या कमलमुखावरील दंवरूपी अश्रु पुसण्यास सूर्य प्रवृत्त झाला असतां तूं त्याचा कर धरूं लागल्यास (म्हणजे किरण अडवूं लागल्यास) तो तुजवर अतिशय रागावेल' ही अत्यंत रम्य कल्पना सजविण्यास 'कर' शब्दावरील श्लेष आवश्यक म्हणून योजिला आहे. कालिदासाच्या श्लेषांचा अर्थ साधारण वाचकांसही सहज समजत असल्यामुळें त्यायोगें कोठेही क्लिष्टता किंवा रसभंग झालेला दिसत नाही.

या ठिकाणीं कालिदासाच्या दुसऱ्याही एका लकबीचा उल्लेख करण्यासारखा आहे. त्याच्या मानसपुत्रांचीं व कन्यांचीं नांवें कांही विशिष्ट हेतूने ठेविलेलीं दिसतात. 'मालविकाग्निमित्रा'च्या पांचव्या अंकांत विदूषकाने मालविकेला बन्दिशालेंतून सोडवून उद्यानांत पाठविल्यावर तो राजाला येऊन मिळतो; नंतर ते दोघेही उद्यानाकडे जातात, तोंच वाटेंत राजाला इरावतीची दासी चन्द्रिका दिसते. तेव्हा राजा विदूषकास भितीआड लपण्यास सुचवितो. तेव्हा विदूषक उत्तर करतो, 'खरेंच, चोरांनी व कामुक पुरुषांनी चन्द्रिकेला टाळलेंच पाहिजे.' यांत चन्द्रिका या शब्दावर विदूषकाने कोटी केली आहे. याप्रमाणेंच बकुलावलिका, ध्रुवसिद्धि, प्रियंवदा इत्यादि पात्रांचीं नांवेंही सार्थ असल्याचें कालिदासाने इतर पात्रांच्या संभाषणांत दर्शविलें आहे. त्याप्रमाणेंच काव्यांतही उमा, अपर्णा, रघु, राम इत्यादि व्यक्तींच्या नांवांची मनोरंजकव्युत्पत्ति त्याने लावली आहे.

यानंतर आपण अर्थालंकारांकडे वळूं. यांचे प्रथमच स्वभावोक्ति व वक्रोक्ति असे दोन भेद पडतात. स्वभावोक्तींत कवीने पाहिलेल्या किंवा कल्पिलेल्या पदार्थांचें अगर व्यक्तींचें अगदी हुबेहूब पण रम्य असें चित्र काढावयाचें असतें, तर वक्रोक्तींत त्यांच्या अंगावर आपल्या कल्पनाशक्तीने निर्मिलेले अलंकार घालून त्यांना सजवावयाचें असतें. या दोन्ही प्रकारांत कालिदासाचें अप्रतिम नैपुण्य दिसून येतें. त्याच्या ग्रंथांत अनेक प्राण्यांची व व्यक्तीची चित्रें अगदी मोजक्या शब्दांत पण यथातथ्य काढलेलीं दिसतात. 'शाकुंतलां'तील, सारथ्याने लगाम सोडल्यावर दौडणारे घोडे व त्यांच्यापुढे प्राण वांचविण्यासाठी पळणारा हरिण, कन्यावियोगप्रसंगी विव्हल झालेला कण्व, 'रघुवंशां'तील, पित्यासमोर दाईचा हात धरून येणारा लहानगा रघु इत्यादिकांच्या शब्दचित्रांवरून कालिदासाची सूक्ष्म निरीक्षणशक्ति व वर्णनकौशल्य हीं प्रत्ययास येतात. त्या जातीचें आणखीही एक उदाहरण घेऊं—

स चापकोटीनिहितैकबाहुः शिरस्त्रनिष्कर्षणभिन्नमौलिः ।
ललाटबद्धश्रमवारिबिन्दुभीतां प्रियामेत्य वचो बभाषे ॥ रघु० ७,६६.

आपला मार्ग अडवून बसलेल्या शत्रूंशीं युद्ध करून विजयी झालेल्या अजाने भयत्रस्त इन्दुमतीकडे येऊन भाषण केलें त्या वेळचें हें वर्णन आहे. यांत धनुष्कोटीवर टेकून उभें राहण्याची अजाची ऐट, शिरस्त्राण काढून घेतल्यामुळें मोकळे सुटलेले त्याचे केश, श्रमाने त्याच्या कपाळावर दिसणारे घर्मबिन्दु यांचें कवीने वेचक शब्दांत इतकें सुंदर चित्र काढलें आहे की एखाद्या कसलेल्या चित्रकारालाही तें मार्गदर्शक होईल.

पण स्वभावोक्तीपेक्षा वक्रोक्तिमूलक उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टान्तादि अलंकारांत कवीच्या तरल कल्पनेचा रम्य विलास दृष्टीस पडतो. त्यांतच पृथ्वीपासून आकाशापर्यंत सर्वत्र स्वैर फिरणारी व सामान्यजनांना नीरस व ओबड धोबड वाटणाऱ्या पदार्थांतही सौंदर्य पाहणारी त्याची भेदक दृष्टि, विविध शास्त्रांच्या व्यासंगाने आलेली बहुश्रुतता, अनेक कलांच्या प्रयोगाने प्राप्त झालेलें नैपुण्य, व्यवहारांत मिळालेले अनुभव यांचें स्वच्छ प्रतिबिंब पडलेलें दिसतें. यास्तव त्याच्या चरित्राकरितां

आम्ही मागे त्यांचा उपयोग केला आहे. एका सुभाषितकाराने 'उपमा कालिदासस्य' असें म्हणून त्याच्या उपमांचें अलौकिकत्व दर्शविलें आहे. कालिदासाने योजिलेल्या उपमांची विविधता, मार्मिकता व रम्यता लक्षांत घेतां तें विधान यथार्थ आहे यांत संशय नाही. पण उपमा या शब्दाचा व्यापक अर्थ घेऊन रूपक, उत्प्रेक्षा, अतिशयोक्ति, दृष्टान्त, अर्थान्तरन्यास इत्यादि इतर सादृश्यमूलक अलंकारांविषयीही ते विधान केलें आहे असें मानलें तरी तें अन्वर्थच होणार आहे. प्रथम कालिदासीय उपमाचे विशेष सागून नतर या अलंकारांकडे वळूं.

(१) रम्यता—कालिदासीय उपमांचा प्रथमच नजरेंत भरणारा विशेष म्हणजे त्यांचें सौंदर्य हा होय. सामान्य जनांच्या चर्मचक्षूना न दिसणारें वस्तूचें सौदर्य कवीच्या मनश्चक्षूंपुढे लपत नाही. उदाहरणार्थ, 'मेघदूता'-तील 'रेवां द्रक्ष्यस्युपलविषमां विन्ध्यपादे विशीर्णां, भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमङ्गे गजस्य।'(मेघ० १९) ही उपमा घ्या. विन्ध्यपर्वताच्या पायथ्याशीं खडकाळ प्रदेशांतून वाहणाऱ्या नर्मदानदीच्या प्रवाहाला हत्तीच्या अंगावर काढलेल्या चित्रविचित्र रंगाच्या वेलबुट्टीची उपमा देऊन त्याचें सौंदर्य कवीने व्यक्त केलें आहे. कालिदासाच्या उपमा कोठेही श्लेषमूलक नाहीत; त्या सहजरम्य साम्यावर बसविलेल्या असतात. याच्या उलट बाण, सुबंधु, श्रीहर्ष इत्यादिकांनी आपल्या उपमा श्लेषाधिष्ठित केल्यामुळें त्या अतिशय कृत्रिम वाटतात. उदाहरणार्थ 'सा (कादम्बरी) जानकीव पीतरक्तेभ्यो रजनिचरेभ्य इव चम्पकाशोकेभ्यो बिभेति' ही बाणाच्या 'कादंबरी'तील उपमा घ्या. हीत राक्षस आणि चंपक व अशोक यांत वस्तुतः कांही साम्य नसतांही दोघांनाही 'पीतरक्त' हें विशेषण लावतां येतें म्हणन श्लेषमूलक उपमा साधली आहे. अशा उपमांत कवीचें भाषाप्रभुत्व दिसून येत असलें, तरी सहृदय वाचकांस त्या रम्य वाटत नाहीत.

(२) समर्पकपणा—कालिदासाने योजिलेल्या उपमा अत्यंत समर्पक वाटतात. त्यांच्या योगें वर्णनीय वस्तूंची यथार्थ कल्पना वाचकांस होते. 'शाकुंतलां'त शाङ्गरवादि तपास्विजनांबरोबर आलेल्या शकुंतलेला पाहून 'मध्ये तपोधनानां किसलयमिव पाण्डुपत्राणाम्' अशी अत्यन्त समर्पक उपमा राजाने योजिली आहे व तिच्या योगें जरठ ऋषींच्या रुक्ष

ाकृतींनी विशेषच खुलणारें तिचें मुग्ध तारुण्य सूचित केलें आहे. 'मेघ-तां'त (श्लो. ९) स्त्रियांच्या हृदयाला कुसुमाची उपमा यक्षाने दिली ाहे. देशी पुष्पांचें सुगंधित्व, रमणीयता व किंचित् उष्णतेनेही करपून जाऊन ळून पडण्याची त्यांची प्रवृत्ति, हीं लक्षांत घेतां स्त्रियांच्या निसर्गमधुर, मळ व अल्पविरहानेही व्याकुळ होणाऱ्या हृदयाला दिलेली त्यांची उपमा थातथ्य वाटते. इन्दुमतीच्या निधनानंतर वसिष्ठ ऋषींच्या उपदेशास ान देऊन व आपला पुत्र दशरथ अल्पवयस्क होता म्हणून अजाने कांही वस काढले, तरी त्या काळांत पत्नीशोकाने त्याचें हृदय हळू हळू विदीर्ण ोत होतें ही कल्पना एखाद्या विशाल सौधाजवळ उगवणाऱ्या व आपल्या ळू हळू पसरणाऱ्या मुळयांनी त्याला कालांतराने उखडून टाकणाऱ्या लक्षवृक्षाच्या रोपट्याच्या उपमेने कवीने व्यक्त केली आहे.

(३) विविधता–कालिदासाच्या उपमांचा साकल्याने विचार करतां यांच्या विविधतेने मन आश्चर्यचकित होतें. आगमभेदाने त्यांचें येणेप्रमाणें र्गीकरण करतां येईल.–

(अ) सृष्टपदार्थीय–लता, वृक्ष, फुलें, फळें, पृथ्वीवरील नानाप्रकाचे प्राणी, आकाशांतील ग्रह, तारे, सूर्य, चन्द्र, धूमकेतु इत्यादि सृष्टींतील च्चयावत् पदार्थांतून त्याने आपल्या उपमा घेतल्या आहेत; त्यांवरून ाच्या दृष्टीची विशालता नजरेंत भरते. उदाहरणार्थ,कण्वऋषीला अवचित मळालेल्या बाल्यावस्थेंतील सुंदर शकुंतलेला रुईच्या झाडावर यदृच्छेने ळून पडलेल्या नवमालिकाकुसुमाची, मदनदाहानंतर दुःखाने तळमळणाऱ्या तीला तळ्यांतील पाणी आटल्यामुळें तडफडणाऱ्या शफरीची व त्रिभुनाला त्रस्त करणाऱ्या तारकासुराला धूमकेतूची दिलेली उपमा पहा.

(आ) शास्त्रीय–कालिदासाने व्याकरण, तत्त्वज्ञान, राजनीति, वैद्यक त्यादि अनेक शास्त्रांतून अनेक सुंदर व निवडक उपमा घेतल्या आहेत. वांना स्वस्थानावरून हुसकून देणाऱ्या शत्रूंना, सामान्य नियमांचा बाध रणाऱ्या अपवादांची, वालीच्या गादीवर बसविलेल्या सुग्रीवाला धातूच्या गीं येणाऱ्या आदेशाची, स्वबलाने शत्रूंचा निःपात करण्यास समर्थ असल्या शत्रुघ्नाच्या मागून रामाज्ञेने जाणाऱ्या सेनेला,अध्ययनार्थ'इ' या धातूया मागे लागलेल्या निरर्थक 'अधि' उपसर्गाची, इत्यादि व्याकरणविषयक

उपमा वाचून संस्कृतव्याकरणाभिज्ञ वाचकांस मौज वाटते. मेनकेला हिमालयापासून झालेल्या पार्वतीला राजनीतींत उत्साहगुणाने मिळणाऱ्या संपत्तीची उपमा अर्थशास्त्रांतून,प्रबल तारकासुरापुढे निष्फळ झालेल्या देवांच्या उपायांना जालीम औषधांनाही न जुमानणाऱ्या सांनिपातिक ज्वराची उपमा वैद्यकशास्त्रांतून आणि ब्राह्मसरोवरांतून उगम पावणाऱ्या सरयूनदीला अव्यक्तांतून उद्भूत होणाऱ्या बुद्धि (महत्) तत्त्वाची उपमा सांख्यतत्त्वज्ञानांतून घेतली आहे. या उपमांनी त्या त्या प्रकरणांतील भाव उत्तम रीतीने व्यक्त होऊन बहुश्रुत वाचकास आनंद होतो.

(इ) आध्यात्मिक–सृष्टींतील व्यक्त पदार्थांतून उपमानें घेऊन वर्ण्य विषय सुगम करण्याची कवीची सामान्यतः प्रवृत्ति असते व आपल्या 'ऋतुसंहारां'त कालिदासाने तोच मार्ग स्वीकारला आहे. पण पुढे जास्त सराव झाल्यावर अमूर्त कल्पनांतून किंवा मनोव्यापारांतूनही त्याने काही उपमा उचलल्या आहेत. वसिष्ठधेनूच्या मागून जाणाऱ्या दिलीपाला श्रद्धायुक्त विधीची व मातेला अलंकृत करणाऱ्या भरताला संपत्तीला शोभविणाऱ्या विनयाची उपमा वाचून चमत्कृति उत्पन्न होते. कालिदासपूर्वकालीन अश्वघोषानेही या तऱ्हेच्या कांही उपमा योजिल्या होत्या, त्यांवरूनही कालिदासाला अशा उपमा सुचल्या असतील.

(ई) व्यावहारिक–कांही उपमा कवीला व्यवहारांतील अनुभवावरून सुचलेल्या दिसतात. ' सच्छिष्याला दिलेल्या विद्येप्रमाणें शकुंतले ! दुष्यन्ताला अर्पिलेली तूं अशोचनीय झाली आहेस' या कण्वांच्या भाषणांतील उपमेंत व ' अभ्यासाने विद्येला प्रसन्न करतां येतें त्याप्रमाणें सदैव सेवा करून तूं या धेनूला प्रसन्न कर' या वसिष्ठांनी दिलीपाला केलेल्या उपदेशांत कालिदासाच्या स्वानुभवाचें प्रतिबिंब दिसतें.

(४) औचित्य–कालिदासाने आपल्या काव्यनाटकादि ग्रंथांत पात्रांच्या तोंडीं घातलेल्या उपमा त्यांना त्या त्या प्रसंगीं सुचतील अशाच आहेत. त्यामुळें त्या अत्यंत स्वाभाविक वाटतात. खादाड विदूषकाने अर्धचंद्राला दिलेली मोडक्या मोदकाची, समुद्रगृहाजवळ शिलेवर झोपलेल्या लठ्ठ विदूषकाला निपुणिका दासीने दिलेली बाजारांतील पोळाची आणि सदैव अध्यापनरत कण्वांनी शकुंतलेला दिलेली विद्येची उपमा पहा. त्यांत त्या

त्या व्यक्तींचे स्वभाव स्पष्ट रीतीने दिसून येतात.

(५) पूर्णता—कालिदासपूर्वकालीन व्यास-वाल्मीक्यादि कवींनी योजिलेल्या उपमांत उपमान व उपमेय यांचें एखाद्याच बाबतींत साम्य दर्शविलेले असतें. इतर बाबींतील साम्य वाचकांनी स्वकल्पनेने जाणावें लागतें. उदाहरणार्थ, 'महाभारता'न्तर्गत नलदमयंती आख्यानांतील खालील उपमा घ्या. 'तां राजसमितिं पुण्यां नागैर्भोगवतीमिव । संपूर्णां पुरुषव्याघ्रैः सिंहैर्गिरिगुहामिव ॥' यांत दमयंतीस्वयंवरार्थ जमलेल्या राजांच्या सभेला एकाच श्लोकांत भोगवती नगरीची व गिरिगुहेची अशा दोन उपमा दिल्या आहेत; पण त्यांपैकी एकीचाही पूर्ण विस्तार झाला नाही. याच्या उलट कलिदास आपल्या उपमांत उपमान व उपमेय यांचें सर्वांगीण साम्य दर्शवितो, त्यामुळें त्यांनी जास्त चमत्कृति उत्पन्न होते. उदाहरणार्थ, इंदुमतीस्वयंवरप्रसंगी अज स्वासनावर जाऊन बसला त्याचें वर्णन घ्या—

वैदर्भनिर्दिष्टमसौ कुमारः क्लृप्तेन सोपानपथेन मञ्चम् ।
शिलाविभङ्गैर्मृगराजशावस्तुङ्गं नगोत्सङ्गमिवारुरोह ॥

रघु० ६, ३.

यांत अजाच्या उच्च आसनाला पर्वतशिखराची व त्या आसनावर चढून जाण्याकरितां केलेल्या पायऱ्यांना पर्वताच्या बाजूवर पडलेल्या खडकांची उपमा दिल्यामुळें अजाचें सिंहाशी सर्वांगीण साम्य ध्यानांत येतें. तसेंच उपमान व उपमेय यांचें लिंगवचनादि बाबींत साम्य असावें असा आलंकारिकांनी नियम केला आहे. कालिदासपूर्वकालीन कवींच्या उपमा या बाबतींत अत्यंत सदोषदिसतात. कालिदासानेही आपल्या प्रथमच्या ग्रंथांत सर्वत्र असा नियम पाळल्याचें दिसत नाही. उदाहरणार्थ, 'मालविकाग्निमित्रां'त 'सा तपस्विनी देव्याधिकतरं रक्ष्यमाणा नागरक्षितो निधिरिव न सुखं समासादयितव्या' ही उपमा पहा. यांत धारिणीला नागाची व मालविकेला निधीची अशा ज्या दोन उपमा योजिल्या आहेत त्या इतर दृष्टीने अन्वर्थ असूनही उपमानोपमेयांच्या लिंगसाम्याभावीं सदोष दिसतात. याच्या उलट 'शाकुंतलां'त 'कथमिदानीं तातस्यांकात्परिभ्रष्टा मलयतटोन्मूलिता चन्दनलतेव देशान्तरे जीवितं धारयिष्ये' या शकुंतलेच्या भाषणांत मुद्दाम 'चन्दनलता' असा शब्द योजन कवीने लिंगसाम्य साधलें

आहे. लिंगवचनभेद असला तरी सहृदयांना उद्वेग वाटत नसल्यास उपमा सदोष मानूं नये असें 'काव्यादर्श'काराचें वचन प्रमाण मानून इतर ठिकाणींही कालिदासाच्या उपमांचें समर्थन करतां येईल. असो.

उपमालंकाराकडे कालिदासाचा विशेष ओढा असला तरी इतरही अनेक रमणीय अलंकार त्याने आपल्या ग्रंथांत साधले आहेत. 'रघुवंशां' तील 'राममन्मथशरेण ताडिता' (११,२०) इत्यादि प्रसिद्ध श्लोकांत व 'अनाघ्रातं पुष्पं किसलयमलूनं कररुहैः' (शाकु० २,१०) इत्यादि मनोहर दुष्यन्तोक्तींत रूपकालंकार आला आहे. यांपैकी पहिल्या स्थलीं एकाच कल्पनेचा विस्तार करून सांग रूपक साधलें आहे, तर दुसऱ्यांत एकामागून एक अशीं अनेक रूपकें योजून शकुंतलेचें सौंदर्य,कोमलता,उन्मादकत्व इत्यादि गुण सुचविले आहेत. तथापि एकंदरींत रूपकापेक्षा उत्प्रेक्षा, दृष्टान्त व अर्थान्तरन्यास या अलंकारांतच कालिदासाचें मन विशेष रमलेलें दिसतें. त्याच्या प्रथमच्या 'ऋतुसंहार', 'मालविकाग्निमित्रा'दि ग्रंथांत कवीच्या प्रतिभेने उत्प्रेक्षांचे कटाक्ष क्वचितच फेकलेले दिसतात. पण 'मेघदूता'त उत्प्रेक्षांचा केवळ पाऊस पडतो आहे असें वाटतें. त्या वीणागीताचा विषयही त्या अलंकारास अत्यंत अनुकूल आहे. अलकेचा मार्ग सांगतांना वाटेंतले पर्वत, नद्या वगैरेवर मेघ आला असतां कसा दिसेल याचें वर्णन यक्षमुखाने कालिदासाने अनेक उत्प्रेक्षा योजून केलें आहे. पक्वफलधारी आम्रवृक्षांनी आच्छादलेल्या आम्रकूट पर्वतावर मेघ गेला असतां तो पर्वत जणूं काय पृथ्वीचा अनावृत स्तन आहेसा वाटेल, चर्मण्वती नदीचें जल घेण्यास तो वाकला असतां गगनचारी व्यक्तींना आपण जणूं काय मध्यें स्थूल इन्द्रनील मणि घातलेला पृथ्वीचा मोत्यांचा हार पाहत आहों असें वाटेल, शुभ्र कैलास पर्वत हा जणूं काय भगवान् शंकरांचा प्रतिदिनीं वाढणारा हास्यसंचय आहे, इत्यादि 'मेघदूता'तील उत्प्रेक्षा अत्यंत हृदयंगम झाल्या आहेत. उत्प्रेक्षेप्रमाणें दृष्टान्तही कवीचा आवडता अलंकार दिसतो. 'रघुवंशां'त आकस्मिक निधन झाल्यामुळें इन्दुमतीचा देह अजाच्या अंगावर पडला त्यामुळें त्यालाही तत्काळ मूर्च्छा आली, या प्रसंगाचें वर्णन करतांना समईतून तैलबिन्दूबरोबर खाली पडणाऱ्या दीपज्योतीचा हृद्य दृष्टांत कवीने योजिला आहे. शकुन्तलेने दुष्यन्तावर आपलें प्रेम जडलें आहे हें सूचित केल्यावर

तिच्या प्रेमळ सख्या 'सागरमुज्झित्वा कुत्र वा महानद्यवतरति,' 'क इदानीं सहकारमुज्झित्वाऽतिमुक्तलतां पल्लवितां सहते' अशा अनुरूप दृष्टांतांनी आपली संमति व्यक्त करतात. निर्दय दुर्वासाशिवाय दुसऱ्या कोणाला निरागस शकुन्तलेला शाप देववेल, हा भाव 'कोऽन्यो हुतवहादृग्धुं प्रभवति' या दृष्टान्तांत उत्तम रीतीने व्यक्त झाला आहे. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. कालिदासाच्या अर्थान्तरन्यासांत त्याच्या व्यावहारिक अनुभवाचें सारसर्वस्व अत्यंत रम्य भाषेंत ग्रथित झालें असल्यामुळें त्यांपैकी कितीएक म्हणीसारखे भाषेंत रूढ झाले आहेत. उदाहरणार्थ, 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्', 'महदपि परदुःखं शीतलं सम्यगाहुः,' 'भिन्नरुचिर्हि लोकः,' 'किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम्,' इत्यादि वचनें पहा. याशिवाय निदर्शना, अतिशयोक्ति, सहोक्ति, पर्याय, समुच्चय, ससंदेह, विभावना इत्यादि अनेक अलंकार घडवून कवीने आपल्या कितावघूस भूषविलें आहे. या सर्वांचीं उदाहरणें स्थलाभावास्तव येथे देतां येत नाहीत. जिज्ञासूंस तीं मम्मटादि आलंकारिकांच्या ग्रंथांत निवडलेलीं दृष्टीस पडतील.

येथवर ध्वनि, रस, रीति व अलंकार या संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांच्या मतचतुष्टयास अनुसरून कालिदासीय ग्रंथांचें परीक्षण करून काव्य या पदवीस ते कसे प्राप्त होतात तें पाहिलें. आता त्यांच्या इतर विशेषांकडे वळूं.

आधुनिक टीकाकार रसालंकारादिकांइतकेंच काव्यनाटकांच्या संविधानकरचना, स्वभावपरिपोष इत्यादि अन्य विशेषांकडे लक्ष देतात. या इतर बाबींत कालिदासाचे ग्रंथ इतर कवींच्या ग्रंथांच्या मानाने कमी सरस ठरणार नाहीत. 'मालविकाग्निमित्रा'च्या कथानकांत अनेक धाग्यांची गुंतागुंत असून ती शेवटी कुशलतेने सोडविली आहे तर 'शाकुंतलां'त नायकनायिकांच्या स्वभावांतील भिन्न भिन्न मनोविकारांचे पापुद्रे हलक्या हाताने उलगडले आहेत. शिवाय कालिदासाच्या ग्रंथांत अनेक जातींच्या, वेशाच्या, धंद्यांच्या व्यक्तींची चित्रें मार्मिकपणें काढलेलीं आढळतात. त्याने निर्मिलेल्या रम्य सृष्टींत काश्यप, कण्व व दुर्वास हे परस्पर भिन्न स्वभावाचे महर्षि, कौत्ससारखा निस्पृह ब्राह्मण, दुष्यंत, दिलीप, रघु, राम यांसारखे कर्तव्यतत्पर राजर्षि, अज व यक्ष यांसारखे पत्नीवियोगाने तळमळणारे प्रेमी जीव, अग्निमित्र व अग्निवर्ण यांसारखे विलासी राजे,

हरदत्त व गणदास यांसारखे कलानिपुण पण परस्परकीर्त्यसहिष्णु नाट्याचार्य, गौतम, माणवक, माढव्य हे तीन तऱ्हेचे विदूषक आणि स्वशौर्याने यवनांचा पराभव करून अश्वमेधाश्व परत मिळविणाऱ्या वसुमित्रापासून मुग्धत्वाने सिंहशावकाचे दांत मोजणाऱ्या सर्वदमनापर्यंत लहान मोठे राजकुमार आढळतात. परिस्थितीच्या बदलामुळें आपणांस याच व्यक्ति आजकालच्या नेहेमीच्या व्यवहारांत दिसल्या नाहीत तरी या प्रकारच्या दिसतील यांत संशय नाही. कालिदासकालीन परिस्थिति लक्षांत घेतां त्याने आपलीं पात्रें सभोवतालच्या जगांतूनच घेतलीं असावींत असें वाटतें. 'विक्रमोर्वशीयां'तील राजाच्या वर्तनांत तत्कालीन नागरकांच्या वृत्तीचें कसें प्रतिबिम्ब पडलें आहे हें आम्ही मागें दाखविलेंच आहे.

पण कालिदासाच्या पुरुषपात्रांपेक्षा तन्निर्मित स्त्रीसृष्टीने रसिकांचें मन जास्त आकृष्ट केलें आहे. त्याने आपल्या ग्रंथांत धारिणी, औशीनरी, पार्वती, उर्वशी, इरावती, मालविका, यक्षपत्नी, शकुंतला, प्रियंवदा, अनसूया, सुदक्षिणा, इन्दुमती व सीता अशीं तेरा महत्त्वाचीं स्त्रीपात्रें निर्माण केली आहेत. यांपैकी धारिणी, औशीनरी व सुदक्षिणा या मध्यम वयाच्या व बाकीच्या तरुण स्त्रिया आहेत. उर्वशी अप्सरा असल्याने तिचीही गणना तरुण स्त्रियांतच करतां येईल. कालिदासाच्या स्त्रीसृष्टींतील तरुण स्त्रियांचें संख्याधिक्य लक्षांत घेतां त्या विलासी व रंगेल कवीचें मन त्यांच्या मुग्धमधुर लीलांत विशेष रममाण होत असावें असें वाटतें. या सर्व स्त्रिया भिन्न भिन्न स्वभावाच्या आहेत. धारिणी, औशीनरी व अनसूया यांचा गंभीर स्वभाव, इरावतीचा मत्सरीपणा, मालविका, उर्वशी, यक्षपत्नी व इन्दुमती यांचें विलासित्व, पार्वतीचा करारीपणा, शकुन्तला व सीता यांचा स्वाभिमानीपणा, प्रियंवदेचा विनोदी स्वभाव आणि सुदक्षिणेची कर्तव्यतत्परता हे यांच्या स्वभावांतील भिन्न भिन्न विशेष प्रामुख्याने नजरेंत येतात. तथापि त्यांचें अनेक बाबतींत साम्यही दाखवितां येतें. या सर्व स्त्रिया अत्यंत प्रेमळ आहेत. यांपैकी विवाहित स्त्रियांचें आपल्या पतीवरचें, पुत्रवतींचें आपल्या मुलांवरचें आणि प्रियंवदा व अनसूया यांचें मैत्रिणीवरचें प्रेम निस्सीम आहे. उत्कट पतिप्रेमामुळेंच धारिणी व औशीनरी

ह्या आपापल्या पतींचे प्रेमविषयक चाळे पसंत नसतांही केवळ त्याने सुखी व्हावें म्हणून त्याच्या नूतनदारपरिग्रहास संमति देतात. पतिप्रेमामुळेंच यांपैकी बहुतेकांच्या स्वभावांत थोडचा फार अंशाने स्त्रीभावसुलभ मत्सरही आढळतो. यक्षपत्नीला पतीचें आपल्यावर अनन्यसाधारण प्रेम आहे हें माहीत आहे. तथापि स्वप्नांत तो दुसऱ्या एका स्त्रीचें आराधन करीन आहे असें पाहतांच ती दुःखित होऊन दचकून उठते (मेघ० ११६); आणि इरावती व औशीनरी या पति आपल्या पायां पडून चुकी कबूल करीत असला तरी त्याला झिडकारितात. कालिदासाच्या बहुतेक मानसकन्या कलानिपुण आहेत. इरावती व मालविका या नृत्यकलेत आणि प्रियंवदा व अनसूया या चित्रकलेंत निपुण दाखविल्या आहेत. यक्षपत्नी तर विरहावस्थेत आपल्या दुःखी मनाला विरंगुळा आणण्याकरितां कधी पतीचे नांव ज्यांत गोविलें आहे अशीं गाणीं रचते व तीं वीणा वाजवून गाण्याचा प्रयत्न करतांना दिसते, तर कधी विरहाने कृश झालेल्या पतीचें चित्र काढून मनाला रमवीत असते. तसेंच यांपैकी बहुतेक स्त्रिया लतावृक्षांवर अपत्यनिर्विशेष प्रेम करणाऱ्या दिसतात. पार्वती, सीता, शकुंतला व निपुणिका या आश्रमांतील वृक्षांना पाणी घालून प्रेमाने त्यांची जोपासना करीत असत. यक्षपत्नीने आपल्या घराच्या अंगणांत लहान मन्दारवृक्षाला दत्तक मुलाप्रमाणें मोठ्या काळजीने वाढविलें होतें. धारिणीचें आपल्या उद्यानांतील सुवर्णाशोकावर इतकें प्रेम होतें की वसन्तसमयीं इतर वृक्षांबरोबर त्याला कळ्या आल्या नाहीत म्हणन तिला अतिशय वाईट वाटलें व मालविकेच्या लत्ताप्रहारानंतर लौकरच प्राप्त झालेला त्याचा पुष्पसंभार पाहून आनंदाच्या भरांत स्त्रीस्वभावसुलभ सवतीमत्सर विसरून तिने स्वतः मालविकेचा राजाशीं विवाह लावला. कालिदासाच्या नायिका लतावृक्षांप्रमाणें पशुपक्ष्यांवरही निस्सीम प्रेम करणाऱ्या आहेत. यक्षपत्नी सायंकाळीं अंगणांतल्या रत्नखचित सुवर्णयष्टीवर बसलेल्या मोराला मधुर तालरवाने नाचवीत असे. शकुन्तलेने जन्मापासून मातृहीन झालेल्या दीर्घापाङ्ग नामक हरिण बालकाची सर्व तऱ्हेने काळजी घेऊन त्याला वाढविलें होतें. हरिणी पार्वतीच्या इतक्या सवयीच्या झाल्या होत्या

की ती त्यांच्या नेत्रांची लांबी मोजून त्यांच्याशीं आपल्या सखीच्या नेत्रांची तुलना करीत असे असें कालिदासाने वर्णिलें आहे.

वर उल्लेखिलेल्या प्रमुख स्त्रीपात्राशिवाय इतरही अनेक तरुण स्त्रियांचीं अस्फुट शब्दचित्रें 'मेघदूतां'त कवीने काढलीं आहेत. त्यांत शिथिल नीतिकल्पनांमुळें वनकुञ्जांत रममाण होणाऱ्या वनचरवधू व विदिशेजवळच्या नीचैर्गिरीवरील गृहांत नागरकांबरोबर विलास करणाऱ्या पण्यस्त्रिया व महाकालेश्वरासमोर रात्रौ नृत्य करणाऱ्या वेश्या आहेत, तशाच आकाशांत काळेभोर विशाल मेघ पाहून हीं वाऱ्याने वाहून नेलेलीं पर्वतांचीं शिखरेंच आहेत की काय असें वाटणाऱ्या भोळ्या सिद्धांगना व कृषिकार्याकरितां अवश्य अशा मेघांकडे स्निग्ध दृष्टीने पाहणाऱ्या भ्रूविलासानभिज्ञ ग्रामतरुणीही आहेत. तथापि यांपेक्षा पौरवधूंचेच वर्णन त्याच्या ग्रंथांत वारंवार येतें. अंधाऱ्या रात्रीं रत्नालंकारांनी भूषित होऊन प्रियकरांकडे जाणाऱ्या व मेघगर्जनेने भयत्रस्त होणाऱ्या अभिसारिका, नगरांजवळच्या उद्यानांत फुलें खुडण्याच्या श्रमाने घामाघूम होणाऱ्या 'पुष्पलावी' तरुणी, कटाक्षनिक्षेपांत चतुर व चञ्चल नेत्रांच्या पौरस्त्रिया, परदेशगत प्रियकरांच्या विरहामुळें झुरणाऱ्या व अंगसंस्कारांकडे लक्ष न देणाऱ्या पथिकवनिता, यांचीं शब्दचित्रें कवीने मोठ्या कुशलतेने थोडक्यांत काढली आहेत. भगवान् शंकर व अज विवाहाकरिता नगरप्रवेश करूं लागले त्यावेळच्या स्त्रियांच्या गडबडीचें कवीने वर्णन केले आहे त्यावरून व 'मेघदूतां'तील यक्षपत्नीच्या वर्णनावरून आपणांस तत्कालीन पौरस्त्रियांच्या विलासी जीवनक्रमाची चागली कल्पना करतां येते.

कालिदासाच्या स्त्रीविषयक कल्पना उदात्त होत्या हें 'गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ' या त्याच्या अजविलापांतील उक्तीवरून दिसून येतें. तथापि गृहिणी व मन्त्री या दोन नात्यांनी त्याच्या स्त्रीपात्रांनी आपलीं कर्तव्यें पार पाडल्याचें वर्णन फारसें कोठे त्याच्या ग्रंथांत आढळत नाही. या दृष्टीने 'स्वप्नवासवदत्तां'तील राजकारणाकरितां स्वतःच्या मृत्यूची खोटी बातमी पसरूं देऊन पतिविरहदुःख सोसणारी व मत्सरादि विकारांस मनांत थारा न देतां स्वतःच्या सवतीलाही पुष्पालंकारांनी भूषित करणारी भासाची नायिका वासवदत्ता

व पतीने विनाकारण आपला त्याग केला असतांही प्रजारंजनतत्परतेस्तव त्याचें कौतुक करणारी भवभूतीची नायिका सीता या कालिदासाच्या विलासी स्त्रीपात्रांपेक्षा जास्त उदात्त दिसतात. कालिदासाच्या तीन्ही नाटकांतील नायक बहुपत्नीक आहेत. त्यामुळें त्याला एकपत्नीव्रताची महती माहीत नव्हती असें कांही टीकाकार म्हणतात, तें मात्र आम्हांस संमत नाही. कारण मेघदूतांतील यक्ष व रघुवंशांतील अज व राम हे एकपत्नीकच आहेत; व त्यांच्या उत्कट पत्नीप्रेमाचें वर्णन कालिदासाने अत्यंत विस्तृतपणें व रम्यतेने केलें आहे. त्याच्या नाटकांतील नायक बहुपत्नीक असण्याचें कारण त्याचा राजाश्रय हें होय. राजदरबारीं दाखविल्या जाणाऱ्या नाटकांचा विषय राजचरित हाच असावयाचा व त्यांत त्यांचें बहुपत्नीकत्व आलें नसतें तरच आश्चर्य. भवभूतीने आपलीं नाटकें लिहिली त्या वेळीं त्याला राजाश्रयाभावी अशीं बंधनें नव्हती; म्हणून त्याच्या 'मालतीमाधव' व 'उत्तररामचरित' या नाटकांत विशुद्ध पत्नीप्रेमाचें चित्र रंगविलें आहे.

सृष्टिवर्णन–आधुनिक वाचकांना कालिदासाचे ग्रंथ आवडण्याचें दुसरें एक कारण त्यांतील अप्रतिम सृष्टिवर्णन हें होय. कालिदासाला सृष्टिवर्णन करण्याची अत्यंत हौस होती. त्याच्या ग्रंथांत एका ना एका ऋतूचें वर्णन आलें आहे, हें आम्ही मागे दाखविलेंच आहे. तथापि 'ऋतुसंहारा'पासून 'रघुवंशा'पर्यंत त्याचे ग्रंथ क्रमाने वाचीत गेल्यास त्याच्या निसर्गाकडे पाहण्याच्या दृष्टींत व सृष्टिवर्णनाच्या पद्धतींत कसा फरक पडत गेला तें दिसून येतें. 'महाभारत' व 'रामायण' यांतील बहुतेक भागांत लतावृक्षांच्या लांबलचक याद्या देऊन सृष्टिवर्णन केलेलें आढळतें. 'ऋतुसंहारा'त कालिदास त्यापुढे पुष्कळच गेला आहे यांत संशय नाही. सृष्टींतील उज्ज्वलवर्णांकडे कवीचें लक्ष गेलेलें दिसतें(ऋतु० ३, २). तींतील ऋतुभिन्नत्वाने कामिजनांवर होणाऱ्या परिणामांचें व त्यांच्या मनांत उत्पन्न होणाऱ्या विकारविचारांचें यथातथ्य वर्णन त्याने केलें आहे. क्वचित् निसर्गांतील नदीवृक्षांवर चेतन धर्माचा आरोप करून केलेलें त्यांचें आलंकारिक वर्णनही त्यांत आलें आहे यांत शंका नाही. तथापि सर्व सृष्टींत एकच चैतन्य भरून राहिलें आहे, स्त्रीपुरुषांप्रमाणें लतावृक्षादि त्याचींच भिन्नभिन्न रूपें होत, ही कल्पना त्याच्या प्रथमच्या ग्रंथांत दिसत नाही. नंतरच्या ग्रंथांत उपनिषदां-

तील वर्णनास अनुसरून त्याने कांही ठिकाणीं लतावृक्षांत वनदेवतांचें अस्तित्व असतें हें दाखविलें आहें. स्वप्नामध्यें,मोठ्या प्रयासाने आपल्या पत्नीचें दर्शन झाल्यावर तिला घट्ट मिठी मारण्याकरितां यक्ष आपले बाहु पसरी ते पाहून वनदेवतांच्या नेत्रांतून मोत्यांसारखे स्थूल अश्रुबिंदु झाडांच्या पानावर पडत असत असें 'मेघदूतां'त वर्णिलें आहे.शकुंतला सासरी जाऊं लागली त्यावेळीं कांही वृक्षांतून वनदेवतांनी आपले कोमल हात मनगटापर्यंत बाहेर काढून तिजकरितां अलंकार दिले असें 'शाकुंतलां'त दाखविलें आहे. इतर ठिकाणीं लतावृक्षांना सचेतन मानून मनुष्यप्राण्याच्या दुःखावस्थेंत पशुपक्ष्यांप्रमाणें त्यांनाही सहानुभूति वाटते असें वर्णन आले आहे. रावणाने सीतेला ज्या मार्गाने नेलें तो मार्ग लतांनी आपल्या शाखांचे पल्लव त्या बाजूला वळवून रामाला सुचविला, हरिणींनी दर्भांकुर खाण्याचें टाकून दक्षिण दिशेकडे डोळे लावून तेंच कार्य केलें (रघु० १३, २४, २५), अशा तऱ्हेच्या वर्णनाने निसर्गांतील सुखदुःखसंवेदित्व कवीने प्रकट केलें आहे. तसेंच मनुष्यांप्रमाणेंच इतर प्राण्यांवर व लतावृक्षादि अचेतन समजल्या जाणाऱ्या वस्तूंवरही वसंतादि ऋतूंचा कसा परिणाम होतो हें त्याने 'कुमारसंभवां'त दाखविलें आहे (कुमार० ६.३६,३९ पहा). त्याच्या सर्व नायिकांना पुष्पांची अतिशय आवड आहे. एकदरीत कालिदासाच्या ग्रंथांवरून तत्कालीन लोकांना पुष्पाचा अतिशय षोक दिसतो. शहराबाहेर फुलांचीं विस्तृत उपवनें असत व त्यांतील फुलें खुडून शहरांत विकण्याचें काम तरुण बालिका करीत असत. मोठमोठ्या वाड्यांत फुलांचा सुगंध दरवळलेला असे. तत्कालीन स्त्रियांच्या पुष्पमय वेषभूषेवरून कालिदासाला अलकेंतील स्त्रियांचें पुढील वर्णन सुचलेलें दिसतें—

> हस्ते लीलाकमलमलके बालकुन्दानुविद्धं
> नीता लोध्रप्रसवरजसा पाण्डुतामाननश्रीः ।
> चूडापाशे नवकुरबकं चारु कर्णे शिरीषं
> सीमन्ते च त्वदुपगमजं यत्र नीपं वधूनाम् ॥ मेघ० ७१.

कालिदासाचें निसर्गवर्णन अत्यंत सूक्ष्म व मार्मिक आहे. त्याचें मन राजशिबिराच्या सभोवार दिसणाऱ्या दृश्यांत, तसेंच, ऋषींच्या तपोवनांत,

पर्वताच्या उत्तुंग शिखरावर आणि मृगयारण्यांत सारखेंच रमतें. त्याने काढलेलीं निसर्गाचीं चित्रें सांप्रदायिक पद्धतीचीं व ठरीव ठशाचीं नसून त्यांत प्रत्यक्ष निरीक्षणाचा ताजेपणा, सहृदयतेचा ओलावा, भावनेची रसिकता व कल्पनेची भरारी हीं दृष्टीस पडतात. विस्तारभयास्तव आणखी उदाहरणें देतां येत नाहीत; पण पूर्वी उद्धृत केलेल्या श्लोकांवरूनही सहृदय वाचकांस वरील विधानांची सत्यता पटेल. हा विषय संपविण्यापूर्वी कालिदासाच्या कल्पकतेचें उदाहरण म्हणून त्याच्या सृष्टिवर्णनातील एका विशेषाचा येथे उल्लेख करणें अवश्य आहे. आकाशस्थ व्यक्तींना भूपृष्ठावरील पदार्थ कसे दिसनात याचें त्याने स्वकल्पनेने अनेक ठिकाणीं रम्य वर्णन केलें आहे. 'मेघदूतां'त मेघ नदी-पर्वतांवर आला असतां कसा दिसेल याचें यक्षाने केलेलें वर्णन मागे दिलेंच आहे. 'रघुवंशां'त रावणवधानंतर पुष्पक विमानांत बसून अयोध्येस जात असतां रामाने खाली दिसणाऱ्या समुद्र, नद्या, सरोवरें, नगरें इत्यादिकांचें मनोहर वर्णन केलें आहे. स्वर्गांतून हेमकूट पर्वतावर उतरतांना दुष्यन्ताला पृथ्वी कशी दिसली तें खालील श्लोकांत वर्णिलें आहे—

शैलानामवरोहतीव शिखरादुन्मज्जतां मेदिनी
पर्णाभ्यन्तरलीनतां विजहति स्कन्धोदयात्पादपाः।
सन्तानात्तनुभावनष्टसलिला व्यक्तिं भजन्त्यापगाः
केनाप्युत्क्षिपतेव पश्य भुवनं मत्पार्श्वमानीयते। शाकु० ७, ८.

'पर्वत जोराने वर येत असल्यामुळें त्यांच्या शिखरांखाली पृथ्वी जात आहे असें वाटतें. वृक्षांच्या शाखा दिसूं लागल्यामुळें ते आता पूर्वीप्रमाणें पानांनी झांकून गेलेले असे दिसत नाहीत. लांबून निर्जल वाटणाऱ्या नद्या आता स्पष्ट दिसूं लागल्या आहेत. कोणी तरी जग मजजवळ उंच फेकीत आहे पहा!' हल्ली विमानांतून खाली उतरणाऱ्या लोकांस या तऱ्हेचाच अनुभव येतो असें म्हणतात. त्यावरूनही कालिदासाच्या कल्पकतेचें सानंदाश्चर्य वाटतें

विनोद—कालिदासीय ग्रंथांचा आणखी एक लक्षांत घेण्यासारखा विशेष म्हणजे त्यांतील विनोद हा होय. जयदेव कवीने कविताकामिनीच्या वर्णनांत भाषाला तिचा हास असें म्हटलें आहे. सध्या उपलब्ध

असलेल्या भासाच्या तेरा नाटकांपैकी फक्त चार पांच नाटकांतच विनोद आढळतो; त्यामुळें अनुप्रासलालसेने तर जयदेवाने असें वर्णन केलें नसेल ना, अशी शंका येते. तें कसेंही असलें तरी इतर कवींच्या नाटयकृतींत उत्कृष्ट प्रकारचा विनोद आढळत नाही असा त्याचा अर्थ ध्यावयाचा नाही. किंबहुना कालिदासाच्या कृतीतच अनेक ठिकाणीं उत्तम प्रकारचा भारदस्त विनोद आला आहे, तो लक्षांत घेतां त्यालाही कविताकामिनीचा हास ही पदवी शोभली असती असें वाटल्याशिवाय राहत नाही.

असंबद्धता, अनपेक्षितपणा, कृत्रिमता, ढोंगीपणा इत्यादि कारणांमुळें जो हास्योत्पादक चमत्कार उत्पन्न होतो तो विनोद अशी विनोदाची व्याख्या करितां येईल. विनोदाचे स्वभावनिष्ठ, प्रसंगनिष्ठ व शब्दनिष्ठ असे तीन प्रकार करतां येतात. या तीनही प्रकारांचीं उदाहरणें कालिदासाच्या ग्रंथांत आढळतात. त्याच्या नाटकांतील मुख्य विनोदी पात्र म्हणजे विदूषक. हा त्याच्या तीन्ही नाटकांत दिसतो. 'मालविकाग्निमित्रां'तील गौतम, 'विक्रमोर्वशीया'तील माणवक व 'शाकुंतलां'तील माढव्य यांच्या स्वभावांत कांही बाबतींत साम्य तर कांहींत वैषम्य आढळतें. हे तीन्ही विदूषक ब्राह्मण असून नायकाचे नर्मसचिव आहेत. त्यांचें काम राजाचें मनोरंजन करणें व त्याच्या प्रेमव्यवहारांत यथाशक्ति मदत करणें हें होय. तिघेही ब्राह्मण जातीचे असले तरी विद्वत्तेच्या नांवाने शून्यच ! त्यामुळें त्यांना महाब्राह्मण असें औपरोधिकपणें म्हटलें आहे. तिघेही दिसण्यांत कुरूप आहेत. 'मालविकाग्निमित्रां'त अनपेक्षितपणें इरावती उपस्थित झाल्यामुळें राजाबरोबर गौतमही पेचांत सांपडतो. तितक्यांत पिंगल वानराने वसुलक्ष्मी नामक लहान राजकन्येला भिवविल्यामुळें तिला उगी करण्याकरितां इरावती राजाला तिकडे जावयास सांगते, व गौतमाचीही अडचणीतून सुटका होते. तेव्हा तो म्हणतो, 'शाबास पिंगल वानरा, शाबास ! योग्य वेळीं तूं आपल्या सोबत्याच्या रक्षणार्थ धावून आलास !' 'विक्रमोर्वशीया'त राजाने आपल्या पुत्राला मनांत कांही शंका न आणतां माणवकाला नमस्कार करण्यास सांगितलें; तेव्हा माणवक म्हणतो, 'शंका (भीति) वाटण्याचें कारण काय ? याने आश्रमांत माकडें पाहिलींच असतील!' या ठिकाणी शरीराच्या कुरूपतेमुळें विनोद उत्पन्न झाला असला तरी कुरूप

माणसानेंच तो स्वत:विषयीं केला असल्यामुळें बोचक झाला नाही. असो. याशिवाय तिघेही विदूषक खाद्यलोलुप व आळशी आहेत. 'मालविकाग्नि-मित्रां'तील गौतम अन्त:पुरांतील स्त्रियांच्या स्वस्तिवायनांनी गलेलठ्ठ झालेला दाखविला आहे. विक्रमोर्वशीयां'तील माणवकाला पाकशाळेंतील पंचविध पक्वान्नें तयार होत असतां तीं पाहण्याखेरीज दुसरें विनोदाचें साधन सुचत नाही. 'शाकुंतलां'तील माढव्य अरण्यांत अनियमित वेळीं मिळणारें कदन्न व कडवट पाणी यांनी अगदी बेजार होतो. खाद्यपदार्थ नेहेमी डोळयापुढे असल्यामुळे तीन्ही विदूषकांना उपमादृष्टांतादि अलंकार त्यांवरूनच सुचलेले दिसतात. तसेंच हे तिघेही अत्यंत भित्रे आहेत. गौतम केतकीच्या अग्राने बोटाला टोचून घेऊन सर्पदंशाचा अभिनय करण्यांत निपुण असला, तरी निद्रित असतां सापासारखें वाकडें लाकूड अंगावर पडलें असतां गर्भगळीत होती. माढव्याला प्रथम शकुन्तलेला पाहण्याची अत्यंत उत्सुकता होती, पण पुढे ती राक्षसांच्या भीतीमुळें पार आटून गेली. याप्रमाणें त्यांच्या स्वभावांत अतिशय साम्य असलें तरी फरकही पुष्कळच आहे. यांपैकी गौतम हा युक्तिबाज, हजरजबाबी व व चतुर आहे, तर माणवक अगदी भोळा व माढव्य सांगकाम्या आहे. विदूषकाच्या स्वभावांत हा जो उत्तरोत्तर फरक दिसतो तो कालि-दासाने बुद्धिपुर:सर केला आहे. मागे 'मालविकाग्निमित्रां'तील पात्रांचें स्वभाववर्णन करते वेळीं त्या नाटकांत गौतमाच्या कर्तबगारीमुळें नायक कसा मेषपात्र बनला आहे तें आम्ही दाखविलें आहे. नायकाच्या स्वभावाला उठाव देण्याकरितां व विदूषकाच्या स्वभावांतील विसंगति टाळण्याकरितां कालिदासाने आपल्या इतर नाटकांत प्राचीन परंपरे-प्रमाणें विदूषकाला खादाड, मूर्ख व आळशी असेंच रंगविलें आहे.

विदूषकाच्या भाषणांतील साध्या घरगुती उपमादृष्टांतांनी चमत्कृति उत्पन्न होते व विनोद खुलतो. हरदत्त व गणदास यांच्या कलहांमुळें मालविका राजाच्या दृष्टीस पडेल अशी धारिणीला भीति वाटते म्हणून 'यांचा हा विवादच मला पसंत नाही' असें ती म्हणते तेव्हा गौतम उत्तर करतो, 'राणीसाहेब ! पाहूं या बोकडांची टक्कर ! उगीच कां यांना वेतन द्यावें ?' यांत कलह करणाऱ्या नाटचाचार्यांना

दिलेली वोकडाची उपमा अनपेक्षित असल्यामुळें विनोदकारक आहे. आपला पति उर्वशीचा नाद सोडीत नाही असें पाहून औशीनरी राणी प्रियानुप्रसादन व्रताच्या मिषाने रोहिणीयुक्त चन्द्रास साक्ष ठेवून उर्वशीशीं प्रेमभावाने वागण्याचा आपला निश्चय प्रकट करते; तेव्हा विदूषक म्हणतो, "हातांतून मासा निसटून गेला की धीवर म्हणतो, 'बरें झालें मला पुण्य लागेल !'" यांतील धीवराचा दृष्टांतही असाच चमत्कृति उत्पन्न करणारा आहे. अन्तःपुरांतील सुंदर स्त्रिया सोडून वनांतील मुनिकन्येच्या मागे लागणाऱ्या दुष्यन्ताला सदैव पेंडखजूर खाऊन कंटाळल्यामुळें चिंचेवर वासना जाणाऱ्या माणसाची दिलेली उपमाही त्याच प्रकारची आहे.

विदूषक हा अगदी साधाभोळा व मंदबुद्धि असल्यामुळें त्याला काव्यमय उक्ति किंवा लाक्षणिक वचनें समजत नाहीत. त्यांचा वाच्यार्थच खरा समजून तो आपणास हास्यास्पद करून घेतो. वसन्तऋतूंतील आम्रमंजरीला दुष्यन्ताने मदनबाण म्हटलेलें ऐकून माढव्य आपला सोटा उगारून त्या बाणांचा नाश करावयाला धावतो तें पाहून दुःखित राजालाही हसूं येतें. असो.

कालिदासाने आपल्या नायकांना जसे विदूषक तशा नायिकांना त्यांच्या विनोदी सख्या दिल्या आहेत. 'मालविकाग्निमित्रां'तील मालविकेची समदुःखी संकटांत न डगमगणारी 'विमर्दसुरभि' सखी बकुलावलिका, सदैव उर्वशीबरोबर असणारी चित्रलेखा व शकुंतलेची प्रेमळ, चेष्टेखोर मैत्रीण प्रियंवदा यांच्या संभाषणांत उत्तरोत्तर जास्त विनोद आला आहे. श्लिष्ट शब्दांच्या प्रयोगाने बकुलावलिका मालविकेच्या तोंडून तिचें राजावर बसलेले प्रेम कसें व्यक्त करविते तें आपण मागें (पृ० १५१) पाहिलेंच आहे. चित्ररथ गंधर्वाबरोबर स्वर्गांत जातांना राजाला आणखी एकदा पाहावें म्हणून उर्वशी आपला मोत्यांचा एकसर लतेंत अडकला आहे असें दाखविते व चित्रलेखेला तो सोडविण्यास सांगते. तेव्हा तीही हसून म्हणते, 'फारच बाई गुतून गेला आहे ही ! सुटायला मोठी कठीण दिसते. पाहतें प्रयत्न करून.' पण या दोघींपेक्षाही प्रियंवदा जास्त विनोदी आहे. तिच्या विनोदांत तिचा मनमोकळेपणा व आनंदी स्वभाव उत्तम रीतीने व्यक्त झाला आहे. वसंत-

ऋतूंतील नूतन पालवीने भरून गेलेला आम्रवृक्ष व नुकतीच बहरलेली वनज्योत्स्ना यांच्या रमणीय संयोगाकडे शकुन्तला बराच वेळ पहात उभी राहते तें पाहून प्रियंवदा म्हणते, 'अनसूये ! ही शकुन्तला वनज्योत्स्नेकडे इतकी निरखून का पाहत आहे आलें का ध्यानांत ? वनज्योत्स्नेला योग्य असा वृक्ष मिळाला तसा मलाही अनुरूप पति मिळेल का ? असे विचार तिच्या मनांत चालले आहेत.' शकुन्तलेला तिची चेष्टा मनांतून आवडते पण वरकरणी ती तिच्यावर रागावते. असे तीन चार प्रसंग 'शाकुंतला'च्या पहिल्या अंकांत आले आहेत, त्यांत समवयस्क व प्रेमळ अशा अविवाहित तरुण मुलींमध्यें नेहमी चालणाऱ्या रम्य विनोदाचें सुंदर चित्र कवीनें काढलें आहे. 'कुमारसंभवां'त विवाहप्रसंगी पार्वतीच्या पायांना रंग लावून 'याने आपल्या पतीच्या डोक्यावर बसलेल्या चन्द्रकलेला ताडन कर' असे तिची सखी विनोदाने म्हणाली; त्यावर पार्वतीने कांही न बोलतां हातांतील पुष्पमालेने तिला ताडन केलें, असा प्रसंग कवीने वर्णिला आहे. 'रघुवंशां'तही अनेक राजांना नापसंत करणाऱ्या इन्दुमतीचें अजावर प्रेम बसलेलें पाहून 'चला आपण दुसऱ्या राजाकडे जाऊ' असें चेष्टेने सुनन्दा म्हणाली; त्यावर इन्दुमती तिच्याकडे रागाने पाहूं लागली, असें वर्णन आलें आहे. यांतही त्याच प्रकारचा विनोद दिसून येतो. याशिवाय स्वत:च्या विसंगत वर्तनाने आपला ढोंगीपणा व्यक्त करणारी पात्रें निर्माण करून मानवी स्वभावांतील दोष कालिदासाने हलक्या हाताने दाखविले आहेत. स्वत:ला शिकारीचा कंटाळा आला असतांही केवळ राजाच्या मर्जीकरितां तिची स्तुति करणारा तोंडपुजा सेनापति व घटकेपूर्वी धीवराच्या गळ्यांत तांबडया फुलांची माला बांधून त्याला वधस्तंभाकडे नेण्याकरितां अत्यंत उत्सुक असणारे, पण त्याला मिळालेलें मोठें बक्षीस पाहून दारूच्या आशेने त्याचे जिवलग दोस्त होणारे पोलिस शिपाई यांचें विनोदी दृश्य 'शाकुंतलां'त काढलें आहे.

कालिदासाच्या ग्रथांत प्रसगनिष्ठ विनोदाचींही कांही स्थळें आढळतात. एखादी व्यक्ति स्वत: विनोदी नसली तरी ती एखादे वेळीं अशा परिस्थितींत सापडते की त्यावेळचें तिचें वर्तन व भाषण हीं तिला न कळत विनोदोत्पादक होतात. 'मालविकाग्निमित्रा'च्या पहिल्या अंकांतील नाटयाचार्याच्या कलहाचा प्रसंग या प्रकारचा आहे.मालविकेला पाहण्याला अन्तर्या-

मीं उत्सुक असलेला पण बाह्यात्कारीं आपण त्या गांवचेच नव्हे असा बहाणा करणारा अग्निमित्र, निःपक्षपातीपणाचा आव आणून राजाचा मनोरथ पूर्ण करण्याकरितां सर्वांसमक्ष मालविकेचा नाट्यप्रसंग घडवून आणणारी परिव्राजिका, औपरोधिक भाषणाने गणदासास चिथावणारा गौतम ही धारिणी राणीस अशा कचाट्यात आणतात, की त्या नाट्य-प्रयोगाला संमति देण्याशिवाय तिला गत्यंतर नाहींसें होतें. हा प्रयोग राजासमोर होऊं नये म्हणून ती जो जो प्रयत्न करते तो तो तिच्या आगलट येतो. हा प्रसगही बहारीचा वठला आहे. याशिवाय कालिदासाने दुसऱ्याही एका विनोदी प्रसगाची योजना कांहीं ठिकाणी केली आहे. दोन व्यक्तींची गाठ पडली असता त्याच्यापैकी एकाचें खरें स्वरूप दुसरीस माहीत नसेल तर त्यांच्या संभाषणांत विनोद उत्पन्न होतो. असे प्रसंग भासाच्या 'मध्यमव्यायोग' व 'पञ्चरात्र' या नाटकांत आले आहेत. कालि-दासाच्या 'कुमारसंभवा'तही अजिनदण्डधारी वटूचे स्वरूप धारण करणारे भगवान् शंकर व दृढनिश्चयाने पतिप्राप्तीकरितां तपश्चर्या करणारी पार्वती यांच्या संभाषणात या तऱ्हेचाच विनोद साधला आहे. अशा तऱ्हेचाच दुसरा प्रसंग 'रघुवंशा'तील सिंहदिलीपसवादांत आला आहे. पण त्याचें पर्यवसान दिलीपाच्या आत्मयज्ञांत होत असल्यामुळे त्यांत विनोदापेक्षा गांभीर्याचीच छटा जास्त आहे. असो.

कालिदासाचीं नाटके राजदरबारीं विद्वत्परिषदेसमोर होत अस-ल्याने गांवढळ लोकांना समजणारा व रुचणारा पाचवळ विनोद व बाष्कळ कोटिक्रम त्याच्या नाटकांत दिसून येत नाही. शब्दनिष्ठ विनोदाचीं कांही स्थळें त्यांत आढळतात; पण त्या ठिकाणचाही विनोद विद्वानांना रुचेल असाच आहे. आपणावर शकुन्तलेचें प्रेम असावें असें वाटण्याचीं कारणें राजाने सांगतांच विदूषक म्हणतो, 'कृतं त्वयोपवनं तपोवनमिति पश्यामि' तूं तपोवनाला उपवनच केलें आहेस असें वाटतें. यांत उपवन व तपोवन यांतील उच्चारसादृश्यावरून विदूषकाने कोटी केली आहे. 'मालविकाग्निमित्रां'त बकुलावलिका व विदूषक यांनी केलेल्या शब्दश्लेषमूलक कोटयांचीं उदाहरणें मागे दिलींच आहेत. 'विक्रमोर्वशीयां'त राजाने उर्वशीच्या सौंदर्याचें वर्णन केल्यावर विदूषक

म्हणतो, 'म्हणूनच आपण दिव्यरसाभिलाषी होऊन चातकव्रत घेतलेलें दिसतें !' उर्वशी ही स्वर्गीय अप्सरा. म्हणून राजाच्या तद्विषयक प्रेमास दिव्यरसाभिलाष म्हटलें आहे. चातक पक्ष्याचाही पर्जन्यरूपी दिव्य रसाचा (जलाचा) अभिलाष प्रसिद्ध आहे. या ठिकाणींही शब्दश्लेषाने कोटी झाली आहे. तथापि शब्दश्लेषाची कालिदासाला फारशी आवड नसल्याने अशा कोटचा त्याच्या ग्रंथांत फारशा आढळत नाहीत.

परिहासाप्रमाणें उपहासांतही कालिदासाचें नैपुण्य दिसून येतें. मालविका राजाच्या दृष्टीस पडूं नये म्हणून धारिणी आपल्या नाट्याचार्यास 'या निरर्थक कामांत पडूं नको' म्हणून सांगते; त्यावर विदूषक म्हणतो, 'ठीक बोलतां राणीसाहेब ! अरे गणदासा ! संगीताच्या मिषाने सरस्वतीपुढले नैवेद्याचे मोदक खाणारा तूं! तुला या विवादाची कटकट कशाला पाहिजे ? यांत तुझा हटकून पराजय व्हावयाचा !' मालविकेच्या दर्शनाकरितां राजाला हरतऱ्हेचा प्रयत्न करतांना पाहून धारिणी ' राजकार्यांत अशीच उपायनिपुणता आपण दाखविली तर फार बरें होईल,' असा टोमणा त्याला मारते. मालविकेशीं लघळपणा करतांना पकडला गेल्यावर ' तूं उशीर केलास म्हणून मी हिची थोडी थट्टा करून मनाला रमवीत होतों,' असे म्हणून राजा इरावतीचें समाधान करण्याचा प्रयत्न करतो; त्यावर ती उत्तर करते, 'मला नव्हतें माहीत, असलें विनोदपात्र आपणांला लाभलें आहे म्हणून. नाही तर ही मन्दभागिनी येथे आली नसती !' इतर नाटकांतही अशा तऱ्हेच्या उक्ति आल्या आहेत.

येथवर कालिदासाच्या ग्रंथांतील अनेक रम्य विशेषांचें विवेचन केलें. त्यावरून कालिदासाचे ग्रंथ आज दीड हजार वर्षें संस्कृतज्ञांस कां प्रिय झाले आहेत तें वाचकांच्या ध्यानांत येईल. पण कोणतीही मानवी कृति घेतली तरी तींत कांहीना कांही तरी वैगुण्य अथवा दोष राहत नाही असें सहसा होत नाही. या न्यायाने कालिदासाच्या ग्रंथांतही टीकाकारांनी व आलंकारिकांनी अनेक उणीवा व दोष दाखविले आहेत. हें प्रकरण संपविण्यापूर्वी त्यांचा थोडक्यांत विचार करणें जरूर आहे.

प्रथम उणीवांचा विचार करूं. मागे सांगितल्याप्रमाणें कालिदासाच्या ग्रंथांत शृंगार व करुण ह्या दोनच रसांचा उत्तम परिपोष झालेला

आढळतो. त्यांतही करुणरसांत भवभूति त्याच्यापेक्षा वरचढ ठरेल. 'कारुण्यं भवभूतिरेव तनुते' ही सुभाषितकाराची उक्ति प्रसिद्धच आहे. आपल्या विलासी, रंगेल व सौंदर्यान्वेषी कवीला रौद्र, वीर व बीभत्स हे रस चांगले साधत नाहीत. 'रघुवंशा'च्या सातव्या सर्गांत इन्दुमतीविवाहानंतर अज, आणि इन्दुमती न मिळाल्यागुळें निराश झालेले इतर राजे, यांचें युद्ध वर्णिलें आहे. पण त्यांतही ललितमधुर शब्दांची योजना केल्यामुळें वीर किंवा रौद्र रसांची प्रतीति होत नाही. भट्ट नारायणाचें 'वेणीसंहार' हें नाटक वीररसांत अधिक सरस आहे. कालिदासाच्या ग्रंथांत खल पुरुषांचीं चित्रें कोठेही काढलेलीं दिसत नाहीत. त्याच्या नाट्यसृष्टीत विविधता कमी आहे. 'विक्रमोर्वशीय' व 'शाकुंतल' यांच्या प्रारंभींच्या प्रवेशांत-नायकनायिकांचें प्रथम दर्शन, परस्परप्रेमदर्शक हावभाव, नायकाला पुनः एकदा पाहतां यावें म्हणून नायिकेने कांही निमित्ताने मागे राहणें, इत्यादि प्रसंगांत इतकें साम्य आहे की शाकुंतल हें सर्वोत्कृष्ट नाटक रचतां यावें म्हणून कवीने 'विक्रमोर्वशीय' हा पहिला प्रयत्न केला असावा असें वाटतें. मालविकाग्निमित्र' व 'विक्रमोर्वशीय' यांतही असेंच प्रसंगसाम्य आहे. त्याच्या नाटकांतील बहुतेक पात्रें राजदरबारी असणाऱ्या कवींच्या दृष्टीसमोर येतील अशींच आहेत. त्यांत भास व शूद्रक कवींची सर्वतोगामी निरीक्षणशक्ति व सहानुभूति दिसत नाही. त्याच्या नाट्यस्त्रीसृष्टींत उदात्ततेचा अंश कमी आहे हें मागे दाखविलेंच आहे. निसर्गाच्या भव्य व भीषण स्वरूपाकडे कवीचें लक्ष गेलेलें दिसत नाही; किंवा तें गेलें असल्यास स्वतःच्या सौम्य स्वभावामुळें त्याला तें स्वरूप आवडलें नसावें. गंभीरप्रकृति भवभूतीच्या नाटकांत त्याचें यथार्थ वर्णन दृष्टीस पडतें.

प्रो.कीथ यांनी आपल्या Sanskrit Drama या ग्रंथांत (पृ० १६०) कालिदासाविषयीं पुढील उद्गार काढले आहेत. "कालिदासाचे ग्रंथ प्रशंसनीय आहेत. तथापि तो आपल्या काव्यांत तसेंच नाटकांतही जीवित व दैव (Destiny) या महत्त्वाच्या प्रश्नांत मुळीच लक्ष घालत नाही ही गोष्ट दृष्टीआड करणें न्याय्य होणार नाही. जर्मन कवीने-गटेने-केलेली प्रशंसा, व 'हिंदुस्थानचा शेक्सपीयर' ही सर विल्यम् जोन्सने कालिदासाला दिलेली पदवी यथार्थच आहे. तथापि कालिदासाची स्वकालीन ब्राह्मणप्रणीत धर्मा-

वर निष्ठा होती हें स्पष्ट दिसतें. तिजमुळें त्याच्या सहानुभूतीचे विषय कमी झाले आहेत याकडेही आपण दुर्लक्ष करतां कामा नये. मनुष्य आपल्या कर्मांनी दैवाची उत्पत्ति करतो. त्या दैवाचाच सर्वत्र न्याय्य अधिकार चालत आहे अशी त्याची खात्री होती; त्यामुळे जग हे एक दुःखपूर्ण स्थळ आहे, त्यात अन्यायाचा अंमल चालला आहे, असें मानणे व बहुजनसमाजाच्या कष्टमय जीविताबद्दल सहानुभूति वाटणें त्याला शक्य नव्हते. स्वतःच्या आकुंचित मर्यादेबाहेर त्याला जातां येईना." प्रो. कीथ यांची ही टीका पुष्कळ अंशी अयोग्य आहे. कालिदासाच्या नाट्यसृष्टीत विविधता कमी आहे ही गोष्ट आम्हीही मागे दाखविली आहे. पण याचे कारण तो ब्राह्मणधर्मानुयायी होता हें नसून तो राजकवि होता हे होय. पण प्रो. कीथ यांच्या टीकेंतील मुख्य मुद्दा दुसराच आहे. वरील विधाने करताना त्याच्या दृष्टीसमोर प्राचीन ग्रीक नाट्यवाङ्मय होते असें वाटतें. प्राचीन ग्रीक नाटकांचे आनंदपर्यवसायी व दुःखपर्यवसायी असे दोन भाग पडतात. ग्रीक लोक स्वतः मोठे आनंदी, विलासी व कलाभिज्ञ होते. ऋग्वेदकालीन आर्यांप्रमाणेंच त्यांनीही सृष्टीच्या भिन्न भिन्न स्वरूपांवर व व्यापारावर चेतनधर्मारोप करून अनेक सुंदर देव व देवता कल्पिल्या होत्या. तथापि त्यांच्या शोकपर्यवसायी नाटकांवर दैववादाची भीषण छाया पडलेली दिसते. सृष्टीतील गूढांच्या मुळाशी दैव (Destiny) म्हणून एक बलिष्ठ, सर्वव्यापी व निष्ठुर शक्ति आहे. मनुष्यप्राण्यांप्रमाणें देवादिकांवरही तिचा अंमल चालतो. सर्वांनी तिच्यापुढे आपली मान लवविलीच पाहिजे. कोणी तिचा प्रतिकार करूं लागल्यास अधिकच निष्ठुरपणें ती आपली इच्छा पूर्ण करते असें त्यांचें मत होतें. या दैवाच्या कृतींत कांही विशिष्ट हेतु दिसतो की नाही, त्याचा मानवी कर्मांशी कांही नैतिक संबंध असतो काय, असल्यास तो कोणत्या तऱ्हेचा, इत्यादि प्रश्नांचा विचार ग्रीक शोकपर्यवसायी नाटकांत केलेला आढळतो व तद्द्वारें जीवितांतील सुखदुःखाचीं गूढ कोडीं उलगडण्याचा प्रयत्न केलेला असतो. कांही नाटकांत मानवी जीवितांतील विविध कर्तव्यांचा कलह प्रतिबिम्बित झाला आहे. कित्येक प्रसंगीं नागरिकत्वामुळें किंवा समाजसंस्थेचा घटक असल्यामुळें प्राप्त झालेलें कर्तव्य कौटुंबिक कर्तव्याशीं विरोधी असतें. अशा वेळीं उत्पन्न

होणाऱ्या कर्तव्यकलहावर कांही नाटकांची उभारणी झाली आहे. अशा प्रकारच्या प्रश्नांचा विचार कालिदासीय ग्रंथांत आढळत नाही हा प्रो. कीथ यांच्या टीकेचा भावार्थ * आहे.

या बाबतींत प्रथम लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही की कोणत्याही कवीचे ग्रंथ परिस्थितिनिरपेक्ष नसतात. प्रत्येक ग्रंथकाराच्या कृतीवर तत्कालीन आचारविचारांचा परिणाम थोड्याना थोड्या अंशाने झालेला असतो. त्याच्या कृतींतील सौंदर्याचा अनुभव घ्यावयाचा असेल तर वाचकाने स्वतःला तत्कालीन परिस्थितींत नेलें पाहिजे. वर्धिष्णु, जयिष्णु व समृद्ध अशा गुप्तसाम्राज्यांत राहणाऱ्या कवीच्या कलाकृतींत सर्वत्र उत्साह, आनंद व आशावादित्व आढळलें तर त्यांत आश्चर्य कसलें? त्याच्या ग्रंथावर दुःखवादाची किंवा नैराश्याची कृष्ण छाया पसरलेली दिसत नाही याबद्दल नाक मुरडणें योग्य होणार नाही. शिवाय ग्रीक नाटककारांनी जे प्रश्न आपल्या ग्रंथांत विचारार्थ घेतलेले दिसतात, त्यांचीं उत्तरें कालिदासपूर्वकालीन ऋषीनी शेंकडो वर्षांच्या विचाराअंतीं आपल्या उपनिषदादि ग्रंथांत लिहून ठेविलीं आहेत. सृष्टीच्या मूळाशीं कोणी अघोर व निर्दय अशी दैत्यरूपी शक्ति नसून सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ व दयाळू परमेश्वराचें न्यायी राज्य चालू आहे. सृष्टींत बाह्यतः दिसणाऱ्या अन्यायाच्या मुळाशीं न्यायच आहे. मनुष्य स्वतःच्या कर्माचीं फळें इहपरलोकी भोगत असतो. म्हणून जीवितांतील त्रिविध तापांनी निराश न होतां 'उद्धरेदात्मनात्मानम्,' प्रत्येकाने स्वतःच्या प्रयत्नांनी आपलें निःश्रेयस साध्य करून घ्यावें, ही आमच्या प्राचीन ग्रंथांची शिकवण आहे. कालिदासाची उपनिषदें व भगवद्गीता यांवर निस्सीम श्रद्धा असल्याने त्यांतील धार्मिक व तात्विक विचारांचा त्याने आपल्या ग्रंथांत पुरस्कार केला आहे हें आम्ही पुढील प्रकरणांत दाखविणार आहों. शिवाय सर्व भारतीय तत्ववेत्त्यांनी कर्मवादाचा स्वीकार केला असल्यामुळें कालिदास ब्राह्मणमतानुयायी नसून बौद्ध किंवा जैनधर्मानुयायी असता तरी त्याच्या ग्रंथांत ग्रीक नाटकांत विचारार्थ घेतलेल्या प्रश्नांचीं तशीं उत्तरें सापडलीं नसतीं.

---

* Cf. Keith—The Sanskrit Drama, pp. 280–281.

पण याचा अर्थ त्याच्या ग्रंथांत दैववाद कोठेही आढळत नाही असें नाही. दैव किंवा भवितव्यता यांनी प्राणिमात्राचें जीवित नियंत्रित झालें आहे हें त्याने अनेक ठिकाणी सुचविलें आहे. 'इन्द्रियें भवितव्यतेला अनुसरत असतात;' म्हणूनच 'लक्ष्मीस्वयंवर' नाटकाच्या प्रसंगी उर्वशीच्या मुखांतून 'पुरुषोत्तमे' याबद्दल 'पुरूरवसि' असा शब्द बाहेर पडला. कांही कारण नसतां मालविकेला वर्षभर अज्ञातवासांतील दुःखे सहन करावीं लागलीं. दैवामुळें शकुन्तलेला पतिवियोगाचें दारुण दुःख प्राप्त होणार हें जाणून कण्वमुनीनी तिच्या प्रतिकूल दैवाची शांति करण्याकरितां सोमतीर्थासारख्या दूरच्या तीर्थाची यात्रा केली. या सर्व ठिकाणीं कालिदासाने दैव किंवा भवितव्यता यांचा अप्रतिकार्य आक्रम सुचविला आहे. तथापि दैव म्हणजे कोणी आंधळी किंवा निष्ठुर शक्ति नसून आपल्याच पूर्वजन्मीच्या कृत्यांचा परिणाम असतो हेंही त्याने अनेक ठिकाणी दाखविलें आहे. आपण निरपराधी आहों व पतीने आपला विनाकारण त्याग केला आहे हें माहीत असतांही त्याला दोष न देतां सीता 'ममैव जन्मान्तरपातकानां विपाकविस्फूर्जथुरप्रसह्यः।' [हा माझ्याच पूर्वजन्मींच्या पातकांचा असह्य असा परिणामरूपी वज्राघात आहे] असें म्हणते. विहार करतांना इन्दुमतीला आकस्मिक मृत्यु येतो त्याचें कारण तिचा पूर्वजन्मींचा अविवेक असें कालिदासाने दाखविलें आहे. भारतीय तत्त्वज्ञानांत कर्मवादाला पुनर्जन्माच्या कल्पनेची जोड दिली असल्याने अत्यंत दुःखी, हीन व दीन मनुष्यही आशावादी असतो. कारण इहलोकींचा अन्याय व दुःख हीं सर्वकाळ टिकणारीं नसून चक्रनेमिक्रमाने स्वकर्मानुसार त्यांची परिणति या नाही तर पुढील जन्मांत तरी न्यायांत व सुखांत होईल असा त्याला भरंवसा असतो. कालिदासाच्या ग्रंथांत शोकपूर्ण प्रसंगांची वाण नाही. मदनदाह, इन्दुमतीनिधन, उर्वशीरूपपरिवर्तन, शकुन्तलाप्रत्यादेश, इत्यादि अनेक प्रसंगांच्या वर्णनावरून मानवी जीवित म्हणजे सर्वस्वीं 'गुलाबाची शय्या' होय असें कवीचें मत असेल असें वाटत नाही. तथापि हे दुःखपूर्ण प्रसंग अन्तिम न मानतां त्याने त्यांचें सुखांत व आनंदांत पर्यवसान केलें आहे. त्यामुळें त्याचे ग्रंथ वाचून मनास आनंदाबरोबरच शांति व समाधान हीं प्राप्त होतात

याविषयीं प्रो. विल्सन यांचे पुढील उद्‌गार चिंतनीय वाटतील : 'हिंदुस्थानांत शोकपर्यवसायी व आनंदपर्यवसायी असे नाटकांचे भेद नसले तरी सर्व हिंदु नाटकांचा पट विविध रंगांच्या धाग्यांनी विणलेला दिसतो. त्यांत गांभीर्य व दुःख यांची सांगड रंगेलपणा व हास्य यांच्याशीं घातलेली असते. मानवी हृदयांतील भीति, अनुकंपा यांसुद्धा सर्व भावनांचा उद्रेक व्हावा असें त्यांचें उद्दिष्ट असलें तरी प्रेक्षकांच्या मनावर दुःखपूर्ण परिणाम करून तें साध्य केलेलें नसतें.' असो.

येथवर कालिदासाच्या ग्रंथांतील उणीवांचा विचार केला. जगांत कोणीही सर्वगुणसंपन्न नसल्यामुळें एखाद्याच्या स्वभावांतील किंवा कृतीतील उणीवांबद्दल त्याला नांवें ठेवणें योग्य होणार नाही. पण त्याची कृति किंवा उक्ति निर्दोष असावी अशी आपली अपेक्षा असते. शिवाय काव्यामध्यें दोष असल्यास त्यायोगें साक्षात् किंवा परंपरेने रसापकर्ष होतो. म्हणून सर्व आलंकारिकांनी दोषांचा सविस्तर विचार व वर्गीकरण केलें आहे. आनंदवर्धनासारख्या रसिक साहित्यशास्त्रज्ञाने 'तत्तु सूक्तिसहस्रद्योतितात्मनां महात्मनां दोषोद्‌घोषणमात्मन एव दूषणं भवति,' [हजारो सुंदर वचनांनी ज्यांनी स्वतःला उज्ज्वल केलें आहे अशा महात्म्यांच्या दोषांचें आविष्करण करणें हें टीकाकारासच दूषणास्पद होतें.] असें मानून दोषांचीं उदाहरणें देण्याचें टाळलें आहे. पण इतर आलंकारिकांनी इतका विवेक न करतां प्रत्येक दोषाचें उदाहरण महाकवींच्या ग्रंथांतून काढून दिलें आहे. यांत खुद्द कालिदासाच्या ग्रंथांतून इतरांच्या मानाने जास्तच उदाहरणें घेतलीं आहेत. यावरून कालिदासाचे ग्रंथ इतर कवींच्या ग्रंथांपेक्षा जास्त सदोष आहेत असा कांही अविवेकी वाचकांचा समज व्हावयाचा ! पण वस्तुस्थिति तशी नाही. कालिदासाच्या ग्रंथांतूनच बरींचशीं उदाहरणें निवडण्याचें कारण त्याच्या ग्रंथांची लोकप्रियता हें होय. स्वतःला माहीत असलेल्या श्लोकांतील दोष दाखविल्यास विद्यार्थ्यास तो चटकन् समजतो. इतर महाकवींचीं काव्यें बिलष्ट असल्याने त्यांचा प्रचार कमी होता; म्हणून या आलंकारिकांनी उदाहरणार्थ कालिदासाचे ग्रंथ निवडलेले दिसतात. दुसरें असें की कालिदास हा कविकुलगुरु. दैवी प्रसादाने त्याची

प्रतिभा स्फुरली, अशी परंपरागत समजूत. अशा कवीच्या हातूनही अशा चुका होतात, मग इतर कवींविषयीं बोलावयासच नको ! असें सुचवून दोषाचें सार्वत्रिकत्व व दोषवर्जनाचें महत्त्व विद्यार्थ्यांस व होतकरू कवीस पटवून द्यावें हाही या आलंकारिकांचा उद्देश असावा. असो. येथे कालिदासाच्या ग्रंथातील सर्व बारीक सारीक दोषाचा विचार न करतां काही प्रमुख दोषांचेंच विवेचन केलें आहे.—

१.अश्लीलता—सहृदय वाचकांस उद्वेगजनक असा कालिदासाच्या ग्रंथातील मुख्य दोष म्हणजे अश्लीलता हा होय. वर्णन करण्याच्या भरांत आपल्या रगेल व विलासी कवीस याचें भान राहिलेलें दिसत नाही. 'ज्ञातास्वादो विवृतजघना को विहातुं समर्थः' (मेघ० ४३) 'नितम्बमिव मेदिन्याः स्त्रस्तांशुकमलङ्घयत्' (रघु० ४, ५२) इत्यादि उक्तीत व अग्निवर्णाच्या स्त्रीसंभोग, वर्णनांत हा दोष आढळतो. उत्तान शृंगारामुळें कालिदासाच्या ग्रंथांचे कांही भाग पाठशाळांतील अध्यापनास अयोग्य झाले आहेत. 'कुमारसंभवां'तील देवीसंभोगवर्णनांत तर हया दोषाचा अगदी कळस झाला आहे. आधी उत्तमप्रकृति पात्रांच्या संभोगशृंगारावें वर्णन वाचून वाचकांच्या मनांत लज्जा उत्पन्न होते. तशांत हा शृंगार कवीला अत्यंत पूज्य वाटणाऱ्या त्रैलोक्याच्या जनकजननीचा—शिवपार्वतीचा—त्यामुळें तो अत्यंत अनुचित वाटतो. या शृंगारावें वर्णन वाचून प्रत्येक सहृदय वाचकास स्वतःच्या मातापित्याच्या संभोगवर्णनाने येते तशी किळस आली पाहिजे, असें सर्व प्रमुख आलंकारिकांनी म्हटलें आहे. कालिदासासारख्या महाकवीच्या ग्रंथांत तो दोष इतका भासत नाही याचें कारण तो त्याच्या अलौकिक प्रतिभेने झाकला जातो असें आनंदवर्धनाने म्हटलें आहे. तथापि तत्कालीन विद्वानांनी याला गहर्ण ठरविल्यामुळें कालिदासाने 'कुमारसंभव' अर्धवट सोडून दिलें असावें हें आम्ही मागे दाखविलेंच आहे.

मात्र हा दोष केवळ कालिदासाच्या ग्रंथांत दिसतो असें नाही. संस्कृत वाङमयांत शृंगार रसास अग्रपूजेचा मान मिळाला असल्याने सर्व संस्कृत काव्यांत तो थोड्याबहुत प्रमाणांत दिसून येतो.* नाटक हें दृश्य काव्य असल्याने स्त्रीपुरुषांच्या मिश्र समाजाने एकत्र बसून त्याचा

* बुद्धचरित ५, ५६ पहा

रसास्वाद घ्यावयाचा असतो. त्यामुळें नाटकांत तर अश्लीलता हा दोष जास्तच दूषणार्ह होतो. पण भवभूतीसारख्या गंभीर स्वभावाच्या सोवळ्या नाटककाराच्या 'मालतीमाधव' नाटकांत तो उत्तान स्वरूपांत आढळतो हें आश्चर्य आहे. कालिदासाच्या नाटकांत मात्र तो बहुधा दिसत नाही हें लक्षात घेण्यासारखें आहे. बहुधा म्हणण्याचें कारण कालिदासाच्या पहिल्या नाट्यकृतींत–'मालविकाग्निमित्रां'त–इरावतीच्या भाषणांत अश्लीलार्थ सूचित झाला आहे. अशोकाप्रमाणें स्वतःलाही पदप्रहार करून आपले मनोरथ पूर्ण करण्याविषयी राजा मालविकेला विनंती करतो, त्या वेळीं इरावती एकदम पुढे होऊन म्हणते, 'कर, कर पूर्ण यांचे मनोरथ! अशोक केवळ फुलें देईल. हे तर फुलें व फळेंही देतील!'

२. **च्युतसंस्कृतित्व**–काव्यांत अशुद्ध व्याकरणप्रयोगाचा उपयोग केला असल्यास 'च्युतसंस्कृतित्व' हा दोष होतो. शुद्ध भाषेचें महत्त्व ध्यानांत आणून प्राचीन आलंकारिकांनी आपल्या ग्रंथांचा एक स्वतंत्र परिच्छेद संस्कृत कवींच्या विवादास्पद प्रयोगांची छाननी करण्यांत खर्च केला आहे. कालिदासपूर्वकालीन अश्वघोष व भास या कवींचें व्याकरणशुद्धतेकडे फारसें लक्ष नव्हतें; त्यामुळे त्यांच्या ग्रंथांत अशुद्ध व्याकरणप्रयोगांची गर्दी उडालेली दिसते. व्यासवाल्मीक्यादि ऋषींच्या काव्यांतही हे दोष आढळतात. पण त्यांच्या अलौकिक तपस्येने त्यांच्या ग्रंथांस पूज्यता प्राप्त झाल्यामुळें त्यांतील व्याकरणदुष्ट प्रयोगांस आर्ष म्हणण्याचा प्रघात आहे. पण अश्वघोषादिकांच्या ग्रंथांतील अशुद्ध प्रयोगांस दूष्यच मानतात. कालिदासाचें भाषाशुद्धतेकडे विशेष लक्ष होतें. 'संस्कारवत्येव गिरा मनीषी' (कुमार० १,२८) या उपमेंत सुसंस्कृत भाषेने विद्वान् पवित्र होतो व शोभतो असें त्याने स्वतःच म्हटलें आहे व सामान्यतः त्याच्या ग्रंथांत दुष्ट प्रयोग क्वचितच सापडतात. तथापि क्वचित् अनवधानाने त्याच्याही हातून झालेल्या चुका आलंकारिकांनी व टीकाकारांनी दाखविल्या आहेत. उदाहरणार्थ—

१. लावण्य.उत्पाद्य इवास यत्नः। (कुमार० १.३५.)
तेनास लोकः पितृमान् विनेत्रा। (रघु० १४,२३.)

या पंक्तींत 'आस' असें अस् धातूचें द्वितीय भूतकाळीं तृतीय पुरुषीं एकवचनी रूप कवीने योजिलें आहे. पण 'अस्तेर्भूः' (२,४,५२) या पाणिनिसूत्राप्रमाणें

अस् धातूचें द्वितीय भूतकाळीं स्वतंत्र रूप योजीत नाहीत. या ठिकाणीं आस हें 'अस गतिदीप्त्यादानेषु' या धातुपाठांतील सूत्राप्रमाणें दुसऱ्याच एका दीप्त्यर्थक अस् धातूचें रूप मानावें असें 'काव्यालंकारसूत्रवृत्ति'कार वामनाने सुचविलें आहे, तर शाकटायनाने हें विभक्तिप्रतिरूप–विभक्त्यन्त शब्दरूपासारखें दिसणारें–अव्यय मानावें असें म्हटलें आहे. तथापि या ठिकाणी अनवधानाने कवीच्या हातून हा प्रामादिक प्रयोग झाला असावा असें वाटतें. *

२. राजयक्ष्मपरिहानिरायत्यौ कामयानसमवस्थया तुलाम्। रघु० १९, ५०.

या पंक्तींतील 'कामयान' हें रूप 'कामयमान' या शुद्ध रूपाबद्दल योजिलेलें अत एव दुष्ट आहे.

कांही ठिकाणीं पाणिनीय व्याकरणाप्रमाणें एखादें रूप अशुद्ध वाटत असलें तरी अभिजात कवीनी अनेकदा योजल्यामुळें शिष्टसंमत अत एव अदूष्य मानलें जातें. कालिदासपूर्वकालीन महामान्य कवींनी अशी कांही रूपें प्रचारांत आणल्यामुळें कालिदासाने आपल्या ग्रंथांत त्यांचा उपयोग केलेला दिसतो. उदाहरणार्थ, पाणिनि, कात्यायन व पतञ्जलि या तीनही व्याकरणाचार्यांच्या मतें द्वितीयभूतकालवाचक धातुसाधितांचा प्रयोग वैदिक भाषेंतच होतो, संस्कृत भाषेंत होत नाही. पण स्वकालीन शिष्ट संप्रदायास अनुसरून 'तं तस्थिवांसं नगरोपकण्ठे' (रघु० ५,६,) 'श्रेयांसि सर्वाण्यधिजग्मुषस्ते' (रघु० ५,३४) इत्यादि ठिकाणीं कालिदासाने त्या धातुसाधितांचीं रूपें योजिलीं आहेत. इतर कवींनीही अशीं रूपें योजिलीं आहेत.† तसेंच 'व्यापारयामास' 'हासयामास' इत्यादि द्वितीयभूतकाळाचीं रूपें अखंड योजावीं असा स्पष्ट नियम कात्यायनाने आपल्या वार्तिकांत घालून दिला आहे. तथापि अश्वघोषाने आपल्या 'बुद्धचरितां'त 'यथावदेनं दिवि देवसङ्घा दिव्यैर्विशेषैर्महयाञ्चक्रुः।' (६,५८) या पङ्क्तींत

* कालिदासाच्या अगोदर सुमारें शंभर वर्ष होऊन गेलेल्या आर्यशूराच्या 'जातकमालें'त अशा तऱ्हेचे प्रयोग आढळतात हें लक्षांत घेण्यासारखें आहे. उदाहरणार्थ, 'नरेन्द्रचूडाधृतशासनस्य तस्य स्वयङ्कारवदास शस्त्रम्।' (मैत्रीबलजातक) हा श्लोकार्ध पहा.

† अश्वघोषकृत 'बुद्धचरित'–ऊचिवान्, ३, ४१; उपजग्मिवान् १२,२ इ.

महयां व चक्रुः असे दोन भाग पाडून मध्यें 'च' हें अव्यय घुसडलें आहे.* कालिदासानेही या तऱ्हेचीं तीन रूपें योजिलीं आहेत—'तं पातयां प्रथममास पपात पश्चात्।' (रघु० ९,६१) 'प्रभ्रशयां यो नहुषं चकार' (रघु० १३, ३६) 'संयोजयां विधिवदास समेतबन्धुः।' (रघु० १६,८६). अशीं रूपें त्या काळी शिष्टसंमत होतीं म्हणून इ.स. ४५७च्या एका शिलालेखांतही दोन ठिकाणी त्यांचा प्रयोग केलेला दिसतो.†

३ **अनौचित्य**—औचित्य हा रसाचा आत्मा होय.काव्यांत अनेक गुण व अलंकार असले तरी त्यांत औचित्य नसेल तर तें रसिकांस निर्जीव भासतें असें क्षेमेंद्राने म्हटलें आहे. कालिदासाच्या ग्रंथांच्या रचनेंत, अलंकारांत, पदवाक्यादिकांच्या प्रयोगांत सर्वत्र औचित्य असतें हें आलंकारिकांनी सोदाहरण दाखविलें आहे. तथापि कांहीं ठिकाणीं त्याच्या हातूनही औचित्यभग झाला आहे. उदाहरणार्थ, 'कुमारसंभवां'त भगवान् शंकरांच्या विलोभनार्थ प्रसृत झालेल्या वसंतऋतूचें वर्णन करतांना कालिदासाने खालील श्लोक घातला आहे—

> वर्णप्रकर्षे सति कर्णिकारं दुनोति निर्गन्धतया स्म चेतः।
> प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः॥
>
> कुमार० ३, २८.

यांत पांगाऱ्याच्या सुंदर फुलांना सुवासिक न केल्याबद्दल विधात्याला दोष दिला आहे. पण त्यायोगें प्रकृतशृंगाररसोद्दीपन मुळीच होत नसल्यामुळें येथे औचित्यभंग हा दोष झाला आहे.

> क्रोधं प्रभो संहर संहरेति यावद्गिरः खे मरुतां चरन्ति।
> तावत्स वह्निर्भवनेत्रजन्मा भस्मावशेषं मदनं चकार॥
>
> कुमार० ३, ७२.

यांत शंकराच्या तृतीयनेत्रवह्नीने झालेल्या मदनदाहाचें वर्णन आलें असल्यामुळें संहारार्थक असें एखादें शंकराचें नांव न योजितां उत्पत्त्यर्थक 'भव'

---

* बुद्धचरित—संवर्धयामात्मजवद्बभूव। '(२, १९)' प्रत्यर्चयां धर्मभृतो बभूव (८।९) या पंक्तीही पहा.

† Girnar Rock Inscription of Skandagupta, *G. I.* No 14.

या नांवाचा प्रयोग केल्याने औचित्यहानि झाली आहे. तसेंच 'मालविकाग्निमित्रा'च्या पहिल्या अंकांत परिव्राजिकेच्या तोंडीं 'अनिमित्तमिन्दुवदनें किमत्रभवतः पराङ्मुखी भवसि' असे शब्द घातले आहेत. एका स्त्रीने दुसरीस 'इन्दुवदना' म्हणावें हें चमत्कारिक दिसतें; यामुळें येथेही तो दोष झाला आहे.

४. रसदोष–एखाद्या रसाचें वर्णन करतांना कवीने त्याचा ओघ अखंड चालू ठेवावा. त्यांत मध्यें मध्यें खंड पडल्यास सहृदय वाचकांचा विरस होतो. 'कुमारसंभवां'तील चौथ्या सर्गांत मदनाला भस्मशेष झालेला पाहून त्याची स्त्री रति हिने अत्यंत शोक केला, त्याचें वर्णन आलें आहे. त्यांत मध्यंतरीं वसन्तागमनाच्या वर्णनाने खंड पडल्यामुळें रसहानि झाली आहे असें 'साहित्यदर्पणां'त दाखविलें आहे. तसेंच 'रघुवंशां'तील ताडकावधवर्णनांत राममन्मथशरेण ताडिता दुःसहेन हृदये निशाचरी। गन्धवद्रुधिरचन्दनोक्षिता जीवितेशवसतिं जगाम सा ॥ (११,२०) असा श्लोक घातला आहे. त्यांत बीभत्स व शृंगार या परस्परविरोधी रसांच्या साहचर्यानें रसभंग झाला आहे.

याशिवाय अविमृष्टविधेयांशत्व, भग्नप्रक्रमत्व, अक्रमत्व, श्रुतिकटुत्व, निहतार्थत्व, अनुचितार्थत्व इत्यादि दोषांचींही एक दोन उदाहरणें आलंकारिकांनी आपल्या ग्रंथांत दिलीं आहेत. विस्तारभयास्तव त्यांचा येथे विचार करतां येत नाही. कांही ठिकाणीं या टीकाकारांनी दोषदर्शनाच्या बाबतींत कवीला अन्याय केला आहे. उदाहरणार्थ,

काप्यभिख्या तयोरासीद्व्रजतोः शुद्धवेषयोः।
हिमनिर्मुक्तयोर्योगे चित्राचन्द्रमसोरिव॥ रघु० १,४६.

यांत वसिष्ठाश्रमीं स्वच्छ वस्त्रें धारण करून जाणाऱ्या राजाराणींना धुकें नाहीसें झाल्यावर उज्ज्वल दिसणाऱ्या चित्राचन्द्रांची सुंदर उपमा कवीने योजिली आहे. व ती उपमानोपमेयांच्या लिंगवचनांच्या बाबतींतही निर्दोष आहे. तथापि 'चित्रा व चंद्र हे सुंदर दिसतात' व 'राजा व राणी सुंदर दिसले' असा येथे कालभेद आल्यामुळे विश्वनाथाने येथे 'भग्नप्रक्रमत्व' नामक दोष मानला आहे. इतकी बारीक दृष्टि स्वीकारिली तर कालिदासाप्रमाणें इतरही अनेक कवींच्या शेंकडो उपमा त्याज्य मानाव्या लागतील; यास्तव कालविध्यादिभेद असला तरी सहृदयांना उद्वेग

वाटत नसेल, तर उपमा सदोष मानूं नये हा काव्यादर्शकारांचा नियमच जास्त ग्राह्य वाटतो. तसेंच 'पदं सहेत भ्रमरस्य पेलवं शिरीषपुष्पं न पुनः पतत्रिणः'(कुमार०५,४)'सा संन्यस्ताभरणमबला पेलवं धारयन्ती'(मेघ०९८) 'नवमालिकाकुसुमपेलवा' (शाकु० १) इत्यादि ठिकाणीं 'कोमल' या अर्थी पेलव या शब्दाचा प्रयोग कालिदासाने केला आहे. किंबहुना तो शब्द त्याचा विशेष आवडता असावा; तथापि यांतील 'पेल' या अंशाने स्वकालीन लाटी (गुजराती) अपभ्रंशांत अश्लीलार्थ व्यक्त होतो म्हणून कालिदासानंतर शेंकडो वर्षांनी झालेल्या मम्मट, विश्वनाथ इत्यादि आलंकारिकांनी तो शब्द त्याज्य ठरविला आहे. आम्हांस तर या ठिकाणीं सोवळेपणाचा अतिरेक दिसतो. आपण योजलेल्या शब्दांचा असा कीस काढला जाईल असें कवीला स्वप्नही पडलें नसेल; व पडलें असतें तरी पुढे कधी काळीं एखाद्या भाषेंत त्याचा असा अर्थ होईल हें त्याला सर्वज्ञत्वाभावीं समजलें नसतें. तेव्हा या ठिकाणीं अश्लीलत्व हा दोष मानणें अयोग्य आहे.

आलंकारिकांनी दाखविलेले सर्व दोष मानले तरी कालिदासाच्या विशाल ग्रंथसंपत्तीच्या मानाने ते अत्यल्पच आहेत. त्याच्या ग्रंथांतील गुणसन्निपातांत तर ते अगदी लोपून जातात; त्यामुळें कालिदासाच्या वाणीचें वर्णन करतांना एका सहृदय ग्रंथकाराने तिला 'निर्दोष' असें विशेषण लाविलें आहे. श्रीकृष्ण कवि आपल्या 'भरतचरित' काव्याच्या आरंभीं कालिदासाच्या भाषेचें येणेंप्रमाणें वर्णन करतो—

अस्पृष्टदोषा नलिनीव दृष्टा हारावलीव ग्रथिता गुणौघैः।
प्रियाङ्कपालीव विमर्दलह्या न कालिदासादपरस्य वाणी॥ १, ३.

'कमलिनीसारखी अस्पृष्टदोषा (रात्रीं विकास न पावणारी, पक्षीं दोषरहित) मुक्ताहारांसारखी गुणौघांनी (अनेक सूत्रांनी, पक्षीं गुणसमुच्चयांनी) युक्त, प्रियेच्या मांडीप्रमाणें विमर्दाने (संवाहनाने, पक्षी परीक्षणाने) आल्हादकारक होणारी, अशी कालिदासाशिवाय इतर कोणाही कवीची भाषा नाही.'*

* या श्लोकांत श्लिष्ट विशेषणांचा पहिला अर्थ कमलिनी, मुक्ताहार इत्यादि उपमानांकडे व दुसरा कालिदासाच्या वाणीकडे लावावा.

प्रकरण आठवें

कालिदासीय विचार

स्वादुकाव्यरसोन्मिश्रं शास्त्रमप्युपयुञ्जते ।
प्रथमालीढमधवः पिबन्ति कटु भेषजम् ॥

भामहकृत काव्यालंकार ५, ३.

कालिदासाच्या चरित्राचें वर्णन करतांना त्याने अनेक ग्रंथांचें अवलोकन केलें होतें व अनेक विषयांचा सूक्ष्मपणें अभ्यास केला होता असें आम्ही मागे दाखविलें आहे. धर्म, तत्त्वज्ञान, समाजस्थिति, राजकारण, शिक्षण इत्यादि अनेक विषयांवर त्याने मननपूर्वक आपलीं मतें निश्चित करून त्यांचा आपल्या ग्रंथांत पुरस्कार केलेला दिसतो. मागे एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें हे उल्लेख तुरळक आहेत; तथापि त्यांवरून त्याचीं तद्विषयक मतें अजमावणें शक्य आहे. कांही महत्त्वाच्या विषयांसंबंधाने तसा प्रयत्न या प्रकरणांत केला आहे.

या सर्व विषयांत धर्म व तत्त्वज्ञान हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. कोणत्याही समाजाचें धारण करून त्याला इहलोकीं अभ्युदय व परलोकी निःश्रेयस प्राप्त करून देण्यास धर्माची अत्यंत जरूरी असते. 'धारणाद्धर्ममित्याहुः,' 'यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः' इत्यादि धर्माच्या व्याख्या सुप्रसिद्ध आहेत. आपल्या हिंदुस्थानांत तर धर्माचें अत्यंत महत्त्व आहे. या पुण्यभूमींतच वैदिक, बौद्ध व जैन या जगांतील तीन महत्त्वाच्या धर्मांचा उद्गम व विकास झाला. धार्मिक कल्पनांचा मनुष्याच्या मनावर मोठा परिणाम होतो व त्यामुळें त्याचें व्यावहारिक जीवन सुयंत्रित करण्यांत त्यांची अतिशय मदत होते हें ध्यानांत आल्यावरून आपल्या प्राचीन ऋषींनी धर्माची व्यवहाराशीं बेमालुमपणें सांगड घालून दिली आहे. धर्माला तत्त्वज्ञानाचें अधिष्ठान नसलें तर तो अंधश्रद्धेचा विषय होऊन बसतो, व कांही काळ परिस्थितीच्य अनुकूलतेमुळें किंवा धर्मसंस्थापकाच्या आकर्षक वैयक्तिक गुणांमुळे त्याचा प्रसार झाला तरी तो चिरस्थायी होत नाही हें ध्यानांत आणून बौद्ध व जैन तत्वज्ञांनी लौकरच आपापल्या

धर्माला तत्त्वज्ञानाची जोड दिली. हिंदुधर्माचें तर प्रथमपासून तत्त्वज्ञान हें एक प्रधान अंग झालें होतें हें ऋग्वेदांतील तत्त्वज्ञानविषयक सूक्तांवरून दिसून येतें. असो.

कालिदासकाळीं हिंदुधर्म संक्रमणावस्थेंत होता. विजिगीषु जैन व विशेषतः बौद्ध धर्माच्या आघातांनी त्यांतील विचारी लोक खडबडून जागे झाले व त्यांनी आपल्या अफाट धर्मग्रंथांतील अनावश्यक भाग गाळून व राहिलेल्यास व्यवस्थित स्वरूप देऊन प्रथम सूत्रग्रंथांची व नंतर सुबोध स्मृतिग्रंथांची रचना केली. तसेंच प्रतिपक्ष्यांनी घेतलेल्या तत्त्वज्ञानविषयक आक्षेपांचें त्यांनी आपल्या वेदान्तादि दर्शनांच्या सूत्रांत निरसन केलें व त्यांच्या पाखंडी मतावर उलट हल्ले चढविले. खुद्द हिंदुधर्मही अनेक स्थित्यंतरांतून जात होता. बौद्धधर्माला राजाश्रय मिळाल्यामुळें अहिंसातत्त्वाचा जनतेंत प्रसार होऊन वैदिक यज्ञयागांविषयीं औदासीन्य उत्पन्न झालें होतें. बौद्धांच्या उपहासात्मक टीकेमुळें वर्णाश्रमधर्मावर लोकांचा विश्वास राहिला नव्हता. प्राचीन चातुर्वर्ण्यव्यवस्था बिघडून गेली होती. सर्वांस बौद्धधर्माचा स्वीकार करून संघांत प्रवेश करतां येत असल्याने पोटभरू व आळशी लोकांचें चांगलेंच फावलें होतें. अशा बिकट प्रसंगीं राष्ट्रांतील विवेकी सनातनधर्मीय विद्वानांनी स्वकालीन परिस्थिति लक्षांत घेऊन हिंदुधर्माची पुनर्घटना करण्याकरितां याज्ञवल्क्य, नारद, कात्यायन इत्यादि स्मृति रचल्या. तथापि राजाश्रयाच्या अभावीं कांही काळ त्यांतील धार्मिक तत्त्वांचा जनतेंत फारसा प्रसार झाला नाही. ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकाच्या आरंभीं गुप्तवंशाचा उदय होऊन हिंदुधर्माला अत्यंत आवश्यक असलेल्या राजाश्रयाची जोड मिळाली. गुप्तवंशीय सम्राट् हिंदुधर्माचे पक्के अभिमानी असल्याने त्यांनी स्वतः यज्ञयागादि करून, हिंदु देवतांचीं देवालयें बांधून व हिंदुधर्मीय विद्वानांना मोठमोठ्या अधिकाराच्या जागा देऊन आपल्या धर्माचें पुनरुज्जीवन केलें. अशा प्रसंगीं प्राचीन हिंदु संस्कृतीचीं उदात्त तत्त्वें व उच्च ध्येय मनोरंजकपणे लोकांपुढे मांडून त्यांकडे त्यांचें चित्त आकर्षण करणें आवश्यक होतें. हें कार्य काव्यनाटकांसारख्या न कळत उपदेशामृत पाजणाऱ्या ग्रंथांनीच

करणें शक्य असतें. मम्मटाने आपल्या 'काव्यप्रकाशां'त 'कान्तासम्मिततयोपदेशयुजे' असें काव्यनिर्मितीचें एक प्रधान प्रयोजन सांगितलें आहे. जशी एखादी सुंदर स्त्री रम्य विलासांनी आपल्या प्रियकराचें चित्त आकृष्ट करून त्याच्याकडून आपल्याला इष्ट तें करवून घेते, तद्वत् कवीही आपल्या मनोरम काव्यनाटकादि ग्रंथांनी वाचकप्रेक्षकांच्या मनांवर सदुपदेश बिंबवूं शकतो. या कारणामुळेंच अश्वघोष नामक जाड्या विद्वानाने आपल्या तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांकडे सामान्य जनांचें लक्ष जात नाही असें पाहून बौद्धधर्म व तत्त्वज्ञान यांच्या प्रसारार्थ आपली 'सौन्दरनन्दा'दि काव्यें व 'सारिपुत्रप्रकरणा'दि नाटकें लिहिलीं. ललितवाङ्मयाने सामाजिक सुधारणेस कशी मदत होते हें कै. वा. हरि नारायण आपटे यांनी आपल्या आबालवृद्धांस प्रिय झालेल्या सुंदर कादंबऱ्यांनी चांगलेंच दाखवून दिले आहे. कालिदासाने आपल्या ग्रंथांत कोठेही अश्वघोषाप्रमाणें आपण हिंदुधर्माच्या प्रसारार्थ काव्यें अगर नाटकें लिहितो असें म्हटलें नाही. तथापि तत्कालीन परिस्थिति व त्याच्या ग्रंथांतील उदात्त ध्येयांनी प्रेरित झालेल्या व्यक्तींची मनोहर चित्रें लक्षांत घेतां त्याचा हाही अप्रत्यक्ष उद्देश असावा असें वाटल्याशिवाय राहत नाही.

कालिदासाच्या वेळीं अश्विनीकुमार, धर्म, इंद्र, संकर्षण, कुबेर इत्यादि प्राचीन देवतांची पूजा प्रचारांतून जाऊन त्यांच्या जागीं ब्रह्मा, विष्णु व शिव या देवतांस प्राधान्य आलें होतें. तथापि या देवतांच्या उपासकांमध्यें पुढे जें हाडवैर उत्पन्न झालें, त्याचा मागमूसही या काळांत दिसत नाही. कदाचित् बौद्धधर्मीयांच्या हल्ल्यामुळें भिन्न भिन्न देवतांचे उपासक आपापले भेदभाव विसरून एकत्र झाले असावेत व तत्कालीन तत्त्वज्ञांची शिकवणही त्याच प्रकारची असावी. कारण कांही असलें तरी या काळात त्यांच्यामध्यें सख्य दिसतें यांत संशय नाही. एवढेंच नव्हे तर एकाच कुटुंबात आईबाप एका देवतेचे, तर मुलें दुसऱ्याच देवतेचीं उपासक असत हें वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेन याच्या उदाहरणावरून आम्ही मागे दाखविलेंच आहे. कालिदास हा स्वतः शिवोपासक होता. त्याच्या सर्व नाटकांच्या नांदीत श्रीशंकराची स्तुति आढळते. 'मालविकाग्निमित्रा'च्या आरंभीं त्याने आपल्या इष्टदेवतेचें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे.—

एकैश्वर्यस्थितोऽपि प्रणतबहुफलो यः स्वयं कृत्तिवासाः
कान्तासंमिश्रदेहोऽप्यविषयमनसां यः परस्ताद्यतीनाम्।
अष्टाभिर्यस्य कृत्स्नं जगदपि तनुभिर्बिभ्रतो नाभिमानः
सन्मार्गालोकनाय व्यपनयतु स वस्तामसीं वृत्तिमीशः ॥

भगवान् शंकर सर्व जगाचा ईश्वर असून भक्तांच्या बहुविध इच्छा पूर्ण करीत असला तरी स्वतः गजचर्मेच वापरतो. त्याच्या देहाचा अर्धभाग पत्नीने व्यापला असला तरी विषयोपभोगापासून विरक्त झालेल्या यतींनाही त्याचें स्वरूप आकलन करतां येत नाही. स्वतः अष्टविध स्वरूपाने तो सर्व जगाला आश्रय झाला असला तरी त्याला मुळीच अभिमान नाही.' अशा रीतीने कवीने श्रीशंकरांचें विरोधगर्भ यथार्थ वर्णन केलें आहे. यांतील कल्पनांचाच दुसऱ्या नाटकांच्या नान्दींत विस्तार केला आहे. 'शाकुंतला'च्या भरतवाक्यांत

ममापि स क्षपयतु नीललोहितः
पुनर्भवं परिगतशक्तिरात्मभूः।

अशा रीतीने आपल्याला पुनर्जन्मांतून मुक्त करण्याबद्दल शंकरांची प्रार्थना केली आहे. कवीने आपल्या 'कुमारसंभव'काव्यांत श्रीशंकराच्या चरित्रांतील एका रम्य प्रसंगाचें रसभरित वर्णन केलें आहे. त्या काव्याच्या सहाव्या सर्गांत जगाची उत्पत्ति, पोषण व लय करणारा व सर्व प्राण्यांचा अन्तर्यामी म्हणून ऋषींनी शंकरांची स्तुति केली आहे. तसेंच दुसऱ्या सर्गांत देवांच्या प्रार्थनेला उत्तर देतांना ब्रह्मदेवाने खालील श्लोकांत 'स्वतः मला किंवा विष्णूला श्रीशंकरांच्या प्रभावाचें सम्यग्ज्ञान होत नाही,' असें म्हटलें आहे--

स हि देवः परं ज्योतिस्तमःपारे व्यवस्थितम्।
परिच्छिन्नप्रभावर्द्धिर्न मया न च विष्णुना॥ कुमार० २, ५८.

तेव्हा कालिदासाच्या शिवोपासकत्वाविषयीं संशय राहत नाही. तथापि तो एखाद्या विशिष्ट शैवसंप्रदायाचा अनुयायी होता असें वाटत नाही; कारण त्याच्या ग्रंथांत कोठेही सांप्रदायिक परिभाषिक संज्ञांचा किंवा विशिष्ट आचारांचा उल्लेख नाही. कालिदासाने उपनिषदांचा व भगवद्गीतेचा

चांगला अभ्यास केला होता हें आम्ही मागे दाखविलें आहे. या अभ्यासानें त्याची दृष्टि विशाल व मतें उदार झालीं होतीं. 'कुमारसंभवा'च्या दुसऱ्या सर्गांत ब्रह्मदेवाचें व 'रघुवंशा'च्या दहाव्या सर्गांत विष्णूचें वर्णन त्याने परमेश्वररूपानेच केलें आहे हें खालील श्लोकांवरून दिसून येईल–

तिसृभिस्त्वमवस्थाभिर्महिमानमुदीरयन्।
प्रलयस्थितिसर्गाणामेकः कारणतां गतः ॥ कुमार० २, ६.
नमो विश्वसृजे पूर्वं विश्वं तदनु बिभ्रते।
अथ विश्वस्य संहर्त्रे तुभ्यं त्रेधास्थितात्मने ॥ रघु० १०, १६.

ब्रह्मा, विष्णु व शंकर हीं एकाच परमेश्वराचीं कार्यनिमित्ताने भिन्न भासणारीं रूपें होत. कार्यवशात् कधी ब्रह्मदेवाला, कधी विष्णूला, तर कधी शंकराला श्रेष्ठत्व येतें त्यामुळें श्रेष्ठकनिष्ठभाव या तिघांच्या बाबतींत सारखाच दृष्टीस पडतो, हें उदात्त तत्त्व खालील श्लोकांत त्याने सांगितलें आहे—

एकैव मूर्तिर्बिभिदे त्रिधा सा सामान्यमेषां प्रथमावरत्वम्।
विष्णोर्हरस्तस्य हरिः कदाचिद्वेधास्तयोस्तावपि धातुरार्यौ ॥
कुमार० ७, ४४.

आपल्या सनातन धर्माचेंही हेंच तत्त्व आहे. मनुष्याने कोणत्याही देवतेची श्रद्धेने उपासना केली तरी ती एकाच परमेश्वराला पोचते व त्याकडूनच त्याच्या इच्छा पूर्ण होतात असें भगवद्गीतेंत म्हटलें आहे(भ.गी.७,२२).असो. आता 'कुमारसंभव' व' रघुवंश' यांतील ब्रह्मा, विष्णु व शंकर यांच्या विविध प्रसंगांनी आलेल्या स्तुतींत कालिदासाने परमेश्वराचें कसें वर्णन केलें आहे तें पाहूं.

परमेश्वराच्या स्वरूपाचें यथार्थ वर्णन करणें अशक्य आहे. कारण तो अवाङ्मनसगोचर आहे असें कालिदासाने अनेक ठिकाणीं म्हटलें आहे प्रत्यक्ष, अनुमान व आप्तवचन किंवा शब्द हीं ज्ञानाचीं प्रमुख साधनें होत. वस्तु इन्द्रियगोचर असल्यास तिचें ज्ञान सुलभ असतें हा नेहमीचा अनुभव आहे. ईश्वर स्वतः तर सामान्य जनांना प्रत्यक्ष होत नाहीच; पण त्याचें ऐश्वर्य ज्यांत व्यक्त होतें ते पृथिव्यादि पदार्थ त्यांचेंही सम्यग्

ज्ञान त्यांस होत नाही. मग ज्याच्या बाबतींत अनुमान व वेदादि आप्त-वचनें यांवरच आपणास अवलंबून राहावें लागतें त्या ईश्वराच्या स्वरूपाची यथार्थ कल्पना आपणास होत नाही यांत नवल काय ? हा आशय कवीने खालील श्लोकात व्यक्त केला आहे—

प्रत्यक्षेऽप्यपरिच्छेद्यो मह्यादिर्महिमा तव ।
आप्तवागनुमानाभ्यां साध्यं त्वां प्रति का कथा ॥ रघु० १०,१९.

ईश्वराच्या ठिकाणी अनेक विरोधी गुणांचा समुच्चय झालेला दिसतो त्यामुळें कोणासही त्याच्या स्वरूपाचें आकलन करता येत नाही. तो स्वतः अज म्हणजे जन्मरहित आहे, तरी पृथ्वीवर अवतार घेतो; स्वतः आप्तकाम असूनही शत्रूंचें निर्दालन करतो; सर्व प्राण्यांचें रक्षण करीत असूनही उदासीन राहूं शकतो (रघु. १०, २५); तो सर्व प्राण्याच्या हृदयांत वास करीत असूनही त्यांच्या जवळ नसतो; निरिच्छ असूनही नेहमी तपश्चर्या करीत असतो; तो दयाळू आहे तरी त्याला कधीही दुःख होत नाहीं; तो पुराण पुरुष आहे तरी त्याला कधीही वार्द्धक्याची बाधा होत नाही (रघु० १०, १९); तो द्रव तसाच घन, स्थूल तितकाच सूक्ष्म, लघु त्या-प्रमाणेंच गुरु, व्यक्त आणि अव्यक्तही आहे (कुमार० २, ११). * परमेश्वर हा चराचर सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय यांचें एकमेव कारण आहे. सांख्य तत्त्वज्ञानी म्हणतात त्याप्रमाणें पुरुष व प्रकृति हीं दोन परस्परस्वतंत्र तत्त्वें नसून तीं एकाच परमेश्वराचीं दोन रूपें आहेत (कुमार० २,१३). त्याला सृष्टीच्या उत्पत्तिलयाकरितां दुसऱ्या-कोणत्याही साधनांची जरूरी लागत नाही (कुमार० २,१०). तो चराचर सृष्टि व्यापून असतो. आकाशांतून पडणारें मेघोदक सर्वत्र एकच प्रकारचें असलें तरी भिन्न भिन्न स्थलीं त्याला भिन्न भिन्न चव प्राप्त होते त्याप्रमाणें परमेश्वर स्वतः एकरूप असला तरी सत्त्व, रज व तम या गुणांच्या योगें विविध स्वरूपें धारण करतो. हव्य व होता, भक्ष्य व भोक्ता, ज्ञेय व

*या तत्त्वाचें परस्परविरुद्ध विशेषणांनीं केलेलें ब्रह्माचें वर्णन उपनिषदांतही आढळतें. उदाहरणार्थ, खालील उतारे पहाः—एतद्वै तदक्षरं गार्गि ब्राह्मणा अभिवद-न्त्यस्थूलमनण्वह्रस्वमदीर्घमलोहितमस्नेहमच्छायमतमः । इ (बृहदारण्यक ३,८,८); अपाणिपादो जवनो ग्रहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः । (श्वेताश्वतर ३,१९)

ज्ञाता, ध्येय व ध्यान करणारा, या सृष्टींत सर्वत्र दिसणाऱ्या द्वंद्वाच्या मुळाशीं एकच तत्त्व आहे (कुमार० २,१५) व तेंच प्राण्यांच्या हृदयांत अन्तरात्म्याच्या रूपाने वास करीत असतें, ही उपनिषदें, ब्रह्मसूत्रे व भगवद्गीता यांची शिकवण कालिदासाच्या ग्रंथांत सर्वत्र दिसून येते. उपनिषदांत या तत्त्वाला ब्रह्म ही संज्ञा दिली आहे व तीच कालिदासाने एके ठिकाणी योजिली आहे(कुमार० ३,१५). तथापि निर्गुण ब्रह्म जाणणें त्याचप्रमाणे वर्णन करणेंही अवघड असतें म्हणून त्याने सर्वत्र ब्रह्मा, विष्णु व शिव हया सगुण मूर्तींचेंच मनोरम वर्णन केलें आहे.

परमेश्वर स्वतः आप्तकाम असला तरी सज्जनांचें रक्षण व दुर्जनांचा नाश करण्याकरितां पुनः पुनः अवतार घेतो व लोकसंग्रहाकरितां विविध कर्मांत व्यापृत असलेला दिसतो हें भगवद्गीतेंतील तत्त्व कालिदासाने खालील श्लोकांत सांगितलें आहे—

अनवाप्तमवाप्तव्यं न ते किञ्चन विद्यते।
लोकानुग्रह एवैको हेतुस्ते जन्मकर्मणोः॥

यांतील शब्दयोजनाही भगवद्गीतेवरूनच सुचलेली आहे हें दिसून येईल. या कारणास्तवच श्रीशंकरांनी विवाहप्रसंगी अग्निप्रदक्षिणा, लाजाहोम, ध्रुवदर्शन इत्यादि स्मृत्युक्तकर्मे केलीं असें कवीने वर्णिलें आहे. कालिदासकाळीं वेदान्ताचीं केवलाद्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत इत्यादि मतें प्रचलित नव्हतीं, त्यामुळें त्यांपैकी कोणतें त्याला अभिमत होतें याचा निर्णय करणें शक्य नाही. शंकराचार्यांच्या मायावादाचीं बीजें उपनिषदांत दिसत असलीं तरी त्यांच्या काळापर्यंत त्याचें पूर्ण विवेचन कोणीही केलें नव्हतें, त्यामुळें कालिदासाच्या ग्रंथांतही मायेचा उल्लेख आला नाही यांत आश्चर्य नाही. कालिदासापूर्वीच्या ब्रह्मसूत्रें व भगवद्गीता या ग्रंथांतही मायावादाला पोषक असे स्पष्ट उल्लेख आले नाहीत. कालिदास स्वतः शिवोपासक असला तरी तत्त्वज्ञानाच्या बाबतींत भगवद्गीतेचाच अनुयायी होता हें आम्ही मागे दाखविलें आहे. त्याची तत्त्वज्ञानविषयक मतें शंकर, रामानुज, मध्व, वल्लभ इत्यादि आचार्यांच्या वेदान्तमतांशीं तंतोतंत जुळत नाहीत म्हणून तो काश्मीरी शैव मताचा अनुयायी होता असें कांही विद्वानांनी प्रतिपादिलें आहे त्याचा आता विचार करूं.

काश्मीरी शैव मताच्या स्पन्दशास्त्र व प्रत्यभिज्ञाशास्त्र अशा दोन शाखा आहेत. यांपैकी पहिली नवव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेलेला वसुगुप्त व त्याचा शिष्य कल्लट यांनी स्थापिली व दुसरी त्यानंतर दहाव्या शतकांत होऊन गेलेल्या सोमानंदाने प्रचलित केली असें विद्वानांनी ठरविलें आहे. पहिल्या मताचा मुख्य ग्रंथ शिवसूत्रें हा काश्मीरांतील महादेव गिरीवर उत्कीर्णरूपाने होता; श्रीशंकरांचा साक्षात्कार झाल्यावर वसुगुप्ताने तेथे जाऊन व तो उतरून घेऊन प्रचलित केला, अशीही सांप्रदायिकांची समजूत आहे. तथापि तें मत वसुगुप्ताहून प्राचीन आहे हें दाखविण्याकरितांच ती समजूत प्रथम प्रचलित झाली असावी, असें डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकरांनी अनुमान केलें आहे. या मताचे तत्पूर्वीचे ग्रंथ अगर उल्लेखही आढळत नाहीत यावरूनही तें अनुमान सयुक्तिक दिसतें. तेव्हा हीं मतें कालिदासकाळीं प्रचलित होतीं असें दिसत नाही. शिवाय त्या मतांत व कालिदासाच्या तत्त्वज्ञानांत फारसें साम्य दिसत नाही व जें थोडेसें दिसतें तें कवीच्या उपनिषदादि ग्रंथांच्या अभ्यासामुळें आलें असावें असें म्हणतां येतें. काश्मीरी शैव संप्रदायांत ईश्वर स्वेच्छेने जगताची उत्पत्ति करतो त्याला प्रधानादि उपादानकारणांची जरूरी लागत नाही किंवा तो स्वतःही उपादान कारण होत नाही असें मानलें जातें. जसा एखादा योगी आपल्या यौगिकबलाने विविध पदार्थ उत्पन्न करूं शकतो त्याप्रमाणें ईश्वरही स्वशक्तीने जीव व जगत् यांची उत्पत्ति करतो असें त्या संप्रदायाचे अनुयायी मानतात.'निरुपादानसंभारमभित्तावेव तन्वते। जगच्चित्रं नमस्तस्मै कलाश्लाघ्याय शूलिने ॥' या वसुगुप्ताच्या श्लोकांत तीच कल्पना ग्रथित केली आहे. ईश्वराला अन्य साधनांची जरूरी लागत नाही, ही कल्पना उपनिषदांतही आढळते व 'उपसंहारदर्शनान्नेति चेन्न क्षीरवद्धि ।' या सारख्या ब्रह्मसूत्रांतही तिचाच उल्लेख केला आहे. कालिदासानेही आपल्या ग्रंथांत तेंच मत प्रतिपादिलें आहे. तथापि परमेश्वर स्वतःही उपादान कारण होत नाही ही कल्पना त्याला मान्य असावी असें वाटत नाही. 'कुमारसंभवा'च्या दुसऱ्या सर्गांत देवांनी केलेल्या ब्रह्मदेवाच्या स्तुतींत 'आत्मानमात्मना वेत्सि सृजस्यात्मानमात्मना । आत्मना कृतिना च त्वमात्मन्येव प्रलीयसे ॥' असा श्लोक आला आहे. त्यांत परमेश्वर जगाची उत्पत्ति स्वतः-

मधूनच करतो व स्वतःमध्यें त्याचा लय करतो असें स्पष्ट म्हटलें आहे. दुसऱ्याही एका बाबतीत कालिदासाचें मत काश्मीरी शैवसंप्रदायाहून भिन्न आहे. जीव हा परमेश्वररूपच आहे पण त्रिविधमलामुळें त्याला स्वस्वरूपाचे ज्ञान होत नाही. ध्यानविधीने त्या मलांचा नाश झाल्यावर तें ज्ञान होतें. असें स्पन्दशास्त्रानुयायी मानतात. प्रत्यभिज्ञाशास्त्राचें मत याहून थोडें निराळें आहे. जीव हा मूलतः परमेश्वराहून भिन्न नसला तरी एखाद्या गुरूने अनुग्रह करीपर्यंत त्याला स्वस्वरूपाची ओळख पटत नाही असें प्रत्यभिज्ञा-शास्त्रानुयायी मानतात. मागे काश्मीर ही कालिदासाची जन्मभूमि होती या मताचा विचार करतां, त्याच्या नाटकांवर प्रत्यभिज्ञामताची छाप पडली आहे, या मताचें आम्ही सविस्तर निराकरण केलें आहे. कालिदासाने आपल्या ग्रंथांत कोठेही केवळ गुरूपदेशाने जीवाला स्वस्वरूपाचें ज्ञान होतें असे म्हटलेलें दिसत नाही. स्पन्दशास्त्रांत म्हटल्याप्रमाणें योग हें मोक्षाचें साधन आहे असें कालिदासाचेंही मत आहे. पण तें भगवद्गीतेंतही आढळतें. या-करितांच भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायांत योगविधीचें वर्णन आलें आहे. कालिदासाने आपल्या ग्रंथांत अनेक पुरुषांनी मुक्तीकरितां योगाचा अवलंब केलेला दाखविला आहे. मदन हिमालयावर आला तेव्हा स्वतः भगवान् शंकर पर्यङ्कबन्ध आसन घालून व प्राणायामनिरोधाने निवात स्थलीं ठेवलेल्या दीपाप्रमाणें निष्कम्प राहून योगबलाने अन्तरात्म-दर्शनांत मग्न होते असें 'कुमारसंभवा'त वर्णिलें आहे. 'रघुवंशा'तही 'तमसः परमापदव्ययं पुरुषं योगसमाधिना रघुः। [रघूने योगसमाधीने अज्ञानाच्या पलीकडे असलेल्या अविनाशी परमात्म्याची प्राप्ति करून घेतली.] असें म्हटलें आहे. तथापि यावरून त्याला काश्मीरी शैव संप्रदायांतील प्रत्य-भिज्ञामत सर्वस्वी मान्य होतें असें दिसत नाही.

कालिदासाने 'रघुवंशा'तील अनेक राजांची मरणोत्तर गति वर्णिली आहे त्यावरून त्याच्या दृष्टीने मनुष्याचें अत्युच्च ध्येय काय असावें हें अजमावतां येतें. दिलीपाने नव्याण्णव अश्वमेध यज्ञ करून मृत्यूनंतर स्वर्गा-रोहण करण्याकरितां जणूं काय नव्याण्णव पायऱ्याच तयार केल्या. अजाने गंगा व सरयू यांच्या संगमाने निर्माण झालेल्या तीर्थांत देहत्याग करून स्वर्गांत इन्दुमतीची प्राप्ति करून घेतली व नंतर तिच्यासह नन्दनवनांतील

क्रीडागृहांत तो रममाण झाला असें त्याने वर्णिलें आहे. तसेंच 'मेघदूतां'त अलकेंतील यक्षांच्या विविध विलासांचें रम्य वर्णन आलें आहे. तथापि स्वर्गाची प्राप्ति करून घेऊन तेथील सुखांत रममाण होणें हें त्याच्या दृष्टीने अत्युच्च ध्येय होतें असें दिसत नाही. 'तद्यथेह कर्मजितो लोकः क्षीयते एवमेवामुत्र पुण्यजितो लोकः क्षीयते।' या छांदोग्य उपनिषदांतील (८,१,६) उक्तीप्रमाणें स्वर्गांतील सुखें हीं नाशवंत असतात. भगवद्गीतेंतही 'ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।'(९,२१) असें म्हटलें आहे. स्वर्गांतील सुखोपभोगामुळें पुण्यसंचय ऱ्हास पावतो ही कल्पना कालिदासाला संमत होती. म्हणूनच त्याने आपल्या 'मेघदूतां'त 'पुण्यसंचय कमी झाल्यामुळें स्वर्गीय जनांनी भूमीवर येऊन आपल्या अवशिष्ट पुण्याईने उज्जयिनी नगरीच्या रूपाने स्वर्गाचा एक सुंदर भागच वसविला आहे,' अशी उत्प्रेक्षा केली आहे. स्वर्गांतील सुखें अक्षय्य नसल्यामुळें मारीचाश्रमांतील ऋषि त्यांचा मोह दूर सारून उच्चत्तर पदप्राप्तीकरितां सदैव तपश्चर्या करीत होते असें त्याने 'शाकुंतलां'त दाखविलें आहे. स्वर्गप्राप्ति झाली तरी जन्म, जरा व मरण यांच्या फेऱ्यांतून मनुष्य सुटत नाही म्हणून त्याने 'शाकुतला'च्या भरतवाक्यांत स्वर्गप्राप्ति न मागतां आपल्याला पुनर्जन्मांतून मुक्त करावें अशी शंकराना प्रार्थना केली आहे. तेव्हा ससारांतून मुक्त होण्याला यज्ञयागादि साधनें उपयोगी पडत नाहीत; योगाभ्यासाने परमेश्वरस्वरूपाचें ज्ञान करून घेतल्यानेच मोक्ष प्राप्त करून घेतां येतो असे त्याचें मत होतें हें निर्विवाद आहे. व तेंच त्याने 'तमसः परमापदव्ययं पुरुषं योगसमाधिना रघुः।' या श्लोकार्धांत सांगितलें आहे. रघु हा अत्यंत सच्छील, दानशूर व कर्तव्यतत्पर राजा होता. धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें त्याने प्रजेकडून वर्णाश्रमधर्माचें पालन करविलें, इतकेंच नव्हे, तर स्वतःही गृहस्थाश्रमांतील सर्व कर्तव्यें पार पाडून संन्यासाश्रम स्वीकारला; व योगाभ्यासाने परमात्मदर्शन प्राप्तकरून घेऊन मरणोत्तर अविद्येच्या पलीकडे असलेल्या परमात्म्याची प्राप्ति करून घेतली असें कवीने म्हटलें आहे. प्रत्यभिज्ञादर्शनांतल्याप्रमाणें त्याला स्वतःच्या शिवस्वरूपाची ओळख पटली असें म्हटलें नाही, हें लक्षांत

ठेवण्यासारखें आहे. कालिदासाच्या वरील पंक्तीवरून मोक्षावस्थेंत जीवेश्वर-भेद कायम राहतो असें त्याचें मत होतें असें वाचकांस वाटण्याचा संभव आहे.तथापि त्याने इतरत्र (रघु० १८,२८) केलेल्या 'स ब्रह्मभूयं गतिमाजगाम' या वर्णनावरून परब्रह्मरूप होऊन जाणें हेंच त्याच्याही दृष्टीने उच्चतम ध्येय होतें यांत संशय राहत नाही.

परमात्म्याच्या प्राप्तीकरितां योगाभ्यासासारखीं आणखीही दोन साधनें कालिदासाने प्रसंगवशात् उल्लेखिलीं आहेत. 'विक्रमोर्वशीया'च्या

अन्तर्यश्च मुमुक्षुभिर्नियमितप्राणादिभिर्मृग्यते ।
स स्थाणुः स्थिरभक्तियोगसुलभो निःश्रेयसायास्तु वः ॥

या मंगल श्लोकार्धांत मुमुक्षु जन प्राणायामादि साधनांनी ज्या हृदयस्थ शंकराचें दर्शन घेण्याचा प्रयत्न करितात तो एकनिष्ठ भक्तीने लौकर प्रसन्न होतो असें म्हटलें आहे. तसेंच फलेच्छा टाकून स्वकर्तव्यें केलीं असतां मनुष्य संसारांतून मुक्त होतो हें त्याने 'मारुतिः सागरं तीर्णः संसारमिव निर्ममः ।' (रघु० १५, ६०) या उपमेंत सुचविलें आहे. योगसाधन, निष्काम-कर्मयोग, भक्तियोग हे एकाच परमेश्वराला पोचण्याचे निरनिराळे मार्ग आहेत, प्रत्येकाने आपापल्या शक्तीप्रमाणें त्यांचा उपयोग करावा, असे त्याचें मत दिसतें. हेंच त्याने खालील श्लोकांत सांगितलें आहे–

बहुधाप्यागमैर्भिन्नाः पन्थानः सिद्धिहेतवः ।
त्वय्येव निपतन्त्योघा जाह्नवीया इवार्णवे ॥ रघु० १०, २६.

श्रीमद्भगवद्गीतेमध्येंही ज्ञान, पातञ्जलयोग, भक्ति, निष्कामकर्म या परमेश्वरप्राप्तीच्या विविध साधनांचें वर्णन करून त्यांचा समन्वय केला आहे तीच दृष्टि कालिदासाचीही होती हें वरील विवेचनावरून दिसून येईल.

कालिदासाचा कर्मवाद व पुनर्जन्म यांवर विश्वास होता हें आम्ही मागील प्रकरणात दाखविलें आहे. स्वतःच्या कर्मामुळेंच उर्वशी व हरिणी या अप्सरांस मृत्युलोकांत यावें लागलें. 'आत्म्याला स्वकर्मानुसार मरणोत्तर गति प्राप्त होत असते; तेव्हा तूं देहत्याग केलास तरी तुला परलोकीं तुझ्या पत्नीचा सहवास प्राप्त होईल असें नाही,' असें सांगून वसिष्ठांनी अजाला पत्नीशोकापासून निवृत्त करण्याचा प्रयत्न केला असें त्याने दाखविलें

आहे. मनुष्याला कृतकर्मांची फळें भोगिलींच पाहिजेत. फक्त ज्ञानानेच त्याला त्यांचें भस्म करतां येतें, हें भगवद्गीतेंतील तत्त्व 'इतरो दहने स्वकर्मणां ववृते ज्ञानमयेन वह्निना'। [दुसरा म्हणजे रघु ज्ञानरूपी वह्नीनें स्वकर्मांचें दहन करण्यास प्रवृत्त झाला.] या श्लोकार्धांत कवीने उल्लेखिलें आहे. मोक्षप्राप्तीकरितां इंन्द्रियनिग्रहाची अत्यंत आवश्यकता असते हेही त्याने अन्यत्र (रघु० ८, २३) प्रतिपादिलें आहे.

जीव जन्ममरणाच्या फेऱ्यांतून जात असल्यामुळें कित्येकदा नकळत पूर्वजन्मीच्या गोष्टींची आठवण होऊन तो खिन्न होतो असें कालिदासाने कांही ठिकाणीं म्हटलें आहे. विश्वामित्राबरोबर राम वामनाश्रमीं प्राप्त झाला; त्यावेळीं आपल्या पूर्वावतारांतील कृत्यें त्याला आठवत नव्हतीं, तरी त्याच्या अन्तःकरणांत खळबळ उडाली असें त्याने 'रघुवंशां'त (रघु० ११,२२) वर्णिलें आहे. 'शाकुंतला'तील खालील श्लोकांतही तेंच तत्त्व ग्रथितकेलें आहे–

रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्
पर्युत्सुकीभवति यत्सुखितोऽपि जन्तुः।
तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वं
भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि॥ शाकु० ५,२.

अलीकडे अमेरिकेंत परलोकविद्येचें संशोधन चालू आहे; तेथे संशोधकांना अशा तऱ्हेचे अनुभव येत असलेलीं माणसें आढळलीं आहेत व त्यावरून त्यांना पुनर्जन्माची कल्पना पटूं लागली आहे; तें पाहून कालिदासाच्या सूक्ष्म मानससंशोधनाचें कौतुक वाटतें.

यानंतर आपण कालिदासाच्या समाजविषयक विचारांकडे वळूं. बौद्धधर्माने जातिभेदाचें उच्चाटन केलें होतें व संसार दुःखमय आहे असें लोकांच्या कानीं कपाळीं ओरडून आबालवृद्धांस संन्यासमार्गाचा उपदेश चालविला होता. या उपदेशाचा अस्वाभाविकपणा व मनुष्याच्या नैसर्गिक मनोवृत्तींशीं विरोध लक्षांत घेऊन सनातन धर्माच्या पुनरुज्जीवनार्थ लिहिलेल्या स्मृतींत वर्णाश्रमधर्माची श्रेष्ठता प्रतिपादिली होती. कालिदासाने आपल्या ग्रंथांत त्याचीच महती गाइली आहे. 'रघुवंशां'तील श्रेष्ठ राजांनी आपल्या राज्यांत प्रत्येक जातीचे लोक आपापलीं कर्तव्यें करीत आहेत की नाही याकडे पूर्ण लक्ष दिलें होतें असें कालिदासाने वर्णिलें आहे.

दुष्यन्ताच्या राज्यांत हलक्या जातीचे लोकही वाईट मार्गानें जात नसत, असें 'शाकुंतलां'त म्हटलें आहे. ब्राह्मणादि वर्णांनी आपापलीं स्मृत्युक्त कर्में केलीं असतां राज्यांत सर्वत्र भरभराट होते, लोक दीर्घायुषी होतात, त्यांच्यावर मानवी व दैवी आपत्ति येत नाहीत, असें दिलीपादि राजांच्या राज्यव्यवस्थेच्या वर्णनांत कवीने सुचविलें आहे. वर्णधर्मांबरोबर आश्रम-धर्माचाही कालिदासाने पुरस्कार केला आहे. 'शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम् । वार्द्धके मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ॥ [रघुवंशांतील राजे बालपणीं विद्येचा अभ्यास करीत, तारुण्यांत विषयोपभोग घेत, वृद्ध-पणांत ऋषींप्रमाणें तपोवनांत राहून तपश्चर्या करीत आणि शेवटीं योगाने देहत्याग करून मुक्त होत.] या वर्णनांत त्याने आश्रमधर्मांतील कर्तव्ये थोड-क्यांत सांगितलीं आहेत. त्याच्या ग्रंथांत राजेलोकांचा जीवितक्रम अगदी याच तऱ्हेचा वर्णिला आहे. त्याच्या नाटकांतील राजकुमारांचें बालपण एखाद्या आश्रमांतच गेलेलें दाखविलें आहे. बालपणीं ब्रह्मचर्यव्रत पाळून विद्या संपा-दन करावी व नंतर तारुण्यांत विषयोपभोग घ्यावा, जगांतील सुखें अनुभ-वावीं व आनंद लुटावा; पण त्यांतही 'न पुनरेति गतं चतुरं वयः' (रघु० ९,४७) [उपभोगक्षम वय म्हणजे तारुण्य पुनः येणार नाही.] म्हणून सदैव विषयासक्त होऊन शरीराची हानि करून घेऊं नये; एकदा इन्द्रि-यांना विषयोपभोगाची चटक लागली म्हणजे त्यांना त्यापासून परावृत्त करणें अत्यन्त कठीण जातें, हें त्याने अग्निवर्ण राजाच्या विलासाचें वर्णन करतांना स्पष्ट म्हटलें आहे. इंद्रियतृप्तीपेक्षा इंद्रियनिग्रहच श्रेष्ठ हें त्याने 'रघुवंशा'च्या तेराव्या सर्गांत शातकर्णी व सुतीक्ष्ण या ऋषींच्या परस्पर-विरोधी जीवनक्रमाचीं चित्रें जवळ जवळ ठेऊन दाखविलें आहे. हे दोघेही ऋषि महान् तपस्वी, त्यांच्या उग्र तपश्चर्येला भिऊन इन्द्राने दोघांसही मोह पाडण्याकरितां अप्सरा पाठविल्या. शातकर्णी ऋषि त्यांच्या जाळ्यांत सापडला व पञ्चाप्सर नामक सरोवरांतील अदृश्य प्रासादांत त्यांच्या नृत्यगीतादि विलासांनी आपला काळ घालवूं लागला. याच्या उलट सुती-क्ष्णाची स्थिति. त्याच्याही समोर येऊन त्याच्याकडे सस्मित कटाक्ष फेकून व कांही मिषाने आपल्या शरीराचा मेखलांकित भाग अर्धवट अनावृत करून अप्सरांनी त्याला भुरळ पाडण्याचा यत्न केला. पण त्यांच्या

मोहास बळी न पडतां तो पञ्चाग्निसाधन करीत होता असें कालिदासाने वर्णिलें आहे. 'प्रजायै गृहमेधिनाम्' [अपत्योत्पत्तीकरितां गृहस्थाश्रम] हें ध्येय त्याने वाचकांपुढे ठेविलें आहे. सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ, कारण तो सर्वोपकारक्षम आहे, म्हणजे त्यांत मनुष्यास सर्व प्राण्यांवर उपकार करतां येतात असें त्याने म्हटलें आहे, गृहस्थाश्रमांतील स्वजाति-प्राप्त कर्मे केल्यावर वृद्धपणीं एखाद्या तपोवनांत जाऊन ऋषींच्या सहवासांत आत्मानात्मविचार करावा, योगाभ्यास शिकावा व त्यायोगें शेवटीं देह ठेवून जीवितांचें सार्थक्य करावें अशी कालिदासाची शिकवण आहे.

कालिदासाने प्रसंगोपात्त अनेक कौटुंबिक व सामाजिक सद्गुणांचा उल्लेख केला आहे. मातृपितृप्रेम, पतिपत्नीप्रेम, बन्धुप्रेम, अपत्यप्रेम इत्यादि कुटुंबसंस्थेला आवश्यक असलेल्या विविध प्रेमाचीं मनोहर चित्रें त्याने आपल्या ग्रंथांत काढलीं आहेत. स्वतःला चौदा वर्षें वनवासांत पाठविणाऱ्या कैकेयीविषयींही रामाला किती आदर होता, 'माते ! आमचे वडील स्वर्गसाधनीभूत सत्यापासून चळले नाहीत याचें श्रेय तुलाच आहे' असें म्हणून त्याने तिची लज्जा कशी दूर केली तें कवीने सुंदर वर्णिलें आहे. याशिवाय वडील माणसांची आज्ञा तिच्या युक्तायुक्ततेचा विचार न करतां पाळावी (आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया), पूज्य जनांचा आदर करावा (प्रतिबध्नाति हि श्रेयः पूज्यपूजाव्यतिक्रमः।), अतिथीचें स्वागत करावें, विद्वानांचा गौरव करावा, असा उपदेश त्याने प्रसंगोपात्त केला आहे.

कालिदासाच्या ग्रंथांवरून त्याला प्रौढविवाह संमत होता याविषयीं वाद नाही. मालविका, पार्वती, शकुंतला, इन्दुमती, या कालिदासाच्या ग्रंथांतील मुख्य नायिका विवाहकालीं विविधकलानिपुण प्रौढ अशा दाखविल्या आहेत. या सर्वांनी स्वतःच्या पतींची निवड केली आहे. त्यावरून कालिदासाला प्रीतिविवाह संमत होता असें कांही प्रतिपादितात, तर कांही 'शाकुंतला'च्या पांचव्या अंकांतील शकुंतलाप्रत्यादेशांतील 'अतः परीक्ष्य कर्तव्यं विशेषात्संगतं रहः। अज्ञातहृदयेष्वेवं वैरीभवति सौहृदम्॥' [एकांतांतील मैत्री विशेष विचार करून करावी; नाही तर ज्यांच्या मनाची पूर्ण ओळख झाली नाही अशांच्या बाबतींत प्रेमाचें पर्यवसान वैरांत होतें.] या शार्ङ्गरवाच्या उक्तीकडे बोट दाखवून कालिदासाला त्याचे दुष्परिणाम

दिसत होते असें म्हणतात. पुष्कळदा सत्य सुवर्णमध्यांत सापडतें असें म्हणतात तसें तें येथेही दिसतें. कालिदासाने 'रघुवंशां'तील राजांचा सर्वत्र प्रीतिविवाहच वर्णिला नाही. दिलीप, रघु इत्यादिकांचा हल्लीच्या प्रमाणेंच ब्राह्म विधीने विवाह झाल्याचें वर्णिलें आहे. राम, कुश इत्यादि कांही राजांच्या पराक्रमामुळें त्यांना विशिष्ट स्त्रिया मिळाल्या असें दाखविलें आहे, त्यांतही प्रेमाचा संबंध येत नाही. हे संबंध दुःखपर्यवसायी झाले होते असें कोठेही वर्णन नाही. म्हणून प्रीतिविवाह कौटुम्बिक सुखाला आवश्यकच आहे असें त्याचें मत दिसत नाही. पण अर्थात् त्याचें त्याला वावडेंही नव्हतें; नाही तर त्याने आपल्या सर्व नाटकांत त्याचीं रम्य चित्रें रंगविलीं नसतीं. उर्वशी व शकुंतला यांच्यावर विवाहानंतर घोर आपत्ति येतात हें खरें; पण त्याचें कारण त्यांचा प्रणयविवाह हें नसून भवितव्यता हें होतें असें आम्ही मागे दाखविलें आहे. नाटकांतील एखाद्या पात्राच्या उद्गारांत कवीच्या मताचें प्रतिबिंब पाहणें योग्य होणार नाही. विशिष्ट परिस्थितींत एखाद्या पात्राला जसे विचार सुचतील तसेच त्याच्या तोंडीं घालणें यांतच कवीचें कौशल्य दिसून येतें. तथापि केवळ बाह्य सौंदर्यावर बसलेलें प्रेम टिकाऊ नसतें म्हणून प्रेमी जीवांनी विवाहापूर्वी आपापल्या मातापित्यांची संमति घ्यावी व त्यांनीही सर्व गोष्टींचा विचार करून आपल्या कन्यापुत्रांच्या सुखाला योग्य तो सल्ला द्यावा असें त्याचें मत दिसतें. हे त्याने 'श्रीः साभिलाषापि गुरोरनुज्ञां धीरेव कन्या पितुराचकाङ्क्ष।' या (रघु० ५,३८) पंक्तींतील गंभीर स्वभावाच्या कन्येच्या उपमेने व्यक्त केलें आहे. त्याच्या सर्व नायिकांत पार्वती ही श्रेष्ठ दिसते. पार्वतीने आपल्या तपश्चर्येने व एकनिष्ठ प्रेमाने शंकरांला वश केल्यावर एकदम त्यांच्याशीं गांधर्व विवाह न लावतां 'माझ्या पित्याची संमति घ्यावी' असें सखीद्वारा त्यांना सुचविलें असें कवीने 'कुमारसंभवां'त वर्णिलें आहे, त्यावरूनही वरील अनुमान युक्त दिसेल.

राजकारण-कालिदासाच्या तीन्ही नाटकांचा व 'रघुवंश' या प्रधान काव्याचा विषय राजचरित हाच असल्याने त्याने आपले राजकारण-विषयक विचार अनेक ठिकाणीं व्यक्त केले आहेत. राज्यसंस्था कोणत्या प्रकारची असावी, राजाच्या अंगीं कोणते गुण असावे, त्याचीं व प्रजेचीं

परस्परांविषयीं कर्तव्यें कोणतीं, कायदे कोणी करावे, कर किती मर्यादेपर्यंत बसवावे इत्यादि अनेक बाबींविषयीं आपलीं मतें निश्चित करून त्याने आपल्या ग्रंथांत प्रतिपादिलीं आहेत. त्यांचा एकत्र विचार करणें मनोरंजक होईल.

कालिदासकाळी हिंदुस्थानांत कांही गणराज्यें अस्तित्वांत होतीं, तथापि त्यांचें कोठेंही त्याने वर्णन केलें नाही. त्याच्या ग्रंथांत त्यांचें वर्णन करण्याचा प्रसंग आला नसावा किंवा त्याला ती राज्यपद्धति पसत नसावी. नाही म्हणावयास 'उत्सवसंकेत' नामक हिमालयांत राहणाऱ्या 'पर्वतीय गणां'चा रघुदिग्विजयांत एकदा उल्लेख आला आहे; पण त्यावरून त्यांच्या युद्धपद्धतीशिवाय त्यांच्याविषयीं जास्त माहिती मिळत नाही. एकंदरींत आपल्या कवीला प्रजाहिततत्पर एकतंत्री राज्यपद्धति पसंत होती असें दिसतें. 'मालविकाग्निमित्रां'त एकदा मंत्रिपरिषदेचा उल्लेख आला आहे; पण ते मन्त्री लोकांनी निवडून दिलेले दिसत नाहीत. शिवाय त्यांचें मत राजावर बंधनकारक होतें असेंही वाटत नाही. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रां'त सल्लागार मन्त्री व कार्यकारी अमात्य यांच्यामध्यें फरक केला आहे, तसा कालिदासाने केलेला दिसत नाही. कारण वर उल्लेखिलेल्या मन्त्रिपरिषदेला अमात्यपरिषद् असेंही म्हटलें आहे. अमात्य, मन्त्री व सचिव हे शब्द कालिदासाने समानार्थक योजिलेले दिसतात. या मन्त्र्यांचा सल्ला घेऊन योग्य वाटेल तें राजा करीत असे. राजाला कांही कारणाने राजधानीबाहेर जावें लागलें तर तो मन्त्र्यावर राज्यकारभार सोपवून जात असे. वसिष्ठाश्रमीं जातांना दिलीपाने, गन्धमादनपर्वतावर उर्वशीसह विहारार्थ जातांना पुरूरव्याने व राजधानीत असतांही विषयोपभोगपर अग्निवर्णाने राज्यधुरा सचिवांच्या स्वाधीन केली होती असें वर्णन आलें आहे.राजाला आकस्मिकपणें मृत्यु आला असतां त्याच्या मुलाला गादीवर बसविण्याची व तो अल्पवयस्क असल्यास त्याच्या मातेला साहाय्य करून तिच्याकडून योग्य रीतीने प्रजापालन करविण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच असे. यामुळें पुष्कळदा मन्त्र्यांच्या हातांत बरीच सत्ता असे यांत संशय नाही व कांही राजे मन्त्र्यांच्या धोरणाने वागत असत. मृगया हें एक व्यसन मानण्यांत आल्यामुळें दशरथ मन्त्र्यांची संमति घेऊन मृगयेस गेला असें कालिदासाने वर्णिलें आहे.

राज्यांतील निरनिराळ्या खात्यांच्या अधिकाऱ्यांस 'तीर्थ' अशी संज्ञा असे. त्यांचाही उल्लेख कालिदासाने केला आहे. (रघु० १७,६८).

एकतंत्री राज्यपद्धतीवर मुख्य आक्षेप हा की सर्व राज्याचा कारभार एका व्यक्तीच्या मर्जीप्रमाणे चालत असल्यामुळें तो दुर्वर्तनी निघाल्यास प्रजेवर अन्याय व जुलूम जबरदस्ती होण्याचा फार संभव असतो. तसें न व्हावें म्हणून आमच्या प्राचीन राज्यशास्त्रज्ञांनी दोन संरक्षक उपायांची (Safeguards) योजना केली होती. त्यांपैकी पहिला हा की कायदे करण्याची सत्ता राजाच्या हाती न ठेवतां ती विद्वान् व निःस्पृह ऋषिवर्गाच्या हातीं ठेविली होती. राज्यकारभारास जरूर ते बहुतेक कायदे स्मृतीत लिहून ठेविलेले असत. त्यांत फरक करण्याचा अधिकार राजास नव्हता. कालमानाप्रमाणें कायद्यांत फरक करण्याची जरूरी भासे, त्या वेळीं नवीन स्मृति लिहिल्या जात किंवा प्राचीन स्मृतींतून नवीन कालाला योग्य तो अर्थ काढीत असत. कायदा बदलला तरी तो बदलला नाही असें दाखविण्याची पद्धत (Fiction) प्रत्येक देशाच्या प्राचीन न्यायशास्त्रांत आढळते. राजाने मन्वादि स्मृतींतील कायद्यांचीच अंमलबजावणी करावयाची हें कालिदासाने 'नृपस्य वर्णाश्रमपालनं यत्स एव धर्मो मनुना प्रणीतः।' (रघु० १४,६६); 'रेखामात्रमपि क्षुण्णादामनोर्वर्त्मनः परम् । न व्यतीयुः प्रजास्तस्य नियन्तुर्नेमिवृत्तयः ॥' (रघु० १,१७) या श्लोकांत सुचविलें आहे व न्याय करतांना अतिथि राजा धर्मवेत्त्यांचें साहाय्य घेत असे असें स्पष्ट म्हटलें आहे (रघु० १७,३९). दुसरा संरक्षक उपाय हा की राजकुमारांस उत्तम शिक्षण देऊन व इन्द्रियनिग्रहाचें महत्त्व त्यांस पटवून त्यांच्यापैकी योग्य त्या कुमारासच युवराज करीत असत. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रां'त राजकुमारांच्या शिक्षणाविषयीं सविस्तर विवेचन आहे व कामलोभादि दुर्गुणांनी नाश पावलेल्या अनेक राजांचीं उदाहारणें देऊन 'तस्मादरिषड्वर्गत्यागेन इन्द्रियजयं कुर्वीत' [स्वशरीरांतील षड्रिपूंचा त्याग करून इन्द्रियांवर स्वामित्व मिळवावें] असा उपदेश केला आहे. कालिदासकाळीही समुद्रगुप्त, चन्द्रगुप्त इत्यादिकांची विद्वत्ता कलानैपुण्य वगैरेबद्दल जे शिलालेखांत उल्लेख आढळतात, त्यांवरून त्यांच्या शिक्षणाबद्दल चांगली काळजी घेतली जात असे असें दिसतें. मागें

प्रयागच्या स्तंभावरील हरिषेणकृत प्रशस्तींतील एक श्लोक दिला आहे, त्यावरून पहिल्या चंद्रगुप्ताने इतर राजकुमारांना दूर सारून समुद्रगुप्ताला केवळ त्याच्या योग्यतेमुळेंच आपला उत्तराधिकारी नेमलें होतें हें स्पष्ट दिसतें; व या अर्थाचे उल्लेख गुप्तांच्या इतर शिलालेखांतूनही आढळतात. कालिदासानेही 'रघुवंशां'त दिलीपाने रघूच्या शिक्षणाची किती काळजी घेतली होती तें वर्णिलें आहे व 'निसर्गसंस्कारविनीत इत्यसौ नृपेण चक्रे युवराजशब्दभाक्'। (स्वभावतःच व शिक्षणानेही तो विनयसंपन्न झाला आहे असें पाहून त्याला युवराज केलें.) असें स्पष्ट म्हटलें आहें. राज्यावर आल्यावर अतिथि राजाने बाह्य शत्रूंस जिंकण्याच्या अगोदर सहा अंतःशत्रूंना जिंकलें; दशरथाला मृगया, द्यूत, मद्य आणि स्त्रिया यांपैकी कशाचेंच व्यसन नव्हतें (रघु० ९, ७); दिलीप ज्ञानी होता तरी वावदूक नव्हता, बलवान् होता तरी क्षमाशील असे, दाता होता तरी बढाईखोर नव्हता, इत्यादि वर्णनांत राजाच्या अंगीं कोणते गुण असावे व त्याने कोणतीं व्यसनें टाळावीं याचें त्याने दिग्दर्शन केलें आहे. राजाने आपला जीवनक्रम कसा ठेवावा याविषयीं कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रांत सविस्तर विवेचन केलें आहे. त्याने दिवस व रात्र मिळून चोवीस तासांचे सोळा भाग करून प्रत्येक भागास निरनिराळीं कर्तव्यें नेमून दिलीं होतीं, त्या नियमांप्रमाणें कालिदासाचे नायक चालतांना दिसतात. (रात्रिदिवविभागेषु यदादिष्टं महीभृताम् । तत्सिषेवे नियोगेन स विकल्पपराङ्मुखः ॥ रघु० १७,४९).सकाळीं राजकृत्यें पाहून झाल्यावर (कार्यासनादुत्थितः) विहाराच्या वेळीं राजा उर्वशीचें चिन्तन करीत होता, असें 'विक्रमोर्वशीयां'त दाखविलें आहे. 'शाकुंतलां'त कण्वशिष्य शकुंतलेसह राजाकडे येतात त्या वेळीं तो लोकांचे न्यायनिवाडे करून नुकताच उठलेला होता; त्यामुळें तपस्वी आपणास भेटावयास आले आहेत असें त्यास कळविण्याचें कंचुकीच्या जिवावर येतें. या सर्व उल्लेखांवरून राजाने सदैव प्रजाहिततत्पर राहावें, त्यांत स्वसुखाचा अभिलाष धरूं नये असा उपदेश कालिदासाने केला आहे. किंबहुना राजा या शब्दाची व्युत्पत्ति 'राज्–शोभणें' यापासून न लावतां 'रञ्ज्–अनुरंजन करणें'

या धातूपासून लावून (तथैव सोऽभूदन्वर्थो राजा प्रकृतिरञ्जनात् ।) प्रजानुरञ्जन हेंच राजाचें ध्येय असावें असें त्याने सुचविलें आहे.

कर–राजाला प्रजेकडून प्राप्तीचा एकषष्ठांश कर म्हणून मिळत असे. हा सर्व वर्णांवर व आश्रमांवर बसविलेला असे (यथा स्वमाश्रमैश्चक्रे वर्णैरपि षडंशभाक् । रघु० १७, ६५). अरण्यांत राहणारे वानप्रस्थ व तपस्वी हेही अरण्यांत उत्पन्न होणाऱ्या नीवारधान्याचा षष्ठांश राजाच्या अधिकाऱ्यांना देण्यासाठी नदीच्या काठीं रास करून ठेवीत असत (तान्युञ्छ-षष्ठाङ्कितसैकतानि शिवानि वस्तीर्थजलानि कच्चित्). तथापि दुष्यन्ता-सारखे महात्मे त्याची अपेक्षा करीत नसत. त्या ऐवजी अरण्यवासी लोक आपणास स्वतःच्या तपश्चर्येचा सहावा हिस्सा देतात (तपःषड्-भागमक्षय्यं ददत्यारण्यका हि नः । शाकु०) असें दुष्यन्त म्हणतो. संपत्तीच्या लोभाने राजाने प्रजेकडून पैसा उकळूं नये. कर म्हणून घेतलेल्या पैशाचा वियोग प्रजेच्या कल्याणार्थच केला पाहिजे हें तत्त्व कवीने अनेक ठिकाणीं प्रतिपादिलें आहे. (प्रजानामेव भूत्यर्थं स ताभ्यो बलिमग्रहीत् । सहस्रगुणमुत्स्रष्टुमादत्ते हि रसं रविः । रघु० १, १८). रघूने दिग्विजय करून जी अलोट संपत्ति मिळविली तिचा विनियोग यज्ञ करण्यांत केला. त्या-नंतर एक विद्वान् ब्राह्मण गुरुदक्षिणेकरितां आला; त्यावेळीं स्वतःच्या इभ्रतीकरितां प्रजेवर जास्त कर न लादतां त्याने प्रत्यक्ष कुबेरावर चाल करण्याचें ठरविलें व त्याच्याकडून मिळालेली सोन्याची सर्वरास त्या ब्राह्मणा-स देऊं केली. दुष्यन्ताच्या राज्यांत कोणी अत्यंत धनवान् व्यापारी निपुत्रिक असतां मेला; तेव्हा तत्कालीन कायद्याप्रमाणें त्याची सर्व संपत्ति राजाला मिळत होती, तरी तिचा लोभ न धरतां त्याची कोणी स्त्री गर्भवती असल्यास त्या गर्भाच्या नांवें ती राखून ठेवावी अशी दुष्यन्ताने आज्ञा केली. यावरून राजे लोकांच्या अंगीं निर्लोभपणा असणें कसें आवश्यक आहे तें कालिदासाने दाखविलें आहे.

राजकर्तव्यें--लोकांकडून करभार घेतल्यामुळें राजाला अनेक कर्तव्यें प्राप्त होतात. त्यांपैकी प्रमुखांचा निर्देश 'प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद्भरणा-दपि । स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः ॥' (रघु० १,२४) या श्लोकांत केला आहे. लोकांचें रक्षण करणें, त्यांना शिक्षण देणें व त्यांना उपजीविकेचीं

साधनें प्राप्त करून देणें हीं राजाचीं मुख्य कर्तव्यें 'रघुवंशां'तील राजांनीं उत्तम रीतीने पार पाडलीं होतीं असें कालिदासाने दाखविलें आहे. त्यांच्या कारकीर्दीत लोकांना शत्रूंची स्वारी माहीत नव्हती; दिलीपाच्या कडक शिस्तीमुळें लोकांना चोराची जाणीव भाषेंतील तद्विषयक शब्दावरूनच होत असे; पुत्रजन्मोत्सवप्रसंगीं मुक्त करण्यास त्याच्या बंदिखान्यात एकही कैदी नव्हता; त्याच्या राज्यात इतकी शांतता व सुव्यवस्था होती की रात्रीं विहारस्थलीं जात असतांना श्रमल्यामुळें अभिसारिका वाटेवरच निद्रावश झाल्या, तरी त्यांच्या अंगावरील वस्त्र हलविण्याची वाऱ्याची छाती नव्हती. दशरथाच्या राज्यांत रोगराईही नव्हती मग शत्रूंचें नांव कुठलें. (रघु० ९,४); अतिथीच्या कारकीर्दीत व्यापाऱ्यांना नद्या विहिरीसारख्या व वनें उपवनांसारखी वाटूं लागलीं. उत्तुंग पर्वतावर ते घरांतल्याप्रमाणें निःशंकपणें वावरूं लागले.(रघु० १७,६४); इत्यादि वर्णन 'रघुवंशांत' आलें आहे. व्यापाऱ्यांप्रमाणें तपश्चर्या करणाऱ्या ऋषिवर्गाचें राक्षसांदिकांपासून संरक्षण करणें हें राजाचें प्रधान कर्तव्य मानलें जात असे. म्हणून आपणाकडें तपस्वी आले असें समजतांच 'ऋषींच्या तपश्चर्येंत कांही विघ्न तर आलें नसेलना ? तपोवनांतील प्राण्यांना कोणी इजा तर केली नाही ना ? माझ्या दुष्कृत्यांमुळें अरण्यांतील लता वृक्षांना पुष्पें व फळें येण्याचें थांबलें नसेल ना ?' असे नाना प्रकारचे विकल्प दुष्यन्ताच्या मनांत येतात. अशा तऱ्हेचेच प्रश्न रघूने कौत्साप्रति विचारले आहेत (रघु० ५,५-९). त्यावरून राज्यांतील शांतता व सुव्यवस्था यांविषयी कालिदासाचे विचार समजून येतात.

शिक्षण—लोकांना शिक्षण देणें हेंही राजाचें प्रधान कर्तव्य मानलें जात असे. याकरितां राज्यांत ठिकठिकाणीं नदीच्या काठी ऋषीचे आश्रम असत् व त्यांच्या निर्वाहाकरितां भोवतालची जमीन राखून ठेविलेली असे. तेथील शिक्षणक्रम निर्विघ्नपणें चालावा म्हणून राजाने एक अधिकारीही नेमलेला असे. आपण अशा तऱ्हेचा अधिकारी असून आश्रमांतील कृत्यें निर्विघ्नपणें चाललीं आहेत काय हें पाहण्यासाठीं तपोवनांत आलों आहों अशी 'शाकुंतलां'त दुष्यन्त प्रथम बतावणी करतो. शिक्षणक्रम संपल्यावर शिष्याने गुरूला दक्षिणा द्यावी लागे तीही राजाकडून मिळे व याप्रमाणें

अप्रत्यक्षपणेंही राजा शिक्षणास द्रव्यद्वारा मदत करीत असे. कौत्स नांवाच्या ब्रह्मचाऱ्यास गुरुदक्षिणेकरितां चौदा कोटी रुपये लागले ते रघूने कुबेराकडून मिळविले असा प्रसंग 'रघुवंशां'त वर्णिला आहे.

पोषण—राजेलोक रस्ते, पूल इत्यादि दळणवळणाचीं साधनें वाढवून सर्वत्र शांतता व सुरक्षितता राखून व्यापाऱ्यांना उत्तेजन देत. पण त्याखेरीज स्वतःही संस्थानातर्फे अनेक लहान मोठे कारखाने चालवीत असत, त्यांत लोकांना उपजीविकेचें साधन मिळत असे. कालिदासाच्या ग्रंथांत यांचें सविस्तर वर्णन नाही; पण एक दोन ठिकाणीं सेतु म्हणजे मोठमोठे पूल बांधणें, शेती करणें, वन्य हत्ती पकडणें, खाणीतून रत्नें काढणें इत्यादि कर्मांचा निर्देश आहे, त्यावरून त्यांची कल्पना करतां येते. (रघु० १६,२; १७,६६).

यज्ञकर्म—कालिदासकाळीं यज्ञकृत्यांनी देव संतुष्ट होतात व योग्य वेळीं जलवृष्टि करतात (रघु० १,६२) अशी लोकांची धार्मिक श्रद्धा असल्याने राजेलोक वेळोवेळीं अनेक यज्ञ करीत असत. दक्षिणेंतील आन्ध्र व वाकाटक यांनी आप्तोर्याम, अग्निष्टोम इत्यादि अनेक यज्ञ केल्याचें कोरीव लेखांत नमूद आहे. कालिदासानेंही आपल्या ग्रंथांत दिलीप, रघु इत्यादि राजांनी यज्ञ केल्याचें वर्णन केलें आहे. दिलीप यज्ञाने स्वर्गाचें व इन्द्र वृष्टीने मृत्युलोकाचें धारण करीत असे. (रघु० १,). वसिष्ठाश्रमास जातांना स्वतः याज्ञिकांना दिलेल्या ग्रामांतून दिलीपाला यज्ञस्तंभ उभे असलेले दिसले, असें कालिदासाने वर्णिलें आहे. त्यावरून यज्ञकर्माकरितां राजे लोक विद्वान् व धार्मिक ब्राह्मणांस अग्रहार देत असत असें दिसतें.

याशिवाय धर्मसंरक्षण, न्यायदान इत्यादि कर्तव्यें राजाने करावयाचीं असत. राजाने लोकांकडून स्मृत्युक्त वर्णाश्रमधर्माचें आचरण करवावें, कोणालाही स्वजातिविहित कर्में टाकून परजातीचीं कर्में करूं देऊं नये, स्वतः राजाने लोकांचे कज्जे पाहून निःपक्षपातीपणाने वादी व प्रतिवादी यांचें समाधान होईल असा न्याय द्यावा, असें कालिदासाने अनेक ठिकाणीं सुचविलें आहे. दिलीपाला नेहेमी गुणांची चाड होती; सज्जन मनुष्य आपला शत्रु असला तरी तो त्याला मान देत असे. व आपल्या मर्जीतला मनुष्य दुर्वर्तनी निघाला तर त्याचा त्याग करीत असे; अपराधानुरूप शिक्षा

देऊन रघूने सर्व लोकांचीं मनें आकर्षित केलीं; इत्यादि वर्णनाने निःपक्षपातित्व, न्यायीपणा इत्यादिकांचें महत्त्व कालिदासाने दाखविलें आहे.

संरक्षण, शिक्षण, पोषण इत्यादि विविध प्रकारें 'रघुवंशां'तील राजे आपल्या प्रजेचें पालन करीत असल्याने तेच खरे प्रजेचे पितें होत असें कालिदासाने अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. प्रजेच्या शोकाचें कारण शोधून तें दूर करण्यांत तत्पर असल्यामुळें सर्वांना राम पुत्राच्या ठिकाणीं झाला होता (तेनास लोकः पितृमान् विनेत्रा तेनैव शोकापनुदेन पुत्री। रघु० १४, २३), 'जवळ खूप संपत्ति असते तोंवर मनुष्याच्या भोंवतीं त्याचे नातेवाईक जमतात; पण ती संपुष्टांत आल्यावर घटकेंत त्यांचा पांगापांग होते. राजा! तूं मात्र सदैव लोकांच्या उपयोगी पडत असल्यामुळें तुझ्या ठिकाणीं बंधुत्व परमावधीस गेलें आहे.' असें बैतालिक म्हणतो तें दुष्यन्तचरितावरून अक्षरशः खरें दिसतें. अशाप्रकारें अष्टौप्रहर प्रजेच्या कल्याणाची चिन्ता वाहणारा राजा एक प्रकारें तपश्चर्याच करीत असतो; म्हणून त्याला राजर्षि ही पदवी शोभते हें कालिदासाने खालील श्लोकांत दाखविलें आहे—

अध्याक्रान्ता वसतिरमुनाप्याश्रमे सर्वभोग्ये
रक्षायोगादयमपि तपः प्रत्यहं सञ्चिनोति।
अस्यापि द्यां स्पृशति वशिनश्चारणद्वन्द्वगीतः
पुण्यः शब्दो मुनिरिति मुहुः केवलं राजपूर्वः॥ शाकु० २,१४

प्राचीन काळीं इतर राजांना जिंकून स्वतः चक्रवर्ती व्हावें अशी प्रत्येक राजाची महत्त्वाकांक्षा असे. इतर राजांना आपलें सार्वभौमत्व मान्य करावयास लावावें म्हणून दिलीपाने नव्याण्णव अश्वमेध केले व रघूने दिग्विजय केला. या दिग्विजयांत रघूने अनेक राजांचा पराभव केला. कित्येक तर युद्धांत मारले गेले; तथापि त्यांचीं राज्यें खालसा न करितां त्यांच्याकडून करभार घेऊन व मृत राजांच्या मुलांस गादीवर बसवून रघु परत फिरला. शत्रूवर विजय मिळविणें हें गौतमधर्मसूत्रांत क्षत्रियांचें कर्तव्य सांगितलें आहे. पण हा विजय परराज्यें लोभाने गिळंकृत करण्याकरितां नसे तर दुर्बलांचें संरक्षण व दुर्जनांचें पारिपत्य करून धर्माचें राज्य

पृथ्वीवर प्रतिष्ठापित करावें व अश्वमेध, राजसूय, विश्वजित् यांसारखे मोठमोठे यज्ञ करून देवांस संतुष्ट करावें, याकरितांच असे हें दाखविण्याकरितां जगज्जेत्या रघूस 'धर्मविजयी' असें सार्थ विशेषण कालिदासाने लाविलें आहे (रघु० ४,४३). ख्रिस्तीशकाच्या पहिल्या तीन शकात शक व कुशानवंशीय परकी राजांशीं टक्कर देऊन हिंदुधर्माला पुनरुज्जीवित करण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानच्या लहान सहान राज्यांत नव्हतें. ते कार्य दिग्विजयी समुद्रगुप्त व द्वितीय चन्द्रगुप्त यांनीच केलें म्हणून चक्रवर्तित्वाचें ध्येय कवीला पटून त्याने आपल्या ग्रंथांत त्याचा पुरस्कार केलेला दिसतो.

शिक्षण—कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीय,' 'शाकुन्तल' व 'रघुवंश' या ग्रंथांत आश्रमांतील परिस्थिति वर्णिली आहे व 'मालविकाग्निमित्र' नाटकांत शिक्षणशास्त्रांतील तात्त्विक विचार आले आहेत. त्यावरून कवीचीं शिक्षणविषयक मतें अजमावितां येतात. 'मालविकाग्निमित्रा'त मालविकेचा नाट्यप्रयोग राजासमोर व्हावा या उद्देशाने विदूषकाने तो प्रसंग जुळवून आणला आहे; म्हणून तेथील परिव्राजिकादिकांच्या भाषणांतील शिक्षणविषयक विचार एकांगी भासून ते कालिदासाचे नसावे अशी शंका येण्याचा संभव आहे. तथापि ते तसे असते तर धारिणीने त्याविरुद्ध आक्षेप घेतला असता. एकदोन ठिकाणीं मतभेदाला जागा होती तेथे तिने तो घेतला आहेही; त्यावरून त्या प्रवेशांत कालिदास आपले सर्वसंमत होण्यासारखे शिक्षणविषयक विचार सांगत आहे याविषयीं संशय राहत नाही.

कालिदासीय ग्रंथांत तपोवनांतील ऋषींचे आश्रम हींच शिक्षणाचीं मुख्य केंद्रें म्हणून वर्णिलीं आहेत. हे आश्रम बहुधा मोठमोठ्या नगरांपासून लांब एखाद्या नदीच्या तीरीं वसलेले असत. 'शाकुंतला'तील कण्वाश्रम दुष्यन्ताच्या राजधानीपासून कांही दिवसांच्या वाटेवर हिमालयाच्या पायथ्याशीं मालिनी नदीच्या तीरावर होता असें त्या नाटकांतील उल्लेखांवरून दिसतें. 'रघुवंशा'तील वसिष्ठाश्रमास पोचण्यास दिलीपास जवळजवळ दिवसभर रथांतून प्रवास करावा लागला असें वर्णिलें आहे. 'विक्रमोर्वशीया'तील च्यवनाश्रम मात्र राजधानीपासून फार दूर नसावा; कारण तेथून राजधानींत येण्यास तापसी व राजकुमार आयु यांना फार वेळ

लागलेला दिसत नाही. याशिवाय श्रीमंत लोक घरीं शिक्षक ठेऊन आपल्या मुलांस विविध विद्यांचें व कलांचें शिक्षण देत असत असें दिसतें. रघु, पार्वती इत्यादिकांचें शिक्षण घरींच विविध विषयांतील शिक्षक ठेवून झालेलें दिसतें. मालविका व इरावती यांना नृत्यगायनादिकांचें शिक्षण देण्यास राजवाड्यांत स्वतंत्र नाट्याचार्य ठेवले होते. क्वचित् पिता पुत्रास व पति पत्नीस कांही विषय शिकवीत असावे. रघूला आपला पिता दिलीप यापासूनच धनुर्विद्या प्राप्त झाली होती व इन्दुमती ही अजाची ललितकला शिकणारी प्रियशिष्या होती असें कवीने वर्णिलें आहे.

आश्रमांत मुलांप्रमाणें मुलींनाही शिक्षण दिलें जात असे. प्राचीन काळीं गृहस्थाश्रमांतील कर्तव्यें केल्यावर लोक वानप्रस्थाश्रम स्वीकारून तपश्चर्येकरितां एखाद्या तपोवनांत जात त्या वेळीं त्यांच्या बरोबर त्यांचीं लहान मुलेंही असत असें दिसतें. मारीचाश्रमांत सर्वदमनाला पाहिल्यावर व तो पुरुवंशांतील आहे असें समजल्यावर दुष्यन्ताला तो एखाद्या वानप्रस्थी पौरव राजाचा मुलगा असेल असें वाटलें. 'तुजकरितां फुलें, फळें व देवतांच्या नैवेद्याकरितां उपयुक्त असलेलें वन्य नीवार धान्य आणून व तुझ्याशीं गोड बोलून मुनिकन्या तुझ्या दुःखाचा परिहार करतील,' असें सांगून वाल्मीकि ऋषींनी वनांत टाकलेल्या सीतेचें सांत्वन केलें. 'शाकुंतलां'तील प्रियंवदा, अनसूया व शकुंतला या आश्रमांतच वाढल्या व शिकल्या होत्या. मुलामुलींचें एकच शिक्षण होत असे किंवा त्यांचे निरनिराळे वर्ग असत याचा उल्लेख मात्र कालिदासाच्या ग्रंथांत नाही. तथापि त्याच्या नंतर सुमारें तीनशें वर्षांनी होऊन गेलेल्या भवभूतीच्या 'उत्तररामचरितां'त आत्रेयी, लव व कुश यांचें कांही काळ एकत्रशिक्षण झालेलें दाखविलें आहे त्यावरून कालिदासकाळींही तशीच पद्धत असण्याचा संभव आहे.

या आश्रमांत सामान्यतः उपनयन झाल्यावर म्हणजे वयाच्या आठव्या वर्षापासून मुलें घेत असत असें दिसतें व तेथे त्यांचें शिक्षण वयाच्या सोळा ते बीस वर्षांपर्यंत होत असावें. 'विक्रमोर्वशीयां'तील 'आयु' नामक राजकुमार आश्रमांतील शिक्षण संपण्याच्या वेळीं कवच धारण करण्यास योग्य झाला होता असें कवीने वर्णिलें आहे. त्यावरून त्यावेळीं त्याचें वय सोळा सतरा वर्षांचें असावें असें वाटतें. ब्राह्मणवर्णांतील

बुद्धिमान् विद्यार्थी चौदाही विद्यांचा अभ्यास करीत त्यांना अर्थातच जास्त वर्षे अध्ययन करावें लागे. शकुंतला व तिच्या सख्या उपवर होईपर्यंत आश्रमांत राहत होत्या व शकुंतलेनंतर लौकरच त्यांचाही विवाह करण्याचा कण्वांचा विचार होता असें दिसतें. हारीत धर्मसूत्रांत आश्रमांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींचे सद्योवधू व ब्रह्मवादिनी असे दोन वर्ग वर्णिले आहेत. यांपैकीं पहिल्या वर्गांतील कन्यांचा शिक्षण संपल्यानंतर विवाह होत असे. व दुसऱ्या वर्गांतील कन्या आमरण आश्रमांत ब्रह्मचर्यव्रताने राहत असत. अशीच परिस्थिति कालिदासकाळीही असावी; म्हणून दुष्यन्ताने शकुतलेच्या सख्यांस ही विवाहापर्यंतच वैखानसव्रताचें आचरण करणार आहे किंवा येथेच सदैव हरिणीच्या सहवासांत राहणार आहे, असा शकुंतलेविषयीं प्रश्न केला आहे. असो.

आश्रमांत घेतांना विद्यार्थ्याच्या शीलाची नीट चौकशी करीत. जो वर्तनाने शुद्ध, बुद्धीने चलाख, कामांत प्रमाद न करणारा व ब्रह्मचर्याने युक्त असेल त्यालाच विद्यादान करावें म्हणजे ती विद्या वीर्यवती राहते असें यास्काचार्यांच्या निरुक्तांत व मनुस्मृतींत म्हटलें आहे. सच्छिष्याला विद्या दिली असतां गुरूला पुढे पश्चात्ताप करण्याची पाळी येत नाही हें कालिदासाने 'वत्से सुशिष्यपरिदत्तेव विद्याऽशोचनीयासि संवृत्ता' या कण्वोक्तींतील उपमेने सुचविलें आहे.

आश्रमांतील जीवनक्रम अगदी साधा असे. राहण्याला वृक्षपर्णांनी तयार केलेली पर्णशाला, नेसण्यास वल्कलें, भोजनास अकृष्टरोहि म्हणजे जमीन नांगरल्याशिवाय उगवणाऱ्या नीवार धान्याचे पदार्थ, वन्य फळें व कंदमूळें, निजण्यास दर्भाची शय्या किंवा हरिणचर्म, अशी आश्रमांतील व्यवस्था असे.(रघु० १९,५; १४,८१).रात्रीं दिव्याकरितां इंगुदी-(हिंगण-बेटा)च्या तेलाचा उपयोग करीत. जखमेवर औषध म्हणूनही त्याचा उपयोग होत असे (शाकु० ४,१४). कालिदासाने एका उपमेंत 'पश्चिमायामिनीयामात्प्रसादमिव चेतना' (रघु० १७,१०) म्हटल्याप्रमाणें पहाटेच्या प्रहरीं बुद्धिप्रसन्न असते म्हणून पहाटे उठून विद्यार्थी अध्ययनास लागत. त्यांच्या अध्ययनाने दिलीपाला पहाट झाली असें समजल्याचें 'रघुवंशां'त दाखविलें आहे.सकाळीं व संध्याकाळीं समिधा,कुश,फळें वगैरे आणण्याकरितां

तपस्वी व विद्यार्थी तपोवनाबाहेर जात असत. स्त्रियांना व विद्यार्थीनींना जवळपासच्या नदीतून किंवा पाणवठ्यावरून गृहकृत्यांकरितां किंवा झाडांस घालण्याकरितां पाणी आणावें लागे. सकाळीं व सायंकाळीं अग्नीची पूजा व होम होत असत. (रघु० १,५३.)

आश्रमांत सदैव शांततेचे वातावरण असल्याने तेथील पशुपक्ष्यांवरही त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहत नसे. वाल्मीकीच्या आश्रमांत सर्व प्रकारचे प्राणी तपस्व्यांच्या संसर्गाने शांत स्वभावाचे झाले होते असें कालिदासाने म्हटलें आहे. आश्रमांत कोणाही प्राण्याची हत्या करूं नये असा कडक नियम असे. शिकार करतां करतां दुष्यंत कण्वांच्या तपोवनाजवळ जाऊन पोहोचला.तेथे एक मृग आपल्या आटोक्यांत आला असें पाहून तो बाण मारणार इतक्यांत समिधा आणणारे तपस्वी मध्यें पडले व त्यांनी राजाला 'हा आश्रममृग अतएव अवध्य आहे' असें सांगून बाण परत घेण्याविषयीं विनंती केली व ती राजाने ऐकली असा प्रसंग 'शाकुंतलां'त घातला आहे. 'विक्रमोर्वशीयां'त ऋषिकुमारांबरोबर फुलें, समिधा वगैरे आणण्याकरितां गेलेल्या आयूने संगमनीय मणि घेऊन जाणाऱ्या गृध्राला बाण मारून खाली पाडलें हें आश्रमाच्या नियमांविरुद्ध कृत्य झालें म्हणून च्यवन-ऋषीनी तापसीला त्याला त्याच्या नातेवाइकांकडे पाठविण्यास सांगितलें. यावरूनही आश्रमांतील शिस्त कशी पाळली जात असे तें दिसून येतें.

आश्रमांत ब्राह्मणकुमारांस चौदाही विद्यांचें शिक्षण मिळे. या विद्यांचा उल्लेख मागे आलाच आहे. क्षत्रिय कुमारांस आवश्यक असें धनुर्वेदशिक्षणही आश्रमांत देत असत असें 'विक्रमोर्वशीया'तील वरील प्रसगावरून दिसून येतें. स्त्रियांस लिहिणें, वाचणें, चित्रकर्म, संगीतकला, गृहकृत्यें इत्यादि उपयुक्त प्रकारचें शिक्षण देत असत. असें 'शाकुंतलां'तील शकुंतला व तिच्या सख्या यांच्या भाषणावरून दिसून येतें. ज्या स्त्रियांना संसारांत पडावयाचें असेल त्यांना बागाइतीचें शिक्षण अवश्य द्यावें असा कालिदासाचा अभिप्राय दिसतो. वृक्षांना योग्य वेळीं पाणी देऊन त्यांची जोपासना करण्याने स्त्रियांच्या हृदयांत नकळत हळू हळू अपत्यप्रेमाचा अंकुर फुटतो असें त्याने अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. तपश्चर्या करीत

असतां ज्या वृक्षांना पार्वतीने पाणी घालून वाढविलें त्यांच्याविषयीं तिला कार्तिकेयापेक्षा जास्त प्रेम वाटूं लागलें. आश्रमांतील लहान वृक्षांना स्वत:ला उचलतां येतील अशा घटांनी पाणी घालण्याने पुत्रोत्पत्तीपूर्वीच तुला अपत्यप्रेमाचा अनुभव येईल असें वाल्मीकीने सीतेला सांगितलें होतें, असें कालिदासाने वर्णिलें आहे. कांही स्त्रिया पुरुषांप्रमाणें इतरही विद्यांचा अभ्यास करीत असतील. 'मालविकाग्निमित्रां'तील परिव्राजिका अशा तऱ्हेची विविधविद्यापारंगत विदुषी दिसते.

'यतस्त्वया ज्ञानमशेषमाप्तं लोकेन चैतन्यमिवोष्णरश्मेः' या पंक्तीत कालिदासाने अज्ञानाचा नाश करून मनुष्याला नवीन दृष्टि प्राप्त करून देणाऱ्या शिक्षकाला रात्रीचा अंधकार दूर सारून सर्व विश्वांत चैतन्य उत्पन्न करणाऱ्या सूर्याची उपमा दिली आहे व त्यायोगें समाजांत शिक्षक वर्गाला किती मान मिळाला पाहिजे हें सूचित केलें आहे. खरा शिक्षकही विद्येवरील निष्ठेने अध्यापनकार्य करीत असतो; जो केवळ उदरंभरणार्थ विद्येचा उपयोग करतो त्याला ज्ञानरूपी मालमसाला विकणारा वाणी म्हणतात (यस्यागमः केवलजीविकायै तं ज्ञानपण्यं वणिजं वदन्ति), असे स्पष्ट उद्‌गार त्याने 'मालविकाग्निमित्रां'त काढले आहेत. सर्व शिक्षक सारख्या योग्यतेचे नसतात. कांहीचें ज्ञानभांडार विशाल असतें, पण त्यांना शिष्याला आपली विद्या शिकविण्याचें साधत नाही. कांहींचें ज्ञान तुटपुंजें असलें तरी तें शिकविण्याची त्यांची हातोटी चांगली असते. हे दोन्ही गुण ज्याच्या ठिकाणीं एकवटले आहेत तोच सर्व शिक्षकांत श्रेष्ठ समजावा, असा स्वानुभव कालिदासाने 'श्लिष्टा क्रिया कस्यचिदात्मसंस्था संक्रान्तिरन्यस्य विशेषयुक्ता । यस्योभयं साधु स शिक्षकाणां धुरि प्रतिष्ठापयितव्य एव ॥' (माल० १,१६) या श्लोकांत सांगितला आहे.

विद्यार्थ्याच्या मनाचा कल, बुद्धि, पात्रता इत्यादि ओळखून त्याला योग्य तो विषय निवडण्यांत शिक्षकाचें कौशल्य दिसून येतें. अशी काळजी प्रथमच घेतली असतां विद्यार्थ्याचे व शिक्षकाचे श्रम फुकट जात नाहीत व विद्यार्थ्याला परीक्षेच्या वाऱ्या कराव्या लागत नाहीत, हें तत्त्व आतां सर्वमान्य झालें आहे. व तेंच कालिदासाने 'मालविकाग्निमित्रां'तील पात्रांच्या वादविवादांत पुढे मांडलें आहे. उभयतां नाट्याचार्यांनी आपापल्या

शिष्येंकडून नाट्याची परीक्षा देऊन आपलें शिक्षणनैपुण्य दाखवावें असें परिव्राजिकेने सुचवितांच धारिणी म्हणते, 'एखादी विद्यार्थिनी मंदबुद्धि असल्यामुळे शिक्षणाचें चीज करीत नसेल तर त्याचा दोष शिक्षकाच्या माथी मारावा काय?' त्यावर विदूषक उत्तर करतो, 'शिक्षणाकरितां अयोग्य विद्यार्थिनीची निवड करण्यांत शिक्षकाचे मंदबुद्धित्व दिसून येतें.' इतरत्रही 'क्रिया हि वस्तूपहिता प्रसीदति' (रघु०,३,१९) योग्य विद्यार्थी पाहून शिक्षण दिल्यास ते फलप्रद होतें असें कवीने म्हटलें आहे.

वरील प्रवेशांत कालिदासाने विद्यार्थ्यांसही कांही सूचना केल्या आहेत. 'अपरिनिष्ठितस्योपदेशस्यान्याय्यं प्रकाशनम्' घेतलेलें शिक्षण पूर्णपणें आत्मसात् झाल्याखेरीज परीक्षेस बसण्याने त्याची स्वतःची हानि व शिक्षकांस अन्याय होतो. हल्ली परीक्षा पास होण्यावर सर्व मदार असल्याने व परीक्षा ही बहुतांशी लॉटरी आहे असा समज सर्वत्र पसरल्याने पुष्कळ विद्यार्थी समाधानकारक तयारी नसतांही परीक्षेस बसतात. पुष्कळदा ते नापास होतात; पण यदाकदाचित् पासु झाले तरी त्यांना मिळालेलें ज्ञान पूर्णपणें मनांत भिनलें नसल्यामुळें पुढील वर्गांत किंवा व्यवहारांत त्याचा कांही उपयोग होत नाही. तसेंच केवळ घोकून कोणतीही विद्या हस्तगत होत नसून तिचा पद्धतशीर अभ्यास करावा लागतो हें कवीने 'विद्यामभ्यसनेनेव प्रसादयितुमर्हसि' (रघु० १, ८८) या उपमेंत सुचविलें आहे.

शिक्षक व विद्यार्थी यांप्रमाणें परीक्षा घेणारीं विश्वाविद्यालयें व मंडळें यांसही कांही उपयुक्त सूचना वरील प्रवेशांत सांपडतील. हरदत्त व गणदास यांच्या कलहाचा निवाडा आपण करावा असें राजाने परिव्राजिकेस म्हणतांच ती हसून म्हणते, 'पुरे ही थट्टा! जवळ शहर असतां रत्नांची परीक्षा कोणी खेडेगांवांत करील काय?' त्यावर राजा म्हणतो, 'आपण विदुषी व मध्यस्थ आहां. मी व राणी दोघेही यांचे पक्षपाती आहों.' यांत विद्यार्थ्यांचे नातेवाईक किंवा त्यांनी पास होण्यांत ज्यांचे हितसंबंध आहेत अशांना परीक्षक नेमूं नये, त्यांच्या हातून कळत न कळत पक्षपात होण्याचा संभव असतो हें कालिदासाने सुचविलें आहे. तसेंच पुढे 'सर्वज्ञस्याप्येकाकिनो निर्णयाभ्युपगमो दोषाय' या परिव्राजिकेच्या उक्तींत

एकाच परीक्षकाच्या मतावर परीक्षेचा निकाल लावल्यास, परीक्षक सर्वज्ञ असला तरी त्याच्या हातून विद्यार्थ्यांना अन्याय होण्याचा संभव असतो; म्हणून परीक्षेंत नेहेमीं दोन किंवा अधिक परीक्षक नेमावे. तसें केलें असतां अन्यायाचा संभव कमी होतो अशी सूचना कवीनें केली आहे हीच पद्धति अलीकडे सर्वसंमत झाली आहे. चित्रकर्म, नृत्य, गीत इत्यादि ज्या प्रयोग-प्रधान कला किंवा विद्या आहेत त्यांचें केवळ पुस्तकी शिक्षण पुरें होत नसून प्रत्यक्ष प्रयोग पाहून परीक्षकांनी विद्यार्थ्यांची लायकी ठरविली पाहिजे हेंही तत्त्व कवीने या प्रवेशांत सांगितलें आहे.

प्रसंगोपात्त कालिदासाने शिक्षणाच्या हेतूचा उल्लेख केला आहे. त्याचा विचार करून हें प्रकरण संपवूं. शिक्षणाचें ध्येय अनेकानी अनेक प्रकारें वर्णिलें आहे. ज्याच्यायोगें शरीर सुदृढ, वाणी प्रगल्भ व मन सु-संस्कृत होईल तें खरें शिक्षण असें कांही म्हणतात, तर काही ज्यामुळे विद्यार्थी उत्तम नागरिक बनेल तें उत्कृष्ट शिक्षण असा आपला अभिप्राय देतात. कालिदासाने 'सम्यगागमिता विद्या प्रबोधविनयाविव' या उप-मेंत प्रबोध म्हणजे ज्ञानप्राप्ति व विनय म्हणजे शीलसपन्नता हे विद्येचे दोन उद्देश सांगितले आहेत. केवळ ज्ञानाने मनुष्य श्रेष्ठ होत नाही. त्याच्या जोडीला सच्छील असलें पाहिजे हें त्याने वरील उपमेंत सुचविलें आहे. विद्येची चांगली उपासना केली तर हे दोन्ही उद्देश सफल होतात. परीक्षेकरितां नेमलेलीं पुस्तकें घोकून ठराविक वेळेंत परीक्षा पास झाल्यानें शील तर राहोच, पण ज्ञानही हातीं लागत नाही असा सध्यांचाही अनु-भव आहे. ज्ञानाने मनुष्याचीं जगांतील सुखसाधनें वाढतील; पण त्याच्या जोडीला सच्छील नसेल तर मानवी स्वभावांतील लोभ, मत्सर, द्वेष इत्यादि दुष्ट मनोविकार बळावून जगांत सर्वत्र कलह, युद्ध व रक्तपात दिसतील. म्हणून ज्ञानाच्या उद्देशांत प्रबोधाबरोबर विनयाचाही उल्लेख कालिदासाने केला आहे.

प्रकरण नववें

कालिदास व उत्तरकालीन ग्रंथकार

ख्यातः कृती सोऽपि च कालिदासः शुद्धा सुधा स्वादुमती च यस्य।
वाणीमिषाच्चण्डमरीचिगोत्रसिन्धोः परं पारमवाप कीर्तिः ॥

सोड्ढल कृत उदयसुंदरी कथा.

कालिदासाच्या ह्यातीत त्याच्या सुधामधुर ग्रंथांची प्रशंसा व प्रसिद्धि सर्वत्र झाली होती असें दिसतें. दानशूर गुप्त सम्राटांच्या आश्रयामुळें कीर्तीप्रमाणें धनाचीही प्राप्ति त्याला झाली होती. म्हणून भवभूतीप्रमाणें 'उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' असे असंतोषाचे व स्वकालीनांविषयी तुच्छतेचे उद्गार त्याने कोठेंही काढलेले दिसत नाहीत. त्याच्या निधनानंतर तर त्याची कीर्ति उत्तरोत्तर वृद्धिगत झाली त्याच्या ग्रंथांनी आबालवृद्धांस मोहून टाकलें. यावें प्रत्यंतर इ. स. च्या सहाव्या शतकापासून आजतागायत प्राचीन अर्वाचीन कवींनी जी त्याजवर स्तुतिसुमनांची वृष्टि केली आहे तीत दिसून येतें. त्यांपैकी कांही या ग्रंथाच्या शेवटीं संकलित केलीं आहेत.

पण या प्रत्यक्ष प्रशंसोद्गारांपेक्षा उत्तरकालीन ग्रंथकारांनी कालिदासाच्या ग्रंथांतील कल्पना व प्रसंग यांचें अनुकरण करून पर्यायाने जें त्याचें श्रेष्ठत्व कबूल केलें आहे त्याला विशेष महत्त्व आहे. कारण त्यावरून त्याच्या ग्रंथांच्या लोकप्रियतेची व प्रसाराची स्पष्टपणें कल्पना येते. कालिदासाच्या निधनानंतर लौकरच रचलेल्या वत्सभट्टीच्या मन्दोसर येथील प्रशस्तींत त्याच्या 'ऋतुसंहार' व 'मेघदूत' या ग्रंथांतील कल्पनाचें स्वच्छ प्रतिबिंब कसें दिसतें हें आम्ही मागें दाखविलेंच आहे. इ. स. च्या सहाव्या शतकांत गयेजवळ नागार्जुनी टेकडीवरील गुहेंत कोरलेल्या अनन्तवर्म नामक मौखरी राजाच्या कोरीव लेखांतील 'यस्माद्भूतसहस्रनेत्रविरहक्षामा सदैवाध्वरैः। पौलोमी चिरमश्रुपातमलिनां धत्ते कपोलश्रियम् ॥' या श्लोकांत रघुवंशांतील एका श्लोकाचें (६,२३) अनुकरण स्पष्ट दिसतें.

इ. स. च्या सातव्या शतकांतील भट्टिकाव्यांत व ऐहोळे येथील रविकीर्ति-कृत प्रशस्तींत अनेक ठिकाणी कालिदासीय कल्पनांचे पडसाद ऐकू येतात. त्या शतकांत केवळ हिंदुस्थानांतच कालिदासाची कीर्ति सर्वत्र पसरली होती असें नसून हिंदुस्थानाबाहेरही सागर ओलांडून ती गेली होती असें दिसतें. कारण त्या शतकाच्या आरंभीं कांबोडिया येथे कोरलेल्या भव-वर्म्याच्या खालील दोन श्लोकांत कालिदासाच्या कल्पना ओळखू येतात:—

शरत्कालाभियातस्य परानावृततेजसः ।
द्विषामसह्यो यस्यैव प्रतापो न रवेरपि ॥
यस्य सेनारजोधूतमुज्झितालंकृतिष्वपि ।
रिपुस्त्रीगण्डदेशेषु चूर्णभावमुपागतम् ॥*

उत्तरकालीन ग्रंथकारांनी कालिदासाच्या ग्रंथांतून कांही रम्य कल्प-नाच तेवढ्या आत्मसात् केल्या असें नाही. तर त्याच्या ग्रंथांतील अनेक प्रसंगही कालिदासीय ग्रंथांतील प्रसंगांवरून सुचलेले दिसतात. संस्कृत नाट्यवाङ्मयांत कालिदासाच्या खालोखाल भवभूतीचें स्थान आहे. किंबहुना हे दोन कवि समकालीन असून परस्परांचे प्रतिस्पर्धी होते अशी दंतकथा आहे. या कवीच्या काळांचा विचार करतां तींत कांही तथ्य दिसत नाही. इतकेंच नव्हे, तर भवभूतीने कालिदासाच्या नाटकांचा सूक्ष्मपणें अभ्यास करून त्यांतील मनोहर कल्पना, शब्दप्रयोग व प्रसंग यांचा मार्मिकपणें आपल्या नाटकांत उपयोग केला आहे असें दाखवितां येतें. 'मालतीमाधवां'त मालतीचें मन वळविण्याकरितां कामन्दकी दुष्यन्त शकुंतला व पुरूरवस् उर्वशी यांच्या प्रेमकथांचे दाखले देते, ते भवभूतीला कालिदासाच्या तद्विषयक नाटकांवरूनच सुचले असावेत. त्याच नाटकाच्या नवव्या अंकांत मालती एकदम अदृश्य झाल्यामुळें उन्मत्त होऊन माधव आपल्या प्रिय-तमेकडे संदेश नेण्याविषयीं मेघाची विनवणी करतो व हत्ती, वायु इत्या-दिकांस मालतीची वार्ता पुसतो तो प्रसंग कालिदासाच्या 'मेघदूत' व 'विक्रमोर्वशीय' या ग्रंथांतील तत्सदृश प्रसंगावरून सुचला असला पाहिजे. 'उत्तररामचरिता'च्या शेवटच्या अंकांत विविध कारणांनी कुश व लव हे आपलेच पुत्र आहेत अशी रामाची खात्री होते तो प्रसंग शाकुंतलाच्या

* रघुवंश ४,४९; ४, ५४ पहा.

शेवटल्या अंकांतील प्रत्यभिज्ञान प्रसंगासारखा दिसतो. याशिवाय 'गौरी-गुरोः पावनाः' यासारखे समान शब्दप्रयोग दिसतात ते निराळेच. या सर्व साम्यांवरून भवभूतीच्या नाटकांवर कालिदासीय ग्रंथांची कशी छाप पडली आहे तें दिसून येतें.

पण कांही झालें तरी भवभूतीचीं नाटकें कालिदासीय नाटकांच्या हुबेहुब प्रतिकृति नाहीत. त्याच्या रचनेंत सर्वत्र त्या विख्यात नाटककाराचें वैशिष्ट्य दिसून येतें. याच्या उलट हर्षाची प्रियदर्शिका व रत्नावली, राजशेखराची 'कर्पूरमञ्जरी' व 'विद्धशालभञ्जिका' व बिल्हणाची 'कर्ण-सुन्दरी' या नाटिका घ्या. त्यांची रचना सर्वस्वी कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' नाटकासारखी आहे असें दिसून येईल. कालिदासाच्या त्या नाटकानें संस्कृत वाङ्मयांत एका विशिष्ट नाट्यप्रकाराचा संप्रदाय उत्पन्न केला असें म्हणता येतें. कालिदासपूर्वकालीन भास कवीचें 'स्वप्नवासवदत्त' हेंही कांही अंशीं या प्रकारचेंच नाटक आहे. तथापि त्यांतील उदयन, वासवदत्ता व पद्मावती या मुख्य पात्रांसारखीं उदात्त स्वभावाचीं पात्रें हर्षादिकांच्या नाटकांत दिसत नाहीत; तर 'मालविकाग्निमित्रां'तील अग्नि-मित्र, धारिणी, इरावती, मालविका या प्रकारचीं पात्रेंच आपल्या नाटकांत उत्तरकालीन ग्रंथकारांनी घातलेलीं आढळतात. शिवाय त्यांच्या नाटकांतील घटनाही 'स्वप्नवासवदत्तां'तल्यासारख्या नसून 'मालविकाग्नि-मित्रां'तल्याप्रमाणें दिसतात. त्यावरून त्या नाटककारांनी कालिदासाचें वरील नाटकच आदर्श मानलें होतें यांत संशय नाही.

या सर्व नाटकांची उभारणी अन्तःपुरांतील कारस्थानावर केली आहे. त्यांत नायकाने आपल्या अन्तःपुरांत प्रच्छन्नरूपाने राहणाऱ्या एका राजकन्येवर अनुरक्त होणें, त्याच्या पूर्वपरिणीत राणीने मत्सराने त्या प्रेमांत विघ्नें आणणें, पुढे कांही निमित्ताने त्या राजकन्येचा पूर्ववृत्तांत उघडकीस येणें व नंतर तिचा राजाशीं विवाह होणें या कल्पना मुख्य दिसतात. नाटकाच्या शेवटी राजाच्या सैन्याला शत्रूवर विजय प्राप्त झाल्याचीही बातमी येते. पण या घटनेचा संविधानकाशीं जसा घनिष्ठ संबंध भास व कालिदास यांच्या नाटकांत दिसून येतो, तसा या इतर नाटकांत दिसत नाही. किंबहुना बिल्हण व राजशेखर यांचे आश्रयदाते राजेच

व त्या त्या नाटकांचे नायक असल्याने त्यांच्या विजयोत्सवांत किंवा विवाहसमारंभांत त्या नाटिकांची राजाज्ञेने निर्मिति झाली होती असें वाटतें. या नाटिकांत विजय व विवाह यांचा कसा तरी बादरायण सबध जोडून दिलेला दिसतो; त्यामुळें त्यांच्या संविधातकांत कार्यैक्य (unity of action) भासत नाही. स्वभावचित्रण व भाषा या बाबतीतही ही नाटकें 'मालविकाग्निमित्रा'पेक्षा कमी प्रतीची आहेत.

नाट्यवाङ्मयाप्रमाणें काव्यवाङ्मयांतही कालिदासाने एका संप्रदायाची स्थापना केली. त्याचें नितांतरमणीय 'मेघदूत' काव्य लोकाना इतकें आवडलें की इतर कवीही त्याचें अनुकरण करूं लागले. शे दीडशें वर्षांच्या अवधींत वायुदूत, भ्रमरदूत, हारीतदूत, चक्रवाकदूत, शुकदूत अशी अनेक दूतकाव्यें निर्माण झालीं. ही काव्यें सध्या उपलब्ध नाहीत, तथापि इ. स. च्या सहाव्या शतकांत होऊन गेलेल्या भामह नामक काश्मीर-देशीय आलंकारिकाने अशा दूतकाव्यांवर आपल्या ग्रंथांत कडक टीका केली आहे, त्यावरून त्यांचें तत्कालीन अस्तित्व अनुमानितां येतें. भामहाच्या टीकेस न जुमानतां उत्तरकालीन कवीनी दूतकाव्यांची रचना सुरू ठेविली. सध्या पन्नासावर अशी काव्ये पूर्णपणें उपलब्ध किंवा नाममात्राने ज्ञात आहेत. त्यापैकी बहुतेक सर्व इ. स. च्या अकराव्या शतकानंतरची आहेत. या काव्वांत उद्धवासारखा मनुष्य, शुक, कोकिल, चातक, चक्रवाक यांसारखे पक्षी, चद्र, वायु वगैरे सारखे अचेतन सृष्ट पदार्थ, मन, भवित यांसारखे अमूर्त पदार्थ किंवा कल्पना यांना दूत कल्पून तद्द्वारा काव्यनायक नायिकांनी आपला संदेश पाठविला आहे. यापैकी बहुतेक विप्रलंभशृंगारात्मक असून मन्दाक्रान्ता वृत्तांतच रचलीं आहेत. त्यांमध्यें अनेक स्थली मेघदूतातील कल्पना व शब्द यांचा उपयोग केलेला दिसतो. कांही कवींनी तर मेघदूतांतील प्रत्येक श्लोकाचा चौथा चरण घेऊन समस्यापूर्तीने आपल्या काव्याची रचना केली आहे. अर्वाचीनकालांत मेघदूताला पूरक अशी दोन काव्यें निर्माण झालीं आहेत त्यांचाही उल्लेख येथें केला पाहिजे. यांपैकी मेघप्रतिसदेश नामक एका दूतकाव्यांत यक्षपत्नीने मेघद्वारा प्रियकरास उलट संदेश पाठविला आहे, तर दुसऱ्या 'मेघदौत्य' नामक दूतकाव्यांत यक्षपत्नीने कुबेराला मेघद्वारा विज्ञप्ति

करून आपल्या पतीची सुटका करून घेतली असा कथाभाग वर्णिला आहे.*

मेघदूत अत्यंत लोकप्रिय झाल्यामुळें वैष्णव व जैन कवींनी स्वधर्मप्रसारार्थ त्याचा उपयोग केलेला दिसतो. वैष्णव कवींनी राम व सीता आणि कृष्ण व गोपी यांच्या प्रेमावर आपल्या दूतकाव्यांची उभारणी केली आहे. याच्या उलट जैन कवींच्या काव्यांत शांतरसाचें साम्राज्य दिसून येतें. इ. स. च्या आठव्या शतकांत जिनसेन नामक जैनकवीने आपल्या 'पार्श्वाभ्युदय' नामक काव्यांत 'मेघदूता'तील प्रत्येक ओळ समस्यापूर्तीने घेतली आहे. 'मेघदूत' काव्य पडलें शृंगारिक. त्यांतील चरणांचा जैनतीर्थङ्करांच्या चरित्रांत उपयोग करतांना कवीला अर्थाची बरीच ओढाताण व शाब्दिक कसरत करावी लागलेली दिसते; पण ती त्याने आनंदानें केली यावरून कालिदासाच्या काव्याने लोकांना कसें मोहित केलें होतें तें दिसून येतें. इतर जैन कवीनीही वरील कारणास्तव दूतकाव्याच्या रूपाने आपल्या आचार्यांस स्ववृत्तविषयक पत्रें पाठविलेलीं दिसतात.

'मेघदूता'त अनेक देश, नगरें, पर्वत, नद्या वगैरेंचें रम्य वर्णन आल्यामुळें त्याच्या हृद्यतेंत भर पडली आहे. कालिदासाने स्वतः देशपर्यटन करून किंवा तद्देशीय प्रवाशाकडून साक्षेपाने माहिती जमविली असल्याने त्याच्या काव्याला ऐतिहासिक दृष्टयाही महत्त्व आलें आहे. त्याचें अनुकरण करणाऱ्यांमध्यें तशी चौकस बुद्धि नसल्याने त्यांचीं काव्यें या दृष्टीने निरुपयोगी ठरतात. बहुतेक कवींनी भौगोलिक उल्लेख टाळले आहेत व ज्या थोडयांनी ते केले आहेत त्यांनाही त्या त्या स्थलांची प्रत्यक्ष माहिती नसल्याने त्यांचीं वर्णनें संशोधकांची दिशाभूल करतात. तेव्हा याही बाबतीत कालिदासाचें श्रेष्ठत्व दिसून येतें.

कालिदासाचे ग्रंथ भाषांतररूपाने युरोपांत ज्ञात झाल्यावर कांही युरोपीय ग्रंथांवर त्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम झालेला दिसतो. शाकुंतलाचें भाषांतर वाचल्यावर प्रसिद्ध जर्मन कवि गटे याला आपल्या 'फाउस्ट' या जगद्विख्यात नाटकाच्या आरंभीं संस्कृत नाटकांतल्यासारखी प्रस्तावना

*Chintaharan Chakravarti—*The Origin and Development of Dutakavya Literature in Sanskrit.* (*I.H.Q* Vol. III pp. 273–293.)

घालण्याची कल्पना सुचली. दुसरा जर्मन कवि शिलर यानें मेघदूत वाचल्यावर रचलेल्या आपल्या 'Maria Stuart' या काव्यांत कैदेत असलेल्या स्काटलंडच्या राणीने आपल्या कारागृहांतून एका मेघाला स्वदेशीं संदेश देऊन पाठविलें असें संविधानक घातलें आहे. असो.

विख्यात आंग्ल तत्त्वज्ञ व ग्रंथकार कार्लाइल याने आपल्या एका ग्रंथांत कधी काळीं शेक्सपीयर व हिंदी साम्राज्य यांपैकी एकाचीच निवड करणें जरूर झाल्यास आपण शेक्सपियरच पसंत करूं असें म्हटलें आहे. कार्लाईलचें हे मत आज प्रत्येक इंग्रज मान्य करील असें नाही. तथापि त्यावरून अभिजात ग्रंथकारांचें राष्ट्रांतील विचारी लोकांस किती महत्त्व वाटत असतें हें दिसून येईल. समृद्ध, स्वतंत्र व एकधर्मी इंग्लंडला शेक्सपियरचें महत्त्व वाटतें त्याच्या शतपट कालिदासाचें महत्त्व दरिद्री, पराधीन आणि विविध जाति, पंथ व भाषा यांनी विभागलेल्या हिंदुस्थानास वाटलें पाहिजे. धर्म, संस्कृति, भाषा याप्रमाणेंच अभिजात व सर्वमान्य ग्रंथकाराचीही राष्ट्राच्या एकीकरणास मदत होते. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे कालिदास होय. उत्तरेस पंजाबापासून दक्षिणेत मद्रासेपर्यंत व पश्चिमेस महाराष्ट्रापासून पूर्वेस बंगालपर्यंत सर्व प्रांतांच्या विद्वानांनी आत्मीयतेने कालिदासाचा काल, जीवित व ग्रंथ यांचीं गूढ रहस्यें उलगडण्यांत मदत केली आहे. हिंदु संस्कृति व संस्कृत भाषा यांचा युरोपीय विद्वानास प्रथम परिचय झाला तो कालिदासाच्या भाषांतरित शाकुंतलामुळेंच. आज समृद्ध व स्वतंत्र पाश्चात्य देशांत दरिद्री व परतंत्र हिंदी लोकांनी अभिमानाने सांगण्यासारख्या गोष्टींत कालिदासाच्या ग्रंथांचा समावेश केला पाहिजे. इंग्लंडचा शेक्सपीयर, जर्मनीचा गटे, इटलीचा डांटे याच्याप्रमाणेंच हिंदुस्थानच्या कालिदासासही जगताच्या कविमालिकेंत प्रमुख स्थान मिळालें आहे. अशा कविश्रेष्ठाचें ग्रंथ कोणता हिंदी मनुष्य अभिमानाने वाचणार नाही ?

—:o:—

कालिदासस्तुतिकुसुमाञ्जलिः ।

१. लिप्ता मधुद्रवेणासन् यस्य निर्विषया गिरः ।
तेनेदं वर्त्म वैदर्भं कालिदासेन शोधितम् ॥ दण्डिनः । (षष्ठशतकम्)

२. निर्गतासु न वा कस्य कालिदासस्य सूक्तिषु ।
प्रीतिर्मधुरसान्द्रासु मञ्जरीष्विव जायते ॥ बाणस्य । (सप्तमशतकम्)

३. एकोऽपि जीयते हन्त कालिदासो न केनचित् ।
शृंगारे ललितोद्गारे कालिदासत्रयी किमु ॥ राजशेखरस्य । (दशमश०)

४. अस्पृष्टदोषा नलिनीव दृष्टा हारावलीव ग्रथिता गुणौघैः ।
प्रियाऽकपालीव विमर्दहृद्या न कालिदासादपरस्य वाणी ॥श्रीकृष्णकवेः।

५. ख्यातः कृती सोऽपि च कालिदासः श्रद्धा सुधा स्वादुमती च यस्य ।
वाणीमिषाच्चण्डमरीचिगोत्रसिन्धोः परं पारमवाप कीर्तिः ॥
सोड्ढलस्य । (एकादशशतकम्)

६. साकूतमधुरकोकिलविलासिनीकण्ठकूजितप्राये ।
शिक्षासमयेऽपि मुदे रतलीलाकालिदासोक्तौ ॥ गोवर्धनाचार्यस्य ।
(द्वादशशतकम्)

७. पुरा कवीनां गणनाप्रसङ्गे कनिष्ठिकाधिष्ठितकालिदासा ।
अद्यापि तत्तुल्यकवेरभावादनामिका सार्थवती बभूव ॥ सुभाषितम्

८. काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्या शकुंतला ।
तत्रापि च चतुर्थोऽङ्कस्तत्र श्लोकचतुष्टयम् ॥ सुभाषितम् ।

९. वासन्तं कुसुमं फलं च युगपद् ग्रीष्मस्य सर्वं च यद्
यच्चान्यन्मनसो रसायनमतः सन्तर्पणं मोहनम् ।
एकीभूतमभूतपूर्वमथवा स्वर्लोकभूलोकयो-
रैश्वर्यं यदि वाञ्छसि प्रिय सखे ! शाकुन्तलं सेव्यताम् ॥
शर्मण्यदेशीय 'गटे' कवेः
(अष्टादशशतकम्)

१०. **कालिदासं प्रति** *

(भज गोविंदम्)

१

दिव्यो मोही विलसति विटपः कुञ्जो मञ्जुरयं परितः।
त्वमेव तत्र कवींद्र! प्रियया यौवनसिंहासने स्थितः॥
जगदिदमखिलं कालिदास! तव मरकतमणिमयपदपीठम्।
बृहन्नभ इदं तवैव मूर्धनि बिभर्ति छत्रं हेममयम्॥
ऋतुषड्वर्गच्छलेन नूनं षडिमा वारविलासिन्यः।
भ्रमन्ति कविवर! भवन्तमभितः सुललितलीलं नृत्यन्त्यः॥
मधूनि पात्रैः सदा नूतनैश्छवि नवनवां बिभ्रन्ति।
तृष्णामभिनवयौवनस्य ते प्रशमयितुं ताः सिञ्चन्ति॥
क्वापि न शोको न वा यातना न कोऽपि जन्तुर्विलोक्यते।
नान्तरेण तव राज्ञीं किञ्चित् त्वमेव राजा विराजसे॥

२

कवितावनितावितास! सम्प्रति कविः केवलं, नान्यस्त्वम्।
क्वासौ राज्ञो विदग्धपरिषद्? क्व च भवनं भवनो यातम्॥
क्व गतः सम्प्रति कालिदास! ननु महान् स नृपतिः स्वामी ते।
क्व च सावन्ती! हन्त न लेशः कस्याप्यधुना विलोक्यते॥
शश्वद्दिव्यानन्दस्यन्दिनि कुबेरनगरे कविनृपते!।
वसति सततं त्वं कृतवानिति लोकः सम्प्रति मन्त्रयते॥
यदाभ्रंलिहे शिखरिशेखरे सांध्यं ध्यानादनन्तरम्।
हर्षाकुलहृदयेन भगवता शिवेन ताण्डवमारब्धम्॥

---

*डॉ. रवीन्द्रनाथ टागोर यांच्या कालिदासविषयक कवितांचें इंग्रजी भाषांतर जून १९३२च्या मॉडर्न रिव्हयूच्या अंकांत प्रसिद्ध झालें होतें त्यावरून हा संस्कृत अनुवाद माझे विद्यार्थी मित्र श्री. ना. पु. वीरकर एम्. ए. यांनी केला आहे.

वारिपरिप्लुतमेघगर्जनाच्छलेन पटहध्वनिरभवत् ।
स्फुरत्कान्तिमद्विद्युद्बलयं तालैस्ताण्डवमनुगतवत् ॥
संस्तुतिगीतं त्वं च गीतवान्, अन्ते सदयं स्मित्वा स्वम् ।
श्रवणभूषणं मयूरपिच्छं गौर्या मूर्धनि ते निहितम् ॥

३

मनोहारिणी कुमारसंभवकथां गायता यावत्तौ ।
स्तूयेते स्म कवीश्वर ! भवता गौरीगिरिशौ भगवन्तौ ॥
तस्थुः परितः प्रमथाः सर्वे शान्ततमाश्च ततो मन्दम् ।
सायंतन्यो नीरदमाला आचक्रमिरे गिरिशिखरम् ॥
गगनमण्डले तडिल्लतासौ न विलासं निजमदर्शयत् ।
जलदानां वृन्दोऽपि समर्थो न तत्क्षणे गर्जितुमभवत् ॥
कण्ठमुन्नतं निजमवनमयन् कमनीयं च तथा बर्हम् ।
स्कन्दमयूरो देव्यास्तस्थौ गिरिजाया निकटे निभृतम् ॥
किमपि चकम्पे क्वचित्सुमन्दस्मितेन देव्या ओष्ठयुगम् ।
तदनु च शीघ्रं मुक्तवती सा दीर्घमलक्षितनिःश्वासम् ॥
क्षणे च तस्या नयनापाङ्गे जाते बाष्पैः परिप्लुते ।
व्रीडाकुलसम्भ्रान्तलोचना सपदि स्म च सा विलोक्यते ॥
ततस्तादृशीं देवीं गिरिजां कविकुलभूषण ! विलोकयन् ।
सपदि नीतवान् भवान् विरामं मधुगानं निजमसमाप्तम् ॥

४

सुखदुःखाशानिराशादिभिर्द्वन्द्वैर्वयमिव कदाचन ।
किमभूदभिभूतो न भवानपि कथय कवीश्वर सनातन ॥
उपजापा वा राजकुले किं प्रावर्तन्त न दिवानिशम् ।
प्रवृत्तं च किं हननं नासीत्कृपाणादिभिः प्रच्छन्नम् ॥

निर्घृणार्थितानिकारानयैः किं ते पीडा नैव कृता ।
तीव्रवेदनाकुले त्वयि गता किं वाऽनिद्रा नैव निशा ॥
निखिलमूर्धिन तव कविता विमला समुल्ललास स्वच्छन्दम् ।
मन्ये शोभापद्मं विकसितमभिप्रमोदप्रभाकरम् ॥
नैवापत्तिर्न चापि शोकः परमदारुणा न वा व्यथा ।
नैतताभिस्ते समवलोक्यते कविता क्वचिदपि कलङ्किता ॥
जीवितसिन्धुं प्रमथ्य गरलं प्राणहरं त्वं प्राशितवान् ।
उदीर्णाश्च ये सुधातुषाराः समन्ततस्तान् विकीर्णवान् ॥

रवीन्द्रनाथ ठक्कुरस्य (विंशं शतकम्)

समाप्त

कांही संदर्भ ग्रंथ व लेख

[ग्रंथांच्या नांवांपुढे अर्धवर्तुलाकृति कंसांत दिलेले संक्षेप प्रस्तुत पुस्तकांत घातले आहेत.]

(अ) कालिदासाचे ग्रंथ

१. **ऋतुसंहार** (ऋतु०) [निर्णयसागर प्रेस]
२. **कुमारसंभव** (कुमार०) [निर्णयसागर प्रेस]
३. **मेघदूत** (मेघ०) [संपादक का. बा. पाठक]
४. **रघुवंश** (रघु०) [सं० गो. र. नदंगींकर]
५. **मालविकाग्निमित्र** (माल०) [सं० कै. शि. म. परांजपे]
६. **विक्रमोर्वशीय** (विक्र०) [सं० शं. पां. पंडित]
७. **शाकुन्तल** (शाकु०) [सं० प्रो. अ. बा. गर्जेंद्रगडकर]

(आ) मराठी भाषांतरें

१. **रघुवंश** (पद्यात्मक भाषांतर) – गणेशशास्त्री लेले त्र्यंबककर
२. **महाराष्ट्र शाकुन्तल** – श्री. के. वि. गोडबोले
३. **मराठी शाकुन्तल** – कै. ल. ग. लेले

(इ) मराठी चर्चात्मक ग्रंथ

१. **संस्कृतकविपंचक** – विष्णु कृष्ण चिपळूणकर
२. **साहित्यसंग्रह** – कै. शि. म. परांजपे
३. **विक्रमोर्वशीय सार व विचार** – कै. मा. व्यं. लेले
४. **शाकुन्तल सार व विचार** – „ „

(ई) संस्कृत ग्रंथ

१. **बुद्धचरित** (बुद्ध०) अश्वघोषकृत [सं० प्रो. कोवेल]
२. **सौंदरनन्द** „ [सं० जॉन्स्टन्]
३. **स्वप्नवासवदत्त** भासकृत [सं० म. म. गणपति शास्त्री]
४. **प्रतिमा** „ [सं० म. म. गणपति शास्त्री]
५. **सेतुबन्ध** प्रवरसेनकृत [निर्णयसागर प्रेस]
६. **भरतचरित** श्रीकृष्ण कविकृत [त्रिवेंद्रम् संस्कृत सीरीज]
७. **काव्यमीमांसा** (का० मी०) राजशेखरकृत [गायकवाड ओरिएंटल सीरीज]
८. **कामसूत्र** (का० सू०) वात्सायनकृत [निर्णयसागर प्रेस]

९. ज्योतिर्विदाभरण
१०. शिवपुराण
११. मत्स्यपुराण
१२. पद्मपुराण
१३. कथासरित्सागर सोमदेवकृत (निर्णयसागर प्रेस)

(ड) इतर भाषांतील ग्रंथ

1. K. C. Chattopadhyaya : *The Date of Kalidasa*
2. Lachhmidhar Kalla : *The Birth-Place of Kalidasa*
3. Aravinda Ghose : *Kalidasa*
4. S. C. De : *Kalidasa and Vikramaditya*
5. Hillebrandt : *Kalidasa* (German)
6. H. D. Sarma : *Padmapurana and Kalidasa*
7. A. B. Keith : *A History of Sanskrit Literature*
8. A. B. Keith : *The Sanskrit Drama*
9. M. Winternitz : *Geschichte der indischen Litteratur*
10. Cambridge History of India, Vol. I, Ancient India
11. V. Smith : *Early History of India* (E.H.I)
12. R. G. Bhandarkar : *Vaishnavism, Shaivism and other Minor Religious Systems*
13. ,, ,, : *A Peep into the Early History of India*
14. K. S. Aiyangar : *Studies in Gupta History*
15. Fleet : *Gupta Inscriptions* (G. I.)
16. *Archeological Survey of Western India* : (A. S. W. I.)
17. H. C Chakladar : *Social Life in Ancient India*

(ऊ) शिवाय खालील नियतकालिकांतील कोरीव व चर्चात्मक लेख —

Epigraphia Indica (Ep. Ind.); Indian Antiquary (Ind. Ant.); Annals of the Bhandarkar Institute; Journal of the Royal Asiatic Society (J. R. A. S.); Indian Historical Quarterly (I. H. Q); Journal of the Bihar and Orissa Research Society (J. B. O. R. S.); भारत इतिहास संशोधक मंडळाचें त्रैमासिक (भा. इ. सं. मं.); शारदाश्रम वार्षिक, यवतमाळ; विविधज्ञान-विस्तार (वि. ज्ञा. वि.); लोकमान्य, हिंदुस्थान अंक इत्यादि.

सूची

अग्निमित्र, ११, १४५–१६१
अभिनंद, ९,३६,७३
अमरकोश, २४, २६
अर्थशास्त्र, २७२
अमितगति, १३
अमृतानंद, ९७
अलेक्झांडर, १४,४२
अलबेरुणी, २८
अवेस्ता, २७
अशोक, ९,४३
अश्वघोष, १९, ४७,९७; त्याच्यी काव्यें, त्यांचे गुण व दोष ९७–९८, २५१; त्याच्या नाटकांचे अवशेष,१४०; — आणि कालिदास १९–२४, ९८–९९; —आणि भास १४२
अष्टाध्यायी, १४,१४०
आगाशे ग. ज., १७७ टीप
आनंदवर्धन, ९४ टीप, १०८,१९७ टीप, २१६,२१७,२१८,२१९,२२०,२४९
आंध्र राजे, ४५–४७; त्यांचा बौद्धधर्मास आश्रय व प्राकृतभाषेस उत्तेजन, ४६,४८
आपटे र. ना. १२
आर्यक्षेमीश्वर, १७० टीप.
आश्रमांतील जीवनक्रम २८०–२८१
ईश्वरप्रत्यभिज्ञाविमार्शिनी, ६३
उत्तररामचरित,७०,२३६
उपनिषदें, ७७, २५९–२६१
उरगपुर, १५,१६,१७
उरैयूर,१६
ऋग्वेद, ७७,१३९; त्यांतील काव्य ९६; त्यांतील पुरूरव्याची कथा १७०
ऋतुसंहार, २४, ९५; त्याचा कर्ता १००; नागरकसमाजांत त्याची रचना १०१; त्यांतील उत्कृष्ट स्थळें १०१–१०२; अलंकार, गुण व दोष १०३; –व रामायणांतील ऋतुवर्णन १०३–१०४
ऋषभदत्त, १३
ऐतिहासिक ग्रंथ, संस्कृत, ९
ऐयंगार कृष्णस्वामी, ३९
ओक शि. का., २८
ओगले के. ल., ८३ टीप, ८५, व टीप.
औचित्यविचारचर्चा, ३७, ९५
कथासरित्सागर, १३,१५६,१५७,१७१
कनिष्क, ४७, ६०
कला, लक्ष्मीधर, ६२, ६५
कल्हण, ९,२८,३५,६५
काकुस्थवर्मन्, ३८
कादंबरी, २२२,२२७
कामन्दक, ५४
कामसूत्र, ३५,४८,१७५; –व शाकुंतल ३५, ८०; त्याचा काल ३५
कात्यायन, २५२
कार्लाईल, २९०
कालकाचार्यकथानक, १३
कालगणनापद्धति, ६०,६१
कालविपर्यास, १६

कालिदास—त्याच्या कालाच्या दोन मर्यादा ११, तत्कालविषयक मतें व त्यांचें परीक्षण—खि. पू. १ लें शतक १२–२६;खिस्तोत्तर पांचवें शतक २६-२७;खिस्तोत्तर सहावें शतक २७–३३; खिस्तोत्तर चौथें–पांचवें शतक ३३,–४१; तत्कालीन परिस्थिति ५०–५५; २५७,२५८;त्याच्या जन्मस्थानाविषयीं विविध मतें व त्यांचें परीक्षण–बंगाल ५७–६२; काश्मीर ६२–६७,६८; मंदोसर ६८–६९; उज्जयिनी ६९; त्याच नांव ५८–५९,६५; चरित्र-विषयक आख्यायिका ७०–७४; त्याची जात ७४–७५; त्याचें शिक्षण ७५; त्याचा विविध शास्त्रांचा व विद्यांचा व्यासंग ७७–८२; त्याची कला-भिज्ञता ८२–८५; त्याचें इतिहास-भूगोलविषयक बिनचूक ज्ञान, ८५–८६; त्याचा प्राचीन काव्यांचा अभ्यास, ७८; त्याचा स्वभाव, ८७–८८; त्यांचें चारित्र्य, ८८–९०; दरबारी शिष्टाचाराचें ज्ञान ९०–९१; त्याचा विनय व स्वाभिमान, ९१–९२,१७७; त्याची राहणी, ९२–९३; त्यांचें आयुर्मान, ९३–९४; त्याचा ग्रंथसमुदाय, ९५; काव्यविवेचन—ऋतुसंहार, १००-१०४; –कुमारसंभव, १०५-११३;–मेघदूत, ११३–१२२; २८८–२८९;–सेतुबंधरचनेंत प्रवरसेनास मदत, १२३;–रघुवंश, १२४–१३८;–नाटकांचें परीक्षण—मालविकाग्निमित्र, १४४–१६१;–विक्रमोर्वशीय, १६१-१७६;–शाकुंतल,१७६–२१६;–त्याच्या ग्रंथांचे विशेष–ध्वनि, २१८-२२०;–रस, २२०–२२१;–रीति, २२१–२२३; —अलंकार–अनुप्रास, २२३; –यमक, २२३–२२४; –श्लेष २२४–२२५; –स्वभावोक्ति २२६; –उपमा, २२६–२३०;–रूपक, २३१; –उत्प्रेक्षा, दृष्टान्त व अर्थान्तरन्यास, २३१–२३२;–संविधानकरचना २३२; –पुरुषपात्रें, २३२–२३३;–स्त्रीसृष्टि, २३३–२३६;–सृष्टिवर्णन, २३६–२३८; –विनोद २३८–२४४; उणीवा २४४–२४९; कालिदास व दैववाद, २४८; दोषविचार, २४९–२५५;–अश्लीलता, २५०;–च्युतसंस्कृतित्व, २५१;–अनौचित्य २५३;–रसदोष, २५४–२५५; तत्त्वज्ञानविषयक विचार, २५८–२६२; —व काश्मीरी शैवमत, २६३; समाजविषयक विचार, २६७–२७०; राजकारणविषयक विचार २७०–२७८; शिक्षणविषयक विचार,२७८–२८४;—व उत्तरकालीन ग्रंथकार, २८५–२९०; त्याची इतरांनी केलेली स्तुति २९१–२९४

काली, ५८–५९

काव्य,–उत्पत्ति व विकास ९६; कालिदासपूर्वकालीन, ९६–१००; व्याख्या, २१७; विविध मतें, २१७;कालिदासोत्तरकालीन २८८–२८९

काव्यप्रकाश, २१६

काव्यमीमांसा, ३६, ३८, ७६, ७८, ९२

काव्यालंकारसूत्रवृत्ति, ३२, २१८, २२१

कीथ, प्रो., ३२, ३४, २४५, २४६, २४७

कीलहॉर्न, १३, ३४

कुन्तक, २१८

कुन्तलेश, ३७–३९, ४०

कुन्तलेश्वरदौत्य, ३७, ९५
कुमारगुप्त, ३४, ४१, ५२, ६१, १६१
कुमारदास, ७१–७४
कुमारसंभव, ४१; रचनाप्रसंग १०४, १६१; त्यांचें कथानक १०५–१०८; त्याच्या उत्तरभागाचा कर्ता, १०८; त्यांतील प्रमुख पात्रांचें स्वभाववर्णन १०९; कांहीं उत्कृष्ट स्थळें ११०–११२;–व शिवपुराण ११२
कुशान राजे, ४७, ५२
कोवेल, १९
खारवेल, १९
कौटिल्य, २७२, २७३
गर्गसंहिता, ४४–४५
गटे, १३८,१७६,१७७,२४५, २८९
गुप्तराजे, १९,५०
गुप्ते, य. रा., ३९
गौतमापुत्र सातकर्णी, १३,४६
ग्रीक राजे–बॅक्ट्रिया येथील; त्यांच्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या ४४–४५
चट्टोपाध्याय क्षेत्रेशचंद्र,१२, १७, १९
चण्डकौशिके, १७०टीप
चन्द्रगुप्त मौर्य,४२–४३
चन्द्रगुप्त द्वितीय, ९, १४, ३८, ३९, ४०, ४१, ७४, १६१; शकारि ३६; त्याची विद्वत्ता, दातृत्व इ. ३६,५४; त्यांचें साहस ५१, ५२; ध्रुवस्वामिनीशीं विवाह ५२; वाकाटकांशीं संबंध ५३; दिग्विजय ५३; त्याच्या राज्यांत हिंदुधर्माचा प्रसार, संस्कृत विद्येचा उत्कर्ष व ललितकलांची ऊर्जितावस्था, ५४–५५; त्याच्या राज्यांतील शांतता, सुव्यवस्था व संपन्नता ५५; कालिदासाशीं प्रथम संबंध १४४, १४५
चन्द्रगुप्त प्रथम, ३२, ५०
जयदेव, २२०, २३८, २३९
जातक ग्रंथ, १९९
जानकीहरण, ७१, ७३
जोन्स सर वुइल्यम, २४५
ज्योतिर्विदाभरण, ३२–३३,६०
टुल्लू आर. व्ही., ७० टीप
तैत्तिरीयब्राह्मण, १३९
दंतकथा, कालिदासविषयक, १०, ७०–७४
दिङ्नाग,३१;–आणि कालिदास३१–३२
देवीचन्द्रगुप्त, ५४
ध्वनिकार, २२३
ध्वन्यालोक, ९४ टीप, १०८,१९७ टीप, २१६,२१७,२१८,२२१
नलोदय, ९५
नवसाहसांकचरित, ९,२०
नहपान, १३, ४५
नागरक, त्यांची विलासप्रियता व कलाभिज्ञता १०१; त्यांचा ललितकलांस आश्रय १०१; बाहेरख्यालीपणा १७५; त्यांच्या साध्वी स्त्रिया १७५; कालिदासाच्या ग्रंथांतील उल्लेख,१०१,११४ १७५
नाट्यकला–उद्गम व उत्क्रांति१३९–१४०; कालिदासपूर्वकालीन नाट्यवाङ्मय, १४०–१४४; कालिदासोत्तरकालीन २८६–२८८
निचुल, ३२
निरुक्त, ३१
नीतिसार, ५४

नीलमतपुराण, ६३–६४, ६६
पतंजलि, ४३, ९६, २५२
पद्मगुप्त, ९, २०
पद्मपुराण, १३७, २०२–२०४
परांजपे, शि. म., १७, ६८
प्रत्यभिज्ञाशास्त्र, २६४; –व वर्णाश्रमधर्म २६५
पाठक, का. बा., १२, २७
पाणिनि, १४,१३९,२५१,२५२
पाण्ड्य राजे, १५–१७
पुष्यमित्र, ११, १८, ४३, ४४; त्याचा अश्वमेध, ८५–८६, १४५
प्रचण्डपाण्डव, १७० टीप
पंचरात्र, १४१, १४३, १५७
प्रतिमा नाटक, १३७, १४१, १४३
प्रत्यभिज्ञादर्शन, ६३, ६६–६७
प्रभावतिगुप्ता, ३९, ५३, ५९
प्रवरसेन द्वितीय ३९, ५३, ५४, ६१, ९३, ९५; –आणि मातृगुप्त २९–३०; कुन्तलेश ३८–४०; त्याचें सेतुबंध काव्य, २९–३०, ४०, १२२–१२३
फा ह्यायन्, ५५
फ्लीट, डॉ., ३४
बाण, ९, १०, ११, १८, ४०, ७३, ७५, २१६, २१९, २२२, २२७
बिल्हण ९, १०, ६५
बुद्धचरित, २०–२४, २५, ९६, ९७–९८, २५०, २५२
बुल्हर ३४, ९९
बृहत्कथा, १३, १५६, १७१, १७२
बृहत्कथामञ्जरी, १३, १५६
बृहद्रथ मौर्य, १८, ४३
बौद्धधर्म–त्यास राजाश्रय ४३,४६; त्यास लोकाश्रय ४८
भगवद्गीता, ७७,२५९,२६२,२६६,२६७
भरत मुनि, १३९, २१७
भरतचरित, ४०
भवभूति, १०, ११, ५९, २१९, २२० २२३, २३६, २५१, २८६
भागवत पुराण, १७१
भांडारकर रामकृष्णपंत, १२, १४, ५९, २६३
भामह, ६५, २१८, २५६
भारवि, ११, ८६
भास ४८,१३७,१३८,२३५,२५१,२८७; त्याच्या नाटकांची उपलब्धि व त्यांचें भासकर्तृकत्व १४१, १४२; त्याचा काल १४२; त्याच्या नाटकांचे गुण व दोष १४२,१४३; –व कालिदास १४३–१४४; –व शूद्रक १४४
भीटा येथील रेवाळ मातीचें पदक २४-२५
भोज, ९,११,३७,३८
भोजप्रबंध, १०, ११
मॅक्डोनेल, ३२, ३४
मॅक्समूलर, १२, २७
मत्स्यपुराण, १७२
मदुरा, १६–१७
मम्मट, ६५, २१६, २१९, २२२
महाभारत, ४९, ७८, ९६, १९५, १९६ १९७, २३०, इ.
महाभाष्य ४३,७९,९६; त्यांतील काव्यांचे उतारे ९६
मातृगुप्त, २८–३०
मालतीमाधव, ५९, २२३, २३६
मालवगण, १३, १४, १५
मालविकाग्निमित्र–त्याचा रचनाकाळ, ४०; त्याच्या प्रस्तावनेतील इतर नाटककारांचे उल्लेख, १३९; त्याचा

रंगभूमीवर प्रथम प्रयोग, १४५; —व स्वप्नवासवदत्त, १४५–१४६; विद्वत्परिषदेचा निर्णय १४५–१४६; नाटक कालिदासाचेंच १४६; त्याचें संविधानक १४६–१५६; त्यांतील ऐतिहासिक घटना १५६; त्यांतील अनावश्यक उल्लेख १७–१८; त्याच्या संविधानकास बृहत्कथेचा आधार १५६–१५७; त्यांतील पात्रांचें स्वभाववर्णन १५७–१६१; त्यांतील भाषा १६१; त्यामुळें कवीस राजाश्रय १६१; —व उत्तरकालीन नाटके २८७–२८८
मिहिरकुल, २८
मृच्छकटिक १४०, १४४
मेघदूत—रचनाकाल ४०; त्यांतील हूणांचा उल्लेख, २६; त्याचें कथानक, ११३; कांही उत्कृष्ट स्थळें, ११८–११९; त्यांतील अलंकार, रस व वृत्त, ११९–१२०; रामगिरीचा शोध, १२०–१२१; —व रामायण १२१–१२२; –व उत्तरकालीन काव्यें, २८८–२९०
मेण्ठ, ३६
यशोधर्मन् २८, ३३
याज्ञवल्क्यस्मृति, ४९, ७६
रघुवंश—कथानक १२४–१३४; अपूर्ण काव्य, १३४–१३५; त्याची रचना, १३५–१३६; इतर काव्यांशीं तुलना १३५;—व पुराणें १३६–१३७; त्यांतील रसपरिपोष, १३७–१३८; भाषा, अलंकार व वृत्तें, १३८
रविकीर्ति, १२
राजतरंगिणी, ९, २८, २९, ६५
राजशेखर, ९, १०, १९, ३३, ३६, ३८, ७६, ७८, ९२, ९४, ९५, १४४, १७०टीप
रामगुप्त, ५१; त्यांची पदच्युति, ५२
रामगिरि, रामटेक, ३९, १२०–१२१
रामायण, २१, २२, ४९, ७८, ९६, १०३, १०४, १२१, १३६
रामिल, १४४
रुद्रदामन्, ४८, ९७
रुद्रसेन द्वितीय, ५३; त्याचा प्रभावतिगुप्तेशीं विवाह ३९, ५३; त्याचें विष्णूपासकत्व, ५९
रे, शारदारंजन, १२, १९, २५
ललितविस्तर, २७
लेले, का. कृ., २८
वत्सभट्टि ३४;– व कालिदास ३४, १००
वराहमिहिर, ३०, ३१, ३२;—आणि कालिदास, ३०–३१
वसुबंधु, ३१, ३२
वाकाटकवंश, ३९, ४०, ५२, ५३
वामन, ३२, २१८, २२१, २२२
वात्स्यायन, ३५, ४८, १७५
वायुपुराण, १३६.
वासुदेव कवि, ९५
विक्रम संवत् १२–१५
विक्रमादित्य, ९, १२–१५, २८–३०, ३२, ३६, ३८, ४०, ४१, १६३
विक्रमोर्वशीय,—रचनाप्रसंग १६१; नाटकाच्या नांवाची साभिप्रायता १२, १७०; त्याचें संविधानक, १६१-१७२; त्याच्या कथानकाचे मूळ आधार—ऋग्वेद व शतपथ ब्राह्मण १७०–१७१; बृहत्कथा व कथासरित्सागर, १७१; कवीनें केलेले फरक १७२; —व मत्स्यपुराण १७२–१७३; भाषा १७३; पात्रस्वभाववर्णन १७३–१७४
विद्धशालभंजिका, ९

विशाखदत्त, १८, ५४
विंटर्निट्झ्, ११३, २०२
विष्णुपुराण, ९३, १३६, १७१
वैदर्भी रीति, ६७
वैद्य, चिंतामणराव १२, १६
वैशेषिकदर्शन, ७८
वंशु, २६
शक लोक १३, १५, २८, २९, ५२
शतपथ ब्राह्मण, ७७, १७०, १७१
शाकुंतल–त्याचें पहिलें इंग्लिश भाषांतर १७६; गटेनें केलेली स्तुति १७६; पाठपरंपरा १७७; प्रस्तावना १७७; संविधानक १७७–१९४; संविधानकाचा मूळ आधार–महाभारत १९५; कवीनें केलेले फरक व त्यांचीं कारणें १९७–२०२; दुर्वासशाप १९७; मुद्रिकेची कल्पना १९९; तत्सदृश एक ग्रीक कथा २००;—व पद्मपुराण २०२–२०४; कथानकाची सुसंबद्धता २०४; प्रसादयुक्त व रम्य भाषा २०४–२०५; रसोत्कर्ष २०५; स्वभावचित्रें २०६–२१६; डॉ. रवीन्द्रनाथांनी काढलेलें सार २०८; त्याचें परीक्षण २०८–२०९;–व फाउस्ट २८९;
शालिवाहन शक, १४, ४७
शिलर, २९०
शिलादित्य, २८–२९
शिवपुराण, ११२
शुक्रनीति, ७९
शुंग राजे, ११, १८, १९
शूद्रक, १४४, २४५
शृंगारप्रकाश, ३७, ९५
संस्कृत भाषा, शुंग व काण्व राजांचा आश्रय, ४३–४४; तींतील ग्रंथांचा नाश ४५; तिच्याकडे सातवाहनांचें दुर्लक्ष ४६; तिला क्षत्रपांचा आश्रय; तिचा गुप्तसाम्राज्यांत उत्कर्ष, ५४
सत्तसई, हालरचित, १३
स्पंदशास्त्र, २६३–२६४
समुद्रगुप्त, ९, ३२; त्याचा दिग्विजय, ५०; त्याचा हिंदुधर्मास व संस्कृत विद्येस आश्रय, ५१, ७४
सारिपुत्रप्रकरण, २५८
सातवाहन राजे, ४६, ६०
साहित्यदर्पण, २१७, २२०
सुदर्शन राजा, ९३
सुभाषितरत्नसंदोह, १३
सेतुबंध, २९–३०, ४०; त्याचा कर्ता १२२; त्याच्या रचनेंत कालिदासाची मदत, १२३
सोड्ढल, ७३, १३७
सौंदरनंद, २०, ४८, ९७, २५८
सौमिल्ल, ४८, १३८, १४४
स्कंदगुप्त, ३६, ११२
स्वप्नवासवदत्त, १४१, १४२, १४५, २३५
हरप्रसाद शास्त्री, १२, २८, ६८, ७५
हरिषेण ५०, ७४, ९९; तत्कृत प्रशस्ति, ९९, ११०
हर्षचरित, ९, ११, १४, १८, ४०, ७५, २१६, २२२
हिंदुधर्म—त्याला शुंग व काण्व राजांचा आश्रय ४३–४४; त्याची पुनर्घटना, ४९, २५७; अहिंसातत्त्वाचा स्वीकार ४९
हूण २६-२८, ६५; त्यांची लिपि २७; ऑक्सस नदीच्या काठीं राज्य २७
हेरास, फादर, ३८
हॉएनत्संग, २८
क्षत्रप, ५२, ५३, ६०, ६१, ९७, १४५